

कैलासवासी
सखाराम निळकंठ पटवर्धन
यांचे स्मरणार्थ,
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,
या संस्थेस नजर.

[ काव्येतिहास-संग्रह. ]

११.

# मोरोपंतकृत

## प्रकरणें—भाग १.

हा

जनार्दन बाळाजी मोडक, बी. ए. (डेक्कन कॉलेज)

यांणीं

पंतांचें चरित्र व विपुल टीपा यां सह

प्रकाशित केला.

श्रीमन्मयूरकविची देते संतोष मानवां कविता ।
असता जरि भूमीवरि सुरगुरु तरि तोहि मान वांकविता ॥

शके १८०९.

# मोरोपंती प्रकरणांची अनुक्रमणिका.


| अनुक्रमांक. | प्रकरणाचें नांव. | पृष्ठ. | ग्रंथसंख्या. | वृत्त. |
|---|---|---|---|---|
| १. | मोरोपंताचें चरित्र. | १. | | |
| २. | पूर्णमंत्र भागवत. | १६. | १०९. | आर्या. |
| ३. | गोपी गोडवा. | २५. | ६९. | ,, |
| ४. | मारुति स्तुति. | ३०. | ३०. | अनुष्टुभ्. |
| ५. | दुर्वासभिक्षा. | ३३. | २३६. | ओव्या. |
| ६. | भृगुचरित्र. | ४५. | ४७. | श्लोक. |
| ७. | दशावतार. | ५०. | १०. | आर्या. |
| ८. | श्रीनाथ चरित्र. | ५१. | २६. | ,, |
| ९. | दुर्गास्तव. | ५३. | ४१. | ,, |
| १०. | ध्रुवचरित्र. | ५६. | १०७. | साक्या. |
| ११. | प्रश्नोत्तर रत्नमाला. | ६३. | ७९. | आर्या. |
| १२. | राजापुरस्थ गंगा प्रतिनिधि. | ६९. | २६. | ,, |
| १३. | सन्मनोरथराजि. | ७१. | ७१. | ,, |
| १४. | श्रीविठ्ठलप्रणिधि | ७६. | ४१. | ,, |
| १५. | श्री काशीस्तुति | ७९. | २६. | ,, |
| १६. | भगवद्गीतास्तुति | ८१. | १५. | ,, |
| १७. | साधुस्तव. | ८३. | ८. | ,, |
| १८. | महिपति स्तुति. | ८३. | १३. | ,, |
| १९. | सत्संगस्तव. | ८५. | ६०. | ,, |
| २०. | मुरलीपंचक. | ८९. | ५. | ,, |
| २१. | नामसुधाचषक. | ९०. | १२६. | ,, |
| २२. | रामगीति. | ९३. | १०३. | ,, |
| २३. | विष्णुपदवकौली. | १०७. | १००. | ,, |
| २४. | भस्मासुराख्यान. | ११४. | ४२. | श्लोक. |
| २५. | साधुगीति. | १२०. | ५०. | आर्या. |
| २६. | पदें. | १२३. | ३. | पदें. |
| २७. | वामनादि कीर्तन | १२४. | ४. | अनुष्टुभ्. |
| २८. | श्रीकृष्णा माहात्म्य. | १२५. | १०. | अनेक वृत्तें. |
| २९. | पदें. | १४०. | ३. | पदें. |
| ३०. | विठ्ठल स्तोत्र. | १४१. | १२. | श्लोक. |
| ३१. | गोपीगोडव्याच्या शेवटचीं पदें. | १४२. | २. | पदें. |
| ३२. | राधाकृष्ण संवाद. | १४३. | ४७. | आर्या. |
| ३३. | रामप्रार्थना. | १४६. | ४०. | अनुष्टुभ्. |
| ३४. | हरिहरस्तव. | १४९. | ११. | आर्या. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५. | पद. | १५०. | २. | पदें. |
| ३६. | दत्तदयोदय. | १५०. | १०२. | आर्या. |
| ३७. | पद. | १५७. | १. | पद. |
| ३८. | दत्तात्रेयाची आरती. | १५८. | १. | आरती. |
| ३९. | पतिव्रता कीर्तन. | १५८. | ५१. | आर्या. |
| ४०. | पुंडरीक प्रार्थना. | १६०. | ३७. | अनुष्टुभ्. |
| ४१. | विठ्ठलविज्ञापना. | १६३. | ६७. | ,, |
| ४२. | प्रार्थना. | १६८. | १०. | ,, |
| ४३. | मुक्तांजलि अथवा गुरुस्तुति. | १६८. | ११०. | आर्या. |
| ४४. | सवाया. | १७६. | ६. | सवाया. |
| ४५. | अवतारमाला. | १७७. | ३१०. | आर्या. |
| ४६. | गंगास्तव. | २०१. | ३७. | श्लोक. |
| ४७. | आरती. | २०६. | १. | आरती. |
| ४८. | विठ्ठलपदपद्मस्तुति. | २०६. | ६. | आर्या. |
| ४९. | बालमंत्ररामायण. | २०६. | २७३. | ,, |
| ५०. | त्रिस्थळी यात्रा. | २२६. | १५. | ,, |
| ५१. | श्रीगुरुस्तुति. | २२७. | ११. | ,, |
| ५२. | द्विचत्वारिंशल्लिंगयात्रा. | २२८. | ४३. | ,, |
| ५३. | साधुसत्कार. | २३१. | ३५. | ,, |
| ५४. | गंगावकीली. | २३४. | १०९. | ,, |
| ५५. | उपसंहार. | २४१. | | |


एकूण २९८१.

प्रथम ... श्री ... १४

श्री

# मोरोपंत.

(इ० स० १७२९–१७९४.)

**श्रीमन्मयूर** कविची, देते संतोष मानवा कविता ।
. असता जरि भूमीवरि, **सुर-गुरु** तरि तोहि मान वांकविता ॥ १ ॥

रत्नागिरी जिल्ह्यांतील **राजापूर** तालुक्यांत मौजे सौंदाळ या गांवीं **मोरो**पंतांचे पूर्वज राहत होते. तेथून त्यांच्या पूर्वजांपैकीं एकजण घाटावर **पन्हळ**गड येथें राहावयास गेला. परंतु त्याचें नांव काय व तो कधीं गेला हें मुळींच समजत नाहीं. **पन्हळगडास** अद्यापि **मोरो**पंतांचा घरटा लोक दाखवितात असें ऐकिवांत आहे. **मोरो**पंतांचे वडील **रामाजी**पंत पराडकर हे **कोलापूर** दरबारीं चाकरीस होते. **मोरो**पंतांचें जन्म **पन्हळगडीं** शके १६५१ **सौम्यनाम** संवत्सरीं झालें. त्यांच्या ज्येष्ठ बंधूंचें नांव **राघो**पंत ऊर्फ सोनाजीपंत, कनिष्ठ बंधूंचें नांव आबाजीपंत, व मातोश्रींचें नांव **लक्ष्मीबाई** असें होतें. ते जातीचे **कऱ्हाडे** ब्राह्मण होते. त्यांस दोन बायका होत्या. वडील रमाबाई व धाकटी आनंदीबाई. रमाबाईचे नेत्रांस कांहीं विकार असल्यामुळें बंधूंचे आग्रहास्तव त्यांनीं दुसरें लग्न केलें. त्यांपैकीं रमाबाईस मात्र संतति झाली. त्यांस रघुनाथपंत व रामकृष्णपंत असे दोन पुत्र आणि एक कन्या होती. रघुनाथपंतांस लष्कर ग्वाल्हेरीस नौकरी होती. त्यांचा वंश तिकडे आहे. रामकृष्णपंतास, त्यांचे चुलत सासरे विठ्ठल उपाध्याय यांनीं निजामाचे दिवाण चंदूलाल यांजकडून कांहीं गांवची जाहागीर देवविली ती अद्याप चालत आहे.

**रामाजी**पंतांनीं आपले मोतद्दारास कांहीं अपराधास्तव पैसा तापवून डाग दिला. पुढें राजानें मात्र करावयास योग्य असा दंड आपण आपले सेवकास केल्याबद्दल आपणास शासन होईल या भीतीनें ते **कोलापूर** सोडून निघाले ते **बारामतीस बाबूजी नाईक जोशी** जाहागीरदार, **बाळाजी विश्वनाथभट** पेशवे यांचे जामात, यांचे घरीं पागेचे कामावर राहिले. इकडे **मोरो**पंत हे पित्यास जाऊन बहुत वर्षें झालीं, परत येत नाहींत, बारा वर्षांवर वर्षें लोटल्यास विधिपूर्वक भेटण्याचा प्रसंग येईल, असें जाणून स्वतःच पित्यास भेटण्याकरितां **बारामतीस** गेले. तेथें त्यांचे गुण पाहून **बाबूजी नाईक** यांस फार संतोष झाला. त्यामुळें सालींना ५०० रुपयांचे वेतन करून **मोरो**पंतांस

त्यांनीं आपले घरीं पुराण सांगण्याकरितां ठेविलें. व त्यांचे बंधू राघोपंत यांस आगळगांव येथील फडनिशी सांगितली. त्यांसही सालीना ५०० रुपये वेतन होतें. खेरिज लग्न कार्य वगैरे प्रसंगी विशेष द्रव्य-साहाय्य नाईक हे त्यांस करीत असत. नाईक पंतांस कांहीं जाहागीर करून देत होते. परंतु यांनीं ती घेण्याचें नाकबूल केलें.

आपलीं मातापितरें आणि यजमान बाबूजी नाईक व त्यांचे चिरंजीव पांडुरंगराव यांविषयीं मोरोपंतांचा लेख असा आहे:—

धन्य **श्रीराम** पिता, धन्या **लक्ष्मी** प्रसू[1] जगीं झाली ॥
आली **सत्यवतीची**[3], कीं **भारत**-कीर्ति सुतमुखें आली ॥ १ ॥
**श्रीमत्सदाशिवात्मज, बाबूजी नायक** प्रभु ज्ञानी ॥
धन्य ह्मणावें ज्यांला, शुद्ध-गुण-श्रवण-तृप्त सुज्ञानीं ॥ २ ॥
जो धीर वीर-हीरे[4], **श्री सिद्धेश्वर**-महादयापात्र ॥
**श्रीमान् बाबूराव,** प्रभु ज्याचें शोभलें यशें गात्र ॥ ३ ॥
दाता वक्ता योद्धा, तेजस्वी मानधन असामान्य ॥
अतुळें पितृ-प्रसादें, मंडित **देवव्रता**[5] असा मान्य ॥ ४ ॥
**भीष्म-द्रोण**-सम गुणें, **शांडिल्य**-सुगोत्र-पद्म-रवि देहा ॥
आश्रय **शंकर** जैसा **उपमन्यु**[6] मना **मयूर**-कवि-देहा ॥ ५ ॥
शालिजितामर-चंदन तन्नंदन **पांडुरंगाय** हि तें ॥
यश मिरवितो प्रजांचीं करि **दशरथसा** न **राम** काय हितें ॥ ६ ॥
या साधु-संग-मुंदिरें मुदित **श्रीराम**-सुत **मयूर** कृती ॥
नर-नारायण-विजयं-ग्रंथ[8] करी व्हावया सुखी सुकृती[9] ॥ ७ ॥

**महाभारत.**

बाधा हरि[10] अंबुद्भव-[11]सें पुर रवि **राम** तनयसा भरत ॥
पावे प्रजा **सदा शिवें**[12], सर्व प्रभु-चरण-भक्ति-लाभ-रत ॥ ८ ॥

सन्नाम-गर्भ-रामायण

श्री बाबूराय प्रभु, माझा अत्यंत सदय अन्नद हा ॥
अर्थि-जना न म्हणो दे, तैसा तप्तास जेंवि सन्नद हा ॥ ९ ॥

**गणेश पाध्ये गोळवलकर** हे **मोरोपंतांचे** गुरु होत. पाध्यांचे घराण्यास **मोरोपंत** फार पूज्य मानीत असत. पुढें **पंढरपूरकर काशिनाथबाबा पाध्ये**

---

१ आई. २ सखी. ३ व्यास-मातेची. ४ श्रेष्ठ. ५ भीष्म. ६ भक्त विशेष (शिवाचा) ७ मेघानें. ८ भारत-ग्रंथ. ९ पुण्यवान्. १० हरण करी (याचा कर्ता राम). ११ कमळा सारखें. १२ कल्याण.

यांची कन्या सुंद्राबाई **मोरोपंतांचे** चिरंजीव **रामकृष्णपंत** यांस दिली तेव्हां तर त्यांचा **पाध्यांचे** घराण्याशीं शरीर संबंधच घडून आला त्यामुळें त्या घराण्याशीं विशेष स्नेह झाला. नंतर **पाध्यांचे** आग्रहास्तव **रामकृष्णपंत** **बारामती** सोडून **पंढरीस** राहावयास गेले. तेथें त्यांचे वंशज अद्यापि आहेत. त्या विषयींची माहिती पुढें दिलेल्या वंशावळीवरून होईल. **मोरोपंतांनीं** आपले गुरु **गणेश पाध्ये**, **केशव पाध्ये**, व **अनंत पाध्ये**, या तिघांविषयीं आपल्या काव्यांत उल्लेख केला आहे तो असा:—

**श्रीमद्गणेश**-**गुरु**-पद-नख-शशि-कांति-च्छटा जयंतुतराम् ॥
प्रतिभा-रत्नं[1] लब्धं यासु मयेदं मनस्तमोघ्निषु[2] ॥ १ ॥

**मराठी मंत्ररामायण**

**श्रीमदु**पाध्यायोत्तम कवि-वर[3] **केशव**-**गणेश**-पाद-रजा ॥
धरुनि शिरीं हें सद्यश लिहिलें पीताति साधु सादर[4] ज्या ॥ १ ॥
**श्रीगी**तेच्या एकादश-संख्याचा[5] जसा उपाध्याय ॥
केवळ भक्तिरसमय **श्रीमद**नंताख्य जो उपाध्याय ॥ २ ॥
तो होय शोभवुनि या कवनातें साधु विप्र भासविता ॥
निज तेजें श्री[6] देउनि पंकरुहां[7] जेंवि विप्रभा[8] सविता ॥ ३ ॥

**महाभारत**

नमिला सद्भावें म्यां, **श्रीमद**नंताख्य जो उपाध्याय ॥
मूर्त श्रीगीतेच्या, अकराव्याचाचि जो उपाध्याय[9] ॥ १ ॥

**सन्मणिमाला**

येइल मनासि तरी द्या आज्ञा गाया स्व-बाहु-महिम्यातें ॥
दाखविलें निजकवन, **श्रीमद**नंताख्य साधुसहि म्यां तें ॥ १ ॥

**नामरसायन**

**श्रीकेशवं** **श्रीगणेशं** । वंदे विद्या-गुरुं हरिम्[10] ॥

**संस्कृत मंत्ररामायण**

साकेतीं[11] दूत कुशल, धाडूनि वसिष्ठ आणवी भरता ॥
तो **गति** जाणोनि ह्मणे, धिक् शतदा तीस जी [12]कु-लोभ-रता ॥२८॥

---

१ ज्ञान-रत्न. २ मनाचें अज्ञान घालविणाऱ्या. ३ विद्वच्छ्रेष्ठ. ४ आदरानें. ५ गीतेच्या अकराव्या अध्यायाचे जवळचा अध्याय म्हणजे बारावा अध्याय. (यांत भक्तीचें महात्म्य आहे). ६ शोभा. ७ कमळाला. ८ शोभा रहित. ९ जवळचा अध्याय (१२वा.) १० या "हरी" विषयीं माहिती मिळाली नाहीं. ११ अयोध्येंत. १२ पृथ्वीचें राज्य आपल्या मुलास (भरतास) मिळावें असा आहे लोभ जिला ती (कैकेयी)

त्यांनीं आपले घरीं पुराण सांगण्याकरितां ठेविलें. व त्यांचे बंधू **राघोपंत** यांस **आगळगांव** येथील फडनिशी सांगितली. त्यांसही सालीना ५०० रुपये वेतन होतें. खेरीज लग्न कार्य वगैरे प्रसंगी विशेष द्रव्य-साहाय्य **नाईक** हे त्यांस करीत असत. नाईक पंतांस कांहीं जाहागीर करून देत होते. परंतु यांनीं ती घेण्याचें नाकबूल केलें.

आपलीं मातापितरें आणि यजमान **बाबूजी नाईक** व त्यांचे चिरंजीव **पांडुरंगराव** यांविषयीं **मोरोपंतांचा** लेख असा आहे:—

धन्य **श्रीराम** पिता, धन्या **लक्ष्मी** प्रसू[१] जगीं झाली ॥
ओली **सत्यवतीची**[३], कीं **भारत**-कीर्ति सुतमुखें आली ॥ १ ॥
**श्रीमत्सदाशिवात्मज, बाबूजी नायक** प्रभु ज्ञानी ॥
धन्य ह्मणावें ज्यांला, शुद्ध-गुण-श्रवण-तृप्त सुज्ञानीं ॥ २ ॥
जो धीर वीर-हीरे[४], **श्री सिद्धेश्वर**-महादयापात्र ॥
**श्रीमान् बाबूराय**, प्रभु ज्याचें शोभलें यशें गात्र ॥ ३ ॥
दाता वक्ता योद्धा, तेजस्वी मानधन असामान्य ॥
अतुळें पितृ-प्रसादें, मंडित **देवव्रता**[५] असा मान्य ॥ ४ ॥
**भीष्म-द्रोण**-सम गुणें, **शांडिल्य**-सुगोत्र-पद्म-रवि देहा ॥
आश्रय **शंकर** जैसा **उपमन्यु**[६] मना **मयूर**-कवि-देहा ॥ ५ ॥
शालिजितामर-चंदन तन्नंदन **पांडुरंगराय** हि तें ॥
यश मिरवितो प्रजांचीं करि **दशरथसा** न **राम** काय हितें ॥ ६ ॥
या साधु-संग-मंदिरें मुदित **श्रीराम**-सुत **मयूर** कृती ॥
नर-नारायण-विजय-ग्रंथ[८] करी व्हावया सुखी सुकृती[९] ॥ ७ ॥

**महाभारत.**

बाधा हरि[१०] अंबुद्भव[११]-सें पुर रवि **राम** तनयसा भरत ॥
पावे प्रजा **सदा शिवें**[१२], सर्व प्रभु-चरण-भक्ति-लाभ-रत ॥ ८ ॥

सन्नाम-गर्भ-रामायण

श्री बाबूराय प्रभु, माझा अत्यंत सदय अन्नद हा ॥
अर्थि-जना न म्हणो दे, तैसा तप्तास जेंवि सन्नद हा ॥ ९ ॥

**गणेश पाध्ये गोळवलकर** हे **मोरोपंतांचे** गुरु होत. **पाध्यांचे** घराण्यास **मोरोपंत** फार पूज्य मानीत असत. पुढें **पंढरपूरकर काशिनाथबाबा पाध्ये**

---

१ आई. २ सखी. ३ व्यास-मातेची. ४ श्रेष्ठ. ५ भीष्म. ६ भक्त विशेष (शिवाचा) ७ मेधानें. ८ भारत-ग्रंथ. ९ पुण्यवान्. १० हरण करी (याचा कर्ता राम). ११ कमळा सारखें. १२ कल्याण.

यांची कन्या सुंद्राबाई मोरोपंतांचे चिरंजीव रामकृष्णपंत यांस दिली तेव्हां तर त्यांचा पाध्यांचे घराण्याशीं शरीर संबंधच घडून आला त्यामुळें त्या घराण्याशीं विशेष स्नेह झाला. नंतर पाध्यांचे आग्रहास्तव रामकृष्णपंत बारामती सोडून पंढरीस राहावयास गेले. तेथें त्यांचे वंशज अद्यापि आहेत. त्या विषयींची माहिती पुढें दिलेल्या वंशावळीवरून होईल. मोरोपंतांनीं आपले गुरु गणेश पाध्ये, केशव पाध्ये, व अनंत पाध्ये, या तिघांविषयीं आपल्या काव्यांत उल्लेख केला आहे तो असा:—

श्रीमद्गणेश-गुरु-पद-नख-शशि-कांति-च्छटा जयंतुतराम् ॥
प्रतिभा-रत्नं[1] लब्धं यासु मयेदं मनस्तमोघ्निषु[2] ॥ १ ॥

मराठी मंत्ररामायण

श्रीमदुपाध्यायोत्तम कवि-वर[3] केशव-गणेश-पाद-रजा ॥
धरुनि शिरीं हें सद्यश लिहिलें पीताति साधु सादर[4] ज्या ॥ १ ॥
श्रीगीतेच्या एकादश-संख्याचा जसा उपाध्याय ॥
केवळ भक्तिरसमय श्रीमदनंताख्य जो उपाध्याय ॥ २ ॥
तो होय शोभवुनि या कवनातें साधु विप्र भासविता ॥
निज तेजें श्री[6] देउनि पंकरुहां[7] जेंवि विप्रभां सविता ॥ ३ ॥

महाभारत

नमिला सद्भावें म्यां, श्रीमदनंताख्य जो उपाध्याय ॥
मूर्त श्रीगीतेच्या, अकराव्याच्याचि जो उपाध्याय ॥ १ ॥

सन्मणिमाला

येइल मनासि तरी द्या आज्ञा गाया स्व-बाहु-महिम्यातें ॥
दाखविलें निजकवन, श्रीमदनंताख्य साधुसहि म्यां तें ॥ १ ॥

नामरसायन

श्रीकेशवं श्रीगणेशं । वंदे विद्या-गुरुं हरिम्[10] ॥

संस्कृत मंत्ररामायण

साकेतीं[11] दूत कुशल, धाडूनि वसिष्ठ आणवी भरता ॥
तो गति जाणोनि ह्मणे, धिक् शतदा तीस जी [12]कु-लोभ-रता ॥२८॥

---

१ ज्ञान-रत्न. २ मनाचें अज्ञान घालविणाऱ्या. ३ विद्वच्छ्रेष्ठ. ४ आदरानें. ५ गीतेच्या अकराव्या अध्यायाचे जवळचा अध्याय म्हणजे बारावा अध्याय. (यांत भक्तीचें महात्म्य आहे). ६ शोभा. ७ कमळाला. ८ शोभा रहित. ९ जवळचा अध्याय (१२वा.) १० या "हरी" विषयीं माहिती मिळाली नाहीं. ११ अयोध्येंत. १२ पृथ्वीचें राज्य आपल्या मुलास (भरतास) मिळावें असा आहे लोभ जिला ती (कैकेयी)

अवनीशा संस्कारी, तदनंतर साप्त तो निघे जाय ॥
साधु गुह भरद्वाजानुमतें स्व-स्वामिचे नमी पाय ॥ २९ ॥
सन्नाम-गर्भ-रामायण

शके १७११ सौम्यनाम संवत्सरीं ह्मणजे आपले वयाचे साठावे वर्षी मोरोपंत अमरसिंग[1] जाधव यांजबरोबर महायात्रेस गेले. तेव्हां काशिस्थ पंडितांनी त्यांचे काव्याची मोठी वाहवा केली. परत येतांना चोळीमहेश्वर येथें अहल्याबाई होळकरीण इची भेट घेऊन तिजवर पुढील पांच आर्या केल्या.

श्रीहरि-हर-भक्ता तूं, [2]देवि अहल्ये वरा[3] धरा-भूषा[4] ।
पूषा[5] तुज साधु म्हणे, ख्याता तुज सम न बाणतनुभूषा[6] ॥१॥
देवि अहल्या बाई, झालीस जगत्त्रयांत तूं धन्या ।
न-न्याय-धर्म-निरता, अन्या कालि माजि ऐकिली कन्या ॥२॥
जाणे धर्म करीना, त्या स्तवितो कोण [7]पंडितंमन्या ।
न न्याय-धर्म-निरता, अन्या कालि माजि ऐकिली कन्या ॥३॥
धमार्थ गोत्र[8]-जन्या, किंवा झालीस तूं धरा[9]-जन्या ।
तुज देवि भेटली जी, सत्कीर्ति कधीं च हे न राजन्या[10] ॥ ४ ॥
न त्यजिसि नर्मदेतें, देवि तुझी ती बहु प्रिया आली[11] ॥
गंगेची हि सखी हो, कीं उभय मनांत सत्क्रिया आली ॥ ५ ॥
श्री विष्णु-पदा स्तविली, त्वद्भक्ता हें तुला हि मानावें ॥
विश्व जिला वानितसे, कां न मयूरें हि तीस वानावें ॥ ६ ॥ *

महायात्रेविषयीं एक आर्या मिळाली आहे ती ही येथें दाखल करितोः—

श्रीपांडुरंगरायें, तुझिया मज वंदनासि पाठविलें ॥
यास्तव स्नाना समयीं, ऐशा प्रभुतें मनांत आठविलें ॥ १ ॥

एका समयीं भीष्माष्टमीचे ( माघ शुक्ल ८ मीचे ) सुमारास पंत नाशकास गेले होते. तेथें श्री० बाळाजी बाजीराव ऊर्फ नाना साहेब पेशवे यांची पत्नी व माधवराव बल्लाळ यांची मातोश्री गोपिकाबाई साहेब ह्या राहात

---

१ या अमर-सिंगा विषयीं माहिती मिळाली नाहीं. २ राणी. ३ श्रेष्ठ. ४ भूषण. ५ सूर्य, ६ बाण-तनु-भू-उषा = बाणासुराची कन्या उषा. ७ जो आपणास महाविद्वान् समजतो तो. ८ पर्वत-कन्या पार्वती. ९ भू-कन्या सीता. १० राजाला. ११ सखी.

* या आर्या पाहून बाईस फार संतोष झाला. तेव्हां सालीना पांचशें रुपये घेऊन आपले पदरीं राहण्याविषयीं तिचा पुष्कळ आग्रह पडला. परंतु त्यांचें प्रेम नायकावर फार असल्यामुळें तें बोलणें कबूल न करितां ते बारामतीस परत आले.

होत्या. त्यांनीं भीष्म-भक्तीवर काव्य लिहिण्यास सांगित्यावरून "भीष्म भक्ति-भाग्य" ह्मणून एक प्रकरण भागवतांतील प्रथम स्कंधाचे आठवे अध्यायाचे आधारें रचून त्याचे शेवटीं असा लेख लिहिला आहे:—

या प्रासूत[1] स्वयं गौरीं[2] कीर्तिं मेनेव[3] सन्नुतां ॥
या सद्वनवसंतश्रीः[4] कल्पवल्लीव याऽर्थिनाम्[5] ॥ १ ॥
यस्याः स्नुषा रत्नगर्भा[6] सपत्नी चामरावती ॥
तस्याः श्रीगोपिकादेव्याः[7] किमपीदं कृते कृतम् ॥ २ ॥

हें पंतांचें काव्य सन १७६१ व सन १७७२ यांचे दरम्यान झालें असावें असें इतिहासावरून होतें.

पुढें बाबूजी नाईक यांज बरोबर पंत एक दोन वेळ पंढरीस श्रीविठ्ठलाचें दर्शनास गेले. ते समयीं तेथील कांहीं मंडळीचे सांगण्यावरून पुढील आर्या-पंचक पांडुरंग-प्रसाद-महिम्यावर रचिलें :—

व्हाव्या प्रसाद तुळसी,-माळा श्रीमत्पदावरिल चि बुका ।
येणें चि धन्यता स्व-स्वीकार करावया धरिल चि[8] बुका ॥१॥
विधि-हर हि ह्मणे स्वपदर, पात्र पदा पुढिल खारकेला हो ।
ईणे उर-क्षतीं षडरींच्या निज लाभ खार केला हो ॥ २ ॥
यम-दूत न पृष्ठीं सुर, पायां वरि बरिके[9] मारितात बुक्या ।
ज्याचा श्रीचरणाच्या, भाग्यें होईल पात्र हात बुक्या ॥ ३ ॥
तारी जनासि लावुनि, आपण होउनि आलंबु[10] कासेला ॥
श्रीचरणींचा झांकुनि, शोभवितो बहु भला बुका सेला ॥ ४ ॥
जी साधु-कर-प्राप्ता, गोड सुधेहूनि बहु सुपारी ती ।
येईल व्यजनाची,[11][12] जरि गुरु तरि कार्य हो सुपा रीती ॥ ५ ॥
साधु-प्रेषित आला, प्रेमें धांवूनि दूर कागद हा ।
पांच किती न च याची, सरि करितिल कामपूर काग दहा ॥ ६ ॥

सन १७४८ पासून १७९४ पर्यंत पेशवाईचे भरभराटीचा काळ मोरोपंतांनीं पाहिला. खर्डे येथें पेशव्यांनीं शेवटचा विजय मिळविल्यावर बहुतेक महाराष्ट्रीय राजकार्य-धुरंधर पुरुष जसे हा भूलोक सोडून गेले तद्वत् महाराष्ट्र कवि-मुकुट-मणि मोरोपंत ही मराठशाहीचा ऱ्हास पाहाण्यास जगले नाहींत. गोपिकाबाईच्या नांवाचा उल्लेख ज्यांत आहे तीं पद्यें व अहल्याबाई विषयींच्या

---

१ प्रसवली. २ पार्वती-पक्षीं शुभ्र. ३ हिमालय-पत्नी व पार्वतीची माता. ४ सज्जनरूपी वनाला वसंताचे शोभेसारखी. ५ याचकांस. ६ पृथ्वी. ७ राणी=पेशव्यांची पत्नी. ८ करितां. ९ इनवटी. १० माग्र. ११ भोपळा. १२ विंझणा, पंखा.

आर्या वर दाखल करण्यांत आल्या आहेत. याखेरीज शिवाजी महाराज व पंतप्रधान (पेशवे) यांच्या नांवाच्या उल्लेखाचीं जीं पद्यें आढळलीं तीं पुढें लिहिलीं आहेत:—

शिवराजास ज्ञानद, जो जैसा याज्ञवल्क्य जनकास ॥
तरले भवार्णवीं बहु, दृढतर त्याची धरूनि जन कास ॥ १ ॥

रामदास-गुण-वर्णन.

सुज्ञ शिवाजी राजा, न ह्मणे तुकयासि काय साधु निका ॥
तत्पंडित प्रधानां, न कळे गुण समज फार आधुनिका ॥१ ॥

तुकारामस्तव.

नित्य महाराज तुम्ही, स्वामी नाम प्रधान पंत अजी ॥
सोडवितां जलधींत, ग्राहग्रस्ता गजा समेत गजी ॥ १ ॥

नामार्या

श्रीरामासि भजावें, भक्तें ज्यां जेंवि तेंवि संतातें ॥
राजासि उपासावें, तैसेंचि जनें प्रधान पंतातें ॥ १ ॥

या खेरीज आपले शेजारी रघुनाथपंत कोशे व नारायणभट या दोघां विषयीं पंतांनीं आपले काव्यांत लिहिलें आहे. हे कोण होते या विषयीं विशेष माहिती मिळाली नाहीं. तथापि शोधकांचें तिकडे विशेष लक्ष लागावें ह्मणून पुढील आर्या देतों:—

रघुनाथपंत कोशे संप्रति गेले समीप सेवेला ॥
प्रेमें सिंचित होते या कवना ते सखे जसे वेला ॥ १ ॥
श्रीनारायणभट्ट ज्ञाते श्रीपांडुरंग-पद-भक्त ॥
सेजारी मी त्यांचा पुसतां कथितील वृत्त ते व्यक्त ॥ २ ॥

नामरसायन.

बहु शोभाप्रद जाला श्रीविठ्ठल-भक्त-राय कवनातें ॥
जेंवि ऋतूंचा करिता प्रकट गुण वसंत नायक वनातें ॥ १ ॥

स्वर्गारोहणपर्व.

पंत आपल्या ग्रंथांविषयीं कोठें कोठें उल्लेख करितात त्यांपैकीं येथें कांहीं पद्यें दाखल करितों:—

यावें दर्शन द्यावें बोलावें डोलवूनि डोलावें ॥
वाटे स्वमंत्र-रामायणें निजनाटक तुह्मीं च तोलावें ॥ १ ॥

---

१ चांगला. २ अलीकडचा. ३ मारुतीस उद्देशून हीं पद्यें लिहिलीं आहेत. ४ माझें (मोरोपंताचें) मंत्ररामायण. ५ आपण केलेलें नाटक (हनूमन्नाटक). ६ मारुती.

प्राकृतें ह्मणोनि निर्भरें[1] हांसोत अतज्ञ[3] नीच मैत्कृतिला ॥
परि जाणशील बा तूं[2] रसिक-कवि-वरा मनीं चमत्कृतिलों[4] ॥ २ ॥
तुमच्या पद-प्रसादें फार चमत्कार अर्थ यमकांचे ॥
त्यांत प्रभु-यश तद्वश जगदुद्धाराधिनें[7] चि यम कांचे ॥ ३ ॥
श्रीमद्भागवत श्री-दशम-स्कंधांत दिव्य कृष्ण-कथा ॥
या नूतन लिहिल्या म्यां वाचूं ऐका रूचेल कर्ण-पथा ॥ ४ ॥
श्रीमद्विष्णु-पुराणीं पाहुनि अत्यंत आदरें रचिला ॥
प्रऱ्हाद-विजय नाम ग्रंथ पहा नगीं चि मणिगणीं खचिला ॥ ५ ॥
जैमिनिकृताश्वमेध-स्थित कुश-लव-चरित वर्णिलें आहे ॥
बा हे रीति पहावी मज तों वाटे सुधा-नदी वाहे ॥ ६ ॥
प्राचीन मंत्र-रामायण आधीं मी च मग तुम्ही वाचा ॥
वांचा वाचाया बहु झड घाली ग्रंथ सत्य नांवाचा ॥ ७॥
संशय-रत्नावलि सत् सत्कृति केकावली चषक[12] आर्या ॥
त्वां ऐकावे ग्रंथ प्रेमें प्याव्या चि राम-नामार्या ॥ ८ ॥
आर्या मुक्ता-माला दावीन परंतु जरि न मागाल ॥
लागाल प्रभु-कंठीं, घालूं फुगवील कीं रमा गाल ॥ ९ ॥
तुमच्या[13] पद-प्रसादें सद्गुरूनें जें असेल पढवीलें ॥
तें बा तुह्मासि दाविन नाम रसायन जपोनि कढवीलें ॥ १० ॥

## नामरसायन.

प्रति दिवशीं रात्रीस धुळीची पाटी, संस्कृत पोथी, व समई इतकी तयारी चाकर करून ठेवीत असे. पुढे सर्व नित्य कृत्य आटपल्यावर सर्व पाटीभर ग्रंथ लिहून नंतर निजावयास जावें असा पंतांचा परिपाठ होता. दुसरे दिवशीं सकाळीं पाटीवरील ग्रंथाची प्रत शाईनें करून ठेवण्याचें काम लक्ष्मण भट वाईकर यांजकडे होतें. एक दिवस चाकराचे हातून पाटी उधळली. त्यामुळें नष्ट झालेला ग्रंथ स्वतः श्रीरामचंद्रानीं कागदावर लिहून ठेविला असें ह्मणतात. * प्रत्यहीं प्रायः १५० ग्रंथ करीत असत.

कोणा एकाचे सांगण्यावरून प्रथम पंतांनीं कर्णपर्व केलें. तें लोकांस

---

१ मराठी. २ पोटभर. ३ तत्व न जाणणारे. ४ माझ्या काव्याला. ५ मारुती. ६ चमत्कार. ७ जगताचा उद्धार ईश्वर-यशानें होतो या दुःखानें. ८ भितो. ९ अळंकार. १० अमृत ११ सरस्वती १२ पान-पात्र (या नांवाचें प्रकरण) १३ मारुतीच्या.

* पंढरीस पंतांचे वंशज या रामचंद्रानें लिहिलेल्या ग्रंथाची पूजा करीत असतात, परंतु ते त्या आर्या कोणास दाखवीत नाहींत असें ऐकतों.

आवडल्यामुळें व पांडुरंगराव नाईक यांनीं सांगितल्यावरून सर्व महाभारतावर आर्या केल्या. भारताच्या प्रत्येक पर्वाच्या पहिल्या आर्येचें आद्याक्षर घेतलें असतां "श्रीपांडवसहायो भगवानरविंदाक्षो जयति" असें एक संस्कृत वाक्य निष्पन्न होतें. त्यामुळें अठरा पर्वांची एक माळ च गुंफल्यासारखें झालें आहे. प्रथम कर्णपर्व केलें तेव्हां त्याची पहिली आर्या:—

भव्य-प्रताप कर्ण [१]स्वपित्याहुनि फार संगरीं तपला ॥
कीं ज्याच्या शर-रश्मि-व्रात-[२]पटीं तो सहस्र-[३]करं लपला ॥ १ ॥

अशी "भ" आद्याक्षर योजून लिहिली होती. पुढें सर्व पर्वांची माळ गुंफण्याचा उद्देश धरून पहिल्यापासून रचना करीत करीत कर्णपर्वाजवळ आले आणि पहातात तों त्या पर्वाचे आरंभीं माळ गुंफण्यास जें इष्ट अक्षर ( भ ) तेंच आपले हातून पूर्वी योजिलें गेलें आहे असें दिसून आलें. कर्ण पर्वाचे शेवटीं यजमान बाबूजी नाईक यांचा स्तव आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं, प्रथम कर्ण पर्व हातीं घेऊन तें संपलें तेव्हां आपले यजमानांविषयीं आपली कृतज्ञता बुद्धि प्रकट करण्याची संधी त्यांनीं फुकट दवडली नाहीं. बाबा पाध्ये यांचे सांगण्यावरून "बृहद्दशम" नामक ग्रंथ भागवताचे दाहावे स्कंधाचे आधारें लिहिला. परंतु तो फार विकट झाला असें पाध्ये यांचें ह्मणणें पडल्यावरून "मंत्रभागवत" ह्मणून सगळ्या भागवतावर ग्रंथ लिहिला. तो बृहद्दशमाहून सोपा आहे खरा. हरिवंश पांडूरंगराव नाईक जोशी यांचे सांगण्यावरूनच केला असें त्या ग्रंथाचे आरंभीच्या पुढील आर्ये वरून दिसून येईल:—

श्री पांडुरंगरायें, असकृत् प्रेमें करूनि सांगावें ॥
भगवन्निदेश जाणुनि, सुयश यथा बुद्धि मग न कां गावें ॥ २ ॥

अध्याय १

गीतेच्या भाषांतराचे पहिले साहा अध्याय मात्र पंतांनीं लिहिले. बाकीचे बारा अध्याय त्यांचे पुतणे आपा पराडकर ह्मणून ब्रह्मावर्ती राहात होते त्यांनीं केले असें ह्मणतात. भगवद्गीतेच्या भाषांतराच्या आर्या यमक-रहित आहेत. पंत राम-भक्त असल्यामुळें सर्व रामायणें मात्र त्यांनीं आपल्या प्रेरणेनें लिहिलीं.

मोरोपंतांचे काव्यांत प्रासयमकादि शब्दालंकार व रूपकोपमादि अर्थालंकार यांचा भरणा फार आहे. त्यांची भाषा प्रौढ व सरस असून तींत अर्थ

१ आपला बाप जो सूर्य त्याहून. २ बाण रूपी किरणांचा समूह हेंच वस्त्र त्यानें. ३ सूर्य.

गौरव फार असतें. त्यांचीं यमकें जरी अप्रतिम असतात तरी तीं साधण्याकरितां ते अर्थाची हानि करीत नाहींत. नियमित स्थळीं नियमित अक्षरें काव्यांत घालणें आणि मार्मिक व हृदयंगम दृष्टांत योजून यमक जुळणें ही गोष्ट त्यांस फार सुलभ होऊन गेली होती. त्यांचे काव्यांत संस्कृत शब्दांचा व निरनिराळे प्रांतांत चालू असलेल्या महाराष्ट्र शब्दांचा भरणा फार आहे. त्यांचे आयाचे दोन दोन, तीन तीन, किंबहुना कधीं कधीं पांच पांच ही अर्थ होतात असा पुष्कळांचा समज आहे. परंतु तो भ्रम-मूलक होय. आह्मांस तर पुढें दाखल केलेल्या आर्येखेरीज दुसरी भरपूर श्लिष्ट-पद-घटित आर्या कोठें आढळली नाहीं:—

मलिन कुटिल नीरस जड[1] अजड पुनर्भव-पणें हि कचसाच ॥
धरिला शिरीं हि न स्व-प्रकृति-गुण त्यजिसि नाम कचें साच ॥ १ ॥

ज्यांनीं "नमो भगवते वासुदेवाय" "श्रीराम जय राम जय जय राम" इत्यादि अक्षरें एका आर्येत सुद्धां सहज आणिलीं त्यांस दोन दोन तीन तीन अर्थ होण्यासारखे "द्विज", "श्रुति", "स्मृति", "अंबर", "पयोधर", "भोगी", "गुण", "गोपाल", "स्नेह" इत्यादि शब्द योजून अर्या करणें अवघड होतें असें नाहीं. परंतु या गोष्टीकडे त्यांचें तादृश लक्ष नव्हतें इतकेंच यावरून सिद्ध होतें. मोरोपंत हे केवळ संस्कृत ग्रंथांचे भाषांतर करणारे, केकावली खेरीज त्यांचा दुसरा स्वतंत्र ग्रंथ नाहीं, इत्यादि दूषक-मतांचें खंडण निबंधमाले सारख्या सर्वमान्य मासिक पुस्तकांत होत आहे ही गोष्ट मोठी अभिनंदनीय होय. येणें रूकन मोरोपंत महाराष्ट्र-कवि-मुकुट-मणीचे पदावर लवकरच आरूढ होतील असें दिसतें. पंतांचीं रामायणें वाचलीं म्हणजे त्यांचे विशाळ बुद्धीविषयीं संशय राहात नाहीं. आमचे एका मित्राचा असा समज आहे कीं, मराठी मंत्र-रामायणांत पंतांनीं सगळें राम-रक्षा-स्तोत्र गुंफिलें आहे. या गोष्टीचा यत्किंचित् प्रत्यय यावा म्हणून ज्यांतून राम-रक्षेचे कांहीं श्लोक निष्पन्न होतात अशा कांहीं आर्या निबंध-मालेंत त्यानें प्रसिद्ध केल्या आहेत. सारांश पंतां सारखा दुसरा महाराष्ट्र कवि आजपर्यंत झाला नाहीं. श्लोक, अर्या, ओवी, अभंग, साकी, इ० सर्व छंदांत त्यांनीं कवीता केली आहे. तथापि आर्या छंदावर त्यांचा भर फार होता.

मंत्र भागवत, बृहद्दशम, महाभारत, १०८ रामायणें, हरिवंश, ब्रह्मोत्तरखंड, भगवद्गीतेचें भाषांतर, सप्तशती, मदालसाख्यान, व केकावली हे पंतांचे

१ केंसासारखा. २ बृहस्पतीचा पुत्र.

मुख्य मराठी ग्रंथ होत. मुक्तामाला, कृष्णार्या, शिवार्या, व आणखी दोन अशीं पांच शतकें, गंगावर्णन, आणि संस्कृत मंत्ररामायण हे त्यांचे संस्कृत ग्रंथ होत. या खेरीज साधुसंत, तीर्थें, दैवतें, इत्यादिकांवर किरकोळ प्रकरणें पुष्कळच आहेत. एकंदर त्यांचा ग्रंथ तीन लक्ष आहे असें ह्मणतात.

सन १७९५ ह्मणजे शके १७१७ राक्षसनामसंवत्सरीं चैत्र शुद्ध १४ स ते स्वर्गस्थ झाले. त्यांचेविषयीं कोणी आर्या केल्या आहेत त्यापुढें दाखल करितों. याशिवाय कांहीं अवांतर माहिती पुढें जोडिलेल्या आख्यायिकांवरून होईल.

आर्या-तरूच्या पक्ष्या, त्या गा बारामतींत मोराशीं ॥
आर्यांत रुचा पक्षा, त्यागा बारा मती तमोराशी ॥ १ ॥

श्रीमन्मयूर-कविची, देते संतोष मानवा कविता ॥
असता जरि भूमीवरि, सुर-गुरु तरि तो हि मान वांकविता * ॥ २ ॥

आर्या कविता कीजे, एका बारामतींत मोरानें ॥
अन्य कवी ते करिती, फिरती बारा-मती तमोरानें ॥ ३ ॥

बारा मतींत आहे, म्हणउनि बारामती असें नांव ॥
तींत वसे तो मोरो-पंत भवाब्धींत जीत नव नाव ॥ ४ ॥

आर्या-छंदें जोडुनि, रामायण-भारतादि आयकवी ॥
नायक वीर-कवींचा, ऐसा होईल अन्य काय कवी ॥ ५ ॥

---

* ही आर्या पंतांचे चिरंजीव रामकृष्णपंत यांनीं केली असें ऐकिवांत आहे.

# वंशावळ.

- रामाजीपंत.
  - सोनोपंत ( काशींत )
    - बापूजीपंत
      - रावजी
  - मोरोपंत
    - रघुनाथ ( ग्वाल्हेरींत )
      - गोविंदराव
      - केशवभट
    - (पंढरींत) रामकृष्णपंत × सुंद्राबाई (काशिनाथबाबा पाध्ये यांची कन्या)
      - मोरुभाऊ
        - * नानापंत
          - * विठलपंत
            - * गोविंदपंत
          - * मोरोपंत ऊर्फ मयूरपंडित
          - * सीताराम
          - * रघुनाथ
      - रामचंद्रपंत (अल्पवयांत मृत)
      - काशिनाथपंत
        - विनायकपंत
        - रामकृष्ण
          - * दत्त
          - नरहरी
        - व्यंकटेश
  - (ब्रह्मावर्ती ) आबाजीपंत
    - बाळाजीपंत उर्फ आपा.
      - भिकाजीपंत
        - बापूजीपंत.
    - दिनकरपंत.
    - सदाशिवभट.
    - लक्ष्मणराव

* हल्लींपंढरीस आहेत.

# आख्यायिका.

१ बाबूजी नाईक यांजकडे प्रथम पंत कांहीं दिवस जाऊन राहिल्या-नंतर जवळच्या मंडळीनें रामचंद्रपंतांचे चिरंजीव मोठे विद्वान असून ते आज आठपंधरा दिवस पंक्तीस असतात असें कळविल्यावरून संध्यावदन-समयीं पंतांस बलावून आणिलें आणि पाट बसावयास देऊन सर्व हकीकत विचारून घेतली. नंतर जवळ रुद्राची पोथी होती ती पुढें करून "याचा अर्थ आह्मांस तुम्हीं सांगा" असें ह्मटलें. त्यावर पंत ह्मणाले कीं, "रुद्र हा वैदिक ग्रंथ आहे. याचा अर्थ सांगण्यास पूर्वी भाष्य पाहून ठेविलें पाहिजे. दुसरा एकादा संस्कृत ग्रंथ दिल्यास त्याचा अर्थ यथामति सांगेन." तें ऐकून जवळ शिव-कवचाची पोथी होती ती पुढें केली. तेव्हां पंत मूळ श्लोक वाचून त्याचा अर्थ तत्क्षणींच मराठी श्लोक शार्दूलविक्रीडित छंदांत रचून सांगूं लागले. याप्रमाणें सर्व शिव-कवचाचा अर्थ सांगितला. तेणेंकरून नाईक फार प्रसन्न झाले आणि सालीना ९०० रुपये करून आपले घरीं पंतांस पुराण सांगण्याकरितां ठेविलें. रामरक्षेचा ही अर्थ मराठींत श्लोक रचून सांगितला असें ह्मणतात.

२ पंत आठपंधरा दिवस बाबूजी नाईक यांजकडे राहिल्यावर एके दिवशीं बायका दळीत असतां ओव्या ह्मणत आहेत असें त्यांनीं पाहिलें. तेव्हां "मी तुह्मांस राम व कृष्ण यांचे चरित्रांवर ओव्या करून देतों त्या तुम्हीं म्हणाल काय?" असें त्यांनीं बायांस विचारिलें. त्यांनीं "होय" ह्मणून उत्तर दिल्यावर पंतांनीं सीतागीत व रुक्मिणी-हरणगीत अशीं दोन प्रकरणें बायकांचे ओव्यांचे चालीवर रचिलीं. त्यांतून दोन ओव्या मासल्याकरितां पुढें दाखल करितों:—

यज्ञासाठीं भूमी, नांगरितां धन्या ॥
सांपडली कन्या, सीता देवी ॥ १ ॥
दाविली किष्किंधा, भेटविली तारा ॥
सुग्रीवाची दारा, जाऊ बाई ॥ २ ॥

सीतागीत

कुरु-क्षेत्रीं येतां, सूर्य-ग्रह-पर्व ॥
स्नाना आले सर्व यदू कुरु ॥ १ ॥
द्रौपदी बाई हे, माझी लग्न-कथा ॥
स्वामी मनोरथा, पुरविती ॥ २ ॥

रुक्मिणी हरणगीत

या ओव्या व ओव्या ह्मणण्यास प्रारंभ करते समयीं आपल्या बायका म्हणतात ती पुढील ओवी यांची चाल एकच आहे असें सहज दिसून येईल:—

पहिली माझी ओवी, पहिला माझा नेम ॥
तुळशी खालीं राम, पोथी वाची ॥ १ ॥

या ओव्या दळते समयीं बायका ह्मणूं लागल्या तेव्हां त्या यजमानांचे कानीं पडल्या. त्यावरून त्यांनीं ह्या नव्या ओव्या कोठल्या वगैरे विचारपूस केली. तेव्हां रामचंद्रपंतांचे चिरंजीव मोरोपंत यांनीं त्या केल्या असें ऐकून यजमानांस संतोष झाला. यजमानांस आपली कविता-शक्ति कळविण्याची ही मोठी चमत्कारिकच शकल पंतांनीं काढिली यांत संशय नाहीं. याप्रमाणेंच सावित्रीआख्यान ही केलें आहे असें म्हणतात.

३ एके समयीं रामजोशीबोवा सोलापूरकर हे तमाशा घेऊन बारामतीस गेले. तेव्हां त्यांचा तमाशा करण्याचा बेत ठरला. परंतु नट पाहाणें अशास्त्र असल्यामुळें पंतांनीं तमाशास येण्याचें नाकबूल केलें. तेव्हां "आपण माडीवर बसून जोशीबोवांचें कवन ऐकावें म्हणजे झालें." असा मंडळीनें आग्रह केल्यामुळें पंतांनीं रुकार दिला. इकडे पंत माडीवर ऐकत बसले आहेत ही गोष्ट मंडळीनें जोशीबोवांस कळविली त्यामुळें डफावर थाप मारिल्याबरोबर जोशीबोवांनी वैराग्य व बोध यांस अनुलक्षून लावण्या म्हणण्याचा सपाटा एकसारखा चालविला. तें पाहून पंतांस फार संतोष झाला व ते खालीं येऊन जोशीबोवांस म्हणाले कीं, "तुमची वाणी फार रसाळ आहे. परंतु तुम्ही या नटास पुढें करून स्वत: मागें उभे राहतां हें बरोबर नाहीं. तुम्ही स्वत: पुढें उभे राहून कीर्तन करावें." त्यावर जोशीबोवा ह्मणाले कीं, "कीर्तनाचें साहित्य मजजवळ नाहीं." तें ऐकून पंत ह्मणाले कीं, "मी काव्य करीत आहें तें कोणाकरितां? तुमचेसारखे जे कीर्तन करतील त्यांजकरितांच माझी खटपट चालली आहे." तेव्हांपासून जोशीबोवांनीं तमाशा करण्याचें काम सोडून दिलें व कीर्तन करण्यास आरंभ केला.

४. वरील आख्यायिकेंत सांगितल्याप्रमाणें पंत व जोशीबुवा यांचा स्नेह झाल्यावर एके समयीं पंत काय करीत आहेत त्याचा शोध करून येण्याविषयीं एका मनुष्यास सांगितलें. तो पंतांस भेटून परत निरोप घेऊन आला कीं, "या वेळीं मी रघुनाथ-चरित लिहित आहें" असें पंतांनीं सांगितलें. तें ऐकून जे पंत मोठे विस्तर-भीरु * व संक्षेपानें सुरस ग्रंथ लिहिण्याविषयीं

* या विस्तर-भीरुत्वाविषयीं कांहीं आर्या निबंधमालेच्या ५१ व्या अंकांत छापल्या आहेत.

ज्यांचा बाणा त्यांनीं " राम-कथा " असें एकादें लहान नांव न योजतां " रघुनाथ-चरित " इतकें लांबट नांव कां सांगितलें याविषयीं जोशीबुवा विचार करूं लागले. बराच वेळ विचार केल्यावर जोशीबुवांनीं अटकळ केली कीं, पंत या समयीं निरोष्ठरामायण लिहित असतील. ह्मणून त्यांनीं "रघुनाथ-चरित्र" अशा लांबट नांवाचा प्रयोग केला असावा. नंतर समक्ष गांठ पडल्यावर विचारून पहातां आपण केलेली अटकळ खरी असें जोशीबोवांस समजून आलें.

५. दुसरे बाजीराव साहेब पेशवे यांची वहीण दुर्गाबाई ही पांडुरंगरावनाईक यांस दिली होती. एके वर्षीं बाजीराव साहेब भाऊबिजेकरितां बारामतीस आले. तेथें नाईक यांचे पदरीं मोरोपंत पराडकर मोठे विद्वान गृहस्थ आहेत असें पाहून ते आपले जवळ असावे अशी आपली मनीषा बाजीरावसाहेबांनीं नायकांस कळविली. त्याजवर नायकांनीं उत्तर दिलें कीं, " ते आमचे येथें आहेत असें नाहीं. तर आह्मींच त्यांच्या आश्रयानें आहों. यास्तव आपण पंतासच विचारावें. ते कोणत्याही कामीं स्वतंत्र आहेत. " त्यावरून पंतांस विचारितां ते नायकांस ह्मणाले कीं, "आपले पाय सोडून जाण्याची माझी तर इच्छा नाहीं. पण माझा आपणास कंटाळा आला असल्यास ईश्वर जिकडे वाट दाखवील तिकडे जाईन." नंतर आह्मांस निदान एकदां तरी आपण पुराण सांगावें असें बाजीराव साहेब ह्मणाले. त्यावर पंत यजमानास ह्मणाले कीं आपण पुराणास असल्यावर मग दुसरें कोणी असलें तरी चिंता नाहीं. एवढ्यावरून बाजीराव साहेब यांस फार राग आला व त्यामुळें ते पंतांचा व त्यांचे काव्याचा फार द्वेष करूं लागले. पुढें गादीवर असतांना व पद-च्युत झाल्यावर ब्रह्मावर्तीं असतां कोणा हरदासाची कथा करावयाची असल्यास जीं पांच चार कलमें * यजमानांचे आज्ञेवरून कारभारी हरदासास कळवीत असत त्यांपैकीं " मोरोपंताची आर्या कथेंत ह्मणूं नये " हें एक असे.

६. मोरोपंत हे लहानपणीं एके समयीं पाध्ये यांजकडे द्वादशीचे दिवशीं जेवायास गेले. भोजनोत्तर त्या दिवसाचे प्रसंगास उद्देशून एक आर्या करून

---

* हीं कलमें ध्यानांत ठेवण्यासारखीं असल्यामुळें येथें देतों:—
१ सगळी कथा चार घटकांत आटपावी.
२ यजमान कथेस येऊन बसल्यावर सभेकडे हरदासानें पाठ करूं नये.
३ कथेंत कृष्ण-चरित्र लावावें.
४ लाविलेलें आख्यान अर्धवट न ठेवितां संपविलें पाहिजे.
५ मोरोपंताची आर्या कथेंत ह्मणूं नये.

सी त्यांनीं पाध्यांचे ओटीचे भिंतीवर लिहून ठेविली आणि आपले घरीं निघून गेले. ती आर्या पाध्यांचे दृष्टीस पडली तेव्हां तींत अर्थ गौरव असून ती त्या दिवसाचे प्रसंगास अनुलक्षून लिहिली आहे असें पाहून त्यांनीं ती कोणी लिहिली याविषयीं चौकशी केली. तेव्हां ती पराडकरांचा मुलगा मोरोबा यानें लिहिली असें समजलें. त्यावरून त्या मुलाचे बुद्धिमत्तेविषयीं खातरी झाल्यामुळें रामाजीपंतास सांगून त्या मुलास आपलेकडे संस्कृत भाषा शिकण्या करितां ठेविलें.

७. महीपतिकृत भक्तविजयाचे ४९ वे अध्यायांत असें लिहिलें आहे कीं एका अडक्याची चूक हिशेबांत लागल्यामुळें पुष्कळ रात्र होईपर्यंत दिव्याशीं चुकीचा पत्ता लावण्याकरितां एकनाथ जागत बसला. नंतर पुष्कळवेळ एकाग्र चित्तानें तपास केल्यावर चूक सांपडली तेव्हां त्यास परमानंद झाला. तें पाहून एकनाथाचे यजमान जनार्दनपंत ह्मणाले कीं ईश्वराकडे असेंच लक्ष लागलें तर किती कल्याण होईल बरें ? तें ऐकतांच एकनाथानें यजमानांचे पायांवर लेखणी वाहिली आणि तेव्हांपासून तो भक्तिमार्गांत शिरला.' हीच गोष्ट कित्येक लोक मोरोपंतांविषयीं सांगतात. व ती जुळवण्याकरितां मोरोपंत हे बारामतीस जाण्यापूर्वीं पन्हाळ्यास मुजुमदारीवर होते असें कल्पितात.

वे० शा० सं० रा० रा० भिकंभटजी करमरकर हरदास वास्तव्य आजरें इलाखा करवीर यांनीं मोरोपंतांविषयीं पुष्कळ माहिती आह्मांस दिली. तिचे आधारें आह्मी चरित्र लिहून तयार केलें तों इतक्यांत हल्लीं पंढरीस राहणारे पंतांचे वंशज (ह्म० नातवाचे नातु) मयूरपंडित यांणीं ही पुष्कळ माहिती मोठ्या उदार बुद्धीनें आमचेकडे लिहून पाठविली. सबब मशारनिल्हे भिकंभटजी व पंडित यांचे आमच्यावर व सर्व महाराष्ट्र जनांवर मोठे उपकार आहेत व त्याबद्दल आह्मी उभयतांचे फार आभारी आहों. शिवाय विद्वद्वर्य मयूरपंडितांनीं मोरोपंतांचीं कांहीं काव्यें आह्मांकडे पाठविलीं आहेत याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत हें वाचकांस कळविण्यास आह्मांस फार संतोष वाटतो.

# मोरोपंत

## पूर्ण-मंत्र-भागवत

नत-मोक्षद भव[1]-विधि[2]-नुत[3] जगदीश वरेण्य[4] वैनतेय-रथ[5] ॥
वाराया वसुधा-भर देह धरी वासवादि-गेय-कथ[6] ॥ १ ॥
नक्षत्र-प[7] प्रमोदे स्वकुळीं भक्तामराग[8] वर-तेजा ॥
वात्सल्यें वसुदेवात्मज होतां यंजिति[9] लोक-वर ते ज्या ॥ २ ॥
नर-पति परमोग्र भयद कंस उरगसा[10] वधीं रते अल्प[11] ॥
वाल व्यसु[12] करि देवक्युदरज सा[13] यादवादि यमकल्प ॥ ३ ॥
नष्टां मोहुनि भवनीं गवळ्याच्या नेज आपुलें राम ॥
वाढवि सुख दे वाढुनि नंद-यशोदादिकां घन-श्याम ॥ ४ ॥
न गमो चित्र भयद तम घन गर्जित वर्ष तेथ शेष वरी ॥
वारिधि तशीं सुखें दे वाट हि यमुना न मार्ग-विघ्न करी ॥ ५ ॥
नष्टायु[14] मोहितां भरि गर-रस वदनीं कुबुद्धि[15] ते हि तरे ॥
वाखाणितां सुधाधिक वरदेश्वर-बाळ यश करी हित रे ॥ ६ ॥
अन[16] मोडी भग्न करुनि गतिस तृणावर्त[17] न परते मागें ॥
वाटेसि सुदेशाच्या लावी वारूनि पाप-चय[18] रागें[19] ॥ ७ ॥
नलिनाक्ष[20]-मुखीं मोहे पाहूनि नभ-आदि जग वदे हा[21] ते ॥
वाहुनि वसु[22] देह तरि च वाल्मीकि-प्रमुख गाति यश गा तें ॥ ८ ॥
नवल करी मोठें जन भव्य-प्रद गर्ग नांव तज कथी ॥
वाचेला सुख दे जें वागवि जड जेंवि[23] मथि दोष[24] मथी ॥ ९ ॥
नव्य-प्रमोद-कर शिशु-लीला-सुभगांगें[25] बहुत बळ-हरि[26] ते ॥
बाळ सुर-गुरू[27] हि झाले देहि-हिता बाप-मायसे करिते ॥ १० ॥
नवनीत-मोषें[28] सोसे न च भक्षी[29] अंगज बहु ते माती ॥
वासवि[30] सुमुख वदे हा बागुलसें विश्व माय बाळा ती ॥ ११ ॥

---

१ शिव. २ ब्रह्मा. ३ स्तुत. ४ श्रेष्ठ. ५ गरुड-वाहन. ६ इंद्रादिकांनीं गाइली आहे कथा ज्याची. ७ चंद्र. ८ भक्तकल्पद्रुम ९ पूजिती. १० सर्पासारखा. ११ लहान. १२ मृत. १३ साहा ( संख्या ) १४ नष्ट झालें आहे आयुष्य जीचें अशी ( पूतना ). १५ दुष्टबुद्धि ( पूतनेचें विशेषण ) १६ गाडा. १७ राक्षस विशेष. १८ समूह. १९ कृपेनें २० कृष्ण २१ हाय हाय. २२ द्रव्य. २३ यशोदा. २४ नाश करी. २५ बाल-क्रीडेनें शोभत आहे अंगें ज्यांची असे ( रामकृष्ण ) २६ बलराम व कृष्ण २७ देव-श्रेष्ठ. २८ चोरी. २९ पुत्र ३० पसरवी.

स्तन-काम मोघें[३१] होतां, भग्न करुनि मथन-पात्र मग भंवते ॥
वानर मेळवुनि सुरस, दे वांटुनि खाय पातली तंव ते ॥ १२ ॥
न करी क्षमा तमो-मति[३२] भर तनुचा न गति जव[३३]-वती तेणें ॥
वात्सल्यें सुत धरूं दे बांढ[३४] यशोधामें[३५] वंध गणि लेणें * ॥ १३ ॥
घन मोहांतुनि इभसे[३६], उद्धारि यमें[३७] अगम[३८] अवनतेष्टकरें[३९] ॥
घे रूप वासुराचें, देवांरि[४०] करी तदीय घात परें[४१] ॥ १४ ॥
नग मोठासा सुभयंकर अजगर वत्स ते हि तत्पाळ ॥
वासुनि मुख देवास हि, गिळि होय तया अघो[४२] तदां काळ§ ॥१५॥
नर-शिशु मानुनि मोहें, भक्षी गल-दग्ध बकें[४३] हतेच्छ वमे ॥
बाळ-हरि असुर-देहा, चिरि सहज नखार्द्र थवससाचि[४४] गमे ॥१६॥
नलिनज[४५] मोहीं होउनि, डिंभ[४६] अनुग वत्स ते हि वर्षभरी ॥
वाढवि सुख न कळों दे, भावा रामा हि विश्वकाय हरी ॥ १७ ॥
नटतां[४७] समोर गर्दभ[४८], गर्वें बळ तेधवांचि त्यास वधी ॥
वानिति सुर देखुनि विभु[४९]-बाहु-प्रति-विजय निवावि वासवं-धी ॥१८॥
नटसा प्रभु प्रमोदें, भग्न करी फण महा-गरळ वमते ॥
वासुकि शत देते बळ, बालिशें[५१] कालिय तसेचि ते शमते ॥ १९ ॥
वन-वन्हि पी रमोत्सव-भवनें[५२] व्रज रक्षि गज-वरा तेंवी ॥
बा सुहृदेक-गुरु नवा, नित्य प्रिय हरिच या जना सेवी ॥ २० ॥
नगोप-समोरु-वपु[५३] असुर, वलभद्र मग प्रलंब[५४] वधि तेजें ॥
वाहाति कुसुमें देवी, वानिति यश सत्सभा मना ये जें ॥ २१ ॥
नगजा-नियमोपासन[५५]-भद्र-मति गवळणी स्व-सुरतेहा[५६] ॥
बाळा सुदती त्यां दे, वासें[५७] चोरूनि सदय वर ते हा ॥ २२ ॥
नवसा परमोत्कांच्या[५८], पावे प्रभविष्णु गडबडुनि ते त्या ॥
वाढिति सु-रस पदेच्छुक, वाडव-दार[५९] प्रिय स्वपद देत्या ॥ २३ ॥

---

३१ व्यर्थ ३२ तमोगुणानें व्यापिली आहे मति जीची ३३ वेगवती ३४ अत्यंत ३५ कृष्ण * 'वाढ यशोदाप्तबंध गणि लेणें' असा पंढरपूर येथील प्रतीचा पाठ आहे. ३६ हत्ती ( गजेंद्र ) ३७ दोन ३८ वृक्ष ३९ नम्रसेवकाचें इष्ट करणारा ४० राक्षसविशेष ४१ कृष्ण ४२ अघासुर § 'तदघकाळ' ( पं० प्र० ) ४३ राक्षसविशेष ४४ गवता सारखा ४५ ब्रह्मा ४६ बालक, गोपाळ. ४७ नाचतां ४८ असुरविशेष ४९ ईश्वराचें भुजांचा प्रत्येक विजय ५० ओकणारें ५१ मूर्ख ५२ लक्ष्मीच्या आनंदाचें स्थान ५३ मोठ्या पर्वता सारखें आहे प्रचंड शरीर ज्याचें ५४ रा० वि० ५५ कात्यायनीव्रत ५६ स्वसुरतेच्छा ५७ वस्त्रें ५८ अति उत्कंठितांच्या ५९ ब्राह्मणस्त्रिया.

दिन सप्त वृष्टि मोठी; करि शक्र भयार्त गवळि ते हरिते ॥
बांहति[६०] नग[६१] सप्त दिवस, धरि सुख दे व्यसन[६२] बाढ-दय[६३] हरि तें ॥२४
ह्मणुनि नमोऽस्तु भवघ्नी[६४], गजवर-वाहन[६५] नतेष्टदा[६६] राहे ॥
वाखाणुनि सुरभि[६७] वदे गोविंद नवात्म-पय अर्जा[६८] वाहे ॥ २५ ॥
वन-नाथ[६९]-भृत्य मोहें ने व्रज-भर्त्या[७०] गमावते गवळी ॥
वारि-पथें तद्वसु दे त्या जाउनि वारि-नायकीं[७१] जवळी ॥ २६ ॥
मदन-विमोहन वल्लभ-वेणु-स्वर-गाति वनांत बहु माते ॥
वामा[७२] मुरसें देह न सांवरि किति वास[७३] म्हणाति जय-गाते ॥ २७ ॥
स्त्रीजन-कामोद्दीपन-भर गगनीं वर विमान ते रासीं[७४] ॥
वाणी[७५] सुरस वदे या वानील समान काय येरांसी[७६] ॥ २८ ॥
नगजा[७७]-यात्रा मोठी भक्षी अजगर वनांत ते दोघे ॥
बा अहि[७८] उद्धारि सुख दे प्रभु वारुनि ताप शाप यश तो घे ॥२९।
धनदाचा[७९] मोठा खल भर्त्रहित अनुग[८०] बळें चि तेज हरी ॥
बाल नसे ने सुदती दे वार्यसे[८१] पाय हंस-कीर्ति-वरी ॥ ३० ॥
नग-गुरु[८२] यमोग्र वृषभ[८३] ध्वनिनें गर्भघ्न वन्हि तेलसनें ॥
वाढे तसा चि केला व्यसु[८३] दवाजयद[८४] पीत-चेलोनें[८५] ॥ ३१ ॥
अहि[८६]-दलन मोरसा करि भव-हर[८७] खल तुरग[८८]-वध नतेष्टद[८९] या ॥
वानिति सुर वरदेशा[९०] याची श्रित-बालकीं यथेष्ट दया ॥ ३२ ॥
वनदासि[९१] मोरसा हरि भक्त गाहिवरोनि पूरितनतेहा[९२] ॥
वानित सुभाग्य देखे बाळा माश्रय-पदां[९३] कृत-स्नेहा ॥ ३३ ॥
मन मोहीं गोपींचें भरलें गडबडति तेधवां रडती ॥
वाटे असु[९४]-प्रयाणचि देश दवानलाचि[९५] कांथ[९६] भर पडती ॥ ३४ ॥
नगरीं प्रमोद-भर जग-दीशा अवलोकिते जन शिवास ॥

६० हांक मारिती ६१ पर्वत ६२ संकट ६३ अत्यंत दयाळु कृष्ण ६४ संसार-नाशास ६५ इंद्र ६६ शरणागताचें इष्ट करणारा ६७ कामधेनु ६८ कृष्णास ६९ उदक-स्वामी ( वरुण )-भृत्य(सेवक) ७० गोकुल-नायका ( नंदा ) ७१ वरुण ७२ स्त्री ७३ वस्त्रें ७४ रासांचे वेळीं ७५ सरस्वती ७६ गचाळास ७७ पार्वती ७८ सर्प ७९ कुबेराचा ८० सेवक ( शंखचूड ) ८१ पर्वतप्राय ८२ अरिष्टासुर ८३ व्यसु ८४ देव-अपजय-द ८५ पितांबरधारीनें ८६ सर्प ८७ संसार-नाशक ( कृष्ण ) ८८ केशिनामक दैत्य ८९ नम्र जनास इष्ट देणारा ९० वरदश्रेष्ठ ९१ जळदास ९२ भक्त-मनोरथ-पूरक ९३ लक्ष्मी-पति-चरणा ९४ प्राणोत्क्रमण ९५ दावाग्नि ९६ कल्याणास.

जाले सुदामें[९७]-कुब्जा-दिक देही अभिनवाव्यय-निर्वास[९८] ॥ ३५ ॥
गुरु-बाणासनें[९९] मोडुनि ईभें[१००] अगसा[१] वधुनि लेश तेजानें ॥
बाढ-भुजें[२] व्यसु केले देवाप्रिय[३] मल्ल मत्त जे पानें ॥ ३६ ॥
अघ-नग परमोग्र भयद गरळ-कटु-वचन न ते स्वजन मानी ॥
खल-मघवा[५] व्यसु केला देशाहित कंस वारिनयें[६] मानी ॥ ३७ ॥
करुनि जनक मोदितें[७] कुल-भर्ता मग उग्रसेन यादव ते ॥
स्व-निवास सुस्थित मुदित देश शिवायनचि निजपदीं लवते ॥३८॥
मृत तनय यमोन्मोचित भव्य गुरूसि[९] मग कृतानति-स्तवं[१०] ते ॥
द्विषदनिल-वासुकि[११] प्रभु देति शिवालयें सदैव जे सेवते[१२] ॥ ३९ ॥
स्वज्ञान मोह-नाशक त्या भक्ता गवळिणींसें[१३] ते दासें* ॥
प्रेषुनि वासुनि मुख जें देति न शमें[१५] ज्या शिवाय खेदास ॥ ४० ॥
नर-पति मागध[१६] मोठे भयद गजादिबळ घे स्वतेज अरी ॥
वार्ता परिसुनि देशीं दावाया ये बुडोनि जाय परी ॥ ४१ ॥
परें[१७]-जन-मोहद भट[१८] गज-वरसे चि मदांध कोटि ते तीन ॥
ज्याचे वासुकिसा दे दरें[१९] केला बाढ यवनें[२०] असु-हीनें[२१] ॥ ४२ ॥
नव पुरें[२२] परमोत्तम शुभ-गतिदें[२३] रचि वेलांत[२४] तेथ अजें[२५] राहे ॥
कुळ वाढवि बहु सुख दे जसि बाळा माय कीर्ति अजरा[२६] हे ॥४३॥
नरसे[२७] चि पळति मोठें भय दाविति सागरीं वसति अजें[२८] ते ॥
बा सुरभितें[२९] न देखति वाहुनि हृदयांत पाय यां भजते[३०] ॥ ४४ ॥
नवरी रेवति[३१] मोदें बळभद्रा मग वरी पदीं च रते ॥
जें वारि-रुहें[३२] सुरसें[३३] दे वाळुनि[३४] त्या काय मधुकरी[३५] परते ॥ ४५ ॥

---

९७ माळी (ज्यानें कृष्णास मथुरेंत हार तुरे दिले) ९८ नूतन-नाशरहित-स्थल ९९ धनुष्य १०० हत्ती १ वृक्षप्राय २ पुष्ट-बाहु (मल्ल) ३ देव-शत्रु ४ मद्यप्राशनानें ४ पाप-पर्वत ५ खल-श्रेष्ठ ६ अधो-गमन-शील (जलवत्) ७ आनंदित ८ कल्याण-स्थान ९ सांदीपनि १० केला आहे नमस्कार व स्तव ज्यांणीं ११ शत्रुरूप-वायूला सर्पाप्रमाणें खाणारे १२ निराळे १३ तें=रामकृष्ण १४ उद्धव १५ शांति

* स्वज्ञान मोह-नाशक त्या भक्ता गवळणींस ते वास ।
प्रेषुनि मुखजें सुख जें देतीं न समजा शिवाय खेदास ॥ असा एक पाठ आहे,

१६ जरासंध १७ शत्रु १८ वीर १९ भीति २० काल-यवन २१ प्राण-रहित २२ द्वारका २३ उत्तम गति देणारा कृष्ण २४ उदकांत (समुद्रांत) २२ कृष्ण २६ नवीन २७ प्राकृत-जना सारखें २८ राम-कृष्ण २९ कामधेनु ३० भक्त ३१ बलराम-स्त्री ३२ कमल ३३ पुष्प-रस ३४ टाकून ३५ भ्रमरी.

खल-जन मोघांश[३६] करुनि भव्यां[३७] मग वरिलि भीष्मकी[३८] मा[३९] ते ॥
वाहे सुदेव-बांडव[४०] पत्र प्रेषूनि म्हणाति यश गा तें ॥ ४६ ॥
मदनें[४१] रमोदर-जें[४२] भयें सागरिं शंबरें[४३] हतेच्छ बुडवि परी ॥
वाढुनि असुर वधुनि दे दर्शन बहु हृष्ट बाप-माय करी ॥ ४७ ॥
सुबहु दिन मोहद समर भक्तें[४४] करुनि संगरोत्सवें[४५] सुतेतें[४६] ॥
वाहे मणि वसु देह हि जें श्री सुख हे हि बायको घे तें ॥४८॥
मन मोडुनि भय पावे गडबडुनि सुतेसि[४७] सूर्य-सख[४८] अर्पी ॥
वानिति[४९] सुरी[५०] गदेपरि वास हरिकरीं यशें जना तर्पी ॥ ४९ ॥
न जगे-हेमोदय-रुचि भक्तें[५१] जगन्मंत[५२] सवाक्रियेंत[५३] रते ॥
वाहे मणि वसु देवा यश ये हें समजती सुधी नर ते ॥ ५० ॥
रवितनया[५४] परमोत्कां[५५] भजनें जगदीश्वरा स्वयें वरि ते ॥
वास सुकृतें पदीं दे वारिज-शय[५६] त्यासि दास्य जे करिते ॥ ५१ ॥
नवरी प्रभु प्रमोदें पितृ-भगिनी-जा[५७] हि मग वरी अरितें ॥
वाहुनि सुजविति देशप[५८] बाहुजें[५९] नयनें झटोनि रण करिते ॥५२॥
नग्नजितें मोदभरें वृष-गर्व-हरा[६०] वरा नतेष्टकरा ॥
वाहिलि सुता[६१] सुदेशज वारणें[६२] हय सह न आवरुनि करा ॥ ५३ ॥
पर न मना ये मोहे तात-भगिन्यंगजा[६३] वरी भ्राते ॥
वाहोनि सुखें देता[६४] बाढश्रेयस्करा वरायातें ॥ ५४ ॥
मद्र-नरप-भू[६५] मोदें इभ-गति[६६] वरिलि विसरे न ते कृष्णा ॥
वासवजें[६७] सुज्ञें जासि देवी नव-वारिज-नयना कृष्णा[६८] ॥ ५५ ॥
नरका[६९] मोठ्या समरीं भस्म करी मग वरी स्त्रिया तेजें ॥
हरि वासव-मदं[७०] सुर-तरु दे मागे इष्ट बायको[७१] तें जें ॥ ५६ ॥
नवऱ्या मोदें भव्या लक्ष्मी जगदीश वरुनि ते सोळा ॥

---

३६ निराश ३७ रूपवती ३८ रुक्मिणी ३९ लक्ष्मी ४० सुदेवनामा ब्राह्मण ४१ प्रद्युम्न ४२ रुक्मिणी-पुत्र ४३ दैत्यविशेष ४४ जांबुवंत ४५ "भक्तकरी संगतोत्सव सुतेतें" (पं० प्र०) संगतोत्सव=दर्शनाचे योगानें आनंदित ४६ जांबुवती ४७ सत्यभामेस ४८ सत्राजित ४९ वाणिति ५० देवी ५१ अक्रूर ५२ सर्व-मान ५३ यज्ञकर्मांत ५४ कालिंदी ५५ परम-उत्कंठिता ५६ कमलपाणि (कृष्ण) ५७ कृष्णाची आत श्रुतकीर्ति-तिची कन्या मित्रविंदा ५८ राजे ५९ क्षत्रिय ६० इंद्र-गर्व-हर (कृष्ण) ६१ सत्या ६२ हत्ती ६३ भद्रा नांवाची ६४ कृष्ण ६५ लक्ष्मणा नांवाची ६६ गजगति ६७ अर्जुनानें ६८ द्रौपदी ६९ भोमासुर ७० इंद्र-गर्व ७१ सत्यभामा सुंदर.

बा[७२]मी सहस्र तितुक्यां सुख दे वाक्कायमनें[७३] पदीं घोळा ॥ ५७ ॥
नर्में[७४] श्री मोहद करि भव-भंजनें[७५] गर्व नुरवि लव तेणें ॥
वाक्यें सुरसें देवाचार्यें[७६] म्हणे काय मी अशीं नेणें ॥ ५८ ॥
रुक्मी नय मोडी त्यजि भय खळ कालिंगकादि बळ ते ज्या ॥
वाइट हि असुनि देती शळें[७७] दवा तेंवि होय वळ तेजा ॥ ५९ ॥
बळि-नंदन[७८] मोठा हर-भक्त महा गर्व वरजें[७९]-तेज जया ॥
बाहु-सहस्र सुरोत्तम दे वारुनि अनय जीवदान तया ॥ ६० ॥
वनद-समोदारें[८०] भला नृग नृप-वर तारिला नतेष्ट-करें ॥
वारिज-नाभें सुज्ञें वरदेशें यादवान्ववाय-वरें[८१] ॥ ६१ ॥
व्रज-जन मोदित करि बळभद्र जगन्नाथ पुरवि वनितेहा ॥
वात्सल्यें सुख दे कीं ह्मणती बाळक वयस्य[८२] मनिं ते हा ॥ ६२ ॥
नर-पति पौंड्रक[८३] मोहे ईश ह्मणे जेंवि भर्णग[८४] मानव तें ॥
त्या वधुनि वासुदेव न करितां वा सुकवि काय मानवतें ॥ ६३ ॥
वानर[८५] मोठा खळ भव-विपदगदें[८६] रैवतेच्छितक्रीडें[८७] ॥
वाम विहतसुर वधिला देशसवापाय[***] हृत-धरा-पीडें[****] ॥ ६४ ॥
नय[८८] मोडुनि भव-हर-जा[८९] गज-पुरिं[९०] करि बद्ध तेधवां दुष्ट ॥
बालिशें[९१] सुयोधन वदे वाइट ऐकोनि होय वळ रुष्ट ॥ ६५ ॥
नगरें[९२] यमोग्र हळें[९३] उच-टुनि भगवत्पादजें[९४] सरितें[९५]-माजी ॥
बुडवित होता वासुनि मुख देवा* अभय वदति जन-राजी[९६] ॥ ६६ ॥
नव मोद प्रति-भवनेंग[९७] गद-पूर्वजें[९८] चित्र भाव ते दावी ॥
वाटे सुख देव-मुनिसें[९९] वाढवि यश जो अनंत वेदा वी[१००] ॥ ६७ ॥
नर-पति-मोचन भक्त-सुगम मागध[१] वधुनि ते हि पार्थ-सख ॥
चिंता वारी सुख दे धर्मा वागवुनि राजसूय-मख ॥ ६८ ॥

---

७२ सुंदर. ७३ वाणी-शरीर-मन हीं. ७४ विनोद. ७५ संसार-नाशक. ७६ बृहस्पति. ७७ टोळ. ७८ बाणासुर. ७९ वरप्राप्तीपासून उत्पन्न झालेलें. ८० मेघवत् उदार ८१ यादव-वंश-श्रेष्ठ ८२ मित्र. ८३ राज विशेष ८४ भिकारी. ८५ नरकासुराचा मित्र ( द्विविद ). ८६ संसाररूप विपत्तीला औषधरूप. ८७ रैवत पर्वतावर इच्छिली आहे क्रीडा ज्याणें (बळराम). *** देशांतील यज्ञाचा नाश करणारा. **** दूर केली आहे पृथ्वीची पीडा ज्याणें. ८८ न्याय. ८९ संसार-नाशक (कृष्ण)–पुत्र ( सांब ). ९० हस्तिनापुरांत. ९१ मूर्ख. ९२ हास्तिनापूर. ९३ नांगरानें. ९४ ईश्वराचे पायापासून झालेली. ९५ यमुनेंत. ९६ जनसमूह. * " दे बा अभय वदति जनराजी " ( पं० प्र० ) ९७ प्रत्येक घरांत असणारा. ९८ कृष्ण. ९९ नारद. १०० प्रसवे. १ जरासंध.

नर-पति शाप-विमोहित भगवद्-द्वेषीं च जो रते चैद्य[2] ॥
बा गति सुदर्शनें दे मारु नि त्यातें भवामयें[3]-सुवैद्य ॥ ६९ ॥
मन मोहे धर्म-भंगें[4] *गमवि वनें[5] स्थळ भुलोनि तेथ पडे ॥
बाळ सुयोधन देखे स्वपरिभवा हास्य मय-सभेंत घडे ॥ ७० ॥
नगरी मोहें रोधी सौभ[6] गगन-यान-चर बळी मातें[7] ॥
घन वात सुनाभायुध[8] नांदे निववावयासि यश गा तें ॥ ७१ ॥
निज-जन-संग्रामोद्यम + भव्य गमेना न वळति ते कोणी ॥
वरवा सुतीर्थ-देशीं वास ह्मणे जाय वळें[9] फिरे क्षोणी[10] ॥ ७२ ॥
सज्जन मोदित केले शुभ-गति-वर-लाभ-काम जे होते ॥
करि तत्सवाहित व्यसु[11] दे वाडवें[12] कथिति अर्थ-चय जे ते ॥ ७३ ॥
नमुनि प्रमोदवि पृथुकें[13] भक्षुनि गहिंवरुनि तेधवां परते ॥
वाडव[14] सखा सुदामा त्या दे वासार्थ हेम[15]-मय पुर तें ॥ ७४ ॥
जन रविचा मोठा शुभ उपराग[16] श्रवण करुनि ते आले ॥
सहवास कुरु-सुदेशीं वाहुज समुदाय पावते झाले ॥ ७५ ॥
द्रुपद-तनयेसि मोदें भगवत्प्रिय-दार[17] ते कथिति लग्नें ॥
बा जा सुरसीं देवी-चित्तें बावरुनि हायसीं मग्नें ॥ ७६ ॥
नंदन-मोहें भजती गमति तदा सत्य वत्स ते पितर ॥
बाप वसुदेव वाटे नंद-यशोदांपुढें जना इतर ॥ ७७ ॥
गोपी नलिनी[18] च तमो-हर[19] भगवान् वदाति जाणते अथवा ॥
सुकल्या वल्ली देव हि वारिदें[20] यश साधु हो असें कथवा ॥ ७८ ॥
नयनें मोदाश्रुभरें[21] अंगज[22] बळ कृष्ण ते भरति पूर्ण ॥
बाळ व्यसु[23] देवकिला दाविति वानीलें[24] काय कवि पूर्ण ॥ ७९ ॥
मन-मोह शुभ गुण-गणें पावे बळें[25] तेज उग्र परि शिकवी ॥
वासविसें[26] सुभद्रा दे वानितिल उगे चि काय हरिसी कवी ॥ ८० ॥
अनुदिन मोदित भजनीं सदनुग-वर[27] शांति-तेज-आवास[28] ॥
त्या सुज्ञा श्रुतदेवा[29] भेटे यदुराज[30] भुलुनि भावास[31] ॥ ८१ ॥

---

२ शिशुपाल. ३ भवरोग. ४ धर्मराजाचे ऐश्वर्यानें. * वाटवी. ५ उदक. ६ शाल्व. ७ माजे. ८ सुदर्शन-धारी (कृष्ण). + हितकारक. ९ बलराम. १० पृथ्वी. + तद्यज्ञ-नाशक वातापि ११ मृत. १२ ब्राह्मण. १३ पाहे. १४ ब्राह्मण. १५ सुवर्णमय १६ ग्रहण. १७ कृष्णाच्या आवडत्या बायका. १८ कमलिनी. १९ सूर्य. २० मेघ. २१ आनंदाश्रुसमूह. २२ पुत्र. २३ मृत. २४ वर्णील. २५ बळराम. २६ अर्जुनास. २७ भक्तश्रेष्ठ. २८ स्थान. २९ ब्राह्मण विशेष. ३० कृष्ण. ३१ भक्तीस.

नरपति मोठा भक्त *स्वगताचि बहुलाश्व भूप तेथ वसे ॥
त्या वासुदेव वाढवि सुयशें या नत पित्यासि पुत्र तसे ॥ ८२ ॥
चित्त न मोडी भक्ती अनुराग बहु स्वदास ते†तारी ॥
मुख वासुं दे चि वारी प्रिय घन चातक-तृषा स्वयें वारी ॥ ८३ ॥
हरि चि घन मोर भक्त चि कीं गर्जति कारिति नृत्य सोत्सव तें ॥
वारुनि अघ सुख देती जीवा प्रभु-वर्य-पाय हे सवते ॥ ८४ ॥
शमन करुनि मोहाचें भजकां जे गति वरा ह्मणति कवि ते ॥
सदरि-पवन-वासुकि[32] दे वागवितिल काय पर असे अविते[33] ॥८५॥
नगजेशीं[34] मोठा खळ भज्ञुनि गळां पडुनि वर वरुनि परते ॥
बाळ वृकासुर देवा हाय ह्मणवि अमर कांपले पर ते ॥ ८६ ॥
वचन अमोघें[35] न व्हाया भस्म गर-ग्रीवें[36] लोक ते शर्वें[37] ॥
भ्रमतां वासुनि मुख हा ह्मणती देवादि सभयधी सर्व ॥ ८७ ॥
व्यसनें[38] तसें मोठें भवीं‡ गडबडतां ते हि लोक-पति बाळ ॥
भूसुरें[39]-विष्णु वृका दे वामनसा भेटि सद्भयद-काळें[40] ॥ ८८ ॥
वृक-मन मोहुनि भगवान् वदला तेव्हां भवाहितीं[41] असुरा ॥
देवा शिरीं §शय मृषा[42] हरि-हर-माया चि भुलवि बहु न सुरां[43] ॥८९॥
नवल असें मोठें भव-गज-हरि[44] कारि वज्र-तेज पाणि[45] धरी ॥
वासव[46] चि सुनाभ[47]-कर छल[48] देवाराति[49] होय तो शिखरी[50] ॥ ९० ॥
नवें[51] मोत्यांचे दाणे-से डिंभें[52] गमावले न ते हानी ॥
लघु वाडव[53] सुत-शोकीं दे गौळी[54] यादवात्यनयें[55] मानी ॥ ९१ ॥
नरें[56] मोठा पण[57] भर घे गर्वें[58] ते यादव ह्मणे शिवा[59] दशमीं[60] ॥
स्पष्ट तव सुतां देउनि संपादिन वाडवोत्तमा यश मी ॥ ९२ ॥
अनळीं[61] मोघपण भासित हो* * नर गणिती न वपुसि जे कवि ते ॥

---

* शरण आलेला. † बहुलाश्व आणि श्रुतदेव. ३२ सज्जन-शत्रु (खल)—वायु-सर्प. ३३ रक्षणकर्ते. ३४ पार्वती-पति. ३५ व्यर्थ न होणारें. ३६ विष-कंठ. ३७ शिव. ३८ संकट. ‡ शिव. ३९ ब्राह्मणरूपी विष्णु. ४० सज्जनांस जे भयप्रद त्यांचा काळ. ४१ शिवशत्रु. § हात. ४२ व्यर्थ. ४३ मद्य. ४४ संसार-हत्ती-सिंह. ४५ हात. ४६ इंद्र. ४७ चक्रधर (विष्णु). ४८ कपट. ४९ देवशत्रु. ५० पर्वत. ५१ नऊ ५२ बालक. ५३ ब्राम्हण. ५४ शिव्या. ५५ यादवांचा मोठा अन्याय. ५६ अर्जुन. ५७ प्रतिज्ञा. ५८ कस्पटासारखे. ५९ कल्याणास. ६० दहाव्या ('सुतां' याचें विशेषण). ६१ अग्नीत. ** 'होइ न गणती' असा पाठ आहे (पं. प्र.)

वासवि[६२] सुज्ञ वदे करि वाणालय[६३] अवल ज्या पवन सविते ॥ ९३ ॥
तरि न उरे शिशु मोहे भगवत्सखे[६४] तेधवां धवल-वाहा[६५] ॥
कृष्ण ह्मणे मी द्विज-सुत देतों बा काय तूं ह्मणसि हा हा ॥ ९४ ॥
नरें[६६] परमोदार रथीं घे भगवान् द्रुत[६७] निघे प्रवर-तेजा[६८] ॥
वात-गति[६९] देश क्रमि वा शिवले काय न रविकर ते ज्यां[७०] ॥ ९५ ॥
दावी परम-घन-तमोहर[७१] भगवत्प्रहित चक्र-तेज पथा ॥
वासव-सुत[७२] सह देशा ने वारिज-नयनें[७३] अद्भुता स्वरथा ॥ ९६ ॥
शेष-शयन परमोत्तम-भक्त-स्वरगमें[७४] अनादि वर-तेजा[७५] ॥
बापा सुतसे देखति वासवि[७६] यदुराय[७७] बद्ध-कर ते ज्या ॥ ९७ ॥
अज्ञान-तमोघ्न[७८] ह्मणे भर जगतीचा[७९] हरा वधुनि परें[८०] ते ॥
द्रुत या न्या वाडव-सुत[८१] मज देवा प्रिय सदा पदा स्मरते ॥ ९८ ॥
नमुनि घेना[८२] मोर तसे भगवत्प्रेरित फिरोनि नरें[८३] हरि[८४] ते ॥
येती वाहुनि दश सुत देति तया नव नवाभ्युदय[८५] करिते ॥ ९९ ॥
सुजन प्रमोद-कर मुनि करिती भगवत्त्रयीं[८६] विवादातें ॥
वाडव सुज्ञ भृगु वदे वारिन संशय तुम्ही निवा दाते ॥ १०० ॥
कोप अनमनें[८७] मोठा भगवद्विधिच्या मनीं उठे न उते ॥
धरि वाट सुर*-मणिशि दे न शिवों बा यद्गुण श्रिताघ-धुते[८८] ॥ १०१ ॥
अनल-परमोग्र[८९] शूलें भस्म श्रीगल[९०] करावया पाहे ॥
तेव्हां शिवा[९१] सुदेवी वारी दृढ पाय धरूनियां राहे ॥ १०२ ॥
अविनत[९२] माधामोरीं[९३] भय न धरूनि राग करि पदें हाणीं ॥
वर-तेजा भृगु वाडव सुज्ञ गदेला नवा अजय[९४] आणी ॥ १०३ ॥
उठुनि नमी मोक्षद-गुरु[९५] परि भक्ता गजबजोनि ते लत्ता ॥
वानी मानी सुख शुचि देह शिवालय[९६] ह्मणे खरी सत्ता ॥ १०४ ॥
सर्वीं[९७] जन प्रमोदित भृगुनें भगवद्यशें चि ते केले ॥

---

६२ अर्जुन. ६३ बाणगृह. ६४ अर्जुन. ६५ अर्जुन. ६६ अर्जुन. ६७ सत्वर. ६८ श्रेष्ठ तेजाचा. ६९ वायूप्रमाणें चपल. ७० ज्या काय ते रविकर न शिवले ! (तो देश). ७१ आति गाढ-अंधकार-नाशक. ७२ अर्जुन. ७३ कृष्ण. ७४ कल्पवृक्ष. ७५ श्रेष्ठ तेजाचा. ७६ अर्जुन. ७७ कृष्ण. ७८ अज्ञान नाशक. ७९ पृथ्वीचा. ८० शत्रु. ८१ ब्राह्मण-पुत्र. ८२ मेदास. ८३ अर्जुन. ८४ कृष्ण. ८५ नवीन ऐश्वर्य. ८६ तीन देवांविषयीं. ८७ नमस्कार न करण्यानें. * शंकराकडे. ८८ भक्तांचें पाप धुऊन टाकणार. ८९ अग्नीसारखा अत्युग्र. ९० शिव. ९१ पार्वती. ९२ अनम्र. ९३ लक्ष्मी-पति-उरीं. ९४ पराजय. ९५ विष्णु. ९६ कल्याणस्थान.

वानिति भूसुर देवा, यत्स्मरणें ताप पाप-सह गेले ॥ १०५ ॥
नद्युत्तमा तैं[९७]ओघघ्नी भव्य-गती गी[९८] तिच्या तटीं वसतें ॥
थाडव सुज्ञ करिति हा, देवाद्या पारखुनि यशोरस ते ॥ १०६ ॥
संतत नव परमोत्सव, भरले नगरींत वसति ते करिती ॥
वाद्यें सुस्वर गीतें, देवालयें[९९][१००]-गर्व सर्व ही हरिती ॥ १०७ ॥
वंदं प्रभुवर मोरचि, भक्त-गण वदान्यतेसि[१०१] पार[१०२] नसे ॥
वाखाणिति सुखदेश्वर वार्ता कविराय ही अशेष कसे ॥ १०८ ॥
मंत्रमय रचुनि भावें, भागवता नमुनि देव-देवा हे ॥
तुळसी च राम-नंदन, सेवा ऐशीच देव दे वाहे ॥ १०९ ॥

समाप्त.

---

## गोपी गोडवा.*

श्रीमद्गोपी-वृंद,प्रेमामृत-सिंधु-बिंदु-लव करितो ॥
श्रवणां शीतळ सेवा, अजि रसिक-चकोर-इंदु लवकरि तो ॥ १ ॥
मथुरेकडील कांहीं, आयकिलें वृत्त सखि नव लटिक तें ॥
नोहे बहु वदति सये !, सुज्ञ-जन-मनीं खरें नवल टिकतें ॥ २ ॥
ओलि[१] कसें काय वरें, वद निववायासि आयको दे हा ॥
हृदय-प्रिय-जन-वार्ता,-श्रवण-सुखें करुनि काय[२] कोंदे हा ॥ ३ ॥
प्रिय सखि ! लाजे जिव्हा, ज्याची पद-धूलि सुर तदा सीसीं[३] ॥
वाहत होते त्यासीं, त्या मथुरेमाजि सुरत दासीसीं ॥ ४ ॥
मेला विधि[४] ऐकवितो, सखि जें स्वप्नीं हि नायकावेंच ॥
गलित तदधरामृत-रस-कण हि जपुनि रसिक-नायका वेंच ॥ ५ ॥
उद्धव कीं अनुसरला, सखि आश्रित आश्रया न विटवीती ॥
यश नाहींच करिल कीं, किति शोषिल तो समुद्र टिटवी ती ॥६॥
बाई सत्य वदसि हें, प्रभु जन असतां कलंक ही शोभे ॥
चंद्रचि पहा जरि हि हा, सक्षय सकलंक दृष्टि ही लोभे ॥ ७ ॥
सखि आर्जवार्थ गेला, ध्याया ह्मणवून हा दयालु बरा ॥

---

९७ पाप-नाशक. ९८ सरस्वती. ९९ स्वर्ग. १०० मेघ. १०१ दातृत्वाला. १०२ अंत.
* एखाद्याचें प्रेम आपणावर असून तें तो पुढें विसरला असतां जे उद्गार आपले तोंडांतून निघतात त्यास गोडवे ह्मणतात. १ हे सखि. २ शरीर. ३ मस्तकीं ४ नशीब.

**उद्धव** पहा कसा जो, मोहीं कृत-साधु-वाद या लुबरा ॥ ८ ॥
सभ्यावांचुनि सदनीं, सखि होता कोण झुरत सवतीच्या ॥
सखि होय काय अगणित, पुण्य-फल लहान सुरत-सर्व[1] तीचा ॥९॥
या भाग्यावरुनि गमे, बहुतचि जन्मांतरीं करी सर्व[2] तो ॥
सवतीस दैव फळलें, हा व्रज सर्वस्व भोगि ती सेवती[3] ॥ १० ॥
**मथुरा**-पुरींत बरवी, मेळविली रसिक-नायका **कुब्जा** ॥
पात्र प्रतिग्रहा या, तूं **द्राविड** जेंवि तंडुला उब्जा ॥ ११ ॥
**मथुरे** बहु अयश तुझें, वरिली तुज माजि **केशवें कुब्जा** ॥
वाटे या स्वपरिभवें, भारी करवील इंदिरा[4] न्युब्जा[5] ॥ १२ ॥
रुचवी खोटा कामचि, दृढ-रति-गुण-पाश-जनक **कुब्जा** या ॥
प्राची[6] जाया न रुचो, हरिला[7] कुणपाश[8]-जन-ककुब्जाया[9] ॥ १३ ॥
सखि माझ्या हृत्सदनीं, रात्रि दिवस हे चि आठवण वागे ॥
ताप मनाची पुरवी, कंक्षाची[10] जेंवि पाठ वणवा गे ॥ १४ ॥
अमृताचीच सुतृषिता, **कृष्णा** आली नवि प्रपा[11] दासी ॥
कासि भजत धरुनि भजनीं, तृष्णा आली न विप्र-पादासीं ॥१५॥
आठ मण यामें[12] आह्मां, तिस दावी करुनि आठ वालें[13] वश ॥
**गौरी-हर**चि मनीं नच, सवतीचा विभव आठवा त्व हा ॥१६॥
**कात्यायनी** द्रवेलचि, तीचा स्तव करुनि पाठवा नाकीं[14] ॥
दासीहुनि काय उण्या, वृत्तयशें भरुनि पाठ वाना कीं ॥ १७ ॥
ती कारणें **हरिस** सखि, बहुधा साधूनि दे **वशीकरण** ॥
दिव्य स्त्री भोगाया, पुरुषासचि ह्मणति देव शीक रण ॥ १८ ॥
बहुधा असेल **कुब्जा**, दासी नामें नसेल ती जाया ॥
विनयें बहु निववाया, नमिल उभि न च बसेल ती ज्या त्या ॥१९॥
सखि दासी सैरंध्री, ती स्ववशा शिल्प-कारिका हो ती ॥
**प्रभुला** रुचली चिमणी, बहु बरवी होय सारिका हो ती ॥ २० ॥
टाणेटोणे[15] शिकतों, तरि सखि देतोंचि तीस उडवून ॥
सखि कोणाला हि किमपि, सुख चिर न मिळेचि सुकृत बुडवून २१

---

१ यज्ञ. २ एकटी ३ साळी भिजवून वाळवाव्या आणि नंतर त्या कुटून तांदूळ करावे ह्मणजे उब्जे होतात. ४ लक्ष्मी. ५ नीच, ठेंगणी. ६ पूर्व. ७ इंद्राला. ८ स्वामी निऋतिकुणप+अश = प्रेत खाणारा = राक्षस = नैर्ऋत्य दिशेचा. ९ दिशारूपी स्त्री (ककुप्+ जाया) १० गवत. ११ पाण-पोयी. १२ प्रहर. १३ दोन गुंजा =वाल. १४ स्वर्गी. १५ मंत्र जादू.

दासी असो नसो परि, जन कुब्जा ह्मणति काय ती कुबडी ॥
विटरी हि कामुका स्त्री घुबडाला काय नावडे घुबडी ॥ २२ ॥
होती पहिली कुबडी, बहुतचि केली बरी परि सये ती ॥
शुभ दैव वृष्टि होती, जनिं सफळें बहु वरी परिस येती ॥ २३ ॥
हा ऐसा हि जन प्रिय, जन दर्शन न मरण तळमळ तो ॥
तैसा कशास पदरीं. घे प्रभु ही वैरि-चरण-तळ-मळ तो ॥ २४ ॥
निंदित जन होय मलिन, पटसा शुचि रजकसा चिखल मळतो ॥
तीर्थचि तीर्थी मिळतां, जो गांवांतील दुष्ट खळमळ तो ॥ २५ ॥
पूर्ण लघुचि गुरुचि सये, वरितो घट गुरु हि बहु उणीव रिते ॥
महदाश्रय कीर्तिप्रद, नसता तरि झटुनि कां गुणी वरिते ॥ २६ ॥
राधे साधे दैवें, सर्व हि तद्दत्त अंगरागं[1] मला ॥
हेतु स्पष्ट तद्भुत,-रूपा तत्काम-संगरो[2] गमला ॥ २७ ॥
तरि अंगदान आधी, बहु किंवा अंगरागं-दान वदा ॥
भक्तिच याला जिंकिल, धरितां ही संगरा गदा नवदा ॥ २८ ॥
तो सखि तरि हरि-परिचर्या भक्ति हा चि न जन चवकळती ॥
उष्णार्ता छायेची, घडतां पळभरि हि भजन चव कळती ॥ २९ ॥
स्वकरें लेववुनि तिचे, काढित हि बसेल हा नग रतींत ॥
दासींत यश हिम-नगाचि, कण-समचि असे लहान गरतींत ३०
अस्मत्कथा असो ज्या, त्या मथुरेंतील गुणवती महिला[3] ॥
कुब्जाऽतियशें लाजुनि, ह्मणतचि असतील विवर दे महिला[4] ३१ ॥
तत्काल विसर झाला, प्रेम-रसें पूर्ण तो कसा पहिला ॥
त्या ती बेडी वेडी या, विश्वासूं नये जसें अहिला[5] ॥ ३२ ॥
बहु शत झटलो सुदृढें, प्रेम-गुणें जो न गोंविला सवतो ॥
कुब्जे कोण ह्मणेल, स्नेहीं याच्या तगो विलासवती ॥ ३३ ॥
आह्मांस आमुची बहु, तीची चिंता वृथाचि कां पडली ॥
कवड्यांची न मिळावी, परि मणिमाळा पथींच सांपडली ॥३४ ॥
चित्तीं क्षण क्षण मला, वाटे दासींत न च वरील हरी ॥
अमृताब्धिची[7] निज-गुणें, परिभूता करिल न चवरी लहरी[8] ॥ ३५ ॥
कुब्जा राणी हरिला, बहु कुब्जेला हि आवडेल हरी ॥
लहरीस सिंधु[9] संतत, सिंधुस हि सदैव आवडे लहरी ॥ ३६ ॥

---

१ उटी. २ युद्ध. ३ स्त्रिया. ४ पृथ्वीला. ५ सर्पाला. ६ दोरानें. ७ अमृतसागराची ८ लाट. ९ समुद्र.

गोरी नसावि कुब्जा, बहुधा काळीच ती असावि खरी ॥
जेंवि घन तमीं संगम, अंधार तरीच हा असा विखरी ॥ ३७ ॥
हो काळी कीं गोरी, तद्विषया श्रुत नसो मला वाणी[1] ॥
तत्संग्रह हरिहि तसा, तापद पाजुन न सोमला वाणी[2] ३८ ॥
कुब्जा धन्या जैशी, आद्या प्रभुंचे[3] धरूनि पाय सती[4] ॥
बहुधा क्षुधिता वाढी, शत जन्में बहु करूनि पायस[5] ती ॥ ३९ ॥
सर्वाधरामृताच्या, वाटावी काय न रिपुंसी[6] पानें ॥
मुरली भली मुखा या, हे रस सेवूनि तरि पुसी पानें ॥ ४० ॥
इचि तासि तिचि हि गति करूनि, पर सर्वस्वापहार[8] कल्याण ॥
भूत-द्रोहि-जनाश्वीं,[9] घालिच वित्तप्रवीर पल्याण[10] ॥ ४१ ॥
सखि ती सुखी असो गे, श्रीकृष्णासीं करूनि केलीला[11] ॥
आह्मी अशा दशेला, पात्र दुरित-पथ धरूनि केलीला ॥ ४२ ॥
वाटे श्रीसे[12] हि दुर्लभ, पावे ती रूप भाग्य जे विदरी[13] ॥
केली प्रभु-प्रसादें, गुरु गुहें[14]-गुरूनें बसोनि जेंवि दरी ॥ ४३ ॥
दासी कुब्जा पहिली, होउनि विभुसीं[15] रमे सती सरळी ॥
मोठें पुण्य मिळाली, जी न प्राप्ता रमेस तीस रळी[16] ॥ ४४ ॥
चिंता तत्प्रियाचि सखी, हे सासि[17] आमुचें असे नातें ॥
वसविल निज दयित मनीं, ती अस्मत्प्रेम जें असेना तें ॥ ४५ ॥
विपरीता गति होती, सखि जों जों भाग्य होय भर भर तें ॥
उलटी नदीस आली, जे मिळतां सिंधु-तोयें[18]-भर भरतें ॥ ४६ ॥
भगवत्पदाश्रिता ती, सांभाळिल भरूनि कां न दीनातें ॥
स्वाश्रित नदी-शताचें, रक्षि दया करूनि कां नदी नातें ॥ ४७ ॥
त्या श्रीपदाश्रित जनें, कवणें कवण न कृतार्थ सांगा तें ॥
शरणागतार्थ सादर, शिवि शिर वेंची दधीच आंगातें ॥ ४८ ॥
प्रिय सखि असो सपत्नी[19], नीचां जाणो हि न जप तप दासी ॥
सेवादर[20] बहु वाटे, श्री वसली तेंवि न जपत पदासी ॥ ४९ ॥
ज्याची सखी अति तिचा, सेवादर बहु ह्मणोन हे मातें ॥
लोह रुचो प्रभुसि गुणें ह्मणो, त्या परिस उणें न हेमातें[21] ॥ ५० ॥

१ भाषण. २ सदृश. ३ शिवाचें. ४ पार्वती. ५ खीर. ६ शत्रूसारखी. ७ प्राशनानें ८ सर्व-द्रव्य-हरण करणें. ९ प्राणिमात्राचा द्रोह करणारे हेच कोणी घोडे त्यांजवर. १० खोगीर. ११ क्रीडा. १२ लक्ष्मीस. १३ कुरूप. १४ कार्तिकस्वामीचा बाप शिव. १५ कृष्णास १६ लाड पुरविणें. १७ सासू (?) १८ उदक. १९ सवत. २० सेवेविषयीं आदर २१ सोन्याला.

अस्मत्सेवादर बहु. दासी-सेवादरा परिस न कसा ॥
चकसा जपला हा जन, दृष्टांत असे वरा परि सनकसा ॥ ५१ ॥
तोडुनि पेति सुत गुरु गृह, अशन[1] वसन धर्म-भीति भी लज्जा ॥
तज्जात्युत्पल-कोमल, विमल-चरण-कमल-सुभजनीं सज्जा[2] ॥ ५२ ॥
सत्य वदसि तूं सखि ये, तेव्हांचें वृत्त गेह भानाचें ॥
येणें श्रीदत्ताचें, जैसें तैसेंचि देहभा नाचें ॥ ५३ ॥
गीत परिसतांचि भुले, मन कीं तैसाचि आननीं कवँळ[3] ॥
जवळ क्षिप्र भिडावें, प्राशाया अमृत जें मुखीं धवळ[4] ॥ ५४ ॥
हासति सकाळ सासू-बाई, नाकीं तशी गमे बाळी ॥
हास्य करि बंधु म्हणुनि, मातुल-जा कीं जसी रमे बाळी ॥ ५५ ॥
तें कुंकुमा पद नयन, सखि कज्जल जें तया पद[5] कपाळ ॥
हा नाथा आह्मां जरि. न प्रतिपाळिसि दया-पदकें[6] पाळ ॥५६॥
स्मरवुनि रिझवुनि खिजवुनि, विरह तुझा फार बायकां गांजी ॥
ती यां स्थिरता आली, भजली मेर्वादि नायकां गा जी[7] ॥ ५७ ॥
दुःसह-विरह-दयार्द्रें, सोडाया क्षण न तीस हि सकावें ॥
देउनि उष्णीष पुन्हा, कैसें करितां नतीस हिसकावें ॥ ५८ ॥
निववाव्या होत्या हो, प्रभुजी दावून पाय या दासी ॥
जीवन[8]-दानें निववी, घन बहु एका न काय यादासी[9] ॥ ५९ ॥
दर्शन मात्र बहु सये, कर जोडियलेचि अंग-संगातें ॥
भेटि असो कीर्ति हि करि, जें ताप शमन करी न गंगा तें ॥६०॥
हरि-यशचि व्रज-हृदया, धाम[10] जसें तोय धाम यादासी ॥
भजुनि हरि जना पावो, हरिला ती जेंवि नामयो[12] दासी[13] ॥ ६१॥
वाटे स्पर्श-मणि[14] प्रभु, जी कुब्जा काय ती पहा रमला ॥
बहु करूण सजुनि तीसीं, असतां [15]श्री आयता पहा रमला ॥ ६२॥
प्रेमें दे गंध तिसीं, दे ब्रह्मांड भव-नदी परते ॥
प्रभु-गुण गात्या गरुडा, व्याळासी त्यजुन भवन-दीप रते ॥६३॥
सुकृतज्ञत्वादि गुणें, अतुळें बहु मानवेलाचि रमा या ॥
कुब्जेवरि करिल तिचा, सिंचुनि बहु मान वेल चिरें[16] मया[17] ॥६४॥
सर्प जसा सदनांतुनि, चित्तांतुनि वैर-भाव सखि जावा ॥

---

१ भोजन. २ तत्पर. ३ घांस. ४ शुभ्र. ५ स्थान. ६ दया-ग्रीद्र. ७ नमस्कार. ८ उदक. १० जलचर. ११ घर. १२ नामदेवाला. १३ जनी दासी. १४ परिस. १५ लक्ष्मी १६ फार वेळ. १७ कृपा.

तेंव्हां मानें तैसा, आतां हि सखा **मुकुंद** न खिजावा ॥ ६५ ॥
**श्रीकुब्जे श्रीकृष्णा**, हा जन चुकला तुह्मांसि निंदून ।
नमितो क्षमा करा हो, क्षमित्याचें यश नसेचि इंदून[1] ॥ ६६ ॥
गोपी विनवित होत्या, ऐसें गाऊन गोडवे दात्या ॥
त्याचें गातां लागे, यश अमृता परिस गोड वेदात्या ॥ ६७ ॥
**प्रभुनें** दिल्हीं द्विजानन रस-पाकांतील गोड वेद-वडी ॥
भक्त **मयूरा**तींतें, प्रभु-घन गातांचि गोडवे दवडी ॥ ६८॥

**श्लोक**

हे गोडवे नाम हि गोडवाची । ग्रंथांतरें जो जन गोड वाची ॥
वाचो न वाचो तरि वाचया जी । वैकुंठ-यात्रोचित हाच वाजी ॥६९

(समाप्त.)

## मारुति-स्तुति.

**अनुष्टुप्**

श्रीमज्जगत्प्राण[2]-पुत्रा, **अंजना** भव[3]-नाशना ॥
**श्री**च्या शोधें लाविला त्वां, कंज[4]-नाभ वैनाशना[5] ॥ १ ॥
स्मरेषु[6] घाया **रामोरीं**, संताप परमा[7] रुते ॥
न **सौमित्री** तदुद्धारीं, तूं शक्त पर **मारुते** ॥ २ ॥
**राम-सुग्रीव**-सख्याचा, हेतु तूं **वात-नंदना** ॥
उत्पत्तिभू[8] गुण-गणा, जसा **मलय** चंदना ॥ ३ ॥
केली प्रहृष्टा लंघूनी, तुवां नद-नदी-पती[9] ॥
मोही रक्षःपतंगातें[10], जिचा वदन-दीप ती ॥ ४ ॥
जी त्वद्बल परीक्षार्थ, देवांनीं प्रेषिली जरी ॥
नागांची माय **सुरसा**, अंतराय[11] पथीं करी ॥ ५ ॥
तोंड शंभर गांवें[12] ती, पसरूनि ह्मणे तुतें ॥
गिळीन मन्मुखीं भूतें, होतीं ब्रह्म-वरें हुतें ॥ ६ ॥
देह अंगुष्ठसा केला, त्वां जो नवति[13] योजन ॥

१ चंद्राहून उणें. २ वायु. ३ संसार. ४ कमळ-नाभ. ५ खाणें-पिणें. ६ मदन-बाण. ७ अतिशय. ८ उत्पत्ति-कार. ९ समुद्र. १० राक्षस-रूपी-पतंग ११ विघ्न. १२ योजनें १३ नव्वद.

४ गेलास तन्मुखीं वांछी । जी करावयास भोजन ॥ ७ ॥
**सुरसे**च्या मुखांतूनी । तूं निघालासि सत्वर ॥
माघारा उसळे चेंडू[2] । जैसा सोडुनि चंत्वर[1] ॥ ८ ॥
**सुरसे**ते बोलिलाशी । **दाक्षायणि** नमोऽस्तु ते ॥
तूं साधु निरहंकार । वा गर्वे सर्व ही उते ॥ ९ ॥
**धाता** विस्मित झाला न । **मैनाक** शिखरीं शची ॥
**शुक्र शक्र** स्तवी नेंहे । मैनाक शिखरीश ची ॥ १० ॥
दोरी धरुनि ओढावी । नभस्था जेंवि वांवडी[3] ॥
तशी कवळुनी छाया । ओढी जी फार वावडी ॥ ११ ॥
ती **सिंहिका** तुझी आपा । सहसा सावळी धरी ॥
करी आकर्षण तुझें । धैर्य वृत्रारिचें[4] हरी ॥ १२ ॥
त्या **सिंहिके**च्या उदरीं । जेव्हां गेलासि घांससा ॥
भासलासि प्रेक्षित्यातें । व्याघ्री ती तूं न कां ससा ॥ १३ ॥
भू-देव-धी हि पावे न । त्वद्ग्रासीं **अंजना** भया ॥
भीताचि व्यसना[5] तो ही । वीर ही **कंज-नाभ**[6] या ॥ १४ ॥
मग काळिज तोडावें । म्यां आधी आंतडीं तमी ॥
वदलासि करूं काय । कार्याच्या तांतडींत[7] मी ॥ १५ ॥
**लंकेंत** शोधिली **सीता** । बा झालासि लहानसा ॥
राक्षसांतें पाठवाया । अंतकाच्या महानसा[8] ॥ १६ ॥
भली **लंका**-देवता त्वां । भंगिली बा कदापि ती ॥
न देती वाट मारूनी । नाकदा हाक दापिती ॥ १७ ॥
**रावणां**तःपुर तुल्य । न च भी तव तातजा ॥
**श्री** देखिली धुंडितां त्वां । अशोक-वनिं **वातजा** ॥ १८ ॥
वृक्षीं बैसोनि कामांध । आला **रावण** पाहिला ॥
तदुक्तें उसळला । क्रोधाचा वेग साहिला ॥ १९ ॥
स्तवें विश्वास देऊनी । श्री-मुद्री[9] मग अर्पिली ॥
कुशलोदंत[10]-पीयूषें[11] । देवी त्वां फार तर्पिली[12] ॥ २० ॥
द्रुम[13]-हानि चमू[14]-हानि । त्वत्कृता अक्षमा[15]-रणीं ॥
सुधाधिका[16] सुरा[17] झाली । सत्कृता अक्ष[18]-मारणीं ॥ २१ ॥

---

१ अंगण. २ फुगतो. ३ खेळण्याचा पतंग. ४ इंद्राचें. ५ संकट. ६ राम. ७ घाईत. ८ सैपाक-घर. ९ अंगठी. १० कुशळ-वार्ता. ११ अमृत १२ संतुष्ट केली. १३ वृक्ष. १४ सेना. १५ असमर्थ-दुःसह. १६ अमृताहून अधिक. १७ मद्य. १८ रावण-पुत्र-शिव.

क ॥ त्यासि सांगे भीष्म विवेक ॥ पर्वद्वयविस्तरें ॥ ८ ॥ शांतिपर्वी आपद्धर्म ॥ राजधर्म मोक्ष-धर्म ॥ आनुशासनिकीं दानधर्म ॥ उपदेशिले विस्तरें ॥ ९ ॥ चतुर्वर्गाचा विवेक ॥ पर्वद्वयीं अलौकिक ॥ श्रवणमात्रें नासे शोक ॥ ऐसें कौतुक उपदेशी ॥ १० ॥ दानधर्मी आधीं अंतीं ॥ कथिली हरिहरांची भक्ति ॥ स्पष्ट जाणती महामती ॥ अभेद शुद्ध प्रसाद ॥ ११ ॥ श्रीमद्विष्णुसहस्रनाम ॥ शेवटीं सांगे साधूत्तम ॥ त्या ही वरी बोले परम ॥ प्रेमें ब्राह्मण-माहात्म्य ॥ १२ ॥ व्यास पराशर वसिष्ठ ॥ वाल्मीकी गाधिज ऐसे शिष्ट ॥ श्रवण करिती परम श्रेष्ठ ॥ श्रुतिस्मृतींचे सागर ॥ १३ ॥ जान्हवी देवी ज्याचें पाद्य ॥ जो कीं उपनिषत्प्रतिपाद्य ॥ ऐको वैसे तो जगदाद्य ॥ वासुदेव ही त्या कथा ॥ १४ ॥ धर्म विचारी जोडुनि हस्त ॥ भीष्म निवारी संशय समस्त ॥ प्रश्नोत्तरें बहु प्रशस्त ॥ उदार वक्ता श्रोता ही ॥ १५ ॥ समीप जाणोनि निधन ॥ पिता जैसें आपुलें धन ॥ पुत्रहस्तीं सावधान ॥ असतां अर्पी प्रेमानें ॥ १६ ॥ तैसें देवव्रतें निर्मल ॥ धर्मासि कथिलें ज्ञान अखिल ॥ केलें इतरांचें ही कुशल ॥ धर्मनीतीनिपुणानें ॥ १७॥ धर्म ह्मणे गा अतुळप्रतापा ॥ ज्ञानसागरा कुरु कुळदीपा ॥ पितामहा मायबापा ॥ धन्य झालों उपदेशें ॥ १८ ॥ आतां पुसतों महाराजा ॥ उरला एक संशय माजा ॥ तो दूर करीं महाभुजा ॥ तुज भागविलें उदंड ॥ १९ ॥ पूज्य वंद्य मुख्य कोण ॥ कोणा वंदिसी तूं आपण ॥ एवढें सांगोनि करी निपुण ॥ मजला पूज्य पूजनीं ॥ २० ॥ भीष्म ह्मणे भला गा पुत्रा ॥ बरा प्रश्न केला पवित्रा ॥ सद्गुणभ्रमरांच्या शतपत्रा[4] ॥ योग्य पुससी धर्मज्ञा २१ सर्वां मध्यें पूज्य ब्राह्मण ॥ हें तूं निश्चयें करूनि जाण ॥ वाहतों पुत्रा तुझीच आण ॥ संशय कांहीं न धरावा ॥ २२ ॥ ब्राह्मणांचे नमितां पाय ॥ आयुष्याचा नाश न होय ॥ यांच्या ठायीं जैसा तनय ॥ धरोनि विनय वर्तावें ॥ २३ ॥ ब्राह्मणांची सेवा नौका ॥ भवसागरीं तारिते लोकां ॥ यांचे पाय जोडितां धोका ॥ काळाचा ही असेना ॥ २४ ॥ सर्वविद्याकळाधर[5] ॥ अनर्घ्य[6]सद्गुणरत्नाकरं[7] ॥ यांतें ब्रह्माहरिहर ॥ परमादरें पूजिती ॥ २५ ॥ ब्राह्मण देवांचे ही देव ॥ आम्ही पत्नी ब्राह्मण धव[8] ॥ यांच्या आश्रयें गौरव ॥ क्षत्रिय सर्वत्र पावती ॥ २६ ॥ ब्राह्मणवर्ण हें मस्तक ॥ इतर हस्तपादादिक ॥ असो राजा अथवा रंक ॥ गतमस्तक तें शव ॥ २७ ॥ शोभा पराक्रम जीवन ॥ लोकांत जसें मस्तकाधीन ॥ तैसें नसतां ब्राह्मणभजन ॥ अमंगळ वर्ण सर्व ही ॥ २८ ॥ ऐक धर्मा कथा आतां ॥ पूर्वी[9] अर्जुनें भ-

३ भीष्म. ४ कमळ. ५ चंद्र. ६ अमूल्य. ७ सागर. ८ पति. ९ सहस्रार्जुनें.

जला दत्ता ॥ वरसामर्थ्यें आली सत्ता ॥ सागरांत पृथ्वीची ॥ २९ ॥ तो सहस्रार्जुन पावे गर्व ॥ मानी तुच्छ लोक सर्व ॥ ह्मणे श्रेष्ठ मी मज गौरव ॥ क्षिप्रांहुनी बहु योग्य ॥३०॥ ब्राह्मण माझ्या आश्रयें ॥ न पावती संसारीं भयें ॥ यांचा पाळक मी निश्चयें ॥ गोप जैसा पशूंचा ॥ ३१ ॥ तें ऐकतां कोपला पवन ॥ ह्मणे तूं केवळ ज्ञानहीन ॥ अर्जुना हो सावधान ॥ बोलतां जिव्हा झडेल ॥ ३२ ॥ मूर्खा ब्राह्मण भास्कर ॥ तूं खद्योत पामर ॥ आपला आपण बडिवार ॥ करितां लज्जा तुज नसे ॥ ३३ ॥ अर्जुन ह्मणे रे तूं कोण ॥ ब्राह्मणमित्रा दावीं वदन ॥ येरो ह्मणे मी पवन ॥ देवदूत गर्विष्ठा ॥ ३४ ॥ हैहय[11] ह्मणे रे पवना ॥ फार वाखाणीसी ब्राह्मणा ॥ कोण तो गुण तुझिया नयना ॥ यांचा आला अद्भुत ॥३५॥ बोलसी धरूनि विप्रपक्ष ॥ आपलें तरी महत्व रक्ष ॥ गोष्टी सांगोनि काय लक्ष ॥ ब्राह्मण प्रत्यक्ष याचक ॥ ३६ ॥ वायु ह्मणे रे कृतघ्नवरा ॥ पावलासि ज्या पासूनि वरा ॥ तो दत्त कोण पामरा ॥ गुरूचा विसर नसावा ॥ ३७ ॥ ऐक ब्राह्मणांचें बळ ॥ मग तूं वर्णीं क्षत्रियकुळ ॥ श्रवणा योग्य नव्हसी खळ ॥ परी सांगावें लागलें ॥ ३८ ॥ पूर्वीं अंगराज यजमान ॥ कश्यपाला पृथ्वीदान ॥ देतूं ह्मणे तें जाणोन ॥ दुःख मानी[12] मेदिनी ॥३९॥ कन्या न शिवे वृद्धा वरा ॥ तैसी कश्यपाला धरा ॥ ह्मणे देतां जाईन घरा ॥ ब्रह्मदेवा पितयाच्या ॥ ४० ॥ तें कश्यप समजे मनीं ॥ अंतरीं शिरोनि ते मेदिनी ॥ तीस सहस्र वर्षें मुनी ॥ धरिता झाला निज तेजें ॥ ४१ ॥ बाहेर जैसा तैसा चि होता ॥ कोण्हा न कळतां देवर्पिता[13] ॥ ऐसें कौतुक दावूनि चित्ता ॥ त्या पृथ्वीच्या लाजवी ॥ ४२ ॥ मग ती धरणी जोडी हात ॥ करी लाजोनि प्रणिपात ॥ चुकलें कन्या मी तूं तात ॥ क्षमा समर्थें करावी ॥ ४३ ॥ काश्यपी भूमि यास्तव ह्मणती ॥ ऐसा कश्यप उदारकीर्ति ॥ कोणा क्षत्रियाची शक्ति ॥ ऐसी असे तूं सांगें ॥ ४४ ॥ सोमें पूर्वीं आपुली कन्या ॥ दिल्ही उतथ्या विश्वमान्या ॥ भद्राभिधाना परम धन्या ॥ रूपें गुणें अप्रतिमा ॥ ४५ ॥ ती खेळतां उपवनीं ॥ वरुणें नेली चोरूनि ॥ तें जाणोनि नारदमुनी ॥ उतथ्यातें जाणवी ॥ ४६ ॥ उतथ्य ह्मणे नारदा ॥ तूं च जावूनि सांग त्या मंदा । आकंठ भक्षितां विषकंदा ॥ कोणी नाहीं वांचला ॥ ४७ ॥ नारद सांगे तथापि वरुण ॥ न सोडी जैसी गांठी कृपण ॥ ह्मणे सुधापात्र[14] कोण ॥ तृषाक्रांत त्यागील ॥ ४८ ॥ झाला संग मिळालें मन ॥ वियोग न सोसे अर्धू क्षण ॥ नारदस्वामी तुझी

---

१० काजवा. ११ सहस्रार्जुन. १२ पृथ्वी. १३ कश्यप. १४ अमृत.

ब्रह्मास्त्राचा रक्षिला त्वां । बहु मान पराभव ॥
सभेंत रक्षोराजाचा । केला हृष्ट बरा भर्ग[1] ॥ २२ ॥
बा भावुनी तुझें पुच्छ । तुच्छ पेटविलें खळें ॥
जळे म्हणे तें लंकेनें । प्रेरितां त्वां महाबळें ॥ २३ ॥
आंजनेया गमे व्योमीं[2] । वदले देव धूर[3] हा ॥
पुरे न राम-प्रणतीं । वदले देव-धूर[4] हा ॥ २४ ॥
खूण सांगोनि जेव्हां त्वां । श्रीचूडामणि[5] अर्पिला ॥
प्रभु आनंदला तेव्हां । पीयूषें तम[6] तर्पिला ॥ २५ ॥
प्रभु दे तुज आश्लेष[7] । पारितोषिक[8] तो भलें ॥
शोभलें यश हें विश्वीं । सर्व सन्मन लोभलें ॥ २६ ॥
अंगदें लक्ष्मण-स्कंधीं । तुवां श्रीराम वाहिला ॥
पाहिला तार्क्ष्य[9] देवांहीं । साधि[10] सव्रीड[11] राहिला ॥ २७ ॥
केला बिभीषण भ्राता । श्रीरामें तव सन्मतें ॥
कीं ज्ञान-शक्ति-संपन्न । विचारें यश जन्मतें ॥ २८ ॥
महौषधि नगाचें[12] त्वां । दोनदां शृंग[13] आणिलें ॥
जे बळी विक्रमी त्यांच्या । मदाचें मूळ खाणिलें ॥ २९ ॥
तें तें बा त्वां कर्म केलें । जें जें अन्या सुदुष्कर ॥
तूं प्रिय प्रभुच्या चित्ता । मधुपा जेंवि पुष्कर[14] ॥ ३० ॥
तूं पूजिलासि भरतें । [15]नतें परम हर्षितें ॥
तूतें सत्कृत जें प्राप्त । न तें पर महर्षितें ॥ ३१ ॥
त्वां कथा तों असावे[16] हे । वरिली परमा गती ॥
बा प्रेम-भक्तिज्ञ न जे । ते मोक्ष वर मागती ॥ ३२ ॥
तूतें श्रीराम "ऋणिनो[17] वयम्" ऐसें सुखें वदे ॥
तूं एक धन्य त्रिजगीं । तातसाचि सुलेंब[18] दे ॥ ३३ ॥
रत्नहार स्वयें श्रीनें । [19]प्रेमांभें भरला दिला ॥
तुला वाटे [20]महोक्षाचा । तर्णकीं[21] भर लादिला ॥ ३४ ॥
प्रभु दे भूषणें [22]अंकीं । स्थापुनी तुज आपलीं ॥
बा जाणों तीं भावि[23] । -साधु-विरहें बहु तापलीं ॥ ३५ ॥

---

१ शिव. २ आकाश. ३ देव-श्रेष्ठ. ४ हाय हाय. ५ सीतेचें शिरोभूषण. ६ राहू (भू-छाया) ७ आलिंगन. ८ बक्षीस. ९ गरुड. १० सदुःख ११ सलज्ज. १२ पर्वताचें १३ शिखर. १४ कमळ. १५ नम्र. १६ जगावें. १७ "आम्ही (मारुतीचे) ऋणी आहों" १८ आलिंगन १९ प्रेमोदक. २० मोठ्या बैलाचा. २१ वासरूं-पाडा, २२ मांडीवर. २३ पुढें होणाऱ्या साधूच्या (तुझ्या) वियोगानें तीं भूषणें ताप पावलीं.

आर्या

जेव्हां स्वपदा गेला, पुसुनि तुतें राम महिवरेश तदा ॥
या परम भक्त वत्सल । हृदयस्थ ** गहिवरे शतदा ॥ ३६ ॥
प्रभुसि वहातां करितो । जें असतें पाप भस्म देवना तें ॥
स्तव तव समर्पिला हो । करु ताप हरूनि अस्मदवनातें ॥ ३७ ॥
जेथें प्रभुचें कीर्तन । तेथें तूं वससि हस्त जोडून ॥
मोडून मन चि अन्य । व्यवहार समस्त सर्व सोडून ॥ ३८ ॥
सु समर्थ श्रीराम-प्रभुचें भक्त-रत्न कीं नाम ।
तुमचा चि भरंवसा मज । आहे बहु सफळ करितसा काम ॥ ३९॥
कर्माकडे न माझ्या । प्रभु-भक्ता आपणा कडे चि पहा ।
न क्षुधित बाल-कर्णीं । मातेचा शब्द बा पडे "चिप" हा ॥४०॥

इति श्रीमद्राम-नंदन-मयूर-विरचिता हनूमन्नुतिः संपूर्णा ।

---

# दुर्वासभिक्षा*

## आर्या.

श्रीगणेशायनमः ॥ श्रीमद्वेदव्यासचरण ॥ ज्ञान देती करितां स्मरण ॥ संसार पंकांतूनि उद्धरण ॥ केलें येणें विश्वाचें ॥ १ ॥ रचिला जयनामा[1] इतिहास ॥ चतुर्वर्गाचा निवास ॥ श्रवणपठणें भाविकास ॥ भवसागरीं तारितो ॥ २ ॥ सर्व श्रुति सर्व स्मृति ॥ जीं जीं शास्त्रें पुराणें असती ॥ त्या सकळांतें महामती ॥ भारता माजी सांठवी ॥ ३ ॥ शब्दब्रह्मसागर मथिला ॥ अमृतें इतिहासकलश भरिला ॥ साधु शिष्यांच्या हातीं दिधला ॥ जाड्यरोगार्तां पाजाया ॥ ४ ॥ विष्णुयशक्षीरसागर ॥ भक्तमहिमासुधाकर[2] ॥ वर्णिला व्यासदेवें सादर ॥ रस जाणती जाणते ॥ ५ ॥ अधर्में दुर्योधन क्षय ॥ पावे धर्में धर्म जय ॥ संकटीं देव करुणालय ॥ दास रक्षी हें कथिलें ॥६॥ जऱ्ही सहाय झाला देव ॥ आलें घरा महावैभव ॥ तऱ्ही आसक्त मनोभाव ॥ नसावा हें कळविलें ॥ ७ ॥ झालें राज्य निष्कंटक ॥ तऱ्ही धर्म पावे शो-

---

१ राज-श्रेष्ठ. २ पुष्प विशेष. ३ आमचें रक्षण.

* "ब्राह्मण महिमा" असें नांव या प्रकरणास जास्ती शोभलें असतें. १ भारत. २ चंद्र.

क ॥ त्यासि सांगे भीष्म विवेक ॥ पर्वद्वयविस्तरें ॥ ८ ॥ शांतिपर्वीं आपद्धर्म ॥ राजधर्म मोक्ष-धर्म ॥ आनुशासनिकीं दानधर्म ॥ उपदेशिले विस्तरें ॥ ९ ॥ चतुर्वर्गांचा विवेक ॥ पर्वद्वयीं आलौकिक ॥ श्रवणमात्रें नासे शोक ॥ ऐसें कौतुक उपदेशी ॥ १० ॥ दानधर्मीं आधीं अंतीं ॥ कथिली हरिहरांची भक्ति ॥ स्पष्ट जाणती महामती ॥ अभेद शुद्ध प्रसाद ॥ ११ ॥ श्रीमद्विष्णुसहस्रनाम ॥ शेवटीं सांगे साधूत्तम ॥ त्या ही वरी बोले परम ॥ प्रेमें ब्राह्मण-माहात्म्य ॥ १२ ॥ व्यास पराशर वसिष्ठ ॥ वाल्मीकी गाधिज ऐसे शिष्ट ॥ श्रवण करिती परम श्रेष्ठ ॥ श्रुतिस्मृतींचे सागर ॥ १३ ॥ जान्हवी देवी ज्याचें पाद्य ॥ जो कीं उपनिषत्प्रतिपाद्य ॥ ऐको बैसे तो जगदाद्य ॥ वासुदेव ही त्या कथा ॥ १४ ॥ धर्म विचारी जोडुनि हस्त ॥ भीष्म निवारी संशय समस्त ॥ प्रश्नोत्तरें बहु प्रशस्त ॥ उदार वक्ता श्रोता ही ॥ १५ ॥ समीप जाणोनि निधन ॥ पिता जैसें आपुलें धन ॥ पुत्रहस्तीं सावधान ॥ असतां अर्पी प्रेमानें ॥ १६ ॥ तैसें देवव्रतें निर्मल ॥ धर्मासि कथिलें ज्ञान अखिल ॥ केलें इतरांचें ही कुशल ॥ धर्मनीतीनिपुणानें ॥ १७॥ धर्म ह्मणे गा अतुळप्रतापा ॥ ज्ञानसागरा कुरु कुळदीपा ॥ पितामहा मायबापा ॥ धन्य झालों उपदेशें ॥१८ ॥ आतां पुसतों महाराजा ॥ उरला एक संशय माजा ॥ तो दूर करीं महाभुजा ॥ तुज भार्गविलें उदंड ॥ १९ ॥ पूज्य वंद्य मुख्य कोण ॥ कोणा वंदिसी तूं आपण ॥ एवढें सांगोनि करी निपुण ॥ मजला पूज्य पूजनीं ॥ २० ॥ भीष्म ह्मणे भला गा पुत्रा ॥ बरा प्रश्न केला पवित्रा ॥ सद्गुणभ्रमरांच्या शतपत्रा[४] ॥ योग्य पुससी धर्मज्ञा २१ सर्वां मध्ये पूज्य ब्राह्मण ॥ हें तूं निश्चयें करूनि जाण ॥ वाहतों पुत्रा तुझीच आण ॥ संशय कांहीं न धरावा ॥ २२ ॥ ब्राह्मणांचे नमितां पाय ॥ आयुष्याचा नाश न होय ॥ यांच्या ठायीं जैसा तनय ॥ धरोनि विनय वर्तावें ॥ २३ ॥ ब्राह्मणांची सेवा नौका ॥ भवसागरीं तारिते लोकां ॥ यांचे पाय जोडितां धोका ॥ काळाचा ही असेना ॥ २४ ॥ सर्वविद्याकळाधर ॥ अनर्घ्य[६]सद्गुणरत्नाकर[७] ॥ यांतें ब्रह्माहरिहर ॥ परमादरें पूजिती ॥ २५ ॥ ब्राह्मण देवांचे ही देव ॥ आम्ही पत्नी ब्राह्मण धव[८] ॥ यांच्या आश्रयें गौरव ॥ क्षत्रिय सर्वत्र पावती ॥ २६ ॥ ब्राह्मणवर्ण हें मस्तक ॥ इतर हस्तपादादिक ॥ असो राजा अथवा रंक ॥ गतमस्तक तें शव ॥ २७ ॥ शोभा पराक्रम जीवन ॥ लोकांत जसें मस्तकाधीन ॥ तैसें नसतां ब्राह्मणभजन ॥ अमंगळ वर्ण सर्व ही ॥ २८ ॥ ऐक धर्मा कथा आतां ॥ पूर्वीं अर्जुनें[९] भ-

३ भीष्म. ४ कमळ. ५ चंद्र. ६ अमूल्य. ७ सागर. ८ पति. ९ सहस्रार्जुन.

जला दत्ता ॥ वरसामर्थ्ये आली सत्ता ॥ सागरांत पृथ्वीची ॥ २९ ॥ तो सहस्रार्जुन पावे गर्व ॥ मानी तुच्छ लोक सर्व ॥ ह्मणे श्रेष्ठ मी मज गौरव ॥ विप्रांहुनी बहु योग्य ॥३०॥ ब्राह्मण माझ्या आश्रयें ॥ न पावती संसारीं भयें ॥ यांचा पाळक मी निश्चयें ॥ गोप जैसा पशूंचा ॥ ३१ ॥ तें ऐकतां कोपला पवन ॥ ह्मणे तूं केवळ ज्ञानहीन ॥ अर्जुना हो सावधान ॥ बोलतां जिव्हा झडेल ॥ ३२ ॥ मूर्खा ब्राह्मण भास्कर ॥ तूं खद्योत[१०] पामर ॥ आपला आपण बडिवार ॥ करितां लज्जा तुज नसे ॥ ३३ ॥ अर्जुन ह्मणे रे तूं कोण ॥ ब्राह्मणमित्रा दावीं वदन ॥ येरी ह्मणे मी पवन ॥ देवदूत गर्विष्ठा ॥ ३४ ॥ हैहय[११] ह्मणे रे पवना ॥ फार वाखाणीसी ब्राह्मणा ॥ कोण तो गुण तुझिया नयना ॥ त्यांचा आला अद्भुत ॥३५॥ बोलसी धरूनि विप्रपक्ष ॥ आपलें तरी महत्त्व रक्ष ॥ गोष्टी सांगोनि काय लक्ष ॥ ब्राह्मण प्रत्यक्ष याचक ॥ ३६ ॥ वायु ह्मणे रे कृतघ्नवरा ॥ पावलासि ज्या पासूनि वरा ॥ तो दत्त कोण पामरा ॥ गुरूचा विसर नसावा ॥ ३७ ॥ ऐक ब्राह्मणांचें बळ ॥ मग तूं वर्णीं क्षत्रियकुळ ॥ श्रवणा योग्य नव्हसी खळ ॥ परी सांगावें लागलें ॥ ३८ ॥ पूर्वीं अंगराज यजमान ॥ कश्यपाला पृथ्वीदान ॥ देवूं ह्मणे तें जाणोन ॥ दुःख मानी मेदिनी[१२] ॥३९॥ कन्या न शिवे वृद्धा वरा ॥ तैसी कश्यपाला धरा ॥ ह्मणे देतां जाईन घरा ॥ ब्रह्मदेवा पितयाच्या ॥ ४० ॥ तें कश्यप समजे मनीं ॥ अंतरीं शिरोनि ते मेदिनी ॥ तीस सहस्र वर्षें मुनी ॥ धरिता झाला निज तेजें ॥ ४१ ॥ बाहेर जैसा तैसा चि होता ॥ कोण्हा न कळतां देवपितॊ[१३] ॥ ऐसें कौतुक दावूनि चित्ता ॥ त्या पृथ्वीच्या लाजवी ॥ ४२ ॥ मग ती धरणी जोडी हात ॥ करी लाजोनि प्रणिपात ॥ चुकलें कन्या मी तूं तात ॥ क्षमा समर्थें करावी ॥ ४३ ॥ काश्यपी भूमि यास्तव ह्मणती ॥ ऐसा कश्यप उदारकीर्ति ॥ कोणा क्षत्रियाची शक्ति ॥ ऐसी असे तूं सांगें ॥ ४४ ॥ सोमें पूर्वीं आपुली कन्या ॥ दिल्ही उतथ्या विश्वमान्या ॥ भद्राभिधाना परम धन्या ॥ रूपें गुणें अप्रतिमा ॥ ४५ ॥ ती खेळतां उपवनीं ॥ वरूणें नेली चोरूनि ॥ तें जाणोनि नारदमुनी ॥ उतथ्यातें जाणवी ॥ ४६ ॥ उतथ्य ह्मणे नारदा ॥ तूं च जावूनि सांग त्या मंदा ॥ आकंठ भक्षितां विषकंदा ॥ कोणी नाहीं वांचला ॥ ४७ ॥ नारद सांगे तथापि वरूण ॥ न सोडी जैसी गांठी कृपण ॥ ह्मणे सुधापात्र[१४] कोण ॥ तृषाक्रांत त्यागील ॥ ४८ ॥ झाला संग मिळालें मन ॥ वियोग न सोसे अर्धं क्षण ॥ नारदस्वामी तुह्मी

१० काजवा. ११ सहस्रार्जुन. १२ पृथ्वी. १३ कश्यप. १४ अमृत.

सुजाण ॥ समजावूनी जा सांगा ॥ ४९ ॥ नारद सांगे उतथ्यापासीं ॥ देत नाहीं भद्रा पांशी[15] ॥ सामें वदतां मज कंठासी ॥ धरूनि वरुणें लोटिलें ॥५०॥ कोपें खळवळला उतथ्य ॥ ह्मणे अयुष्य सरलें तथ्य ॥ तरीच आग्रहें सेवितो अपथ्य ॥ वारितां ही सद्वैद्यें ॥ ५१ ॥ मग त्या उतथ्यें मुनिराजें ॥ आपुल्या महातपस्तेजें ॥ केलें कौतुक तें सहस्रभुजें ॥ अर्जुना त्वां परिसावें ॥ ५२ ॥ सहा लक्ष ह्रदां[16] भीतरीं ॥ होती वरुणाची जी पुरी ॥ त्या उदकातें शुष्क करी ॥ कल्पक्षयीं रवि जसा ॥ ५३ ॥ वरुणपुरातें सागर ॥ सोडूनि पळे बहु सत्वर ॥ दुराचारीयाचा सेजार ॥ सोडी जैसा सज्जन ॥ ५४ ॥ तेव्हां वरुणाचे आप्त जन ॥ ह्मणती द्यावें ब्राह्मण-धन ॥ हटें न देतां आमुचें जीवन ॥ शोषील तो काळार्क ॥ ५५ ॥ तथापि जळेश्वरें[17] न सोडी लोभा ॥ उतथ्यमुनी करी क्षोभा ॥ ह्मणे मूर्खा काय शोभा ॥ तुज जायाच्या भूषणें ॥ ५६ ॥ त्या वरुणाच्या पुरी प्रती ॥ जात होती सरस्वती ॥ तीतें ह्मणे तो मुनिपती ॥ सोडूनि देश हो गुप्त ॥ ५७ ॥ आज्ञा मुनीची मस्तकीं वंदी ॥ गुप्त होय सरस्वती नदी ॥ जळाचा लेश उरों नेदी ॥ उखर[18] केला तो देश ॥ ५८ ॥ ऐसा होतां निर्जळ देश ॥ भय पावला नदीनदेशीं[19] ॥ मस्तकीं धरी मुनि-निदेश ॥ सामर्थ्य कांहीं चालेना ॥ ५९ ॥ अद्यापि मरुदेश[20] निर्जळ ॥ तेथें पूर्वी वरुण-स्थळ ॥ रुक्ष झालें धरणी-तळ ॥ मुनींद्राच्या प्रतापें ॥ ६० ॥ वरुणें भद्रानामक सती ॥ नेउनि अर्पिली उतथ्या प्रती ॥ वंदूनि ह्मणे कोप चित्तीं ॥ शरणागताचा न धरावा ॥ ६१ ॥ उतथ्य म्हणे अगा वरुणा ॥ भिवों नको केली करुणा ॥ पंगू म्हणों नये अरुणा ॥ अंधकारें सर्वथा ॥ ६२ ॥ कोठें गेला वीर्यमद ॥ जेणें अपमानिला नारद ॥ पुढें तरी ब्राह्मणपद ॥ अभयप्रद स्मरावें ॥ ६३ ॥ बळवंताचें निज धन ॥ पोटिशीं धरूनि करितां जतन ॥ न जिरे केलिया ही रोदन ॥ लोक हांसती ऐकोनी ॥ ६४ ॥ माझी पत्नी म्यां साधिली ॥ तुझी शक्ति वायां गेली ॥ जा तुज वरी म्यां दया केली ॥ ऐसें ह्मणे उतथ्य ॥ ६५ ॥ ऐसें उतथ्याचें तेज ॥ अर्जुना म्यां कथिलें तुज- ॥ तूं ही बोलावें बाहुजें[21] ॥ ब्राह्मणांहुनि जो श्रेष्ठ ॥ ६६ ॥ अगस्त्यब्राह्मणाचा महिमा ॥ आतां परिसावा नृपोत्तमा ॥ असुरीं जिंकिला सूत्रामो[22] ॥ सर्व देवां समवेत ॥ ६७ ॥ फिरती देव धरणी वरी ॥ भ्रष्टैश्वर्य मानवा परी ॥ स्वधा[23]स्वाहा[24]भाग अरी ॥ बलात्कारें भोगिती ॥ ६८ ॥ अगस्त्यासि गेले शरण

---

१५ वरुण. १६ डोह. १७ वरुण. १८ उकिरडा. १९ वरुण. २० मारवाड. २१ क्षत्रिय. २२ इंद्र. २३ पितृभाग २४ हविर्भाग.

धरिती माथां मुनीचे चरण ॥ सांगतां दुःख तो सकरुण ॥ अभय देता जाहला ॥ ६९ ॥ तृणा मध्यें जैसा अनळ ॥ पेटला कोपें महाबळ ॥ गगना पासूनि जैसे टोळ ॥ जाळूनि पाडी अतुरातें ॥ ७० ॥ कांहीं राहिले दानव शेष ॥ सेविती धाकें दक्षिण देश ॥ कोपला जाणों व्योमकेशें[२५] ॥ त्रिपुरावरी देवार्थ ॥ ७१ ॥ कांहीं होते धरणीतळीं ॥ अश्वमेध-यज्ञस्थळीं ॥ त्यांतें यजमान तेव्हां बळी ॥ अभय देता न ह्वला ॥ ७२ ॥ ते मात्र वांचविले दानव ॥ ऐसा अगस्त्याचा प्रभाव ॥ ऐसा कोणी महानुभाव ॥ क्षत्रिय कोठें सांगपां ॥ ७३ ॥ वसिष्ठाचा महिमा नृपा ॥ ऐक सांगतों करूनि कृपा ॥ खलीनाम दानव प्रतापा ॥ ब्रह्मवरें पावले ॥ ७४ ॥ होतां ब्रह्मदेवाचा वर ॥ तेणें अमृत सरोवर ॥ ज्यांत बुडवितां शव सत्वर ॥ जिवंत होय क्षणमात्रें ॥ ७५ ॥ देव करिती दीर्घसत्र ॥ व्रतनियमें ते कर्शित-गात्र ॥ जाणोनि त्यांतें ते अमित्र ॥ ह्मणती व्यसनीं मारावे ॥ ७६ ॥ खलीदानव महावैरी ॥ घेऊनि धांवले मोठे गिरि ॥ देव समरीं परम घोरीं ॥ जे जे मृत्यु पावले ॥७७॥ सरोवरीं टाकिती प्रेत ॥ तत्क्षण होती ते जिवंत करिती निर्जरांचा[२६] घात ॥ संकट मोठें मांडलें ॥ ७८ ॥ इंद्रास शरण गेले सुर ॥ ह्मणती काय करावा विचार शक्र ह्मणे मुनीश्वर ॥ वासिष्ठ आह्मां रक्षील ॥ ७९ ॥ वसिष्ठा प्रति ह्मणती रक्षीं ॥ केला पराभव विपक्षीं[२७] ॥ आमुच्या सेनांचिया लक्षीं ॥ समर्थ नाहीं एक ही ॥ ८० ॥ वसिष्ठ ह्मणे धरा धीर ॥ रक्षील सर्वांसि सर्वेश्वर हे काय मज पुढें पामर ॥ पहा तपःसामर्थ्य ॥८१॥ कोपला साक्षात्प्रळयरुद्र ॥ खवळला कल्पांतीं समुद्र ॥ दग्ध केले सर्व ही क्षुद्र ॥ मुनीश्वरें ते असुर ॥ ८२॥ कैलासासि जातां गंगा ॥ मुनीश्वरें ती महाभागा ॥ अज्ञापिली सरोवरभंगा ॥ करावया ते काळीं ॥८३॥ गंगेनें तो सरोवर ॥ येऊनि भंगिला सत्वर ॥ सरयूनाम पावे सुर ॥ मुनीश्वरातें वर्णिती ॥ ८४ ॥ रक्षिले वसिष्ठें सेंद्र देव ॥ ऐसा अद्भुत विप्र-प्रभाव ॥ ऐसा कोण्ही भूमिर्धव[२८] ॥ असेल तरी सांग तूं ८५ अत्रिचें ही तपोवीर्य ॥ रक्षी देवांचें ऐश्वर्य ॥ तें चि आतां महाश्चर्य ॥ अर्जुना तुजला सांगतों ॥८६॥ देवां दानवासीं रण ॥ पूर्वीं होय लोमहर्षण[२९] ॥ राहूनें केलें तेज क्षीण ॥ चंद्राकांचे प्रतापें ॥ ८७ ॥ तेव्हां पडलें निबिड तम ॥ देव पावले समरीं भ्रम ॥ दानवांहीं न करितां श्रम ॥ सहजें सुर जिंकिले ॥८८॥ करिती अत्रीची प्रार्थना ॥ ह्मणती स्वामी तपोधना ॥ अभय द्यावें अमरजना ॥ नेलें दानवीं यश सारें ॥८९॥ अत्री भास्कर सुधाकर[३०] ॥ स्वयें होय तपःसागर ॥ प्रथमरूपें मुनीश्वर ॥ दानवांशीं झगटला ॥ ९० ॥ प्रकाश

---

२५ शिव. २६ देव. २७ शत्रु. २८ पति. २९ शहारे येण्यासारखे. ३० चंद्र.

केला नाशिलें तिमिर ॥ दानवासीं करितां समर ॥ देव ही झाले युद्धीं समोर ॥ मारिले शत्रु प्रतापें ॥ ९१ ॥ रक्षिले देव केला विजय ॥ झाला दानवांचा क्षय ॥ चंद्रार्क पावले बलोदय ॥ सुरसमुदाय तोषविला ॥९२॥ असा सहाय तपोधन ॥ चर्मवल्कल ज्याचें वसन ॥ फळभक्षणें रक्षी प्राण ॥ त्याचें सामर्थ्य हें ऐसें ॥ ९३ ॥ ऐसा क्षत्रियांत कोणी ॥ असेल तरी बोल वाणी ॥ किंवा जोडूनि दोन्ही पाणी[31] ॥ च्यवनप्रताप परिसावा ॥ ९४ ॥ अश्विनी कुमार सोमपान ॥ करोत ऐसें म्हणे च्यवन ॥ शक्र म्हणे एवढें वचन ॥ आह्मां पासीं न चाले ॥ ९५ ॥ येरी ह्मणे आमुचा बोल ॥ कल्पांतीं ही नोहे फोल ॥ सूर्यपुत्रे[32] हे ही सुशील ॥ योग्य सोमप्राशनीं ॥ ९६ ॥ न ये इंद्राच्या तें मना ॥ करावया च्यवनाच्या हनना ॥ झाला सिद्ध निर्दय-मना ॥ पर्वत-वज्र घेऊनी ॥ ९७ ॥ च्यवनें प्रोक्षोनि मंत्रित अंभें[33] ॥ केला शक्राचा भुज-स्तंभ ॥ ज्याणें वधिले पाकजंभ[34] ॥ मंत्रें तो शक्र खिळियेला ॥ ९८ ॥ निर्मिला मंत्रप्रतापें मद ॥ वृत्रासारिखा अति उन्मद ॥ ज्याचे शत योजन रदें[35] ॥ दंष्ट्रीं[36] द्विशत योजनें ॥ ९९ ॥ तेणें ऐसें पसरिलें मुख ॥ देवां सहित शतमखें[37] ॥ जिव्हां मुळीं पहिला धाक ॥ होय सर्व लोकांसि ॥ १०० ॥ शक्रासि ह्मणती समय अमर ॥ करावा मुनिला नमस्कार ॥ आग्रह करितां सहपरिवार ॥ भस्म आतां होतसों ॥ १०१ ॥ इंद्रें दोन्हीं कर जोडुनी ॥ नमस्कारिला च्यवन मुनी ॥ सोमपानीं त्या पासुनी ॥ योग्य केले सुरवैद्य ॥ १०२ ॥ मदाचे केले भाग च्यारी ॥ अक्ष मृगया पान[39] नारी ॥ येथें ठेवी ह्मणोनि चतुरीं ॥ व्यसन चतुष्टय न धरावें ॥ १०३ ॥ ऐसा क्षत्रिय महाभाग ॥ असेल तरी अर्जुना सांग ॥ वृथा गर्वभारें उत्तमांग[40] ॥ सिणवावें हें अनुचित ॥ १०४ ॥ जेव्हां मदें गिळिले देव ॥ तेव्हां कपनामक दानव ॥ हरिती देवांचें वैभव ॥ धरा हरिली च्यवनानें ॥ १०५ ॥ ब्रह्मा विनविला अमरीं ॥ आह्मीं अशक्त कपांच्या समरीं ॥ संकट नाशीं उपदेश करीं ॥ पदच्युत जाहलों ॥ १०६ ॥ ब्रह्मा ह्मणे परित्राण ॥ तुमचें करितील सुब्राह्मण ॥ त्यांसि जावें सत्वर शरण ॥ माथां चरण धरावे ॥ १०७ ॥ अमरीं धावोनि धरितां पाय ॥ ब्राह्मण ह्मणती सांगा काय ॥ दिधलें मागाल तें अभय ॥ आहे बोला ह्द्गत ॥ १०८ ॥ देव ह्मणती दानव कप ॥ त्यांहीं हरिलें त्रिविष्टप[41] ॥ आमचा न चाले प्रताप ॥ तुह्मीं सकप व्हा आतां ॥ १०९ ॥ ब्राह्मणांहीं दिलें अभय ॥ केला कपक्षय निश्चय ॥ कळतां दानवांहीं सामनय ॥ तेथें कांहीं योजिला ॥ ११०

---

३१ हस्त. ३२ आश्विनीकुमार. ३३ उदक. ३४ राक्षस विशेष. ३५ दांत. ३६ दाढा. ३७ इंद्र. ३८ फांसे. ३९ मद्यपान. ४० शिर. ४१ त्रैलोक्य.

धनीनामा धाडिला दूत ॥ तो ब्राह्मणांतें भेटे त्वरित ॥ म्हणे तुम्हां ऐसे सद्वृत्त ॥ कंप[42] ते कैसे जिंकाल ॥ १११ ॥ जाणतो वेद करिती याग ॥ सर्व भूतीं संविभाग ॥ सत्य बोलती महाभाग ॥ ते कप कैसे जिंकाल ११२ वृथा मांस वृथा दारा ॥ न सेविती वृथाचारा ॥ गुरुच्या चरणाब्जीं धरिला थारा ॥ ज्यांच्या चित्तभ्रमरांहीं ॥ ११३ ॥ रजस्वलेशीं न रमती ॥ प्रदीप्त पावकीं होमिती ॥ दिवसा निद्रा करिती ॥ ते कप कैसे जिंकाल ॥११४॥ ऐसे कपांचे सद्गुण ॥ धनीदूत नीति निपुण ॥ वर्णी त्याचें करूनि श्रवण ॥ म्हणती ब्राह्मण सक्रोध ॥ ११५ ॥ जे देव ते आम्ही द्विज ॥ दूता सत्य सांगतों तुज ॥ जिंकूं कपांतें युद्धीं सहज ॥ ऐसें चि त्यांसि सांगावें॥११६॥ कपांसीं विप्रांसीं झालें रण ॥ सर्व दानव झाले क्षिण ॥ विजयश्रीनें ते ब्राह्मण ॥ रणस्वयंवरीं वरियेले ॥ ११७ ॥ ऐसा ब्राह्मणांचा प्रताप ॥ नाशी सुरासुरांचा दर्प । गौतमें शक्रासि देऊनि शाप ॥ कृपा केली पुनरपी ॥ ११८ ॥ अंगिरा शापी हुताशना ॥ आहे ठावें महाजनां ॥ अगम्य करी सिंधुप्राशना ॥ ऐकिलें असेल हें त्वां ही ॥ ११९ ॥ ब्राह्मण शापें लवणोदक[43] ॥ झाला नदींचा नायक ॥ तालजंघ क्षत्रियांतक ॥ और्वब्राह्मण विख्यात ॥ १२० ॥ दंडकांचा राज्यनाश ॥ ब्राह्मणें केला निःशेष ॥ तूं ही झालासी धराधीश ॥ दत्तात्रेयप्रसादें ॥ १२१ ॥ ब्राह्मण असो कैसा तरी॥ गर्भस्थास ही नमस्कारीं ॥ कांहीं काळ वैभव जरी ॥ भोगावेंसें वाटेल ॥ १२२ ॥ अर्जुन म्हणे गा जगत्प्राणा[44] ॥ सावध केलें मज सुजाणा ॥ भजेन सर्वस्वें ब्राम्हणां ॥ ब्राह्मण माझे कुळदेव ॥ १२३ ॥ तुझा बोधसुधाकरें[45] ॥ उदय पावतां मोहांधकार ॥ कैसा राहेल दया फार ॥ केली हानी चुकविली ॥ १२४ ॥ वायु म्हणे गा विचक्षणा ॥ क्षत्रधर्मे सर्व ब्राह्मणा ॥ रक्षीं आपुल्या इंद्रियगणा ॥ फार न लगे सांगावें ॥ १२५ ॥ भृगुवंशव्यजना[46]पासुनी ॥ भय होणार आहे म्हणोनि ॥ आपुला प्रतापदीप हानी ॥ न पावे तें करावें ॥ १२६ ॥ दानधर्मी पवनार्जुन ॥ संवाद ऐसा परम पावन ॥ यातें ऐकतील सज्जन ॥ ब्राम्हणभक्त आदरें ॥ १२७ ॥ श्रीरामनंदन मयूरेश्वर ॥ ब्राम्हणांचा निजकिंकर ॥ न करितां ग्रंथाचा विस्तर ॥ वदलायश विप्रांचें ॥ १२८ ॥ पवनार्जुनांचा संवाद ॥ ऐकोनि पावला आनंद ॥ धर्म श्रवणीं लागतां स्वाद ॥ कर्णवदना ओढवी ॥ १२९ ॥ पुन्हां सांगा विप्रमहिमा ॥ करुणासागरा नृपोत्तमा ॥ धर्म ह्मणे सुधासमा कथा सुखें सेवूंदे ॥ १३०॥ भीष्म ह्मणे गा धर्मराया ॥ ब्राम्हणभक्ता धर्मतनया[47]॥ धन्य तूं श्रोता

४२ राक्षस विशेष. ४३ समुद्र. ४४ वायु. ४५ चंद्र. ४६ पंखा. ४७ यम.

माझ्या हृदया ॥ आनंद वाटे सांगतां ॥ १३१ ॥ परि मी वृद्ध वाणक्षत ॥ रणीं पडलों जैसें प्रेत ॥ बोलतों तोषें परंतु श्रांत ॥ क्षणक्षणीं होतसें ॥ १३२ ॥ यास्तव ब्रम्हण्य देव हरी ॥ यासि हा तूं प्रश्न करीं ॥ सांगेल विप्रमहिमा मुरारी[४८] ॥ जगद्गुरु स्वमुखें चि ॥ १३३ ॥ धर्म विनवी कृष्णनाथा ॥ म्हणे पुरवीं मनोरथा ॥ तुझ्या वदनें ब्राह्मण कथा ॥ परिसावया इच्छितों ॥ १३४ ॥ कृष्ण म्हणे धर्मराया ॥ ऐक बापा सद्गुणालया ॥ जे म्यां पूर्वीं रुक्मिणीतनयीं ॥ कथिली कथा निजमुखें ॥ १३५ ॥ ब्राम्हणांहीं आणिला कोप ॥ प्रद्युम्न पावला संताप ॥ तो मज पुसे यदुकुळदीप ॥ तें चि तुजला सांगतों ॥ १३६ ॥ ब्राम्हणांतें भजतां नित्य ॥ सेवा करितां जैसा भृत्य ॥ मला सांगा स्वमुखें सत्य ॥ विप्रभजनीं फळ कोण ॥ १३७ ॥ भाव जैसा शिवार्चनीं ॥ तैसा चि ब्राम्हणांच्या भजनीं ॥ स्वयें पूज्य त्रिभुवनीं ॥ विप्र जनीं कां लवतां ॥ १३८ ॥ साहतां विप्रांचे अन्याय ॥ धांवोनि धरितां मस्तकीं पाय ॥ भिक्षुकांच्या भजनीं काय ॥ फळ होतसे तें सांगा ॥ १३९ ॥ ऐसें ऐकोनि प्रद्युम्नवचन ॥ मग मी जाणोनि त्याचें मन ॥ स्वानुभावाचें केलें कथन ॥ कीं तो व्हावा सावध ॥ १४० ॥ वत्सा विप्रमहत्व तुज ॥ सांगतों ऐक मनींचें गुज ॥ माझ्या पुत्रांत महाभुज ॥ तुं चि योग्य ह्या उपदेशा ॥ १४१ ॥ ब्राह्मण माझें निज धन ॥ ब्राह्मण कल्याणांचें निधान ॥ ब्राह्मणांचें चरणार्चन ॥ परम पावन सर्वांसी ॥ १४२ ॥ विप्रप्रसादें रणांगणीं ॥ जिंकितों मी शत्रुश्रेणी ॥ लोकत्रयीं चक्रपाणी ॥ मान्य विप्रप्रसादें ॥ १४३ ॥ आमुचा आराध्य महेश्वर ॥ तो चि स्वयें धरणीसुरें[५१] ॥ समुद्रोदरीं माझें पुर ॥ ब्राह्मणवरें तरलेंसे ॥ १४४ ॥ जे जे ब्राह्मणांचे दास ॥ ते ते जयलक्ष्मीचे निवास ॥ रक्षितें संकटीं यदुकुळास ॥ विप्रप्रसाद सत्कवच ॥ १४५ ॥ आयुष्य कीर्ति यश बळ ॥ ब्राह्मणपूजेचें हें फळ ॥ इतुकें चि नव्हेगा केवळ ॥ आत्मज्ञान हे देती ॥ १४६ ॥ उपमन्युच्या आशीर्वचनें ॥ दर्शन दिधलें त्रिलोचनें ॥ पोटा आलासि तूं वरदानें ॥ महेश्वराच्या कुळदीप ॥ १४७ ॥ वसुदेव ब्राह्मणसेवक ॥ माझा आजा हा देवक ॥ तुझा मातामह भीष्मक ॥ ब्राह्मणभक्त विख्यात ॥ १४८ ॥ एकदा श्रीदुर्वासामुनी ॥ द्वारकापुरीं येउनी ॥ कौतुक करिता झाला जनीं ॥ तें चि पुत्रा परिसावें ॥ १४९ ॥ आहेत जे हे सर्वलोक ॥ लोकपाळ जे इंद्रादिक ॥ ते संपूर्ण ब्राह्मणपूर्वक ॥ कैसें यांतें न भजावें ॥ १५० ॥ ब्राह्मणांचा कोप कांहीं ॥ धरितां कल्याण होणें नाहीं ॥ नौका फोडोनि कोण भुजांहीं ॥ सागरातें तरेल ॥ १५० ॥

४८ कृष्ण. ४९ प्रद्युम्न. ५० सेवक. ५१ ब्राह्मण.

ब्राह्मण म्हणजे महद्भुत ॥ उभय लोकीं ही विख्यात ॥ कोपतां क्षणांत कृतांत होती ब्राह्मण प्रतापी ॥ १५२ ॥ भस्म करितील ब्रह्मांड ॥ जैसा शुष्क गोमयपिंड ॥ काळदंडास ही ब्रह्मदंड ॥ क्षणें शतखंड करील ॥ १५३ ॥ ब्रह्मांडाची घडामोडी ॥ ज्यांच्या शक्तीला केवळ थोडी ॥ यांच्या चरणरजांची जोडी ॥ सर्व तीर्थे करिताती ॥ १५४ ॥ व्हाया उभय लोकीं कल्याण ॥ आश्रय करावे ब्राह्मण ॥ सन्मानकामुकें अभ्यसन ॥ सद्विद्येचें करावें ॥ १५५ ॥ शीघ्रकोपी भगवंत ॥ उदार जैसा उमाकांत ॥ दुर्वासमुनीचें भिक्षावृत्त ॥ तुजला नाहीं ठाउकें ॥ १५६ ॥ वर्णे करूनि हरिपिंगळ ॥ नेसला चिंध्या अमंगळ ॥ बिल्ववृक्षाचा दंड विशाळ ॥ करीं मिरवी सर्वदा ॥ १५७ ॥ दीर्घ श्मश्रू अत्यंत कृश ॥ भिक्षुरूप व्योमकेश ॥ सर्वां मनुष्यांत तादृश ॥ दीर्घ कोणी असेना ॥ १५८ ॥ तो योगिराज हिंडे पुरीं ॥ म्हणे कोणी मजला घरीं ॥ ठेवील काय दिवस चारी ॥ राहावेंसें वाटतसे ॥ १५९ ॥ माझा स्वभाव बहु कोपन ॥ करावें सर्वदा संगोपन ॥ दुर्वासा हें कळतां जन ॥ मान्य कैसे होतील ॥ १६० ॥ सर्वस्व मजला निवेदावें ॥ पूजा करावी शुद्ध भावें ॥ जें जें करीन तें सोसावें ॥ हें कवणासि सोसेल ॥ १६१ ॥ ऐशा गाथा गाय योगी ॥ चत्वरीं सभास्थानीं मार्गीं ॥ सर्व ऐकती परी त्या लागीं ॥ यावें कोणी न म्हणती ॥ १६२ ॥ म्यां तें परिसतां चि पुत्रा ॥ धांवोनि वंदिलें त्या पवित्रा ॥ विप्ररूपा वायुमित्रा ॥ आलों गृहा घेउनी ॥ १६३ ॥ केला सर्व जनाला बोध ॥ कथिला मुनीचा ॥ दुःसह क्रोध ॥ करविले नाना पदार्थ सिद्ध ॥ मागेल ते ते द्यावया ॥ १६४ ॥ वंदन करूनि त्या मुनिवर्या ॥ सांगतों त्याची स्वैर चर्या ॥ कांहीं घडली जा परिचर्या ॥ अनुग्रहें त्याच्या ची ॥ १६५ ॥ करूं बैसतां भोजन ॥ सहस्रांचें भक्षी अन्न ॥ तप्त लोहीं जैसें जीवन ॥ भस्म करी तेजस्वी ॥ १६६ ॥ केव्हां भक्षी केवळ थोडें ॥ थुंकोनि टाकी अन्नें गोडें ॥ ह्मणे झालीं गात्रें रोडें ॥ व्यर्थ येथें राहिलों ॥ १६७ ॥ निद्रा आणि जागर ॥ पुष्कळ करी ज्ञानसागर ॥ केव्हां स्नान संध्यापर ॥ केव्हां कांहीं करीना ॥ १६८ ॥ मी आणि तुझी जननी ॥ बैसों चरणसंवाहनीं ॥ जेव्हां निद्रा सेवी मुनी ॥ आम्ही रचिल्या मृदु सेजे ॥ १६९ ॥ स्नान-संध्या भोजन ॥ शयन पादप्रक्षालन ॥ या या कर्मीं परिजन ॥ आह्मां विना नावडे ॥ १७० ॥ रुक्मिणी ढाळी चामर ॥ व्यजनें सेवीं मी किंकर ॥ अभ्यंग कराया मुनीश्वर ॥ आज्ञा करी आम्हांसीं ॥ १७१ ॥ कोप येतां नाळी फोडी ॥ न्यायें वर्ततां दीकाढी खोटी ॥

१ यम २ गोंवरी ३ दाढी ४ शिव ५ अंगणांत ६ अग्नि ७ पंखा ८ नरडें.

यज्ञसूत्र जटा तोडी ॥ वस्त्रें फाडी अभिनवें ॥ १७२ ॥ उगाचि हांसे उगाचि रडे ॥ शय्येवरूनि भूवरि पडे ॥ कोपाग्निनें सर्वदां कढे ॥ काळियाविषें र्‍हद जैसा ॥ १७३ ॥ जाळी मुक्ताफळांचे हार ॥ ह्मणे चूर्ण करितों फार ॥ येणें तरी तांबूलसार ॥ लागेल आह्मां भक्षितां ॥ १७४ ॥ निद्रा न येतां शय्या जाळी ॥ बोलतां आधीं द्याव्या गाळी ॥ त्या मुनीतें मी वनमाळी ॥ कांपें नसतां अपराध ॥ १७५ ॥ मागे भलतें चि भलत्या वेळे ॥ पळभरी कोपे पळभरि खेळे ॥ नमना आणवी स्त्रीयांचे मेळे ॥ ह्मणे मातें छळितसां ॥ १७६ ॥ केव्हां बैसे सिंव्हासनीं ॥ केव्हां रुसोनियां स्मशानीं ॥ केव्हां होय परममौनी ॥ मूक बधिर जन्माचा ॥ १७७ ॥ आज्ञे विना भोजन स्नान ॥ आज्ञा नसे पुत्रा जाण ॥ हस्त जोडोनि रात्रिदिन ॥ पायां पाशीं असावें ॥ १७८ ॥ केव्हां धरी दिव्यांबर ॥ केव्हां केवळ दिगंबरें ॥ दिवसामध्यें वेष शंभर ॥ तो भगवंत स्वीकारी ॥ १७९ ॥ नाहीं केली मुनीची निंदा ॥ नमन त्याच्या पदारविंदा ॥ तद्गुण कीर्तन मज गोविंदा ॥ करावेंसें वाटलें ॥ १८० ॥ रात्री दिवस नित्य जागा ॥ रुक्मिणी सह त्या महाभागा ॥ सेवीत होतों जैसी आंगा ॥ छाया क्षण ही न विसंबे ॥ १८१ ॥ ऐसें छळितां एके दिवसीं ॥ इच्छा झाली पायसीं ॥ उष्ण उष्ण जैसें त्यासी ॥ मानें तैसें वाढिलें ॥ १८२ ॥ पायस भक्षूनि ह्मणे पुत्रा ॥ प्रसाद माझा आपुल्या गात्रा ॥ शीघ्र लावीं तुज सत्पात्रा ॥ दान तैसें म्यां दिल्हें ॥ १८३ तें मुनीचें प्रसादवचन ॥ श्रवणीं पडतां चि पायसान्न। चरणापासूनि केशांत चर्चन ॥ तात्काळ केलें आदरें ॥ १८४ ॥ रुक्मिणीतें ह्मणे मुनीराय ॥ तूं ही लावीं पाहसी काय ॥ केशापर्यंत आपुला काय ॥ पायसानें सारवीं ॥ १८५ ॥ आज्ञा केली दोघांजणीं ॥ रथ आणवी त्याच क्षणीं ॥ आह्मां तो मुनिशिरोमणी ॥ योजी स्यंदनें धुरेसी ॥ १८६ ॥ आपण बैसे रथावरी ॥ प्रतोदातें घेऊनि करी ॥ चालवी द्वारकेच्या भीतरी ॥ राजमार्गें सर्वत्र ॥ १८७ द्वारकेंत हाहाकार ॥ तेव्हां लोक करिती फार ॥ कापतीं यादव सहपरिवार ॥ ज्ञाते ह्मणती भीवों नका ॥ १८८ ॥ वांटी याचकांतें रत्नांजळी ॥ मार्गीं सुवर्णमणी उधळी ॥ वर्षामेघाहुनि आगळी ॥ औदार्यशक्ती स्वामीची ॥१८९॥ मिरवे पुरींत जैसा नवरा ॥ वंदिती लोक त्या मुनिप्रवरा ॥ ह्मणती याहुनि शक्ति अवरी ॥ महेंद्राची कोटिगुणें ॥ १९० ॥ पडली वैदर्भी सुकुमारी ॥ ह्मणोनि कोपोनि कशा मारी ॥ त्या ईश्वराला कोण वारी ॥ उगाचि पाहे मी नवळी ॥१९१॥ मंद चालतां प्रतोद लावी ॥ केवळ निर्दयपणासि दावी ॥ अं-

१ डोह २ नम्र ३ खीर ४ रथ ५ चाबूक ६ नीच ७ चाबूक.

तरीं करूणार्णव गोसावी ॥ तो आमुचा कुळदेव ॥ १९२ ॥ वसुदेव बळदेव उग्रसेन ॥ अक्रूरोद्धव सज्जन ॥ कळों न देतां पुसती नयन ॥ मुनीश्वराचें भय पोटीं ॥ १९३ ॥ ह्मणे पाहों उपवनें ॥ मंद सुगंध शीत पवनें ॥ आनंद पावेन कीं तीं भवनें ॥ सर्वाऋतूंच्या शोभेचीं ॥ १९४ ॥ पुरा बाहेर नेला रथ ॥ लंघितां परम त्वेरनें पथ ॥ रुक्मिणीचा देह सव्यथ ॥ स्खलन पावे पुनरपी ॥ १९५ ॥ रथावरूनि टाकी उडी ॥ वैदर्भीला कोपें ताडी ॥ ह्मणे काय झालें फुगडी ॥ घातली ना माहेरीं ॥ १९६ नावडे माझें वचन भजन ॥ क्षण सेवेसी विटलें मन ॥ जातों आह्मी तपस्वीजन ॥ पृथ्वी असे आमुची ॥ १९७ ॥ उदंड आहेत माझे दास ॥ तेथें पुरवूं हा हव्यास ॥ वाहतां चारी पाऊलें रथास ॥ सातां जागीं पडतसां ॥ १९८ ॥ ऐसें बोले दावी राग ॥ आड मार्गें चि महाभाग ॥ रूसोनि जातां पाठिलाग ॥ केला आह्मीं दोघांनीं ॥ १९९ ॥ श्रमें गांठोनि धरिले पाय ॥ तेव्हां हंसे तो मुनिराय ॥ ह्मणे आतां उरलें काय ॥ प्रसन्न झालों वर मागा ॥ २०० ॥ सत्यसागारा भला गा शौरी ॥ झालों प्रसन्न मी तुजवरी ॥ जितक्रोधा तुझिये सरी ॥ उतरे ऐसा न एक ॥ २०१ ॥ केला दाटोनि पुष्कळ छळ ॥ दोष नाहीं पाहिला तिळ ॥ यश हें तुझें बहु निर्मळ ॥ क्षीराब्धीतें लाजवे ॥ २०२ ॥ वर मागावे जे मनांत ॥ प्रसन्न घालों वरदनाथ ॥ पहा सामर्थ्य पारिजात ॥ मला हात जोडितो ॥ २०३ ॥ अन्नाचिया ठायीं प्रीती ॥ मनुष्यांची जैसी असती ॥ त्याहूनि आवडी लोक धरिती ॥ तुझिया ठायीं मंद्रूरें ॥ २०४ ॥ तुझिया भजकां न शिवे शोक ॥ तुझ्याया यशातें गाऊत लोक ॥ त्वत्प्रताप लोकालोक ॥ पर्वतातें लंघील ॥ २०५ ॥ तूज परीस सुप्रिय जना ॥ दुसरें नसो यदुनंदना ॥ करील विश्व तुझिया भजना ॥ हा वर माझा तुज असो ॥ २०६ जें म्यां फोडिलें जें जाळिलें ॥ तुझिया सदनीं जें नाशिलें ॥ तें सर्वत तसेंचि संचलें ॥ गृहा जातां पाहसी ॥ २०७ ॥ पहिलें वस्तु मोलें गुणें ॥ पाहतां भरेल पुष्कळ उणें ॥ ब्राह्मण सेवा योग निपुणें ॥ त्वां मज भावें हारविलें ॥ २०८ ॥ माझी कृपा कामकपिलो ॥ प्रसन्न झाली वत्सा तुजला ॥ नोहे छळक मी ब्राह्मण भला ॥ भक्त यशातें वाढवितों ॥ २०९ ॥ उच्छिष्ट पायसें चर्चिल देह ॥ झाला अभंग निःसंदेह ॥ झाला कल्याणाचें गेह ॥ साधु स्नेह धरितील ॥ २१० ॥ पुत्रका परंतु पादतळें ॥ कोमळें केवळ कमळदळें ॥ राहिलीं सर्वांग त्या वेगळें ॥ वज्राभेद्य जाहलें ॥ २११ ॥ एव्हढें मात्र जाहलें खोटें ॥ माझ्या मना लागलें मोठें ॥ होणार तें तें चुकतें कोठें ॥ ऐसें

---

१ कल्पवृक्ष. २ धेनु.

वदला मज प्रती ॥ २१२ रुक्मिणीतें ह्मणे मुनी ॥ वत्से ऐक माझी वाणी ॥ उघडिली वर रत्नांची खाणी ॥ अलंकारितों तुज आतां ॥ २१३ ॥ लोकीं ज्या ज्या असतील सती ॥ त्या वर्णितील तुझी कीर्ति ॥ न शिवो तुझिया देहा प्रती ॥ जरा रोग वैवर्ण्य ॥ २१४ ॥ पुण्य गंधाचें विलासगेह ॥ तुझें असो सर्वदां देह ॥ लोकत्रयीं तूं निःसंदेह ॥ पावसील वर यश ॥ २१५ ॥ पति-प्रसाद अतिमात्र ॥ पावेल कन्ये तुझें गात्र ॥ उच्छिष्ठ पायसा झालें पात्र ॥ कल्याणभाजन यास्तव ॥ २१६ ॥ सोळा सहस्र सपत्नीं[1] माजी ॥ आप्तज-नांचिया समाजीं ॥ तुंचि मुख्या हे घे माझी ॥ आशीर्वाणी मस्तकीं ॥ २१७॥ तुजसीं पतिसीं नसो वियोग ॥ सर्वदा भोगीं दिव्य भोग ॥ पुत्र पौत्र महाभा-ग ॥ पावसील मद्वाक्यें ॥ २१८ ॥ मस्तकीं ठेऊनि करपंकज ॥ मजला ह्मणे तो मुनिराज ॥ ऐसी च बुद्धी असोंदे तुज ॥ उपदेश हा आमुचा ॥ २१९ ॥ ब्राह्मण चरणीं भाव ॥ असों दे अभिनव ॥ दया करील महादेव ॥ विप्ररूप तुज वरी ॥ २२० ॥ ऐसें बोलोनि झाला तुष्ट ॥ वरामृतें केलें तृप्त ॥ आह्मां भासे होतों सुप्त ॥ स्वप्न पाहोनि जागलों ॥ २२१ ॥ देहीं नाहीं कांहीं क्लेश ॥ आनंदें कोंदे सर्व देश ॥ विप्ररूप व्योमकेश[2] ॥ प्रसन्न झाला या परी ॥ २२२ ॥ स्वप्न पाहोनि जागा झालों ॥ ना त्या आनंदसागरीं न्हा-लों ॥ किंवा सुधा सेवूनि धालों ॥ सदना आलों सदार ॥ २२३ ॥ जाळिलें भंगिलें वस्त्रपात्र ॥ नाशिलें तें तें वस्तुपात्र ॥ पाहतां गृहीं माझें गा-त्र ॥ रोमांचित जाहलें ॥ २२४ ॥ भाग्यालंकार त्याला ओप ॥ दिधली त्याला नाहीं लोप ॥ प्राकृतांला वाटे कोप ॥ अनुग्रह स्वामीचा ॥ २२५ ॥ भरले कांचनरत्नकोश ॥ राशी अन्नाचे निर्दोष ॥ झाला द्वारकेला संतोष ॥ चमत्कार पाहतां ॥ २२६ ॥ तेव्हां पासूनि गुप्त व्रत ॥ धरिता झालों मी अच्युत ॥ करीन ब्राह्मणांचें वांछित ॥ कायवाङ्मनें सर्वस्वें ॥ २२७ ॥ ब्राह्मणांतें साक्षात् शिव ॥ आणोनि भजतों मी केशव ॥ विप्रदर्शनीं मज उत्सव ॥ जैसा दरिद्रा निधिलाभें ॥ २२८ ॥ तूं ही तुत्रा ऐसें चि करीं ॥ विप्रभजनीं निष्ठा धरीं ॥ सर्व कल्याणांतें वरीं ॥ आज्ञा आदरीं गुरू-ची ॥ २२९ ॥ ऐसें प्रद्युम्नातें मागें ॥ कथिलें तें त्वां महाभागें ॥ पुशिलें ह्मणोनि म्यां अनुरागें ॥ धर्मराजा वर्णिलें ॥ २३० ॥ पितामहाची आज्ञा न मोडे ॥ कीं मज पूज्य ऐसे थोडे ॥ आणि तुमचा संतोष जोडे ॥ घडे गुरूचें कि-र्तन ॥२३१॥ माझी आवडी येथें मोठी ॥ जाणा तुम्ही खरी कीं खोटी ॥ यज्ञांत साहित्य भूप कोटी ॥ करितां उष्टीं मी काढीं ॥२३२॥ ब्राह्मणांचे पु-

---

[1] सवती. [2] शिव.

तले पाय ॥ तें म्यां स्वमुखें वदावें काय ॥ ब्राह्मणापेक्षां बापमाय ॥ मजला अधिक न गमती ॥ २३३ ॥ ब्राह्मणभक्त देवव्रत ॥ तूं हि ब्राह्मण चरणीं नत ॥ वर्णील कोण तुमचें सुकृत ॥ धन्य तुह्मी प्रभु ह्मणे ॥ २३४ ॥ ऐसी दानधर्मी कथा ॥ श्रवणमात्रें नाशी व्यथा ॥ पुरवी श्रोत्यांच्या मनोरथा ॥ श्रीरामात्मज हें जाणें ॥ २३५ ॥ श्रीदुर्वासमुनींची भिक्षा ॥ दुःखदारिद्र्यनाशमनीं दक्षा ॥ श्रवणमुखें रसिक हो भक्षा ॥ मयूरेश्वर प्रार्थितो ॥ २३६ ॥

समाप्त.

---

# भृगुचरित्र.

——o:o:o——

## श्लोक.

जी सुखप्रद सरस्वती धुनी¹ । सेविली सतत सर्व साधुनीं ॥
तत्तटीं करिति सत्र² सन्मुनी । जे स्वकर्मरत नित्य जन्मुनी ॥ १ ॥
मोक्षार्थ सत्र करिती ऋषि सर्व हो ते ॥
जेथें स्वयें चि यजमान हि ते चि होते* ॥
तेव्हां वितर्क करि त्या मुनिंची सभा जी ॥
जो तत्क्षणें चि भवबीज-कणास भाजी ॥ २ ॥

ब्रह्मा शंभू विष्णु तीघे समर्थ । यांच्या दासा प्राप्त होती पुमर्थ³ ॥
तैत्तद्भक्तां⁴ भासती ते चि भारी । शैवां शंभू वैष्णवां कैटभारी† ॥ ३ ॥
तच्चें परी कोण वरा तिघांत । ज्याचें पदध्यान भवातिघात ॥
सर्वांस ही जो सुलभ स्वभावें । ज्याच्या हरे ताप निज स्वभावें ॥ ४ ॥
तराया भवाब्धींत अज्ञान राशी । तिहीं प्रार्थिला श्रीभृगु ज्ञानराशी ॥
परीक्षा करायास तो सिद्ध झाला । जनीं सर्व ही जाणती सिद्ध ज्याला ॥ ५ ॥
श्री सत्यलोका प्रति तो द्विजाती⁵ । गेला न जेथें विषयेच्छु जाती ॥
की परीक्षा भृगु तो पित्याची⁶ । न होय दुर्बुद्धि तथापि त्याची ॥ ६ ॥
स्तवन वंदन तो कवि घातया । न करि जाउनि लोक विधातया ॥
ह्मणुनियां विधि तो बहु तापला । गणि मनीं अवमान चि आपला ॥ ७ ॥
विवेकें चि तो कोपतापास वारि⁷ । करी शांत जैसें स्व बापास वारी ॥

---

१ नदी. २ यज्ञ. ३ चतुर्विधपुरुषार्थ. ४ त्याच्या त्याच्या भक्तास. ५ ब्राह्मण ६ ब्रह्मदेवाची. ७ उदक. * हवन करणारे. † विष्णु.

नमस्कार तो हस्त जोडूनि घाली । मनीं लाज तेव्हां विधिच्या निघाली[८]
पहाया प्रभू योगिया तापसांच्या । क्षणें जो हरी चिंतितां ताप साचा ॥
परीक्षा कराया पहायास भार्वा । भृगू जाय जो भूरहायास्वभावा ॥ ९ ॥

आला भेटावयाला मुनिवर भृगु हा सौहृदें भाउ मातें ॥
सामोरा देव जातां निरखि कुतुक तें दिव्यशोभा उमातें ॥
इच्छीना हा शुचिलें पितृ[१०]वनवसतिप्रेतपालिंगनाशी ।
ज्याचें नेत्रें पहाता सुखशिशिर *भवोग्रातपा लिंग नाशी ॥ १० ॥

तों बुद्धि झाली असि भूतपाची † । कीं हा म्हणे मी निज[११]भू तपाची ॥
ज्येष्ठावमानी रत हा असाधू । मरो क्षणें शूळ यशासि साधू ॥ ११ ॥

ज्याणें हा मुनि पोटिसीं धरुनियां व्हावें चि रोमांचित ।
जो सर्वज्ञ जनीं पदाप्ति करितां सत्कर्म-सोमांचि[१३]तें ॥
तो कोपे विभुचा भुज ज्वलद पापित्ताचिच्या अग्रजा ।
शूळा घे बहु फारसे पटु पवी छेदी असे अग्र ज्या ॥ १२ ॥

प्रगल्भा[१४] मानाची वसति गिरिजा आपणचितीं ।
न भी वाराया[ला] सुखनिधि[१५]लीं आपण चि ती ॥
तिला आलिंगाया नव हि भुज जेव्हां सरसती ।
न संकोचें बोले शिव हृदयहारी सरस ती ॥ १३ ॥

रक्षायाला तत्क्षणीं देवरीं[१६] हे । पायां लागे तों उगा देव राहे ॥
तीणें शांतक्रोध तो शंभु केला । तो ही तीच्या प्रेमभावीं भुकेला ॥ १४

बुझायाला गोवत्सलन जिस विश्वंभरें[१७] नमी ।
म्हणे जी कोपानें [१८]परिणति करा शंभर न मी ॥
स्वयें विप्रत्राणास्तव रमणपायां वर तनू ।
त्यजी ते अक्रोधा करि भुवनपा[१९] या वरतनू ॥ १५ ॥

क्षणीं जीची दृष्टी सहज भुवनें शंभर विती ।
सुखग्रासीं जी कीं निजभजकतोकां[१९] भरविती ॥
स्वयें विप्रत्राणास्तव रमणपायां वर पडे ।
तदां झाले लोकीं पद दशभुजांही वरपडे ॥ १६ ॥

त्रासि पदा मति ते अगजा न न । क्षण जिला स्मरला हि गजानन ॥
विगतरोष करी पतिला सती । नुरवि हो प्रभुकोपतिलां[२०]स ती ॥ १७ ॥

---

८ शंकराला. ९ आत्पगणें. १० स्मशानात राहणारा शंकर. ११ मुख्य ठिकाण. १२
१३ सत्कर्मरूपी चंद्रानियुक्त. १४ प्रौढ. १५ शिवाला. १६ दिराला (भृगुला.) १७ शिव.
१८ क्षम. १९ बालक. २० तीळभर. * संसाराच्या उग्र तापाला. † शिवाची.

चरित्र तें पाहुनि शंकराचें । सर्वांचिया त्या अभयंकराचें ॥
आसादिलें त्या मुनिनें लवानें[२१] । वैकुंठ चित्तें अति पेलवानें ॥ १८ ॥

रमोत्संगीं[२२] ठेवी रसिक विभु सर्वोत्तम उसे ।
तदंकाला मानी भुवनपतिचें चित्त मउसें ॥
मिषानें निद्रेच्या मुनिहृदयसद्मा सुपतिला ।
उशीला निंदूनी करि मुदित पद्मा सुपतिला ॥ १९ ॥
होता जागविला जणों हरिजनें एकादशी कीर्तनें ।
जाला श्रांत विशुद्ध भक्तभजन-प्रेमाचिया नर्तनें ॥
या साठीं निजला उगाचि करुनी लक्ष्म्यंक पर्यंकसा ।
त्या सौख्यांत पदप्रहार विषयी निःशंक हा हो कसा ॥ २० ॥

कीर्तनीं स्वगुणकीर्तनगोडी । ती सुधेंत तंव केवळ थोडी ॥
स्वस्वरूपरुचिहेतु समाधी । तो न सुप्त हत सर्वसमाधी ॥ २१ ॥

करावा जागा ही परि बहु सती लाज वटती ।
मनीं ही सप्रेमें कुलयुवतिलीला जवटती ॥
प्रबुद्धांचा राजा कपटमयनिद्रा कवळितो ।
करानें लोटावा तरि विभु अणिद्राकवळ तो ॥ २२ ॥
द्विजार्चालाभाचा समय असुसंपाद पळतो ।
उभा आहे श्रीमन्मुनिवर पुढें पाद पळ तो ॥
पदस्पर्शें होतां सदय विभुला जागर तरी ।
नसे संकष्टाचा अपरिमित तो सागर तरी ॥ २३ ॥

न आहे ह्मणावा जरी देव जागा । कळेना मना वाद हा ठेव जागा ॥
तुह्मी वर्ततां देव कैसा निजेला । धरी तो बळें कौतुकानें निजेला ॥ २४ ॥

सर्वज्ञ विप्र मम सत्वपरीक्षणासी । आला चुकावुन वदोनि परी क्षणासी ॥
हा यामुळें कुतुकराशि निजोनि घोरे । तो विप्र कोंवे निजसिद्धिपथीं निघोरे २५

कुतुकनिद्रित देव असें खरें ॥ वळखिलें हृदयीं मुनिशेखरें[२३] ॥
वदन पाहुनि तो भुलला तरे ॥ सुख-हृदीं[२४] न न तें मुनि लात रे ॥ २६ ॥

पादांभोजरसा सर्व करुनियां तो भूलला बाळक ॥
पायें जागविला करा समजुनी लोकत्रयीं पाळक ॥
किंवा पद्मनिवासिनी भृगुसुतावासार्थ शुद्धा पदा ॥
लावी तीर्थ करी मुकुंदहृदया त्या भक्तचिंतास्पदा ॥ २७ ॥

---

२१ क्षणानें २२ मांडीवर. २३ श्रेष्ठानें. २४ ठोहात.

स्वदासासि अक्लेश चि देवराशी ॥ तया श्रीवराशी शचीदेवे[25]राशी ॥
उरीं तो करी साधु लत्ताप्रहार ॥ तुटे तो गळ्यांतील हा क्षिप्रं[26] हार ॥ २८ ॥

ज्याचीं भक्तिज्ञ लोकीं अमृतनिधि अशा विश्वपाळा तयातें ॥
मारी हो तो परीक्षेस्तव हृदयिं भृगू सत्तपा लात यातें ॥
तो हा विप्रावमाना समजुनि उठला तो गमे घाबरा हो ॥
या सर्वे तूं चि देवीं स्वजनशिखिदयाकाळमेघा बरा हो ॥ २९ ॥

जयाच्या पायाचा रज विभव होतो निजसुरा ॥
उठे पादस्पर्शे गडबडुनि हो तो निजसुरा ॥
जयासाठीं योगीजन अनशनानें तळमळे ॥
तयाचा विप्रांच्या चरणनमनीं कुंतळें[27] मळे ॥ ३० ॥

उठे गडबडोनियां उतरुनी पलंगातळीं ।
करी मुनिपदास तो विरजें[28] आपल्या कुंतळीं[29] ॥
नमस्करुनि आसनीं बसविला महा आग्रहें ।
कृतार्थ भृगुला करी असकृदंघ्रियुग्मग्रहें[30] ॥ ३१ ॥

येणें तुझें न दिधलें मज होउं ठावें । प्रत्युद्गमार्थ[31] पहिलें तुज हो उठावें ॥
माझा खराचि सदया अपराध राया । तूं शांतिला क्षमें[32] चि सत्वपरा धराया ३२

हें माझें हृदय प्रभो कठिण कीं त्वत्पाद हे कोमळ
स्पर्शानें तरि याचिया मम हृदावासीं न ठाको मळ ॥
ताता हें दुखलें असेल पद कीं आज्ञा स्वदासा धुया ।
द्यावी क्षाळुनि धन्य होइन जनीं मी त्वत्पदा साधु[33] या ॥ ३३

क्षाळूनियां पद कणा अवनेजनांच्या[34] । घेईन साधिन यशा अवनें जनाच्या ॥
मातें हि मद्गत हि साधुसभाजनांतें[35] । तारीन हो करुनि साधुसभाजनांतें[36] ॥ ३४

जालों मी श्रीनिवास प्रभु तव चरणस्पर्शपूतांग[37] देवा ।
चापा चक्रा भुजा वा बळ मुनिचरण द्वंद्व धूतां गदे वा ॥
आधीं पूजा करूं दे मग कर करणें सत्तमा ज्या निदेशीं[38] ।
जेणें घेऊनि आलें तुज भुवनगुरो, चित्त माझ्या निदेशा ॥ ३५ ॥

तीर्थाचें तीर्थकारी इतर जळ नमे हें जसें पातकारी[39] ।
हें पीयूषाभ[40] वारी भजकसुख पिपासोद्भव क्षोभ वारी ॥

---

२५ शचीचे दिराला (विष्णुस.) २६ सत्वर. २७ केंस. २८ स्वच्छ. २९ केसानें. ३० वारंवार दोन्ही पाय धरून. ३१ सामोरे येण्यास. ३२ योग्य. ३३ चांगले. ३४ पाय धुतलेलें पाणी. ३५ साधुसमुदायाला. ३६ पूजा. ३७ पवित्र शरीर. ३८ आज्ञा ३९ पापनाशक. ४० अमृततुल्य.

देती ऐश्वर्य भारी भुवनमहित मी या पदें कैटभारी ।
हे माझी कीर्ति सारी द्विजपदयुगळीं सर्व संताप सारी ॥ ३६ ॥
भवत्पादाब्जांचे दृढ वसति चिर्त्ती भरंवसे ।
बळें या घेऊनी अहिपति[1] शिरीं भूभर वसे ॥
भवत्पादार्चेनें सकळ सुरवृंदा महित मीं ।
असे तापार्तांचा विधु तरणि उद्दाम हि तमीं ॥ ३७ ॥
भवद्वंदापाशीं मम मन बसें वेंचित रती ।
भवाब्धीतें सारे द्विजचरणसेवें चि तरती ॥
तुह्मीं स्वस्वाधीन क्षितिसुर[2] तपस्वी जग विर्ता[3] ।
लया नेतां कांहीं समय कुतुकानें जगविर्ता ॥ ३८ ॥
तुम्हीं त्रैलोक्याचे अभयसुखदेते वसविते ।
अविद्याध्वांताचे सतुदित धरादेव सविते ॥
भवन्माहात्म्याला अवधिच नसे शोधक-मतें ।
असें जाणायाला पदनमन हें बोधक मतें ॥ ३९ ॥
ब्रह्मण्य देव हरि यापरि गोड बोले । प्रेमें करूनि धृतसात्विकभाव डोले ॥
हातें हळू चि रगडी पद देव दोनी । विप्रासि दुर्लभ असें सुख दे वदोनी ४०
करि करें मग साधु सभाजर्नें[4] । स्तविति ज्या प्रति साधुसभाजन ॥
करुनियां चरितें हरि तो मलों[5] । बहु मला गमतो हरि तो भला ॥ ४१ ॥
केलें ब्रह्मण्य देवें अतुळ कुतुक हें तारक श्रेष्ठ आजी ।
आजा धूतो पदातें वर मुदितमनें घालिते नीर आजी ॥
नाहीं संकोच पूजा गुरु करि बहुधा टाकिली लाज नातें ।
हें गातां शीघ्र तारी परि वरि हरिची सत्वलीला जनातें ॥ ४२ ॥
सारे सात्विकभाव या वसुमतीदेवास झाले तसे ।
जे तद्भक्त तदीय देह चि तशा त्या भूपणा लेतसे ॥
तो श्रीकांतदयापयोद मुनि तो भासे मयूरार्भ[6] रे ।
नेमानें भरतें अनुक्षण तदा तद्बाष्पपूरा भरे ॥ ४३ ॥
वंदी तो भृगु सकलक्षमानदाते । दासांच्या सुरवरलक्षमानदातें ॥
गेला तो मुदित सरस्वतीस सत्रा । घेऊनी हरिगुणसद्व्रतीस सत्रा ॥ ४४ ॥
काथि भृगु हरिभक्तिमज्जनातें । करिति मुनी सुखसिंधु-मज्जनातें[7] ॥
विधिजनिस हि देति खेंव सारे । म्हणति मुकुंद भजा सुखें वसारे ॥४५॥

---

१ शेष. २ भूदेव (ब्राम्हण.) ३ उत्पन्न करिता. ४ पूजा. ५ पाप. ६ मयूराच्या प्रमाणें शोभणार. ७ स्नानातें.

मुनि म्हणति सदा जो मोक्षदाना विकासी ।
धरूं भवजलधींत त्वत्पदानाविकासी ॥
करूं जप तप अर्चा साधना याजनासी ।
तुजविण हरि कैंची सद्गती या जनासी ॥ ४६ ॥
**मयूरेश्वरें** वर्णिलें हें चरित्र । कराया मनोवाग्वपूतें पवित्र ॥
रसज्ञा जनाला नमस्कार आहे । कवित्वें न मद्बुद्धि गर्वासि वाहे ॥ ४७ ॥

---

## दशावतारार्या.

करुणा-शब्द-श्रवणें, सदया उदकांत **मीन** हो जागा ॥
परि मज विषयींच विभो दैवें बहु हीन मी न हो जागा ॥ १ ॥
मंथन-समयीं घेतां, पृष्ठीं श्रमलासि **मंदरा** हीन ।
वचनें दुखविशि माझ्या.' वदतां मी तुजसि मंद राहीं न ॥ २ ॥
दन्तीं धरा धराया, देवा तुज कांहिं बळ न सायास ।
मजसीं मृद हि न वदवे, झालें तुज काय बल नसायास ॥३॥
होतासि जेविं काष्ठीं, श्रवणीं पडतां चि हाक दासाची,
**प्रल्हादा** परि माझी, वाणी करिशील हा कदा साची ॥ ४ ॥
निपट कपट-मति बहु हा, व्हावा तुज उद्धरावयासि बळी ।
निर्बल पडलों म्हणुनी करिशी अमुची सख्या अशी अवळी ॥ ५ ॥
शंका न ज्यास चित्तीं अपुली जननी जिवें चि माराया ।
त्या तुज करुणा कैंची बापा दीना जनासिं तारा या ॥ ६ ॥
पाषाणातें लावुनि केली चरणाचिया नखा [1]रामा ।
मज वरि कोप कराया **दशानना**चा न मी सखा रामा ॥ ७ ॥
**गोकुळ**-वासी दासी, त्यां पाशीं राहसी जसा दास ॥
नीच कसा मी झालों, देवा त्याहुनि तव प्रसादास ॥ ८ ॥
करुणाकर ह्मणवीशी, तुझिया उपमेस काय बोलावा ॥
परि मज विषयीं च **विभो** कठिणीं हृदयांत कां न वोलावा ॥ ९ ॥
ज्या तुजला या काळीं मान सवारी बसूं न दे वाजी ।
या तुज लागिं नवेक्षे कैसा दुर्घट घडेल देवाजी ॥ १० ॥

दशावतार समाप्त.

---

[1] स्त्री ( अहल्या ).

# श्रीनाथ-चरित्र.

आणावें कावडिनें, श्रीगंगेचें भरूनियां पाणी ।
ब्राम्हण जे[1]मनि फिरवी, केली सेवा अजा न बापानीं ॥ १ ॥
ऐशी द्वादश वर्षें, सेवा करि हरि अती अनंदानें ।
दाखविलें नाथाला, जें सुख तें पाहिलें न नंदानें ॥ २ ॥
करि होड जोड बांधुनि, कुल-तारक-नाथगेहिंचें खोड ।
अति गोड कोड कौतुक, भक्ताचें हरिचि ही जुनी खोड॥३॥
" होतों व्रजांतरीं तैं, जाला मद्देह फार लाडकर । "
झिजवीत नाथ-सदनीं, प्रायश्चित्तार्थ काय खोड कर ॥ ४ ॥
श्री एकनाथ संत चि, गुरु-पद-रत वास ज्या प्र[2]तिष्ठान ।
तिष्ठा नमूनि तत्पद, देव घरीं ज्या घरीं प्र[3]तिष्ठा न ॥ ५ ॥
निर्जर-रिपु जर्जर करि, तो गुर्जर-देश-विप्र-कामकरी ।
होऊनि नाथ-सदनीं, गंधजलादिक उदंड काम करी ॥ ६ ॥
शुक सम जेणें केले, विकार-रिपु हे अनाथ संतत सा ।
भव-सिंधु-सेतु तो कां, न ध्यावा एकनाथ संत कसा ॥ ७ ॥
शुक भवनिधि तरले परि, योगों[4]ळाबू धरूनियां पोटीं ।
एकोबा हे तरले भव-प्र[5]स्तर दृढ धरूनियां पोटीं ॥ ८ ॥
नमिला ऊ[6]र्मि-लास्यप्रद शांति-जलधि एकनाथ तो भावें ॥
शोभावें ज्याचें यश विश्वीं ज्या देव-वृंद लोभावे ॥ ९ ॥
विश्वेश्वर अ[7]विमुक्ति विठ्ठल पंढरपुरीं प्रतिष्ठानीं ।
प्रभु एकनाथ वरिला सर्व महित दैवत प्रतिष्ठानीं ॥ १० ॥
श्रीनाथ घरीं पाणी द्वादश वर्षें भरी च कंसारी ।
त्या वंशासि भजावें सार्थक हें मुख्य सौख्य संसारीं ॥ ११ ॥
मुरलि म्हणे " स[8]द्वंशज, मम सम हरिला न अन्य आवडती ।
" परि झाली मजहुनि ही, प्रियकर बहु एकनाथ-कावड ती ॥ १२ ॥
" झाली सुख सावडती श्रीहुनि बहु एकनाथ-कावड ती ।
" आवडती स्कंधा वरि वाहे वाटे कधीं न नावडती ॥ १३ ॥
" स्कंधा वरि मद्वंशज, स्वपदीं प[9]द्मा अयोग्य हें न मनीं ।

---

१ जेवण. २ पैठण. ३ निवास. ४ योगाभ्यास-रूपी भोंपळा. ५ फत्तर-धोंडा, ६ साव स नाचविणारा. (आनंद-देणारा.) ७ काशींत. ८ चांगल्या वंशांतला पक्षी, चांगल्या बांबूची। ९ लक्ष्मी.

"आपुलि दशा कशाला, सांगूं झाल्यें गृहांतरीं धेमनी" ॥ १४ ॥
नेतां **गंगोदक** जरि, पुशिलें तव नाम काय गा गोत ।
सांगे **नाथ**-सदनिंचा **श्रीखंड्या** मी च दास-वर्गांत ॥ १५ ॥
**श्रीधर मुरलीधर** हीं, नामें धरिलीं तये प्रसंगानें ।
देवत्वादि महत्वा, वितरुनि गेला चि विप्र-संगानें ॥ १६ ॥
महदाश्रयसाह्यानें, स्कवा वरि वागवीत भूषण हें ।
त्रैलोक्यांतरिं मिरवी **श्रीखंड्या** पाणक्या विशेषण हें ॥ १७ ॥
बाह्यांतर संकोच त्यजिला सेवेंत **एकनाथा**च्या ।
विध्वंसिताघ-पुंज, श्रवणीं पडतां चि ही कथा ज्याच्या ॥ १८ ॥
**वसुदेव देवकी** तशि **नंद यशोदा** व्रजस्थ जन सगळे ।
सादर **शुकताता**नें वर्णियले भाग्यवान ते अगळे ॥ १९ ॥
सत्य चि दे परगुण जरि मायेनें मोहिलें तयाला हा ।
**श्री नाथा**च्या ठायीं मिथ्या माया-पदार्थ हा नाहीं ॥ २० ॥
**श्री**च्या करा परिस ही मृदुतर भासति **हरी**स कण वाळू ।
खुपति न पदारविंदा नेता पाणी स्वभक्त-कनवाळू ॥ २१ ॥
**श्रीसह** मंचक-शय्या, तुच्छ करुनि दृढिं धरुनि कावडिला ।
शयना न करी रात्रौ काय म्हणावें यया हि आवडिला ॥ २२ ॥
मीं कोण काय करितों ऐसें नुमजे असोनि बुद्धि वर ।
लक्षावधि कावडिनें रांजण भरि हरि जसा च कीं धिवर ॥ २३ ॥
**श्री एकनाथ**-सदनीं **माधवजी** सर्व काम हें करितो ।
स्वकरें चंदन घांसी गंगेचें पाणि कावडी भरितो ॥ २४ ॥
गोपां किति गोपींनां नेदी उदकासि आणिकां वडिलां ।
तो **एकनाथ**-सदनीं गंध उगाळूनि आणि कावडिला ॥ २५ ॥
अद्यापि साण रांझण **नाथ**-द्वारांत असति देवाच्या ।
हातिंचे म्हणुनि कवी **पंतमयूरश** तशि वदे वाचा ॥ २६ ॥

**नाथ-चरित्र** समाप्त

---

१ फुंकणी २ शुक-पिता=व्यास.

# दुर्गास्तव [आर्या]

दुर्गे नाशूत तव श्रीचरण प्रणतकल्पनग[1] मोहा ॥
महिषासुराहुनि अधिक आह्मां भक्तांसि अल्प न गमो हा ॥ १ ॥
ते शुंभनिशुंभ तसे कामक्रोधाख्य ही मर्थी खळ गे ॥
दुर्गे हे तव भजनीं घातक न भले जसे पथीं खळगे ॥ २
होतो काळ हि दास चि कर जोडुनि सर्वकाळ जीवांचा ॥
दुर्गे स्मर त्यांसि ह्मणसि तूं सोडुनि सर्व काळजी वांचा ॥ ३ ॥
दुर्गे देवि प्राकृत जन नित्य स्वैरें वैर जे करिते ॥
अरि ते मग जगदीश्वरि न लवतिल कसे दयासुधा सरिते ॥ ४ ॥
अत्यद्भुत रूप तुझें अत्यद्भुत भक्तवत्सले देणें ॥
अत्यद्भुत यश दुर्गे जालें लोकत्रयास जें लेणें ॥ ५ ॥
महिमा अहि-मानव-सुर गाती दुर्गे तुझा नवल यांचें ॥
काय निगम तव बंदी स्तव न घडे यांस ही न वलैयांचे[3] ॥ ६ ॥
दुर्गे त्वद्वात्सल्यें इतर पितर लाजले तुला कोटी ॥
होवूत तव श्रीमच्चरणयुगीं प्राण हे तुलाकोटी[4] ॥ ७ ॥
दुर्गे भगवति वधिले त्वां महिषप्रमुख खळ न रागानें ॥
कीं सुगति दिली हें यश देतें कालिदलनबळ नरा गानें ॥ ८ ॥
दुर्गे त्वां सर्वार्थप्रद केलें भव्य चरित गायातें ॥
त्वद्दृष्टि पुढें किति खळबळ पळ हि प्रबळ तरि तगाया तें ॥ ९ ॥
त्वां निर्मुनि नांदविलें नांदे त्वदधीन विश्व दुर्गे हें ॥
ज्यांत नसे तव पूजनगुणकीर्तनयजन तीं च दुर्गेहें[6] ॥ १० ॥
श्रमति प्रसू प्रसवतां बहुत चि विटती हि सेवितां बोळ ॥
तूं न तसि तुझा प्रेमें भक्षिति शक्रादि देवि तांबोळ ॥ ११ ॥
करिसी विनता रंका शक्र चि तूं रंक अविनता शक्रा ॥
विश्वस्थितिलय सरला कीं होतां भ्रूलता तुझी वक्रा ॥ १२ ॥
हरिहरविधि सेविति तव गुण सति यश हें न मज जडा कथवे ॥
पथ वेद कथिति सोडिति गति कामांचे कधीं हि या न थवे ॥ १३ ॥
दुर्गति गांजी जीवा जी कोणाचें हि नायिके दुर्गे ॥

---

१ कल्पवृक्ष. २ यथेच्छ. ३ कंकण. ४ नूपुर-तोरड्या. . ६ दुष्टघरें.

तीतें द्रवोनि दीनीं तूं चि ह्मणसि विश्वनायिके दुर्गे ॥ १४ ॥
दुर्गे वळि-पुर-निग्रहदक्षे शक्रादिदेव-राजी जी ॥
ती तुज करीं शचीच्या जोडुनि कर जेंवि देवरा जीजी ॥ १५ ॥
आणिमादिसिद्धि दासी संवाहिति चरण वारिती चवरें ॥
दुर्गे जी दास्य करी पावे यश तोषकारि ती च वरें ॥ १६ ॥
दुर्गे व्यसनसमुद्रीं ताराया तूं चि सादरा जीवां ॥
अगणित तरले स्मरले जे तुझिया भव्य पाद-राजीवा ॥ १७ ॥
दुर्गे अर्जितें समरप्रारंभीं स्तवन तव नरीं कथिलें ॥
दर्शन वरदान दिलें त्वां तरि च प्रबळबळ तसें मथिलें ॥ १८ ॥
दुर्गे तव प्रसादें नारी किति सर्व संपदा भुलती ॥
झुलती सिंधुर अंजिरीं शत्रूंची देखतां उरें उलती ॥ १९ ॥
दुर्गे देवि दयावति वरदे परदेवते सदाधारे ॥
तव यश ह्मणतें सादर मज सेवुनि जीव हो सदा धारे ॥ २० ॥
श्रीदुर्गे कीर्ति तुझी विपुला अमृतप्रपा जगीं आहे ॥
लावितसे भवपांथश्रांतां सर्वां करावया आ हे ॥ २१ ॥
ब्याली श्रुति महिषासुर-शोणितबीजादि-घात-लीला जें ॥
दुर्गे ह्मणतां पररण गुरु ती श्रवणांत घातली लाजे ॥ २२ ॥
दुर्गे परमेश्वरि हें ब्रह्मांड स्वल्प तव महामाया ॥
मायासृष्टिसुते वरि करिसि सदां फार तूं महा माया ॥ २३ ॥
बिज दुर्गति चुकवाया होति क्षम देवि कवि न यत्नांनीं ॥
जेंवि तव गुणस्तोत्रें ह्मणुन चि तुज गाति सविनय ज्ञानीं ॥ २४ ॥
दुर्गे देवि महासति बहुविनयें पसरिला पदर ज्यांहीं ॥
ते जन कृतार्थ केले संसारीं या तुझ्या पदरजांहीं ॥ २५ ॥
दुर्गे दुर्लिपि पुसिसी दाखविसी स्वप्रभाव पुनिवेसी ॥
न शरत्काळींच्या ये त्वत्पादनखप्रभावें पुनिवेसी ॥ २६ ॥
दुर्गे नारायणि तूं सर्वाद्या विष्णुची महाशक्ती ॥
देती प्रणतांसि तुझी सर्वेश्वरि भुक्ति मुक्ति ही भक्ती ॥ २७ ॥
प्रभुवर सुरतरु वेष्टुनि वसतीस तसी च तूं महा व्रततीं ॥
मिरवी तव प्रसादें जी ख्यात पतिव्रता महाव्रत ती ॥ २८ ॥
भजका वांछित देतें तव लोचन सानुकंप देवि वर ॥

---

१ दुर-गे अगे दुरजा असें. २ अष्टमहासिद्धी. ४ अर्जुनाला. ३ विष्णुनें. ५ हत्ती. ६ अगणित. ७ तृप्त व्हा. ८ पाणपोई. ९ शरीराला. निरविणारी. १० वेली.

देवि वररथ हि पाहे रवि हि न ज्या ज्ञानसंपदे विवर ॥ २९ ॥
दुर्गे देवि सुरासुरवीरजयाजय महा समर केले ॥
त्वां व्यास-प्रमुखाखिल-सुकवि निजपदांबुजभ्रमर केले ॥ ३० ॥
शक्रादि विषय न गणिति पात्र तुझ्या जे यशास हे माते ॥
स्पर्शमणि प्राप्त जयां भजतिल दुर्गे कशास हेमातें ॥ ३१ ॥
दुर्गे जड मूक हि जन नमुनि तुझें होय पादपीठ कवी ॥
लीलेनें चि गुरु यशा त्यांसी सांगोनि वाद पी ठकवी ॥ ३२ ॥
स्वचरितरंजितभर्गे गुणगणनाक्षमगणेशवाग्गर्गे ॥
श्रितदत्तचतुर्वर्गे रक्ष मज यशोविभूषितस्वर्गे ॥ ३३ ॥
दुर्गे तूं चरणनतां नव निधि किति ओपिसील नव लक्ष ॥
नवल क्षम तव यश करि विश्व करिल चंद्रकोटि न वलक्ष[1] ॥ ३४ ॥
दुर्गे जसि पावसि तूं तैसी अन्या न देवता पावे ॥
असतो जरि सुसमर्था तरि न महेंद्रादि देव तापावे ॥ ३५ ॥
भवपतित ह्मणति कर दे वरदे परदेवतेसि तुजला जे ॥
दुर्गे उद्धरिसि तयां वत्सळ ह्मणवूनि सर्व तुज लाजे ॥ ३६ ॥
दुर्गे त्वद्दासाच्या पुरुषार्थ पडति बळें गळां ठावें ॥
त्वद्भक्तें करितां जप तप विघ्नकृतच्छळें गळांठावें ॥ ३७ ॥
दुर्गे कां न तव यशोमृतपान ह्मणुनि नको रसिक लाजो ॥
तो अधिक चांद्रिकेचें सेवन पक्षी चकोर सिकला जो ॥ ३८ ॥
दुर्गे भस्म करावें मेरुसमा ही अघा तव ध्यानें ॥
भगवति घातीं स्मरतां तुज पावावा न घात वध्यानें ॥ ३९ ॥
दुर्गे गातां तारिति तव विपदब्धींत वासवा नावें ॥
कविमधुपानीं त्वत्पदपद्म चि सेवूनि वास वानावें ॥ ४० ॥
ग्रंथ श्री दुर्गास्तव आर्या लिहिल्या जपोनि चाळीस ॥
हा मोहास जसा श्रीराम नतमयूरमेघ वाळीस ॥ ४१ ॥

**समाप्त.**

---

१ शुभ्र, धवल.

# ध्रुवचरित्र,

[ साक्या. ]

भक्तिस साधु चरित्रें बळ दे तारिसें अरित्रें ॥ ध्रु० ॥
उत्तानचरण राजा परम ख्यात त्रिजगीं हरिसा ॥
परिसा मंदारासें हि ज्याचे आश्रित म्हणति न परिसा ॥ १ ॥
ज्येष्ठ वधू सुनीति सुनीति च मूर्तिमती ती गुरुचीं ॥
परम प्रिया कनिष्ठा जाया त्याची नामें सुरुची ॥ २ ॥
ज्येष्ठा स्त्री प्रसवली जया तो ध्रुव बाळक निष्ठेचा ॥
उत्तम नामा दुसरा तातप्रिय बाळकनिष्ठेचा ॥ ३ ॥
एका समयीं सुरुचि सुतातें अंकीं घेउनि राजा ॥
लालन करीत बसला होता म्हणत रसा इतरा जा ॥ ४ ॥
सिंहासनीं बसावें आपण असि वांछा ध्रुव वाहे ॥
पाहे भूप उगाचि न घे कीं ती सुरुचि निकट आहे ॥ ५ ॥
परम कठिण ईर्ष्यी गर्ववती ती सुरुचि असें वदली ॥
जेणें साधुसभा बहु कांपे वातें जैशी कदली ॥ ६ ॥
वत्सा दुर्लभ सिंहासन हें इच्छिशी बैसायातें ॥
उचित नसोनि हि आक्रमिसी तूं सहसा कैसा यातें ॥ ७ ॥
राजसुत हि न पदोचित तूं कीं म्यां धरिलासि न पोटीं ॥
होतासि मदात्मज जरि असती पदरीं सुकृतें मोठीं ॥ ८ ॥
अन्य स्त्रीसुत आपण ऐसें बहुधा नेणसि बाळा ॥
इच्छिसी दुर्लभ अर्थ म्हणोन चि नुमजुनि हीना भाळा ॥ ९ ॥
आराधिला अवंध्य मनोरथ व्हाया जो साधूंनीं ॥
सुतपें आराधुनि तो ईश्वर तदनुग्रह साधूनी ॥ १० ॥
ये माझ्या पोटीं सिंहासनकाम मनीं जरि आहे ॥
ऐसें सुरुचि वदे निष्ठुर तें बाळ हि न ध्रुव साहे ॥ ११ ॥
अहिसा खवळुनि माते पाशीं तेथुनि रडतचि गेला ॥
पुसतां सुनीतिला श्रुत रोदनहेतु पुरजनें केला ॥ १२ ॥
दवदहनांत लता तैसी ती बाळा शोकीं पडली ॥
आलिंगुनि बाळातें सोडुनि धैर्यातें बहु रडली ॥ १३ ॥
ती बाळासि ह्मणे बापा हा न परापराध मानीं ॥
कीं द्यावा दोष परा आपण जोडुनि नराधमानीं ॥ १४ ॥

---

१ नाव. २ चाटूनें (वल्ह्यानें.) ३ कल्पवृक्षास. ४ नवऱ्याची. ५ असूया. ६ केळ. ७ बसतोस. ८ नशीब. ९ संपादून. १० दावाग्नीत.

बापा दुःख परा जो देतो जें भोगितसे तो तें ॥
पेरावें बीज जसें त्याचें प्राप्त फळ तसें होतें ॥ १५ ॥
सत्य **सुरुचि** वदली वत्सा कीं माझीं कर्में खोटीं ॥
ज्यां हतभाग्येनें धरिलासी प्रथम अभद्रीं पोटीं ॥ १६ ॥
वाढविलासी मग बारा [ ? ] तूं तंव अहितकरें स्तन्यें ॥
धन्य असें कसें फळ होतें काय ह्मणावें अन्यें ॥ १७ ॥
मी दुर्भगा नव्हे कैसी कीं पुत्रा मातें भार्या ॥
दासी ही ह्मणतां बहु लज्जा वाटे राजा आर्या ॥ १८ ॥
जैसी मी माता तैसी च प्राज्ञ जन मतें **सुरुची** ॥
मजहुनि ही तुजला बहु मान्या कीं ती दयिता गुरुची ॥ १९ ॥
सत्य प्रिय हित वदली मत्सर सोडुनि तूं तें चि करीं ॥
आराधीं **श्रीहरि**तें तो चि श्रेष्ठ वरद सुरनिकरीं[1] ॥ २० ॥
उत्तम जसा तसा भद्रासन इच्छिसि तूं जरि तरि तें ॥
प्रभुपदसारस आराधीं हित बहु भजकाचें करितें ॥ २१ ॥
ब्रह्मेंद्रादि हि झाले प्रभुतें आराधुनि सुपदेश ॥
ऐसा **सुनिति** हि करी त्या **ध्रुव**बाळाला उपदेश ॥ २२ ॥
त्यागी करावया रोमांचित धीरजना भवनातें[2] ॥
ध्रुव बाळ निघे आराधाया नीरजनाभ[3] वनातें ॥ २३ ॥
माय हि न ह्मणे ध्रुवबाळाला बहु ताप न हो राहो ॥
कीं जी शरणागति प्रभुप्रति होय शुभद होरा[4] हो ॥ २४ ॥
संसृतिपारद परम विशारद भेटे श्रीनारद या ॥
शारदयामवतीश[5] चकोरीं तेंवि करी फार दया ॥ २५ ॥
पुसुनि मुनि ह्मणे बा बाळ असें वचन कठिण सोशील ॥
तेंव्हां चि तुझें ऐसें केवळ उग्र हटि नसो शील[6] ॥ २६ ॥
भूतसुहृत मानि यति शरण बुध शांतिस चि सुराभि मानी ॥
बहु दुर्लभ परमेश्वर त्यातें पावे न दुरभिमानी ॥ २७ ॥
ध्रुव बोले सांगसि जें तूं तें सत्य चि सर्व स्वामी ॥
ऐकावें त्वां वदतों कांहीं सज्जन सर्वस्वा मी ॥ २८ ॥
साधुनि वृत्त्युपदेशामृत हें प्यावें कविकटकांहीं ॥
न धरी सुरुचिदुरुक्तिशरशतच्छिद्र-हृदय घट[7] कांहीं ॥ २९ ॥

---

१ देवांच्या समुदायांत. २ घर. ३ विष्णु. ४ सुमुहूर्त. ५ शरच्चंद्र. ६ स्वभाव. ७ घागर.

धर्मांचें तत्व तसें चि न हा जाणे बाल नयाचें ॥
त्वां गुरुवरें करावें संप्रति समुचित लालन याचें ॥ ३० ॥
भगवद्दर्शन दुर्लभ हि सुलभ व्हाया जी काय किली[1] ॥
ती तव हस्तीं आहे ऐसी कीर्ति तुझी आयकिली ॥ ३१ ॥
बहु मानावें तोकें केलें आंगउपायन तातें ॥
बहु काय वदों सदय गुरुवरा सांग उपाय नतातें ॥ ३२ ॥
परम प्रसन्न होऊनि भगवान् ज्ञानदया राशि कवी ॥
भगवध्द्यानार्चनमंत्र सुविधि राजकुमारा शिकवी ॥ ३३ ॥
ध्रुव नमुनि ह्मणे जातों आतां मी बापा यमुनेतें ॥
भगवद्दर्शन झालें चि तुझे दिसतां पाय मुने तें ॥ ३४ ॥
जाऊनि यमुने प्रति तत्तीरीं रम्य मधुवनीं राहे ॥
आरंभी परपुरुषाराधन शिशु हि बहु श्रम साहे ॥ ३५ ॥
मुनि भूपाला भेटे राजा पूजी मुनिला विधिनें ॥
त्यातें कां खिन्न असे पुसिलें त्या ज्ञानदयानिधिनें ॥ ३६ ॥
कथितां वृत्त सविस्तर त्याच्या होय भर विलापाला ॥
पुत्र विरहाविषतरुचा विधिनें विपुल भरविला[2] पाला ॥ ३७ ॥
स्त्रीजित निर्दय निस्त्रप[3] ऐसें स्वमुखें बहु निंदुनि घे ॥
सुतशोकांत न तो नृप जाणों राहुमुखीं इंदु निघे ॥ ३८ ॥
नारद ह्मणे सुतातें शीघ्र चि सिद्धार्थ पहाशील ॥
आहे क्षेमीं देवसुरक्षित तन्मान्य महाशील ॥ ३९ ॥
मुनिवचनें चिंता सोडावी परि घडल्या अनयातें ॥
स्मरुनि अनादरुनि श्रीतें तो नृप चिंती तनयातें ॥ ४० ॥
पांचा वर्षांचा ध्रुव उग्रीं नियमीं चळला न दरें ॥
पहिल्या मासीं तो त्रिदिनांतीं खाय कपित्थें[4] बदरें[5] ॥ ४१ ॥
दुसरे मासीं द्विगुण दिनांतीं तो शीर्णें तृणपर्णें ॥
भक्षुनि चिंती प्रभुसि परिसिला होता जैसा कर्णें ॥ ४२ ॥
तिसरे मासीं त्रिगुण दिनांतीं पी केवळ तोयातें[6] ॥
आशीर्वाद मुनीचा जो दे योगिबळ तो यातें ॥ ४३ ॥
मग तो चवथे मासीं द्वादश दिवसांतीं वातातें ॥
प्राशुनि चित्तीं चिंतीं प्रेमें चतुरानन-तातातें[7] ॥ ४४ ॥

१ किल्ली (युक्ति) २ लावविला. ३ निर्लज्य. ४ कवठ. ५ बोर. ६ पाणी. ७ विष्णु.

पंचम मासीं एक पदें तो स्थाणु[1]सम उभा राहे ॥
ह्रदयीं भगवन्मूर्ती तें चि न तदितर कांहीं पाहे ॥ ४५ ॥
विश्वस्वरूप हरिहुनि आपण भिन्न नसे या भावें ॥
धरिला ध्रुवें समाधि असें चि ध्यान धराया यावें ॥ ४६ ॥
त्याच्या प्राणनिरोधें झाला विश्वप्राणनिरोध ॥
भ्याले लोक सलोकप त्यांशि न लागे कारणशोध ॥ ४७ ॥
व्यसनीं सर्व हि लोकेश शरण गेले लक्ष्मीपतितें ॥
यन्नामें शुचि व्हावें चलन न होतां पक्ष्मीं[2] पतितें ॥ ४८ ॥
ते प्रभुसि ह्मणति आह्मांसि तुझा मात्र असे विश्वास ॥
रक्षीं सदया प्राणनिरोधा पासुनि या विश्वास ॥ ४९ ॥
दे अभय प्रभु सांगे कारण जें कांहीं न कळे तें ॥
जा स्वथ ह्मणे पावविलें सुख हें कां हीनकळेतें ॥ ५० ॥
लोकेश स्वस्थानीं धाडुनि जगदीश्वर मग पोतें ॥
न लवे तोंचि मधुवनीं आला समधिष्ठुनि खगपातें ॥ ५१ ॥
राहे पुढें उभा परमेश्वर परि तो ध्रुव पाहेना ॥
कीं अंतःस्फुरितप्रभुमूर्तिवियोग क्षण साहेना ॥ ५२ ॥
त्या ध्रुवहृद्गतनिजमूर्तीतें तो प्रभुवर आकर्षी ॥
व्हाया प्रमुदित साधु श्रोते सुकवि ध्रुवें[3] नाकर्षी ॥ ५३ ॥
ह्रदयीं भगवन्मूर्ति न दिसतां पावे व्युत्थानातें[4] ॥
ध्रुव गडबडला चुकला शोधी बाळ जसा थानातें ॥ ५४ ॥
नेत्रें उघडीं घाबरला तो ध्रुव सहसा जों पाहे ॥
तों आंत जशी तसि बाहेर प्रभूमूर्ति उभी राहे ॥ ५५ ॥
भी परि सुनीतिसुत दंडा परि पडला करि अंजलि ही ॥
कीं बहु भाग्य ललाटीं श्रीगुरुनारद करकंज[5] लिहीं ॥ ५६ ॥
स्वगुरुगुरूचि शिकवुं ह्मणे जाणों शिकवि न या स्ववन मुनी ॥
स्तुति वांछा धरुनि उगा चि पुढें राहे यास्तव नमुनी ॥ ५७ ॥
ध्रुवमति जाड्य ब्रह्ममयदरें स्पर्शुनि गाल हरी तें ॥
वात्सल्य असें परिसुनि जन हो हर्षुनि गाल हरीतें ॥ ५८ ॥
जागविली निजली होती त्या बाळाची जी वाचा ॥
बोध दिला ऐसा लाजावा ज्या महिमा जीवार्चा ॥ ५९ ॥

---

१ खुंट. २ डोळ्याच्या पापण्या. ३ निश्चयेंकरून. ४ प्रतिरोध. ५ करकमळ.
६ बृहस्पतीचा.

प्रभुनें शिशुसि शिकविलें जैसें निजवर्णन वेदास ॥
वाट सो उच्चारी स्तवनीं शुचि वर्ण नव दास ॥ ६० ॥
बाळ मुखींचीं जरि अव्यक्तें अक्षररूपें साधीं ॥
केवळ अमृत चि होती वत्सल गुरुजनकर्णीं आधीं ॥ ६१ ॥
परमानुग्रह करुनि शिकविलें प्रभुनें भाषण मग तें ॥
किति वर्णावें अमृत कसें हो त्या सूक्ति पुढें तगतें ॥ ६२ ॥
वाजविला वेणु तसा किंवा बहु शिक्षित हा शुकसा ॥
प्रभुला प्रमुदित मग न करील ध्रुव बाळक आशु कसा ॥ ६३ ॥
भगवान् प्रसन्न होउनि बोले दिधलें तुजला पद तें ॥
सर्वपदश्रेष्ठ असें वत्सा विश्व जयातें वदतें ॥ ६४ ॥
ज्यातें प्रदक्षिणा सप्तर्षि ग्रहमंडळ करि वेढी ॥
जे ज्योतिश्चक्री वृषचक्रीं जेवि विराजे मेढी[1] ॥ ६५ ॥
आधीं वत्सा तूं येथुनि जा निजजनकाच्या भवनीं ॥
जातां तपोवनाप्रति देइल तुजला राजा अवनी ॥ ६६ ॥
छत्तिस सहस्र वर्षे करिसिल अवनीच्या अवनातें ॥
नित्य मम भुजा परि करितील प्रकृति तव स्तवनातें ॥ ६७ ॥
उत्तम[2] मरेल मृगयेंत सुरुचि दवदहनांत जळेल ॥
वत्सा हें न टळेल कदापि त्वत्कीर्ति हि न मळेल ॥ ६८ ॥
बहुलक्षिण यज्ञांहीं मातें यजुनि सुखें वससील ॥
मग तूं माझ्या सर्वामर मुनिवंद्य पदीं बससील ॥ ६९ ॥
ऐसा अत्यद्भुत वर देवुनि गुप्त प्रभुवर झाला ॥
मग नातिप्रीत मनें तो ध्रुव तात-पुरी प्रति आला ॥ ७० ॥
कर जोडुनि वार्ताहर[3] सांगे ध्रुव आला हे वार्ता ॥
ती राजाला झाली जैसी वृष्टि सुधेची आर्ता ॥ ७१ ॥
वार्ताहरासि बहु मोलाचा मणिहार दिला भूपें ॥
रत्नाकरें प्रसन्नें रत्नें द्यावीं उदकें कूपें ॥ ७२ ॥
नारद मुनिच्या विश्वासें ती वार्ता साची वाटे ॥
शोक सुतागमनें जेंवि घटजतेजें सागर आटे ॥ ७३ ॥
राजा भार्यापौरामात्यां सह सामोरा गेला ॥
तें स्वनिर्यति[4] वरि तेंवि सुरुचिवरि न ध्रुव तो रागेला ॥ ७४ ॥

---

१ मेट. २ सापत्नभाऊ. ३ हेर. ४ स्वप्रारब्धावर.

गुरुस सुरुचिस सुनितिस वंदुनि भेटुनि निववी अंगें ॥
कीं आलें तापहरत्व श्रीमुनिभगवत्पदसंगें ॥ ७५ ॥
सादर सुरुचि निरखि दिसलें न तदानन सा महिने तें ॥
ध्रुव मनिं ह्मणे अशा पदवीस न दान न साम हि नेतें ॥ ७६ ॥
विरहद होउनि योगद झाला त्या यादा अर्णव तो ॥
भगवज्जनसंगज परमोत्सव सांग कसा वर्णवतो ॥ ७७ ॥
पुरजन न वर्णवे वर्णवतो त्याचा तात कसा हो ॥
ध्रुव ह्मणतां चंद्र चकोर असे कीं घन चातक साहो ॥ ७८ ॥
नेला नगरीं तो ध्रुव गाजत वाजत मिरवित तातें ॥
माथां तत्कीर्तिं वितानें तें त्रिभुवन मिरवि ततें तें ॥ ७९ ॥
वर्णिति अत्यद्भुत भाग्य सदा सुरपन्नग राजाचें ॥
अमृताचे वर्षतसें निववी यश तन्नगरा ज्याचें ॥ ८० ॥
योग्य दशा पुत्राची राज्या त्यागा आपुलि पाहे ॥
मग भगवद्भक्तीं सत्पात्रीं राजा स्वश्री वाहे ॥ ८१ ॥
कृतकृत्य चि नृप झाला रत भगवंतीं सुत पाहूनीं ॥
गेलातपोवना कीं अधिक न अंतीं सुतपाहूनि ॥ ८२ ॥
वाटेल कसें परम पद प्रद तप कविला सामान्य ॥
हें टाकुनि होय जडाचि नेणुनि सपैक विलासा मान्य ॥ ८३ ॥
पाववि ताताच्या प्रकृतीचें मानस जेंवि सराला ॥
तें विसरविं हंसकुळाकरवी मानस जेंवि सराला ॥ ८४ ॥
तो उत्तम मृगयेतें गेला तेथें वधिला यक्षें ॥
व्हायाचें तें होय चि कोणें भावि चुकाविलें दक्षें ॥ ८५ ॥
गेहीं सुतशोक परम दुःसह ह्मणूनि सुरुचि ती गहनीं ॥
शिरली सद्यः स्वतनुवियोगें व्हाया सुख दवदहनीं ॥ ८६ ॥
क्षोभे ध्रुव बहु ज्याच्या चक्रध्वनिनें अरि तापावे ॥
त्या चढुनि रथीं यक्षपुरा षढहितमदहारिता पावे ॥ ८७ ॥
आले त्रयोदशायुत धावुनि गुह्यक राक्षस यक्ष ॥
तींतीं बाणांनीं एकैका विंधी ध्रुव रणदक्ष ॥ ८८ ॥
एकें एकें सा सा ऐसे त्यांहीं शर बहु लक्ष ॥
पाठविले तेव्हां ध्रुव झाला दवदहन चि ते कक्ष ॥ ८९ ॥
प्रकट करिति बहु दुःसह जाणुनि यातें ते परसाया ॥

---

१ जळचर. २ समुद्र. ३ छत. ४ विस्तृत. ५ गोडी रहित. ६ चतुर. ७ गवत.

नारायणास्त्र योजी जें ध्रुव भ्याल्या त्या परसा या ॥ ९० ॥
गुह्यकपुर मर्दुनि ध्रुवानें मर्दाया अलकेला[1] ॥
त्या राक्षसगुह्यकयक्षांच्या पति वरि ही चल केला ॥ ९१ ॥
तेव्हां त्याचा त्यासि पितामह मनु भेटुनिया वारी ॥
तत्क्षोभा शमवि सदुक्त दवा घनमुक्त जसें वारी ॥ ९२ ॥
एकाच्या अपराधें केला बहुतांचा घात कसा ॥
तूं प्रभुपदनखचंद्रामृतरस पितां कीं चातकसा ॥ ९३ ॥
न क्षोभाया करि तो अंजलि ईश्वरबंधु प्रति मी ॥
त्या मेघें वर्षावें या ममवंशीं अधुप्रतिमी[2] ॥ ९४ ॥
हरिभिन्न असे ज्याला कोणी जाता न वदे हर तो ॥
न क्षोभो तद्भक्तजनाच्या भजनीं तव देह रतो ॥ ९५ ॥
निजपौत्रातें स्वायंभुव मनु सांगुनि ऐसें गेला ॥
ध्रुवभूपें चापन्यास करुनि अंजळि हरासि केला ॥ ९६ ॥
शिवसख हि तया दर्शन नेउनि पाहुनि हर्षे डोले ॥
लोलेक्षण तद्रूपीं होउन बहु मधुर असें बोले ॥ ९७ ॥
साधो प्रसन्न झालों वदला जें स्वायंभूमनु तें ॥
जनुतें सफळ कराया केलें मान्य तुवां सुजनंनुतें[3] ॥ ९८ ॥
यक्षानिमित्त चि उत्तमनिधनीं यक्षवधीं तूं हि तसा ॥
काळाचें तें करणें राजा तो चि अहितेंसाहि[4] तसा ॥ ९९ ॥
बा ध्रुवराजा मजपासीं त्या अभिमत वर मागावा ॥
हरिभक्ता तव महिमा व्हाया शुचिता परमा गावा ॥ १०० ॥
ध्रुव हें मागे मज शंभुभजकमुकुटमणे वर दे हा ॥
सन्मतिस ह्मणो स्वपदीं जेंवि श्रीस ह्मणे देव रहा ॥ १०१ ॥
तो धनप तथास्तु असें वदला मग अंतर्हित झाला ॥
या परिस पाहुनि नय सुयश ध्रुव निजनगरा आला ॥ १०२ ॥
षटत्रिंशद्वर्षसहस्र स्व प्रकृतींस[5] सुख प्राज्य ॥
देउनि मग उत्कल नामक निज तनुजातें दे राज्य ॥ १०३ ॥
श्रीबदरिकाश्रमीं ध्रुव जाऊनि हरितें चिंतित राहे ॥
नंदसुनंदप्रभुचे पार्षद[6] आले त्यातें पाहे ॥ १०४ ॥

---

१ कुबेरपुरी. २ आड विहीर ३ सुजनांनीं स्तविलेला. ४ दुःख सहन करणारा. ५ प्रजेला. ६ दूत.

त्यांहीं दिव्यविमानीं वाहुनि विष्णुपदा प्रति नेला ॥
ऐसा राजा ध्रुव जगदीशें उत्तमपदभाक् केला ॥ १०५ ॥
देवर्षि ह्मणे झाला बाळ हि धन्य सुनीतिसुत पहा ॥
प्रभु न ह्मणों दे दीना शिकउनि शीघ्र सुनीति सुतप हा ॥ १०६ ॥
राम दयाघन भक्तमयूरप्रियहित सर्व हि करितो ॥
दर्शन देउनि जें बहु दुःसह तें तापत्रय हरितो ॥ १०७ ॥

समाप्त.

---

# प्रश्नोत्तर-रत्न-माला.

श्रीशंकरभगवत्पदरचित प्रश्नोत्तराख्य मणिमाला ।
प्राकृत शब्दगुणीं[1] मी रचितों बुध हो परंतु प्रतिपाला ॥ १ ॥
कंठींच असों द्या हो हे मणिमाला अलभ्य परि साची ।
प्रेमें सुलभचि रसिकां कीर्ति इणें जिंकिली च परिसाची ॥ २ ॥
प्रश्नोत्तरमणिमाला हे केवळ होय हो सुधाधारा ।
खळ राहुलाचि न जिरे त्यांस जिरे भजति जे बुधाधारा[3] ॥ ३ ॥
**श्रीशंकरें** दिली हे भजकां रसिकांसि कामदा कपिला[4] ।
**श्रीरामें** जसि गाया प्याया निज कीर्ति त्या महाकपिलों[5] ॥ ४ ॥
कोण न शोभे विमल प्रश्नोत्तररत्नमालिकाधारी ।
दृष्टीं दृष्टार्थांचा स्वसाधनीं जो सुजाण संसारीं ॥ ५ ॥
सच्छिष्य बोधरीती करुनि **श्रीशंकरें** दयानिधिनें ।
ग्राह्याग्राह्य पदार्थ स्पष्ट चि केले असे अशा विधिनें[7] । ६ ॥
स्वामी काय ग्राह्य स्वमुखें सांगा करा दया पूर्ण ।
शिष्या स्वीकारावें गुरुवचन प्रणतिपूर्व[8] अति तूर्ण[9] ॥ ७ ॥
काय त्यागावें तें स्वामी सांगा अजाणत्यास मज ॥
शिष्या अकार्य सारें टाकावें हें मनीं बरें समज ॥ ८ ॥
स्वामी कोण गुरु हे सांगा होईन संशयोन्मुक्त ॥
शिष्या जो तत्त्वज्ञ प्राणिहिता कारणें सदोद्युक्त ॥ ९ ॥

---

१ हाय. २ शब्दरूपी दोऱ्यांत. ३ ज्ञान्यांचा आश्रय. ४ कामधेनु. ५ माहातिला. ६ दृष्टादृष्टार्थांच्या साधनीं जो तो चि कुशल संसारी असाही पाठ आहे. ७ रीतीनें. ८ नमस्कारपूर्वक. ९ सत्वर.

सत्वर काय करावें स्वामी तुमचा चि बोल मज वेद ॥
वत्सा शीघ्र करावा ज्ञानें संसार-संतति-च्छेद ॥ १० ॥
स्वामी मोक्ष तरूचें बीज कथावें तुम्हीं मुखोदक जें ॥
शिष्या साधो आयिक अति शुद्ध ज्ञान आणि सत्क्रिय जें ॥ ११ ॥
[10]पांथेय काय मार्गीं सांगा तुमचेंचि वाक्य बहु [11]पथ्य ॥
शिष्या धर्म सिदोरी फार बरी हें चि जाण तूं तथ्य ॥ १२ ॥
[12]शिष्याज्ञानतमोर्का गुरुराया कोण शुद्ध या लोकीं ॥
शिष्या ज्याचें मानस निर्मळ लोकत्रयांत [13]शुचि तो कीं ॥ १३ ॥
पंडित कोण स्वामी [14]छात्रें जनाच्या अनंतसुखहेतो[15] ॥
शिष्या सद्बुद्धिसुधाकलशा जेथें विवेक राहे तो ॥ १४ ॥
हाळाहळा परिस ही दारुण विष कोणतें आजि स्वामी ॥
अपमानिलें गुरूतें वत्सा तें गरळ जाणतों आम्हीं ॥ १५ ॥
स्वामी कारुण्यनिधे संसारीं सार काय सांगावें ॥
गुरुराया चिंतामणिचरणा ऐसें तुला न कां गावें ॥ १६ ॥
वारंवार हुडकितां हें चि मनुष्यांत सार आढळलें ॥
शिष्या जें जन्म क्षण न त्यजुनी स्वपरहितपदा* ढळलें ॥ १७ ॥
मद्या परि मोहप्रद काय स्वामी दया करूनि सदा ॥
शिष्या पुत्रकलत्रीं[16] सुरेहुनि स्नेह दे अपार मदा ॥ १८ ॥
तस्कर कोण स्वामी वत्सा जे विषय दस्युं[17] ते जाण ॥
कोण भयाची वल्ली शिष्या तृष्णा चि रे तुझी आण ॥ १९ ॥
स्वामी वैरी कोण [18]छात्रा तो शत्रु जो [19]अनुद्योग ॥
ज्या [20]उद्योगाभावें पावति विलयासि सर्व सुखभोग ॥ २० ॥
स्वामी कोणापासुनि भय लोकीं फार पावती प्राणी ॥
शिष्या मरणापासुनि भय पावति सर्व ही खरी वाणी ॥ २१ ॥
जात्यंधाहूनि अधिक कोण कथा जी गुरो तुह्मी ज्ञानी ॥
शिष्या अंधापरिस हि कामी बहु अंध हें मनीं मानीं ॥ २२ ॥
स्वामी शूर ह्मणावें कोणाला हें मला तुम्ही बोधा ॥
शिष्या स्त्रीनेत्रशरें पावेना जो व्यथेसि तो योधा ॥ २३ ॥
स्वामी कर्णांजलिनीं सेवाया काय हो [21]सुधे सारें ॥

---

१० शिदोरी. ११ हितकारक. १२ शिष्याचें अज्ञान हाच अंध:कार त्याचा नाश करण्याविषयीं सूर्य. १३ शुद्ध. १४ शिष्य. १५ कारण. * पथा असाही पाठ आहे. १६ स्त्री. १७ चोर. १८ शिष्य. १९ आळस. २० उद्योगाचा अभाव. २१ अमृतासारखें.

शिष्या पीयूषाहुनि[22] फार सदुपदेशभाषणें सारें[23] ॥ २४ ॥
गुरुतेचें मूळ मला स्वामी कांहीं च ठाउकें नाहीं ॥
शिष्या न मागणें हें गौरवें[24]-बीज स्वमानसीं पाहीं ॥ २५ ॥
देवा हें ही सांगा त्रैलोक्यामाजि काय हो गहन ॥
बापा चरित स्त्रीचें नेणाति विधि-शक्र-गुरू-शशी-दहन ॥ २६ ॥
चतुर ह्मणावें कवणा स्वामी सांगा पुरो स्पृहा[25] माजी ॥
बारे स्त्रीचरितें जो न खंडिला तो कृती[26] जनामाजी ॥२७ ॥
दारिद्र्य कोण सांगा बहु पुसतों कीं तुह्मां नसे रोष ॥
शिष्या बरवें पुशिलें दरिद्रपण तें चि जो असंतोष ॥ २८ ॥
लघुता कोण स्वामी पुसतों हें संशयाब्धिसेतूतें ॥
यांचा लघुत्व कारण हें कैसें ठाउकें नसे तूतें ॥ २९ ॥
जीवित तें कोण वदा भक्त भ्रमराचिया सदरविंदा[27] ॥
वत्सा तें चि जिणें रे ज्याची जाली नसे जगीं निंदा ॥ ३० ॥
ज्याड्य कशास ह्मणावें हें सांगाजी मला सुदासास ॥
शिष्या जो कौशल्य प्राप्तीसाठीं नसे चि अभ्यास ॥३१॥
जागर कोण स्वामी पुरवाया दास काम[28] हा भागा ॥
जागर मुख्य विवेक चि पुस तूं भीतोसि कां महाभागा ॥ ३२ ॥
स्वामी हें हि कळों द्या निद्रा ती कोणती कसी आहे ॥
शिष्या जे जंतूला मोहुनियां काय मूढता राहे ॥ ३३ ॥
कमळदळस्थजळकणा सम चंचल कोण तो पदार्थ गुरो ॥
बा गा यौवन आयू द्रव्य चपळ बोध हा मनांत उरो ॥३४॥
शारद[29]शशिकिरणासम आल्हादक कोण सांग गुरुवर्या ॥
शिष्या ऐसे सज्जन ज्यांची हरिती त्रितापँ[30] परिचर्या[31] ॥ ३५ ॥
स्वामी कोण सुदुःसह सर्वां नरकांपरीस ही नरक ॥
परवशता चि निरय[32] हें जाणुनि तूं संग सोडुनी सरक ॥३६॥
गुरुजी मज उपदेशा जगत्रयीं कोणतें अखंड सुख ॥
शिष्या कळेल तुज तें विषयीं होशील जधवां विमुख ॥३७॥
स्वामी सत्यँ* पदार्थ ज्ञानसुतें करूनि मीं असें रहित ॥

---

२२ अमृताहून. २३ सार. २४ मोठेपणाचें बीज २५ इच्छा. २६ चतुर. २७उत्तम कमळा. २८ इच्छा. २९ शरदतूंतील. ३० आधिदैविक, अध्यात्मिक, व आधिभौतिक हे तीन ताप; उदाहरणें:—वीज आंगावर पडणे आधिदैविक, रोग शरीरीं होणें हा आध्यात्मिक; व पाण्यांत बुडणें हा आधिभौतिक. ३१ सेवा. ३२ नरक. * 'साध्य' पाठांतर.

शिष्या तरि तूं कररे तनुवचनमनें करूनि भूतहित ॥३८॥
स्वामी जे जे प्राणी त्यांचें प्रिय वस्तु मुख्य तें काय ॥
शिष्या पंच प्राण चि लोकांचा प्रिय पदार्थ समुदाय ॥३९॥
स्वामी हें ही सांगा दानांत श्लाघ्य कोणतें दान ॥
साधो जें फल–वांच्छा–वर्जित तें दान ह्मणति सज्ञान ॥४०॥
मित्र कवण हें सांगा संशय न तुह्मां विना दुजा छेदी ॥
तो मित्र होय बापा पापाचारांत जो बुडों नेदी ॥ ४१ ॥
कोण अलंकार गुरो सांगाया योग्य तूं चि होशील ॥
शिष्या जरि हें पुससी तरि भूषण मुख्य आपुलें शील[३३] ॥४२॥
गुरुराया वाचेचें मंडण जें तें असो मला विदित ॥
वाग्भूषण सत्य चि हें शिष्या जाणूनि नित्य हो मुदित[३४] ॥४३॥
ज्याचें अनर्थ फळ तें काय श्रीगुरुवरें निवेदावें ॥
शिष्या विषया पासुनि न निवारित चित्त तें असो ठावें ॥४४॥
स्वामी गुरो दयाब्धे सर्वांला कोणती सदा सुखदा ॥
शिष्या सज्जनमैत्री जीणें स्तवितात सर्व लोक पदा ॥४५॥
सर्वां ही व्यसनांच्या[३५] नाशीं देवा समर्थ कोण बरें ॥
अखिल–व्यसन–ध्वांत[३६]–द्युमणि[३७] त्याग चि मनांत जाण खरें ॥४६॥
*स्वामी अंध ह्मणावा कोण छात्रा अकार्यरत होतो ॥
कोण बधिर गुरुवर्या हित वचनातें न आयके जो तो ॥ ४७ ॥
स्वामी मूक–पदार्थ–श्रवणीं श्रवणासि लागली भूक ॥
वत्सा समयीं नेणे प्रिय बोलायासि तो खरा मूक ॥ ४८ ॥
गुरुजी मरण कवण हें सांगुनि मजला निवृत्ति द्या विपुला ॥
बाळा मुर्खत्व चि रे निधन[३८] महा तें नसो नसो रिपुला ॥ ४९ ॥
स्वामी मोल जयाला नाहीं लोकीं असें असे काय ॥
शिष्या समयीं दिधलें अमूल्य चुंबी त्रृणासि नरराय[३९] ॥ ५० ॥
शल्य असे कोण गुरो मरणा पर्यंत ज्या मुळें ताप ॥
तें शल्य नेत्र झांकुनि केलें असतें सुगुप्त जें पाप ॥ ५१ ॥
यत्न करावा कोठें हें सांगाजी तुह्मी महा ज्ञानी ॥
शिष्या यत्न करावा विद्याभ्यासीं सदौषधीं दानीं ॥ ५२ ।

---

३३ स्वभाव. ३४ आनंदित. ३५ संकट. ३६ अंधार. ३७ सूर्य. ३८ मरण. ३९ राजा. * "अंध ह्मणावें कोणा अविचारें जो अकार्यरत होतो" पाठांतर.

अवहेळणा करावी कोठें तीचीं वदा गुरो स्थानें ॥
खळ परभार्या परधन निंदावीं विहित सत्यदा स्थानें ॥ ५३ ॥
रात्रि दिवस चिंतावी कोण गुरुवरा स्वदासविश्रमदा ॥
कुशलें संसाराची ध्यावी निःसारता चि न प्रमदा[40] ॥ ५४ ॥
कोण प्रिया करावी स्वामी करुणामृत द्रवद्धृदया[41] ॥
वत्सा प्रिया करावी सन्मैत्री दक्षता तसीच दया ॥ ५५ ॥
कंठींहि प्राण जरी आले तरि हीं अहो गुरो कवणा ॥
आत्मार्पण न करावें हें सांगा जी मला पदप्रवणा[42] ॥ ५६ ॥
शिष्या मुर्ख विषादाहंकार कृतघ्न हे असे चवघे ॥
आत्मा यांसि न द्यावा या उपदेशामृतींच तूं चव घे ॥ ५७ ॥
पूज्य हि कोण स्वामी हें उपदेशा कृपा करूनि मला ॥
तो पूज्य वृत्त ज्याचें निर्मळ निष्काम तो प्रशांत भला ॥ ५८ ॥
कोण ह्मणावा अधम स्वामी सांगा करीन मी श्रवण ॥
जो सद्वृत्तापासुनि चळला त्याहूनि नीच तो कवण ॥ ५९ ॥
स्वामी पुरुषें कवणें न करुनि आयास जिंकिलें त्रिजगा ॥
सत्यक्षमागुणाढ्यें जग जिंकिलें तूं हि त्या गुणा भजगा ॥ ६० ॥
देवानीं ही कवणा [43]करिजे तें सुविनयें सदा नमना ॥
ज्याचें क्षण हि विसंबे भूतदया भगवती[44] पदा न मन ॥ ६१ ॥
स्वामी कोणा पासुनि धरिजे उद्वेग बुद्धिमंतानें ॥
संसारवना पासुनि व्हावें उद्विग्न चित्त संतानें ॥ ६२ ॥
गुरुराया वश होतो कवणाला प्राणि गण जसा दास ॥
शिष्या सत्यप्रिय जो नित्य वदे त्या चि वहु विनीतांस[45] ॥ ६३ ॥
नित्य रहावें कोठें सांगा जी शिष्य मानसा धार्या[46] ॥
न्यायपथीं वस वत्सा दृष्टादृष्टार्थलाभ साधाया ॥ ६४ ॥
स्वामी काय असे हो चपळेच्या[47] विलसितां[48] परी चपळ ॥
खळसंगति [49]युवतिजन हि चपळ तयाला विलोकितां च पळ ॥६५॥
कंप नसे कुळशैला[50] कळिकाळीं ही तसा नसे कवणा ॥
शिष्या सत्पुरुष चि ते कलि भीतो ज्यांचिया गुणश्रवणा ॥ ६६ ॥

---

४० स्त्री. ४१. करुणारूपि आमृतानें द्रवत आहे हृदय ज्याचें. ४२ नम्र. ४३ केलें जातें. ४४ भूतदया-रूपी देवी. ४५ नम्र. ४६ तृप्त होण्या करितां. ४७ विजेच्या. ४८ लवणें. ४९ स्त्रीजन. ५० मुख्य पर्वत.

ज्ञाननिधे स्वामी मी शौच्य ह्मणावें कशास तें नेणें ॥
शिष्या तें कार्पण्यक्लेश चि लोकद्वयांत हा जेणें ॥ ६७ ॥
विभवीं काय श्लाघ्य स्वामी हें वांछितों कळायास ॥
हें हि वदा उपदेश प्रणतीं जो तो न निष्फळायास ॥ ६८ ॥
श्लाघ्य उदारपण चि बहुधनवंतास चि न अल्प धनिकां हीं ॥
तैसें चि सहिष्णुत्व[५१] हि उचित समर्था तसें न जानें कांहीं ॥ ६९ ॥
लोकीं चिंतामणिपरि दुर्लभ तें काय सांगिजे आतां ॥
कथिन चतुर्भद्र[५२] तुला या अमृता पसरिला चि कीं आ तां[५३] ॥७०॥
अज्ञानतिमिर[५४]भास्कर ह्मणति चतुर्भद्र ज्यासि तें व्यक्त ॥
सांगोनियां करावा ज्ञानामृततृप्त आपुला भक्त ॥ ७१ ॥
प्रियभाषण सह दान ज्ञान हि गतगर्व वित्तसत्त्यागें[५५] ॥
शौर्य क्षमासहित या पावे चहुं मंगला महाभागें[५६] ॥ ७२ ॥
असि हे कंठीं ज्यांच्या प्रश्नोतर–रत्नमालिका विमळा ॥
इतर विभूषणरहित हि ते संत वसंत[५७] बुधसभादि[५८] मळीं[५९] ॥७३॥
प्रश्नोतरमणिमाळा ज्याच्या कंठीं पडेल शोभल ॥
त्याच्या गळां पडेल प्रेमें सत्कीर्ति मुक्ति लोभेल ॥ ७४ ॥
प्रश्नोत्तरमणिमाळा रचिली **श्रीशंकरें** स्वयें अशि कीं ॥
कंठीं धरूनि व्हावें सत्कृतिला पात्र सज्जनीं रसिकीं ॥ ७५ ॥
जो धरिल प्रश्नोतर सन्मौक्तिकरत्नमालिका सारा ॥
भजतील सर्व त्याला हंस जसे **मानसाख्य** कांसारा[६०] ॥ ७६ ॥
ज्वरितासि शर्करा जसि कटु होय खळांसि सुरस ही कविता ॥
शिष्टां पद्मां सुख दे दुष्टा घूंकांसि ताप दे सविता ॥ ७७ ॥
संत **मयुरेश्वरकृतकवनीं** नवनीत कोमळी गोडी ॥
घेतील कीं तयाची करणें परगुणविवृद्धि ही जोडी ॥ ७८ ॥
या आर्या आर्यांनीं गाव्या घ्याव्या जशा सुधाधारा ॥
कीं अर्पिल्या **मयुरें श्रीरामा राघवा** बुधाधारा ॥ ७९ ॥

---

**समाप्त.**

---

५१ सहनशीलपणा. ५२ चार प्रकारचें कल्याण. ५३ त्वां. ५४ अंधकार. ५५ सत्कर्मी खर्च. ५६ दैववान. ५७ वसंत ऋतु. ५८ ज्ञानिसमूह. ५९ बाग. ६० सरोवर. ६१ घुबड.

# श्रीगंगा-राजापुरस्थ-प्रतिनिधि-तीर्थ-कीर्तनं-

श्रीमद्भार्गवराम प्रभुवर शर[1]पात[2]जातसंत्रासें[3] ॥
सिंधु[4] सेरे सह्यासें[5] त्यजुनि ग्रह जेंवि लब्धमंत्रास[6] ॥ १ ॥
तें इषुपातक्षेत्रीं[7] स्थल जें सोडूनि जाय अर्णव[8] तो ॥
त्या सुरतीर्थमयाचा महिमा लघुकविस काय वर्णवतो ॥ २ ॥
त्या सुक्षेत्रीं ह्मणती वृद्ध परमभक्त शूद्र तो भावें ॥
चिंती गंगेसि सुधारसपानें कां [नरें] न लोभावें ॥ ३ ॥
हा गंगे तुज अंतीं अंतरलों कीं असें दरिद्र वदे ॥
तो धांवा मातेच्या हृदया शिशुचा तयापरि द्रव दे ॥ ४ ॥
आली धांवुनि केलें जें गंगाद्वार तत्समान खळें[9] ॥
पावावा या सुरभी[10]पासुनि सुजनें न वत्समान[11] खळें[12] ॥ ५ ॥
प्रकटे हरिचरणसुता[13] उन्मूळनि[14] क्षणांत मेढीतें[15] ॥
स्वतरंगींहीं[16] दावी माय भुजांहीं शिशूसि वेढीतें ॥ ६ ॥
श्रीगंगा मूर्तिमती होउनि कर्पूरजन्म कदलीतें ॥
हृदयांत लाजवाया ऐका सुरसिक तयासि वदली तें ॥ ७ ॥
बहु कारुण्यें द्रवल्यें देवूं बा काय वासरा[17] मागें ॥
बा माझा या हृदयीं केला न क्षणहि वास रामागें[18] ॥ ८ ॥
नमुनि भगवतीस ह्मणे हा माते श्यां बहु श्रमविलीस ॥
जे तूं श्रीजगदीशें निजशुद्ध जटांत कीं रमविलीस ॥ ९ ॥
या चरणदर्शनाहुनि मागावें अधिक तें दिसे न मला ॥
तुज तरि याहुनि बहुमत वर माते सांग कोण तो गमला ॥ १० ॥
तरि मावल्ये करावी धांवुनियां कलियुगीं अशीच दया ॥
हा दास दीन नेणे मागोंसें ह्मणसि बोल हूं वद या ॥ ११ ॥

---

१ शर = बाण. २ पात = पतन. ३ जातसंत्रास = प्राप्त झाली आहे भीति ज्यास असा ( हें सिंधूचें विशेषण ). ४ सिंधु = समुद्र. ५ सह्य = पर्वत- विशेष. ६ लब्धमंत्र = मंत्री, पंचाक्षरी. ७ इषुपातक्षेत्र = कोंकण ( बाण पडून झालेलें क्षेत्र ). ८ अर्णव = समुद्र ९ धान्याची मळणी काढण्याचें ठिकाण. १० सुरभी = कामधेनु. ११ वत्समान = बाळकास प्राप्त होणारा मान. १२ खळें = दुष्टानें. १३ हरिचरणसुता = गंगा. १४ उन्मूळन = उपटून. १५ मेढ = खांब ( ज्यास बैल बांधितात ). १६ तरंग = लाट. १७ वासरा = हे वत्सा १८ रामाग = परशुरामाचा अपराध.

ते वत्सला[19] ह्मणे वा भूतदया सुगुण हा न सामान्य ॥
हे नसती तरि कैसा होतासि यशें जगीं असा मान्य ॥१२॥
स्नानें करितिल माघापासुनि वैशाखमास पावेतों ॥
वा तें हें चातकशिशु आ करि जों मेघ त्यास पावे तों ॥१३॥
परि तुजसम जे दुर्बळ भोळे सद्भक्त तेचि तरतील ॥
स्पर्श न करितिल बालिश[20] पाणी पाणी ह्मणोनि मरतील ॥१४॥
तुजकारितां प्रतिवर्षीं येइन जड निंदितील सोसीन ॥
मी शरण आलियांतें प्रक्षाळुनि सर्व पंक[21] पोसीन ॥१५॥
ऐसें वदली गंगा क्षीरें[22] न्हाणून वत्स तर्पून ॥
वाणीतें प्रभु रक्षिति अधनीं कन्येसि जेंवि अर्पून ॥१६॥
येथे अद्यापि श्रीगंगा राजापुराचिया जवळ ॥
कोंकण करिती विखरुनि शुद्धयशश्चंद्रचंद्रिका[23] धवल[24]॥१७॥
मज एकवेळ घडलें सत्संगतिनें अलभ्य मज्जन हो ॥
रचिलें सुतीर्थ कीर्तन हें फळ त्याचेंचि होय सज्जन हो ॥१८॥
या तीर्थकीर्तनाचा पडला त्या तीर्थ–कीर्तनें विसर ॥
नग[25] लेउनि विसरावा मुक्तांचा सुगुणपूर्ण जेंवि सर[26] ॥१९॥
गंगा ह्मणे अहा या माझी कैसी सुकीर्ति धवळील ॥
मद्रूप विसरला जें केवळ कारुण्य मूर्त जवळील ॥२०॥
हे लागलीच चिंता गंगेला ह्मणुनि मज दिलें स्मरण ॥
कीं गंगेचेंचि सुहृद सर्व जनोत्धार सद्व्रताचरण ॥ २१ ॥
कडियेवरि नच घेतां स्तन्यामृत[27] काय बाळ कवळील ॥
स्तवन असोचि गुरुदया नसतां जड पशुहि नीट न वळील ॥ २२ ॥
जें गंगेसि वहावें गंगाप्रभुच्या पदींच तें वाहें ॥
वाहे अन्या जैशा तैसी ऐशाहि रीतिनें वाहे ॥ २३ ॥
कीर्तनभक्ति इलुसि[28] मज दाखउनि मनास लाविला चटका ॥
हा लाभ परि निजसुखानुभवावाचूनि ताविला चटका ॥ २४ ॥
गंगेला जायाला मज हतभाग्या न शक्ति न उपाय ॥
स्तुति सूचविली प्रभुचे देति प्रणतासि भाक्ति नउ पाय ॥ २५ ॥

---

१९ वत्सला = दयाळु. २० बालिश = मूर्ख. २१ पंक = चिखल (पाप). २२ क्षीर = उदक. २३ चंद्रिका = चांदणें. २४ धवल = शुभ्र. २५ नग = दागिना. २६ सर = हार. २७ स्तन्य = दुग्ध २८ इलुसि = थोडीशी.

भक्तमयूरमनोनट नटतो सामान्य कीं बरा नटतो ॥
श्रीराम चि हें जाणें उरला व्यापूनि सर्व ही घट तो ॥ २६ ॥

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं श्रीमद्गंगाप्रतिनिधितीर्थकीर्तनंसंपूर्णम्.

## ॥ सन्मनोरथराजिः ॥

श्रीरामासि भजावें भक्तें म्यां जेंवि तेंवि संतांतें ॥
राजासि उपासावें तैसें चि जनें प्रधानपंतांतें[1] ॥ १ ॥
व्रतिबाळांचे कल्पुनि विधुचें रविचें जसें चिरागमन ॥
धरि उत्छव दिवसाचें बहु धरू माझें तसें चि राग[2] मन ॥ २ ॥
कर्णयुगांत भरावें हरिहरिजनें[3] यश: प्रचुर[4] म्यां तें ॥
जैसा दोंदीं[5] कोंदीं गुर्जरदेश विप्र चुरम्यातें[6] ॥ ३ ॥
हा हो सुतृप्त राघवनामें सारें चि जेंवि तेलिंगा ॥
शीला[7] जपो बहु जपाति जैसे अय्याख्य साधु ते लिंगा ॥ ४ ॥
म्यां लावावी हरिहरकीर्ति सुवीरें जसी सडक डावी ॥
गोवर्धनीं[8] घनघटा[9] तसि मजवरि अरिचमू[10] कडकडावी ॥ ५ ॥
मतिची पडो हरिगुणीं पतिकंठीं मिठि जसी सुदारांची ॥
नुचारू परमर्मीं जीभ नकारा जसी उदारांची ॥ ६ ॥
सत्संगतीं असावा प्रेमा ग्रीष्मीं जसा असे व्यजनीं[11] ॥
रम्य हि अभक्त हो मज मधुपा चंपक तसा असेव्य-जनीं ॥ ७ ॥
स्त्रीस जसें न त्यजवे केलें उच्छिष्ट माजरें दुभतें ॥
सद्गुजन दूषिलें जरि दुष्टें मद्बुद्धि न त्यजू शुभ तें ॥ ८ ॥
काव्य करावें म्यां न च वचकावें दूषिती परि लघूंस ॥
न करावें काय सदन कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस ॥ ९ ॥
हा सांजलि हो भजनीं योग्य मखीं युक्त कर सदर्भ कसा ॥
मद्ग्रंथ गुरुप्रिय हो अप्रौढ हि उक्तकर सदर्भकसा ॥ १० ॥

१ प्रधानपंत = पेशवा. २ राग = प्रीति. ३ हरिजन = भगवद्भक्त. ४ प्रचुर = पुष्कळ. ५ दोंद = पोट. ६ चुरमा = पक्वान्न विशेष. ७ शील = स्वभाव. ८ गोवर्धन = पर्वत विशेष. ९ घन-घटा = मेघ-समूह. १० अरि-चमू = शत्रु-सेना. ११ व्यजन = पंखा.

मातेतें त्यजुनि पळ हि जाय न भलतीकडे जसें बाळ ॥
सत्संगति सोडुनि मन न च जाउ तसें चि घेउ हें आळ ॥ ११ ॥
गुरुभक्ति ते स्वमाता भाऊ सत्संग विषय तो बाऊ ॥
भावूं[12] माझें मानसबाळ श्रीरामकीर्तितें खाऊ ॥ १२ ॥
कांपावें मन कुजनीं वृद्धपणीं कांपतें जसें शिर तें ॥
सत्संगीं च शिरावें बाळ जनन्यंचळीं[13] जसें शिरतें ॥ १३ ॥
मद्ग्रंथ असावा बुधजनबहुमत जेंवि शंभुवृषभांड[14] ॥
अर्थें पूर्ण असो मम वच सत्पूजार्थ जेंवि वृषभांड ॥ १४ ॥
पूज्य असो मतिस तसा जन जैसा जड अशक्त जामाता[15] ॥
सद्दृष्टि या जनीं अवलोकुनि लाजोत साधु ज्या माता ॥ १५ ॥
मज आपणांत मिळवुनि ध्यावें सुविशुद्धयशसुधानें तें ॥
तोयासि[16] आत्मदानें जे अमृतभुगाननीं[17][18] दुधा नेतें ॥ १६ ॥
नच सोडावें नारायणनामानें कदापि हें वदन ॥
मेल्या ही लोभाच्या चित्तें सोडूं नये जसें सदन ॥ १७ ॥
सद्रुजन न त्यजावें बहुकष्टीं संकटीं जसें वतन ॥
सूक्त[19] करावें तैसें जैसें तपकीर–तत्परें जतन ॥ १८ ॥
भाग्यवतीला दुर्बळकन्यासी तत्समेसि हे उक्ति ॥
व्हावी परिपाल्या कीं घेती शिशुची हि जाणते युक्ति ॥१९॥
पांचांलिकाविवाहीं जैसें पिशुनीं तसें असो रुसणें ॥
समयींआपन्नजनीं द्यावें सुप्रिय जनीं जसें उसणें ॥ २० ॥
मन्मति सदुक्तिस भुलो त्या मुरलीला जसी च ती राधा ॥
प्रभु मुनिसुतासि[21] न ह्मणे काय अधिष्ठुनि पयोधितीरा धा[22] ॥२१॥
प्रेमें नवीं नवीं तीं माझ्या रसनेसि[23] सुकविकुलगीतें ॥
गीतें यावीं येती माहेरीं जेंवि बहुत मुलगीतें ॥२२॥
हो सत्कर प्रसादें कुब्जा तैसी मदीय मति सरळी ॥
खळकृतनिंदा सुखदा हो श्यालकृता[24] जसी च मतिस रळी[25] ॥२३॥
ज्या उक्तीतें समयीं अर्थी जाणोनि दान साधु करी ॥

---

१२ भावू = मानू. १३ जनन्यंचळ = आईच्या लुगड्याचा पदर. १४ शंभुवृषभांड = नंदीचा अंड. १५ जामाता = जांवाई. १६ तोय = उदक. १७ अमृतभुक् = देव. १८ आनन = मुख. १९ सूक्त = तपकिर ठेवण्या करितां कोंकणांत केळीचें वाळलेलें सोप घेतात तें. २० पांचालिका = भावली. २१ मुनिसुत = उपमन्यु. २२ धा = तृप्त हो. २३ रसना = जीभ. २४ शालकृता = मेव्हण्यानें केलेली. २५ रळी = थट्टा.

गोडीनें सेवावी ती म्यां क्षुधितें जशी च माधुकरी ॥२४॥
साध्वीशीनें न टळो द्यावा हा सुमतिनें जसा पदर ॥
सेवावें रसिकें वच याचें श्री राघवें जसें बदरें[26] ॥२५॥
सद्दृष्टि आदरू मज वत्सा जसि गाय आदरि द्रवुनी ॥
हा आर्त ह्मणो न पदीं हेमंतीं जेंवि हा दरिद्र उनीं ॥ २६ ॥
बोलूनि डोलवू हा डोलवितो जेंवि रसिक शिर कीरें[27] ॥
मग चिंता काय जडा वाटो याची सदैव किरकीर ॥ २७ ॥
म्यां न च द्यावें ह्मणतां धरूं वच मोडुनि नकोटरनगातें ॥
खग कनकपंजरा बहु मानी सोडुनि न कोटरें[28]नगें[29]तें ॥ २८ ॥
साध्वीला जें कांहीं कांत प्रिय तें चि कार्य होय जनीं ॥
स्वाहाधवा[30]नभिमतीं[31] आग्रह काशास आर्य हो यजनीं[32] ॥ २९ ॥
निश्चय करूनि न मागे तिळ ही ठेवी पतिव्रता चरण ॥
भगवद्भजनीं माझी तैसी च करू मति व्रताचरण ॥ ३० ॥
लागाव्या गोड तशा मत्हृदया ज्या परें दिल्या गाळी[33] ॥
बाळें देतां हर्षें नसतां अठवूनि अश्रुतें गाळी ॥ ३१ ॥
हरिकीर्तिगीति जी म्यां दैवा व्हावें कुरंगें[34] रे तींतें[35] ॥
लोळावा हा सत्पदधूळींत जसा तुरंग[36] रेतींत ॥ ३२ ॥
बहु साधूक्त रूचावें लोभिप्रभुला जसें चहाडाचें ॥
मज अन्यकलत्राचें[37] स्पर्श न विटवू जसें च हाडाचें ॥ ३३ ॥
वत्स जसा स्तन्यातें[38] सादर पीतो धरूनि आम्यातें[39] ॥
जें साधुमुखोद्गत यश तैसें प्यावें करूनि आ म्यां तें ॥ ३४ ॥
हरिकीर्तनीं शिरावें धनिकगृहीं जेंवि जपुनि चोरानें ॥
न उठावें बहुकार्यें बहु भारें जेंवि कुचर ढोरानें ॥ ३५ ॥
संसारदुःख विसरवु सत्पद्धति मतिस जेंवि काय घडी ॥
वरमायेसि विवाहीं विसरवि चवरी गुलाल पायघडी ॥ ३६ ॥
निजदेहगेहभान प्रभुभक्तांच्या कथीं हि मेळांत ॥
मज कीर्तनीं नसावें जैसें शिरतां मुलांस खेळांत ॥ ३७ ॥
म्यां कीर्तना टपावें मार्जारें सर्वदा जसें दुग्धा ॥

---

२६ बदर=बोर. २७ कीर=पोपट. २८ कोटर=घरटें. २९ नग=वृक्ष. ३० स्वाहाधव=स्वाहेचा पति=अग्नि. ३१ अनभिमत=अप्रिय. ३२ यजन=हवन. ३३ गाळी=शिव्या. ३४ कुरंग=हरिण. ३५ तींत=गीतींत. ३६ तुरंग=घोडा. ३७ कलत्र=स्त्री. ३८ स्तन्य=दुग्ध. ३९ आमा=स्तन

मन्मति विनयादिगुणां वाहो प्रेमें नगा जसी मुग्धा[40] ॥ ३८ ॥
प्रिय हरिजन हो जैसा आला माहेरचा वहायाला ॥
स्त्रीजन जसा विवाहा जावें म्यां सज्जना पहायाला ॥ ३९ ॥
हृदय हरिजना कांता मतिनें उघडें करूनि ओपावें ॥
सद्विरहीं बहु देहीं गोपीचित्तें तसें चि कोपावें ॥ ४० ॥
हो नियति[41] बहु मता मम मतिस कुलवतीस जसि सदा श्वश्रू[42] ॥
स्पर्शावें गुरुजनपद शिरें जसें गर्विजनकरें स्मश्रू[43] ॥ ४१ ॥
स्वप्रियलब्धरसकथन करिती स्वसखींजनीं जसी वाला ॥
प्रेमळ जनीं कथू निजसुख रसनीं[44] स्तवुनि आपल्या भालीं[45] ॥ ४२ ॥
कीर्तन असो मतिस बहु मत जैसें स्त्रीस हळदकुंकु तरी ॥
स्वामि पुढें करु रसना चाटु पदीं पडुनि जेंवि कुं कुतरी ॥ ४३ ॥
साधूक्ति बहु मता मज हो धनिक जनास जेंवि यादवही ॥
कीं ज्यासि सुधा स्पर्शे त्या न विषाचा हि दे भया दवै[46] ही ॥ ४४ ॥
उलटा आंत स्पष्ट व्यवहार दहांत दाखवी सुलटा ॥
मन्मति हो तैसी परपुरुषासक्तीं[47] सदा जसी कुलटा[48] ॥ ४५ ॥
जैसें अंधें वृद्धें नसतां गतिहेतु हस्तकीं यष्टी ॥
तैसें व्हावें सज्जनसंगति वांचुनि उदंड म्यां कष्टी ॥ ४६ ॥
आवड असो कथेची जसि वाळा फाल्गुनांत पुनवेची ॥
संतीं वेंचावें धन तापसजन तप जसें *तपुनि वेची ॥ ४७ ॥
माणिकनकभूषणाहूनि सुबहुमता स्त्रीजना गळसरीती ॥
हो तासि सदुक्ति या हा दावू एक चि जसा पळस रीती ॥ ४८ ॥
रंगावें सद्वचनें मतिनें चूर्णें[49] जसें चि हळदीनें ॥
भजन न सोडावें म्यां जेंवि कधीं कर्षकें[50] न हळ[51] दीनें[52] ॥ ४९ ॥
द्यावा कर्मारंभीं नामातें जेंवि मान वढिलातें ॥
जनमत चि करावें जें स्त्रीमत करि जेंवि मानव ढिलीं[53] तें ॥ ५० ॥
हळु हळु झडो अहंता सज्जमनीं वार्धकीं जशी शेंडी ॥
[54]केंडू विवेक विषया निस्पृह जन वस्तुतें जसा केंडी ॥ ५१ ॥

---

४० मुग्धा = स्त्री. ४१ नियति = नशीब. ४२ श्वश्रू = सासू. ४३ स्मश्रू = मिशी. ४४ रसना = जीभ. ४५ भाळ = नशीब. ४६ दव = अग्नि. ४७ पर पुरुष = परकी पुरुष-पक्षीं पुरुषोत्तम ( विष्णु ). ४८ कुलटा = वेश्या. ४९ चूर्ण = चुना. ५० कर्षक = शेतकरी. ५१ हळ = नांगर. ५२ दीन = गरीब. ५३ ढिला = वाईल बुध्या. ५४ केंडू = टाकू.

* 'जपुनि ' पाठांतर.

दुःसंगा आधीं च स्वांतें सत्संनिधान सेवावें ॥
जेंवि अशुचिते पूर्वीं श्रवणीं यज्ञोपवीत ठेवावें ॥ ५२ ॥
हरिहरिजनाश्रय वरा होतें बहु तदितराश्रयें भंड ॥
लागुनि असमर्थाच्या कांसेला वस्त्र पावतें दंड ॥ ५३ ॥
ज्यांत न हरिहरिजनयश ऐसें जें काय कीर्तनीं गान ॥
तें अलवण भोजनसें न च सेउत आर्तबाळसे कान ॥ ५४ ॥
किर्तनरुचि तसि वाढो खाजविल्याचीं जशी च कंडू कीं ॥
वाढे विषयरति विटीं[५५] गर्जनरुचि जेंवि वृष्टि मंडूकीं ॥ ५५ ॥
वरि संकोच असावा आंत बहुत कृष्णकिर्तनीं काम ॥
गुरु जन समक्ष पतिचें घेतां आर्याग्रहें जसें नाम ॥ ५६ ॥
माझी श्रुति[५६] साधूच्या सर्व हि सेवूनि साजु[५७] कवनींचें ॥
सेवुनि शेळी साजे जेंवि शिळें आणि साजुक[५८] वनींचें ॥ ५७ ॥
एक तरि साधुचा म्यां पळ भारि तरि काय पाय दाबावा ॥
ज्या काळ ह्मणे केला आपण रक्षाई काय दाबावा ॥ ५८ ॥
कवि ह्मणति यद्रजोर्थ स्वविभव सव्योमयान[५९] वेंचावा ॥
यद्ग्राहकें ह्मणावें तक्षकसे कोटि या नवे चावा ॥ ५९ ॥
जी सत्पदभुक्त कुसुममाळा भव्यासिभाल दोरीती ॥
सुजनेतर याहुनियां भिन्न जरि वदेल तरि वदो रीती ॥ ६० ॥
साधुपदासि जपावें बहु देवाला जपे जसा गुरव ॥
मज संनिदेशीं[६०] भुलवू भुलवितसे जेंवि रंकुलीं[६१] सुरवें[६२] ॥ ६१ ॥
हरिजन ह्मणोत नातें जडलें आंगासि जेंवि आवाळूं ॥
कां वा आह्मी खोटें ह्मणुनि तुज करावयास आ वाळूं ॥ ६२ ॥
प्रभुसि[६३] जसि पिशाचांची मानो साधुसि तसी च मत्सेवा ॥
सद्दृष्टि ह्मणेल चि ये काढूं दे देवतटिनि[६४] वत्से वा ॥ ६३ ॥
सत्पदरजाहुनि अधिक चिंतामणि सुरद्रुम न गमावे ॥
सन्नतमतिमहिलागीं नव नव सेवाधिकार न गमावे ॥ ६४ ॥
पावावें हरिजनपदसंगा व्हायासि पारद स्वा मीं ॥
पुसतां मग कथिल चि वा हा तव गुरुबंधु नारदस्वामी ॥ ६५ ॥
सद्भजनें पोसावें प्रेमचि सघनें जसें स्वतुंद रसें ॥

---

५५ विट = जार. ५६ श्रुति = कान. ५७ साजु = साजो = शोभो. ५८ साजुक = ताजें. ५९ व्योमयान = विमान. ६० संनिदेश = साधूंची आज्ञा. ६१ रंकु = हरिण. ६२ सुरव = सुस्वर. ६३ प्रभु = शिव. ६४ देवतटिनी = गंगा.

वाटावें इतराचें कामिनना परकलत्र सुंदरसें ॥६६॥
चंद्रींच्या अमृतातें सेवायाचें सदारें[65] शिकला जो ॥
मज तो चकोर पाहुनि सत्कीर्तिरता सदा रसिक लाजो ॥६७॥
श्रीमद्विष्णुजनांहीं केला स्वक्रोध कामलय ज्यांहीं ॥
हा दास न निववावा तरि मग ते नाग कां मलयजांहीं ॥६८॥
ताप शमाया अलिनीं[67] नलिनीं[68] ग्यां सत्पदीं च लोळावें ॥
पोळावें चातकमन न दवीं जलदें द्रवोनि ओळावें ॥ ६९ ॥
हा कवि मयूर हर्षें सद्घन पाहोनि सरस नाचावा ॥
अति विस्मयें ह्मणावें खळ हो निंदूनि न रसना चावा ॥७०॥
सन्मत मनोरथांची सुमणींची जेंवि तेंवि हे राजि[69] ॥
रामसुत मयूर ह्मणे सर्व रसिक हो द्रवोनि हेरा जी ॥७१॥
॥ इति श्रीमन्मयूरविरचिता सन्मनोरथराजिः संपूर्णा. ॥

---

समाप्त.

## श्री विठ्ठल-प्रणिधिः[1]

वंदेहं विठ्ठलं दातुं शं[2] देहं धृतवान्प्रभुः ॥
संदेहं हंतुमुदितो मंदेहं[3] योऽ शुमानिवं ॥१॥
प्रल्हादा न स्पर्शे पीडा स्मरणें असें भले वदले ॥
गदें[5] लेश हि न उरावा भक्तीं कीं न च तुझी कृपा वदले ॥२॥
वा परम वत्सला तूं उद्धरिता जाहलासि आर्तातें ॥
जें दे तुला गजाची प्रिय पुत्राची पिया न वार्ता तें ॥३॥
त्वां अत्युग्र व्यसनीं[6] लीलेनें अंबरीष वांचविला ॥
पुण्य प्राज्यें[7] यशांचा ध्रुव शिशु रक्षुनि राशि सांचविला ॥४॥
पुरवुनि अनेक वस्त्रें गौरविली द्रौपदी जळजनाभें[8] ॥
त्वां अद्भुत प्रतापें दिधलें बहु त्या महाखळजना भें ॥५॥
आत्मकथा भक्तकथा तुज रुचती व्यास शुक असें कथिती ॥

---

६५ सदार = सस्त्रीक. ६६ लय = नाश. ६७ अलि = भ्रमर. ६८ नलिन = कमळ. ६९ राजि = माळ.

१. प्रणिधि = प्रार्थना, हेर. २ शं = सुख. ३ मंदेह = दैत्य विशेष. ४ अंशुमान् = सूर्य. ५ गद = रोग. ६ व्यसन = संकट. ७ प्राज्य = पुष्कळ, ८ जळजनाभ = विष्णु.

नाना पापें नाना दुःखें नाना महाभयें मथितीं ॥६॥
कीर्तन तुज आवडतें साच कथिति पुंडरीक वरदाः हें ॥
कीर्तनकर जनतापें तुज व्हावें दुःख नेंवि करदाहें ॥७॥
वांचविला जो पावे मरण उपजतांचि करुनि आ बाळ ॥
तूं माय दीन शिशुची होऊं न देसी कदापि आबाळ ॥८॥
कीर्तन नित्य प्रेमें करितां छाया स्वयें करिसि पदरें ॥
नाम निरत शबरीचीं त्वां उच्छिष्टें हि भक्षिलीं बदरें[९] ॥९॥
नेंवि तुकोबा जैसा एकोबा नामदेव तत्सम हा ॥
त्वत्कीर्तनरत विठ्ठल पावावा जेंवि सुरभिवत्स महीं[१०] ॥१०॥
कां भक्तवत्सला बा सांप्रत झालासि तूं उदासीन ॥
प्रभुची सेवालेशें झाली काय प्रिया कुदासी[११] न ॥११॥
प्रभु असुनि अशक्त तसा कां हें न च होय उचित महिम्यातें ॥
सुचवूं नये यशस्कर जें कार्य अवश्य शुचितम हि म्यां तें ॥१२॥
स्वप्रियभक्त असा कां होऊं दिधला जगांत बोभाट ॥
रक्षावा चि व्यसनीं प्रभुनें तो प्राकृतें हि जो भाट[१२] ॥१३॥
सदय कसा कुरवाळी आर्ता तें काय काम हें भारी ॥
विश्वेशा ये ह्मणतां वधिला धावूनि कां महेभारी[१३] ॥१४॥
पूर्वी जे उद्धरिले आले ते दास काय कामास ॥
गाइल तुज कीं देइल वपु कापुनि लोकनाथका मास ॥१५॥
दीनातें उद्धरितां मिळतें यश शुद्ध काय हें थोडें ॥
यश जोडाया केलीं मानधनाहीं [१४]कलेवरें रोडें ॥१६॥
कुरवाळिल्या विना मृत गोपाळ कुमार उठविले क्षिप्र ॥
अवलोकुनि च तसा त्वां उठवावा हा कृपाकरें विप्र ॥१७॥
दासा हा मी आलों ऐसी देऊनि हांक हांकेला ॥
द्यावा धीर दयाळा कष्टीं सेवक नहाक[१५] हा केला ॥१८॥
बा विठ्ठला तुजविणें परिपाळक कोण सोयरा जीवा ॥
जीवन तूं शोभा तव यश जेंवि द्युमणि[१६] तोयें[१७] राजीवां[१८] ॥ १९ ॥
आत्मा गुणें[१९] देह फणी[२०] स्पष्ट असा बोध यासि अथवा हो ॥

---

९ बदर = बोर. १० मह = आनंद. ११ कुदासी = कुब्जा. १२ भाट = स्तुतिपाठक. १३ महेभारि = महा—इभ—अरि = गजेंद्रशत्रु. (नक्र). १४ कलेवर = शरीर. १५ नहाक = व्यर्थ. १६ द्युमणि = सूर्य. १७ तोय = उदक. १८ राजीव = कमल. १९ गुण = दोर. २० फणी = सर्प.

अभयवर विठ्ठला दे धडक तुझा भक्तिराजपथ वाहो ॥ २० ॥
आबाळवृद्धलोक त्वन्महिम्यानें तसा चि रिझवावा ॥
जेणें कीर्तनवर्षे श्रोत्यांचा तापदाव विझवावा ॥ २१ ॥
विषशिशुनागें रोगें तव जन न करूनि आ बरा खावा ॥
स्वप्रभुताभक्तीचा उत्साह धरूनि आव राखावा ॥ २२ ॥
निजपापकर्म फळ जें ह्मणसिल भोगूनि सर्व सारावें ॥
अघ पूतना अजामिळ बक यांतें तरि कधीं न तारावें ॥ २३ ॥
चित्रपटांत लिहविल्या योनि चतुरशीति[21] लक्ष ज्या उक्त ॥
त्यावरि शिष्य फिरविला गुरुनें केला भवव्यथामुक्त ॥ २४ ॥
विश्वगुरु पांडुरंगा तूं तारीं करूनियां असें कांहीं ॥
किमपि अशक्य तुला वा प्रभुवर्या भक्तवत्सला नाहीं ॥ २५ ॥
रंगांत प्रेमभरें ज्याचे त्वत्कीर्तिनीं असु[22] खपावे ॥
तो विठ्ठलप्रभो तव भक्त कसें वा असें असुख पावे ॥ २६ ॥
प्रेमें कीर्तन करितां नित्य घडवा कसा महादोष ॥
तोष प्रभुला व्हावा त्यांत उठावा न सर्वथा रोष ॥ २७ ॥
देवा तूं चि समर्थ स्व जनाची कीर्तिलाज राखाया ॥
त्वद्दासाहुनि अन्या लागे व्यसनांत काजरा खाया ॥ २८ ॥
ज्याच्या हृदयीं वससी होऊं देसी तया कसी पीडा ॥
व्रीडों[23] बहुत मज जडा होती पक्षी हि बहु जपे नीडों[24] ॥ २९ ॥
देवा जनकाचें मन दुःखित देखुनि मुलास कळकळतें ॥
रदवदल किति करिल जड करुणा सिंधो तुला सकळ कळतें ॥३०॥
गुरु वदले संकीर्तन मखकर्म[25] चि कलियुगांत भद्र[26] सिका ॥
होता तसा असावा याचा अभिमान तुज चि सद्रसिका ॥ ३१ ॥
संकीर्तनयज्ञ घडो येथें जन्मांतरीं हि हा काम ॥
पुरवावा त्वां याचा त्याचा ही जो जपे तुझें नाम ॥३२॥
भक्तोपेक्षा केली ऐसें ह्मणतील तुज हि लोक दहा ॥
वारावा चि उपद्रव दासाचा सर्वसाधुशोकद हा ॥ ३३ ॥
व्याकुळ कीर्तनविरहें त्वद्विरहें करूनि वा जसा नंद ॥
करिव कथा लोक सकळ हो हो प्रभु तूं हि आज सानंद ॥ ३४ ॥
प्रभुच्या पडुनि गळां हे केली रदवदल विचकिले दंत ॥

---

२१ चतुरशीति = चवऱ्यांयशी. २२ असु = प्राण. २३ व्रीडा = लाज. २४ नीड = घरटें. २५ मख = यज्ञ. २६ भद्र = कल्याणप्रद.

साहित्य मयुराचें प्रभु जवळिं करोत सर्व ही संत ॥ ३५ ॥
म्यां ब्रह्मण्य प्रभुवर परमार्त ब्राह्मणार्थ भावानें ॥
पसरुनि पदर विनविला जाच्या तरतात पतित नावानें ॥ ३६ ॥
या रदवदल-श्रवणें करिल चि विठ्ठल दया असें वाटे ॥
कीं दीनबंधु हा श्रुत होतां दीनोक्त गहिंवरें दाटे ॥ ३७ ॥
बहुधा इतुके दिवस प्रभुवर आहे समाधिसुखमग्न ॥
हें जरि नव्हे तरि न कां बोले पाहे बसे असे नग्न ॥ ३८ ॥
सोडिल समाधि विठ्ठल भक्तांगीं पाणिपद्मैं फिरवील ॥
जिरवील क्षणमात्रें दुःख यश त्रिभुवनांत मिरवील ॥३९॥
शमवील सर्व पीडा स्वप्न तसा भुक्त भोग गमवील ॥
भ्रमवील न भक्तांतें स्वपदाब्जीं स्वजनभृंग रमवील ॥४०॥
निजपदभजनीं याचा निश्चय निश्चळ सदा कसा आहे ॥
पाहे मार्येिं पीडा दाखवुनि स्वजनसत्तमा या हे ॥४१॥
प्रभु न जडोक्तीस विटे वृद्ध जनक जेंवि बाळगाळीस ॥
भक्त मयूरें लिहिल्या आर्या सज्जनसुखार्थ चाळीस ॥४१॥
इति श्रीरामात्मजमयूरपंडितकृतः श्री विठ्ठलप्राणिधिःसंपूर्णः

समाप्त.

## ॥ अथ श्रीकाशीस्तुतिः ॥

श्रीकाशि श्रीकंठ प्रभुची तूं वल्लभा पुरीवर हा ॥
त्वन्महिमा ऐसी च श्रितसर्वप्रिय सदा पुरीव रहा ॥१॥
तूं देवि राजधानी शंभुप्रभुची श्रुतिस्तुता आद्या ॥
तव आश्रित जन न ह्मणति देवा तें अमृत करुनिया आ द्या ॥२॥
आनंदवन ह्मणति तुज अविमुक्त महाश्मशान कविराजे ॥
त्रिजगीं त्वत्कीर्ति पुढें सति कोणाची हि कीर्ति न विराजे ॥३॥
काशी काशी काशी ऐसें देशांतरीं हि जो वदतो ॥
त्वद्वासें पावावें जें तें चि व्यक्त पावतो पद तो ॥४॥
ब्रह्मांडीं जीं क्षेत्रें जीं तीर्थें दैवतें हि जीं असती ॥
सर्व त्वदाश्रय करुनि वाराणसि सर्वदा सुखें वसती ॥५॥

---

२७. पाणिपद्म = हस्तकमल. २८ माया = खोटी.

राशी तूं सर्वांची पुण्याची निर्मलातुलाराशी ॥
हा शीतकर[1] म्हणे जित होउनि तर सद्यशःकणें काशी ॥६॥
वाराणसि सर्वां ही जीवांतें तूं चि मुक्तिदा साची ॥
म्हणती वेदव्यास हि देवि न हे या चि उक्ति दासाची ॥७॥
वाराणसि तुजमध्यें ज्या जीवें काय काय सोडावा ॥
तेणें अति दुर्लभ जो तो मोक्ष सुखें करूनि जोडावा ॥८॥
काशि महाविद्या तूं अन्यत्र तसी नसे तुझी वसती ॥
हे पावते भवार्णव[2] लंघायास्तव न सेतु जीव सती ॥९॥
जेव्हां चि मरण करितो रुद्रप्रभु तारकोपदेश तदा ॥
घटिकेंत मुक्त जीव त्रिदशांला[3] फार कोप दे शतदा ॥१०॥
पावावें तुज मध्यें भगवति साक्षाच्छिवत्व कुणपानें[4] ॥
बहु वेड लाविलें कविहृदया या तव अगाध[5] गुणपानें[6] ॥११॥
यागातें योगातें भजुनि गति वशीं[7] च पावला जीव ॥
त्यातें वाराणसि तूं भलत्यांसि अशी च पाव लाजीव ॥१२॥
मरण अमंगळ परि तें कारण तुज माजि मंगळ गतीचें ॥
कार्शिमृति[8] कसी हि घडो केवळ कैवल्यें[9] अंग लगतीचें[10] ॥ १३ ॥
जीं तीर्थें जीं क्षेत्रें तीं सेवाया मुमुक्षुला[11] उचितें ॥
कीं पाठविति तुज कडे पावाया मुक्ति शेवटीं शुचितें ॥ १४ ॥
तुज मोक्षसत्र[12] ह्मणती व्यासादि उगें चि काय काशि कवी ॥
अतिसदये संग तुझा हें देणें विश्वनायका शिकवी ॥ १५ ॥
भवदाश्रित नाकींच्या[13] त्या आठविती न विप्र भोगांतें ॥
न तुजविना इतुकें तव पतितें ह्मणते कवि प्रभो गांत ॥ १६ ॥
तुज मधिल शव शिव चि हें सति परम रहस्य[14] नारदें सुघडें ॥
सांगुनि मरुत्त राजा केलें जग उद्धरावया उघडें ॥ १७ ॥
वाराणसि ऐकति जे जन तुझिया मोक्षदायका शीलीं[15] ॥
ते साधनसंपन्न हि ह्मणती पावन काय काशीला ॥ १८ ॥
आश्रित चि तुझा काशि त्रैलोक्यामाजि धन्य सुखवासी ॥
विधिलोकस्थ[16] हि हें सुख वांछुनि विश्वेश्वरासि मुख वासी ॥ १९ ॥

---

१ शीतकर = चंद्र. २ भवार्णव = भवसागर. ३ त्रिदश = देव. ४ कुणप = प्रेत. ५ अगाध = खोल. ६ पान = प्राशन. ७ वशी = इंद्रियें दमन करणारा. ८ मृत = मरण. ९ कैवल्य = मोक्ष. १० लगत = स्नेह. ११ मुमुक्षु = मोक्षेच्छु. १२ सत्र = यज्ञ. १३ नाक = मोक्ष. १४ रहस्य = गुह्य. १५ शील = स्वभाव. १६ विधिलोक = ब्रह्मलोक.

सुरकार्यार्थ घटज[17]मुनि वाराणसि पावला तुझ्या विरहा ॥
ज्ञानी हि स्मरुनि तुतें अनुदिन ह्मणतो ह्मणेल ही चिर हा[18] ॥२०॥
श्रीकाशि तुझ्या ठायीं यात्रोत्सव सर्वदा नवे शत गे ॥
भवें[19] न तुज पुढें जैसा नृहरि पुढें सर्व दानवेश[20] तगे ॥ २१ ॥
भुक्ति मिळे मुक्ति मिळे दोनी हि सुखें चि काशि साधुनि घे ॥
मधुमधुनि पिपीलिके[21]सा तुज मधुनि कधीं स्वयें न साधु निघे ॥२२॥
"का" ह्मणतां काळ पळे जो सर्वांचा हि सर्व मद नाशी ॥
अति दुर्लभ शील मिळे येतां त्वन्नाम वर्ण[22] वदना "शी" ॥ २३ ॥
सेवन करूनि यत्नें वांछितसे जेंवि साधु जन काशी ॥
परमेश्वरा स्वधर्मे भजुनि तुला तेंवि साधु जनकाशी ॥ २४ ॥
श्रीकाशि श्रीगंगा भेटुनि तुज निकट सविनया वाहे ॥
ह्मणति अशांतपणें मज रागा कोणी हि कवि न यावा हे ॥ २५ ॥
हा रामसुत मयूर हि पावावा मरण काशि तव अंकीं[23] ॥
त्वां प्रभुतें विनवुनि बहु उद्धरिले जे निमग्न भवपंकीं[24] ॥ २६ ॥

इति श्रीरामनंदनमयूरविरचिता श्रीकाशीप्रार्थना समाप्ता.

---

समाप्त.

## ॥ अथ श्रीमद्भगवद्गीतास्तुत्यार्याः ॥

श्रीमद्भगवद्गीते वर्णावें आदरें तुला[1] नमुनी ॥
सर्वोपनिषत्सारे माते तुज पाहती तुला न मुनी ॥ १ ॥
तुज सोडुनि तरि तरते अन्याचे जीव जरि उपासक ते ॥
त्यजुनि अमृत लंघाया मृतितें सेवूनि जरि तुपा सकते ॥ २॥
भगवद्गीते ज्ञात्या अधिका तुजहुनि सुधा[2]नदी नाहीं ॥
त्वद्भक्ता तापांहीं भय जेंवि दिजे बुधा न दीनां[3]हीं ॥ ३ ॥
तुज भजत्या संसारीं वसतां गतिलाभ होय जो गीते ॥
त्यासि न पात्र भ्रमति श्रमति व्यर्थ चि तपोनि जोगी ते ॥ ४ ॥

---

१७ घटज = अगस्त्य. १८ हा = हायहाय. १९ भव = संसार. २० दानवेश = दैत्येंद्र = हिरण्यकशिपु. २१ पिपीलिक = मुंगळा. २२ वर्ण = अक्षर. २३ अंक = मांडी. २४ पंक = चिखल.

१ तुला = उपमा. २ सुधा = अमृत. ३ दीन = गरीब.

सेवुनि सुधा हि तापति कामक्रोधार्त सतत रोगी ते ॥
संसारीं प्राशुनि तुज हा रामतनूज नत तरो गीते ॥ ५ ॥
जय मोह[4]महिषमर्दिनि जय भगवति गेय[5]गुरुगुणे गीते ॥
जरि झाली नसतीस प्रकटा तूं यति हि बहु भवा भीते॥ ६ ॥
तव †सचिव द्वैपा[6]यन शंकर मधु[7]सूदनादि योगी ते ॥
ज्ञा[8]नेश प्रतिनिधि हे वर्णन तुझिया मनास यो गीते ॥ ७ ॥
युवराज तुझा वा[9]मन वाम न मानू तुवांचि मानावें ॥
गुरु लघु कविनीं प्रभुते नित्य यथामति विशंक वानावें ॥ ८ ॥
भगवति शुचिकीर्ति तुझी सुमति ज्ञानेश्वरी[10] प्रिया आ[11]ली ॥
झाली विश्वख्याता हे कार्या बहु जनांचिया आली ॥ ९ ॥
नेती तिकडे जासी भगवति बहु मत इचें[12] तुला उक्त ॥
ज्ञानेश्वरीस जन जे अनुसरले त्यांसि करिसि तूं मुक्त ॥१० ॥
श्रीमद्भगवद्गीते नियमें जो करितसे तुझा पाठ[13] ॥
तारिसि तया तयाच्या घेउनि कामादिशत्रुंची पाठ ॥ ११ ॥
त्यातें मुक्ति वरि तुझे गीते अध्याय पाठ अठरा ज्या ॥
लोक[14]पति त्यजुनि जसी ती दमयंती करुनि हठ राजा[15]॥१२॥
एकचि अध्याय पुरे किंबहुना श्लोक एक हा नियम॥
गीते त्वदाश्रितजनीं तिळ हि करिल न बहु मानहानि यम ॥१३॥
पटु अघ[16] हरुनि जलधिचे असुर मधुनि शंभुचे उदार पण ॥
हतभव[17]भीते गीते अत्यंताद्भुत तुझें उदारपण ॥ १४ ॥
साधनसंपत्तिपरा झाल्या तुज नम्र कंधरा[18] आर्या[19] ॥
भावेंसमर्पिल्या या तव चरणीं नमुनि पंधरा आर्या ॥ १५॥
इति श्रीरामनंदनमयुरेश्वरविरचिता श्रीमद्भगवद्गीतास्तुतिःसंपूर्णा.

---

**समाप्त.**

---

४ मोहमहिषमर्दिनि = मोहरूपी रेड्याचें मर्दन करणारी. ५ गेयगुरुगुणा = गाण्यास योग्य आहेत मोठे गुण जीचे अशी. ६ द्वैपायन = यमुनेच्या द्वीपांत ( बेटांत ) झालेला (व्यास) ७ मधुसूदन = मधुरिपु (विष्णु). ८ ज्ञानेश = ज्ञानेश्वरीचा कर्ता ज्ञानदेव ह्यानें ज्ञानेश्वरी शके १२१२ त केली. † सचिव = प्रधान. ९ वामन पंडित. ह्यानें "यथार्थ दिपिका" नांवाची भगवद्गीतेवर टीका लिहिली आहे. १० ज्ञानेश्वरी = ही ज्ञानेश्वरानें केलेली टीका ( भगवद्गीतेची ) ११ आली = सखी. १२ इचें = ज्ञानेश्वरीचें. १३ पाठ = वाचन, पढणें. १४ लोकपति = लोकपाळ ( इंद्र. यम, वरुण. अग्नि). १५ राजा = नळनामक राजाला. १६ अघ = पाप. १७ हतभवाभेत = हरण केलें आहे संसाराचें भय जीणें अशी. १८ कंधरा = कंठ, मान. १९ आर्या = श्रेष्ठा.

## ॥ अथ साधुस्तवः ॥

साधु श्रीरामचरण तेथें तापापहरकथा[1] गंगा ॥
श्रोते जन कामांतक[2] नसोनि संसार नातळे[3] अंगा ॥ १ ॥
सच्चरितसुधामय रघुकुलकैरव[4] रामचंद्र †तत्पाद ॥
सज्जनतापनिवारक चकोर मोक्षेच्छु अमृत संवाद ॥२॥
हरिगुण जीवनदायक संत चि घन[5] जीवनाब्धि[6] रघुराम ॥
जनगत पातक चातक न जयांचा जीवनांतरीं[7] काम[8] ॥ ३ ॥
राघव सहस्रगुणकर तमोरि विश्वप्रकाशकर तरणी[9] ॥
सज्जन अरुण तमोंतक कमळ पण स्पष्ट एक तच्छरणीं ॥४॥
राम कृपाघन तद्गुण जीवन आसार[10] संत तेथ मरु[11] ॥
शरणागत जो इच्छी कीं ऐशी अमृतवृष्टि नित्य करु ॥५॥
निजजीवननिधि[12] राघव सिंधु[13] मिळाल्या तयांत संतनद्या ॥
त्यांस मिळाले ओढे शरणागत कीं स्वरूप चिंतन द्या ॥६॥
रामपद स्पर्शमणी[14] शरणागत लोह संत तें स्वर्ण[15] ॥
वर्णस्तुति काय गुणें परिस चि साक्षीसि देति सत्कर्ण ॥७॥
राम दयाघन जीवनदाता सदुदार दास ते मोर ॥
कुटिलगति दर्पविषधर[16] खळसर्प जयांसि ताप बहु थोर ॥ ८ ॥

इति श्रीमयूरविरचितः साधुस्तवः संपूर्णः

समाप्त.

## महिपतिस्तुतिः

श्रीहरिभक्तजनांचीं श्रीहरिभक्तिसत्सुधाभरितें [?] ॥
चरितें गातां जेणें आयुष्य क्षण पडों दिलें न रितें ॥१॥

---

१ तापापहरकथा=ताप हरण करणारी आहे कथा जीची अशी (गंगा). २ कामांतक= मदन–शत्रु, शंकर. ३ नातळे=न स्पर्शे. ४ कैरव=कमल. ५ घन=मेघ. ६ जीवन= पाणी. ७ जीवनांतर= अन्य उदक. ८ काम=इच्छा. † पाद=पाय–पक्षीं किरण. ९ तरणी=सूर्य. १० आसार=वृष्टि. ११ मरु=मारवाड देश–निर्जल देश. १२ जीवननि- धि=पाण्याचा–पक्षीं जिविताचा ठेवा. १३ सिंधु=सागर. १४ स्पर्शमणी=परीस. १५ सुवर्ण=सोनें. १६ दर्पविषधर=गर्वरूपी विष धारण करणारा.

हरिभक्तविजयनामें[1] रचिला सद्ग्रंथ दोष साराया ॥
वाराया तापातें प्राणी भवसागरांत ताराया ॥ २ ॥
त्या महिपतितें पाहुनि ऐकुनि सच्चित्त कां न लोभावें ॥
शोभावें यश याचें चिर नमिला विष्णुदास तो भावें ॥ ३ ॥
ज्याचा ग्रंथ हरिजना सेव्य चकोरां जसा सदा इंदु ॥
जो पसरला जगांत स्नेहांचा[2] सत्सरीं जसा बिंदु ॥ ४ ॥
सत्य तुकारामाचा या महिपतिवरि वर प्रसाद असे ॥
सदनुग्रहाविणें हे निघतिल †उद्गार सार काय असे ॥ ५ ॥
साधूंचें यश गाया प्रेमें देवूनियां सुभाकेला[3] ॥
निःसंशय ताराया जड महिपति विठ्ठलें उभा केला ॥६॥
महिपतिच्या वाणीतें सेवुनि तरतात जेंवि गंगेतें ॥
विषयांत रंगले जे जनमानस सद्यशीं च रंगे तें ॥ ७ ॥
ज्ञानोबाची जैसी एकोबाची सुधा जसी वाणी ॥
कीं, मुक्तेश्वर कविची महिपतिची सेविती तसी प्राणी ॥ ८ ॥
महिपतिचा सुत विठ्ठल त्याला श्रीपांडुरंग आठव दे ॥
तत्प्रेरणें करूनियां आर्या आर्यादरार्थ आठ वदे ॥ ९ ॥
स्वस्तुति केली ह्मणवुनि महिपति हरिभक्त भक्त न विटो बा ॥
मज तों वाटे ऐशा साधुजनाहूनि भिन्न न विठोबा ॥ १० ॥
संतासि नावडे स्तुति हे ठावें मज परंतु देवास ॥
महिपति ह्मणेल विठ्ठलराया या निजपदीं च दे वास ॥ ११ ॥
श्रीविठ्ठलासि आहे साधूंची फार सर्वदा भीड ॥
चीड प्रभुसि न येइल देइल मज करूनि निज पदीं नीड[4] ॥ १२ ॥
अंजलि करूनि असतो गरुड उभा जेंवि अहिपति[5] समोर ॥
हरिभक्तिप्रेमगुणें नम्र सदां तेंवि महिपतिस मोर ॥ १३ ॥

इति श्रीमहिपतिस्तुतिः

---

**समाप्त.**

---

१ ह्या महिपतीचे भक्तविजय. भक्तलीलामृत, संतविजय. संतलीलामृत, व कथासारामृत असे पांच मुख्य विस्तृत ग्रंथ आहेत. २ स्नेह = तेल. ३ भाक = वचन. † महिपतीनें तुकारामावर केलेले अभंग निबंधमालेंत छापले आहेत. ४ नीड = स्थान. ५ अहिपति = विष्णु.

## ॥ सत्संगस्तवः ॥

सत्संग अतिश्रेष्ठ श्रेयस्कर ह्मणुनि सुज्ञ या गाती ॥
यातें भजतां सिद्धिप्राप्ति असे जी न योगयागा ती ॥१॥
सत्संग अधिक विश्वें हा जाया ताप आपला गावा ॥
सुरतरु सेवुनि तापे हरि इतरा कां न ताप लागावा ॥२॥
सत्संग अघास जसा भगवान्भास्कर[1] न सोडि तिमिरास[2] ॥
त्या भजुनि स्वपदास प्रभुस जसे लोक जोडिति मिरास[3] ॥३॥
सत्संगाचा दासीसुत[4] तो देवर्षि होय हा महिमा ॥
ताप हराया जैसी सत्संगति चंद्रिका तसी न हिमा[5] ॥४॥
जन पापक्षय व्हाया वांछीना कोण साधुच्या संगा ॥
भंगाया संसर्गें घडलें अघ इच्छिती स्वयें गंगा ॥५॥
लीलेनें देतो जें सत्संग नता न दे पद पिता तें ॥
जरि राज्य दिलें केलें न च पुत्राचें बरें तदपि तातें ॥६॥
सत्संगति करिताहे लीलालेशें करूनि जेंवि हित ॥
न तसें माता जाणें संसारामाजि मात्र जें विहित ॥७॥
समजे संसारातें क्षण घडतां साधुसंगमन कारा[6] ॥
जाणें सर्वपदार्था एका चि न साधुसंगमन-कारा ॥८॥
सत्संग ह्मणे सेवा मज पावायासि कंजनाभा[7]गा[8] ॥
अक्षय धन दाखविता मी च न साधूनि अंजना[9] भागा ॥९॥
सत्संग चि हित इतरीं दिसतो प्रेमा परंतु पातळ तो ॥
जोंवरि कार्या येतो जन त्यातें तोंवरी च आतळतो ॥१०॥
सत्संगाची देती तसि इतराची कधीं न तोखें[10] दया ॥
दु:सह चिरकालामयें[11] भव हा सत्संग होय ओखद या ॥११॥
सत्संग असे ह्मणतो कीं जो बालक करील आ ग्रां तें ॥
याचें अमृत प्राशुनि जें न पुन्हा आदरील आम्यातें[12] ॥१२॥
सत्संगति बहु मान्या थोराहुनि बहु दया करिल हानीं ॥
माता न असी ती हि स्नेहाची एकदां करिल हानी ॥१३॥

---

१ भास्कर=सूर्य. २ तिमिर=अंधेर. ३ मिरास=वतन. ४ दासीसुत=नारद. ५ हिमा=थंड. ६ कारा=बंदी शाळा. ७ कंजनाभ=कमल नाभ. ८ अग=वृक्ष, पर्वत. ९ अंजन=काजळ, पर्वत विशेष. १० तोख=संतोष. ११ चिरकालामय=फार दिवसांचा रोग. १२ आमा=स्तन.

देतो सत्संग जना अमृतकराहूनि[13] शुद्ध सद्यश तें ॥
जें गावें सत्कविनीं रसिकसभेमाजि गद्यपद्यशतें ॥१४॥
सत्संग सिंह याणें दूर भयें कामनाग[14] सरकविला ॥
डोले भुलोनि खळजननाग[15] गमे हा हि नागसर कविला ॥१५॥
विश्वाहित[16] दुःसह बळशाली अत्युग्र मोह सैरिभ[17] या ॥
भस्म करी सत्संगतिदेवी नाशूनि सर्ववैरिभया ॥१६॥
येइल पर्यंकीं शिशुरूपप्रभु करिल यासि आवड तो ॥
किंबहुना स्वात्म्याहुनि हरिला सत्संग फार आवडतो ॥१७॥
सत्संग जरि मिळे तरि बहु पापी ही सुखें अजा[18] मिळतो ॥
पुत्रास सदुपदेशें नारायण हें ह्मणे अजामिळ तो ॥१८॥
सत्संगतिप्रसादें बहु भगवद्भक्तिच्या भरीं भरले ॥
सरले दोष सकल जन न तरावे जे कधीं हि ते तरले ॥१९॥
सत्संग लेववी गुण जैसा पीडूनि हात कासार ॥
न गमे चि असत्संगें मूढा संसार पातकासार[19] ॥२०॥
सत्संगें भेटविली मति देवा जेंवि गाय कासारा[20] ॥
सत्संगति होय तसी जसि हरिची कीर्ति गायका सारा ॥२१॥
देतो सत्संग तसा बहु सुगुणमहत्व भक्तजनतेला[21] ॥
सत्पुष्पसुगंध जसा मुदित करायास तज्ज्ञमन तेला ॥२२॥
मृगमदसंगतरेणु[22] स्थिति देवांच्या हि करि ललाटांतें ॥
क्रीडासत्संगमिलितचिद्दधिच्या[23] कां न करिल लाटांतें ॥२३॥
सत्संगति भुलवी ज्या क्षण संसृतितें[24] कधीं भुले न च तो ॥
इकडे चित्त न देउनि नरकीं जड जीव सर्वदा पचतो ॥२४॥
सत्संगा जाड्यहरण यश मृतिहरण न सुधानदा[25] देतें ॥
बाळा वाटे कांहीं सुख खाजवितां बुधा न दादेतें[26] ॥२५॥
तरले ह्मणती बापा सत्संगा देह दारसुतराई ॥
जन्मोजन्मीं आह्मी होऊं न तुझे कदापि उतराई ॥२६॥
हा सद्यपति श्रीकर शंकर सत्संग कवि असे ह्मणती ॥

---

१३ अमृतकर=चंद्र. १४ नाग=हत्ती. १५ नाग=सर्प. १६ वि-श्वाहित=सर्वनाशक. १७ सैरिभ=रेडा. १८ अज=परमेश्वर. १९ आसार=प्रळयवृष्टि, अतिवृष्टि. २० कासार=तळें २१ भक्तजनता=भक्तजन-समूह. ("ता" प्रत्यय समूह दाखवितो—बंधुता=बंधुसमूह) २२ मृगमद=कस्तुरी. २३ चिदुदधि=चित्समुद्र. २४ संसृति=संसार. २५ सुधानद=अमृत-नद. २६ दाद=पुरळ.

प्रणति प्रेमें करितां तरले त्यांची कधीं नव्हे गणती ॥२७॥
सोडुनि सत्संगतितें ज्ञाता सुविरक्त हा न सेवि दरी ॥
बरवी बाहिर घालुनि शिरली चतुरांतरीं नसे विदरी[27] ॥२८॥
जीवातें सत्संग स्वसुखें तोयें भरी नद सरातें ॥
हा जें न पाडवा प्रिय दीपावाळि हि न करी न दसरा तें ॥२९॥
प्रणतीं प्रसन्नपण जें सत्संगाचें धरूनि शिखिता[28] तें ॥
भस्मचि करितें सहसा सकळा हा चित्रगुप्त[29]लिखितातें ॥३०॥
अत्यद्भुता मधुरता जीची विश्वांत भरूनियां उरली ॥
सत्संगति मन हरिती श्रीव्रजपतिसूनु[30]ची जसी मुरली ॥३१॥
दुर्गुणहर शरणागतसंरक्षक इष्टजनकलंकारी ॥
सत्संग तसा जैसा श्रीरघुपति विश्वजनक लंकारी ॥३२॥
सत्संगा कीर्ति वरी जी ह्मणती न च कवि प्रयागा ती ॥
लेश हि कळिकाळाचा न धरूनियां वंचक[31] विप्र या गाती ॥३३॥
सत्संगति सुगुणांहीं सर्वांहि स्वाश्रितासि शोभविती ॥
ज्याच्या पदरीं पुण्य प्रचुर विमळ बहु तयासि लोभविती ॥३४॥
जीं हरिहरप्रसादीं कल्याणें वसति साधुसंगीं तीं ॥
अघ शमतें सुख गमतें मन रमतें जेंवि दिव्य संगीतीं ॥३५॥
सत्संगमीं च नाना दुःखातें तथापि चित्त रंगेतस ॥
जलनिधितरंग[32] वातें सत्संगें उठति चित्तरंग[33] तसे ॥३६॥
सत्संग शुद्ध सुकृतें मिळतो वैकुंठलोकपरिसरें[34] हा ॥
कवि ह्मणति जना येथें हरियश जायासि शोक परिस रहा ॥३७॥
सत्संग जोडिल्यावरि जोडायाचें न राहिलें कांहीं ॥
सत्संगीं पूजावा पुरुषार्थांहीं जसाचि लेंकांहीं ॥३८॥
संग इतर इतरांगें त्यांत गमे साधुसंग शिर[35] कविला ॥
हृदयीं या एके ची श्रीहरिहरभक्तिरंग शिरकविला ॥३९॥
स्पर्शमणि[36] सुवर्ण करी दे स्पर्शमणित्व तो न लोहातें ॥
हा साधुसंग करितो साधु असाधुसि हरूनि मोहातें ॥४०॥
सत्संगम चिंतामणिमंदिर ऐसें कितेक वदतात ॥
परि न समीचीनें[37] दिसे हा देतो जेंवि आत्मपद तात ॥ ४१ ॥

---

२७ विदरी = कुरूप. २८ शिखिता = आग्नित्व. २९ चित्रगप्त = यमाचा चिटणीस. ३० व्रजपति–सुनु = नंद–पुत्र (कृष्ण). ३१ वचक = भीति. ३२ तरंग = लाटा. ३३ चित्तरंग = ज्ञानकल्लोळ. ३४ परिसर = कांठ; प्रांत. ३५ शिर = श्रेष्ठ. ३६ स्पर्शमणि = पारस ३७ समीचीन = चांगलें.

इतर कुवासर[38] ज्यांत श्री सत्संगति घडे सुवासर तो ॥
कवि ह्मणति मळ सकळ हि सत्संगनदांतरीं धुवा सरतो ॥ ४२ ॥
सत्संगतितें सेवी जेंवि पिपीलिक[39]समूह [40]रावतें ॥
जाणति बहु साधुगृहीं जे सत्सेवक तसाच [41]रावि तें ॥ ४३ ॥
सत्संगाचा महिमा कोणा तीर्था न ये चि गंगाद्या ॥
अंगा द्यावाभूमी साधूंच्या न मिति ह्मणति संगा द्या ॥ ४४ ॥
अघ तीर्थविशेष हरी तो साधूंचा चि होय वा चेलों[42] ॥
ह्या चेलीं[43] जळ जैसें करितो सत्संग शुद्ध वाचेला ॥ ४५ ॥
प्रभुच्या वंशांत जसे सत्संगीं वसति तात सद्रस जे ॥
सर्वांसि सर्वदां हा सत्संग चि द्यावयासि भद्रें[44] सजे ॥ ४६ ॥
सत्संग भवाहिगरुड[45] सत्संग भवद्रुमघ्न वन्य करी[46] ॥
सत्संग भवदहनघन सत्संगम यवस्थ[47] जीव धन्य करी ॥ ४७ ॥
सत्संगति सूर्यसुता[48] सत्संगति जान्हवी[49] हरी तृष्णा ॥
सत्संगति कावेरी सत्संगति हे चि गौतमी[50] कृष्णा ॥ ४८ ॥
जेंवि कतकें[51] तोयातें द्रुत[52] करुनि मळाचिया परिभवातें[53] ॥
सत्संग स्वच्छ करी जरि बहुत कलुष[54] असे परिभवातें[55] ॥ ४९ ॥
सत्संगें स्वच्छ हृदय भस्मानें जेंवि आरसा उटिला ॥
सत्संग सरळ करितो तावुनि वंशीं[56] शिखी[57] जसा कुटिलों[58] ॥ ५० ॥
जलद बलद सस्याला[59] हरिभजना साधुसंग हा बळद ॥
मुक्तिस मुमुक्षुत करें आपण सत्संग लावितो हळद ॥ ५१ ॥
परमार्थव्यवहारीं करितो पटु साधुसंग हा पंत ॥
अंत करुनि जाड्याचा केले येणें चि सर्व हे संत ॥ ५२ ॥
सत्संग कारभारी भारी मारी मुकुंदचित्तातें ॥
जड उद्धरवुनि घेतो देतो जोडुनि सुकीर्तिवित्तातें ॥ ५३ ॥
प्रभुसि जडोद्धृति पसरुनि सत्संगतिमाउली करा यांची[60] ॥
हे स्वप्रसादपदरें तप्तावीर साउली करायाची ॥ ५४ ॥

---

३८ वासर=दिवस. ३९ पिपीलिक=मुंगी. ४० राव=काकवी. ४१ रावि=खपे. ४२ चेला=शिष्य. ४३ चेल=वस्त्र. ४४ भद्र=कल्याण. ४५ भवाहिगरुड=संसाररूपी सर्पाला गरुडा सारखा ४६ करी=हत्ती. ४७ यवस्थ=तृणस्थ. ४८ सूर्यसुता=यमुना नदी. ४९ जान्हवी=गंगा नदी. ५० गौतमी=गोदावरी. ५१ कतक=एका प्रकारचें फळ, ज्याच्या योगानें गढूळ पाणी स्वच्छ होतें. ५२ द्रुत=सत्वर. ५३ परिभव=नाश. ५४ कलुष=गढूळ. ५५ भव=संसार. ५६ वंश=वेळू. ५७ शिखी=अग्नि. ५८ कुटिल=वांकडा. ५९ सस्य=धान्य. ६० याची=मागे.

कर्ण त्वचा शिबि पलल[६१] दे अस्थि दधीचि विप्र अर्थिजना ॥
जीमूतवाहनाच्या आले दुष्कर हि जीवदान मना ॥ ५५ ॥
ऐसे अगणित दाते ह्मणते वांछित सुखें वदान्या ते ॥
सत्संग अधिक गातो याचि बहु सुकवि मुखें वदान्यांतें[६२] ॥ ५६ ॥
सत्संगा कवि होउनि रोमांचोत्फुल्लकाय[६३] गातात ॥
पोषूनि न सर्वस्वप्रेमद हा होय काय गा तात ॥ ५७ ॥
सत्संग हरिहराहुनि अत्यद्भुत भव्यगुण न हा गांजी ॥
हरिहरजन हो या मम वाक्यें कोपाल मानसीं कां जी ॥ ५८ ॥
सत्संगाच्या पोटीं साठवले हरिहरादि हे सर्व ॥
गर्व त्यागुनि भजले विनयें होऊनि थोरही खर्व[६४] ॥ ५९ ॥
सत्संगमेघ सुखवुनि नाचवितो प्रणत भक्तमोरांतें ॥
श्रीरामाधिक वदलों सत्संगातें नमोनि थोरांतें ॥ ६० ॥

इतिश्री रामनंदनमयूरविरचिता सत्संगस्तुतिः

---

## ॥ अथ श्रीमुरलीपंचकं ॥

व्यक्तानेकस्वररसतरंगिणी[१] जींत विश्वमति मुरली ॥
व्रजवनितांची[२] दूति चुंबिशि ते हे मनोरमा मुरली ॥ १ ॥
जीची नादसुधा या ब्रह्मांडघटीं भरोनियां उरली ॥
जी ज्येष्ठ सुरभि[३]-भगिनी चुंबिशि ते हे मनोरमा मुरली ॥ २ ॥
नखमणिकिरणीं अधरामृतरससिक्ता सदैव अंकुरली ॥
श्रीची प्रबळ सपत्नी[४] चुंबिशि ते हे मनोरमा मुरली ॥ ३ ॥
विरहीं व्रजबालांहीं जीवरि मृदुलांगुलीतती[५] चुरली ॥
वंशप्रभवा[६] सरला चुंबिशि ते हे मनोरमा मुरली ॥ ४ ॥
यन्माधुर्योत्कर्षश्रवणें वाणी सुधा मनीं झुरली ॥
भक्तमयूरघना हरि चुंबिसि ते हे मनोरमा मुरली ॥ ५ ॥

इति श्रीरामनंदनमयूरकविवर्यकृती मुरलीपंचकं स्तोत्रं संपूर्णम्

---

६१ पलल = मांस. ६२ वदान्य = दाता. ६३ काय = शरीर. ६४ खर्व = लहान.

१ तरंगिणी = नदी. २ व्रजवनिता = गोकुळस्त्रिया. ३ सुरभीभगिनी = कामधेनूची बहीण. ४ सपत्नी = सवत, ५ तती = समूह, ६ वंशप्रभवा = वेळुची.

## ॥ अथ श्रीनामसुधा-चषकः* ॥

स्वप्रश्रयासि आली मात्रा बहु वेंचितां न जे वेचे ॥
तीच्या दानें करिसी अमर चि जन आत्मपादसेवेचे ॥ १ ॥
शंभो श्रीरामाच्या नामातें नित्य सेविसी बापा ॥
त्याच्या बळें चि हरिसी पापिजनाच्या क्षणें महापापा ॥ २ ॥
वैद्यांतर[1] समुपेक्षुनि जो दीन वरी तुझें गृहाजिर[2] तें ॥
औषध त्यास चि देसी कीं अन्योपायनिःस्पृहा जिरतें ॥ ३ ॥
आलें दिव्य रसायन जेव्हां पासुनि हें तुझ्या हाता ॥
झालें तेव्हां पासुनि नाम तुला वैद्यनाथ हें ताता ॥ ४ ॥
विषदाह नाम शमवी माथांची दिव्य वीचि[3]मत्सरितीं[4] ॥
ती सागरीं प्रवेशे होय शशी[5] क्षीण ती चि मत्सरितीं[6] ॥ ५ ॥
ह्मणती तापातें हरि परि न प्रभुनामसम हिमाचळ तो ॥
मारि प्राणी त्राणीं पटु नाम ह्मणोनि न महिमा चळतो ॥ ६ ॥
मृदुशीत लागती परि अहि[7] अहित क्रूर दूर सोडावे ॥
श्रीरामनामसख्यावरि खळसंगासि हात जोडावे ॥ ७ ॥
त्वत्सुत[8] विघ्नघ्नें[9] कसा देति न जे खळ जपों तपों दीना ॥
दोंदीं[10] नागवर[11] शिथिल करुनि बळें त्यांत विघ्न कोंदीना ॥ ८ ॥
दृग्दहनें[12] विश्व जळे परि हरिलें तेन मन्मथें[13] वा तें ॥
नाम चि मिरवी जिरवी दे न अधःपिंड[14] जन्म येवातें ॥ ९ ॥
ह्मणती मंगल शील स्रातें तुज शंकरा मना मसणीं ॥
जरि आवडी तरी कीं तर्पिसि बहु रंकें[15] रामनामसणीं ॥ १० ॥
श्वशुर पितामह[16]-मूर्ध[17]च्छेदनें पुरदाह[18] उग्रविषपान[19] ॥
साधूंत रामनामग्रहणें शंभो तुझाचि बहु मान ॥ ११ ॥
गोडी प्रभुनामीं कीं दयिताधर[20]बिंबचुंबनीं गोडी ॥

---

१ वैद्यांतर = दुसरा वैद्य. २ गृहाजिर = गृहांगण. ३ वीचिमत् = लाटांनीं युक्त. ४ सरिता = नदी. ५ शशी = चंद्र. ६ मत्सरिता = मत्सर. ७ अहि = सर्प. ८ त्वत्सुत = तुझा पुत्र (गणपती). ९ विघ्नघ्न = विघ्ननाशक. १० दोंद = पोट. ११ नागवर = सर्पश्रेष्ठ. १२ दृग्दहन = दृष्टि-अग्नि. १३ मन्मथ = मदन. १४ अधःपिंड = लोखंडाचा गोळा. १५ रंक = भिकारी. १६ पितामह = ब्रह्मा. १७ मूर्द्ध = डोकें. १८ पुरदाह = त्रिपुरास जाळणें. १९ पान = पिणें. २० दयिताधर = प्रियाधरोष्ठ. * चषक = पेला.

उभयरसश्लोक्ति खरी शुकमुखयतिपति[21] मतीं दुजी थोडी ॥१२॥
विश्वगुरो ज्यां देसी सुक्षेत्रीं रामनामउपदेश ॥
त्यांला बहु धन्य ह्मणे तो जो ध्रुवनामसाधु सुपदेश[22] ॥ १३ ॥
आह्मी चातक पातकहर[23] नाम अमृत उदार तूं अब्द[24] ॥
या वेगळ्या वरांतें देतां तुज कुजन लाविती शब्द ॥ १४ ॥
रामाचें नाम चि धन जन धन ह्मणती जयासि तें खोटें ॥
मोठें प्रेम धरिति जे त्यांचीं हें दुष्ट निरवितें पोटें ॥ १५ ॥
नामधनेंचि वर[25] धनिक सेव्य जगा तूं विलोकितां वृत्ति[26] ॥
भिक्षाशन भस्म-भुजंग-भूषा प्रावरण एक इभकृत्ति ॥ १६ ॥
न रमति तुझे उपासक पळ हो जे सद्विवेकविभ्र धनीं ॥
कीं प्राकृतें हि तेणें मेल्यावरि हि न निवे कवि प्रधनीं ॥ १७ ॥
ज्याचा प्रभुनामधनें प्राकृतधननाशकंप टाकविला ॥
त्या समशीलास सखा ह्मण न दुजा वित्तलंपटा कविला ॥ १८ ॥
जें ईश्वरा रुचे तुज तें चि किमपि आणखी निवेदीन ॥
न प्राकृतें धनें प्रभुनामें जैसा तसा निवे दीन ॥ १९ ॥
उत्तमधनदानें यश उत्तम तूं वरद उत्तम स्वामी ॥
उत्तम कळिकाळ हि बहु उत्तम पात्रांत दीन हो हा मी[31] ॥ २० ॥
तपसी जपसी उग्रा उग्रा रघुवीरनाममंत्रास ॥
भूतपते भूतबळें तुजपासुनि पावती न संत्रास[32] ॥ २१ ॥
मोह हरी ह्मणती परि सर्वांचें नाममंत्र मन मोही ॥
येणें जो मुनिगुरुवर[33] परमेश्वर मोहिलासि तूं तो ही ॥ २२ ॥
या विश्वमनोमोहनमंत्रें केले तुवां स्ववश योगी ॥
गौरी बाळा[34] भुलली मानी सद्रत्नहार वर भोगी[35] ॥२३॥
या चि महामंत्रें त्वां सर्व महासिद्धि किंकरी[36] केल्या ॥
गेल्या भवदाज्ञेनें रंकाप्रति हात जोडुनी ठेल्या ॥ २४ ॥
परम प्रसन्न झाला शुद्धा हा मंत्रराजरान तुला ॥
प्रेमा तुझा मिळाला यास जसा रंग साजरा जतुला[37] ॥ २५ ॥

---

२१ यतिपति= संन्यासिश्रेष्ठ. २२ सुपदेश = सु + पद + ईश (उत्तम स्थानाचा स्वामी). २३ हर =हारक. २४ अब्द= मेघ. २५ वर =श्रेष्ठ. २६ वृत्ति= उपजीविका. २७ अशन= खाणें. २८ भुजंग = सर्प. २९ इभकृत्ति =हत्तीचें कातडें. ३० प्रधन = मरण. ३१ मी = मी मोरोपंत. ३२ संत्रास = भीति. ३३ मुनि गुरुवर = मुनिश्रेष्ठ (नारायण). ३४ बाळा= स्त्री. ३५ भोगी = सर्प. ३६ किंकरी= दासी. ३७ जतु= लाख.

शंभो रंभोर्वश्याद्यमरी करिती पुढें पसा दासी ॥
यत्पीकपानकामें तीं प्रार्थी त्वत्पदप्रसादासी ॥ २६ ॥
या रामनाममंत्रें उतरिसि तत्काळ काळसर्पातें ॥
मणिमंत्रभेषजांतर[38] दुर्हर कंदर्पभूत[39]दर्पातें ॥ २७ ॥
या रामनामसुरसें तर्पिसि तूं करिसि सूपकारातें ॥
तृप्तिप्रदत्व कैंचें शीतकरा[40] अमृतसूपकारा[41] तें ॥ २८ ॥
नामधनें अंत सधन वेषें मूढांसि सांगपण साचें ॥
दारिद्र्य नव्हे वरदा नीरस वरि जेंवि आंग पणसाचें[42] ॥ २९ ॥
सैंधवखिल्य उदधितें तेंवि मिळो हा हि रंक रामातें ॥
कीं जेंवि पय पयातें उपदेशीं मंत्र शंकरा मातें ॥ ३० ॥
श्रीरामनाममंत्रें भारीं कामाहि[43] अमितफट[44] काळा ॥
साधुमनें मोहिसि परि यश घे मोहूनि या हि फटकाळा ॥ ३१ ॥
भक्षीना आखु[45] ते त्वत्कंठींचा हि हार पवनाश[46] ॥
त्या हि गुहशिखी[47] मंत्र न होऊं दे भक्तभाग्यलवनाश ॥ ३२ ॥
बळियाचक[48] जामातो[49] परि गिरिराजात्मजा[50] न सासूया[51] ॥
मंत्र* नसतां न पीती तव वेषा मवहुमान सासूया ॥ ३३ ॥
अनुचर[52] पिशाच भूषण मूर्ध[53] स्रक्[54] सर्प गगनपट कटिला ॥
नगराजप्रियदुहितां मंत्रबळें भाळली तुला जटिला ॥ ३४ ॥
जे सप्त कोटि होते त्वद्‌हृदयीं प्रथममंत्र ते ज्यातें ॥
पाहुनि सर्व निघाले म्याले प्रभुनाममंत्रतेजातें ॥ ३५ ॥
नाममहामंत्रार्थ व्रत वरिलें काय हें सदारानें[55] ॥
जटिलें दिगंबरें त्वां धरिलीं तुहिनाद्रि[56]र्थी सदा रानें ॥ ३६ ॥
नाममहामंत्रमय चि जपतां झालासि तूं उगा राया ॥
चित्तें सृष्ट्यवनलयीं[57] लागेना पक्ष्म[58] ही उगाराया ॥ ३७ ॥
तूं नामामृतसागर नामधनकुबेर नामतंतुपट ॥

---

३८ भेषज = औषध. ३९ कंदर्प = मदन. ४० शीतकर = चंद्र. ४१ सूपकार = सैपाकी. ४२ पणस = फणस. ४३ कामाहि = मदन सर्प. ४४ अमितफट = मोठी आहे फटा (फडा) ज्याची असा. ४५ आखु = उंदीर. ४६ पवनाश = वायुभक्षक (सर्प). ४७ गुह-शिखी = कार्तिकस्वामीचा मोर. ४८ बळियाचक = विष्णु. ४९. जामाता = जांवई. ५० गिरिराजात्मजा = पर्वतश्रेष्ठ-कन्या (पार्वती). ५१ सासूया = मत्सरयुक्त. ५२ अनुचर = सेवक. ५३ मूर्ध = मुंडकें. ५४ स्रक् = माळ (हार). ५५ सदार = सस्त्रीक. ५६ तुहिनाद्रि = हिमालय. ५७ सृष्ट्यवनलय = सृष्टीचें रक्षण व नाश. ५८ पक्ष्म = पापणी.

*. 'जरि न भुलति तव रूपा न पाहती नवहुमान सासूया" पाठांतर.

त्वन्मूळें नामाला शोभा नामें हि या तुला दुपट ॥ ३८ ॥
नवसंगमदयिताधरचुंबन कीं सरस राम हें नाम ॥
या मन्मथशत्रो वद कोठें पावे रसज्ञ विश्राम ॥ ३९ ॥
नाश तमाचा नामें कीं त्वन्नयनत्रयें नतास वदा ॥
सवदा तव दासोचित कोण प्रभुजी अहो महोत्सवदा ॥ ४० ॥
शशिसूर्यानलतेजस्त्रय नेत्रत्रय तुजें दुजें नाम ॥
सर्वप्राणिसुखप्रद यां मध्यें कोणतें भलें धाम[५९] ॥ ४१ ॥
झांकुनि नेत्रें वसतां मानुनियां शरण कोप टाकवितें ॥
हें नामधाम हित पथ दाखवितें भीति कोप टाकवितें ॥ ४२ ॥
नामामृतें चि सर्व हि आस्नानाप्रांसि तोष दे वांचे ॥
अमृतें प्रसिद्ध केले धर्मासुमतिप्रमोष देवांचे ॥ ४३ ॥
सत्य रसज्ञोत्तम तूं नाम वरूनि काम सांडिला तुच्छ ॥
वत्स प्रस्नव[६०]पूर्ण स्तन सोडुनि चुंबिना चि गोपुच्छ ॥ ४४ ॥
सर्वविवेकिमुकुटमणि तूं जोडुनि रामनामवरवित्त ॥
जाउं न देसि भयमदविरहद विषयांतरा कडे चित्त ॥ ४५ ॥
भलता नामसुवर्ण क्षेत्रीं घे तूं हि देसि भलत्यातें ॥
ये पात्रत्व अपात्रा मुक्ति ह्मणे मद्गृहासि चल त्यातें ॥ ४६ ॥
नामसुवर्ण प्रेमें देतोसि यथेच्छ नित्य काशींत ॥
राशींत द्रव्याच्या न तिळ उणें पण न याचकाशींत[६१] ॥ ४७ ॥
अमृतें विश्व हि तर्पी परि होय क्षीण न प्रभा वाढे ॥
हें नामधाम अद्भुत याचा चि तम स्वयें पडे दाढे ॥ ४८ ॥
निःशेष करि कुमतिला ताप न दे उग्र होय न कदापी ॥
हें नामधाम निरुपम जगतीं याच्या अनुग्रहें पापी ॥ ४९ ॥
वरदा वर दासांतें प्रेमें दिधले अदेयतर[६२] मागें ॥
यास्तव मन मज माजें ह्मणतें श्रीरामनामवर मागें ॥ ५० ॥
परम अनावर माजें मन मज याचें न सोसवे रुसणें ॥
देसिल तरि अगदीं दे देवा देऊं नको मना उसणें ॥ ५१ ॥
दुर्लभ नामवरातें पावुनि जरि हा असाधु माजेल ॥
माजो केलें पावो वरद कर तुझा यशें विराजेल ॥ ५२ ॥
सुदृढ प्रेमगुण करा सूक्ष्महि न तदंतरीं असो सांधा ॥

---

५९ धाम=तेज. स्थान ६० प्रस्नव=पान्हा. ६१ याचकाशी=याचकाचा आशीर्वाद.
६२ अदेयतर=देण्यास अत्यंत कठीण.

प्रभुनामरत्नकंठीं घट्ट तुझी पटु करें बरें बांधा ॥ ५३ ॥
श्रीमंत सेवकातें देती सद्रत्न हेम[63] नेपथ्य[64] ॥
शोभा तेचि तयांची कृपण चि मानिति न हें मनें पथ्यें[65] ॥ ५४ ॥
मी बहु जपेन यातें परि मजवरि बा तुझी असो दृष्टी ॥
सांडेल कसें ज्याचा स्वपशास्तेजें प्रकाशली सृष्टी ॥ ५५ ॥
स्वामिप्रसाद होतां रंक हि होतो सुवस्तुला योग्य ॥
क्षाळिति यथेच्छ गांगें[66] स्वांगें जन जे तुझा शिरोभोग्य ॥ ५६ ॥
राहेल पदनिकट चि हा न भवन्नामरत्न पळवील ॥
पळवील तरी आठां मूर्तींतुनि एकमूर्ति कळवील ॥ ५७ ॥
म्हणतील अर्पितों परि झगडेल करील विघ्न दोंदील[68] ॥
या मोदक पुष्कळसे जठरीं पांचीं करीं हि कोंदील ॥ ५८ ॥
म्हणतील दान समयीं साध्वी दावील लोभ वानीती[70] ॥
नी निज दान न वारी हें कासि वारील हो भवानी ती* ॥ ५९ ॥
आहेत नामरत्नें तुमच्या कंठीं सहस्र तीं ठेवा ॥
यांतुनि एक हें द्या देवा भावें करीन मी सेवा ॥ ६० ॥
ज्यासि दिलीं ते दास चि त्यांचा कैसा करूं नको हेवा ॥
हे वादाची जागा न्यायें सांगेन वाद मी देवा ॥ ६१ ॥
धरितां लोभ असा जरि तरि कैसी आप्तकामता राहे ॥
सप्त वितस्ति[71] शिळा भवसिंधूंत लिहोनि नाम तारा हे ॥ ६२ ॥
जाता गळां चि पडतां वारी भलत्या परी लचांडाला ॥
येतां धांवत गंगा काय वितृष्ण न करील चांडाला ॥ ६३ ॥
लटिकें काय भिवविता बाळासि मला अहो शिव स्वामी ॥
जैवि भगीरथ गांगा सेविन नामामृता शिवस्वा मी ॥ ६४ ॥
सत्राजिता[72] न पचला नाहीं आलें यश स्यमंतकदा[73] ॥
तरि तो तापकराचा तापकर चि करिल हे न अंत कदा ॥ ६५ ॥
चोरी प्रभुधन पापी खंडुनि घे राहु कारटा काया ॥

---

६3 हेम=सोनें. ६४ नेपथ्य=पोषाग. ६५ पथ्य=हितकर. ६६ गांग=गंगोदक. ६७ आठमूर्ती=शकुंतला नाटकाच्या पहिल्या श्लोकांत या आठ मूर्ति वर्णिल्या आहेत. ६८ दोंदील=गणपति. ६९ पांचकर=चार हात व एक सोंड. ७० वानीती=वर्णन करिती. * जी साध्वी तुज हीं दे हें कां नेदील हो भवानी ती. ७१ वितस्ती=विती. ७२ सत्राजित=सत्यभामेचा बाप. ७३ स्यमंतकद=स्यमंतक नांवाचा मणि देणारा (सत्राजित).

सर्वस्वें वस्तु न मी याया कीं साहुकार टाकाया ॥ ६६ ॥
कां आवरितां सोडा नामा मद्दुरितसेवनीं तरळा ॥
प्याले सकळ सुर अमृत प्यालां देवा तुह्मी कसे गरळा [७४] ॥ ६७ ॥
वंधु विषधराशीन [७५] परि साधु तुह्मी हा ह्मणा भला खगपा [७६] ॥
आह्मी कवी नवीना रीति नव्हे छाटितों च लाख गपा ॥ ६८ ॥
अजि हें ज्याचें त्याचें याच्या ठायीं कसें नसो शील ॥
नाम स्वजनातिक्रम करितो काळिकाळ हें न सोशील ॥ ६९ ॥
तुजपाशीं माग ह्मणे मज नित्य भवार्त हें मन गरा [७७] जें ॥
प्यालासि तें चि भेषजें [७८] दे कार्य नसे चि हे मनगरा जें ॥ ७० ॥
दे रामनामसर्वस्वाचें मज दान वा नको अन्य ॥
दात्या हा त्याग महा देत्या घेत्या हि जन ह्मणो धन्य ॥ ७१ ॥
द्या द्या ह्मणतां जैसा मी तैसे वा तुह्मी हि उरगांना [७९] ॥
आइकतां दीनाच्या किति काकुळतीस नेंवि शुभ गाना ॥ ७२ ॥
अर्थिमनोरथपूर्ति [८०] श्रेष्ट यशस्कर तसें न तप माना ॥
वरदा स्मर [८१] दाहातें योग्य तसा काय मी हि अपमाना ॥७३॥
ज्यासि पुसाल ह्मणेल चि तो याचककाम पूरवा हूं द्या ॥
अव्यय [८२] भव्य यशस्कर नाम सुधोदामपूर वाहूं द्या ॥७४॥
नलगे चि अमृत [८३] मेवा देवा ठेवा करा वरा जतन ॥
स्वामी हा मी नामीं सस्पृह साधीन आपुलें वतन ॥ ७५ ॥
कां भीतां द्या नाम क्ष्वेडों [८४] ची वा धरूं नको शंका ॥
अंकालंकारातें [८५] रक्षीं मृगनाभि [८६] च्या जशा पंका ॥७६॥
कर्ण दधीचि शिबि प्रभु तो नो सोसी शिरीं नव क्रकचें [८७] ॥
सत्यव्रतदात्यांचा देवा वज्र हि करी न वक्र कच ॥७७॥
तुमचें निष्ठुरपण हा लाजवितें भूतनायका [८८] पविलों [८९] ॥
भक्षावयासि बाळक माते करवीं न काय कापविला ॥७८॥
श्रीरामनामचिंते त्वां ज्याचा देह वाळवीला गे ॥
हरिसि मरणभय त्याचें इतर मरे ज्यास वाळवी लागे ॥७९॥

---

७४ गरळ=विष. ७५ विषधराशन=सर्प खाणारा (गरुड). ७६ खगप=गरुड ७७ गर=विष. ७८ भेषज=औषध. ७९ उरगाना=कंटाळाना. ८० अर्थि=याचक. ८१ स्मर=मदन. ८२ अव्यय=अक्षय. ८३ अमृत=मोक्ष–पक्षीं देवांचें पेय. ८४ क्ष्वेड=विष ८५ अंका लंकार=चंद्र. ८६ मृगनाभि=कस्तूरी. ८७ क्रकच=करवत. ८८ भूतनायक=शिव. ८९ पवि=वज्र.

शंभो अंभोजांतें[90] मधुप[91] विसंबेल तूं न नामातें ॥
न वदसि तरि कळवावें करुनि करांबुजविधूननेंना[92] मातें ॥ ८० ॥
देसील परि विसरवी जरि हि सुधाकर विधु[93] न नामासी ॥
मृतिभय न धरि न पाहे मधुरसभुक् करविधूननें[94]ना मासी ॥८१॥
गावूनि नाम नटसि[95] त्यजुनि स्त्रीपुत्रमित्रजनशंका ॥
देवा दे वात्सल्यें वर वाटतसे तसें चि मज रंका ॥८२॥
सारूप्यदान देउनि गौरविला शंकरा जसा नंदी ॥
दे नामपारितोषिक[96] मज मी हि प्रभुवरा तुझा वंदी[97] ॥८३॥
नोहें मी अंधक वृक दशमुख उपमन्युहूनि दीन असें ॥
चित्तीं निश्चित समजो नामवरप्रद दयानदीन[98] असें ॥८४॥
म्हणसील वरें झाले बहु मत्त करूनि मद्यजन[99] नीच ॥
केळकमेळकां विष धर्मज्ञा दे न मद्य जननी च ॥८५॥
उग्रप्रकृतिहृदय तें केंवि वरदनायका द्रवे यांचें ॥
दुग्धप्रदासि निर्विष होइल मुख काय काद्रवेयांचें[100] ॥८६॥
नामवरें विद्याकुळवित्तवयोरूपशक्तिमद उतरे ॥
धुतरें[101] इतरवर ह्मणों कीं पायसं[102]वर कुशील ते कुतरे ॥८७॥
दुर्मतिकळावतींचे[103] अनुचर त्यांचे चि तीर्थरूपें[104] ढव[105] ॥
केवळ मूर्ख ह्मणावे तरि त्यांला अर्थशास्त्र ही पढवे ॥८८॥
शंभो अंभोदाची[106] सर्वत्र हि सम जसी पडे वृष्टी ॥
साधुअसाधु ह्मणेना तैसी च तुझी दयावती दृष्टी ॥८९॥
विश्वगुरो भजकांतें देउनि वर करिसि चित्त तुष्टपणें ॥
परि पाप ताप पावति लाविति तुजला हि बोल दुष्टपणें ॥९०॥
आद्या आर्या आसा आत्म्या दे रामनामसंनिधिला[107] ॥
निरवीं मग मज मोहध्वांत[108] मिहिर[109] साधु धामें[110] संनिधिला[111] ॥९१॥

---

९० अंभोज = कमळ. ९१ मधूप = भ्रमर. ९२ करांबुज विधूनन = हस्तकमळ हलविणें. ९३ विधू = चंद्र. ९४ कराविधूनन = हात हलाविणें. ९५ नटसी = नाचतोस. ९६ पारितोषिक = बक्षीस. ९७ बंदी = स्तुतिपाठक. ९८. दयानदीन = कृपासागर. ९९ मद्यजन = माझें पूजन. १०० काद्रवेय = सर्प. १०१ धुतरे = धोतऱ्या सारखे मादक. १०२ पायस = क्षीर. १०३ कळावती = वेश्या. १०४ तीर्थरूप = बाप. १०५ ढवा = धीट, रांडबाज. १०६ अंभोद = मेघ. १०७ संन्निधि = उत्तम ठेवा. १०८ ध्वांत = अंधेर. १०९ मिहिर = सूर्य. ११० धाम = गृह—पक्षीं तेज. १११ संनिधि = समीपता.

मधुरतर ह्मणुनि सस्पृह बहु जालें चित्त बावळें[११२] नामीं ॥
या वाचुनि देसिल जरि सर्व धनप[११३]वित्त बा वळेंना मीं ॥९२॥
आर्थिजनांतें ह्मणती दाते उघडें करूनि अररा[११४] या ॥
देशी काशीमध्यें तूं हि **श्रीराम** नामवर राया ॥९३॥
तुमचा अभयवरप्रद तापापह सुप्रमोदकर वाळा ॥
कर वाळा वाह्रा कां दासशिरीं द्या त्यजूनि करवाळा[११५] ॥९४॥
देवा ऐसें ह्मणसी नामवरादीष्टसिद्धि परमा जे ॥
शरणागतासि देती लोकांत अनंत साधु कर माजे ॥९५॥
वर द्यावयासि सिद्ध चि केले म्यां साधु मूर्तिकर वरते ॥
जा घे बहु उत्सुक तुज द्याया त्वत्कामपूर्तिकरवर ते ॥९६॥
हें सत्यसार संमत सुज्ञां संतासि सर्व साधुकरा ॥
समसदय तुम्ही सादर सदाशिवा सेवकेष्टसाधु करा ॥९७॥
साधुचरण साधूदर साधुहृदय साधुहस्त साधुमुख ॥
साधुनयन साधुश्रुति किंबहुना साधुमूर्ति साधुसुख ॥९८॥
पुसतां चि मुख्य तत्व प्रेमें होवूनि साश्रु तत्वांची ॥
गति तूं हें सद्रूपें केलें मूढांसि बा श्रुत त्वां ची ॥९९॥
तरती तारिति भजकां देती घेती हि हें यश पथानें ॥
साधु तुझे चरण वरद त्यांस हि जे दुष्ट हेय[११६] शपथानें ॥१००॥
आळ हठें घे ज्याची लावावा त्या चि तो पृथुक[११७] थानीं ॥
आकार रसैक्यांचा कैसा हो समजतो पृथु[११८] कथानीं ॥१०१॥
दासांचा हठ विजयी करितो चि तुझ्या हठासि तो गोळा ॥
भृत्यजिता करुणाब्धे न स्मरसी सुज्ञनाथ ही भोळा ॥१०२॥
रामाचें नाम अमृत तूं घनसा मीं हठीं हि चातकसा ॥
परमोदारा देवा होऊं देसील दीनघात कसा ॥१०३॥
पितरांपाशीं न तसा तुजपाशीं जेंवि दासहठ चाले ॥
आले सांगत ऐसें वृद्ध चि उपदेश ते मला झाले ॥१०४॥
सेवा केवा माझा किति शितिकंठा अहो महादेवा ॥
मेवा दे वात्सल्यें जननी जननीतितें चि दे ठेवा ॥१०५॥
जों मुग्धदुग्धजीवन तों देउनि तें चि पोषिती पितर॥
करुणा तरुणावरि मग करिति असी तों धणी स्वयें इतर ॥१०६॥

---

११२ बावळें=वेडें. ११३ धनप=कुबेर. ११४ अररा ? ११५ करवाळ=तरवार. ११६ हेय=त्याज्य. ११७ पृथुक=बालक. ११८ पृथु=मोठा.

माता चि अन्नपूर्णा विश्वंभर तूं चि तात विश्वास ॥
श्रीरामनामसंनिधि योग्या मज द्याल हें सविश्वास ॥१०७॥
रुसला कुमार अंबास्नेहेंही ह्मणति साधु न समजला ॥
तें वृत्त मोह करि परि परिहरि उपमन्यु भक्तिरस मजला ॥१०८॥
शंभो दिधलें नसतां येतें वदनासि रामनाम कसें ॥
टपत चि असतें पातक-कण-भक्षण-लक्ष दक्ष हें वकसें ॥ १०९ ॥
द्या द्या ह्मणतों त्याचा भाव असा कीं मुखीं असो अंतीं ॥
संतीं सदां म्हणावें नामप्रेमा मयूरवरपंतीं ॥ ११० ॥
प्रकटी प्रथम भगीरथ नृप लोकीं सुरनदीस ती आर्या[११९] ॥
तसि हे मयूर नाहीं तरि सर्वांला न दीसती आर्या[१२०] ॥ १११ ॥
उचित प्रचार भासो रसिकांस प्राकृतांत[१२१] आर्यांचा[११९] ॥
युष्मद्वरें चि होतो सत्कार प्राकृतांत[१२२] आर्यांचा[१२०] ॥ ११२ ॥
गद्यें ओंव्या सवया दोहांतें सर्व जाणती लोक ॥
श्लोक प्रिय त्यांस जयां प्रसन्न तूं पुण्यपूर्वकश्लोक[१२३] ॥ ११३ ॥
आर्यानाथा[१२४] आधीं छंदःशास्त्रांत पिंगळाचार्या[१२५] ॥
आर्याराध्या[१२६] देवा त्वां चि पढविली मनोहरा आर्या[१२०] ॥ ११४ ॥
आर्यासुधा बुधांनीं आकंठ प्राशिली च धन्यांनीं ॥
कानीं मात्र परिशिली होती हो ती सती तदन्यांनीं ॥ ११५ ॥
ते हे सुधा बुधांनीं मज लुब्धाला दिली सदा त्यांनीं ॥
केलों पात्र दयेला आधीं मग मी किलीस दात्यांनीं ॥ ११६ ॥
साधुप्रसाद आर्यामृतरस रसिकां सख्यांसि दाखवितों ॥
राखवितों मर्यादा हि यथामति मी वळें चि चाखवितों ॥ ११७ ॥
सुखद प्रचार रसिकां वाटेल प्राकृतांत आर्यांचा ॥
तुमच्या वरें चि जेंवि व्रजवासिप्राकृतांत आर्यांचा ॥ ११८ ॥
आर्यावृत्तक्षीरीं युष्मन्नुतिशुद्धशर्करा[१२७] प्राज्य ॥
वरि ओतिलें यथेष्ट स्वच्छ श्रीरामनाम भव्याज्य[१२८] ॥ ११९ ॥
भेटो रसिक लव हि जो ग्रंथा चषकांत[१२९] नूरवि प्रासी ॥
ऐसा वर दे वरदेश्वरचरणा मज मयूरविप्रासी ॥ १२० ॥

---

११९ आर्या=श्रेष्ठा. १२० आर्या=आर्या छंद. १२१ प्राकृत=सामान्य जन. १२२ प्राकृत=मराठी काव्य. १२३ पुण्य-पूर्वक-श्लोक=पण्य श्लोक=जनार्दन (पुण्य श्लोको नळो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः पुण्यश्लोका च वैदही पुण्यश्लोको जनार्दनः). १२४ आर्यानाथ=भवानीपती. १२५ पिंगलाचार्य=छंदशास्त्रकार. १२६ आर्याराध्य=श्रेष्ठपूजित. १२७ नुति=स्तुति. १२८ आज्य=(शेळीचें) तूप. १२९ चषक=वाटी.

उघडा करितां होइल दूषकखळदृष्टिमक्षिकापात ॥
रसिकासि शोधितों मीं तों चषकावरि असो तुजा हात ॥ १२१ ॥
अथवा रसिकपते तूं प्राशन याचें करीं जगंनाथा ॥
होईल विश्व तृप्त स्वामी मी ठेवितों पदीं माथा ॥ १२२ ॥
या चषकें नामामृत साधुश्रोत्राननें शिवा पी हो ॥
उचित महादेवा तुज सेव्या देवांसि अमृतवापी हो ॥ १२३ ॥
सेवा हो सेवा हो ह्मणतां अत्यादरें उठे शंका ॥
शुद्ध स्वादुत्वें हि श्रीमज्जनतृप्तिदुष्करा रंका ॥ १२४ ॥
आर्या दयिता चि तुझी आत्मस्तुति भलतसी हि तुज इष्टा ॥
शिष्टाश्रया न ह्मणसी राघवनामाहुनी सुधा मिष्टा ॥ १२५ ॥
जे साक्षाज्जगदंबा-बिंबाधर-चुंबनासि विसरविती ॥
ते हे स्वमतरसवर प्राशीं रसिका प्रमोदविसरें[130] विती[131] ॥ १२६ ॥
इतिश्रीरामनंदनमयूरेश्वरविरचितःश्रीरामनामामृतचषकः संपूर्णः

॥ पद ॥

भलतया हि जीवा ॥ रामनाम चि तारी ॥ भलतया हि जीवा ॥ध्रु०॥ अन्य मंत्र जपतां मळती लेश मात्र चुकतां चळती स्पष्ट त्यांत बहु कष्ट फल मदभ्रष्ट त्वरित मग नष्टपणें ची रामनाम ॥ १ ॥ योग याग हिमपर्वत रे त्यांत साधक न सर्व तरे सर्व गमे गुरुगर्वे होय अघपर्व त्यांत कवि सर्व हि म्हणति रामनाम ॥ २ ॥ भक्त मयूर दयाजलदा शीघ्र भेटवीं रामपदा फार सुलभ हित सार अमृतमणिहार सतत महित रामनाम० ॥ ३ ॥

## समाप्त.

---

## ॥ अथ श्रीरामरीतिर्लिख्यते. ॥

श्रीहरिदास न चुकती जें कोठें न्यून किमपि करितात ॥
दृग्दोषभीत मिरविति रुचिर शिशुसि सजुनि काय तरि तात ॥ १ ॥
अमृतात्यधिकरसभरित चरित प्रभुचें जयांत तें वस्तु ॥
न च सकळ जनां दाविति भाग्यवती जेंवि सुगुण हा अस्तु ॥ २ ॥

---

१३० विसर = समूह. १३१ विती = प्रसवती.

श्रीज्ञानदेव रचिता न च विसरति रसिक जे अति ज्ञाते ॥
मानससरोवराला हंस जसे करुनियां प्रतिज्ञा ते ॥ ३ ॥
सदभंगगातयां[1] बहु मधुर हि परवच रुचेल कां बाहो ॥
कोण ह्मणेल अमृतफळभुङ्मत[2] गोमंतकस्थ आंबा हो ॥ ४ ॥
श्रीवामन वेणु चि जन किति जेणें मोहिला पर स्वामी ॥
तद्ग्रंथज्ञ बुध ह्मणे कां इतरा आतळों परस्वा मी ॥ ५ ॥
ज्या श्रीमदेकनाथ श्रीमुक्तेश्वर कवींद्रकृत ओंव्या ॥
त्यां अन्याकृति माता सोडुनि दाया न बाळका होव्या ॥ ६ ॥
हिंदुस्थानी भाषा ग्वालेरी गोड ती हि पंजाबी ॥
सुरसिक कवि म्हणति इची तूं चि श्रीकृष्णपादकंजा[3] बी ॥ ७ ॥
श्रीसूरदास-तुलसीदास-कबीरादि-सुकवि-कवनातें ॥
सोडुनि लावील कवण रसिक दुजाशीं रिझोनि नव नातें ॥ ८ ॥
करिती जे पावुनि हरिदत्ता प्रतिभामहावरा[4] कवन ॥
त्या परकाव्य तरि ह्मणो सदुपवनकरा[5] पहा वराक[6] वन ॥ ९ ॥
ज्या वाजले यशाचे साधुकवींच्या सदैव हि नगारे ॥
तन्निरतांसि ह्मणेल क्षण हि कवन नव न दैव हि न गा रे ॥ १० ॥
ज्याची छाया निववी जैसा तैसा हि होय सुतरु च तो ॥
परलोक कामुकाला बहु नृप-पुत्रापरीस[7] सुत रुचतो ॥ ११ ॥
हरिभक्ता हर कीं हरभक्ता हरि नाठवे तसें एका ॥
भजतो त्या ग्रंथ दुजा न च चातक-खग वळे परा सेका ॥ १२ ॥
श्रीहरिहरभक्त जसे उभयत्र सुभक्तिची च चव घेती ॥
उभयग्रंथीं ऐसी रीति भले जाणती न अवघे तीं ॥ १३ ॥
निंदिति न मुखें किति परि निंदा चित्तांत कर्म फटकळ तें ॥
श्रवणीं जृंभान्यस्तुति-वार्तोद्युदयें करूनि अटकळतें ॥ १४ ॥
घेती सर्वत्र मधुप रस कीं हरिभक्त साधु सुरसिक ते ॥
असते रसज्ञ अमृतीं न च रमते साधुसूक्ति सुर सिकते ॥ १५ ॥
दिसति ह्मणविति हि भगवद्भक्ति रसिक साधुजन निपट थोडा ॥
अगणित असति सुमुख शुचिलक्षणसंपन्न थोडका घोडा ॥ १६ ॥
पुष्ट करावें अन्यग्रंथा सुरसें जसें सुता रोडा ॥

---

१ सदभंगगाता = साधूंचें स्तवन करणारा. २ अमृतफळ भुङ्मत = अमृतफळ खाणाऱ्याला मान्य. ३ कंज = कमळ. ४ प्रतिभा--महावर = ज्ञानरूपी मोठा वर. ५ सदुपवन = उत्तम बाग. ६ वराक = नीच. ७ नृपपुत्रापरीस = राजकुमाराहून.

ऐसा हरिहरभक्तांवांचुनि विश्वांत शोधितां थोडा ॥ १७ ॥
प्रतिभा[८]रूपा आज्ञा दिधली ज्या किंकरा[९] हरें अजितें ॥
साजितें जना अरसिका तत्कवन नवा ह्या तसें अजि तें ॥ १८ ॥
प्रथमिडसराचे हरि न वदुनि देतां न दान वरि पोहे ॥
कवि म्हणति रीति तव तव भक्तीं च परी न दानवरिपो हे ॥ १९ ॥
चरणीं समर्पिलें तें ह्रदयीं होऊनि बहु समुद्धरिसी[१०] ॥
न करिसि अनादर कधीं देऊनि सद्यश जडा समुद्धरिसी[११] ॥ २० ॥
गोपांच्या बाळांहीं प्रेमें जें काय तुज दिलें उष्टें ॥
तें सेवुनि तोषविले ते बहुत चि वत्सलें तुवां तुष्टें ॥ २१ ॥
ऐकों देव पुढें करमुख तूं उष्टयासि करिसि बा हर्षें ॥
तैं कोंदे वपु ढेंकर देसी चातक जसाचि दे वर्षें[१२] ॥ २२ ॥
बा तुज समर्पिला जो गिळिला उगळूनि तो हि सुग्रास ॥
तूं परमसदय करिसी गोपींसीं श्रीविलासभुग्रास[१३] ॥ २३ ॥
तूं "यत्करोषि[१४]"ऐसें वदलासि दिलें तयासि मन पार्थे ॥
कवि वाङ्मयें तपें तुज अर्पिति तीं जाहलीं च अनपार्थें[१५] ॥ २४ ॥
देवा तूं भावाचा म्हणती त्वद्भक्तजनकवि भुकेला ॥
भिल्लें प्रसन्नमुख जळपळ[१६]दानें स्कंद[१७]जनक विभु[१८] केला ॥ २५ ॥
त्वच्चरणार्पित अहित हि महितें[१९] हित महाप्रसादता पावे ॥
अन्यर्पितें विषें ही तप्त निवावे कधीं न तापावे ॥ २६ ॥
ज्यांची श्रुतिमति वाणी त्वत्कीर्तीची अधीनता पावे ॥
ते निजसार्थक्याच्या चिंतेनें तों कधीं न तापावे ॥ २७ ॥
तूं भगवान् हरि कीं हर भजनोत्साहा नतानवदशील ॥
म्हणसी सर्वा दीना भिवुनि भवीं[२०] हा नता न वदशील ॥ २८ ॥
घेतो नवी जुनी ही विधु[२१] दे ज्या काय मानव दशीला ॥
देवा तूं कृपण असें आपुलिया विधुसमा न वद शीला ॥ २९ ॥
प्रेमें तुजला होतें बा सुपदार्था समान वाईट ॥

---

८ प्रतिभा = ज्ञान. ९ किंकर = सेवक. १० समुद्धरिसी = समूद+हरिसी (समुद् = सहर्ष) ११ समुद्धरिसी = उद्धार करतोस. १२ वर्ष = पाऊस. १३ श्रीविलासभुग्रास = श्रीविलास भुक्+रास (श्रीविलास भुक् = लक्ष्मीशीं क्रीडा करणारा; रास = नृत्य). १४ यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासियत्। यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ २७ ॥ भगवद्गीता अध्याय ९ वा. १५ अनपार्थ = व्यर्थ नव्हेत अशी. १६ पळ = मांस. १७. स्कंद = कार्तिकस्वामी. १८ विभु = प्रभु. १९ महित = पूज्य. २० भय = संसार. २१ विधु = चंद्र.

रुचली तुला चि रुचती वा दीना ही न मानवा ईट ॥ ३० ॥
तापस-तर्पण[22] केलें जें त्वां सेवूनि शाक-पत्रास ॥
वाटे पावे कल्पुनि सर्वामृतदान नाकप[23] त्रास[24] ॥ ३१ ॥
भक्तार्पित कनक[25]कुसुम तें साक्षात्कनक[26]कुसुम भव मानी ॥
हें चि यशस्कर सुज्ञ प्रभु तुच्छ पदार्थ ही न अवमानी ॥ ३२ ॥
चाखुनि रस तुज भोळ्या शबरीनें जीं समर्पिलीं बदरें ॥
देवा तीं अमृतफळाहुनि बहु मानूनि घेतलीं पदरें ॥ ३३ ॥
म्हणसी सेवूनि दीना दासांचे मंद बोल कानांहीं ॥
ऐसा कश्यप दशरथ शौरि तथा नंद बोलका नाहीं ॥३४॥
निश्वास[27] वेद ज्याचे ऐसा सर्वज्ञ तूं तुला रुचतें ॥
जरि न स्तवन भलतसें तरि कवणा नीट तें कसें सुचतें ॥ ३५ ॥
न्यास्तव रचुनि दयास्तव सुजना देती तव प्रिया लिहुनी ॥
दास अधिक दासाहुनि जाणें न प्रियसखी प्रियालिहुनी ॥ ३६ ॥
त्वद्भक्त शिरोनि तव स्तवनीं कवनीं रसासि चाटुनि घे ॥
तदितर जो जन भोजनकरकामें भाजना[28]त चाटु[29] निघे ॥ ३७ ॥
ग्रंथीं शिरूनि ढवळुनि सेविति सारा हि नर विलासा जे ॥
विरसा चपळा तन्मतिरीति सखी काय न रविला साजे ॥ ३८ ॥
खळ वोधिला हरिजनें तो तातें बाळ भराविला साचा ॥
आंत न ने चि हितकर हि दुष्कृत कळिकाळभर विलासाचा ॥ ३९ ॥
त्वज्जन म्हणे जना रे श्रीपतिचे शर्म[30]कर विलास वदा ॥
पुत्रासि साहुकारें जेंवि कथुनि धर्म करविला सवदा ॥ ४० ॥
सुजनांत ऐकत करुनि आवश्यक कर्म नर विलास वसे ॥
स्पष्ट करावे लागति त्या दुसरे धर्म न रविला सवसे[31] ॥ ४१ ॥
सुरस हरिविलासाचा कीं घे कळिकाळ हरविलासाचा ॥
पण लीलापूर्व करुनि तेणें कळिकाळ हराविला साचा ॥ ४२ ॥
त्वच्चरितांतिल देवा त्वद्भक्तमनांत न रस नाचावे ॥
साधूंत सर्व मायिक म्हणुनि हि कीं धृष्ट न रसना[32] चावे ॥ ४३ ॥
रीति तुतें ती च भजे बहु मिळवाया यशास साधूंतें ॥

---

२२ तर्पण=तृप्ति. २३ नाकप=स्वर्गस्वामी ( इंद्र ). २४ त्रास=भीती. २५ कनक =धोतरा. २६ कनक=सोनें. २७ यस्य निश्वसितं वेदा वेदभ्यो योऽखिलं जगत् । निर्ममे तमहं वंदे विद्यातीर्थमहेश्वरम् ॥ १ ॥ २८ भाजन = भांडें २९ चाटु=पळी. ३० शर्म=सुख. ३१ सव=यज्ञ ३२ रसना=जीभ.

जें साम्य साधिलें श्रुति-शास्त्रांहीं मीं कशास साधूं तें ॥ ४४ ॥
तूं स्वगुणें करिसि जसी तासि च करी सर्व पापहानि खळ ॥
कीं साधुसम चि परहितकर हा बा सर्वपापहा निखळ ॥४५॥
जैसी सिंधुवधू[33] ती धूती तैसी च पापराजि[34] भली ॥
गंगा तेंवि तव जना प्राप्तखळाची न वा परा जिभली ॥४६॥
देवा निरामयें[35] सुखी शतवत्सर सर्व खळ असावेच ॥
न प्रार्थितां न च करिल पंकाचा तीर्थजळ असा वेच ॥४७॥
हरिभक्त असे हरिजन तैसे हरिदास सर्व ही ऐसे ॥
यापरि कसें तरि तुझें नाम मुखीं त्यांसि नरक बा कैसे ॥४८॥
त्वन्निंदक तरति तमीं सन्निंदक हे च सांग कां बुडती ॥
तरि सत्कीर्ति जसी हरिकीर्ति तसी मी ह्मणोनि कां उडती ॥४९॥
मी साधु एक ह्मणसी न च दाखविसि क्रियेंत हा भेद ॥
त्वन्निंदकसन्निंदकफळभेद चि वाढवी मनीं खेद ॥५०॥
संसारिराति गणिका[36] जसि तसि हरिभक्तसाधुरीति सती ॥
निंदीना कां देवा ठावी तीची न माधुरी तिस ती ॥५१॥
हरिदासातें निंदिति हरिदास नव्हे नवी च हे रीती ॥
गोपी अंगुलि मोडिती कुब्जेवरि शुक कवि च हेरी ती ॥५२॥
हरिभक्ता कर्म ठकवि निंदिति हरदास कर्मठ कवींतें ॥
दोष कळोनि हि रुचतो प्रबळ प्राचीन कर्म ठकवीतें ॥५३॥
सगुणपरा निर्गुणपर निंदिति निर्गुणपरा सगुणपर ते ॥
रामा कृपाकटाक्ष न योजिसि जों स्पष्ट तों न गुण परते ॥५४॥
निंदेतें मन माझें श्रीगिरिशाचें जसें न तापावें ॥
श्रीरामा कीं भलत्या त्वद्दासाचें तसें नता पावें ॥५५॥
पाहुनि बळिस न दितिचा[37] साहे सन्मति हि अदिति[38] सुतपातें ॥
तसि च अदितिचा पाहुनि देवा तुजला हि न दितिसुतपातें॥ ५६ ॥
जो सप्रसाद यातें न च साहे विप्रसाद[39] या लोकीं ॥
सर्वज्ञा किंचिज्ज्ञस्वजनार्थी विप्रसा दयाळो कीं ॥५७॥
श्रीरामा जाणसि जरि तरि हि तुज निवेदितोंचि मद्रीती ॥
माझ्या ठायीं च वरी मज हे मद्रांत[40] जेवि मद्रीती[41] ॥५८॥

---

३३ सिंधुवधू = गंगा. ३४ राजि = पंक्ति. ३५ निरामय = रोगरहित. ३६ गणिका = वेश्या. ३७ दिति = दैत्य-माता. ३८ अदिति = आदित्यांची (देवांची) माता. ३९ विप्रसाद = ज्याचेवर प्रसाद ( कृपा ) नाहीं असा. ४० मद्र = देशविशेष. ४१ मद्री = मद्रदेशस्थ स्त्री.

धातूंत जसें हाटक[42] नाटक वर[43] सर्व सुप्रबंधांत[44] ॥
तें अरसिकांत. संप्रति निष्फळसें मुकुरें[45] जेंवि अंधांत ॥५९॥
रस न समजति ह्मणविति रसिक म्हणुनि चित्त बहुत हळहळतें ॥
जें तन्निदक भाषण होतें कर्णांत तप्त हळहळ[46] तें ॥६०॥
थोरांहीं स्तविले कवि तन्निंदा तिळ हि सोसवत नाहीं ॥
मज सुरस ग्रंथांहीं वृत्तिपरा जेंवि सोस[47] वतनांहीं ॥६१॥
ज्या सेतुनें भवनदी वाहुनि संसारखेदभार तरे ॥
धर्मार्थकाममोक्षप्रतिपादन ज्यांत वेद भारत रे॥६२॥
त्याला कैसे करितां इतरपुराणांसमान किति हास ॥
चित्तांत आवरावा ह्मणतों रे हा मुकुंद इतिहास ॥ ६३ ॥
श्रीमद्रामायण जें कोणी कांहीं ह्मणेल जरि त्यातें ॥
त्याला राक्षस ह्मणतों मी सन्मार्गात विघ्नकरित्यातें ॥ ६४ ॥
श्रीमद्भागवत मला निज-पूर्वजपुण्यचरितसें वाटे ॥
तत्कथितात्मनिधानालाभें कंठ क्षणक्षणीं दाटे ॥ ६५ ॥
श्रीविष्णुपुराणाचि श्रीभागवतें तसी च गति केली ॥
वृंदावनें जसी श्रीसाकेताची[48] प्रसिद्धि मृदु ठेली ॥ ६६ ॥
सद्व्यसनीं वेचावें आयुष्य नसे चि भरंवसा याचा ॥
झालों जीर्ण तरि मनीं आहे रसिकांत भर वसायाचा॥ ६७ ॥
त्वत् प्रीत्यर्थ तव सुगुणमय चि करुनि कवन वेचितों देहा ॥
उत्साह त्वत्कीर्तनरस चित्ता नवनवेचि तों दे हा ॥ ६८ ॥
समजुनि द्यावी वळवुनि सेवेनें सुरसिका बिहारी ती ॥
म्हणतो अद्यापि तसी वेडा भूसुरें[49] शिकावि हा रीती॥ ६९ ॥
श्रीरामा बहु गोड चि मजला ऐसें दुकाळल्या सर्व ॥
कोठें मिळतें कैंची शक्ति धरिन मी मनांत कां गर्व ॥ ७० ॥
श्रीरामा न तुज पुढें म्यां दीनें दीनरीति बोलाव्या ॥
योग्य तुझी च तुजपुढें सुसभा परिसोनि जीस डोलाव्या ॥ ७१ ॥
शांति नसे श्रीरामा हें विनवायासि बोलिलों देवा.
श्रीपद या ठेव शिरीं किंवा म्हण निज जनासि तरि ठेवा ॥ ७२ ॥
श्रीरामा सर्वांच्या रीतींत तुझी च सुमहिता रीती ॥

---

४२ हाटक=सोनें. ४३ वर=श्रेष्ठ. ४४ सुप्रबंध=उत्तमकाव्य. (काव्येषु नाटकं रम्यं). ४५ मुकुर=आरसा. ४६ हळहळ=विष. ४७ सोस=हांवरेपणा. ४८ साकेत=अयोध्या. ४९ भूसुर=ब्राह्मण. ५० सुम=फूल.

तत्काळ नता सर्वा एक हि नेच्छूनि सुमं[50] हि तारि ती ॥ ७३ ॥
सुगळीं[51] बिभीषणीं जी दाखविली सर्व ही परि सुरीती ॥
हे सुविरक्ता भुलवी न च परममनोहरा परि सुरी[52] ती ॥ ७४ ॥
रामा बहुतांसि तुझी बहु दावुनि रीति कोवळीक वळी ॥
जैसी निज बाळातें हृदयाची माय कोंवळी कवळी ॥ ७५ ॥
आवडल्या हि न मागे संकोच धरूनि पावणा शेंगा[53] ॥
तो जड रसिका आर्या या पाठकरूनि पावणाशें[54] गा ॥ ७६ ॥
मज अभिमान नसे म्यां रामपदाच्या चि वाहिल्या आणों[55] ॥
आर्या मनीं सुजन हो श्रीरामपदीं च वाहिल्या आणों[56] ॥ ७७ ॥
जीभ विनिव तीकरवीं प्रभुचे गुण सबहुमान वानीव ॥
तापत्रयें भवीं या बा तापें न बहु मानवा नीव ॥ ७८ ॥
श्रीगौरी हि ह्मणे मजहुनि पटु मत्कांतभक्तिते वारिती ॥
विषयीं सज्ज न सज्जन मज्जन[57] मज्जनकनुतयशीं कारिती ॥ ७९ ॥
कागद होति यमाचे करितां चि यथामति स्तवन कोरे ॥
सत्य चि हें बा श्रोत्या चित्तांत ह्मणों अतिस्तव नकोरे ॥ ८० ॥
गुरु ह्मणति करीत चि जा प्रभुचाचि यथामति स्तव न राहो ॥
येथें चि अघहति[58]स्तव सक्त रतिस्तव गतिस्तव नरा हो ॥ ८१ ॥
करितां खशाबशा स्तव होसिल चि जनीं महायशा त्रास ॥
ह्मणातिल सज्जन भगवद्भजनीं होउनि सहाय शाबास ॥ ८२ ॥
स्तव शिकल्या उचित जवळि करुनि सदा सदय सत्सभा टपणें ॥
हे वर्ण्या चि न वर्णू पशुतिस्तव सुरभि[59] वत्स भाटपणें ॥ ८३ ॥
साधुसभेनें नाहीं कोणाचा कोण उद्भव[60] पुरविला ॥
अन्य किति ईत आल्या वाटेल स्वीय शुद्ध वपु[61] रविला ॥ ८४ ॥
हे ह्मणाति नंदनींचे पुरिव विषयिकामराशि शोभ लते ॥
भुलिव स्वौदार्ययशें मंदारा पामरा शिशो भलते ॥ ८५ ॥
तसि हे जासि रामपदीं झाली गुण सुखानि जानकी रमती ॥
ईत ह्मणेल इरा हे मजला दे सुख निजा न कीरमती ॥ ८६ ॥
वर्णिति साधुसभेची बहु सोडुनि गर्व सुरसभा रीति ॥

---

५० सुम=फूल. ५१ सुगळ=सुग्रीव, ५२ सुरी=अप्सरा. ५३ शेंगा=करंज्या. ५४ पावणाशें=७५ (पंचाहात्तर.) ५५ आगा=शपथा. ५६ आणा=( मनीं ) आणा. ५७ मज्जन=स्नान, बुडी. ५८ हति=नाश. ५९ सुरभि=कामधेनु ६० उद्भव=आनंद. मनोरथ. ६१ वपु=शरीर.

आह्मांहूनि शतगुणें देणारी सर्व सुरस भारी ती ॥ ८७ ॥
जसि सत्सभा न भुलवी कृष्णा दावूनि वदन राधा या ॥
हे ह्मणति ये सुखें धा वा इतरांला हि वद नरा धा या ॥ ८८ ॥
साधुसभा जेंवि असी कोणी हि नरा सभा समहिमा न ॥
ईस न भजतां फिरतां क्षोणी हि न रासभा[६२]सम हि मान ॥ ८९ ॥
हे पटु कळंकरूपा क्षाळाया इंदुपातका नांदे ॥
वा या अमृतनदीचा एक तरी बिंदु पात कानां दे ॥ ९० ॥
तितुकी सत्कृति कैंची जो कोणी अश्वमेधयाजी[६३] या ॥
श्रितसत्सभांसि ह्मणती हरिहर तुमचा चि वेव या जी या ॥ ९१ ॥
जी सत्सभेसि अनता[६४] जनता[६५] सोडूनि परिस[६६] भागावी ॥
साधूंची सुज्ञानें बहु हरिहरकीर्तिपरि सभा गावी ॥ ९२ ॥
सत्कारिला इणें जो तो रंक हि सुरवरासि सत्कार्य ॥
किंबहुना श्रीहरिहर आंगें करितिल जपोनि तत्कार्य ॥ ९३ ॥
तुळितां देवसभांसीं सुयशें होऊनि तदधिका राहे ॥
करिल चि पणांत कुतुकें त्यांतें गोवूनि तदधिकारा हे ॥ ९४ ॥
जे भाट[६७] सत्सभेचे झाले न च तोंड हिमटवाणी तें ॥
मनुजा ह्मणेल लटिकें हें तरि तत्काळाचिमट वाणीतें ॥ ९ ५॥
श्रीसत्सभा भगवती प्रेमें शरणागतासि आपंगु ॥
पावेल चि अत्युत्तम गतिस सुखें जरि मयूर हा पंगु ॥ ९६ ॥
आपंगिलों चि आई साधुसभेनें तरी च गा याची ॥
मति झाली श्रीहरिहर तज्जनचरितें वरीच गायाची ॥ ९७ ॥
दावुनि इणें दिला धरि वदनीं धुतां दास हरि लगामातें ॥
जो वदला विधि[६८]सि मम स्मरण सकळ मोह हरिल गा मातें ॥ ९८ ॥
कळवित आली हितकर मार्ग पुढें ही जनास कळविल या ॥
पातक नेइल हरिहरचरणीं लावुनि मना सकळ विलया ॥ ९९ ॥
अति दुर्लभा प्रसादामृतनिधिचा भक्ति नउ जरी लहरी ॥
प्रणत कुरीतिस काय प्रकटुनि पद शक्ति न उजरील हरी ॥ १०० ॥
भक्तमयूरें वंदुनि कळविलि करुणाघनास तुज रीती ॥

---

६२ रासभ = गाढव. ६३ अश्वमेधयाजी = अश्वमेध करणारा. ६४ अनता = नम्र नव्हे अशी. ६५ जनता = लोक-समूह. (ता प्रत्यय समूहवाचक आहे—जसें बंधुता = बंधुसमुह.) ६६ पारिस = स्पर्श मणि (ज्याच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें.) ६७ भाट = स्तुतिपाठक. ६८ विधि = ब्रह्मा.

कुब्जेसि तसी च तुझी प्रणतकुरीतिस दया चि उजरीती ॥ १०१ ॥
हा ग्रंथ रामरीति च यांत श्रीरामरीति सारा जी ॥
याच्या हि व्याख्यानें सुरसिक हो स्वाधिभीतिसा राजी ॥ १०२ ॥
तीं आगळें असें हें आर्यांचें मधुर एक शत गावें ॥
याचें गायन जोंवरि तों वरि तरि किमपि दुःख न तगावें ॥ १०३ ॥

॥ इति श्रीमन्मयूरपंडितकृता श्रीरामरीतिः संपूर्णा. ॥

## समाप्त.

---

## विष्णुपद-वकीली.

श्रीविष्णुपदा आलों शरण तुतें भिवुनि कालसर्पा या ॥
कैचें शुचि धन न शके तुज तुळसीदळ हि एक अर्पाया ॥ १ ॥
श्रीपांडुरंगरायें मज तुज वंदावयास पाठविलें ॥
तारिति साधु असें म्यां त्या प्रभुनें ही मनांत आठविलें ॥ २ ॥
श्रीविष्णुपदा आला मज घेवुनि अमरसिंह हा राजा ॥
यश जोडुनि ह्मणणारे रे रुचसि जडा न रत्नहारा जा ॥ ३ ॥
श्रीविष्णुपदा वाटे त्वदितर जें काय तें असार मला ॥
जड ही तुज पावोनि ब्रह्म जसें आयतें असा रमला ॥ ४ ॥
श्रीविष्णुपदा होती वंदुनि बहु धन्य हे तुला जीव ॥
या परि च पाव सकळ हि सद्गतिचे अन्य हेतु लाजीव ॥ ५ ॥
विष्णुपदा तूं मूर्त त्रिजगत्कल्याण संततोदार ॥
जो तुज पावे पाहे इतर प्रभुचें न संत तो दार ॥ ६ ॥
विष्णुपदा त्वां केले पितरांचे अनृण शरण जे आले ॥
झाले विघ्न व्याकुळ विधिचें बळ न तिळ तुज पुढें चाले ॥ ७ ॥
श्रीबाबूरायप्रभु माझा अत्यंत सदय अन्नद हा ॥
आर्थिजना न ह्मणो दे तैसें तप्तास जेंवि सन्नद हा ॥ ८ ॥
श्रीगायत्री-गंगा-गीता-सिद्धेश्वरैकभक्तार्ते ॥

---

६९ तीं आगळें=तिहींनीं अधिक असें.

१ ही आर्या आह्मीं पंतांचे चरित्रांत दिली आहे. २ या अमरसिंह राजाविषयींही चरित्रांत उल्लेख आहे. ३ विधि=नशीब ४ ही चरित्रांत दिली आहे. ५ हा=दर्शक सर्वनाम ६ सन्नद=उत्तम नदी. ७ हा=हाय हाय.

या विष्णुपदा मुक्ति न वरिल कसी गुरुपदाब्जसक्तातें ॥ ९ ॥
परि याच्या उद्देशें विष्णुपदा पिंड अर्पिला भावें ॥
तव अर्चनीं यश जनें सुक्षीरीं जेंवि सर्पि लाभावें ॥ १० ॥
स्मरती ताईबाई पुण्ययशीं धरुनि लोभ विष्णुपदा ॥
सुखवीं जो तुज भजतो होतो चि सुपात्र तो भविष्णुपदा ॥ ११ ॥
कमळाबायी सदया जननीजननीति आश्रितीं दावी ॥
बा विष्णुपदा तीतें करुनि कृपा भेटि सर्वथा द्यावी ॥ १२ ॥
दे नीलकंठराया दर्शन देवूनि पुण्ययश गाया ॥
विष्णुपदा ह्मणसि जना करितों सर्वा हि सिद्धि वशगा या ॥ १३ ॥
ऋण कृष्णराय नेवू तुजला वाहोनि पिंड विलयातें ॥
विष्णुपदा नमन तुझें संसारवनीं न हिंडविल यातें ॥ १४ ॥
श्रीपांडुरंगराय प्रेक्षुनि तुज या जगांत हो धन्य ॥
श्रीविष्णुपदा व्हावें यासि यश जसें तसें नको अन्य ॥ १५ ॥
श्रवणीं प्रेमाश्रु जया येती तो फार आठवे दाजी ॥
या गति दे विष्णुपदा पावावी करुनि पाठ वेदा जी ॥ १६ ॥
शुचि सुव्रत जो ज्याची ती च अनुद्वेगहेतु मुद्रा जीं ॥
श्रीविष्णुपदा तारी तो सज्जन विष्णुभक्त रुद्राजी ॥ १७ ॥
श्रीविष्णुपदा येवुनि आबाजी वेंकटेशसुत पाहो ॥
याचा तव सत्कारें कुळकर्ता सुप्रसन्न सुतपा हो ॥ १८ ॥
न कधीं च करी रोष सुजनाचे तिळ हि गाल फुगती तें ॥
श्रीविष्णुपदा पावो तो छोटेलाल साधु सुगतीतें ॥ १९ ॥
यात्रा असे कपाळीं हें केलें स्ववच सत्य दादानें ॥
विष्णुपदा तो निववीं जें देसी अमृतदान या दानें ॥ २० ॥
श्रीविष्णुपदा बापा पापा हरिसी निवारिसी तापा ॥
जो आठवला आपा या पाव प्रार्थुनि स्वयें मापा ॥ २१ ॥
निववी दामोदरसा दामोदर साधुमन असा रसिक ॥
तारी विष्णुपदा जो न सिके न ह्मणे परा असार सिक ॥ २२ ॥
तारीं प्रभाकरातें वरि च दिसे यन्मनीं न राग वसे ॥
श्रीविष्णुपदा सद्यश बहु ऐशा तारितां नरा गवसे ॥ २३ ॥
रखुमाबायी भक्ता परि तुज पावावया नसे शक्ता ॥
विष्णुपदा तारावी तारिसि तव कीर्ति हे जगीं व्यक्ता ॥ २४ ॥

---

८ सर्पि=तूप.

श्रीदत्तात्रेयातें आराधुनि तें चि पावला नाम ॥
विष्णुपदा मुक्त चि तो तुज भेटावा असा असो काम ॥ २५ ॥
दे दर्शन विष्णुपदा मज सांगे सन्मुहूर्त आबा या ॥
कीं विष्णुभक्तसदनीं सिद्धांतें कथिसि नित्य राबाया ॥ २६ ॥
श्रीविष्णुपदा प्रेमें माता म्यां जीस मानिलें आहे ॥
पाहे तुज जी अंतीं संतीं स्मरिलें स्मरो तरो बा हे ॥ २७॥
तोया यादं वराया ज्या प्रेम्या धरितसें भला भजनीं ॥
तो या यादवराया प्राप्त असो कीं दुजा न लाभ जनीं ॥ २८ ॥
विष्णुपदा मानवती त्र्यंबकरायासि लोक संसारीं ॥
हें न बहु मानवावें ज्यांच्या हृदयांत शंभु कंसारी ॥ २९ ॥
श्रीविष्णुपदा सांग स्वामीतें बहु सुखी विसोबा हो ॥
कीं प्रभु ह्मणतो गजसा सुयशस्कर आर्त जन·दिसो बाहो ॥ ३० ॥
विष्णुपदा दाखीव स्वभजनपथ वासुदेव कृष्णातें ॥
पावो जेंवि अजामिळ पावे अथवा सुदेव कृष्णातें ॥ ३१ ॥
विष्णुपदा ह्मण पावुनि मज बापूभक्तजामदारा गा ॥
कीं ह्मणसि त्यजुनि प्रभु नामकथासक्त ज्या मदा रागा ॥ ३२ ॥
प्रभुगुरुसेवा सादर बहु आबाजी तसा च गंगाजी ॥
विष्णुपदा गति याला दे ती पावे कधीं न भंगा जी ॥ ३३ ॥
तूतें गुणरत्नांचा कमळाकरनाम जो ढवा पूजी ॥
विष्णुपदा जोडुनि दे वांछी तत्पुत्र जोड बापू जी ॥ ३४ ॥
अर्थिजना मागाया बहु उत्सव कर्णकीर्ति दे मग या ॥
रामसुता विष्णुपदा देईल असी सुबुद्धि का न गया ॥ ३५ ॥
विष्णुपदा दे दर्शन पुनरपि करुणा करूनि बाबातें ॥
हा बा तेंवि करितसें प्रेम करी जें द्रवोनि आबातें ॥ ३६ ॥
सद्बुद्धि बाळ राघव सुरसिक हे कीर्तनीं सदा सक्त ॥
तारावे विष्णुपदा संसारीं तारिले जसे भक्त ॥ ३७ ॥
श्रीहरिदास सदाशिव तारीं पावो कधीं न साधि[11] लया ॥
विष्णुपदा ह्मण भुक्ति हि मुक्ति हि होउनि अधीं न साधिल या ॥३८॥
जो श्रीपति नीराजी नीरांजी[12] विष्णुतें सदा भावें ॥
व्हावें तव दर्शन या संसारीं यासि सर्वदा पावें ॥ ३९ ॥

---

९ याद=जळचर. १० कंसारी=कृष्ण ११ साधि=दुःखी. १२ नीराजी=ओंवाळी.

हें पुण्यकार्य नेलें सिद्धिस गंगाधरें पराडकरें ॥
सत्पुरुष अशक्ताची काय प्रक्षाळिती न रांड[13] करें ॥ ४० ॥
प्रेमें घेवुनि आले साधु जगन्नाथपंत जे कुंटे ॥
योग्यचि हें जन्ममरण सत्पुरुषाच्या अनुग्रहें खुंटे ॥ ४१ ॥
सन्मित्रपुत्र विठ्ठल आर्यांच्या सेवनीं जया गोडी ॥
श्रीविष्णुपदा यावरि करुणा करुणालया नसो थोडी ॥ ४२ ॥
तुतें भजुनि निवावा राम जगन्नाथ पुत्र हा दुसरा ॥
प्रेमें सेवूनि निवे हंस जसा नित्य मानसा सुसरा ॥ ४३ ॥
सेवी अनंतभट्ट श्रेष्ठा जी वाट ती सखेदास ॥
या रक्षीं विष्णुपदा कीं प्रभुला वाटती सखे दास ॥ ४४ ॥
हरिभक्तां हीं केलें प्रकट श्रीहरिकथेंत जें उक्त ॥
या पुण्यें विष्णुपदा बहुधा करणार तूं मला मुक्त ॥ ४५ ॥
आ × × नेलें लावी श्री गंगेशीं पदस्थिरज नातें ॥
उत्तम लोकीं मिळतें त्या पाप्या ही पद स्थिर जनातें ॥ ४६ ॥
तारावें उपकर्ते जे सज्जन विठ्ठलादि गोसावीं ॥
पोसावीं निज बाळें विष्णुपदा लंघनें हि सोसावीं ॥ ४७ ॥
या भव्य हेतु तुझें आयकिलें परम भव्ययश कानें ॥
त्वदनुग्रहपक्षीश्वरें[14] उडवावा काय कर्ममशकानें ॥ ४८ ॥
माझ्यासद्गुरुवंशीं झाले आहेत पुरुष होतील ॥
विष्णुपदा ह्मण यांच्या श्रीगुरु कर्णांत अमृत ओतील ॥ ४९ ॥
मैराळ बहु प्रेमळ विष्णुपदा विष्णुकीर्ति जो गातो ॥
स्वप्रिय भक्त करावा आहे सद्भक्तिकीर्ति जोगा तो ॥ ५० ॥
वैरागी हरिदास प्रेमळ जो नित्य सत्कथाच वदे ॥
विष्णुपदा हा तारी यासि सुधेहुनि सक्तता चव दे ॥ ५१ ॥
नारोपंत त्र्यंबकपुत्र महादेवपंत हे दास ॥
विष्णुपदा पावावे संसारीं सर्वथा न खेदास ॥ ५२ ॥
श्रीविष्णुपदा सदया व्हावी च तुझी कृपा कृपारामीं ॥
दीनोद्धारीं प्रभुला बहु सुख जैसें नृपा नृपारामीं ॥ ५३ ॥
तारावें विष्णुपदा मजवरि सुस्नेह करिति जे सिंपी ॥
घन चातकीं करि दया परि अमृतें देश सर्व ही सिंपी ॥ ५४ ॥
जो मोरापा सद्गुण मैराळप्रमुख जे तया भ्राते ॥

---

१३ राड=चिखल. १४ पक्षीश्वर=गरुड.

रामोपासक सर्व हि तारावें हरिपदा दयाभ्रांतें[१५] ॥ ९९ ॥
विष्णुपदा तुज पूजुनि पुष्कळ सुख बाळ हेंदरा लाहो ॥
दाया समर्थ न नता या संसृतिजाळ हें दरोला[१६] हो ॥ ९६ ॥
श्रीविष्णुपदा पावुनि तुज भिवजी खोत हो तसा पाळी ॥
निजधर्म ह्मणे हरिहरि तारावा जेंवि सांवता माळी ॥ ९७ ॥
विष्णुपदा यश घेसी ह्मणुनि तुज प्रार्थितों उदारा मी ॥
तव कोंडदीक्षितीं हो राजारामीं कृपा उदारामीं ॥ ९८ ॥
हरिदास महादेव प्राकृत ते लोक ह्मणति वेडा या ॥
याचें श्रीविष्णुपदा तूं चि प्रभु दुःखदैन्य फेडाया ॥ ९९ ॥
प्रेमें हरिहरनामें बहु गातो नालबंद संभाजी ॥
विष्णुपदा याची हे वृत्ति बरी स्पर्शली न दंभा जी ॥ ६० ॥
विष्णुपदा ह्मणतो हरिहर कृष्णा गौंड या नता पावें ॥
भगवन्नामनिरत जो तेणें तापत्रयें न तापावें ॥ ६१ ॥
जे रामजी उदाजी ते विष्णुपदा सुखी करावे च ॥
प्रभुपाशीं शद्बाचा दीनाच्या पालनीं बरा वेंच ॥ ६२ ॥
ज्या बाबूरायाची तत्पुत्रांची हि साधली सेवा ॥
विष्णुपदा तारावे ते सर्व हि विनिव तूं असें देवा ॥ ६३ ॥
विष्णुपदा तारीं जो स्मरतो सप्रेम हरिस खाटिकतो ॥
कष्टीं न टिके दीनाजवळ इतर एक परि सखा टिकतो ॥ ६४ ॥
विष्णुपदा न विटसि वर बहु दीनें मागतां गळां पडुन ॥
कीं प्राकृत ही मानी बाळाचें मागणें पिता कडु न ॥ ६५ ॥
बहु उपकारी नरसो साबाजी यासि पाव विष्णुपदा ॥
दे मोक्षपद चि याला सदया देवूं नको चि विष्णुपदा ॥ ६६ ॥
मातेहूनि बहु दया केली आदर करूनि आकानें ॥
विष्णुपदा तारीं गुण घ्यावे च इचे करूनि आ कानें ॥ ६७ ॥
वदला प्रसन्न चित्तें साहित्य करूनि बंधु आबा जा ॥
विष्णुपदा तारावा याची सगुणा असी च बा भाजा[१७] ॥ ६८ ॥
मीं जरि अशक्त निर्धन कोपी तरि बहु भली रमा भार्या[१८] ॥
ईतें सद्गति दे तूं हे चि करी प्रथम बोध या कार्या ॥ ६९ ॥
मज संरक्षित आले संभाजी शंभु साधु केदारी ॥

---

१५ दयाभ्र=कृपामेघ १६ दर=भय. १७ भाजा=भार्या. १८ एथें पंतांनीं खुद्द आपल्या स्त्रीच्या उद्धारार्थ वकीली चालविली आहे.

विष्णुपदा तारावे हे देउनि यांसि बोध खेदारी ॥ ७० ॥
भरवहनें वृषभांचें जैसें वहु दुःख तेंवि भोयांचें ॥
श्रीविष्णुपदा ऐसें जें दैन्य उडिव तें विभो यांचें ॥ ७१ ॥
जो विष्णुकीर्तनातें बहु जोडी लुब्ध जन जसा हेमा ॥
नेमा न चुके तारीं विष्णुपदा विष्णुभक्त तो खेमा ॥ ७२ ॥
भ्रात्यांसि मज अपत्यें जेंवि दहांची तसीं च आहेत ॥
पुरवीं विष्णुपदा रत व्हावीं हरिगुणरसीं च हा हेत ॥ ७३ ॥
विष्णुपदा तारावा त्वां केशवपंत जेंवि सुत तातें ॥
कर्तव्य चि सर्वज्ञा जेणें होय स्वकीर्ति सुततता[19] तें ॥ ७४ ॥
विष्णुपदा तुज नमुनि हि मोरो मल्हार बहुत कष्टतसे ॥
शरणागत जे त्यांचे त्वां केले काय न हुत कष्ट तसे ॥ ७५ ॥
ज्यांसि दिलें दर्शन ते मुक्त चि उरला हि सर्व तारावा ॥
वारावा अकरावा हो विष्णुपदा गदांधि[20] वारावा ॥ ७६ ॥
श्रीविष्णुपदा दर्शन देवुनि ज्याचे निवारिले दोष ॥
चुकतां विरक्ति विषयीं देवा सदया करूं नको रोष ॥ ७७ ॥
श्रीविष्णुपदा वार्णिति तुज बहु सत्कवि मुखें वदान्यातें[21] ॥
कीं भक्तमयूराश्रा म्हणसी जें प्रिय सुखें वदा न्या तें ॥ ७८ ॥
विष्णुपदा तारावे जांवाई सर्व मामक[22] व्याही ॥
हव्या[23] हीना यांच्या साङ्ग करू विष्णुनाम कव्यां[24] ही ॥ ७९ ॥
विष्णुपदा दांडेकर केशव करुणा करूनि लक्षावा ॥
वा तुज पदर पसरितो भवसिंधु-निमग्न दीन रक्षावा ॥ ८० ॥
श्रीविष्णुपदा सदया वरदा प्रणताखिलामरद्रो[25] हें ॥
कवि कथिति भस्म होतो षडरिगण स्मरें[26] जसा हरद्रोहें[27] ॥ ८१ ॥
विष्णुपदा सुखवावे गाणारे कीर्ति जेंवि भाट तसे ॥
वाटतसे प्रभुसि असें प्रेमें कंठांत बाष्प दाटतसे ॥ ८२ ॥
सुकवि कथिति कीं सर्व प्रणतांचें इष्ट विष्णुपद वीतें ॥
किंबहुना भव्याच्या पावे तुज नमुनि जिष्णु[28] पदवीतें ॥ ८३ ॥
विष्णुपदा हर्षविती प्रभु त्यातें कीर्ति गाय जो भाट ॥

---

१९. सुतता=चांगली विस्तृत. २० गदाधि=रोग-व्यथा. २१ वदान्य=उदार. २२ मामक=माझे. २३ हव्य=देवास दिलेलें. २४ कव्य=पितरांस दिलेलें. २५ प्रणताखिलामरद्रु=सर्व शरणांगतांचा कल्पवृक्ष २६ स्मर=मदन. २७ हरद्रोह=शिवाचा-द्वेष २८ जिष्णु=अर्जुन.

जरि काय न हर्षविला करितो भलता दहांत बोभाट ॥ ८४ ॥
श्रीविष्णुपदा देसी प्रणतांतें सुवर निल्य नव लक्ष ॥
धवल क्षयरहित तुझें यश ऐसा शारदेंदु न वलक्षे ॥ ८५ ॥
करिति तुझ्या नीरा जन नीराजन गुरु ह्मणोनियां गाती ॥
त्यां गति गंगा दे जी न मिळे योगा करूनि यागा ती ॥ ८६ ॥
श्रीविष्णुपदा पावे तुज जो त्याला नसे उणें कांहीं ॥
त्वत्तीर्थधरें जीं जनवृंदें न महेशसीं गुणें कां हीं ॥ ८७ ॥
विष्णुपदा दीनातें पावसि तैसें चि तूं सदा पावें ॥
मज अनुमोदन दिधलें ज्यांहीं त्यांतें यमें न दापावें ॥ ८८ ॥
सर्व मनोरथपूरक जें जोडावें जगांत जन्मुनि तें ॥
विष्णुपदा सद्धन तूं बहु संमत नारदादि सन्मुनितें ॥ ८९ ॥
विष्णुपदा वदसील व्रत माझें मुख्य होय रे बा हें ॥
उद्धरितो सर्व प्रिय करितों न सखे न सोयरे बाहें ॥ ९० ॥
विष्णुपदा या हो या ऐसें पाचावया यशा बाहूं ॥
त्वां न वळवितां ह्मणतिल विषयरतमति प्रजा कशा बा हूं ॥ ९१ ॥
तुज विष्णुपदा श्रीकरपल्लवसंलालिता असो नमन ॥
तूंतें सोडुनि पळ ही माझें विषयीं कधीं वसो न मन ॥ ९२ ॥
विष्णुपदा त्वां दर्शन दिधलें गणिलें न कर्म फटकळ तें ॥
अज्ञ जनांस हि करुणाक्षांत्यादिगुणें प्रभुत्व अटकळतें ॥ ९३ ॥
षडरिमदा मोहगदा हरुनि सदा करिसि मुदित साधु सदा ॥
विष्णुपदा अमृतनदा ह्मणसि वदान्यवर तूं न हंत वदा ॥ ९४ ॥
विष्णुपदा तूं प्रभुसी स्वाश्रितसंसारकंपदा तुळसी[30] ॥
कीं वाहिली तुला ती देती पुरुषार्थसंपदा तुळसी[31] ॥ ९५ ॥
नमनें तोखे दास श्रीविष्णुपदा धरील जो भावा ॥
न मनें तो खेदास स्थळ होय यशें जगांत शोभावा ॥ ९६ ॥
विष्णुपदा साङ्ग करीं केलें पिंडप्रदान तुजवरि तें ॥
मन तूं तें धन्य करिसि हें ऐकुनि साधुकथित गुज वरितें ॥ ९७ ॥
विष्णुपदा तव संश्रित गोकुळजीप्रमुख जो गयावळ तो ॥
मुदित असो कीं प्रणतीं दीन जनीं करुनियां दया वळतो ॥ ९८ ॥
श्रीविष्णुपदा द्यावें सद्यश तुज हेचिडावकीलीला ॥
मी पांडुरंगराया आलों मागोनि या वकीलीला ॥ ९९ ॥

---

२९ वलक्ष=शुभ्र. ३० तुळसी=बरोबरी करिशी. ३१ तुळशी=तुळशीपत्र.

शरणागतें मयूरें विष्णुपदा या समर्पिल्या आर्या ॥
जेंवि प्रसादतुळसी भगवद्भक्तां जना सदा धार्या ॥ १०० ॥

॥ इति श्रीरामनंदन-मयूर-विरचिता श्रीविष्णुपदपद्म-वकीली संपूर्णा ॥

## समाप्त.

---

## भस्मासुर आख्यान.

### श्लोक.

जो समर्थ भव मोक्षक राया ॥ साधु गाति भवमोक्ष कराया ॥
तत्पदें नमुनि सादर सारा ॥ कीर्ति गा हरि असा दर सारा ॥ १ ॥
पूर्वीं होता अमर्त्येतर[1] शकुनिसुत क्रूर त्याची वृकाव्हा[2] ॥
हिंस्रत्वें निर्दयत्वें त्यजुनि मद ह्मणे दूर सिंहा वृकां[3] व्हा ॥
ऐसा अन्वर्थनामा[4] असुर खळमणी तो पथीं नारदास ॥
प्रेक्षी वंदी प्रबद्धांजळि विनवि जणो तत्पदाधार दास ॥ २ ॥
देवर्षीस ह्मणे स्वपादविनतस्वांतें[5] प्रमोदावहा ॥
तूतें या भुवनांत सर्व ह्मणती पापाटवीदाव[6] हा ॥
सर्वज्ञा हरितोसि संशय पळे तो पाहिला आजि तूं ॥
आह्मीं वांछितसों तुझ्या सुवचनें संदेहवृंदा जितूं ॥ ३ ॥
देवर्षिप्रवरा असें पुसतसें कीं विष्टपाचे[7] धणी ॥
ब्रह्मेशाच्युत हे तिघे स्वभजकां देती सुखाची धणी[8] ॥
यांमध्यें परि आशुतोष[9] सुर तो कोण प्रभो हें तुह्मी ॥
सांगा जी भवदंघ्रिला समजलों कामाप्तिचा[10] हेतु मी ॥ ४ ॥
वृकासुर असें पुसे नमुनि जोडुनीया शयां[11] ॥
क्षणांत समजे मनीं सुरमुनी तदीयाशया ॥
ह्मणे मग तयासि तो शकुनिनंदना हा बरा ॥
विचार पुसिला तरी भज सुखार्थ आशांबरा[12] ॥ ५ ॥
होतो तुष्ट महेश अल्पचि गुणें तत्काळ दासावरी ॥

---

१ अमर्त्येतर=देवांहून अन्य (दैत्य). २ आव्हा=नाम. ३ वृक=लांडगा. ४ अन्वर्थनामा=यथार्थ आहे नांव ज्याचें असा. ५ स्वांत=मन. ६ अटवी=अरण्य. ७ विष्टप=स्वर्ग. ८ धणी=विपुलता. ९ आशुतोष=लवकर संतुष्ट होणारा. १० कामाप्ति=मनोरथ पूर्ति. ११ शय=हात. १२ आशांबर=दिगंबर (शिव).

भक्तांला स्वकरें सुतासम शिवाजानी[13] स्वयें सांवरी ॥
कोपे ही प्रभु हा तसा चि सहसा स्वल्पा हि दोषास्तव ॥
याच्या होय न कीर्तिचा तिळ सहस्त्रास्यें हि शेषा स्तव ॥ ६ ॥
बंदीच्या परि रावणें निशिचरें केला पदाचा स्तव ॥
भोळा शंकर हा प्रसन्न चि तदां जाला तया यास्तव ॥
बाणें ही स्तवुनि प्रहृष्ट करुनी मागीतला हा वर ॥
स्वामिन् मत्पुर रक्ष हें च मज दे हो सिद्ध पाहा वर ॥ ७ ॥
बाणाचें पुर रक्षिलें पुरहरें विश्वेश्वरें श्रीहरें ॥
केलें तें वरदानवाक्य हि खरें त्या चंद्रमःशेखरें[14] ॥
तो दिक्तुंड[15] हि पुंड खंड परशु स्थानाचलोत्पाटनीं ॥
झाला सज्ज परंतु देव निजला होता क्षमापाटनी ॥ ८ ॥
भक्ताला अति तूर्ण शंकर सुधापूर्णेक्षणें पाहतो ॥
तद्वांछावर द्यावया वरद तो त्याच्या पुढें राहतो ॥
त्याचा भार समस्त ही स्मरहर स्वामी स्वयें वाहतो ॥
त्या पासूनि सुसंकटें घडति जीं त्यांला सुखें साहतो ॥ ९ ॥
त्या शाकुनेया[16] विभुला भजावें ॥ घडेल हो सत्वर लाभ जावें ॥
सांगोनि ऐसें हित त्या वृकास ॥ गेला स्वयें नारद सावकास ॥ १० ॥
केदारीं जाउनीयां मग असुर वृक स्वांगमासासि होमी ॥
भेटेना देव तेव्हां निज शिर हि ह्मणे छेदितों आज हो मी ॥
खंडाया मस्तकातें स्वधितिस[17] दिवसीं सातव्या घे करानें ॥
कुंडापासूनि तेव्हां प्रकटुनि सहसा वारिला शंकरानें ॥ ११ ॥
ज्याकाळीं करुणाब्धि धूर्जटिकरस्पर्शामृता लाभला ॥
तेव्हां तो परिपूर्णदेह पहिल्याहूनी हि जाला भला ॥
होता केवळ अस्थिशेष हवनीं कापूनि घेतां पळीं[18] ॥
तो केला क्षतहीनकाय वरदें लागों न देतां पळा ॥ १२ ॥
मूर्द्धच्छेदनसाहसांतुनि[19] बळें बाहेर तो काढिला ॥
मांसाच्या परिकर्तनें[20] करुनियां होता चि जो कां ढिला[21] ॥
श्रीकंठ त्रिजगच्छरण्य वरद प्रीतिप्रसन्नेक्षण ॥

---

१३ शिवाजानी = पार्वती आहे स्त्री ज्याची तो. १४ चंद्रमःशेखर = चंद्र आहे कपाळावर ज्याच्या तो. १५ दिक्तुंड = रावण. १६ शाकुनेय = शकुनिपुत्र (भस्मासुर). १७ स्वधिति = कुऱ्हाड. १८ पल = मांस. १९ मूर्द्ध = डोकें. २० परिकर्तन = कापणें २१ ढिला = शक्तिहीन.

श्रीमच्छंकर हें वदे करुनियां तत्प्राणसंरक्षण ॥ १३ ॥
होतों मीं वरद प्रसन्न सदयस्वांत प्रपन्नावरी[22] ॥
देतों शीघ्र वरासि धांवुनि सुखें जो ज्या चि कामावरी[23] ॥
मांस च्छेदुनि होमिलें शिखिमुखीं[24] हें काय भक्ता बरें ॥
आत्मा व्यर्थ चि पीडिला मज हि तां[25] केलें वहू घाबरें ॥ १४ ॥
सकृन्नामोच्चारें[26] करुनि अथवा केवळ जळें ॥
फळें पत्रें पुष्पें स्तवननमनें की स्मृतिबळें ॥
भवांभोधीमध्यें मदुपनत तो भाविक तरे ॥
किती घेती भावें मज विगतलोभा विकत रे ॥ १५ ॥
जो कांहीं असुलभ होय या हि मागें[27] ॥ आतां ही पुढति हि तूं तया हि मागें[28] ॥
हें माझें वचन मनांत मान साचें ॥ सांगावें अभिमत जें स्वमानसाचें ॥ १६ ॥
श्रवण करुनि ऐसें वाक्य तो पंकराशी[29] ॥
असुर वृक ह्मणे त्या दुर्लभा शंकरासी ॥
स्वकर शिरिं जयाच्या मी चि ठेवीन लोकीं ॥
लव उशिर न होतां तो मरावा त्रिलोकीं ॥ १७ ॥
लोकक्षयावह भयावह त्या खळानें ॥
मागीतला वर असा चि विशृंखळानें ॥
हांसोनियां शिव तथास्तु असें वदे तो ॥
जाणों सुधा विषधराप्रति देव देतो ॥ १८ ॥
पीती यथेष्ट अमृतासि तथापि नाकी[30] ॥
जाले भयार्त विमना चि तथा पिनाकी[31] ॥
हर्षे सुदुर्मति वृकासुर कामलाभें ॥
नाहीं ह्मणे सुरमृगैकवृकीं[32] मला भें[33] ॥ १९ ॥
ऐसा तो पापरूपी वृक असुर बरें वंचुनी लोकराया ॥
योजी तत्काळ चित्तीं समधिगत[34]वराची परीक्षा कराया ॥
केला संकल्प लोकत्रयसुभगा[35]शिवा[36]रत्न त्याचें हराया ॥
धांवे ठेवावया तो स्वकर शिरिं तदा भीति जाली हरा या ॥२०॥

---

२२ प्रपन्न=शरणागत. २३ काम=इच्छा. २४ शिखि=अग्नि. २५ तां=त्वां. २६ सकृत्=एकवार. २७ मागें=पूर्वी. २८ मागें=माग. २९ पंकराशी=पापराशी. ३० नाकी=स्वर्गस्थ (देव). ३१ पिनाकी=शंकर. ३२ सुरमृगैकवृक=देवरूपी पशूंस लांडग्यासारखा. ३३ भें=भय. ३४ समधिगत=प्राप्त ३५ सुभग=सुंदर. ३६ शिवा=पार्वती.

जाळावा जरि लोचनानळकणें दुष्कीर्ति भक्तक्षयें ॥
देयादेय नसे वदान्य[37] गुरुला श्रीशंभुला निश्चयें ॥
दासापासुनिया पराभव बरा मानूनि ऐसें स्वयें ॥
तो मृत्युंजय मन्मथांतक पळे जाणों तयाच्या भयें ॥ २१ ॥
न सावरति सर्वथा दश भुजा हि देवा जटा ॥
वृषासहित राहिल्या चरण पादुका वाजटा[38] ॥
शिरःस्रजे[39] हि धावतां त्वरित भंग पावे गळे ॥
गळोनि पडलें फणी पथि भुजंगपा वेगळे ॥ २२ ॥
गळाल्या गळांतूनि रुद्राक्षमाला । नसे निर्भयस्थान रुद्रा क्षमाला ॥
पळे विष्टपीं[40] ऊघडा नागत्रा जी । पदाला चि मानी प्रभू नाग[41]वाजी ॥ २३ ॥
काष्ठांचे[42] नाथ सारे निरखुनि ह्मणती ह्त्तमाच्या अहर्पा[43] ॥
बोलावें काय आह्मी अजि अमृत कसें पाजितां दुष्ट सर्पा ॥
ज्यांते देवा वरांतें खळमति धरिती ते महापाप दर्पा ॥
त्याचें कांहीं च नाहीं स्मरण आणि पुन्हा दुर्जनाला चि तर्पा॥२४॥
नाहीं दुष्कीर्ति कांहीं अलिक[44]दृगनळे जाळितां दैत्यटोळा ॥
केला कीं या खळानें सुविमळमहिमा सर्व ही आज गोळा ॥
ध्याना वांचूनि कीं हो न उघडि इलुसा कामदाहोग्र डोळा ॥
या औदार्यें सुरांचें घर बुडवितसे हा महाराज भोळा ॥ २५ ॥
याणें देवूनि पूर्वी प्रवरवर जनीं तर्पिला पंक्तितुंड[45] ॥
तो अंतीं श्रीमदानें निशिचर कुमती माजला फार पुंड ॥
कैलासाच्या चि जाला स्वभुजमळमदें सिद्ध उन्मूलनाला ॥
घाली हस्तासि जैसा समदगजपती पद्मिनी मूळनाला ॥ २६ ॥
हा तैसा चि स्वपादस्तवनतनमनें थेय तत्थेय नाचे ॥
जाला बाणासुरा ही वरद पुरविलें इष्ट त्याच्या मनाचें ॥
पाळावें लागलें तत्पुर मग सुटला स्वीय कैलासवास ॥
सांगावें स्पष्ट कोणी हित अहित असे या जगद्वास खास ॥ २७ ॥
असें देव त्यांतीं वदति मनिं कोपें चि जळती ॥
जयीं भोळेनाथ त्रिनयन महाराज पळती ॥
सुचेनाती युक्ति द्रुत हरिल जी संकट पती ॥

---

३७ वदान्यगुरु = दातृ-श्रेष्ठ. ३८ वाजटा = वाजणाऱ्या. ३९ स्रज = माळ. ४० विष्टप = स्वर्ग. ४१ नाग = हत्ती. ४२ काष्ठा = दिशा. ४३ अहर्प = दिन-नाथ (सूर्य). ४४ अलिक = कपाळ. ४५ पंक्तितुंड = दशमुख (रावण).

दिशांचे ते तुष्णी सभयदय साशंक टपती ॥ २८ ॥
निर्भीक[४६]स्थानकामें पुरहर भुवनें हिंडला सर्व आशा ॥
नाहीं संपूर्ण झाली ह्मणउनि निरखी घाबरा सर्व आशा[४७] ॥
श्वेतद्वीपासि गेला मग निगमनुत[४८] त्र्यक्ष तो भागला जो ॥
भक्तापासूनि जाला परिभव ह्मणुनी कां महाभाग लाजो ॥ २९ ॥
आला धांवत तूर्ण तेथ हि महा उत्पातकारी वृक ॥
जैसा वारणमारणस्पृह हरी किंवा मृगारी वृक ॥
तो वेगें वटुवेश शेषशयन श्रीकांत ये आडवा ॥
जो दुष्टां यम सज्जनास दसरा दीपावळी पाडवा ॥ ३० ॥
अजिनदंडकमंडलुमेखळा ॥ कुशधर द्विजबाळ गमे खळा ॥
पथिं तयाशि करूनि नमो हरी ॥ मधुरवाक्पटु तो मन मोहरी ॥ ३१ ॥
बैसावें शाकुनेया क्षणभरि परमश्रांत जालासि वाटे ॥
कां जालें दूर येणें बहुत लगबगां चालिलां फार वाटे ॥
आत्मा सर्वार्थ दाता सकळबुधमतें पूरुषाला निकामें[५०] ॥
साधावें सर्व कांहीं अनुदिन चतुरें यासि रक्षूनि काम ॥ ३२ ॥
आला अत्यंत दूर श्रमउनि तनुला ज्यास्वकार्यानिमित्त ॥
सांगावें हो विभो तें श्रवणिं जरि मला योग्य मानील चित्त ॥
प्रायःस्वार्थाप्तिसाठीं वरिति निपुणते लोक आप्ता सहाया ॥
बाळाच्या भाषणातें नयपथनिपुणा प्रार्थितों मी सहा या ॥ ३३ ॥
हरा ही वंचाया बहुगति जया पाठकवि तो ॥
असा ही जो कीं त्या प्रभु कपटि भूपा ठकवितो ॥
हरीनें युक्तीनें पथि शकुनिचा पाक[५१] वळिला[५२] ॥
महापाशा विस्तारुनि कपटरूपा कवळिला ॥ ३४ ॥
पीयूष[५३]वर्षिवचनें परिसोनि कानें ॥ होऊनियां श्रमविवर्जित त्या वृकानें ॥
सांगीतलें सकळ वृत्त बटुप्रतीतें ॥ जो ओपिला वर हरें भुवनप्रतीतें ॥ ३५ ॥
सारें ऐकोनि वृत्त स्मित करुनि ह्मणे दक्षशापें पिसोंची[५४] ॥
जाला वाचा तयाची निजमनिं गणितां काय अद्यापि साची ॥
राहे प्रेतीं पिशाचीं गतविभव वसे नित्य नग्न स्मशानीं ॥
त्याचा विश्वास कैसा तुह्मि दृढ धरिला शाहण्यानीं अशांनीं ॥ ३६ ॥

---

४६ निर्भीक=निर्भय. ४७ आशा=दिशा. ४८ निगमनुत=वेदस्तुत. ४९ तूष्णीं=गप्प–उगीच. ५० निकाम=अत्यंत. ५१ पाक=पुत्र. ५२ वळिला=आडवला. ५३ पीयूष=अमृत. ५४ पिसा=वेडा.

आहे विश्वगुरू विनेत्रवचनीं विश्वास तूजा जरी ॥
ठेवावा स्वशिरीं तरी कर परीक्षा हे करीं साजरी ॥
होतां वाक्य मृषा[55] वृषासन[56] रणीं त्वां दानवेंद्रे तदा ॥
जिंकावा भजकप्रतारक पुढें बोले न मिथ्या कदा ॥ ३७ ॥
ऐसें भ्रामक रम्य बोल बटुचे तद्योगमायाबळें ॥
हातोहांत[57] चि बुद्धिला भ्रमविती त्या दानवाच्या पळें ॥
मोहें मानुनि तें खरें सुरगुरुद्रोही महापातकी ॥
ठेवी हस्त शिरीं च होय कुमती तो आपुला घातकी ॥ ३८ ॥
हस्तस्पर्शविभिन्नमस्तक हि तो दे भीति लोका पवी—[58] ॥
छिन्न-प्रोच्चे[59]-नगां[60]समान पडतां सारी धरा कांपवी ॥
आनंदें सुर पुष्पवृष्टि करिती श्रीजानि[61]च्या मस्तकीं ॥
गाती नाचति वर्णिती यश पदें वंदूनिया हस्तकीं ॥ ३९ ॥
ऐसें संकट वारिलें मग हरी गेला महेशाकडे ॥
हें बोले जन जे विभो विचरती पूज्यापुढें वांकडे ॥
ते होती निजभद्रजीवनयशस्स्नेह[62]क्षयीं काकडे ॥
सर्वज्ञ प्रभुजी तुह्मी हगिरडे घेतां असे कां कडे[63] ॥ ४० ॥
महेशाचें देवें त्वरित हरिलें संकट बटू ॥
स्वरूपें हे लीला मधुर अमृताचा रस कटू ॥
रसन्यूनाधिक्यग्रहणविषयीं जे जन पटु ॥
पिती श्रोत्रास्यें ते हरिजन सुधेला घुटुघुटु ॥ ४१ ॥
श्रीशानें संकटातें हरुनि सकरुणें मुक्त केला गिरित्रि[64] ॥
संसारारातिभीतिप्राति परिहरिलें हें हरींचें चरित्र ॥
गातां आकर्णितां ही भवभय शमवी यास्तव स्वादरानें ॥
भावार्थें गाइलें हो सदुदितरत जो त्या मयूरेश्वरानें ४२ ॥

## समाप्त.

---

५५ मृषा=खोटें. ५६ वृषासन=शिव. ५७ हातोहात=तत्काळ. ५८ पवि=वज्र. ५९ प्रोच्च=आति उंच. ६० नग=पर्वत. ६१ श्रीजानी=विष्णू. ६२ स्नेह=तेल. ६3 कडे=कडेवर. ६४ गिरित्र=शिव.

## ॥ अथ साधुरीतिप्रारंभः ॥

### आर्या

श्रीची आवडि न तसीं हरिस जसी नित्य साधुरीतीची ॥
न सुधा सुकविबहुमता ऐसी नाहीं च माधुरी तीची ॥ १ ॥
कोणी साधु ह्मणे हो दासी चुकली क्षमा करा सोडा ॥
वृत्ति न चालेल इची न इचे माझे चि पाय हे तोडा ॥ २ ॥
अनता अपवित्रा ही साधु हित जसा नता पवित्रास ॥
साधु सुहृत् सर्वांचा कोणास हि दे न ताप वित्रास ॥ ३ ॥
खळ निंदी साधु रडे पुसतां यास्तवच मी ह्मणे रडलों ॥
नरकीं पचेल निंदक या दुःसह दुःखसागरीं पडलों ॥ ४ ॥
हुरडा घेतां ताडी पाडी देवूनियां हि जो गाळी ॥
साधु इनाम करुनि दे शेत सुता तातसा तया पाळी ॥ ५ ॥
लाजे विरे वहु स्त्री जीचा सध्वनि सरे अधोवायु ॥
तत्संकोच नुराया साधु वधिरसा चि होय जों आयु ॥ ६ ॥
त्याचा होय ब्राह्मण जन लग्नीं वहु गृहस्थ जो अडला ॥
परिचित करा महत्त्व प्रकट ह्मणुनि साधु खळखळां रडला ॥ ७ ॥
सुत सांपडला वधिला करितां धनिकाचिया गृहीं चोरी ॥
वहु हरिजन साहित्यें हर्षे हे साधुरीतिची थोरी ॥ ८ ॥
न्यावी सामग्री स्त्री मज अर्पावीं असें वदे वाणी ॥
तर्पुनि हरिजन हर्षे साधु करी साच आपुली वाणी ॥ ९ ॥
निर्धनमित्रस्त्रीनें वधिला पचवावयासि नगवाळ ॥
साधुन तन्मन दुखवी याहुनि यश अन्य काय न गवाळ ॥ १० ॥
ठक हरिजन होय वधी वित्तार्थ स्त्रीस रगडितां पाय ॥
साधु समाधान करी त्याचें न ह्मणे मनांत ही हाय ॥ ११ ॥
स्त्री हाणी पोतेरें त्याच्या दीपीं वळुनि दे वाती ॥
साधु ह्मणे तारावी न वुडो दुरितें मळूनि देवा ती ॥ १२ ॥
मृतपुत्र श्वशुर पुसे रडतां ज्ञाते तुह्मी कसे स्वामी ॥
साधु ह्मणे वाटाया तुज चि समाधान रडतसें बा मी ॥ १३ ॥
चोरांनीं गृह लुटितां निरुपम हर्षासि होय तें मूळ ॥
साधु ग्रामीं वांटी शेषधनाचा घरोघरीं गूळ ॥ १४ ॥
निःसीम च्छळ सोसी पोसी सत्वासि संकटीं धीट ॥
साधु ह्मणे याचक हा जन्मोजन्मीं असो नसो वीट ॥ १५ ॥

शतपुत्रक्षयहोतां साहे निःसीम शोकतापातें ॥
साधु न दे शापातें जाणे तन्मूळ पूर्वपापातें ॥ १६ ॥
एकत्र नग्न सुप्त स्वस्त्री-परपुरुष मंदिरीं पाहे ॥
साधु तयांतें झांकी परहृदयक्लेश न च मनीं साहे ॥ १७ ॥
चोटांत तुझा गुरु या खळवचनें दुःख मानितां मोठें ॥
साधु ह्मणे बा आहे बहु सत्पुरुषांत काय हें खोटें ॥ १८ ॥
दुष्टें गाळी देतां शिष्य ह्मणे यासि ताडितों स्वामी ॥
साधु ह्मणे घेत नसे देतों बा जाणतों भला या मी ॥ १९ ॥
तो चि सिधा द्याया ये शिष्य न घे गुरु ह्मणे अरे पाहें ॥
वाइट तें मद्वचनें घेउनि घेसी न कां बरें बा हें ॥ २० ॥
छळितां पाठी लागे जें भस्म करावयासि वक्रातें ॥
साधु ह्मणे विप्राचा भंगे जें मज नको चि चक्रा तें ॥ २१ ॥
मातेचे पाय जसे छळ करित्याचे तसे चि जो पाहे ॥
साधु निवे न च कोपे न दुरुक्तक्षोभ मानसीं राहे ॥ २२ ॥
भोजन दे चोरांला आदर आग्रह करी स्वयें मोटा ॥
साधु प्रसन्नचित्तें बांधुनि लागे वहावया मोटा[1] ॥ २३ ॥
रीति न कोणाची ही या अतितर सरळ रीतिशीं तुकली ॥
साधु ह्मणे तस्कर हो घ्या तुमची एक आंगठी चुकली ॥ २४ ॥
आंगावरि नित्य थुके एके दिवसीं न त्या खळा पाहे ॥
तद्वारीं साधु उभा तें तद्वृत चालवावया राहे ॥ २५ ॥
फिराफिरुनि मुते पादे उघडी ठेवूनि मस्तकीं गांड ॥
साधु ह्मणे जन हसवुनि रिझवुनि धन मेळवूं सुखें भांड ॥ २६ ॥
नरकींचे वदले बा सुखनिकट उभा असोन दे वातें ॥
साधु ह्मणे हें च बरें जें स्वर्गींचें असो न देवा तें ॥ २७ ॥
जे जीव पतित नरकीं ते पुण्यें उद्धरूनियां सर्व ॥
साधु स्वर्गा गेला ज्याच्या चित्तीं न लेश ही गर्व ॥ २८ ॥
जों जों प्रायश्चित्त ब्राह्मण आग्रह करूनियां देती ॥
तों तों साधुमनांत प्रीति न चतुराननीं[2] हि नांदे ती ॥ २९ ॥
जो विष पाजी भाजी त्याच्या ही नरकयातना चुकवी ॥
गाती सात्विकभावव्याप्त सदा साधुरीतितें सुकवि ॥ ३० ॥

---

१ मोट = ओझें. २ चतुरानन = ब्रह्मा.

प्रभुनें छळिला आंगें सर्वस्व हरूनि बांधिला छद्में ॥
परि साधुनें भुलविला प्रभु अलि सौगंधिकें जसा पद्में ॥ ३१ ॥
वाढवि अन्याणुगुणा साधु सदा वायु जेंवि फुणगीतें ॥
सुयशानें जरि साजे लाजे परि फार आत्मगुणगीतें ॥ ३२ ॥
ज्यासह घडतें दैवें सहज पथीं चालणें पदें सात ॥
त्या मित्र साधु ह्मणती देती च व्यसनसागरीं हात ॥ ३३ ॥
समजुनियां गर्भवती झाली भ्याली उदंड रंडा तें ॥
साधु ह्मणे घे माझें नाम मुलि भिवूं नको चि दंडातें ॥ ३४ ॥
गेली निघोनि आली दुकळीं घेऊनि ती पती पोरें ॥
साधु तिला प्रतिपाळी गावी सद्रीति आदरें थोरें ॥ ३५ ॥
कोणी वहु बोधें ही सोडुनि सुक्षेत्र आग्रहें जाय ॥
ज्याच्या शद्बें परते साधु खराचे हि त्या नमी पाय ॥ ३६ ॥
प्रणत जनाचें जाया सिद्धिप्रति सर्व योजिलें कार्य ॥
साधु मरण पथकरिती ऐसी सद्रीति वर्णिती आर्य ॥ ३७ ॥
दे अन्न अंत्यजां जें केलें तर्पावयासि पितरांतें ॥
हें साधुशील दुर्लभ लोकीं कालत्रयीं हि इतरांतें ॥ ३८ ॥
अंत्यजतोक कडे घे उष्णीं ज्या फार लाळ सेंबुड तें ॥
अद्भुत सुकृत न गातां साधूंची रीति आळसें बुडते ॥ ३९ ॥
ज्यांचीं चरणाब्जरजें ब्रह्मेंद्राद्यमरमस्तकीं लेणीं ॥
तत्प्रियसख साधु वळी आपण पुरवावया मठीं शेणीं ॥ ४० ॥
निंदा शाप हि घ्यावा परि हरिस भजा असें चि सांगावें ॥
हें सच्छील त्यागुनि कुशलें तीर्थादि अन्य कां गावें ॥ ४१ ॥
हस्तीं धन आलें जें तें देवब्राह्मणासि अर्पावें ॥
स्वापत्य तसें प्रेमें अन्नार्थि प्राणिजात तर्पावें ॥ ४२ ॥
कृष्णीं प्रेम जयांचें तद्व्यभिचारास ही न लेखावें ॥
रेखावें साधुजनें हृदयीं त्यांतें गुरू च देखावें ॥ ४३ ॥
सद्रीति हे अभक्ता जरि तरि मातेस ही न मानावें ॥
वानावें वेश्येस हि भुलली जी काय राम या नावें ॥ ४४ ॥
साधु प्राणी पाहुनि संसारीं तापले असुख पावे ॥
व्हावें जग मुदित ह्मणे तदुःखें आपले असु खपावे ॥ ४५ ॥

---

३ छद्म=कपट. ४ व्यसन=संकट ५ खर=गाढव. ६ शेणी=गोंवऱ्या. ७ जात=समूह.

विषयविष चि ना हो हरिजन कांपायांस भाळला जीव ॥
विधिविभुचा लावुनि हितजन कां पायांस भाळ लाजीव ॥ ४६ ॥
कवि ह्मणाते न दुग्धगृहा आंतुनि होवूनि खर्व ओतु[8] निघे ॥
साधुसभेंत वस तसा हरियशकर्णांत सर्व ओतुनि घे ॥ ४७ ॥
साधु अभयवर दिधले न कधीं च जसे करी[9] रद[10] बदलिती ॥
जसि सद्रीति जडांची श्रीप्रभुजवळि न करि रदबदलि ती ॥ ४८ ॥
हे दुर्मतिघूस करी रंध्रें बहु मानसा धुरी तीतें ॥
यास्तव सर्व हि हरिजन देतिल बहुमान साधुरीतीतें ॥ ४९ ॥
हे साधुरीति लिहिली मयूरें रामनंदनें ॥
या ग्रंथें पूर्ण साधूंचा हो जैसा काम नंदनें[11] ॥५० ॥

इतिश्रीरामनंदनमयूरेश्वरविरचिता साधुरीतिः

॥ पद १ ॥

दाशरथे ऐसे चि करीं पदपद्में पावन पापी ॥ ध्रु ॥
वासराधिपति[12]कुलतिलका हरिनीलनवाभ्रश्यामा ॥
आसरा जयश्रीकीर्तिप्रति अकुतोभय तूं रामा ॥
अमलातुलसद्गुणधामा[13] ॥ शमलापह[14]शोभननामा ॥
नमलानमींशीलनिधे मी वापी ॥ १ ॥ दाशरथे० ॥ १ ॥
तोकाला माय मयूरा जैसी नवनीरद[15]माला ॥
लोकाला कीर्ति तुझी हे तैसी सुखदू नरपाळा ॥
शमवीं भवदावज्वाळा रमवीं स्वयशें सुरबाळा[16] ॥
भ्रमवी खळ एक जगीं हो चापी ॥ २ ॥ दाशरथे० ॥ २ ॥

॥ पद २ ॥

सख्या रामहरे कृष्णहरे बोल बरें ॥ ध्रु ॥
दुस्तरा भवार्णवासि सर्व पूर्वजां समेत ॥
या कलींत हीं सुखें चि विघ्न लाजवूनि तरें ॥ १ ॥ सख्या० ॥ १ ॥
भव्यधाम रामनाम काम पूर्ण तूर्ण[17] करी ॥
तारिले अनेक जीव कीं कथूनि हें चि हरें ॥ २ ॥ स० ॥ २ ॥

---

८ ओतु = मांजर. ९ करी = हत्ती. १० रद = दांत. ११ नंदन = पुत्र; इंद्राचें वन. १२ वासराधिपति = सूर्य. १३ धाम = गृह. १४ शमलापह = पापनाशक. १५ नीरद = मेघ. १६ सुरबाळा = देवांगना. १७ तूर्ण = सत्वर.

नाम-मेघसक्त भक्त मोर यासि हर्ष थोर ॥
होय हृदय अमल अमल शमल नुरे मान खरें ॥ ३ ॥ स० ॥१॥

॥ पद ३ ॥

हृदया बरें विचारीं ॥ नाम स्मरें न तापें ॥ ध्रु० ॥
भगवान अजामिळाला नामें गजा मिळाला ॥
गणनातिगें गिळाला ॥ नाम प्रताप पापें ॥ १ ॥ नाम० ॥
ज्यांचे मनांत थारे गिळिले अरोति सारे ॥
प्रभुच्या असें न वारे ॥ केलें रणांत चापें ॥ २ ॥ नाम० ॥ २
नामीं च भाव राहो ॥ दुष्कर्मपंक वाहो ॥
सौख्या मयूर लाहो ॥ जें मोजवे न मापें ॥ ३ ॥ नाम० ॥

## ॥ वामनादिकीर्तनं ॥

साक्षात् श्रीविष्णु ऐसें चि ॥ मानवा मान वामना ॥
दोषांचा लेप चढवी ॥ मान वामा नवा मना ॥ १ ॥
भुलसी विषया येणें ॥ उलसील महाऽसुखें ॥
कुलशीलमदत्यागीं ॥ तुलसीदास गा मुखें ॥ २ ॥
कीर्तिला तीर्थ पादाचा ॥ जेणें सद्भक्त चांगया ॥
सांग या सत्पदनता ॥ पिंडा झाली न कां गया ॥ ३ ॥
लाजो तुझ्या सुरांचा [हीं] ॥ नगें मोहा निवृत्तितें ॥
भय वारील नमितां ॥ न गमो हानि वृत्तितें ॥ ४ ॥

---

समाप्त.

---

१८ अराति = शत्रु. १ वामा = स्त्री. २ नग = वृक्ष.

## ॥ श्रीकृष्णामाहात्म्यारंभः ॥

॥ श्लोक ॥

श्रीकृष्णेची परम सुखदा सत्कथा आयकाया ॥
हे वाळाच्या शुचि करि जसी वत्सला माय कोया ॥
वक्त्रीं चित्तीं हितकर इचें सर्वदा नांव राहो ॥
तीर्था योगा हयमखशता सर्वदां ना वरा हो ॥ १ ॥

भाग्यें विलोकुनि महामुनि नारदातें ॥ पूजूनियां ऋषिभवांवुधिपारदातें ॥
जोडूनि हस्त वदले कलिदोषदावा ॥ भ्यालों प्रभो सुपथ देउनि तोष दावा ॥ २ ॥
जोडूनि पापें नरकीं भरावें ॥ कैसें महोग्रा कलितें तरावें ॥
अन्नोदक त्यागुनियां मरावें ॥ सांग प्रभो काय कसें करावें ॥ ३ ॥

॥ आर्या ॥

देवर्षि ह्मणे ऋषि हो जेणें पुरुषार्थ सर्व जोडावा ॥
ब्राह्मणदेह सुदुर्लभ तो न कलिभयें कदापि सोडावा ॥ ४ ॥
श्रीहरिहरयश असतां तत्संकीर्तन करावया रसना ॥
कां मरण वांछितां हो दुस्तर मानुनि मनीं कलिव्यसना ॥ ५ ॥

॥ श्लोक ॥

प्रकट हरिहरांची कीर्ति जी या नदीनें ॥
धुवुनि मळ करावें सत्पदा या न दीनें ॥
कळिस बळ न कांहीं सेतु हा वाळवेचा ॥
त्यजुनि अघभयातें कीर्तनीं काळ वेंचा ॥ ६ ॥

कर्षणें जसि कृषीवळें भुक्ती ॥ कीर्तनें कुशळ साधिति मुक्ती ॥
त्यागिती न बुध मौक्तिकशुक्ति ॥ हे धरा स्वहृदयीं शुचि उक्ति ॥ ७ ॥
कीर्तनें चि पुरुषार्थ साधती ॥ पातकें हरिजना न बाधती ॥
या युगीं गुण असे असा रहा ॥ स्वस्थधी कळि नव्हे असार हा ॥ ८ ॥

॥ आर्या ॥

ऋषि हो विष्णुप्रभुनें आणिक ही निर्मिलें असे त्राण ॥
कथितों तें हि कलिभयें होउनि विकळ त्यजूं नका प्राण ॥ ९ ॥

---

१ काय = शरीर. २ अंबुधिपारद = समुद्रपार करणारा. ३ दाव = अग्नि.
४ व्यसन = संकट. ५ कृषीवळ = शेतकरी. ६ शुक्ति = शिंप.

॥ श्लोक ॥

पूर्वी सृष्टि करी असी प्रभु हरि ब्रह्मासि आज्ञा करी ॥
तो प्रार्थी गुरुतें सुकीर्ति सुगति त्वत्सेवकातें वरी ॥
हें मी जाणतसें तुझ्या चि करुणायोगें मुकुंदा परी ॥
चिंतेची मम चित्त पावुनि भया या आदरी बा दरी ॥ १० ॥

॥ आर्या ॥

कलियुग अघसागर कीं त्यांत त्रैलोक्यनायकादेवा ॥
कैसी स्थिति प्रजांची कल्पावी म्यां घडावया सेवा ॥ ११ ॥

॥ श्लोक ॥

पापें प्रजा व्याकुळ आपदांनीं ॥ होतील सिद्धा मग शापदानीं ॥
स्वर्गार्थ धर्मी चिर या सजाव्या ॥ देवा न दोषें निरयांस जाव्या ॥१२॥

॥ आर्या ॥

कृष्ण ह्मणे निर्मावीं तीर्थें कलिदोष सर्व हरितील ॥
कारतील पुण्य-संग्रह जीव सुखें सद्गतीस वरितील ॥ १३ ॥
धात्या मत्करुणेनें केली विज्ञप्ति मज हि निर्माया ॥
तीर्थांच्या मातेतें झालों उद्युक्त मी हि निर्माया ॥ १४ ॥

॥ श्लोक ॥

जीस मी उठवितों प्रतिकल्पीं ॥ वर्तती सुतनु यत्तनुतल्पीं ॥
धातया प्रकटितों कलि तीतें ॥ त्रस्त हो बहु अघ छळिती तें ॥ १५ ॥

॥ आर्या ॥

ऐसें वदोनि कृष्णें कृष्णा नद्यप्रजा सुकृतसलिला ॥
निजतनुपासुनि केली प्रकट कराया सदा सभय कलिला ॥ १६ ॥

॥ श्लोक ॥

आधीं श्रीकृष्ण कृष्णेतें पुण्यकीर्तिसह स्रजी ॥
धाता भगवदाज्ञेनें मग तीर्थसहस्र जी ॥ १७ ॥

॥ आर्या ॥

मंत्रमहौषधिधारी पडतां ज्वाळांत ही न भाजावा ॥
ज्या प्राप्त सिद्धगुटिका तो लंघुनि सागरा नभा जावा ॥ १८ ॥

---

७ निरय = नरक. ८ तल्प = शय्या. ९ स्रजी = उत्पन्न करा.

यापरि कृष्णाश्रित जे ते पडतां हि न कळींत मळतील ॥
जळतील दोष त्यांच्या स्पर्शें प्रत्यूह[10] दूर पळतील ॥ १९ ॥

॥ श्लोक ॥

जे होते ऋषि कलिभीत सारदानें ॥ केले ते प्रमुदित सर्व नारदानें ॥
हें कृष्णायश वश यास जे तयांतें ॥ षड्वैरी नमितिल मोह-जेते[11] यांतें ॥२०॥

॥ इति श्रीकृष्णमहात्म्ये श्रीमयूरकविकृते प्रथमोऽध्यायः ॥

॥ आर्या ॥

ऋषि ह्मणाति ब्रह्मण्यें श्रीकृष्णें प्रेषिलासि रक्षाया ॥
सत्पात्र तूं चि सुयशा भवमग्नोद्धारकर्मदक्षा या ॥ १ ॥

॥ श्लोक ॥

त्वां प्रल्हादध्रुवादि स्वहित कथुनियां नारदा धन्य केला ॥
बा तूं या मंडळीला पवनसुत जसा त्या धराकन्यकेला[12] ॥
त्वद्वाक्पीयूष[13]पानें करुनि बहु सुखें आमचा काय कोंदे ॥
श्रीमत्कृष्णानदीचा निरुपममहिमा सर्व ही आयकों दे ॥ २ ॥

॥ आर्या ॥

जें पुसिलें श्रीकृष्णामाहात्म्य द्रुहिणपुत्रें[14] सांगे हें ॥
सफळ प्रणत मनोरथ करुणेच्या न करिजेल कां गेहें ॥ ३॥
देवर्षि ह्मणे मुनि हो पुसतां परमादरें जसें मजला ॥
विधि हि असें चि पुसे त्या जो नत जन उद्धरावया सजला ॥ ४ ॥
प्रभु सांगे कृष्णेचा महिमा अहिमानवामरस्तव्य[15] ॥
भव्यप्रभाव विश्वीं जो सुकृतरसिकमनीं सदा नव्य ॥ ५ ॥
ऐकुनि सांग स्वजना वत्सा चतुरानना बुधाधारा ॥
कृष्णेची जलकणिका सुहित करी न च असी सुधाधारा ॥ ६ ॥
बा होय मन्मयी हे श्रीकृष्णामत्कळा सुधासम जे ॥
ह्मणतिल ते बाळ चि जो मत्सेवक तत्त्व त्या बुधा समजे ॥ ७ ॥
स्नानें पानें स्तवनें स्मरणें कृष्णेचिया महाघ सरे ॥
वैकुंठ पदीं हि चढे प्राणी तेथुनि जसा न हा घसरे ॥ ८ ॥
निःशंक न प्रवर्ते कृष्णेचें फार भय असे कलिला ॥

---

१० प्रत्यूह=विघ्न. ११ मोहजेता=मोहजिंकणारा. १२ धराकन्यका=भूमि-सुता (सीता) १३ वाक्पीयूष=शब्दामृत. १४ द्रुहिण=ब्रह्मा. १५ अहिमानवामरस्तव्य=सर्प, मनुष्य, व देव यांहीं स्तवन करण्यास योग्य.

स्पर्शुनि जगदघ हरितो जो वायु स्पर्शला इच्या सालिलीं ॥ ९ ॥
धात्या साक्षान्मत्तनु कृष्णा साक्षान्महेशतनु वेणा ॥
भजतां यासि चुकतिल प्राण्याच्या रोगमृत्युजनुं वेणी ॥ १० ॥

॥ श्लोक ॥

मुक्तिप्रद प्रकट मार्ग पुराण आहे ॥ त्यातें धरूनि विरळ स्वपदासि लाहे ॥
कृष्णासमाश्रित सुखें सुगतीस पाहे ॥ कीं तो सुदुस्तर विघ्न सदा नवाहे॥ ११ ॥
होय मुक्त सुखें कृष्णा-वेणासंश्रित जो जन ॥
यच्छिरीं कल्पवल्ली त्या काय दुर्लभ भोजन ॥ ११ ॥
तारिती सर्व जीवातें कृष्णावेणा महानद्या ॥
मोठें चि देती फळ या ह्मणो कोणी लहान द्या ॥ १३ ॥

॥ आर्या ॥

असती सिद्धचि संतत आश्रित जीवासि निज पदा न्याया ॥
याया अमृत जनांतें आह्मांहुनि बहु गुणें वदान्या या ॥ १४ ॥
करितिल कृष्णास्नान स्मरतिल धरतिल हि जे मम ध्यान ॥
तच्चित्तीं प्रकटुनि मी दीप्त करिन भवभयापहं ज्ञान ॥ १५ ॥

॥ श्लोक ॥

कृष्णेतें सृजितो स्वयें कलिभय त्यागूनि तूं हि प्रजा ॥
निर्मी त्या सुयशा वरीं बहु सुखें गातील सद्विप्र ज्या ॥
सर्वत्र द्युमणिप्रभा प्रसरतां जो पांथ वाचा तया ॥
कैंची कीं न घडे पराभव तमापासूनि बा धातया ॥ १६ ॥

॥ आर्या ॥

ऐसें बोलुनि भगवान् शमवाया विषयभोगतृष्णेतें ॥
प्रकट करी तनुपासुनि निरुपमतमरम्यमूर्ति कृष्णेतें ॥ १७ ॥

॥ श्लोक ॥

वर्ण श्याम तसा जसा चि हरिचा श्रीमूर्तिचा शोभला ॥
[21] चक्रांका सुचतुर्भुजा गुण जिचा निर्दोष जो तो भला ॥
श्रीशाचा महिमा विलोकुनि जितें त्याचि क्षणीं लोभला ॥
माया केवळ आपणावरि ह्मणे चित्तीं प्रभु क्षोभला ॥ १८ ॥

---

१६ सलिल = पाणी. १७ जनु = जन्म. १८ वेणा = वेदना. १९ भवभयापह = संसारभीति-नाशक. २० द्युमणि = सूर्य. २१ चक्रांका = चक्रवाक पक्षी आहे जिच्या ठायीं.

तो शोभली फार महानदी सती जीच्या पुढें योग लहान दीसती ॥
चित्तीं म्हणें जे कारितील मज्जनें[22] ते अन्यपापें हरितील मज्जनें[23] ॥ १९ ॥
असी कृष्णादेवी निजतनुभवा विश्वसुहिता ॥
दिली कृष्णें तीतें शतधृति[24] म्हणे हे स्वदुहिता ॥
तयाचा जो लोकप्रियहित मिळाला सुरस त्या ॥
बहु प्रेमें सर्वा करिति नुति[25] पूजा सुरसत्या[26] ॥ २० ॥
भाग्येंकरूनि भव्याची[27] ॥ मावली पावली मग ॥
ब्रम्हा रची श्रीहरिच्या ॥ उक्तिनें युक्तिनें जग ॥ २१ ॥
आर्या -जगदघहरें सुतीर्थे रचिलीं या निर्मिल्या जगीं विधिनें ॥
त्यावरि भूवरि कृष्णा तीर्था बा आणिली दयानिधिनें ॥ २२ ॥
जैसी सुरभि स्वर्गीं विविधविषयभुक्तिदान दीनां दे ॥
या भूतळीं तदधिका हे कृष्णा मुक्तिदा नदी नांदे ॥ २३ ॥
इति श्रीकृष्णामाहात्म्ये द्वितीयोध्याय:

---

## अध्याय तिसरा.

श्लोक–जगत्पूज्या कृष्णा परम गुरुची मूर्ति सुसती ॥
तिच्या माहात्म्यातें मुनि नमुनियां पाय पुसती ॥
कृपावर्षे ज्याच्या भय तिळ न संसारदव दे ॥
महात्मा तो ऐसें करुनि करुणा नारद वदे ॥ १ ॥
या प्रश्नें तुमची मोठी ॥ माझी ही धन्यता पहा ॥
म्हणतील भवत्ताप ॥ हा नसे अन्य ताप हा ॥ २ ॥
आर्या–श्री कृष्णामाहात्म्यश्रवणेच्छा जेधवां मनीं झाली ॥
आली तुमच्या हस्तीं मुक्ति प्रेमें जसी प्रिया आली[28] ॥ ३ ॥
जेथें श्रीकृष्णेचें माहात्म्य श्रवण तो चि वरदेशीं[29] ॥
सर्व मनोरथ पुरवी नुरवी कळिविघ्न विष्णु वरदेशीं[30] ॥ ४ ॥
कृष्णेच्या भक्ताचा कोणाहि पुढें न हात पसरेल ॥
त्या परम सभाग्याचें कल्पांतीं हि न महातप सरेल ॥ ५ ॥
श्लोक–पक्षांचा ध्वनि ऐकतां चि हृदयीं जे पक्षिपाळा[31] अहि[32] ॥

---

२२ मज्जन=स्नान. २३ मज्जन=मत् + जन ( माझे जन=भक्त. ) २४ शतधृति= इंद्र. २५ नुति=स्तुति. २६ सुरसत्या=देवांगना. २७ भव्य=कल्याण. २८ आली=सखी. २९ वर-देश=श्रेष्ठ प्रांत. ३० वरदेश=वरद + ईश ( वर देणाऱ्यांत श्रेष्ठ ). ३१ पक्षिपाळ= गरुड. ३२ अहि=सर्प.

भीती त्यांसि लपावया स्थळ बिळीं देती दयार्द्रा मही ॥
कृष्णेच्या सुयशासि कांपति अघें दे त्यां न थारा ख ही ॥
तीं जींत प्रभु चित्रगुप्त लिखितें ती होय दग्धा वही ॥ ६ ॥

आर्या–महिमा कृष्णेचा जो याचें कलिदलन नाम या गाते ॥
जे जन होती योगा जैसे तैसे चि धाम यागातें ॥ ७ ॥

श्लोक–मंदरीं पुसिलें स्कंदें ॥ कृष्णामाहात्म्य आदरें ॥
त्यातें जगल्लताकंदें ॥ कथिलें त्या उमावरें ॥ ८ ॥

आर्या–रोमांचिततनु होउनि यच्छ्रवणीं निश्चळा उमा राहे ॥
कृष्णाकीर्ति परिसिली म्यां नमुनि प्रभु सुता कुमारा हे ॥ ९ ॥
या माहात्म्यश्रवणा शुचि सज्जन शैव भागवत मात्र ॥
पात्र प्रसिद्ध ज्यांचें सात्विक भावासि होय गृह गात्रे[३३] ॥ १० ॥

श्लोक–कृष्णातटीं जे वश योगयाग या कधीं तशातें न म्हणेचि या गया ॥
सर्वा ऋणां पासुनि जीव सोडवी न मागती प्रत्युत[३४] हात जोडवी ॥ ११ ॥
ब्रह्मा विष्णु महेश्वर प्रभु कलिप्रारंभ होतां क्रिया ॥
व्हाया सत्फलदा सुपुण्यनिधि या भूच्या कराया प्रिया ॥
कृष्णा घेउनि आदरें उतरले आनंद अर्पावया ॥
विश्वातें विपुलें महामृतरसें तप्तांसि तर्पावया ॥ १२ ॥

आर्या–ब्रह्मादि देव भूवरी अवलोकिते सुप्रदेश जों आले ॥
तों ते तपस्विवर्या सत्पुरुषातें विलोकिते झाले ॥ १३ ॥
त्या पुरुषातें पुसती ते सुर तूं कोण वांछिसी काय ॥
घे इष्ट शिष्टवर्या बहु कृश झाला तपःश्रमें काय ॥ १४ ॥
किमपि अदेय नसे या कृष्णेच्या आगमोत्सवामाजी ॥
मा जीभ न बोले ती श्रेष्ठा पुरवील अर्थिकामा जी ॥ १५ ॥

श्लोक–हें ऐकतां तापस फार हर्षे ॥ प्रेमाश्रुधारा घनसा चि वर्षे ॥
वंदी स्तवी जोडुनि अंजलीला ॥ वर्णी प्रभूच्या पदकंज[३५]-लीला ॥ १६ ॥

आर्या–प्रभुहो तप करितों कीं न बुडोत कलींत जीव सर्व तमीं[३६] ॥
आलों शरण तुम्हांतें जोडुनियां हस्त सह्य पर्वत मीं ॥ १७ ॥
झालां प्रसन्न तरि द्या वर हा माझी च हे असो कन्या ॥
कृष्णानदी प्रवर्तो मजपासुनि यश असें नसो अन्या ॥ १८ ॥

श्लोक–करितों प्राप्त व्हा[illegible] मी ॥ पुण्यता धन्यता पसा ॥
द्या कृष्णा हे मुक्ति जैसी ॥ देतसां अन्य तापसां ॥ १९ ॥

---

३३ गात्र=शरीर. ३४ प्रत्युत=उलट. ३५ कंज=कमल. ३६ तम=पाप.

श्लोक—अशा नमुनि मागतां सुवर उद्धराया जना ॥
तदुक्त रुचलें बहु त्रिभुवनेश्वरांच्या मना ॥
प्रसन्नमति पाहती सकळ देव कृष्णानना ॥
जसे तृषित चातक प्रियकरा उदारा घना ॥ २० ॥
म्हणे कृष्णा सह्या असिसि शुचि धर्मा नत नयीं[37] ॥
तुझी होऊं मीं कां सकळजनशर्मा[38] न तनया ॥
मिळाली ती कन्या जसि भुवनमाता हिमनगा[39] ॥
तुला मी या नात्या परम वश माझें हि मन गा ॥ २१ ॥

आर्या—सह्या मी जेंवि तुझ्या होतिल बहु मदनुजा नद्या कन्या ॥
अन्या वाढविंतिल यश करितिल तुजला हि धन्य त्या धन्या ॥ २२ ॥
मी सह्यसुता होत्यें सुरमुनि हो सह्यजा म्हणा मातें ॥
यासि सुखें करिन शिवा करित असें जसि तया प्रणामातें ॥ २३ ॥

श्लोक—या वात्सल्यें सर्व देव-संघ विस्मय पावला ॥
म्हणे कृष्णे तुझा जो या कृष्णाचा तोचि पावला ॥ २४ ॥
भक्तवत्सलता नित्य प्रभुहृत्सारसा जसी ॥
कृष्णे तुझा हि सेवी या सद्गुणें फार साजसी ॥ २५ ॥

आर्या— सह्य प्रमुदित होउनि कृष्णेसि म्हणे महाप्रसाद असें ॥
गौरीप्रसादभाजन जेंवि हिमाचल तसा चि मीं हि असें ॥ २६ ॥
कृष्णे सह कृष्णातें ब्रह्मादिसुरां समेत घेऊन ॥
सह्य स्वपदा गेला तच्चरणावरि शिरोब्जें[40] ठेवून ॥ २७ ॥
सह्याचळीं मिळाले वसुरुद्रादित्य सर्व नाकर्षि[41] ॥
राजर्षि महर्षि सकळ तो कृष्णोत्सव तयांसि आकर्षी ॥ २८ ॥
गंधर्व यक्ष किंनर विद्याधर सिद्ध साध्य आशाप[42] ॥
यांला तो उत्सव हित मलिन कलिनरक तयांस हा शाप ॥ २९ ॥
ते अलि तो पद्माकर[43] ते पिक[44] तो वृक्षराज आंबा हो ॥
कृष्णोत्सव कल्पद्रुम त्या अर्थिजनां यशें न कां बाहो ॥ ३० ॥
पूजी फळपुष्पादि द्रव्यें भव्यें तयांसि नग[45] सह्य ॥
स्वक्षय तो मह[46] कळतां होइल कैसा कळीस मग सह्य ॥ ३१ ॥
ऋषि पितर देव म्हणती झालेचि कृतार्थ सर्व नर कास ॥
कृष्णेची धरुनि खळा कलिस तसा त्यजिल गर्व नरकास ॥ ३२ ॥

---

३७ नय=न्याय. ३८ शर्म=सुख. ३९ हिमनग=हिमालय. ४० अब्ज=कमल. ४१ नाकर्षी=देवर्षी. ४२ आशाप=दिग्पति. ४३ आकर=खाण. ४४ पिक=कोकिल ४५ नग=पर्वत. ४६ मह=उत्सव.

कृष्णेंत करुनि तर्पण आम्हांला परम तृप्ति भव्याहीं ॥
कव्याहीं[४७] देतिल नर कर्मीं आदर धरूनि हव्याहीं[४८] ॥ ३३ ॥
कृष्णेंत जलांजलि जरि आम्हांस मिळेल सौख्य अर्पावें ॥
तरि काय हो स्वधेनें[४९] काय सुधेनें हि अधिक तर्पावें ॥ ३४ ॥
जाईल ज्या दिशेप्रति होईल चि ती अलंकृता पूता ॥
अमृतफळ मिळाल्यावरि रसिक जन पुसेल कोण हो नूतां[५०] ॥ ३५ ॥
ते चि सुभाग्य जन जगीं तेचि शुभोदय समस्त वर देश ॥
तीं च सुपुण्य क्षेत्रें जेथें कृष्णाप्रवाह वरदेश ॥ ३६ ॥
विस्तार स्वर्गाचा होइल संकोच नरकवर्गाचा ॥
ईचा प्रवाह जैसा सर्वार्थप्रद मुहूर्त गर्गाचा ॥ ३७ ॥
स्वर्गाची निःश्रेणी[५१] कृष्णा भाग्यें नरांसि सांपडली ॥
कळि जरि तम तो गमतो केवळ जड यासि भूल कां पडली ॥ ३८ ॥
श्लोक--कृष्णातिरीं जंगमत्वें वसावें ॥ किंवा भाग्यें स्थाणुभावें असावें ॥
वर्षें शीतें कष्टतां आतपानें ॥ आहे मोठी धन्यता वातपानें ॥ ३९ ॥
बोलिले अमर या परि सारे ॥ त्यां म्हणे हरि हि या परिसा रे ॥
दीसतो परि लहान गमो हा ॥ न स्वयें हरिल हा नग मोहा ॥ ४० ॥
आर्या--वसतों ह्या सह्यशिरीं श्वेताश्वत्थस्वरूप मी सुगम ॥
कृष्णेचा मत्पादापासुनि होइल महायशा उगम ॥ ४१ ॥
श्लोक--अश्वत्थरूप प्रभु होय धारा ॥ कृष्णा हि तन्मूलज तोयधारा ॥
त्या सर्व देवद्विजमंडळीला ॥ श्रीविष्णूची ती करि थंड लीला ॥ ४२ ॥
आर्या--सुरमुनि जयजय वदती पुष्पांच्या वर्षती सरी घनसे ॥
गंधर्वगीति निपुणा परि द्याया हर्ष तीस रीघ नसे ॥ ४३ ॥
गावूनि हरिहरांचीं मधुरें त्रिजगन्मनोहरें कृत्यें ॥
करित्या झाल्या हर्षें त्या परम महीं[५२] वराप्सरा[५३] नृत्यें ॥ ४४ ॥
अघ हरित जग प्रमुदित करित तनु[५४] हि ती महा नदी पसरे ॥
निबिडतम[५५]तमःप्रशमीं[५६] न च मागें जरि लहान दीप सरे ॥ ४५ ॥
श्लोक--पुढें झाला हर्षें नरसहित नारायणमुनी ॥
तयामागें चाले त्वरित गति कृष्णा सुरधुनी[५७] ॥

---

४७ कव्य=पितरांस दिलेलें. ४८ हव्य=देवांस दिलेलें. ४९ स्वधा=अग्निची दुसरी बायको ५० नूत=फल विशेष. ५१ निःश्रेणी=निसणी (शिडी). ५२ मह=उत्सव. ५३ वर=श्रेष्ठ. ५४ तनु=लहान. ५५ निबिडतम=अति गाढ ५६ प्रशम=नाश. ५७ धुनी=नदी.

प्रतापें पूर्वेचीं हरित [58]दुरितें पुण्यें[59]सलिलीं ॥
सुखें गेली झाली बहुत हृदयीं भीति कलिला ॥ ४६ ॥
सर्वांसि दे सुकृततेज नदी पिके तें ॥
त्या सोडिती क्षण न ते जन दीपिकेतें ॥
जी देउनि स्वसहवास वदे वसा रे ॥
माझ्या तटीं च सह[61]वासव देव सारे ॥ ४७ ॥
आर्या—सर्वदुरिततापघ्नी पुण्या ऋग्वेदसंहिता आहे ॥
अतिपुण्यें तींत जसीं सूक्तें येथें हि बुध असें पाहे ॥ ४८ ॥
कृष्णा पुण्या तीर्थें अतिपुण्यें वर्तती इच्या पोटीं ॥
ज्यांचें सेवन करितां भस्म चि होतात पातकें मोठीं ॥ ४९ ॥
सह्या पासुनि सागरसंगमपर्यंत विप्र हो असती ॥
तीर्थें अतिपुण्यें या कृष्णेच्या आश्रयें सुखें वसती ॥ ५० ॥
या कृष्णामाहात्म्यश्रवणें जळतात सर्व ही दोष ॥
रोष न कळिकाळाचा चाले श्रीविष्णु पावतो तोष ॥ ५१ ॥

इति कृष्णामाहात्म्ये तृतियोऽध्यायः

---

## अध्याय चवथा.

आर्या—देवर्षि म्हणे मुनिहो जेथें यमनियमरक्षणा जपला ॥
पूर्वीं भगवान्ब्रह्मा साधाया आत्मसिद्धिला तपला ॥ १ ॥
तो ब्रह्मगिरि द्विज हो सह्याच्या उत्तरेकडे शृंगीं ॥
जो स्वाश्रितीं सुवत्सल पद्माकर जेंवि सर्वदा भृंगीं ॥ २ ॥
त्याच्या दक्षिणभागीं जेथें द्रवले समस्त ही वेद ॥
तो वेदगिरि जयाचें दर्शन तत्काळ वारितें खेद ॥ ३ ॥
या दोघांच्या मध्यें आहे सत्तीर्थ आमलक नामें ॥
मुक्त चि केले स्वाश्रित अगणित या पुण्यसिद्धिच्या धामें ॥ ४ ॥
दिव्य जनांला चि दिसे ज्या स्थानीं दिव्यमूर्ति आम[62]लकी ॥
ज्याच्या स्नानें पानें करुनि म्हणे हाय न प्रजा म[63]ळकी ॥ ५ ॥
आमलकीतरूमूळापासूनि प्रकट जाहली वेणा ॥
जीची कीर्ति कळीला सिंहाची गर्जना जसी ए[64]णा ॥ ६ ॥

---

५८ दुरित=पाप. ५९ पुण्य=पवित्र. ६० सलिल=पाणी. ६१ वासव=इंद्र. ६२ आमलकी=आंवळीचें झाड. ६३ मळकी=पापी. ६४ एण=हरिण.

वेणेचा कृष्णेसीं योग महासिद्धिहेतु सन्मुनि हो ॥
बुध म्हणति कृष्णवेणा तद्दर्शन कलियुगांत जन्मुनि हो ॥ ७ ॥
कवि म्हणति कृष्णवेणा हें अंतीं नाम यो जिभे घोकीं ॥
लोकीं श्रेष्ठीं स्थापी कोणाला ही बुडों न दे शोकीं ॥ ८ ॥
मुनि हो ककुद्मतीसीं कृष्णेसीं प्रीतिसंगम नमो ही ॥
म्हणतां मुक्त करि तसा हा जैसा साधुसंग मन मोही ॥ ९ ॥
परम प्रेमळ हरिहर भक्तांचा तेंवि धन्य संगम हा ॥
देतो सर्वांसि जसा विपुला देनाचि अन्यसंग महा ॥ १० ॥
झाला ककुद्मतीच्या कृष्णेच्या तेंवि संग ओघांचा ॥
जे ज्ञान भक्तियोग स्वच्छ जसा काय या चि दोघांचा ॥ ११ ॥
याच्या कीर्तिपुढें परकीर्ति खजूरीपुढें जशा शिंदी ॥
हा कलिसंगमल हरी संगम लैहरी[६५] सुधाब्धिच्या निंदी ॥ १२ ॥
हिमगिरि गौरीस तसा कीर्तिस याच्या सुदंडक वियाला ॥
हा प्रीतिसंगम अतुळ गाति गातिल उदंड कवि याला ॥ १३ ॥
कृष्णादक्षिणतीरीं गणिकाख्य सुतीर्थ तें अहो मुनिहो ॥
म्हणतें माज्या तेजीं मुक्त महापातकास होमुनि हो ॥ १४ ॥
पूर्वीं नरनारायण विधिला भेटावया स्वयें आले ॥
घाले तत्सत्कारें जे मोहीं नित्य घालिते घाले ॥ १५ ॥
जो सकळतीर्थपूर्ण ब्रह्मकमंडलु तयांतुनि प्रकट ॥
होय नदी जाळाया श्रितपातक पापवासनासकट ॥ १६ ॥
श्लोक—म्हणती साधु करूनी ॥ प्रणिपात कमंडली ॥
जीतें निजक्षयरुजा ॥ गणि पातकमंडली ॥ १७ ॥
आर्या—संगम कमंडलीचा कृष्णेसीं जो तया चि शुद्धतमीं ॥
तपले नरनारायण मन हि म्हणे ज्यापुढें न उद्धत मीं ॥ १८ ॥
म्हणतें हें तीर्थ महापातक मद्यश चि हरिल गा मातें ॥
कळि याच्या महिम्यातें केवळ वश जेंवि हरि[६६] लगामातें ॥ १९ ॥
मुनिहो या तीर्थाचा महिमा आदर करूनि परिसा हो ॥
इतिहास उग्र आधीं मन तुमचें धृति धरूनि परि साहो ॥ २० ॥
होता गौतमनामा ऋषि तेजस्वी स्मरारिचा भक्त ॥
त्यक्तक्रोध जितेंद्रिय धनधान्यसमन्वित क्रियासक्त ॥ २१ ॥

---

६५ लहर=लाट. ६६ हरि=घोडा.

रम्य महाकाळवनीं वसला बहु काळ होय तो जीर्न[६७] ॥
मोजि न दक्षेसि म्हणे अंतीं मन शिवपदीं च योजीन ॥ २२ ॥
त्या वृद्धाची तरुणी रूपवती संगलालसा भार्या ॥
ती पतिच्या फार जपे किमपि जपेना चि तो तिच्या कार्या ॥ २३ ॥
पतितें नित्य म्हणे ती माझें जातें वृथा चि तारुण्य ॥
पाषाणीं द्रव तैसें तुझिया हृदयीं नसे चि कारुण्य ॥ २४ ॥
श्लोक—पुत्रार्थ संपादिति अंगना कीं ॥ पुत्राविणें होय चि भंग नाकीं ॥
कां व्यर्थ नानामिष ये रमाया ॥ वाटे मला हें विष येर माया ॥ २५ ॥
बळें चि घे साधुनि अंगसंग ती ॥ स्त्रीची करी सन्मतिभंग संगती ॥
म्हणे मम स्वप्रिय बायको पहा ॥ करील हो तीवरि काय कोप हा ॥२६॥
संध्याकाळीं गर्भ पोटांत राहे ॥ चित्तीं चिंता साधु तो विप्र वाहे ॥
गर्भच्छद्में तें महा पाप वाढे ॥ जेणें व्हावे प्राप्त संताप गाढे ॥ २७ ॥
सिंहोदरी प्रसवली सुत विप्रजाया ॥ हर्षोनि हर्षित करी बहु विप्रजा[६८] या ॥
संस्कार सर्व करि गौतम नंदनाचे॥ नेणोनि भावि फळ तो बहु मंद नाचे ॥२८॥
आर्या—गौतम गर्गासि म्हणे कैसा होईल पुत्र हा गर्गा ॥
बा सांग भविष्य तुला म्हणती सर्वज्ञ बहु जसे भर्गा[६९] ॥ २९ ॥
त्याचें जातक पाहुनि गर्ग म्हणे गौतमा मुनिवरा हे ॥
ऐसी तव कीर्ति जिला बहु लाजुनि शारदी पुनिव राहे ॥ ३० ॥
बा तुज असा कसा सुत झाला होणार हा महा पाप ॥
ब्रह्मघ्न मातृगामी मद्यप देईल दर्शनें ताप ॥ ३१ ॥
याचें नाम सुदामा परम दुरात्मा परंतु हा अंतीं ॥
पावेल शांति कृष्णामाहात्म्यीं गाइजेल ही संतीं ॥ ३२ ॥
हें ऐकुनि धर्मात्मा गौतम मुर्छित पडे रडे तापें ॥
स्त्रीतें म्हणे कसी गे प्रसवलिस महाघ तूं महा पापे ॥ ३३ ॥
जेंवि बहु कुपुत्राचें न फणीचें[७०] तेंवि दे वपु त्रास ॥
देता झाला कैसा ऐशा मज देवदेव पुत्रास ॥ ३४ ॥
गृहशून्य अपुत्राचें न कुपुत्राचें चि शून्य गृह लोकीं ॥
इत्यादि विलाप करी तो गौतम मग्न होय बहु शोकीं ॥ ३५ ॥
शोकें हृदय तडकलें बहुधा झालें न हरिहर स्मरण ॥
बहु हाय हाय वदला गौतम तत्काळ पावला मरण ॥ ३६ ॥

---

६७ जीन=म्हातारा. ६८ विप्रज=निपुत्रिक. ६९ भर्ग=शिव. ७० फणी=साप.

वेणेचा कृष्णेसीं योग महासिद्धिहेतु सन्मुनि हो ॥
बुध म्हणति कृष्णवेणा तद्दर्शन कलियुगांत जन्मुनि हो ॥ ७ ॥
कवि म्हणति कृष्णवेणा हें अंतीं नाम यो जिभे घोकीं ॥
लोकीं श्रेष्ठीं स्थापी कोणाला ही बुडों न दे शोकीं ॥ ८ ॥
मुनि हो ककुद्मतीसीं कृष्णेसीं प्रीतिसंगम नमो हीं ॥
म्हणतां मुक्त करि तसा हा जैसा साधुसंग मन मोहीं ॥ ९ ॥
परम प्रेमळ हरिहर भक्तांचा तेंवि धन्य संगम हा ॥
देतो सर्वांसि जसा विपुला देनाचि अन्यसंग महा ॥ १० ॥
झाला ककुद्मतीच्या कृष्णेच्या तेंवि संग ओघांचा ॥
जे ज्ञान भक्तियोग स्वच्छ जसा काय या चि दोघांचा ॥ ११ ॥
याच्या कीर्तिपुढें परकीर्ति खजूरीपुढें जशा शिंदी ॥
हा कलिसंगमल हरी संगम लैहेरी[६५] सुधाब्धिच्या निंदी ॥ १२ ॥
हिमगिरि गौरीस तसा कीर्तिस याच्या सुदंडक वियाला ॥
हा प्रीतिसंगम अतुळ गाति गातिल उदंड कवि याला ॥ १३ ॥
कृष्णादक्षिणतीरीं गणिकाख्य सुतीर्थ तें अहो मुनिहो ॥
म्हणतें माज्या तेजीं मुक्त महापातकास होमुनि हो ॥ १४ ॥
पूर्वीं नरनारायण विधिला भेटावया स्वयें आले ॥
घाले तत्सत्कारें जे मोहीं नित्य घालिते घाले ॥ १५ ॥
जो सकळतीर्थपूर्ण ब्रह्मकमंडलु तयांतुनि प्रकट ॥
होय नदी जाळाया श्रितपातक पापवासनासकट ॥ १६ ॥
श्लोक—म्हणती साधु करूनी ॥ प्रणिपात कमंडली ॥
जीतें निजक्षयरुजा ॥ गणि पातकमंडली ॥ १७ ॥
आर्या—संगम कमंडलीचा कृष्णेसीं जो तया चि शुद्धतमीं ॥
तपले नरनारायण मन हि म्हणे ज्यापुढें न उद्धत मीं ॥ १८ ॥
म्हणतें हें तीर्थ महापातक मद्यश चि हरिल गा मातें ॥
कलि याच्या महिम्यातें केवळ वश जेंवि हरि[६६] लगामातें ॥ १९ ॥
मुनिहो या तीर्थाचा महिमा आदर करूनि परिसा हो ॥
इतिहास उग्र आधीं मन तुमचें धृति धरूनि परि साहो ॥ २० ॥
होता गौतमनामा ऋषि तेजस्वी स्मरारिचा भक्त ॥
त्यक्तक्रोध जितेंद्रिय धनधान्यसमन्वित क्रियासक्त ॥ २१ ॥

---

६५ लहर=लाट. ६६ हरि=घोडा.

रम्य महाकाळवनीं वसला बहु काळ होय तो जीर्न[६७] ॥
मोजि न दक्षेसि म्हणे अंतीं मन शिवपदीं च योजीन ॥ २२ ॥
त्या वृद्धाची तरुणी रूपवती संगलालसा भार्या ॥
ती पतिच्या फार जपे किमपि जपेना चि तो तिच्या कार्या ॥ २३ ॥
पतितें नित्य म्हणे ती माझें जातें वृथा चि तारूण्य ॥
पाषाणीं द्रव तैसें तुझिया हृदयीं नसे चि कारूण्य ॥ २४ ॥
श्लोक--पुत्रार्थ संपादिति अंगना कीं ॥ पुत्राविणें होय चि भंग नाकीं ॥
कां व्यर्थ नानामिष ये रमाया ॥ वाटे मला हें विष येर माया ॥ २५ ॥
बळें चि घे साधुनि अंगसंग ती ॥ स्त्रीची करी सन्मतिभंग संगती ॥
म्हणे मम स्वप्रिय बायको पहा ॥ करील हो तीवरि काय कोप हा ॥२६॥
संध्याकाळीं गर्भ पोटांत राहे ॥ चित्तीं चिंता साधु तो विप्र वाहे ॥
गर्भच्छद्में तें महा पाप वाढे ॥ जेणें व्हावे प्राप्त संताप गाढे ॥ २७ ॥
सिंहोदरी प्रसवली सुत विप्रजाया ॥ हर्षोनि हर्षित करी बहु विप्रजा[६८] या ॥
संस्कार सर्व करि गौतम नंदनाचे ॥ नेणोनि भावि फळ तो बहु मंद नाचे ॥ २८॥
आर्या--गौतम गर्गासि म्हणे कैसा होईल पुत्र हा गर्गा ॥
बा सांग भविष्य तुला म्हणती सर्वज्ञ बहु जसे भर्गा[६९] ॥ २९ ॥
त्याचें जातक पाहुनि गर्ग म्हणे गौतमा मुनिवरा हे ॥
ऐसी तव कीर्ति जिला बहु लाजुनि शारदी पुनिव राहे ॥ ३० ॥
बा तुज असा कसा सुत झाला होणार हा महा पाप ॥
ब्रह्मघ्न मातृगामी मद्यप देईल दर्शनें ताप ॥ ३१ ॥
याचें नाम सुदामा परम दुरात्मा परंतु हा अंतीं ॥
पावेल शांति कृष्णामाहात्म्यीं गाइजेल ही संतीं ॥ ३२ ॥
हें ऐकुनि धर्मात्मा गौतम मुर्छित पडे रडे तापे ॥
स्त्रीतें म्हणे कसी गे प्रसवलिस महाघ तूं महा पापे ॥ ३३ ॥
जेंवि बहु कुपुत्राचें न फणीचें[७०] तेंवि दे वपु त्रास ॥
देता झाला कैसा ऐशा मज देवदेव पुत्रास ॥ ३४ ॥
गृहशून्य अपुत्राचें न कुपुत्राचें चि शून्य गृह लोकीं ॥
इत्यादि विलाप करी तो गौतम मग्न होय बहु शोकीं ॥ ३५ ॥
शोकें हृदय तडकलें बहुधा झालें न हरिहर स्मरण ॥
बहु हाय हाय वदला गौतम तत्काळ पावला मरण ॥ ३६ ॥

---

६७ जीन=म्हातारा. ६८ विप्रज=निपुत्रिक. ६९ भर्ग=शिव. ७० फणी=साप.

मृत पति सुत शिशु[७१] टाकुनि संपादाया महाघ रागेली ॥
सच्चरितावरि सहसा सोडुनि सिंहोदरी घरा गेली ॥ ३७ ॥
ती कान्यकुब्जदेशीं गणिकांची[७२] नायिका स्वयें झाली ॥
भ्याली नाहीं नरका बहु भक्षुनि मांस ती सुरा प्याली ॥ ३८ ॥
तारुण्यें सौंदर्यें चातुर्यें सर्व तरूण लुटिले तें ॥
काय वदावें भुलले कामुक रंभेसि तेंवि कुटिलेतें ॥ ३९ ॥
दांतीं[७३] वरपर्यंकीं चवरांहीं वीजितीं[७४] तिला गणिका ॥
मणिकाय काय कांचन वाढे ती जेंवि वन्हिची कणिका[७५] ॥ ४० ॥
संपत्ति कामसेना[*] ती सेवी आयती समीं[७६] चवदा ॥
कामुक म्हणती तीतें जी रंभा काय ती समा च वदा ॥ ४१ ॥
तो शुशु सुहृज्जनाहीं वाढविला पुत्रसा च पोसून ॥
अत्यंत दुष्टचेष्टित जरि तो तरि तदपराध सोसून ॥ ४२ ॥
द्यूत धरी चोरी त्या चोरा परसंपदा दुरापा[७७] न ॥
सुहृदांस न आटोपे पाप सुदामा करी सुरापान ॥ ४३ ॥
जे पाप मार्गलुंपक त्यांत शिरे सत्यमार्गलुंपकसा ॥
रोधी त्यास न नरक त्रास निवारिल गजासि कूप कसा ॥ ४४ ॥
ब्राह्मण हि सुदाम्यानें वधिले तें पाप काय सांगावें ॥
मागावें बहु लघु हें गुरु म्हणती मांगिणी न कां गावें ॥ ४५ ॥
ऐसें करुनि सुदामा तो गेला कान्यकुब्ज देशातें ॥
घे पापकर्मपर्वत माथां न ब्रह्मकर्मलेशातें ॥ ४६ ॥
बुडविति जना न कोटिहि अरि लोभक्रोधकामसे नेला ॥
ऋषिसुत दुष्कर्मीला कीं तो दे भोग कामसेनेला ॥ ४७ ॥
वृत्त गळां पडुनि पुसे सर्व महापापपुंज तो तीस ॥
गणिका झालीस कसी पूर्वीं तूं सांग कोण होतीस ॥ ४८ ॥
श्लोक--सांगे ती निजवृत्त गोत्र पतिचें जें नाम तें आपलें ॥
त्याचें मानस ऐकतां उमजतां नातें अघें तापलें ॥
होय व्याकुळ हायहाय चि वदे दुर्जीविता त्रासला ॥
पर्यंकावरुनि क्षमेवरि[७८] पडे नष्टासुसा[७९] पासला[८०] ॥ ४९ ॥

---

७१ शिशु=लहान. ७२ गणिका=वेश्या. ७३ दांत=हस्तिदंताचा. ७४ वीजिती=वारा घालिती. ७५ कणिका=ठिणगी. ७६ समा=वर्षे. ७७ दुरापा=प्राप्त होण्यास अशक्य. ७८ क्षमा=पृथ्वी. ७९ नष्टासु=गतप्राण. ८० पासला=आडवा * कामसेना=हें नांव सिंहोदरीनें वेश्या झाल्यावर घेतलें होतें.

अघें आंत बाहेर ही ताप त्याला । सुचेना चि कांहीं तया तापल्याला ॥
म्हणे तो त्रिलोकीं अशा उद्धतातें । दिसेना चि देईल जें शुद्धता तें ॥५०॥
ब्रह्मघ्न ही मद्यप मातृगामी । ऐसा महापातकराशि हा मी ॥
कैसा तरूं या अघसागराला । घोंटील उग्रा न घसा गराला ॥ ५१ ॥

स्वदेहा मानये विष्टामूत्रांच्या मणिकां पण ॥
विटे सिंहोदरी निंदी बहु तें गणिकापण ॥ ५२ ॥

होत्यें धार्मिक [82]भूमिदेवगृहिणी म्यां भाग्य तें सोडिलें ॥
आप्तांचें मन शीलसद्गुणयशःस्नेहक्षयें मोडिलें ॥
लज्जामौक्तिकदामभूषण बरें अत्याग्रहें तोडिलें ॥
वेश्या होउनि शेवटीं अघ असें अत्युग्र हें जोडिलें ॥ ५३ ॥
प्राणत्यागा योग्य हे मी अशीला ॥ अन्य प्रायश्चित कैंचें अशीला ॥
स्पर्शेल श्रीवन्हि या काय देहा ॥ कीं मोडीत क्रीडला कायदे हा ॥ ५४॥

विटला जीव माझा हा ॥ कशाला काय गेह या ॥
जो रणीं मरणारा त्या ॥ स्वशाला काय गे ह्या ॥ ५५ ॥

तो ही ती ही होय [83]निर्विण्ण दोघें ॥ नेलीं दैवें जेंवि काष्टादि ओघें ॥
कोणी कोण्याच्या मुखातें न पाहे ॥ होतें तेथें गेह सर्वस्व राहे ॥ ५६ ॥

आर्या–भ्रमतां वनांत भाग्यें देवल परमर्षि भेटला भावें ॥
नमिला त्यांहीं तैसें तें बुडतां जेंवि बेट लाभावें ॥ ५७ ॥
देवल पुसे तयातें दिसतां दुःखित विरक्त सांगातें ॥
प्राणत्यागोद्यत कां कारण जें काय सत्य सांगा तें ॥ ५८ ॥
तीं दोघें ही म्हणती अश्राव्य अवाच्य तें महापाप ॥
घडलें आम्हां स्वामी तेणें अत्यंत पावलों ताप ॥ ५९ ॥
मुनिवर्या सर्वज्ञा ज्ञानें तुज न कथितां हि समजावें ॥
शरणागताघ तुझिया तेजें रविच्या हि सर्व तम जावें ॥ ६० ॥
देवल म्हणे समजलें मज तुमचें सर्व वृत्त सुज्ञानें ॥
निष्कृति[84] कृष्णा दुसरी या पापा पाहिली न सुज्ञानें ॥ ६१ ॥

श्लोक–नमुनि म्हणाति दोघें देवला सांग बापा ॥
कथिसि हरिल कृष्णा या अशा घोर पापा ॥
वद सदयवरा ती कोण कोठें पहावी ॥
अनुसरुनि तनू हे जीस आम्हीं वहावी ॥ ६२ ॥

---

८१ मणिक=मडकें. ८२ भूमिदेव=ब्राह्मण. ८३ निर्विण्ण=कंटाळलेला. ८४ निष्कृति=प्रायश्चित्त.

आर्या—देवल सांगे सह्यप्रभवा कृष्णा महानदी आहे ॥
वाहे प्राचींत जिच्या स्नानें पातक न लेश ही राहे ॥ ६३ ॥
झाली श्रीकृष्ण तनु श्रीकृष्णा भवभयासि उडवाया ॥
योगमयी तीर्थमयी ज्ञानमयी सर्व पाप बुडवाया ॥ ६४ ॥
रक्षिल कृष्णा चि तुम्हां कीं ती दोषाचळासि अशनी[८५] च ॥
ज्यां स्पर्शे वायु इचा ते होति न यमभटांसि[८६] वश नीच ॥ ६५ ॥
ब्रह्मनदी [८७]संभेदीं जा नरनारायणाश्रमीं च वसा ॥
माघशतस्नानें ती कृष्णा पावेल निश्चयें नवसा ॥ ६६ ॥
श्लोक—बरवा रस हा असार साचा ॥ न सुरांचा गुण तो असा रसाचा ॥
मुनिहो न च पी तथापि याला ॥ जडधी जाय दुज्या कथा पियाला ॥६७॥
यश हें बहु मानसा धुयाला ॥ पटु देती बहु मान साधु याला ॥
निववी पतितापहा नि वारी[८८] ॥ हरिजेचें अति ताप हा निवारी ॥ ६८ ॥
न हरितनुर्धुनी[८९] यशा समान ॥ स्वरस असें कळतां कशास मान ॥
त्रिदशीं[९०] कवि हि देति देवमाया ॥ भुलवि तयां उमजो न देवमाया ॥६९॥
इति श्रीरामनंदन मयूरविरचिते श्रीकृष्णामाहात्म्ये चतुर्थोऽध्यायः

---

## अध्याय पांचवा.

आर्या—मुनितें वंदुनि आलीं तीं नरनारायणाश्रमीं दोघें ॥
ओघें प्रमुदित केलीं झालीं च अघें तयां पुढें मोघें ॥ १ ॥
त्या अघनिकंतनीतें[९१] गणिका तत्सुत करुनियां प्रणति ॥
माते कृष्णे सद्गति आम्हां शरणागतांसि दे म्हणती ॥ २ ॥
स्नान करुनि अभयवर होइन निःसंग मी असा याची ॥
ती गणिका तो तत्सुत इच्छा धरि संगमीं वसायाची ॥ ३ ॥
पाहुनि मुनीश्वरातें दोघें लाजोनि दोंकडे गेलीं ॥
राहोनि दक्षिणोत्तर-तीरीं स्नानें उपोषणें केलीं ॥ ४ ॥
श्लोक—स्मरे ती जाऊं दे लव हि न रिकामा दिसवड ॥
करी तीन स्नानें जपुनि अरि कामादि सवड ॥
न पावे वैराग्यें तृण चि गणि कायोपरिभवा[९२] ॥
सुखें साहे वेंची तपुनि गणिका यापरि भवा[९३] ॥ ५ ॥

---

८५ अशनि=वज्र. ८६ भट=योद्धा. ८७ संभेद=संगम. ८८ वारि=पाणी. ८९ धुनी=नदी. ९० त्रिदश=देव. ९१ निकंतनी=नाशक. ९२ कायापरिभव=शरीरक्लेश. ९३ भव=संसार

आर्या–प्रायोपवेशीं[१४] करि ती गणिका निश्चय धरी मरायाचा
हरिहर नामस्मरणें सुचला सद्योग हा तरायाचा ॥ ६ ॥
दर्शन देऊनि पुसे कोण मनोरथ तुझा असें नंदी ॥
ऐकुनि गणिका हर्षे त्या वृषरूपेश्वरासि ती वंदी ॥ ७ ॥
हांसोनि म्हणे वृषभा तुज काय कथूं स्वयें तुझा भर्ता ॥
कर्ता सफळ मनोरथ कोठें तो नतभवव्यथाहर्ता ॥ ८ ॥
प्रभुला नंदी वंदी बंदी ज्याचे समस्त ही वेद ॥
गणिकोक्त तया सांगे तच्चित्तींचा हरावया खेद ॥ ९ ॥
परम प्रसन्न सांगुनि नंदीनें वृत्त देवमणि केला ॥
गणिकेला तो भेटे जैसा पवमान वन्हिकणिकेला ॥ १० ॥
देव म्हणे पावसि कां सेवुनि हें दिव्य वारि खेदास ॥
कृष्णेनें उद्धरिले हर्षविले सर्व सारिखे दास ॥ ११ ॥
श्लोक–ते मुक्त जे या कृष्णेचें करिती तटसेवन ॥
न जाणोनि हि माहात्म्य प्राशिती घटसे वनें[१५] ॥ १२ ॥
जे कोणी योगयागव्रतनिरत सदां तापस ब्रह्मचारी ॥
दाते विद्याभयांचे दृढ गुरुभजनीं गोद्विजत्राणकारी ॥
त्यांला जें प्राप्त होतें शुभ फळ गणिके जाण त्याहूनि भारी ॥
कृष्णेचें तीर्थकोटिस्तुत-शुचि-यश हें सेवितां भव्य वारी ॥ १३ ॥
कृष्णेच्या तपलीस पावन तटीं दुष्कर्म तें क्षाळिलें ॥
झालें शुद्ध तुझें कलेवर पुटीं[१६] सोनें जसें जाळिलें ॥
आतां सुभ्रु असेल कृत्य उरलें तें सांग शक्तास या ॥
मान्या तूं विजयादि जेंवि गिरिजासेवातिसक्ता सयीं[१७] ॥ १४ ॥
आर्या–ऐसें ऐकुनि पडली गणिका त्या प्रभुपुढें जसा दंड ॥
थंड क्षणांत झाली कीं करि जगदीश सुयश जें भंड ॥ १५ ॥
गणिका म्हणे प्रभुवरा माझें दुष्कृत तुला सकळ कळतें ॥
द्रवलासि कीं जनकमन दुःखित पाहुनि मुलास कळकळतें ॥ १६॥
न च तरत्यें मी करितां शत जन्में अति तपा वनामाजी ॥
त्वां लाज राखिली बा सदयवरा पतितपावना माजी ॥ १७ ॥
जरि सुप्रसन्न मजवरि झालासि दयार्णवा अगा धात्या ॥
ज्यांत असें दुःखभय प्रभुजी नाशीं भवा अगाधा त्या ॥ १८ ॥

---

१४ प्रायोपवेश=मरण्याचा निश्चय करून उपास करणें. १५ वन=उदक १६ पुट=मूस.
१७ सया=सख्या.

गणिकेश्वर या नामें तूं या कृष्णातटीं रहा देवा ॥
गणिकातीर्थ असें या तीर्थातें जग म्हणो महादेवा ॥ १९ ॥
या तीर्थीं माघव्रत करितां व्हावे चि सर्व ही मुक्त ॥
उक्त प्रणतांचें तूं सफळ करिसि तुज चि होय हें युक्त ॥ २० ॥
जे न्हातिल या तीर्थीं त्यांचें त्वां पापबीज जाळावें ॥
टाळावें विघ्न विभो सकळां शरणागतांसि पाळावें ॥ २१ ॥
नंदीवरि बैसुनि घे गणिकेस हि म्हणुनियां तथास्तु तिला ॥
केली प्रभुनें ऐसी विश्वाच्या पात्र हे कथा स्तुतिला ॥ २२ ॥
श्रीसिद्धेश्वरतीर्थीं माघस्नानें करूनियां शुचिता ॥
तो हि सुदामा पावे सद्गति जी ब्रह्मविज्जना उचिता ॥ २३ ॥
जाचा श्रवणीं भिजवी पाप्याचें देह वस्त्र ही घाम ॥
तें धुतलें जेणें त्या तीर्थाचें धूत-पाप हें नाम ॥ २४ ॥
श्लोक–स्वगुरुपुत्र सदाशिव पंडितें ॥ सुरसिकें निजसद्गुणमंडितें ॥
लिहविलें परमाद्भुत सह्यजा- ॥ यश म्हणे कळिकाळ असह्य ज्या ॥ २५ ॥
कृष्णेचें निज पूर्वजांसि लिहिलें माहात्म्य तर्पावया ॥
हें निःसीम अनंतभक्तहृदया आनंद अर्पावया ॥
ऐकावें रसिकाननें चि रसिकें साधावया मुक्तितें ॥
श्रीकृष्णाप्रियभक्तहो सुजन हो द्या मान या उक्तितें ॥ २६ ॥
श्रीरामनंदन मयूर लिहोनि पाहे ॥
हें कृष्णशंकर पदांवरि पुष्प वाहे ॥
कृष्णाप्रसाद शुभ हा गुण यांत आहे ॥
जो शंभुविष्णु-जन तो बहु हर्षलाहे ॥ २७ ॥
इति श्रीरामनंदन मयूरविरचितं श्रीकृष्णामाहात्म्यं संपूर्ण.

---

## पद्यं दत्तात्रेयस्य.

हे भवरोगभिषक्[1]चरणाब्जपरागलवा दत्ता ॥ धृ ॥
त्वद्भक्तिस अनुसरले त्यांची तुजवर ही सत्ता ॥
कां न चतुर्विध पुरुषार्थांची सिद्धि तदायत्ता ॥ १ ॥
त्वद्भक्तभयें चळचळ कांपे अंतक जगदत्ता[2] ॥
खातो युष्मद्भजनपराङ्मुख मुनि हि पडरिलत्ता ॥ २ ॥

---

१ भिषक्=वैद्य. २ जगदत्ता=जगत् खाणारा.

शांता तुज सोडूनि प्राकृत आराधी मत्ता ॥
भक्तमयूरघना तूं देशी सारा धी यत्ता ॥ ३ ॥

---

## ॥ पद. ॥

नंदनंदन नंदयानंदकंद सुखकंद कंदर्प[3]दर्पापहास्या ॥ धृ ॥
दीन मतिहीन पदलीन जलमीन जलगीनभुज वीनरथ[4] सर्वभूपा ॥
दुग्धघटभुग्धरणिधृग्धरणदग्धमुविदग्ध मलादिग्ध[6]वपु मुग्ध[7]रूपा ॥ १ ॥
अभ्रनिभ विभ्रमणशुभ्रगुण विभ्रमननदादभ्रकरुण भ्रमविनाशदक्षा ॥
कामजनकामलसुधामय भवामयहरामरपरामसुतकल्पवृक्षा ॥ २ ॥

---

## पद ब्याहागडाराग

रघुवीरा रामा तूं हितकारी ॥ धृ ॥
तुजवांचुनि भवपारावीरीं ॥ कोणी अन्य न तारी ॥ १ ॥
उद्धरिली पदपद्मरजें जी ॥ शापशिळा मुनिनारी ॥ २ ॥
वधिले राक्षस लीलेनें जे ॥ वज्रधर[10]ांस हि भारी ॥ ३ ॥
दिव्य विमानीं वाहुनि नेली ॥ स्वपदीं नगरी सारी ॥ ४ ॥
भक्तमयूरमनस्तापातें ॥ त्वद्गुणवारिदें[11] वारी ॥ ५ ॥

---

# अथ श्री विठ्ठलस्तोत्र.

तुझें पादपद्मद्वयध्यान कांहीं ॥ न केलें क्षणार्धार्ध हीं येथ पाहीं ॥
घडीही नसें पावलों साधुसंगा ॥ मला रक्ष रक्ष प्रभो पांडुरंगा ॥ १ ॥
करावी तुझी मोक्षदा शुद्ध भक्ति ॥ गृहस्त्रीधनीं ही असावी विरक्ति ॥
असें हें ठसो सर्वदा अंतरंगा ॥ मला रक्ष रक्ष प्रभो पांडुरंगा ॥ २ ॥
तुझें नाम निर्लज्ज होऊनि गावें ॥ प्रपंचांतुनी शीघ्र वाटे निघावें ॥
करीती परंतु स्मर[1]क्रोध दंगा ॥ मला रक्ष रक्ष प्रभो पांडुरंगा ॥ ३ ॥
न जाणोनि माहात्म्य ही आननाशी ॥ तुझें नाम येतां महा पाप नाशी ॥
स्वमार्गच्युताजामिलाघौघभंगा ॥ मला रक्ष रक्ष प्रभो पांडुरंगा ॥ ४ ॥
गजेंद्रासि नक्रें धरीतां जळांत ॥ तुला आठवीतां स्वयें त्वां पळांत ॥
तया रक्षिलें सन्मनाच्या पलंगा ॥ मला रक्ष रक्ष प्रभो पांडुरंगा ॥ ५ ॥

---

३ कंदर्प=मदन. २ वीनरथ=गरुडवाहन. ५ धरणिधृग्धर=पर्वतधारी. ६ मलादिग्धवपु=मातीनें भरलें आहे अंग ज्याचें असा. ७ मुग्ध=सुंदर. ८ भवामय=भवरोग. ९ पारावार=समुद्र. १० वज्रधर=इंद्र. ११ वारिद=मेघ. १ स्मर=मदन.

तुझ्या वामनत्वीं पदातें विधीनें ॥ जयीं क्षाळिलें भक्तिपूजाविधीनें ॥
जगद्दोषहंत्री तधींहूनि गंगा ॥ मला रक्ष रक्ष प्रभो पांडुरंगा ॥ ६ ॥
जरी लाविला तूजसीं नित्य दावा ॥ तयां तारिलें त्वां भवारण्यदावा[2] ॥
स्वभक्ताचिया खाजवीलें तुरंगा ॥ मला रक्ष रक्ष प्रभो पांडुरंगा ॥ ७ ॥
खगेंद्रध्वजा क्रूरकर्मा सदर्प ॥ गिळीतो महाभीम[3] संसारसर्प ॥
पहा लागल्या वेदना लक्ष अंगा ॥ मला रक्ष रक्ष प्रभो पांडुरंगा ॥ ८ ॥

या दासाहुनि हीन दीन विषयव्यामूढ ही संकटीं ॥
लीलेनें बहु तारिले कलियुगीं राहोनि भीमातटीं ॥
आहेसि प्रभु तूं उभा चि सदया ठेवूनि पाणी कटीं ॥
मातें मात्र न तारुनी अयश हें संपादिसी शेवटीं ॥ ९ ॥
मन्नामग्रहणें चि पापिजन जो तारीन तो निश्चयें ॥
जो जें वांछिल त्यासि तें वरद मी अर्पीन सर्व स्वयें ॥
ऐशी तूं जगदीश्वरा प्रभुवरा केली प्रतिज्ञा खरी ॥
या दीनासि न रक्षितां त्रिभुवनीं होत्ये मृषा[4] वैखरी[5] ॥ १० ॥
आतां उद्धर सत्वर प्रभुवरा ठेऊनि पाणी कटीं ॥
देवा काय विचार फार करिसी गुंतों नको संकटीं ॥
निःसंगा न शिवेल पाप तुजला जालें जरी शेवटीं ॥
तें ही जाइल सर्वदां हि वससी श्रीचंद्रभागातटीं ॥ ११ ॥
प्रल्हादध्रुवनारदर्षिशुकभीष्मव्यासदाल्म्यादि जे ॥
ते ज्ञानी सुकृती तयांसि दिधलें तें तों न मातें दिजे ॥
वेश्याजामिळपूतनाघदनुजव्याधादिकां जें दिलें ॥
तें द्यावें फळ त्याहुनी बहुत मी दुष्कर्म संपादिलें ॥ १२ ॥

॥ समाप्त. ॥

---

## गोपीगोडव्याच्या शेवटील पदें.

पसरीं पदरा जीवा पदराजीवा याच ॥ धृ ॥ रज गुरु
चिंतामणि लघु मग किति माणिक आणिक पाच ॥ १ ॥
हे चि चुकविती या लोकींचे परलोकींचे जाच ॥ २ ॥
वर्षाकालिं मयूर तसा हो नित्य प्रमुदित नाच ॥ ३ ॥

### पद २

नतमुख सुकवितिल कसे सुकवितिलकसे पाय ॥ धृ ॥

---

२ दाव=अग्नि. ३ भीम=भयंकर. ४ मृषा=खोटी. ५ वैखरी=वाणी.

शरणागतभयहरणावांचुनि याला करणें काय ॥ १ ॥
अपराधांतें घालिल पोटीं न असा बाप न माय ॥ २ ॥
यांच्या कीर्तीचें देवांची करिल चि गायन गाय ॥ ३ ॥
या निज भक्त मयूरघनाचा न जगीं महिमा माय ॥ ४ ॥

## राधाकृष्णसंवाद.

आर्या–श्रीकृष्ण म्हणे राधे सुकृतीं द्यावें मनास खेदा न ॥
म्हण हांसुनि घे सफळा व्हाया निजकामना सखे दान ॥ १ ॥
राधा म्हणे तुज शठा गोपाळा दानपात्रता नाहीं ॥
कोठेंही नायकिलें, वेदरहित दानपात्र, तानींहीं[1] ॥ २ ॥
श्रीकृष्ण म्हणे केवळ मुग्धा[2] तूं वेद पांचवा गे हा[3] ॥
राधा म्हणे त्यजी हा पण न करूनियां चि वांचवा गेहा ॥ ३ ॥
श्रीकृष्ण म्हणे राधे मुग्धे गांधर्व पांचवा समज ॥
समचि सुखद सर्व हि हे ठावे कविमतिस पांच वास मज ॥ ४ ॥
राधा म्हणे न गाहो स्वकरा सांवरूनि गानयज्ञ करा ॥
वाचाळ हो तरि तुम्ही जाच कसे करूनि गान यज्ञकरा ॥ ५ ॥
श्रीकृष्ण म्हणे राधे न रुसें हें सामगान यज्ञांत ॥
गाना वांचूनि सख्ये यज्ञ नसे सामगा नयज्ञांत ॥ ६ ॥
राधा म्हणे न मागति भलतें देति न जुने नवे दाते ॥
जे वेदज्ञ विलंघिति नाकीं याया जुनेन वेदा ते ॥ ७ ॥
श्रीकृष्ण म्हणे सुंदरि पुरवावी अर्थिकामना कीं ते ॥
वेदीं मुख्य चि झाले पूज्य करूनि अर्थिकाम नाकीं ते ॥ ८ ॥
राधा म्हणे मुखांबुज हो न श्रमि तव सुपात्र पाहीन ॥
देईन देय रुचतां न च मत अमित वसुपा त्रपा[4]हीन ॥ ९ ॥
मागों नये पदार्थ ज्ञात्यानें सुगुरुकृतयशोभलते ॥
कोण म्हणेल सुरांच्या पात्र प्रिय पुरवितां न शोभ लते ॥ १० ॥
श्रीकृष्ण म्हणे न म्हणति द्यावे फलपुष्पनवसुरतदान
शुभ कायदान न वदति हित समजुनि दे च नवसुर तदा न ॥ ११ ॥
राधा म्हणे यश नसे जें दुर्लभ वस्तु तदभिलाखांतें[5] ॥
एक हि नसेल धर्मन्यायरहित पूर्णकाम लाखांत ॥ १२ ॥

१ तान=गाण्यांतील तान. २ मुग्धा=असमंजस. ३ हा=गंधर्ववेद ( गायनविद्या. )
४ त्रपा=लज्जा. ५ अभिलाख=अभिलाष ( इच्छा ).

श्रीकृष्ण म्हणे पात्रीं द्यावें मानुनि घनासमान वया ॥
राधे वळें चि म्हणती पात्रातें घ्या धनास मानव या ॥ १३ ॥
राधा म्हणे हंसें ये हे आइकतां चि बोल कानांहीं ॥
स्वार्थपर अनळस असा वाटे कोठें हि बोलका नाहीं ॥ १४ ॥
श्रीकृष्ण म्हणे न म्हणती गुरुलघु सुरगुरु पदा न ते लिंगा ॥
दानीं लोभी बहु तरि अनुचित बोले कदा न तेलिंगा ॥ १५ ॥
राधा म्हणे घनाभा दानाचा लाभ हा निराळ्यातें ॥
शालीशीं सरि करितां धरितां हट लाभहानि राळ्यातें ॥ १६ ॥
श्रीकृष्ण म्हणे देणें न चुके दे दान जनितमा राधे ॥
पाहे उत्तम वस्तूत्पन्नमहालोभ जनितमाराधे ॥ १७ ॥
राधा म्हणे न चाले हरि बळ हे परवधू कनकलंका ॥
सोडा मार्ग तुम्हांसीं लाविल वदतां मला जन कलंका ॥ १८ ॥
श्रीकृष्ण म्हणे राधे जैसा दशवदनहतक लंकेला ॥
नाहीं व्हाया बसला वरुनि तुला गर्व गतकलंकेला ॥ १९ ॥
राधा म्हणे अघ वधी त्यांस वळें जे परांगना हरिते ॥
रामा तसें परा ही अन्यद्दत कलैत्र तप्त कीं करितें ॥ २० ॥
श्रीकृष्ण म्हणे सत्य चि वदसि म्हणुन हरिन आपली नवरी ॥
वळसिल तूं हि क्षणभरि विरहें कोपोनि तापली न वरी ॥ २१ ॥
राधा म्हणे अगाई चाल सखे कृष्णजी बरे शिकलां ॥
नवरी कोण गळपडू गोपीभाग्यें व्रजीं बरे टिकलां ॥ २२ ॥
श्रीकृष्ण म्हणे राधे पूस यशोदेसि काय भय जा गे ॥
नव्हती म्हणत मज तुझा नवरा सत्यांत धर्म जय जागे ॥ २३ ॥
राधा म्हणे स्वअनयें विटवितसां कां बळी दिलीप गडी ॥
हिसकुनि घेत्यें तुमची हे मुरली कांबळी दिली पगडी ॥ २४ ॥
श्रीकृष्ण म्हणे मुरली टाकूनि दिली हिरोनि कुंजांत ॥
दे हुडकुनि न शिरे न चि एकाकी मूर्त-तिमिरपुंजांत ॥ २५ ॥
राधा म्हणे पहा जा व्हावी जरि हे मनःप्रिया मुरली ॥
कांहीं निजप्रतिष्ठा न उरेल तुम्हांमुळें म्हणुनि झुरली ॥ २६ ॥
श्रीकृष्ण म्हणे घ्यावी मुरली दंडार्थ एक दाँम हि म्यां ॥
मिटक्या देउनि देणें अमृताच्या लाज एकदां महिम्या ॥ २७ ॥
राधा म्हणे उगे हो चोर उगे घेतलेंत बांधून ॥

---

६ कलत्र=स्त्री. ७ दाम=गेरी.

कळले रसगुण पुनरपि ते चि पहावे कशासि रांधून ॥ २८ ॥
श्रीकृष्ण म्हणे आपण देत चि होतीस सुरस दामातें ॥
अमृत प्राशुनि हि ह्मणत होते बहु धन्य सुर सदा मातें ॥ २९ ॥
राधा म्हणे चला हो गेले गांवास काय मामाजी ॥
अथवा आहे चि घरीं म्हणवी बांधूनि माय, मॉ, मॉ, जी ॥ ३० ॥
श्रीकृष्ण म्हणे मजला बांधावें चित्त या चि जरि कामीं ॥
तरि बांध या भुजांहीं पाहें राहें रुसोनि न रिकामी ॥ ३१ ॥
राधा म्हणे करावा अरसाचा आद्य वाद काशाला ॥
उत्तर देइन चि तुम्हां जसि देती वाद्यवादका शाला ॥ ३२ ॥
श्रीकृष्ण म्हणे उत्तर देइन चि असें जसें च वदलीस ॥
दान हि देइन म्हण हठ कर्पूरासीं न योग्य कदलीस ॥ ३३ ॥
राधा म्हणे असें मी जा घ्या हुडकुनि तुम्हीं च ती मुरली ॥
जरि मेळवाल गेली जी दानेच्छा म्हणा चि ती पुरली ॥ ३४ ॥
श्रीकृष्ण म्हणे राधे घेइन तुजपासुनी च मुरलीला ॥
मी एकलीस जाऊं नेदीं गिवसील कोण झुरलीला ॥ ३५ ॥
या ही तुझ्या सखीला मी ठेउनि घेइनाचि ओलीला ॥
कुल्या[9] जातां तृषिता तीचा चाटूनि काय ओलीला ॥ ३६ ॥
राधा म्हणे सखी सह जाउनि हुडकीन मी च हें राहो ॥
नवनीताची हांडी रक्षा दूरुनि उगे चि हेरा हो ॥ ३७ ॥
कृष्ण म्हणे व्यसन मला लावियलें शिशुपणांत नवनीतें ॥
म्हणसील भक्षिलें चि स्पष्ट प्रेक्षित बसेन न वनीं तें ॥ ३८ ॥
राधा म्हणे करावें प्रियसखि आतां असें कशाला गे ॥
अजि न म्हणेन तसें मी अनृतोक्तें डाग कीं यशा लागे ॥ ३९ ॥
श्रीकृष्ण ह्मणे राहो आलि[10] तुझी चाल मी हि शोधीन ॥
नाहीं तरि निजमुरलीदान न मिळतां असें चि रोधीन ॥ ४० ॥
आलि म्हणे सखि याच्या पुरतिल न मयासुरादिजन कपटा ॥
जो कुंजीं मुरली दे शोधुनि नेऊनि याचि कनकपटा[11] ॥ ४१ ॥
श्रीकृष्ण म्हणे राधे मुरली कां त्वां तसी झुगारावी ॥
ती काय तव सपत्नी गे तीवरि न च रमा उगारावीं ॥ ४२ ॥
राधा म्हणे हठचि बहु करितां तरि मी अशी च राहेन ॥

---

८ मा, मा=नको, नको. ९ कुल्या=अल्प नदी. १० आलि=सखी. ११ कनकपट=पीतांबरधारी.

शून्या चि काय जगती साहेन उगी च वाट पाहेन ॥ ४३ ॥
वृषभानुजा[१२] म्हणे किति मुरली श्रोस हि गणी न हे राधा ॥
हेरा धांवुनि घ्या त्या दयिता लाभोत्सवीं अहेरा धा ॥ ४४ ॥
श्रीराधा होय पुढें ब्रह्मवनश्यामकाय मागोन ॥
ऐशा सुयशावांचुनि त्यासि इतर काम काय मागोन ॥ ४५ ॥
प्रभु सुप्रसन्न दे त्या कां श्रीपरि उर न राधिकालि[१३]ला ॥
गाय मयूर प्रेमें चिंतुनि हे सुरनराधिका-लीला ॥ ४६ ॥
श्लोक—हा ग्रंथ नामें नवदानकेली[१४] ॥ क्रीडा विचित्रा न वदा न केली ॥
नाना स्वभक्तांप्रति भाव दावी ॥ साक्षात्तदाशाप्रतिभा[१५] वदावी ॥ ४७ ॥
इति श्री मयूरविरचितोऽयं श्रीराधाकृष्णसंवादः संपूर्णः

---

## अथ श्रीरामप्रार्थना.

### श्लोक. ( अनुष्टुप् )

श्रीरामा जलदश्यामा देवदेवा दयाकरा ॥
धाता भवीं फळें उग्रें दे वदे वा दया करा ॥ १ ॥
जे कामक्रोधलोभादि यांहीं मोहूनियां बळें ॥
कर्में करविलीं त्यांचीं भोगावीं लागती फळें ॥ २ ॥
विश्व त्वदाश्रयें खोटी पर माया सदा विती ॥
जीव भ्रमवि ती रामा परमायास[१] दाविती ॥ ३ ॥
सुस्वामिनें म्हणावें बा कां सुदासी नको बळें ॥
हृदय प्रभुचें व्हावें कां उदासीन कोंवळें ॥ ४ ॥
दीना गांजी मोहपाश हा पाउल गडी लया ॥
नेऊ रामा अन्य कोण बापा उलगडील या ॥ ५ ॥
ममैवांशो जीवलोके जीवभूत असे स्वयें ॥
वदलासि प्रभुवरा सत्य त्वद्वाक्य निश्चयें ॥ ६ ॥
त्वदंश जीव मग कां अविद्या[२] यास भाजिती ॥
तुला तों भंग मोहातें कवि द्याया सभाजिती[३] ॥ ७ ॥
एकदां पाय बा रामा शरण्या दाव पाव कीं ॥
त्वद्दर्शनीं नाश अघा अरण्या दावपावकीं ॥ ८ ॥

---

१२ वृषभानुजा=वृषभानूची कन्या ( राधा ). १३ राधिकालि=राधिका हीच सखी ( आलि ). १४ केली=क्रीडा. १५ प्रतिभा=ज्ञानस्फूर्ति.

१ परमायास=अतिसंकट. २ अविद्या=अज्ञान. ३ सभाजिती=पूजिती.

दिला हर्ष मखत्राणें गाधिजा आधि ज्या महीं[4] ।।
गाती पूर्वज ताराया निज या विजया महा ।। ९ ।।
दिली गति तुवां होतां पातकाकुळ ती सती[5] ।।
रामा करी जी जोडूनी हात काकुळतीस ती ।। १० ।।
भंगिला प्रभुचा चाप छात्र[6] भार्गवराम ही ।।
म्हणे सीतेसि धरुनी क्षात्रमार्ग वरा मही ।। ११ ।।
पावले शोक साकेतीं[7] रामा जीव नवा सदा ।।
मान्या तुला त्वत्ताताची रामा[8] जी वनवासदा ।। १२ ।।
वटदुग्धप्रदा आली जो गुहाख्य निषाद या ।।
रामा तुझा सख्या जैसी यावी देतां विषा दया ।। १३ ।।
तुला स्वशोकें मेला तो म्हणवी जरि बाप हा ।।
दिला दुर्वह राज्याचा भरता भरताप हा ।। १४ ।।
दिल्यास धर्मा रक्षाया भरता पादुका नया ।।
रक्षिती न पडों देती भरतापादुकानया ।। १५ ।।
त्वां ते निवविले ज्यांच्या मनीं ताप सदा वसे ।।
जे रक्षस्त्रस्तदोषांच्या वनीं तापस दावसे ।। १६ ।।
वाटे हेममय स्पष्ट श्रीस जो ऐण[9] तापद ।।
झालासि तूं हि शोकाचें बा जसा नेणता पद ।। १७ ।।
श्रीतें छळें[10] हरि करी दशानन रसा[11] हता ।।
साहिली त्वां चि देवा ती दशा न नर साहता ।। १८ ।।
या प्रसादें काय झाली शबरी न बरी यशें ।।
त्वां सेविलीं घेउनि तीं बदरें पदरें वशें ।। १९ ।।
पडों दे कळ चिंतेची ज्या न कीशांस[12] दाद या ।।
दिलें राज्य तुझी दीनीं जानकीशा सदा दया ।। २० ।।
रामा मोह न बाधों दे या बालिशमनास जें ।।
तें कराया दीनबंधो बा बालिशमना सजें ।। २१ ।।
माराया त्या जगीं ज्याचें महायश तशासि ते ।।
कपिऋक्ष तुला झाले सहाय शत शासिते ।। २२ ।।
जो समाचार सीतेचा चूडामणि हि अर्पि तो ।।

---

४ मह=उत्सव ५ सती=पतिव्रता ( अहल्या ). ६ छात्र=शिष्य. ७ साकेत=अयोध्या. ८ रामा=स्त्री ( कैकेयी ) ९ एण=हरिण. १० छळ=कपट. ११ रसा=पृथ्वी. १२ कीश=वानर.

कपि वाटे तुला प्राज्यें पीयूषें[13] प्राण तर्पितो ॥ २३ ॥
तुवां आलिंगिला प्रेमें आंजनेय[14] महागुणी ॥
हर्षोत्कर्षें कंजनाभा[15] अंजना[16] भा[17] धरी दुणी ॥ २४ ॥
शरणागत जो रामा बिभीषण तयावरी ॥
राज्याभिषेक केला त्वां नम्रा तव दया वरी ॥ २५ ॥
हें त्वद्यश म्हणे स्नेही न तात वद या वरी ॥
बाळा प्रसूची[18] न जसी नता वद दया वरी ॥ २६ ॥
निर्मिसी निववाया भूकन्यकामन सेतुला ॥
रामा भक्तप्रियाहूनी अन्य काम नसे तुला ॥ २७ ॥
त्वयार्क तूं द्विषद्दुर्गसैन्य जें आडवारि[19] तें ॥
सधर्मीं प्रेम असतें ठाकतें आड वारितें ॥ २८ ॥
मरती भरती रामा वा आज्यजिर[20] वीर ते ॥
त्वच्छराग्नि तयां होमीं तें आज्यें[21] जिरवी रते ॥ २९ ॥
घनसे देववीरश्रीपद रावण वात सा ॥
न शमे जो पसरितां पदरा वणवा तसा ॥ ३० ॥
देवब्राह्मण रक्षाया त्वां तो खपविला भला ॥
या तुझ्या विजयें रामा वा तोखें[22] पवि[23] लाभला ॥ ३१ ॥
तुझ्या मनीं न तम कीं रज नीच रमा वळे ॥
शुद्धसत्वा दुर्गुण तो रजनीचर[24] मावळे ॥ ३२ ॥
करी जपे चरित्राच्या जी तेजें पालनास ती ॥
अग्निकुंडीं पुष्कराक्षा दुष्करा क्षालना सती ॥ ३३ ॥
कपींस स्वर्ग रुचला न पुष्पकविमानसा ॥
त्वद्यश प्रिय नाकींचें[25] न पुष्प कविमानसा ॥ ३४ ॥
श्रीरामा त्वद्वियोगार्ता राज्याचा भर तापद ॥
त्वद्दास्य हें चि रुचलें सद्भक्ता भरता पद ॥ ३५ ॥
जो निंदी काय ठावी त्या तत्वाचि परिटा किली ॥
रामा[26] लोकाभिरामा त्वां सत्वाची[27] परि टाकिली ॥ ३६ ॥

---

१३ पीयूष=अमृत. १४ आंजनेय=अंजनीपुत्र ( मारुती ) १५ कुंज=कमल. १६ अंजना=मारुतीची आई. १७ भा=शोभा. १८ प्रसू=आई. १९ आडवारी=विहिरीं-तलें पाणी. २० आज्यजीर=आजि + अजीर ( रणांगण ). २१ आज्य=शेळी ( अ-जा ) चें तूप. २२ तोख=संतोष. २३ पवि=वज्र. २४ रजनीचर=राक्षस. २५ नाक=स्वर्ग. २६ रामा=स्त्री ( सीता ) २७ सत्वाची=पतिव्रता.

त्वां चि प्रजा रंजविल्या नेणती ज्या मनोगदा ॥
तुजी सर्वां ही नृपांला कृपा लाजविती सदा ॥ ३७ ॥
विमानीं वाहिले नेले पुरस्थ विरहासहें ॥
त्वां न केलें होय जेणें पुरस्थविरहास हें ॥ ३८ ॥
त्वां सेविलें अमृतसें सार साकेत काकवी ॥
पुरी अन्या न तुळिती सारसा केतका कवी ॥ ३९ ॥
बापा भक्त मयूराच्या तापा वारिसि तूं घना ॥
रामा या मन्मुखीं स्थापीं नामा आनंदवीं मना ॥ ४० ॥
इति श्रीमद्रामनंदनमयूरविरचिता श्रीरामप्रार्थना संपूर्णा.

---

## अथ श्रीहरिहरस्तव.

श्रीचरणां भजती जे तत्प्रिय पुरविसि उमापते काम ॥
रक्ष कमलावरा या मार्गे विख्यात बा तुझें नाम ॥ १ ॥
श्रीमा या तव दासा दास्य चि दे यांत होतसें धन्य ॥
नर मानिल या च वरा ओपीं बा हें बरें नसे अन्य ॥ २ ॥
संसार परम दारुण अनुदिन हा वदावे शंकरा बा या ॥
सेवेंत बलावरजों पायांच्या समुचिता नतीं माया ॥ ३ ॥
बापा भवपांथांच्या सीतारामा असोत कवि दाते ॥
जे न भजति तव चरणा चतुर हि तरति न अंधकाराते ॥ ४ ॥
तापत्रय दुःसह हो सदय भवा यादवा शमिव आतां ॥
व्हाया उतराई मीं आळस न करीन कीर्तिला गातां ॥ ५ ॥
हो सुप्रसन्न करुणासिंधो बा पापराशि वारो गा ॥
शीघ्र हरे ऐसें करिं कीं म्हणसि नतांसि मुक्तिला भोगा ॥ ६ ॥
त्वद्भजनीं साधूंच्या भजनीं वास रस दे हरा बावा ॥
हे वामना नसो विषयांचा हा दास जाणसी भावा ॥ ७ ॥
देवा अजामिळाला जागा साधुन दिला समस्तेना ॥
बा कोणा हि प्रभुला लेश हि यश थोरपण तुझें येना ॥ ८ ॥

---

३८ स्थविर=वृद्ध.

१ कमलावर=लक्ष्मी-पति. २ बलावरज=बलरामाचा धाकटा बंधु (कृष्ण). ३ सीताराम=विष्णु-पक्षीं गार बाग (सीत + आराम). ४ अंधकाराते=शिव. पक्षीं पापरूपी अंधकाराला. ५ भव=शिव. ६ यादवा=हरे. पक्षीं या दवाग्नीला. * हेवा मना. पक्षीं हे वामनरूपी विष्णो. ७. समस्तेन = सकलस्वामी (समस्त + इन).

दास्य महादेवा दे पादच्छायेंत या म्हण ‡ मुरारे ।।
म्हणसि नतां निवुनि सुखें निववाया बहु परांस हि पुरारे ।। ९ ।।
अपराध घाल पोटीं प्रकटुनियां तेज दाव पावकसा ।।
हळहळ साराया मी जड पालटतो मज स्वभाव कसा ।। १० ।।
श्रीहरिहरस्तवार्या लिहिल्या रामात्मजें दहा मात्र ।।
यांला जे श्रीहरिहरभक्त रसिक सुज्ञ साधु ते पात्र ।। ११ ।।

---

### ।। पद ।।

राम राजीवदलनयन रघुवीर रविवंशभूषणरत्न रावणारे ।। धृ० ।।
वातनंदनमनःशांतकरचरणजलजात कुशतात कारुण्यसिंधो ।।
शातकुंभाभपट[8] पातकापह धरणिजातपःफल दीनबंधो ।। १ ।।
चापनिगमांतग[9] सदापदपहाररत तापसाराध्यपद पूण्यमूर्ते ।।
क्ष्मापवर[10] कुसुर[*]वनितापवादाघसंतापभंजन भुवनगीतकीर्ते ।। २ ।।
रक्षसामंतचतुर क्षमापालनपर क्षपानाथ[11]जितवदनकांते ।।
रक्ष रामज[12]मुदार क्षमादिगुणनिकरक्षय[13] स्मृतिरस्तु मयि तवांते ।। ३ ।।

### ।। अथ शिवस्य ।।

शंकरेशान शशिचूड शितिकंठ शिव शर्व शाश्वत शरंण्येश शंभो ।। धृ ।।
भाललोचन भुजगभसित[14]भूषण भवानीश भवभीतिहर भद्रभजना ।।
गरलगल गुह[15]गजाननतात गोवाह[16] गीर्वाण[17]-गणगीतगुणभाजना ।। १ ।।
निगमनुत[18] नीरदाभ निधिनायनत नगनंदिनी[19]नयननलिनाग्नि ।।
विष्णुविधिवंद्य विख्यातवैभव विश्ववरद वासवविहतविनतविघ्ना ।। २ ।।
दोषदरदैन्यदवदावदितदुष्टबलदक्षदुर्दर्शदयमानांतरा ।।
मुनिमहित मोदमय मदनमर्दन मयूरेश्वरमनोमीनमत्स्याकरा ।। ३ ।।

---

## ।। दत्तदयोदय ।।

### आर्या.

दत्तात्रेयस्वामी नमितों मी दीनबांधवा देवा ।।
तुमचें स्तवन कराया किति माझ्या मंदबुद्धिचा केवा ।। १ ।।

---

‡ मुरा रे पक्षीं हे मुररिपो. ८ शातकुंभाभपट=कांतलेल्या सुवर्णघटासारखी शोभा आहे वस्त्राची ज्याच्या. ९ चापनिगम=धनुर्वेद. १० क्ष्मापवर=राजश्रेष्ठ. ११ क्षपानाथ=चंद्र. १२ रामजं=रामनंदनं ( मयूरं ) १३. निकरक्षय = समूहस्थान ( निकर + क्षय ). १४ भसित= भस्म. १५ गुह=कार्तिकस्वामी. १६ गोवाह=वृषभवाहन. १७ गीर्वाण = देव. १८ निगम-नुत=वेदस्तुत. १९ नगनंदिनी = पर्वतकन्या. * कुसुर=भूसुर ( गौतम )

तूं या संसारवनीं भ्रांतां जीवांसि लाविसी वाटे ॥
दुःखित दीन पहातां करुणासिंधो तुझा गळा दाटे ॥ २ ॥
त्वां तारिले असंख्य प्राणी संसारसागरीं दत्ता ॥
लोकत्रयांत नांदे देवा अव्याहता तुझी सत्ता ॥ ३ ॥
तूं तीर्थांचें तीर्थ ज्ञान्यांचें ज्ञान योग योग्यांचा ॥
धार्मिक सदय चिकित्सक[1] दुःसहसंसाररोगरोग्यांचा ॥ ४ ॥
जे जे लोकीं पुत्री त्यांमध्यें धन्य तव पिता अत्री ॥
कीं त्वां नित्य उभविली ब्रम्हांडशिरीं स्वकीर्तिसुच्छत्री ॥ ५ ॥
अनसूयेचा कुक्षि क्षीराधिहुनि कोटिगुण गुणें महित ॥
कीं तज्ज अमृतकर[2] तूं जाड्यकलंकक्षयादिकीं रहित ॥ ६ ॥
जें अनसूया पावे सुख विधिची शंभुची हि न वधू तें ॥
जननीजनकसुहृन्मन हर्षविलें बा तुवां चि अवधूतें ॥ ७ ॥
एक गुणग्राहक तूं सारग्राही दुजा नसे चि कवी ॥
अगनगखगांदिकां[3] गुरु कोण म्हणे स्वहित कोण हें शिकवी ॥ ८ ॥
तूं लोकसंग्रहार्थ चि योगाचा करिसि नित्य अभ्यास ॥
तुज अन्य काम कोण स्वलाभपूर्णास भक्तिलभ्यास ॥ ९ ॥
एकांततीर्थभिक्षासेवन जनसंग्रहार्थ करितोस ॥
चरितें सुकीर्तिभरितें निर्मुनि बा लोकशोक हरितोस ॥ १० ॥
भजला अर्जुन भावें त्यावरि केली दयासुधावृष्टि ॥
शरणागतीं अलर्की वत्सीं सुरधेनु होय तवदृष्टि ॥ ११ ॥
दिधले बहु वर देवद्रुम[4]दर्पघ्न त्वदंघ्रिकंज[5]रजें ॥
होतां प्रसन्न होतें शरणागतदीनवज्रपंजर जें ॥ १२ ॥
देवा दयासमुद्रा दत्ता दासांसि देसि अपवर्ग[6] ॥
तुजला भजोनि जाले कृतकृत्य असंख्य विप्रनृपवर्ग ॥ १३ ॥
या विषयवासनाविषलिप्ता तप्ता सुदुःखदा जाणों ॥
मन सूया अनसूयापुत्रा वैराग्य चांगलें बाणों ॥ १४ ॥
अर्जुन हि भ्रम पावे जेणें देऊं नको चि दत्ता तें ॥
कीं त्वत्प्रियजन दूर त्यागिति त्या भाग्यमद्यमत्तातें ॥ १५ ॥
सत्कीर्ति पावलाचि स्तुत्य सहस्रार्जुन त्वदीय जन ॥
सद्गति कसी घडेना भावें केल्या तुझ्यापदीं यजनें[7] ॥ १६ ॥

---

१. चिकित्सक=वैद्य. २ अमृतकर=चंद्र ३ अगनगखग=वृक्ष-पर्वत-पक्षी. ४ देवद्रुम=कल्पवृक्ष. ५ अंघ्रिकंज=पादकमल. ६ अपवर्ग=मोक्ष. ७ यजन=पूजन.

शरणागतीं अलर्की प्रसाद जो तो चि सज्जना रुचला ॥
कृतवीर्यनंदनींचा[8] विषयविरक्तांसि भासला कुचला[9] ॥ १७ ॥
वैराग्य योगभाग्य श्रेष्ठ प्राज्ञप्रिय प्रभो साचें ॥
इक्षुक्षेत्र उपेक्षुनि कोण रसिक वन वरील भोसाचें ॥ १८ ॥
जे वरिति विषयभोगा योगाभ्यासप्रसंग ज्यां न रुचे ॥
ते सुरस इक्षुचे हि त्यागुनि सुग्रास चोखिती बरुंचे[10] ॥ १९ ॥
दत्ता त्वत्पदपद्मच्छाया तापत्रयार्तविश्रांति ॥
तत्काळ अलर्काची गेली शोकप्रदा भवभ्रांति ॥ २० ॥
दत्ता सत्तापन्ना बहु शरणागतजनांसि वागविसी ॥
बोधकरें संसारस्वप्नभ्रमपरवशांसि जागविसी ॥ २१ ॥
दत्तात्रेया तुमचा नाशाया दीनताप कर वीर ॥
भेटा मला हरील क्षणपापिस्पर्शपाप करवीर ॥ २२ ॥
पडतांचि दृष्टि तुमची होइन निष्पाप ताप हा लटिका ॥
संसारश्रम जाया नलगे त्वच्चरण पाहतां घटिका ॥ २३ ॥
सुविशुद्ध बुद्ध मुक्त क्षणमात्रें तो अलर्कनृप झाला ॥
तुमचा प्रसाद होतां बोधाच्या क्षण नकोचि उपजाला ॥ २४ ॥
भक्त अलर्कार्जुनयदु इत्यादि असंख्य तारिले दत्ता ॥
त्वत्पदबळें चि मुनिनीं संसृतिकृत्येसि मारिली लत्ता ॥ २५ ॥
म्हणुनि तुला कर जोडुनि देवा मी दीन विनवितों भावें ॥
घन जेंवि चातकाला करुणौदार्यव्रतीश्वरा पावें ॥ २६ ॥
सोडवितें भवपाशापासुनि निजदास्य सादरा जीवा ॥
म्हणवुनि मुमुक्षु भावें विनविति तुझियाचि पादराजीवा[11] ॥ २७ ॥
वा गा मागा देतों हे तों वाणी निघे तुझ्या चि मुखें ॥
अभयार्थिकृपणशरणागतकटकें त्वां न पाहिलीं विमुखें ॥ २८ ॥
त्वां भक्तांसि निजात्मा दिधला आतां तुझी नसे सत्ता ॥
दत्ताख्या चि वदे हें सत्यव्रत सत्यसंध[12] तूं दत्ता ॥ २९ ॥
तम नाशी ताप हरी कळानिधी अमृतकर महेशमत ॥
श्रम तत्काळ निवारी जन्हि जगदवना असे सदा भ्रमत ॥ ३० ॥
तन्हि न बघे मन तुमच्या जगदाल्हादप्रदोदया भावा ॥
भावानें हें वदतों भावाल[13] मला चि मूढ तरि भावा ॥ ३१ ॥

---

८ कृतवीर्यनंदन=सहस्रार्जुन. ९ कुचला=कडू काजरा. १० बरु=बोरू. ११ राजीव=कमल. १२ सत्यसंध=सत्यप्रतिज्ञ. १३ भावाल=मानाल.

मूढ कसा मी स्वामी कांति तया ची असो निकाम[14] हिमा[15] ॥
भूतपति शिरिं धरूं द्या तुमचा विधुला नये निका महिमा ॥ ३२ ॥
न गुहागत तम नाशे चंद्रकरांहीं न ताप ही सर्व ॥
माथां पिशाचपतिनें धरिलें म्हणऊनि कां वृथा गर्व ॥ ३३ ॥
अमृतकर कळानिधि तो कैसा न हरी निजक्षय व्याधि ॥
वंद्य कसा तो ज्याची गुरुदाराधर्षणीं अभव्या धी ॥ ३४ ॥
स्वामी क्षमा करा हा निंदक पापी असें न मानावें ॥
घेतों तुमचीं शुद्धें पुण्यश्लोकोत्तमोत्तमा नावें ॥ ३५ ॥
श्रीदुर्वासा भगवान् बंधु तुझा सर्ववरद गुरु दक्ष ॥
त्रिभुवनवंद्यपदांबुज वर देउनि दास सुखाविले लक्ष ॥ ३६ ॥
हें विश्वाला ठावें वेदपुराणप्रसिद्ध परि कोपी ॥
तो पीतपट[16]प्रभुला वळला तद्भक्ति न इतरा सोपी ॥ ३७ ॥
मुष्टींत धरिल कोणी तरि जरि दुर्धर असे असो पारा ॥
परि हा सुदुर्धर प्रभु इंद्रप्रमुखांस ही न सोपारा ॥ ३८ ॥
आराधाया त्याच्या अमरद्रुमगर्वहरपदासि कसीं ॥
सामर्थ्यें पुरती बा कैसा उतरेल दीन दास कसीं ॥ ३९ ॥
सोसाया त्याचें छळ बळ कैचें आज पामरा मातें ॥
कांपे हृदय पुराणीं आइकतां चरित रामरामा तें ॥ ४० ॥
जोडुनि रथीं सदार प्रभुसि पुरीं चालवि प्रतोदानें[17] ॥
छळितो परि बहु देतो इष्टार्थांची सुविप्र तो दानें ॥ ४१ ॥
तो श्रीमदंबरीष च्छळिला तें व्यसन केव्हढें भारी ॥
करितां श्रवण थरारां कांपे अद्यापि सत्सभा सारी ॥ ४२ ॥
वनवासव्यसनांत च्छळकाम धरी परंतु पांचाळी ॥
गेली शरण प्रभुला तो चि अकालक्षयासि त्या टाळी ॥ ४३ ॥
छळितो परंतु सद्यश वाढवितो ज्यासि चाटितो दहन ॥
तें पहिल्याहुनि पावे पुष्कळ संपत्ति मालतीगहन[18] ॥ ४४ ॥
छळ साहतां गुरुकृपे पापजळें होय भद्र बहु मोठें ॥
हें मृदुयत्नें घडतां चतुरें व्हावें जनांत कां खोटें ॥ ४५ ॥
छळ न करितां नव्हे शिव दासांचें जरि म्हणाल जी स्वामी ॥
छळिला अलर्क केव्हां हें पुसतों तुज निजाश्रितस्वा मी ॥ ४६ ॥

---

१४ निकाम=अत्यंत. १५ हिमा=थंड. १६ पीतपटप्रभु=कृष्ण. १७ प्रतोद=चाबूक. १८ गहन=वन.

छळ न करितां कराल प्रभुजी जी तीच मज दया मोटी ॥
अपमान श्रम नसतां जें जोडे स्वल्प तें चि धन कोटी ॥ ४७ ॥
असतां अघहर गंगाऱ्हदें[19] शिखिकुंडीं[20] शिरेल कोण कवी ॥
आरोग्य शर्करा दे तरि कटुकीची न घे रसज्ञ चवी ॥ ४८ ॥
तूं भक्तवत्सल प्रभु करुणालय शुद्धसत्वमयकाय ॥
तुजला चि आठवीतां मजला संसारदुःखभय काय ॥ ४९ ॥
भगवंताला त्याला करितों दूरूनि भीरु मी नमनें ॥
दुग्धाब्धिकीर्ति परिसो परि सोडी मानसा न मीन मनें ॥ ५० ॥
लक्ष्मण काय विचक्षण नव्हता सत्पात्र ही प्रसादास ॥
त्या हि दुराराध्य मुनी मग आराधील हा कसा दास ॥ ५१ ॥
ज्यां ज्यां वरि सेवेनें झाला मुनि सुप्रसन्न ते धन्य ॥
तरले सिंधु भुजांहीं दैवें संप्रति नसे तसा अन्य ॥ ५२ ॥
तुमचें होतें त्याचें दुर्लभ कळिमाजि दर्शन चि आधीं ॥
त्यांत दुराराध्य तसें उग्रत्व नसे हरीं[21] मृगव्याधीं ॥ ५३ ॥
श्रीमन्नारदबाबा ते हि कळीं माजि भेटती न जना ॥
कलहप्रिय म्हणति म्हणुनि भी मन परि पाय योग्य ते भजना ॥ ५४ ।
न टिके मुहूर्तभरि हि क्वचित्कथंचिदपि तत्पद भ्रमती ॥
दर्शन घडतें तरि ते करिते चि दया गुरु अदभ्रमती ॥ ५५ ॥
वाल्मीकि-व्यास-शुक- प्रल्हाद-ध्रुव-मुखांसि तो तारी ॥
हरिभक्ति ज्ञानरसें ओती जो शिष्यमूर्ति ओतारी ॥ ५६ ॥
कंटाळे माय हि वहु हरितां शिशुचा हि बाह्य मळ हातें ॥
बाह्यांतर नतमळ तो गुरुवर हरि करि शिवार्थें[22] कळहातें ॥ ५७ ॥
वाल्मीकिचें दुरित किति होतें हो तें तरी न धरि वीट ॥
स्वकरें हरि हरिहूनि मुनिसिंह प्रणताघ करिवधीं[23] धीट ॥ ५८ ॥
या गुरु राजें अगणित जीव भवदवानळांत वांचविले ॥
सोडविले बहुत जिहीं ममतापाशीं स्वकंठ कांचविले ॥ ५९ ॥
भवकारागृहमुक्त प्राणी करितो हठेंचि हरि ताप ॥
बाप प्रेम खरें ते बद्धविमोक्षीं सुखें चि वरि शाप ॥ ६० ॥
कोठें हि आढळेना मुनि तो भ्याला असेल या कळिला ॥
कीं अद्भुत सच्छिष्यप्रेमगुणांहीं बळें चि आकळिला ॥ ६१ ॥

१९ ऱ्हद=डोह. २० शिखि=अग्नि. २१ हरि=सिंह. २२. शिव=कल्याण. २३ करि=हत्ती.

भ्याला म्हणतो त्वद्यश जरि कीं त्याच्या मनीं सदा नसतें ॥
भवभयहर भवदंघ्रिध्यान हि न विशुद्ध मानसीं ठसतें ॥ ६२ ॥
काय नृसिंहोपासक कीं शरभमनुज्ञ[24] भीलें[25] वेताळा ॥
जंभें उगारिल्या कीं वज्रकर स्वर्पती[26] लवे ताळा ॥ ६३ ॥
यदनुग्रहें अनळविधुजां[27] दुःसह त्याहि अंधकारा ती ॥
धाकेल चंडकर[28]रुचि किंवा कामासि अंधकाराति ॥ ६४ ॥
सद्वृत्तीस खळाच्या धाकें न कदापि साधु सोडील ॥
चोरभयास्तव लोभी जन कोण बरें धनें न सोडील ॥ ६५ ॥
धरिलें नसेचि चित्तीं काळिचें भय एकवल्लें[29] भागवतें ॥
जिंकावें केवि कधीं स्वाहेच्या प्राणवल्लभा[30] गवतें ॥ ६६ ॥
तरि कां नुगवे भगवच्छुद्धयशःपुंडरीक[31]सुहृदर्क ॥
बहुधा दिधलें काळिला अभय असा हा कसा बरा तर्क ॥ ६७ ॥
दुष्टजना शरणागत व्हावें साधूंसि हें रुचेना च ॥
दैवें रुचतां न रुचे स्वगुण रुचे सत्कथा रुचे नाच ॥ ६८ ॥
देते जरि भलत्याला भलतें जें ज्यास अर्थजात[32] रुचे ॥
तरि कां कवी न म्हणते कीं संत सखे समुद्रजातरु[33]चे ॥ ६९ ॥
संत विवेकी करिती पाहुनि अधिकार जी दया साजे ॥
ऐसे प्रसाद त्यांचे देती अन्योन्य न प्रयासा जे ॥ ७० ॥
म्हणउनि अभय कळीला दिधलें म्हणतां नये चि तरि तो कां ॥
सांप्रत कळींत न दिसे भगवान्मुनि अस्मदादिकां लोकां ॥ ७१ ॥
बहुधां अस्मद्दृष्टि स्वच्छ नसे अमित पातकीं मळली ॥
घूक[34]क्षणासि रविसा मुनि न दिसे तर्क मति असा फळली ॥ ७२ ॥
मति वाखाणी मानुनि सुंदर या तर्कबाळकाला जे ॥
हांसे वाल्मीकिकथा म्हणउनि ती विश्वपाळका लाजे ॥ ७३ ॥
करुणा कराल तरि बा ताराल चि शुद्ध तर्क हा मात्र ॥
केले पुष्कळ पामर पापी प्राणी तुम्हीं कृपापात्र ॥ ७४ ॥
पाहुनि मनिं रेखावे भवदंघ्रि दयानदा सदा पावा ॥
हा षड्रिपुनीं तुमचा न धरुनि भया न दास दापावा ॥ ७५ ॥

---

२४ मनुज्ञ=मंत्रज्ञ. २५ भील=भिईल. २६ स्वर्पति=इंद्र. २७ अनलविधुजा=अग्नि व चंद्र यांपासून उद्भवणारी. (रुचि=कांति). २८ चंडकर=सूर्य. २९ वल्ल=वाल (वजन) भर. ३० स्वाहेचा प्राणवल्लभ=अग्नि. ३१ पुंडरीक=कमल. ३२ अर्थजात=द्रव्यसमूह. ३३ समुद्रज तरु=कल्पवृक्ष. ३४ घूक=घुवड.

ऐसें भक्त मयूर प्रार्थी तुजला दयाघना दत्ता ॥
नमनें हि कोप न शमे तरि हाणीं या शिरावरी लत्ता ॥ ७६ ॥
व्यसनीं दीन तुला चि प्रार्थिति देऊनि हाक दादास ॥
रक्षिसि धांवुनि आंगें सदया तैसाचि हा कदा दास ॥ ७७ ॥
शरणागत पितृसख जमदग्नि कुलज राख विप्र तापाला ॥
पावे बा वेगानें स्वजनीं जन दाखवि प्रतापाला ॥ ७८ ॥
आंगीं असोनि अद्भुत सामर्थ्य प्रेम ही यशीं मोटें ॥
प्रभुजि जिरविले असतां अमित प्रणतापराध ही पोटें ॥ ७९ ॥
किंच सकृन्निजनामोच्चारश्रवणें[35] जळे महापंक ॥
सर्व हि अवगत असतां कां हो सदया न उद्धरा रंक ॥ ८० ॥
व्यसनीं नत रक्षावे निस्तुळ सर्वज्ञ नायका यश तें ॥
इतरां विभूषणांचीं प्रभुचा शोभविति काय काय शतें ॥ ८१ ॥
माते अनसूये सति तूं तरि पुत्रासि आपुल्या बोधीं ॥
बुडतों मज कर नेदी जवळि असोनि हि भवाब्धिच्या रोधीं[36] ॥ ८२ ॥
हा पंकजपत्रेक्षण अत्रे क्षण न भरतां चि तारील ॥
भवदाज्ञा लंघीना दीनांचें व्यसन सर्व वारील ॥ ८३ ॥
काय उणा करुणार्णव होइल मज एक अर्पितां बिंदु ॥
जग तर्पी अमृतरसें धन्य जडप्रकृति सक्षय हि इंदु ॥ ८४ ॥
पुत्रासि विश्वहित उपदेश करायासि तूं महाविंदु[37] ॥
सर्वस्वामृतदानें पुनरपि वृद्धीस पावतो इंदु ॥ ८५ ॥
अत्रिस्वामी काय स्वमुखें स्वसुतासि पढविलें युक्त ॥
नमुनि विनवितों भावें न करीं अद्यापि कां मला मुक्त ॥ ८६ ॥
ऐका हो संत तुम्ही सदय कसा हो नतासि होगलिता ॥
अजि सांवरा गुरूंची गुर्वी बिरुदावली न हो गलिता ॥ ८७ ॥
नित्य परोपकृतिव्रत संत तुम्ही म्हणुनि एकदां भागा ॥
कांहीं च न मागापरि उपकृति धर्मार्थ एवढें मागा ॥ ८८ ॥
तुमचें वचनोल्लंघन न करील प्रभु पहा बरें हटका ॥
वागवितों भीड सदा संशय आणूं नका मनीं लटका ॥ ८९ ॥
वेंचिति परोपकारीं सर्वस्व अनित्य जीवित हि संत ॥
वचनाची काय कथा जोडिति सद्यश अनंत मतिमंत ॥ ९० ॥
पहिलें तों आम्हां जड जीवांसि तुम्हां चि संतरायांचें ॥

---

३५ सकृत=एकदां. ३६ रोध=तीर. ३७ विंदु=ज्ञाता.

चरणस्मरण सदोषध बुधसंमत संपदंतरायांचें ॥ ९१ ॥
मी केवळ मूढ चि कीं देव तुम्हांहूनि वेगळा म्हणणें ॥
तें हें तैसें जैसें कूपातें सुरसरित्तटीं खणणें ॥ ९२ ॥
नह्यंमयानि हा ये श्लोक परि जसा खरासि पाटीर[39] ॥
काळाची ही कांपे तुमची होतां उणी कृपा टीर[40] ॥ ९३ ॥
तुमचा वरप्रसाद ब्रह्मा हरि शंभु देव या परता ॥
सृष्टिस्थितिलयकर्ता नाहीं श्रद्धेय हें न पापरता ॥ ९४ ॥
सत्पदरजीं जसा जन गांगीं[41] हि न होय पट तसा धुवट[42] ॥
या भवसिंधूंत तुम्ही प्रभुचे आधारभूत साधु वट ॥ ९५ ॥
क्षीरधि संतसमाधि हि शेषरुचि प्रभुपदासमीप रमा ॥
कसि वाखाणूं तुमची कीर्ति अहो बाप दास मी परमा ॥ ९६ ॥
करुणेचें वतन तुम्ही शांतीचें भाग्यवंत माहेर ॥
सुघनज्ञानरसाचे संत रवे मधुर आंत बाहेर ॥ ९७ ॥
स्मरभूतभूतवैद्य स्पर्शमणी सर्वपापिलोहाचे ॥
ब्रह्मग्रह संत तुम्ही प्रणतजनाच्या अनादिमोहाचे ॥ ९८ ॥
सुरभिस्वर्द्रुमचिंतामणि शिष्याचे दयानिधी पंत ॥
निजबिंबप्रतिबिंबा अमृतकराचें खरें तुम्ही संत ॥ ९९ ॥
साधुगुणग्राहकता भूतीं सर्वत्र सर्वदां समता ॥
गुरुरीति वसे संतापाशीं हे उक्ति सर्वदासमता ॥ १०० ॥
विमळ सकळ गुण तुमचे कां न सुधाधिक म्हणो निवे दास ॥
जांच्या श्रवणें चि असे अद्भुत रुचले म्हणोनि वेदास ॥ १०१ ॥
श्री दत्तात्रेयातें तत्तुल्यांतें समस्त संतातें ॥
साष्टांग नमन आहे सांभाळा जी मयूरपंतातें ॥ १०२ ॥
इति श्री रामात्मजमयूरपंडितकृतो दत्तदयोदयः संपूर्णः

## पद रागिणी धनासरीः—

पाव नता जय पाव नताश्रयपादरजा बापा ॥ धृ ॥
ऐकुनि हें बहु मानिल देवनदी न निजा आपा ॥
होइल धाक विपाक सुदुःसह सर्व महापापा ॥ १ ॥
ओसणतील सती हि करा मजला हि शिलाशापा ॥
गातिल साधुकवींद्र तुजा जयशालिभुजा चापा ॥ २ ॥

---

३८ अंतराय=विघ्न. ३९ पाटीर=चंदन. ४० टीर=कुला. ४१ गांग=गंगोदक. ४२ धुवट=स्वच्छ.

हर्षद हो बहु वर्ष दयामृतवर्ष हरीं तापा ॥
चंपक हो अयशोभ्रमरासि मयूर खळा सापा ॥ ३ ॥

---

## आरती दत्तात्रेयाची.

जय भगवन् जय भगवन् योगीश्वर दत्त ॥
त्वत्तः सर्वैः कुशलं प्राप्तो नो मत्तः ॥ धृ ॥
गुरुणापि सता भवता जनसंग्रहमतिना ॥
गुरवो बहवोऽत्र कृता दर्शित सद्गतिना ॥
सच्चित्सुखरूपं त्वां देव तया सति ना ॥
न भजति विषयी स समः स्पष्टं मलमतिना ॥ १ ॥ ॥ जय ॥
अपि च कृतं खलु दशशतभुजमर्जुनभूपं ॥
श्रुत्वालर्कं च सकन्नमनात्सुखरूपं ॥
भजतिजनस्त्वां सिंधुं मुक्त्वान्यं कूपं ॥
शूलं वोग्रं त्यक्त्वा सौवर्णं यूपं ॥ २ ॥ जय ॥
गृण्हाति यया मूढोऽयं भारं मस्ते ॥
प्रविशति निरवधिसुखदे न तव यशसि शस्ते ॥
भक्तमयूरं करुणाघन नर्तयतस्ते ॥
सा मायास्तेमायाधिपवत्सल हस्ते ॥ ॥ ३ ॥ ॥ जय ॥

---

## अथ श्री पतिव्रता कीर्तन. आर्या.

श्रीब्रह्मयाची देवी सावित्री जी महासती भार्या ॥
तीस नमस्कार असो मजवरि ती बहु दया करो आर्या ॥ १ ॥
श्रीविष्णुची प्रिया जी देवी लक्ष्मी महासती भार्या ॥
तीस नमस्कार असो मजवरि ती बहु दया करो आर्या ॥ २ ॥
श्रीश्रीकंठ प्रभुची दुर्गादेवी महासती भार्या ॥ तीस न० ३ ॥
श्रीस्वायंभुवमनुची जी शतरूपा महासती भार्या ॥ तीस० ॥ ४ ॥
श्रीमत्कश्यपमुनिची जी सुमति अदिति महासती भार्या ॥ ती० ॥ ५ ॥
श्रीमत्कर्दममुनिची परम सती देवहूति जी भार्या ॥ ती० ॥ ६ ॥
श्रीमुनिवर्यात्रीची जी अनुसूया महासती भार्या ॥ ती० ॥ ७ ॥
श्रीगौतममुनिची जी सुमति अहल्या महासती भार्या ॥ ती० ॥ ८ ॥
श्रीकुंभसंभवाची[1] लोपामुद्रा महासती भार्या ॥ तीस ९ ॥

---

1 कुंभसंभव=अगस्त्य.

श्रीमद्वसिष्ठमुनिची साध्वी श्रेष्ठ अरुंधती भार्या ॥ तीस० ॥ १० ॥
श्रीजमदग्निमुनीची मान्या विश्रांत रेणुका भार्या ॥ तीस० ॥ ११ ॥
श्रीशक्राची देवी सद्‍बुद्धि शची महासती भार्या ॥ तीस० ॥ १२ ॥
श्रीवन्हिप्रभुची जी स्वाहा देवी महासती भार्या ॥ तीस० ॥ १३ ॥
श्रीयमधर्मप्रभुची जी धूमोर्णा महासती भार्या ॥ तीस० ॥ १४ ॥
श्रीवरुणप्रभुची जी देवी गौरी महासती भार्या ॥ तीस० ॥ १५ ॥
श्रीमत्सुरगुरुची जी देवी तारा महासती भार्या ॥ तीस० ॥ १६ ॥
श्रीमत्सूर्यप्रभुची त्रिजगन्मान्या सुवर्चला भार्या ॥ तीस० ॥ १७ ॥
श्रीमच्चंद्राची जी सद्‍बुद्धि सुकीर्ति रोहिणी भार्या ॥ तीस० ॥ १८ ॥
श्रीमत्कुबेर विभुची ऋद्धि ख्याता महासती भार्या ॥ तीस० ॥ १९ ॥
श्रीदशरथ राजाची जी कौसल्या महासती भार्या ॥ तीस ॥ २० ॥
श्रीरामप्रभुची जी श्रीमत्सीता महासती भार्या ॥ तीस ॥ २१ ॥
श्रीलक्ष्मणप्रभूची जनकसुता उर्मिला सती भार्या ॥ तीस ॥ २२ ॥
श्रीमत्भरताची जी सन्मान्या मांडवी सती भार्या ॥ तीस० ॥ २३ ॥
श्रीशत्रुघ्नाची जी श्रुतकीर्ति महापतिव्रता भार्या ॥ तीस० ॥ २४ ॥
श्रीमद्ययातिची जी श्रीशर्मिष्ठा महासती भार्या ॥ तीस० ॥ २५ ॥
श्रीमद्ययातिची जी शुक्रसुता देवयानि जी भार्या ॥ तीस० ॥ २६ ॥
श्रीदुष्यंतनृपाची श्रेष्ठा साध्वी शकुंतला भार्या ॥ तीस० ॥ २७ ॥
श्रीशंतनुराजाची गंगादेवी महासती भार्या ॥ तीस० ॥ २८ ॥
श्रीशंतनुची दुसरी जी सत्यवती महासती भार्या ॥ तीस० ॥ २९ ॥
श्रीधृतराष्ट्रनृपाची जी गांधारी महासती भार्या ॥ तीस० ॥ ३० ॥
श्रीमत्पांडुनृपाची कुंती देवी महासती भार्या ॥ तीस० ॥ ३१ ॥
श्रीमत्पांडुनृपाची दुसरी माद्री महासती भार्या ॥ तीस० ॥ ३२ ॥
श्रीवसुदेवप्रभुची जो देवी देवकी सती भार्या ॥ तीस० ॥ ३३ ॥
श्रीवसुदेवप्रभुची दुसरी जी रोहिणी सती भार्या ॥ तीस० ॥ ३४ ॥
श्रीमद्बळभद्राची जी देवी रेवती सती भार्या ॥ तीस० ॥ ३५ ॥
श्रीकृष्णप्रभुची जी देवी श्रीरुक्मिणी सती भार्या ॥ तीस० ॥ ३६ ॥
श्रीमत्पांडुसुतांची श्रीमत्कृष्णा[२] महासती भार्या ॥ तीस० ॥ ३७ ॥
श्रीहरिसखार्जुनाची सुमति सुभद्रा महासती भार्या ॥ तीस० ॥ ३८ ॥
श्रीकुवलयाश्वनामा राजा त्याची मदालसा भार्या ॥ तीस० ॥ ३९ ॥
श्रीमत्कपिलाचार्यप्रभुची जी श्रीमती सती भार्या ॥ तीस० ॥ ४० ॥

---

२ कृष्णा=द्रौपदी.

श्रीनळराजाची जी श्रीदमयंती महासती भार्या ॥ तीस० ॥ ४१ ॥
श्रीसत्यवान् तयाची श्रीसावित्री महासती भार्या ॥ तीस० ॥ ४२ ॥
श्रीमद्दशवदनाची देवी मंदोदरी सती भार्या ॥ तीस० ॥ ४३ ॥
श्रीमद्बिभीषणाची देवी सरमा महासती भार्या ॥ तीस० ॥ ४४ ॥
श्रीवालीची तारा रामोक्तिरता महासती भार्या ॥ तीस० ॥ ४५ ॥
श्रीमत्सुग्रीवाची सद्बुद्धि रुमा पतिव्रता भार्या ॥ तीस० ॥ ४६ ॥
श्रीमंत केसरी जो त्याची जी अंजना सती भार्या ॥ तीस० ॥ ४७ ॥
श्रीमान् हिमाद्रि त्याची मेना देवी महासती भार्या ॥ तीस० ॥ ४८ ॥
श्रीमत्कश्यपमुनिची देवी विनता महासती भार्या ॥ तीस० ॥ ४९ ॥
श्रीभगवज्जनजो जो जी जी त्याची महासती भार्या ॥
तीस नमस्कार असो मनवरि ती बहु दया करो आर्या ॥ ५० ॥
श्रीरामसुत मयूरें संसारीं तारिती प्रपन्नांस[३] ॥
म्हणवुनि केल्या आर्या आर्यांच्या[४] कीर्तनार्थ पंनास ॥ ५१ ॥

॥ इति श्रीपतिव्रताकीर्तनं ॥

---

## अथ श्री पुंडरीकप्रार्थना. (अनुष्टुप्)

पुंडरीका तुज असा साधु तूं चि महामहा ॥
म्हणसी जड जीवांतें मोक्षरूप महा महा ॥ १ ॥
यश केलें तप तुवां अगाध बळ साधुन ॥
या तसें म्हणती बा त्या अगाधबळ साधु न ॥ २ ॥
देव याया मुक्ति केला त्वां उभा शयना वरी ॥
न निजे न बसे हात हा शुभाशय नावरी ॥ ३ ॥
जड मोक्षपदा न्याया वदान्या या रमावरा ॥
वरा मागोनि म्हणती न प्रभो हात आवरा ॥ ४ ॥
पुंडरीका भुलविला तपस्तेजें तुवां हरी ॥
करी जड जना मुक्त प्रणामें चि अघें हरी ॥ ५ ॥
बा पुंडरीका जी पूर्वीं होती फार महाग ती ॥
तुवां कलियुगीं केली बहु स्वस्त महागति ॥ ६ ॥
कल्पद्रुमादि जे होते यशें लोकांत साजले ॥
पुंडरीका त्वदौदार्यें ते चित्तीं सर्व लाजले ॥ ७ ॥
बा दयावंत जे त्यांहीं तुजला हात जोडिले ॥

---

३ प्रपन्न=शरणागत. ४ आर्या=पतिव्रता.

तुज्या भिडेनें प्रभुनें जडांचे पाश तोडिले ॥ ८ ॥
भाग्यवंत नसे कोणी पुंडरीका जगीं दुजा ॥
हिमाद्रि मेरु हि ज्ञात्या दिसे तुजपुढें खुजा ॥ ९ ॥
प्रभु तूं कीं त्वदोंत विश्वाचा मायबाप हा ॥
पुंडरीका हें मदुक्त लटिकें काय बा पहा ॥ १० ॥
निवारिती काय मायबाप ताप तुज्या असे ॥
करिती स्नेह परि बा बाळकाची रुजा असे ॥ ११ ॥
पुंडरीका मुक्तिसत्र ख्यात निर्विघ्न घातलें ॥
विश्वेश्वर यशाहूनि बहु त्वद्यश मातलें ॥ १२ ॥
पुंडरीका भेटला तो केला पाशविमोचनें ॥
मुक्तिचा नवरा जीव नवराजीवलोचनें ॥ १३ ॥
वरवा वर वाचेला आहा बा हा तुला कसा ॥
सुचला रुचला देवा मानहाव सुधारसा ॥ १४ ॥
पुंडरीका क्षमा केली त्वां वैकुंठाधिका सदा ॥
पुंडरीकाक्ष माकेली स्थाना त्या नाठवी कदा ॥ १५ ॥
करी सुवर्णमणि जो होऊनि स्वगुणा वश ॥
बा म्हणावें तया लोहें दयालो हें तुझें यश ॥ १६ ॥
तैसे त्वां मुक्त जे केले वंदावासि तिहीं रसें ॥
घडेल प्रत्युपकृत प्राण ही अर्पितां कसें ॥ १७ ॥
भला रंजविला स्वामी भला मागितला वर ॥
भला जडजनोद्धारा लाविला त्वां दयाकर ॥ १८ ॥
पुंडरीका महाबुद्धे जोडिला त्वां महावर ॥
देत्यां घेत्यां थोरथोरां म्हणतो हाय हा वर ॥ १९ ॥
योग्य हें कल्पपर्यंत महायश तगावया ॥
लागावें यासि जोडूनी सहाय शत गावया ॥ २० ॥
गाति प्रेमें या यशातें विठ्ठलाचे उपासिते ॥
म्हणती कामधेनूच्या फिके दुग्धा तुपासि ते ॥ २१ ॥
सर्वा रसांत यश हें पुंडरीका तुझें निकें ॥
टिके यांत म्हणे सुज्ञ स्वांतीं पीयूष तें फिकें ॥ २२ ॥
म्हणती साधु पाप्यातें प्या यशें चि निवाल या ॥

१ वजा=दुःख. २ राजीव=कमल. ३ क्षमा=पृथ्वी. ४ पुंडरीकाक्ष=विष्णु. ५ माकेली=लक्ष्मी-क्रीडा. ६ निकें=चांगलें. ७ स्वांत=मन. ८ पीयूष=अमृत.

श्रीनळराजाची जी श्रीदमयंती महासती भार्या ॥ तीस० ॥ ४१ ॥
श्रीसत्यवान् तयाची श्रीसावित्री महासती भार्या ॥ तीस० ॥ ४२ ॥
श्रीमद्दशवदनाची देवी मंदोदरी सती भार्या ॥ तीस० ॥ ४३ ॥
श्रीमद्बिभीषणाची देवी सरमा महासती भार्या ॥ तीस० ॥ ४४ ॥
श्रीवालीची तारा रामोक्तिरता महासती भार्या ॥ तीस० ॥ ४५ ॥
श्रीमत्सुग्रीवाची सद्बुद्धि रुमा पतिव्रता भार्या ॥ तीस० ॥ ४६ ॥
श्रीमंत केसरी जो त्याची जी अंजना सती भार्या ॥ तीस० ॥ ४७ ॥
श्रीमान् हिमाद्रि त्याची मेना देवी महासती भार्या ॥ तीस० ॥ ४८ ॥
श्रीमत्कश्यपमुनिची देवी विनता महासती भार्या ॥ तीस० ॥ ४९ ॥
श्रीभगवज्जननी जो जी जी त्याची महासती भार्या ॥
तीस नमस्कार असो मनवरि ती बहु दया करो आर्या ॥ ५० ॥
श्रीरामसुत मयूरें संसारीं तारिती प्रपन्नांस ॥
म्हणवुनि केल्या आर्या आर्यांच्या कीर्तनार्थ पंतांस ॥ ५१ ॥

॥ इति श्रीपतिव्रताकीर्तनं ॥

---

## अथ श्री पुंडरीकप्रार्थना. (अनुष्टुप्)

पुंडरीका तुज असा साधु तूं चि महामहा ॥
म्हणसी जड जीवांतें मोक्षरूप महा महा ॥ १ ॥
यश केलें तप तुवां अगाध बळ साधुन ॥
या तसें म्हणती बा त्या अगाधबळ साधु न ॥ २ ॥
देव द्याया मुक्ति केला त्वां उभा शयना वरी ॥
न निजे न बसे हात हा शुभाशय नावरी ॥ ३ ॥
जड मोक्षपदा न्याया वदान्या या रमावरा ॥
वरा मागोनि म्हणती न प्रभो हात आवरा ॥ ४ ॥
पुंडरीका भुलविला तपस्तेजें तुवां हरी ॥
करी जड जना मुक्त प्रणामें चि अघें हरी ॥ ५ ॥
बा पुंडरीका जी पूर्वी होती फार महाग ती ॥
तुवां कलियुगीं केली बहु स्वस्त महागति ॥ ६ ॥
कल्पद्रुमादि जे होते यशें लोकांत साजले ॥
पुंडरीका त्वदौदार्ये ते चित्तीं सर्व लाजले ॥ ७ ॥
बा दयावंत जे त्यांहीं तुजला हात जोडिले ॥

---

३ प्रपन्न=शरणागत. ४ आर्या=पतिव्रता.

तुझ्या भिडेनें प्रभुनें जडांचे पाश तोडिले ॥ ८ ॥
भाग्यवंत नसे कोणी पुंडरीका जगीं दुजा ॥
हिमाद्रि मेरु हि ज्ञात्या दिसे तुजपुढें खुजा ॥ ९ ॥
प्रभु तूं कीं त्वदोंत विश्वाचा मायबाप हा ॥
पुंडरीका हें मदुक्त लटिकें काय बा पहा ॥ १० ॥
निवारिती काय मायबाप ताप तुझ्या असे ॥
करिती स्नेह परि बा बाळकाची रुजा असे ॥ ११ ॥
पुंडरीका मुक्तिसत्र ख्यात निर्विघ्न घातलें ॥
विश्वेश्वर यशाहूनि बहु त्वद्यश मातलें ॥ १२ ॥
पुंडरीका भेटला तो केला पाशविमोचनें ॥
मुक्तिचा नवरा जीव नवराजीवलोचनें ॥ १३ ॥
वरवा वर वाचेला आहा बा हा तुला कसा ॥
सुचला रुचला देवा मानहाव सुधारसा ॥ १४ ॥
पुंडरीका क्षमा केली त्वां वैकुंठाधिका सदा ॥
पुंडरीकाक्ष माकेली स्थाना त्या नाठवी कदा ॥ १५ ॥
करी सुवर्णमणि जो होऊनि स्वगुणा वश ॥
बा म्हणावें तया लोहें दयालो हें तुझें यश ॥ १६ ॥
तैसे त्वां मुक्त जे केले वंदावासि तिहीं रसें ॥
घडेल प्रत्युपकृत प्राण ही अर्पितां कसें ॥ १७ ॥
भला रंजविला स्वामी भला मागितला वर ॥
भला जडजनोद्धारा लाविला त्वां दयाकर ॥ १८ ॥
पुंडरीका महाबुद्धे जोडिला त्वां महावर ॥
देत्यां घेत्यां थोरथोरां म्हणतो हाय हा वर ॥ १९ ॥
योग्य हें कल्पपर्यंत महायश तगावया ॥
लागावें यासि जोडूनी सहाय शत गावया ॥ २० ॥
गाति प्रेमें या यशातें विठ्ठलाचे उपासिते ॥
म्हणती कामधेनूच्या फिकें दुग्धा तुपासि ते ॥ २१ ॥
सर्वा रसांत यश हें पुंडरीका तुझें निकें ॥
टिके यांत म्हणे सुज्ञ स्वांतीं पीयूष तें फिकें ॥ २२ ॥
म्हणती साधु पाप्यातें प्या यशें चि निवाल या ॥

१ रुजा=दुःख. २ राजीव=कमल. ३ क्षमा=पृथ्वी. ४ पुंडरीकाक्ष=विष्णु. ५ माकेली=लक्ष्मी-क्रीडा. ६ निकें=चांगलें. ७ स्वांत=मन. ८ पीयूष=अमृत.

आर्यी सन्महिम्या सेवा मग विष्णुशिवालया ॥ २३ ॥
जसें हरिहरांचें हें यश नाम तुजें जगीं ॥
लज्जा उत्पन्न करितें त्या देवांच्या महानगीं ॥ २४ ॥
तुजा तात महासाधू तुझी माता महासती ॥
करिती जाहली धन्य तुज्या मातामहास[10] ती ॥ २५ ॥
पितृभक्ति असी केली न गुहें[11] न गजाननें ॥
त्वां घेतलें धन्य असें म्हणोनि नगजाननें[12] ॥ २६ ॥
पितृभक्ति न रामत्वीं न कृष्णत्वीं हि साधली ॥
लाधली पुंडरीका ती तुज सिद्ध न बाधली ॥ २७ ॥
भगवत्प्रियभक्तांत श्रेष्ठ नारद यापरी ॥
तूं बा तुजवरी स्पष्ट दिसे फार दया परी ॥ २८ ॥
म्हणे जना भव सुखें तर वारकरी तसे ॥
जे शत्रु तच्छिरीं उग्र तरवार करीतसे ॥ २९ ॥
येती क्षेत्रीं तुज्या तीर्थे देव संतत सेवना ॥
गुण देसी जना बा न दे वसंत तसे वना ॥ ३० ॥
पुंडरीका तव पुरी संताची होय हे खनि[13] ॥
लेखनीं अक्षमा[14] त्यांच्या भारतीची[15] हि लेखनी ॥ ३१ ॥
पुंडरीका द्रवे तो ही मातेचा बाळ जो कडे ॥
म्हणे तुकोबा त्वत्क्षेत्रीं खळा पाझर रोकडे ॥ ३२ ॥
तत्काळ निष्पंक करी हरिनामनदी नता ॥
त्वत्क्षेत्रीं संसृति जसी हरिना मन दीनता ॥ ३३ ॥
चिंतितें जीव होऊनी क्षेत्रीं अनघ टाकिती ॥
त्वत्पुरी वांचवि जना मोरा घनघटा किती ॥ ३४ ॥
त्वत्क्षेत्रांत न कोणी ही असानंद नर क्षण ॥
हा जसा पावला घोषीं[16] असा नंद न रक्षण ॥ ३५ ॥
येती जाती हि जी यात्रा नमो कळि करी तिंतें ॥
हा आटोपी आपुल्या दे न मोकळिक रीतितें ॥ ३६ ॥
हिता खळा हि तुमची सुलीला न गमो हि ती ॥

९ नग=वृक्ष. १० मातामह=आईचा बाप. ११ गुह=कार्तिकस्वामी. १२ नगजानन=नगजा + आनन=पार्वतीमुख. १३ खनि=खाण. १४ अक्षम=असमर्थ. १५ भारती=सरस्वती. १६ घोष=गोकुळ.

धीला सद्गुण हे जैसे मुलीला नग[१७] मोहिती ॥ ३७ ॥
इति श्रीरामनंदनमयूरविरचिता श्रीपुंडरीकप्रार्थना ॥

---

## ॥ अथ श्रीविठ्ठलविज्ञापना ॥

पांडुरंगा दयासिंधो जसा पतितपावनीं ॥
त्वत्कीर्तनीं सर्व तसा नव्हे अतितपा वनीं ॥ १ ॥
गृहीं च स्वस्थ असती न जाती संत कानना ॥
न पहाती तुझ्या नामस्मरणें अंतकानना ॥ २ ॥
लागे सोसावया कांहीं न वर्ष न हिमातप ॥
विठ्ठला तव नामाचा न पावे महिमा तप ॥ ३ ॥
स्थापिसी वदनीं ज्याच्या निज नाम ह्तारितें ॥
त्या देऊनि न जातां ही विजना मह[१] तारितें ॥ ४ ॥
जसी त्वत्कीर्ति न जना नर्मदा शर्मदा[२] तसी ॥
तुझ्या यशःपटाची बा एक भागीरथी दशी ॥ ५ ॥
माराया तुज देवा जी सविष स्तन्य[३] दे बकी[४] ॥
केली तव प्रसादानें ती जसी धन्य देवकी ॥ ६ ॥
तुला खोटा म्हणे भांडे तुजसीं मूढ तोतया ॥
योगिदुर्लभ जो देवा त्वां दिला मोक्ष तो तया ॥ ७ ॥
नारायण म्हणे पुत्रा जो त्या गति अजामिळा ॥
दिली त्वां म्हणसी नामें सुखें मज अजा मिळा ॥ ८ ॥
मानितोसि तया बंधुसम बाळसमान बा ॥
नामोच्चारीं कीर्तनीं ज्या नसे आळस मानवा ॥ ९ ॥
देसी जडा हि तूं जैसा सत्वराशि शुका मना ॥
पुरवाया सदा मासा सत्वरा शिशुकामना ॥ १० ॥
धृतव्रत त्यागिसील तूं जो परम तो कसें ॥
जें भक्तसत्व तुज तें वृद्धा चरम[५] तोकसें[६] ॥ ११ ॥
एकार्णवीं बुडाली ती स्थापिली महि[७] मागती[८] ॥
विठ्ठला तव भक्तीतें आत्माराम[९] हि मागती ॥ १२ ॥

---

१७ नग=दागिने.

१ मह=उत्सव. २ शर्मदा=सुखदा. ३ स्तन्य=दूध. ४ बकी=पूतना. ५ चरम=शेवटचें. ६ तोक=बालक. ७ महि=पृथ्वी. ८ मागती=पुनः. ९ आत्माराम=मुनि.

कंसादि तारिले होते जे धरूनि असत्पथा ॥
गातें तुझ्या चि साधूंचें सदें[10] या सदया कथा ॥ १३ ॥
वृषकेश्यघ[11] जे भस्म करिते अरितेज गा ॥
म्हणसी लोक हो गेल्या तापदा अपदा जगा ॥ १४ ॥
ज्यांहीं वराव्या जावूनि निरयीं[12] चिर यातना ॥
त्यावरि त्वत्कथा पीतां यम भी दंडपातना ॥ १५ ॥
कथा निववितो जैसी तुझी पदनदी नता ॥
त्वत्कीर्ति गात्या न जना दावी वदन दीनता ॥ १६ ॥
वासराधिप[13] राजीवां[14] वासरा जननीस्तन ॥
वा सरा भक्तयादांच्या[15] आसरा तूं दयाघन ॥ १७ ॥
तारिले ते तुवां वैरें आणिते क्रोध जे तुला ॥
असा तूं चि प्रभो केला करावा शोध जेतुला ॥ १८ ॥
नवनीताहूनि तुझें प्रभो ह्रदय कोंवळें ॥
स्वप्नांत ही न दोषातें स्पर्शे अत्यंत सोंवळें ॥ १९ ॥
वियोगदानें काठिन्य स्थापावें कां न गोवळें[16] ॥
कोंवळे परि अत्यंत अन्याचें मम पोवळें ॥ २० ॥
श्रीची हि नाहीं परवा पर वामा[17] व्रजीं[18] तशा ॥
भक्ता तुवां रंजविल्या गातात मुनि या यशा ॥ २१ ॥
गेलासि तूं सुदाम्यातें पायीं धावुनि आहवा ॥
पाडवा दुसरा काय भुललास चि वाडवा[19] ॥ २२ ॥
वदलासि मुनींद्रातें घ्या महा पाहुणेर हा ॥
श्रुतदेव मदात्मा या न तुम्ही पाहुणे रहा ॥ २३ ॥
तृप्त झालासि कृष्णेच्या शाकपत्रें न कां कृष्णा ॥
विदुराच्या सुधा व्हाव्या तुज स्वाश्रितशांकण्या ॥ २४
व्रजीं भृंगामिषें देवा विरहीं निंदि राधिका ॥
आत्मारामा भक्त्यधीना तुला ती इंदिराधिकीं[20] ॥ २५
कुब्जेची तीं *स्थळीं होती जी लज्जाहेतु वांकडी ॥
अंगरागार्पणें[21] केली सुरम्या ते तुवां कुंडी[22] ॥ २६ ॥

---

१० सद=समूह. ११ वृषकेश्यघ=( वृष + केशि + अघ )=राक्षस विशेष. १२ निरय=नरक. १३ वासराधिप=सूर्य. १४ राजीव=कमल. १५ याद=जलचर. १६ गोवळ=गुराखी, गवळी. १७ वामा=स्त्रिया. १८ व्रज=गोकुल. १९ वाडव=ब्राम्हण. २० इंदिरा=लक्ष्मी. २१ अंगराग=चंदनाची उटी. २२ कुंडी=शरीर. * तीन जागीं.

त्वां सुखार्थ व्रजीं रूपयश प्रकटिलें नवें ॥
तुझ्या विश्वमनोवृत्ति मुरली मुरली-रवें[२३] ॥ २७ ॥
म्हणे देवर्षि न्हाणीन व्रजधूळींत अंग मी ॥
अशी पुण्यर्धि तो गंगायमुनांच्या न संगमीं ॥ २८ ॥
गुरुवत्सल बा तूं चि गुरूला मृत नंदन ॥
देता झालासि करूनि प्रेमें साष्टांग वंदन ॥ २९ ॥
युद्धीं झालासि करिता तूं पृथानंदनावना[२४] ॥
तुला सोडूनि भजती कां वृथा नंदना वना ॥ ३० ॥
आलिंगूं देसि बाहूंनीं करिसी प्रिय बाहुनी[२५] ॥
पांडुरंगा पार्थसूता[२६] वत्सला देवकीसुता ॥ ३१ ॥
ब्रह्मांडभांड न पुरे तुझ्या सद्गुणसागरा ॥
पुरेल काय मोजाया पर माप रमावरा[२७] ॥ ३२ ॥
न तूं म्हणासि जीवांचें किती मी चांगलें करूं ॥
माता हि विटती धूतां जें भरी आंग लेंकरूं ॥ ३३ ॥
भक्तगेहीं जरि स्वर्द्रु रुजला तुजला तरी ॥
स्मरेल काय त्या त्याची परवा बरवा परी ॥ ३४ ॥
त्वद्भक्ताच्या दुर्लभा जी मुक्ति ये चत्वरास[२८] ती ॥
नसी प्रिया स्वप्रियाच्या भजना सत्वरा सती ॥ ३५ ॥
तुझ्या नामजपें प्राणी निवतो शिवतोखदें[२९] ॥
आरोग्य जेंवि पीयूषें[३०] न तसें होय ओखदें ॥ ३६ ॥
सेविली सर्वदा ज्यांहीं त्वत्कीर्ति सुरसा धुनी[३१] ॥
मानिले बाळें[३२] चि सुधासक्त ते सुर साधुनीं ॥ ३७ ॥
यथेष्ट भोळ्या भक्तांनीं विठ्ठला लुटिलास हा ॥
तुझा स्वभाव म्हणतो यातना कुटिला सहा ॥ ३८ ॥
अशुद्धरीतितें ही जी उद्धरी शुद्धरीतितें ॥
त्वत्कीर्ति भव्या वारीना सुरभी[३३] सुरभीतितें ॥ ३९ ॥
शुद्धि देऊनि मलिना परिसापरि साजवी ॥
शास्त्रज्ञा हि तव पदीं जडला जड लाजवी ॥ ४० ॥

---

२३ रव=स्वर. २४ पृथानंदनावना (पृथानंदन + अवन)=अर्जुनरक्षण. २५ बाहुनी=बोलावून. २६ सूत=सारथी. २७ रमावर=लक्ष्मीपति. २८ चत्वर=अंगण. २९. शिव-तोखद=कल्याण-आनंद देणारें. ३० पीयूष=अमृत. ३१ धुनी=नदी. ३२ बाळ=मूर्ख. ३३ सुरभी=कामधेनु.

सहास्य लोभा पाहोनि बहुक्षीणा बळा भया ॥
लागलासि जनीला तूं देवदेवा दळावया ॥ ४१ ॥
विप्रसा मानिला त्वां न चोखामेळा महारसा ॥
भुललासि प्रभो त्याच्या बहुप्रेममहारसा ॥ ४२ ॥
बा माझी जीभ वर्णील दामाजीच्या यशा कसी ॥
झालासि राबता[३४] त्याचा संत गाती कथा असी ॥ ४३ ॥
झालासि एकोबाचा तूं विश्वाब्जरवि[३५] चाकर ॥
लिहितां या यशा कैसा चालेल कविचा कर ॥ ४४ ॥
राबसी दासगेहीं तूं जसे सेवक राबती ॥
त्वत्कीर्ति च सुधा देवा जी सुधा होय राबे[३६] ती ॥ ४५ ॥
विणिले त्वां कबीराच्या मागीं बैसोनियां पट ॥
भक्ताधीन असोंव हे बा तुला लागली चट ॥ ४६ ॥
प्राणी तरे यथाबुद्धि त्वत्कीर्ति वदता रसें ॥
कीं तुझीं प्रणतीं प्रोद्यत्करुणें पदसारसें[३७] ॥ ४७ ॥
म्हण मद्भक्तियोगें न तुकोबातें शिवेतर[३८] ॥
भवीं व्यसन[३९] मन्नामें चुको बा तें शिवे तर ॥ ४८ ॥
प्राकृता हि म्हणे येत्ये येतां वत्स दया सये ॥
निववाया पहातां चि म्हणो सत्सदयास ये ॥ ४९ ॥
जे तुझे भक्त दीनांचें करिती संत ते हित ॥
निववावे तप्त हें चि तयांचें संततेहित[४०] ॥ ५० ॥
सदाश्रिताच्या न दिला वियोग भवना महें[४१] ॥
दयार्द्र सच्चक्षु तुझें कीं नाशी भव नाम हें ॥ ५१ ॥
विठ्ठला करुणाक्रीडाभवना भवनाशना ॥
हृदयस्था प्रकट हो मम षड्वैरिशासना ॥ ५२ ॥
सर्व दीनजनीं देवा तुझी दृष्टी सुकोमळा ॥
क्षणी लावूनि न म्हणे नसो वृष्टि सुको मळा[४२] ॥ ५३ ॥
चकोरपद्म तर्पाया निघे इंदु निघे इन[४३] ॥
न म्हणे स्वाश्रितत्यागें कोणी निंदुनि घेइन ॥ ५४ ॥

---

३४ राबता=चाकर. ३५ विश्वाब्जरवि=विश्वरूपी कमलास सूर्यासारखा. ३६ राब=काकवी. ३७ सारस=कमल. ३८. शिवेतर ( शिव + इतर )=अकल्याण. ३९ व्यसन=संकट. ४० संततेहित ( संतत + ईहित )=निरंतर; इष्ट. ४१ मह=उत्सव. ४२ मळा=शेतमळा. ४३ इन=सूर्य.

त्यालासि गोप रक्षाया दयासिंधो दवानळा ॥
पुण्यश्लोका त्वन्महत्व न ये धर्मा न वा नळा ॥ ५५ ॥
केलें त्वां क्षिप्र मारूनि सुसरा[४४] करिपावन[४५] ॥
या चरित्र असें कोण दुसरा करि पावन[४६] ॥ ५६ ॥
नामोच्चारें तशा त्वां त्या दिली मुक्ति अजामिळा ॥
वदतें यश हें चित्तीं धरा युक्ति भजा मिळा ॥ ५७ ॥
भक्तें ध्यावीं तव पदें नलिनें[४७] अलिनें[४८] जशीं ॥
या अंतर न पाडावें मलिनें कलिनें रसीं ॥ ५८ ॥
आम्हां जडां वरि करीं विठ्ठला या अनुग्रहा ॥
येवूं देवूं मुखीं काळ न होउनि अनुग्र[४९] हा ॥ ५९ ॥
वराक[५०] चि प्रभुवरा अघादि नव राकसा ॥
त्वत्प्रसादाविना होता मुक्तिचा नवरा कसा ॥ ६० ॥
अनता हि तुवां मोक्ष दिला द्यावा नता तसा ॥
साक्षात्तात चि तूं बापा पांडुरंगा न तातसा ॥ ६१ ॥
तारीं जड जडोद्धारापासूनि यश जन्मतें
यशाहूनि त्रिभुवनीं नाहीं अधिक सन्मतें ॥ ६२ ॥
दृष्ट केला तो यशें जो देवदेवा नर क्षण ॥
सत्प्रेमाचें करिसि कां देवदेवा न रक्षण ॥ ६३ ॥
दीनावनें होय साधुवादें[५१] या लोक लागती ॥
मातेशीं बाळ करितो या दयाळो कलागती ॥ ६४ ॥
शुकेसा[५२] मोरें[५३] हि तुझें लागला यश गावया ॥
जाणोनि दुर्लभतरा या काळवशगा वया ॥ ६५ ॥
यथामति तुला गावें याचि दे अमळा वरा ॥
नाशीं भक्त मयूराच्या शमळा[५४] कमळावरा[५५] ॥ ६६ ॥
तूं चंद्र चंद्रिका कीर्ति होय भक्त चकोर हा ॥
म्हणेल विठ्ठला कोण पुरे प्राशूं नको रहा ॥ ६७ ॥
इति श्रीमन्मयूरपंडितकृता श्रीविठ्ठलविज्ञप्तिः समाप्तिमयासीत्.

---

४४ सुसर=नक्र. ४५ करिपावन (करिप + अवन) =गजेंद्र-रक्षण. ४६. पावन= पवित्र. ४७ नलिन=कमळ. ४८ अलि=भ्रमर. ४९ अनुग्र ( अन् + उग्र )=सौम्य. ५० वराक=क्षुद्र, नीच. ५१ साधुवाद=स्तुति. ५२ शुक=पोपट-पक्षी शुकाचार्य ५३ मोर=पक्षी किंवा मोरोपंत. ५४ शमल=पाप. ५५ कमला=लक्ष्मी.

## प्रार्थनानुष्टुभदशक.

श्रीरामा नीरदश्यामा[1] सुखधामा रघूत्तमा ॥
त्वत्पादनखचंद्राची ज्योत्स्ना[2] माजा हरू तमा ॥ १ ॥
यास्तव स्मरतों नित्य स्वामी तुज दया करा ॥
तापापासूनि हा दीन मुक्त होय असें करा ॥ २ ॥
सेवा करावया लावा देवा हा योग्य चाकर ॥
या तप्ताच्या शिरीं आतपत्र[3] हो तुमचा कर ॥ ३ ॥
शरणागतसंत्राणीं[4] रामा तूं बहु सादर ॥
ऐसें असोनियां दीन पावतो हा कसा दर[5] ॥ ४ ॥
माया नदींत श्रीरामा तुझे चरण सांगडी ॥
बहु आवडले हे चि साधूंच्या मानसां गडी ॥ ५ ॥
मीनाचें जीवन जळ दीनांचें तूं चि केवळ ॥
मी नाथा तापलों यत्नहीनाचें मुख्य तूं बळ ॥ ६ ॥
आलों शरण्या तुजला शरणागत पातकी ॥
न होसि तूं दीनबंधो शरणागत-घातकी ॥ ७ ॥
विश्वास[6] विश्वास[7] तुझा कीं तूं दीनांसि रक्षिसी ॥
कशा ही संकटीं धांव म्हणतां न उपेक्षिसी ॥ ८ ॥
तुझ्या प्रतापें आम्हांतें याकाळीं जरि पाळिलें ॥
तरि सांभाळिलें सर्व यश नातरि वाळिलें ॥ ९ ॥
गाय पंकांत रुतली राय तो तीस उद्धरी ॥
पाय दीनांसि रक्षीना काय श्रेष्ठत्व तें तरी ॥ १० ॥

॥ इति प्रार्थनानुष्टुभदशकं ॥

---

## मुक्तांजली किंवा गुरुस्तुति.

श्रीगुरुचरणस्मरण प्रणति[8] स्तुति दर्शनार्चन श्रवण ॥
येथें चि हृदय संतत संत तरति करुनियां अतिप्रवण[9] ॥
श्रीगुरुचें चरणांबुजरज जें तें मुख्य होय मंगल गा ॥
अंगलगा[10] सिद्धि सदा याच्या याचा चि धरिति संग लगा[11] ॥ २ ॥

---

१. नीरद=मेघ. २ ज्योत्स्ना=चांदणें. ३ आतपत्र=छत्र. ४ संत्राण=रक्षण. ५ दर=भीति.
६ विश्वास=भरंवसा. ७ विश्वास=जगताला.

८. प्रणति=नमन. ९ अतिप्रवण=अति उत्सुक. १० अंगलगा=आंगास चिकटलेल्या.
११ लगा=आश्रय, आधार.

श्रीगुरुचरणोदक हें तीर्थांचें जनक विप्र या गाती ॥
याची सुकीर्ति म्हणती न ज्ञाते जन कवि प्रयागा ती ॥ ३ ॥
श्रीगुरुराज वदान्य[12] प्रणति करिति सर्व कल्पनग[13] यातें ॥
जें हा प्रणतां देतो जीवांला शेषतल्प[14] न गया तें ॥ ४ ॥
श्रीगुरुकडे भवमहाव्यसनीं गुरुभक्त चित्त पाठवुनी ॥
होय सुखी हेमंतीं देउनि शीतार्त जेंवि पाठ उन्हीं ॥ ५ ॥
गुरुभक्ता बहु मानीं हंस भजे मानसा सराला जो ॥
श्रीगुरुला श्रीपतिचा करिता बहुमान सासरा लाजो ॥ ६ ॥
श्रीगुरुच्या कीर्तीची ज्योत्स्नेची सम म्हणों नको रीती ॥
अति धवळा हे होती केवळ चि वही म्हणोन कोरी ती ॥ ७ ॥
श्रीगुरुची चंद्र अमृतकर म्हणति परि न बराबरीला हो ॥
याची प्रबोध पावो कीं पात्र गुणें बरावरी लाहो ॥ ८ ॥
*दोषाकरा जडात्म्या[15] आणिल गुरुच्या नवीन समतेला ॥
सारासार ज्ञाता न म्हणे हय्यंगवीनसम[16] तेला ॥ ९ ॥
गुरुभक्तांत नव्हे जो म्हणतां गुरुराजतपनसा[17] मान्य ॥
नाशी गुहातम न मग कैसें तत्तेज तप न सामान्य ॥
श्रीगुरुचें नुरवी पददर्शन सुखसदन ताप दासांचे ॥
कामादि शत्रु जे जे त्यांत चि गुरुपद न तापदा सांचे ॥ ११ ॥
श्रीगुरुनें लीलेनें सर्व श्रुति शास्त्रसार पढवीलें ॥
ध्रुव बहुमत परम पदीं रंकांतें कर धरुनि चढवीलें ॥ १२ ॥
श्रीगुरुचा प्रेमा जो म्हणती करिजेल तो कवि न तातें ॥
वात्सल्यभरें भावी केवळ कळवळुनि तोकें[18] विनतातें ॥ १३ ॥
श्रीगुरु अधिक सुखविलें जें पोषुनि काय न मन मातें[19] तें ॥
कोप न याया शतदा मी न करिन काय नमन मातेतें ॥ १४ ॥
श्रीगुरुच्या सोडावें न नता प्रेमें जसें नभा[20] वातें ॥
इष्टामित्रा सुहृदा आप्ता सख्या हि ये न भावातें ॥ १५ ॥
श्रीगुरुच्या उक्ति समा नुति माजि म्हणेल कामकपिला[21] जो ॥
पशुता कल्पुनि चित्तीं तो ही म्हणतां न रामकपि[22] लाजो ॥१६॥
श्रीगुरुला चिंतामणि न म्हण जिभे शब्द मानदगडदया ॥

---

१२ वदान्य=दाता. १३ नग=वृक्ष. १४ तल्प=शय्या. *दोषाकर=चंद्र. १५ जडात्मा=जलात्मा=जलमय. १६ हय्यंगवीन=उत्तम तूप. १७ तपन=सूर्य. १८ तोक=बालक. १९ माते=माजे. २० नभ=आकाश. २१ कपिला=धेनु. २२ कपि=मारुति.

काय करिल न पडों दे श्रीगुरुपदरेणु मानदगडदया ॥ १७ ॥
श्रीगुरु न स्पर्शमणि[23] हि कीं तो हि तया चि सारिखा परिस ॥
निवड हि करितो लोह स्वीकारी दूर सारि खापरिस ॥ १८ ॥
श्रीगुरुचें वचनामृत त्या अमृताहूनि अधिक या सुरसा[24] ॥
सेवुनि इतरा न रसा नर साधायासि तळमळे सुरसा[25] ॥ १९ ॥
श्रीगुरुचे जे त्यांच्या कामाद्यग्रारि साहती लत्ता ॥
गुरुभक्तांची चाले त्या काळावरि हि सर्वदा सत्ता ॥ २० ॥
श्रीगुरुचरणाची जी [26]संख्येयाखिलें[27]गुणा न धूलि हि ती ॥
मोजावयासि असतें शक्य तरि कधीं च विधिवधू[28] लिहिती ॥२१॥
श्रीगुरुनें क्षणभरि जें द्यावें सुख किमपि दंभरहितातें ॥
तें देइजेल न सुता विधि होउनि कल्प शंभर हि तातें ॥ २२ ॥
श्रीगुरुपदसरसिज जें तदुपासकचित्त बंभरें[29] चि तें हो ॥
गुरुयशसें न इतर सुख अमृत तसें काय अंभ[30] राचितें हो ॥ २३ ॥
श्रीगुरु हा भवसिंधुप्राशनकरितां महाघटज[31] नांदे ॥
जनिमरणपथश्रांतां परसुख पांयां जसा वट जनां दे ॥ २४ ॥
श्रीगुरु हा चतुरानन चतुरासि नव्या नव्या चि सृष्टींत ॥
किति न चमत्कृति दावी प्रकटाया प्रेमबाष्प दृष्टींत ॥ २५ ॥
श्रीगुरु हा नारायण सत्कीर्तिश्रीनिवास अवतारी ॥
जो घन साधुवनातें शमवुनि निःशेष पापदव तारी ॥ २६ ॥
श्रीगुरु शंकर येणें सुदृढ स्वानुभवभव्यचापधरें ॥
भस्म क्षणांत केलें देहपुरत्रय सुतीक्ष्ण बोधशरें ॥ २७ ॥
श्रीगुरु शक्र विचाराशनि[32]पातें करुनि मोहवृत्रास ॥
मर्दुनियां दूर करी दुःसह देवादिदेहभृत्त्रास ॥ २८ ॥
श्रीगुरु चि लोकपाळक साक्षाद्यमधर्म वरुण वित्तप[33] हा ॥
सत्य स्वानुभवातें श्रुति म्हणति स्थिर करुनि चित्त पहा ॥
श्रीगुरुपदप्रसादें श्रीगुरुचा जाणतात महिमा ते ॥
म्हणति अनंता अचला गुरुमूर्ति च तूं असी न महि माते ॥ ३० ॥
श्रीगुरुमातेनें निजहृदयीं निवळूनि आवळीला जो ॥

---

२३ स्पर्शमणि=परिस. २४ सुरस=उत्तमरस. २५ सुरसा=देवासारखा. २६. संख्येय=मोजण्यास शक्य. २७ अखिल=सर्व. २८ विधिवधू=सरस्वती. २९ बंभर=भ्रमर. ३० अंभ=पाणी. ३१ घटज=अगस्त्य. ३२ विचाराशनि=विचारवज्र. ३३ वित्तप=कुबेर.

माता परेसि म्हणतां तो [३४]धात्री जेंवि आंवळी लाजो ॥ ३१ ॥
श्रीगुरु समर्थ लोकीं श्रीगुरु चि पडों न दे नता शोकीं ॥
श्रीगुरु चिन्मय तो कीं श्रीगुरु समबुद्धि अरिजनीं तोकीं ॥ ३२ ॥
श्रीगुरु शास्त्रपुराणश्रुतिसज्जनशतमतें असामान्य ॥
श्रीगुरु जसा कविजना विश्रांत दुजा नसे असा मान्य ॥ ३३ ॥
श्रीगुरु माय श्रीगुरु तात श्रीगुरु धणी परित्राण ॥
श्रीगुरु वित्त श्रीगुरु विद्या श्रीगुरु चि जीवन प्राण ॥ ३४ ॥
श्रीगुरु सनत्कुमार श्रीगुरु नारद जयासि कवि गाती ॥
श्रीगुरु वाल्मीकिमुनि श्रीगुरु शुक ज्यासि सन्मुनि ध्याती ॥ ३५ ॥
श्रीगुरु कपिलाचार्य व्यास पराशर वसिष्ठ गाधिज या ॥
श्रीगुरुमूर्ति ध्याव्या गाव्या याव्या मुखासि [३५]आधि जया ॥ ३६ ॥
श्रीगुरुचरणांसि पंथीं न च कंटक कीं शिरीं खडा बाहो ॥
गुरुभक्त म्हणे जीवा मुक्त न हो गुरुपदीं [३६]खडावा हो ॥ ३७ ॥
श्रीगुरुला नी कांहीं सेवा सुखसंपदा नवि नवी ती ॥
मागति गुरुभक्त दुजी जोडाया कंपदा न विनवीती ॥ ३८ ॥
श्रीगुरुचे चरण शिरीं नित्य धरुनि गा त्रपा दुकानातें ॥
देती श्रीच्या यांसीं लावि करुनि गात्र पादुका नातें ॥ ३९ ॥
श्रीगुरुतें चि भजावें नमन करुनि धरुनि मुक्तिच्या [३७]चिबुका ॥
व्हावें चंदन किंवा कासे लागोनि युक्तिच्या चि बुका ॥ ४० ॥
श्रीगुरु सेवि न होउनि [३८]मृगमद कर्पूर केशर अबीर ॥
या जडपणासि माजा बहु बहु मानील मुक्त हि कबीर ॥ ४१ ॥
श्रीगुरुतें चि भजावें प्रेमें होऊनि बा शुभ [३९]व्यंजन ॥
स्वीकारील असे जडपण तो पावेल आशु भव्य जन ॥ ४२ ॥
श्रीगुरुच्या सेवेतें सोडुनि मी मुक्तितें भुलेंना कीं ॥
तींत न हें सुख येथें व्हावें तैसें चि म्यां फुलें नाकीं ॥ ४३ ॥
श्रीगुरु कामद म्हणवुनि धरिली म्यां हे मनांत आस नतें ॥
हांसोत संत व्हावें ज्यावरि गुरुमूर्ति भव्य आसन तें ॥ ४४ ॥
श्रीगुरुतें स्पर्शाया व्हावा तद्वस्त्र पात्र हा टोपी ॥
परमवदान्यापासीं अर्थी न मनोरथासि आटोपी ॥ ४५ ॥
श्रीगुरुभक्त म्हणेल ब्रह्मयासि तुझें हि पद नको राया ॥

---

३४ धात्री=उपमाता; आंवळीचें झाड. ३५ आधि=मनोव्यथा. ३६ खडावा=लांकडाचे जोडे. ३७. चिबुक=हनुवटि. ३८ मृगमद=कस्तूरी. ३९ व्यजन=पंखा.

गुरुपद गुरु पद व्हावें करुनि नवस यवसं[४०] रदनें[४१] कोराया ॥ ४६ ॥
श्रीगुरुचें व्हावें जें लोड उशी दार सुत पलंग डवा ॥
सांनिध्यार्थ चरण घे मोडूनि म्हणेल सुतप लंगड बा ॥ ४७ ॥
श्रीगुरुसि आवडे जो पावावें त्या चि सुरस महिम्यातें ॥
जें नावडे न द्यावें रूप क्षणमात्र सुरसम हि म्यां तें ॥ ४८ ॥
श्रीगुरुचा भाट बरा प्राप्त स्तुतिरूप सुरस भाटा कीं ॥
कवि म्हणति हें न घडतां जी जी म्हणती हि सुरसभा टाकीं ॥ ४९ ॥
श्रीगुरुला स्तवितां सुख तें काना न निज आलिया स्तवन ॥
स्वनुतिस गुरुभक्तश्रुतिसन्मतिच्या म्हणति आलि[४२] यास्तव न ॥ ५० ॥
श्रीगुरुचें जो कोणी जाया सर्व प्रयास पद रगडी ॥
पुरुषार्थ सकळ त्याचे होती पसरुनि तयास पदर गडी ॥ ५१ ॥
श्रीगुरुचे जो भगवद्गुणसे प्रेमें द्रवोनि गुण गातो ॥
श्रीचा सुकीर्तिचा किंबहुना सन्मुक्तिचा हि कुणगा तो ॥ ५२ ॥
श्रीगुरुच्या भजनसुखें क्षण देहाचा जया पडे विसर ॥
त्याच्या षडरातींचा हा ! हा ! हा ! हा ! म्हणे रडे विसर[४३] ॥ ५३ ॥
श्रीगुरुवचनासि जसा चातक मेघोदकासि आ पसरी ॥
न करील तद्यशाची त्या श्रीसुरसिंधु[४४]चें हि आप सरी[४५] ॥ ५४ ॥
श्रीगुरु भावें वंदुनि जेणें सानंद घातला उजवा ॥
तीर्थें म्हणती पाहुनि त्या स्वात्मा समय[४६] पातला उजवा * ॥ ५५ ॥
श्रीगुरुला जे शरण न जाती त्यांला घडे चि ना सुगती ॥
पावति न च शोभा ते भातेसे धरुनि मद[४७] वृथा फुगती ॥ ५६ ॥
श्रीगुरुगुणहंसां न प्राकृतगुणगृध्रवायसां गाल ॥
तरि धर्म पुसेल तया चुकवाया दंड काय सांगाल ॥ ५७ ॥
श्रीगुरु पाहे नुरवुनि तिळभरि ही भेद सारखे दास ॥
प्रणतांच्या शमवि श्रीगुरुचें वच वेदसार खेदास ॥ ५८ ॥
श्रीगुरुचें यश जो जन सुमलिन मानूनि तोक[४८] या धूतें ॥
गुरुभक्त म्हणुनि तारी कनककशिपुतें हि तो कयाधू[४९]तें ॥ ५९ ॥
श्रीगुरुपदप्रसादें ध्रुववाळें सुपद जोडिलें अढळ ॥
इच्छितपदार्थदानीं कोणाचा हात वा असा सढळ ॥ ६० ॥

---

४० यवस=गवताचीकाडी. ४१ रदन=दांत. ४२ आलि=सखी. ४३ विसर=समूह. ४४ सुरसिंधू=गंगा. ४५ सरी=बरोबरी. ४६ समय=स्वोद्धाराचा काळ. * उजवा=कार्य करून घ्या. ४७ मद=गर्व. ४८ तोक=बालक. ४९ कयाधू=प्रल्हाद-माता.

श्रीगुरु वसिष्ठ केला श्रीरामें हें न काय आइकसी ॥
तरती कपिलातें जरि गुरु न करिति देवहूति[50] आइ कसी ॥ ६१ ॥
श्रीगुरुवांचुनि वांचुनि विफळ जिणें यांत वांकडें काय ॥
शुक मांगे भागविला कृष्णें आणूनि लांकडें काय ॥ ६२ ॥
श्रीगुरुसांदीपिनि[51]ची भार्या आर्या वदे तदाज्ञा ते ॥
बळकृष्ण मानिति जसी श्रुतिची आज्ञा तसी तदा ज्ञाते ॥ ६३ ॥
श्रीगुरु ज्यातें नारी संसाराब्धींत संत तो चि तरे ॥
श्रीगुरुसि शरण जाणें चित्ता हें होय संततोचित रे ॥ ६४ ॥
श्रीगुरुच्या शाश्वत सुखरूपीं चरणीं च जेंवि पंगु रहा ॥
चित्ता भवविभवानें न भुलें अत्यल्पकाळ भंगुर हा ॥ ६५ ॥
श्रीगुरु अनिळो[52]नळें[53]सी पापनिकरें[54] वाळला जसा पाला ॥
गुरु दे भवा* जसा खगपति[55]नखकरवाळें[56] लाज सापाला ॥ ६६ ॥
श्रीगुरुच्या मूर्तिवरुनि जरि ओंवाळूनि सांडिला काय ॥
तरि ऋण न फिटे तेथें स्तव भलतासा चि मांडिला काय ॥ ६७ ॥
श्रीगुरुराया ठाव्या बाळा घड काय या स्तवनरीती ॥
न अव्हेरिली च गोपी कृष्णें जडकाय यास्तव नरी ती ॥ ६८ ॥
श्रीगुरुराया हा या पायांला याचितो करुनि नमनें ॥
कीं क्षण हि यासि सोडुनि जावें विषयस्पृहा धरुनि न मनें ॥ ६९ ॥
श्रीगुरुदेवा सेवा घे वात्सल्यें करुनि अनवरत[57] ॥
मन वर तव दासाचें हा पावुनि हो जसें चि अनव रत ॥ ७० ॥
श्रीगुरुमाते न तुझें मन निष्ठुर देवसिंधु[58]साखि लेश ॥
तो त्वत्प्रसाद म्हणती देवपुराणें जयासि अखिलेश[59] ॥ ७१ ॥
श्रीगुरुवर्या दे तें मर्यादेतें न शील जें मोडी ॥
थोडी हि मनें विष या विषया जाणुनि धरूं नये गोडी ॥ ७२ ॥
श्रीगुरुराजा नसतां तव पदशरणागतीं असुख[60] लेश ॥
सादर भजतिल न तुतें तरि न राहवे चि हे असु खलेश ॥ ७३ ॥
श्रीगुरुनाथा गाथा[61] तव सुयशाच्या चि रविसमा गाव्या ॥
रचितों मी च सकळ गुरु पर कोणा रचुनि कविस मागाव्या ॥ ७४ ॥

---

५० देवहूति=कपिलाचार्य माता. ५१ सांदीपिनी=कृष्णाचा गुरु. ५२ अनिळ=वायु. ५३ अनल=अग्नि. ५४ निकर=समूह. * भव=संसार. ५५ खगपति=गरुड. ५६ करवाळ=तरवार. ५७ अनवरत=निरंतर. ५८ देवसिंधु=गंगा. ५९ अखिलेश=अखिल+ईश. ६० असुख=दुःख. ६१ गाथा=कविता.

श्रीगुरुवरा वराभयदात्या रक्षीं च माय चुकलीला ॥
गातों तुझ्या यथामति मी प्रेमें जेंवि गाय शुक लीला ॥ ७५ ॥
श्रीगुरुराया शुद्ध ब्रह्म चि तूं नर न दिससि जरि नरमा ॥
तक्र तसें दुग्ध दिसे दोहींच्या किमपि साम्य परि न रसीं[६२] ॥ ७६ ॥
श्रीगुरुराया दिसला गोपांच्या बाळकांत बाळकसा ॥
म्हणुनि ह्मणावा कळतां तेज पशुपबाळ विश्वपाळकसा ॥ ७७ ॥
श्रीमद्गुरो दिसे श्रीदत्त म्हणुनि योगिनायक पिसा[६३] च ॥
मारुति कपिसा दिसतो यास्तव तो होय काय कपि साच ॥ ७८ ॥
श्रीगुरुराया उपमा नाहीं तुज हें तुजें तुज चि समजे ॥
ते न बधती[६४] च झाले भजुनि तुज स्वात्मदा तुज चि सम जे ॥ ७९ ॥
श्रीगुरुनाथा माया लववुनि हा दास बोलतो कांहीं ॥
बोलवि चि शिकविले हृदयविनोदार्थ बोल तोकांहीं ॥ ८० ॥
श्रीगुरुराया उपमा योजावी विष्णुची तुला तरि तो ॥
मायापति तूं मायाहर हा गुण मम मना मनो[६५] करितो ॥ ८१ ॥
श्रीगुरुराया माया पायांला या भिवूनियां पळति ॥
श्रीविष्णु जिला आश्रय झाला न टिके चि तुजपुढें पळ ती ॥ ८२ ॥
श्रीगुरुराया करितो परिपूर्ण तुझा अनुग्रह रित्यातें ॥
उग्र कनकशिपुसी जो तत्सुत झाला अनुग्र हरि त्यातें ॥ ८३ ॥
श्रीगुरुराया ज्या तूं होसी होती प्रसंन त्या सर्व ॥
जैसे सुर पार्थातें झाले होतां प्रसंन तो शर्व[६६] ॥ ८४ ॥
श्रीगुरुराया अंतर्बाह्य न अन्यत्र सर्वथा नातें ॥
आया बाया माया दाविति देती न सर्व थानातें ॥ ८५ ॥
श्रीगुरुराया कथिली जी त्वां कर्णांत हे तुजी वाचा ॥
चतुरक्षरा इणें तो हरिला जो मोहहेतु जीवाचा ॥ ८६ ॥
श्रीगुरुराया बा या तुझिया नमितां चि पाद-राजीवीं[६७] ॥
शिवता[६८] स्वयंवरवधू घालितसे माळ सादरा जीवा ॥ ८७ ॥
श्रीगुरुराया जाया आयासा या स्वजन्ममरणाच्या ॥
स्मरणाच्या कासेला लागावें बा तुझ्या चि चरणाच्या ॥ ८८ ॥
श्रीगुरुराया न शिवे ताप कधीं तव पदास शिवल्याला ॥
अंतर्बाह्य निरंतर बा कोण तुझा न दास शिवें[६९], ल्याला ॥ ८९ ॥

---

६२ रस=गोडी. ६३ पिसा=वेडा. ६४ बधती=वश होती. ६५ मना=अडथळा, हरकत. ६६ शर्व=शिव. ६७ राजीव=कमल. ६८ शिवता=कल्याण समूह. ६९ शिव=कल्याण.

श्रीगुरुराया दीनं मामव ह्मणवुनि पदास शिवला जो ॥
म्हणसि भ्रम स्मरुनि तो उमजुनियां आपणासि शिव लाजो ॥ ९० ॥
श्रीगुरुराया म्हणवी जीवदशा हाय कविस भाजी जी ॥
तीच शिवमयी केली तरिच तुला आयकवि सभा जी जी ॥ ९१ ॥
श्रीगुरुराया त्वां दृढ कंठींचा पाश अनव सरकविला ॥
ऐशा तुज न भजाया संसारीं कोण अनवसर कविला ॥ ९२ ॥
श्रीगुरुराया तूं श्रीकृष्ण तुझा तत्त्व-बोध हा वेणू ॥
श्रोतृश्रुति गोपीव्रज सद्व्रज नत तो चि पदकमलवेणु ॥ ९३ ॥
श्रीगुरुराया प्रेमें सेवावे म्यां तुझे सदा चरण ॥
हें मात्र न सोडावें जोडावें निश्चयें सदाचरण ॥ ९४ ॥
श्रीगुरुराया टिकला शिकला हि अलोल कीर हा यास ॥
पद पंजरीं कथितसे चिरकाळ अलोलकी रहायास ॥ ९५ ॥
श्रीगुरुराया वत्सल सागर तूं सर्वदा समैनाकी ॥
शिक्षित किमपि वदे ती बहुमान्या प्रभुसि होय मैना कीं ॥ ९६ ॥
श्रीगुरुराया कवणा संसारीं स्पर्शला अनय नाहीं ॥
स्खलनावांचुनि केलें गमन न विषमीं पथीं अनयनाहीं ॥ ९७ ॥
श्रीगुरुराया पावें जातें पावोनि चित्त आधीतें ॥
बा मज तव प्रसादें न रुचो स्वप्नीं हि वित्त-आधी तें ॥ ९८ ॥
श्रीगुरुराया नियमें बुडवितसे अहत्यासि गर्व तमीं ॥
चरणीं असें न होउनि रज कीं बोधार्णवांत पर्वत मी ॥ ९९ ॥
श्रीगुरुराया द्यावें ज्ञान भजाया जना न सांगाया ॥
कां गाया लावील न तुज तें यावें अभाग्य आंगा या ॥ १०० ॥
श्रीगुरुवरा रविकरानुगृहीत सुपूर्ण इंदु होय जरी ॥
रविसम तम शमवुनि सुनिपुणगुण तो न प्रकाश तेंवि करी ॥ १०१ ॥
श्रीगुरुराया पडतें मागुनि घेऊनि जरि उणीव रितें ॥
तरि तें दासत्व गळां पायांच्या पडुनि कां गुणीं वरितें ॥ १०२ ॥
श्रीगुरुराया व्हाया जलधि च जलधींत मेघ-बिंदु निघे ॥
गुरुभक्तिरसज्ञ न तो गंगा वदनें नद्यांत निंदुनि घे ॥ १०३ ॥
श्रीगुरुराया माझी हे आवडि आळ बा पुरीव सती ॥
अर्धांगीं आहे कीं वैकुंठाख्या कसी पुरी वसती ॥ १०४ ॥
श्रीगुरुराया ज्या या जाया-सुत-वित्त-संपदा साच्या ॥

---

७० दीनं मामव=मज गरीबातें रक्ष. ७१ अनव=जुना, अनादि. ७२ अनयन=अंध.

कृत्याशा अत्युग्रा देती हृदयासि कंप दासाच्या ॥ १०५ ॥
श्रीगुरुराया त्या ती बाधों न दिली सुदर्शनें[७३] कृत्या ॥
चालुं न द्यावें मजवरि संसृतिच्या या सुदर्शनें[७४] कृत्या ॥ १०६ ॥
श्रीगुरुराया स्वयशा जरि हंस करावया अहंसा धू ॥
ऐसें सांगसि अद्भुत करिसि तरि न ह्मणसि तूं अहं साधु ॥ १०७ ॥
श्रीगुरुराया त्वनिना मी तत्पदभजनमानवेशपथा[७५] ॥
करितां या पायांच्या कोण कुशळ न जन मानवे शपथा ॥ १०८ ॥
श्रीगुरुराया नलगे भजनेतर म्हणुनि आण वाहूं द्या ॥
प्रभुजी जें बहुमत तें मज बाळ चि गणुनि आणवा हूं द्या ॥ १०९ ॥
अष्टोत्तरशतसंख्या या स्तुतिरूपा सुनिर्मला मुक्ता[७६] ॥
श्रीगुरुरामपदाब्जीं नमुनि मयूरें समर्पिल्या युक्ता ॥ ११० ॥
इति श्रीमयूरवि० श्रीगुरुमुक्तांजलि.

---

## सवय्या-षट्कम्.

शिवहृदयालय तूं सुखदायक निर्जरनायक[७७]सेव्यपदा ॥
अभय मला जरि देसि अपाय निवारुनि पाय नमीन सदा ॥
तुज भुजगाभभुजा[७८]सि असे वरमागतसें त्ररदानकरा ॥
रघुकुलवंशवतंस[७९] दशाननसंततिकानन[८०]दाव[८१]करा ॥ १ ॥
कळत चि जोडियलें बहु पातक मीं निज घातक आत्मगुणें ॥
मदितरदुर्मतिसंचित दुष्कृत तें मजहूनि उदंड उणें ॥
काराशिल हा जरि रंक विभो गतपंक[८२] तुझें यश होय दुणें ॥
हृदयिं विचार तुवां करणें मग उद्धरणें मजला निपुणें ॥ २ ॥
जलधिनिबंधन अंध न पाहति शासन लंघति दास न ते ॥
वर शरणागत मागतसे तव शोक निवारिसि लोकपते ॥
जड तरले वश जे भजकां अज कामरिपुप्रभृति स्मरती ॥
भजनकरा अपराधकरास हि तारिसि भक्तपणें तरती ॥ ३ ॥
अहित समंतु[८३] परंतु मनीं तुज वैर करुनि सदा जपती ॥
वर गति योग्य चि ते जानिं विस्मित सस्मित योगि समाजपती ॥

---

७३ सुदर्शन=कृष्णाचें चक्र. ७४ सुदर्शन=चांगलें दर्शन. ७५ मानवेशपथ=राजमार्ग ७६ मुक्ता=मोत्यें. ७७ निर्जरनायक=इंद्र. ७८ भुजगाभभुज=सर्पासारखे गोंडस आहेत भुज ज्याचे. ७९ वतंस=भूषण. ८० कानन=वन ८१ दाव=अग्नि. ८२ पंक=पाप. ८३ समंतु=सापराध.

तव चरणा परिमापरि साधुगुणें स्तविती म्हणती शिव ते ॥
तराति उरेचि न जीवपण क्षण लोह सुवर्ण तसें दिसतें ॥ ४ ॥
रामरघूत्तम कामरिपुप्रिय लोकशोकहर याप्रतिभावें ॥
दाशरथे तुज होउनियां पादिं लीन दीनजनबंधुसि गावें ॥
आमरण स्मृति हे च असो वय या च साच सुपथांत सरावें ॥
दे वरदा वर या शरणाप्रति पापतापजलधींस तरावें ॥ ५ ॥
रघुरमणा तव कीर्ति सुधा हृदयांत बुडे तरि जीव तरे ॥
सुखकर नाव चि नाव तुझें स्मरतां भवसिंधुसि या उतरे ॥
भजक मयूर दयाघन तूं दुरिताघनगाशनि पादरजा ॥
भजन चि दे बहु मानपुरःसर मान चि येथ चि आदर जा ॥ ६ ॥

---

## ॥ अथावतारमाला आर्याबद्धा प्रारभ्यते ॥

### १ ला अवतार.

श्रीमद्विष्णुप्रभुचे अगणित अवतार सार चोवीस ॥
साधुसभाकंठ म्हणे या शुभमाळेसि तूं चि होवीस ॥ १ ॥
हे वर्णिले यथामति हरिचें अवतारचरित जरि लव ही ॥
तरि चतुर [1]चित्रगुप्त हि लिहिली कोरी च सर्व करिल वही ॥ २ ॥
विधिनें नारदमुनिला जे विश्व करावया पतितें[2] रहित ॥
कथिले अवतार स्वप्रभुचे गाईन ते अतितर हित ॥ ३ ॥
स्वायंभुवमनुला करि आज्ञा द्रुहिणें[3] प्रजा करायाची ॥
तो सिंधुमग्न भूस्थळ त्या सुवरमणिव्रजाकरों[4][5] याची ॥ ४ ॥
भूद्धरणातें धाता सतत ध्यानांत आठवी त्यातें ॥
न सुचे मग तो प्रार्थी नेत्रें[6] झांकूनि आठ बीत्यांतें[7] ॥ ५ ॥
तों चि निघे विधिनासेंतुनि[8] दर्शन दे वराहतोकें[9] वनीं ॥
पद्म जसा वाढे जो सुकवींच्या देव राहतो कवनीं ॥ ६ ॥
गगनीं तत्काळ प्रभु विधिदेवमुनिप्रमोदें[10] सह वाढे ॥
गर्जे त्या नादांहीं शमले जे त्रिविध[11] ताप बहु गाढे ॥ ७ ॥
ब्रह्मादि म्हणाति ज्याच्या चरणींचा एक रेणु शिरला हो ॥

---

१ चित्रगुप्त=यमाचा चिटणीस. २ पतित=पापी. ३ द्रुहिण=ब्रह्मा. ४ व्रज=समूह. ५ आकर=खाण. ६ आठ=चार तोंडांचे आठ डोळे. ७ पिता=बाप (विष्णु). ८ नासा=नाक. ९ तोक=बालक. १० प्रमोद=आनंद. ११ त्रिविध=अध्यात्मिक, आधिदैविक, आधिभौतिक.

कृत्याशा अत्युग्रा देती हृदयासि कंप दासाच्या ॥ १०५ ॥
श्रीगुरुराया त्या ती बाधों न दिली सुदर्शनें[73] कृत्या ॥
चालुं न द्यावें मजवरि संसृतिच्या या सुदर्शनें[74] कृत्या ॥ १०६ ॥
श्रीगुरुराया स्वयशा जरि हंस करावया अहंसा धू ॥
ऐसें सांगसि अद्भुत करिसि तरि न ह्मणसि तूं अहं साधु ॥ १०७ ॥
श्रीगुरुराया त्वद्विना मी तत्पदभजनमानवेशपथा[75] ॥
करितां या पायांच्या कोण कुशळ न जन मानवे शपथा ॥ १०८ ॥
श्रीगुरुराया नलगे भजनेतर म्हणुनि आण वाहूं द्या ॥
प्रभुजी जें बहुमत तें मज बाळ चि गणुनि आणवा हूं द्या ॥ १०९ ॥
अष्टोत्तरशतसंख्या या स्तुतिरूपा सुनिर्मला मुक्ता[76] ॥
श्रीगुरुरामपदाब्जीं नमुनि मयूरें समर्पिल्या युक्ता ॥ ११० ॥
इति श्रीमयूरवि० श्रीगुरुमुक्तांजलि.

---

## सवय्या-षट्कम्.

शिवहृदयालय तूं सुखदायक निर्जरनायक[77]सेव्यपदा ॥
अभय मला जरि देसि अपाय निवारुनि पाय नमीन सदा ॥
तुज भुजगाभभुजा[78]सि असे वरमागतसें त्वरदानकरा ॥
रघुकुलवंशवतंस[79] दशाननसंततिकानन[80]दाव[81]करा ॥ १ ॥
कळत चि जोडियलें बहु पातक मीं निज घातक आत्मगुणें ॥
मदितरदुर्मतिसंचित दुष्कृत तें मजहूनि उदंड उणें ॥
काराशिल हा जरि रंक विभो गतपंक[82] तुझें यश होय दुणें ॥
हृदयिं विचार तुवां करणें मग उद्धरणें मजला निपुणें ॥ २ ॥
जलधिनिबंधन अंध न पाहति शासन लंघति दास न ते ॥
वर शरणागत मागतसे तव शोक निवारिसि लोकपते ॥
जड तरले वश जे भजकां अज कामरिपुप्रभृति स्मरती ॥
भजनकरा अपराधकरास हि तारिसि भक्तपणें तरती ॥ ३ ॥
अहित समंतु[83] परंतु मनीं तुज वैर करूनि सदा जपती ॥
वर गति योग्य चि ते जानें विस्मित सस्मित योगि समाजपती ॥

---

७३ सुदर्शन=कृष्णाचें चक्र. ७४ सुदर्शन=चांगलें दर्शन. ७५ मानवेशपथ=राजमार्ग ७६ मुक्ता=मोत्यें. ७७ निर्जरनायक=इंद्र. ७८ भुजगाभभुज=सर्पासारखे गोंडस आहेत भुज ज्याचे. ७९ वतंस=भूषण. ८० कानन=वन. ८१ दाव=अग्नि. ८२ पंक=पाप. ८३ समंतु=सापराध.

तव चरणा परिसापरि साधुगुणें स्तविती म्हणती शिव ते ॥
तराति उरेचि न जीवपण क्षण लोह सुवर्ण तसें दिसतें ॥ ४ ॥
रामरघूत्तम कामरिपुप्रिय लोकशोकहर याप्रतिभावें ॥
दाशरथे तुज होउनियां पादिं लीन दीनजनबंधुसि गावें ॥
आमरण स्मृति हे च असो वय या च साच सुपथांत सरावें ॥
दे वरदा वर या शरणाप्रति पापतापजलधीस तरावें ॥ ५ ॥
रघुरमणा तव कीर्ति सुधा हृदयांत बुडे तरि जीव तरे ॥
सुखकर नाव चि नाव तुझें स्मरतां भवसिंधुसि या उतरे ॥
भजक मयूर दयाघन तूं दुरिताघनगाशनि पादरजा ॥
भजन चि दे बहु मानपुरःसर मान चि येथ चि आदर जा ॥ ६ ॥

---

## ॥ अथावतारमाला आर्याबद्धा प्रारभ्यते ॥

### १ ला अवतार.

श्रीमद्विष्णुप्रभुचे अगणित अवतार सार चोवीस ॥
साधुसभाकंठ म्हणे या शुभमाळेसि तूं चि होवीस ॥ १ ॥
हे वर्णिले यथामति हरिचें अवतारचरित जरि लव ही ॥
तरि चतुर चित्रगुप्त[१] हि लिहिली कोरी च सर्व करिल वही ॥ २ ॥
विधिनें नारदमुनिला जे विश्व करावया पतितें[२] रहित ॥
कथिले अवतार स्वप्रभुचे गाईन ते अतितर हित ॥ ३ ॥
स्वायंभुवमनुला करि आज्ञा द्रुहिणें[३] प्रजा करायाची ॥
तो सिंधुमग्न भूस्थळ त्या सुवरमणिव्रजा[४]करों[५] याची ॥ ४ ॥
भूद्धरणातें धाता सतत ध्यानांत आठवी त्यातें ॥
न सुचे मग तो प्रार्थी नेत्रें झांकूनि आंठ[६] वीत्यातें[७] ॥ ५ ॥
तों चि निघे विधिनासेंतूनि[८] दर्शन दे वराहतोकें[९] वनीं ॥
पद्म जसा वाढे जो सुकवींच्या देव राहतो कवनीं ॥ ६ ॥
गगनीं तत्काळ प्रभु विधिदेवमुनिप्रमोदें[१०] सह वाढे ॥
गर्जे त्या नांदांहीं शमले जे त्रिविध[११] ताप बहु गाढे ॥ ७ ॥
ब्रह्मादि म्हणाति ज्याच्या चरणींचा एक रेणु शिरला हो ॥

---

१ चित्रगुप्त=यमाचा चिटणीस. २ पतित=पापी. ३ द्रुहिण=ब्रह्मा. ४ व्रज=समूह. ५ आकर=खाण. ६ आठ=चार तोंडांचे आठ डोळे. ७ विता=बाप (विष्णु). ८ नासा=नाक. ९ तोक=बालक. १० प्रमोद=आनंद. ११ त्रिविध=अध्यात्मिक, आधिदैविक, आधिभौतिक.

उदकीं शिरे तडागीं कविचित्तीं ये करेणु[12] शिरला हो ॥ ८ ॥
नादें हतदिगिभांचे[13] मग होतिल कां न कर्ण वर चील ॥
करितां कुक्षिविदारण कां अंजळिला न अर्णव[14] रचील ॥ ९ ॥
क्षिति उद्धरितां प्रभुशीं युद्ध हिरण्याक्षआदि दैत्य करी ॥
परकंपद ही तद्बळ न गणी जगदीश जेंवि शैत्य[15] करी १० ॥
प्रभुसि प्रथम दितिज[16] तो हांसे मग बहु तयास कोल[17] हरी ॥
प्रभुकीर्तिसम न होइल अमृतोदधिची दया शिको लहरी[18] ॥ ११ ॥
वधुनि हिरण्याक्षातें व्यापारुनि हरि सलील दाढेतें ॥
उद्धरि महितें करि यश जेणें निःसीम भद्र वाढे तें ॥ १२ ॥

इति श्रीयज्ञवराहचरितं ॥

## २ रा अवतार.

श्रीपति रुचिप्रजापतिपासुनि आकूतिच्या[19] स्वयें पोटा ॥
आला सुयज्ञनामा लोकीं प्रकटी प्रताप हा मोठा ॥ १३ ॥
विष्णुसयज्ञप्रभुची सहजा स्त्री होय दक्षिणाख्या ती ॥
अवतरली विश्वांत प्रकट करायासि दक्षिणा ख्याती ॥ १४ ॥
करि दक्षिणोदरीं सुत उत्पन्न सुयज्ञ सुयम या नांवें ॥
वानावें त्यास हि कीं रविसम रविच्या करांसि[20] मानावें ॥ १५ ॥
होउनि आपण इंद्र त्रिभुवनपीडा द्विषद्भयासि हरी ॥
स्वायंभुवमनु मातामह[21] तो यास्तव म्हणे तयासि हरी ॥ १६ ॥
कोलाऽवतारिं[17] पहिला प्रभुचा यज्ञावतार हा दुसरा ॥
याच्या सुयशा सेविति सुकवि जसे हंस मानसा सुमरा ॥ १७ ॥

इति श्रीयज्ञावतारचरितं ॥

## ३ रा अवतार.

सुतपोनिधि प्रजापति कर्दम योगींद्र जो तया धन्या ॥
श्रीविष्णुप्रेरितशतरूपा पति देवहूति[22] दे कन्या ॥ १८ ॥
स्वीकारी कर्दम[23] कीं झाली पहिली च भगवदाज्ञा त्या ॥
भाग्यसमृद्धिविमान प्रकटी मुनि कल्पनगें[24] वदा ज्ञात्या ॥ १९ ॥

---

१२ करेणु=हत्ती. १३ दिगिभ=दिग्गज. १४ अर्णव=समुद्र. १५ शैत्य=थंडी. १६ दितिज=दैत्य. १७ कोल=डुकर. १८ लहर=लाट. १९ आकूति=स्त्री विशेष. २० कर=किरण. २१ मातामह=आईचा बाप. २२ देवहूति=स्त्री विशेष. २३ कर्दम=मुनि विशेष. २४ नग=वृक्ष.

धन्या कन्या पावे मूर्तिमतीभक्ति तत्समा नवती[25] ॥
होय मनुसुता भाग्या प्रसवुनि हरि कपिलवत्स मानवती ॥ २० ॥
दे देवहूतिला स्तनरस सेवुनि आत्मवित्त कपिलास्य[26] ॥
अद्यापि जया पावुनि सोडितसे सर्वचित्त कपिलास्य[27] ॥ २१ ॥
मातेसि आत्मविद्या शिकवुनि दे मुक्ति कापिल हा तिसरा ॥
अवतार श्रवण करुनि गाउनि हरिभक्त हो भवा विसरा ॥ २२ ॥
इति श्रीकपिलावतारचरितं ॥

## ४ था अवतार.

चिरकाळ अपत्यार्थी दुष्करतर शुद्ध तपकरी अत्री ॥
पत्रीशवाहि[28] त्यातें भटे जो विश्व पोषिता सत्री ॥ २३ ॥
हर्षे मुनिवर विभुला पावुनि बहु जेंवि रंके[29] संनिधिलें[30] ॥
किंवा बाळचकोर स्मरतां लाहुनि सुधांशुसंन्निधिला[31] ॥ २४ ॥
ह्मणतां माग मुनि ह्मणे जाणासि तूं भक्तवत्सला भावा ॥
ध्यां त्वत्पदप्रसादें त्वत्तुल्य व्यक्त वत्स लाभावा ॥ २५ ॥
कोऽन्यो मत्तुल्योऽत्रे तुभ्यं दत्तो मयाहमेवं[32] असें ॥
वदला पद लाजविना त्या प्रभुचें परवदान्य[33]लक्ष कसें ॥ २६ ॥
तो दत्तप्रभु चवथा अवतार सुभुक्तिमुक्तिच्यादानें ॥
यदुहैहयादि धन्य चि केले ज्या विश्वपूज्यपादानें ॥ २७ ॥
इति श्रीदत्तात्रेयचरितं ॥

## ५ वा अवतार.

ब्रह्मा आधीं विविधा सृष्टि करायासि सुतप जें करितें ॥
विपुल अखंडित भावें सर्व समर्पी प्रवर्तका हरितें ॥ २८ ॥
तेणें सनत्कुमार प्रख्यात प्रथम मुनि दुजा सनक ॥
तिसरा सनंदन सनातन चवथा होय हरि जगज्जनक ॥ २९ ॥
ऐसीं कुमाररूपें चार धरी अजित मोह पळवाया ॥
प्रळयांत लोपलें जें लोकीं तें आत्मतत्त्व कळवाया ॥ ३० ॥

---

२५ नवती=नव्वद. २६ कपिलास्य=कपिलाचें मुख. २७ कपिलास्य=वानराचें नाचणें. २८ पत्रीशवाह=गरुडवाहन (विष्णु) २९ रंक=भिकारी. ३० सन्निधि=उत्तम ठेवा. ३१ सुधांशुसंनिधि=चंद्रसामिप्य. ३२ हे अत्रे मत्तुल्यः कः अन्यः ? मया तुभ्यं अहमेव दत्तः=हे अत्रि माझे समान दुसरा कोण आहे ? मी स्वतःच तुझ्या पोटीं येतों. ३३ वदान्य=दाता.

करुणा जीस म्हणावें करिति कथुनि तत्त्व हें कुमार चि ती ॥
सुमुनिमति यदुपदेशीं स्थिति जगदीशीं जशी उमा रचिती ॥ ३१ ॥
साधुसभेचा मंगलतिलक कुमारावतार पंचम हा ॥
आत्माश्रितांसि देतो सुख दावुनि तत्व जेंवि मंच महा[३४] ॥ ३२ ॥

इति श्रीकुमारावतारचरितं ॥

### ६ वा अवतार.

लक्षनुता दक्षसुता धर्माची जी मनःप्रिया मूर्ति ॥
तत्सुत नरनारायण होय करि मुकुंद सत्स्पृहापूर्ति[३५] ॥ ३३ ॥
श्रीबदरिका[३६]श्रमांत स्वात्मसुखीं करुनि जे सुतप रमते ॥
वक्रा शक्रा गमले निजपदहरमूर्तिचे सुत परम ते ॥ ३४ ॥
पाठविल्यासुरपतिनें स्मर[३७]सेना अप्सरा महा कुटिला ॥
ज्यांहीं लीलेनें पण करुनि तपोधन जन क्षणें लुटिला ॥ ३५ ॥
उर्वश्यादि सहस्र प्रभुपदपरिचारिका स्त्रिया धन्या ॥
पाहुनि लज्जित झाल्या नागर[३८]कन्यापुढें जशा वन्या ॥ ३६ ॥
तेथें कैंचा काम क्रोध हि जेथें कधीं न भासावा ॥
नरनारायणनामा त्रिभुवनहित सदवतार हा सावा ॥ ३७ ॥

इति श्रीनरनारायणावतारचरितं. ॥

### ७ वा अवतार.

केला शब्दशरांहीं मातेच्या सवतिनें उरीं विद्ध ॥
इद्ध[३९] ज्वलन तमा ध्रुव जाय वनीं व्हावया तपें सिद्ध ॥ ३८ ॥
श्रीनारदमुनिदर्शित पथ यमुनातीरमधुवनीं तपला ॥
तप लाजविता झाला वृद्धांचें बाल हि व्रता जपला ॥ ३९ ॥
शिकवि शिवुनि गल्ल दरें[४०] ताप हरुनि सर्व या स्तवनतातें[४१] ॥
दे ध्रुवपद गुरु म्हणवुनि पोषावा गर्व यास्तव न तातें ॥ ४० ॥
माय महाराज जनकपरि ज्या कोणी न होय हर्षद या ॥
शिशुसि सुखवि धावुनि विभु घन चातक दास अमृतवर्षद या ॥ ४१ ॥
बाळ निववला पांचा वर्षांचा जो मनांत तप्त महा ॥
बहुवत्सल वरदोत्तम सद्गुरुचा सदवतार सप्तम हा ॥ ४२ ॥

इति वत्सलावतारचरितं ॥

---

३४ मह=आनद. ३५ स्पृहापूर्ति=इच्छा पुरविणे. ३६ बदरिका=बोरीचें झाड. ३७ स्मर=मदन. ३८ नागर=शहरांतल्या. ३९ इद्ध=पेटलेला. ४० दर=शंख. ४१ नत=नम्र.

## ८ वा अवतार.

वेननृप स्वीकारी आपण हि परा हि निंद्य मार्ग वदे ॥
धर्मन्यायासि पराभव जेंवि क्षत्रियांसि भार्गव दे ॥ ४३ ॥
कुपिताद्विजहुंकारप्रेता व्हावें चि नरकपद वेना ॥
त्या सुत होउनि तारी प्रभुचें कारुण्य किमपि वदवेना ॥ ४४ ॥
वृत्त्यर्थ जन तयाला जैसे तातासि पृथुक[४२] विनवीती ॥
दोही[४३] समा करी क्षिति दावी सद्रीति पृथुकवि[४४] नवी ती ॥ ४५ ॥
केली दुहिता सुहिता करुनि धरा भूप म्हणाति अन्याया ॥
परि महदंतर होऊं दे स्वप्रामाजि ही न अन्याया ॥ ४६ ॥
श्रीमत्रिभुवनपतिचा हा पृथुअवतार आठवा याचा ॥
महिमा आठवुनि दिला ग्यां साधुजनासि आठवा[४५] याचा ॥ ४७ ॥

इति श्रीपृथ्ववतारचरितं ॥

## ९वा अवतार.

लंघिति सुखें स्मरुनियां ज्यातें संसारकानना[४६] भितरे ॥
प्रभुपुत्र ऋषभनामा होय मग भवासि कां न नाभि तरे ॥ ४८ ॥
योगींद्र मेरुदेवीसुत भगवान् ऋषभदेव तत्तनय ॥
भरतप्रमुख शत सुगुण नव योगी ज्यांसि मान्य दत्तनय ॥ ४९ ॥
परदुर्वहलीलेनें आपण वाहोनि राज्यभर तातें ॥
ऋषभें दिधलें सज्जनसंमत पाहोनि राज्य भरतातें ॥ ५० ॥
नतविषयवासना हरि ऋषभ प्रभु तो जसा अहिमगु[४७] रुजा[४८] ॥
मुनि म्हणति परमहंसप्रवरशतोत्तम महामाहिम[४९] गुरु ज्या ॥ ५१ ॥
उन्मत्तजडपिशाच स्थिति दावी ऋषभदेव अवसानीं[५०] ॥
व्हावें भस्म अघांनीं ज्या शिवुनि शिखीसें[५१] जेंवि यवसांनीं[५२] ॥ ५२ ॥
सेविति विषयविषाला औषध याचें नचे गायन वमाया[५३] ॥
नवमा[५४] या अवताराहुनि वत्सीं न करि गाय नव माया ॥ ५३ ॥

इति श्रीऋषभावतारचरितं ॥

## १०वा अवतार.

भगवत् प्रीत्यर्थ करी पूर्वीं चतुरानन स्वयें यज्ञ ॥

---

४२ पृथुक=बालक. ४३ दोही=दूध काढी. ४४ कवि=ज्ञाता. ४५ आठवा=स्मरण. ४६ कानन=वन. ४७ अहिमगु=सूर्य. ४८ रुजा=दुःख. ४९ महामाहिम=मोठा आहे महिमा ज्याचा. ५० अवसान=अखेर. ५१ शिखि=अग्नि. ५२ यवस=गवत. ५३ वमाया=ओकण्याकरितां. ५४ नवमा=नवव्या.

त्यांत प्रकटे भगवान् हयशीर्ष स्मरुनि ज्या तरति अज्ञ ॥ ५४ ॥
जो अखिलदेवतात्मा श्रुतिमय मखमय भवव्यथा हरितो ॥
विधियज्ञांत प्रकटुनि करि कुतुकें अद्भुता कथा हरि तो ॥ ५५ ॥
तप्तकनकवर्ण प्रभु झाला लीलेकरुनि वाजिशिरा ॥
जो श्रितयादांसि म्हणे सत्सुखपीयूषसिंधुमाजि शिरा ॥ ५६ ॥
नासापुटांतुनि श्रुति तुरगमुखाच्या बहु प्रकट झाल्या ॥
प्याल्या ब्रह्मादिश्रुति सुसुधाधाराचि त्या परि न धाल्या ॥ ५७ ॥
ऐसा त्रिजद्गुरूचा तुरगग्रीवावतार या दशमा ॥
सेवुनि सन्मन पावे जैसें गंगाह्रदांत याद शर्मा ॥ ५८ ॥

इति श्रीहयग्रीवावतारचरितं.

## ११वा अवतार.

द्रुहिण निजों लागे तों तद्वदनांतूनि मूर्त ते वेद ॥
बाहेर निघति त्यांतें हरुनि हयग्रीव असुर दे खेद ॥ ५९ ॥
तें दानवेंद्रचेष्टित जाणुनि तत्काळ विश्वपाळ हरी ॥
श्रुतिरक्षण खळमर्दन निजभक्तसुखार्थ मीनरूप धरी ॥ ६० ॥
द्रविडेश्वर सत्यव्रत नारायणचरणनीरजीं लीन ॥
तर्पण करि कृतमालातटिनींत तदंजलींत ये मीन ॥ ६१ ॥
त्यजितां जळांत विनवी त्या राजर्षीस निपट लघु दीन ॥
स्वकमंडलूंत ठेवुनि नेला तेणें निजाश्रमीं मीन ॥ ६२ ॥
न पुरे उदंच न तया सर हि महा मीन होय शत गांवें ॥
बसवुनि तरींत तारी त्या होवुनि तत्पदासि नत गावें ॥ ६३ ॥
तत्त्व समुद्रीं कथिलें प्रभुनें कां तो विहार न करावा ॥
खळ वधुनि वेद विधिला दे हा मत्स्यावतार अकरावा ॥ ६४ ॥

इति श्रीमत्स्यावतारचरितं ॥

## १२वा अवतार.

क्षीराधितें अमर असुर मथिती पावावया अमृत रत्नें ॥
मंदरमंथाभारें जाय तळीं न धरवे परम यत्नें ॥ ६५ ॥
क्षीरोदधींत पृष्ठीं घे मंदर देव होय पृथु कमठ ॥
कीं जे आर्यमनोरथ जो श्रीभगवत्प्रसाद पृथुक मठ ॥ ६६ ॥

---

५५ वर्ण=रंग. ५६ याद=जळचर. ५७ पीयूष=अमृत. ५८ श्रुति=वेद. ५९ श्रुति=कान. ६० ह्रद=डोह. ६१ शम=शांति. ६२ नीरज=कमळ. ६३ तटिनी=नदी. ६४ गांव=योजन. ६५. तरींत=नौकेंत. ६६ पृथु=मोठा. ६७ कमठ=कांसव.

नगपरिवर्तनपृष्ठीं कंडूयनसेंचि तें सुखद भावी ॥
लावी पातीं निद्रा घे प्रभु लीला असी कितिक गावी ॥ ६७ ॥
इष्टार्थ सर्व साधुनि होउनि जो देवदेव कांसव दे ॥
हित हा चि होय ध्यावे चिंतामणिहूनि अन्य कां सवदे ॥ ६८ ॥
ज्याच्या श्रवणें स्मरणें सर्वांचा सर्व ताप वारावा ॥
त्या प्रभुचा हा मंदरगिरिधरकूर्मावतार बारावा ॥ ६९ ॥

इति श्रीकूर्मावतारचरितं.

## १३वा अवतार.

दितिज हिरण्यकशिपु विधिपासुनि वर उग्र तप करुनि साधी ॥
शक्रादि लोकपति नृप ने त्यांसि करी पदें हरुनि [६८]साधी ॥ ७० ॥
भगवद्भक्त शुचियशा प्रल्हाद तया स्वपुत्ररत्नातें ॥
माराया करि शस्त्रज्वलनाहि[६९]विषादि नैकैं[७०] यत्नातें ॥ ७१ ॥
ईश्वर मी कोण तुझा कोठें तें शीघ्र सांग दाव कसा ॥
असिकर[७१] पुत्रासि पुसे क्षोभे कल्पांतकाळपावक[७२]सा ॥ ७२ ॥
सर्वत्र स्तंभीं ही आहे म्हणतां चि तो तया ताडी ॥
तों त्यांतुनि प्रकटे नृहरि नखांहीं च तदुदरा फाडी ॥ ७३ ॥
ज्या गातां दोषांहीं नेवि शशांहीं न सिंह घेरावा ॥
श्रितमोहविनाशक हा होय नृसिंहावतार तेरावा ॥ ७४ ॥

इति श्रीनृसिंहावतारचरितं.

## १४वा अवतार.

इंद्रद्युम्न महात्मा जो पांड्यद्रविडसत्तम ख्याता ॥
तो होता श्रीपतितें पूजुनि कुलाचलाश्रमीं ध्याता ॥ ७५ ॥
प्रत्युत्थानप्रणति न करितां गज हो असें घटज[७३] शापी ॥
हूहूसि म्हणे देवलमुनि ही होशील नक्र तूं पापी ॥ ७६ ॥
झाला गज त्रिकूटीं तो त्या नक्रें सरोवरीं धरिला ॥
करिला [७४]गवेग न सुटे संस्कारें पूर्विल्या स्मरे हरिला ॥ ७७ ॥
धांवुनि येउनि गरुडें व्यापारुनि दिव्य आपुलें चक्र ॥
उद्धरिला केला निजरूप करिवर स्वरूप तो नक्र ॥ ७८ ॥
हरिसंज्ञकावतार प्रभुचा [७५]शिवकोटिभ[७६]वन चवदावा ॥

---

६८ साधी=दुःखी. ६९ अहि=सर्प. ७० नैक=अनेक. ७१ असिकर=खड्गधर. ७२ पावक=अग्नि. ७३ घटज=अगस्त्य. ७४ गवेग=पकड. ७५ शिव=कल्याण. ७६ भवन=स्थान.

अमृतें गैदैं तैंपनें तम येणें ही तेंवि भव न च वदावा ॥ ७९ ॥

इति श्रीहरिसंज्ञकावतारचरितं.

## १५वा अवतार.

अमृत न देउनि वंचुनि बळि अरिनीं मारिला चि वांचविला ॥
गुरुनें प्रभाव अद्भुत दिधला जो जपुनि सुचिर सांचविला ॥ ८० ॥
त्रिभुवनपति बळि होतां पुत्र पदच्युत म्हणे अदिति हाय ॥
माय शरण तीस करी वरदवरशरण्य तो अजित माय ॥ ८१ ॥
वामन होय शताव्या हयमेधीं त्रिपदभू बळिस याची ॥
गुरु वारी परि दे चि प्रभुची तासि कीर्ति हरि कळिस याची ॥ ८२ ॥
सर्वस्वें प्रभुपदयुग होय करि शिरें तृतीयपदपूर्ति ॥
वाटे बळी बळि च कीं छळुनि करी द्वारपाळ सुखमूर्ति ॥ ८३ ॥
प्रभु भक्ता निववि वरें सुभटकरें शिवुनि कंधरा वाहा ॥
श्री वामनावतार प्रेमळ सर्वस्व पंधरावा हा ॥ ८४ ॥

इति श्रीवामनावतारचरितं ॥

## १६वा अवतार.

प्रभुला यमनियम धरुनि भजला नारदसुरर्षि तो भावें ॥
श्रवण करुनि यश कोणा साधुजनाचें न चित्त लोभावें ॥ ८५ ॥
होय प्रसन्न भजनें दर्शन दे हंसरूप हरि त्यातें ॥
निजभक्तियोग सांगे स्तवुनि शिरीं चरणरेणुधरित्यातें ॥ ८६ ॥
जें आत्मतत्त्वदीपक भागवतज्ञान साधन व्यक्त ॥
तें उपदेशी भगवान् हंस करि कृतार्थ आपुला भक्त. ॥ ८७ ॥
सारासारनिवडितां भवमार्गीचा समर्थ बोलावा ॥
घोळावा हृदयीं हा श्रितहित हंसावतार सोळावा ॥ ८८ ॥

इति श्रीहंसावतारचरितं ॥

## १७ वा अवतार.

स्वायंभुवप्रमुख जे ख्यात मनु चतुर्दश प्रजापाळ ॥
यारूपें प्रभु वर्ते ज्या तिलकें भव्य भूमिचें भाळ ॥ ८९ ॥
हानि करि अधर्माची मनु होउनि देव वृद्धि धर्माची ॥
दुर्जनदमनचरित्रें प्रकटी सत्कीर्ति सुखैनि शर्माची ॥ ९० ॥
प्रभु मनु होउनि सादर परिपाळी सर्वकाळ साधूंतें ॥
प्रसवे पुत्र म्हणति ते भूतप्रिय जें सदैव साधू तें ॥ ९१ ॥

---

७७. गद=रोग. ७८ तपन=सूर्य. ७९ खानि=खाण. ८९ शर्म=सुख.

परम पतित ही ज्याचें स्मरुनि मनीं पादसारसिं[81] तरावा ॥
निजसेतु[82]रक्षकाचा हा मन्ववतार सार सतरावा ॥ ९२ ॥
इति श्रीमन्वतारवर्णनं ॥

### १८ वा अवतार.

धन्वंतरि होय प्रभु आयुर्वेद प्रवर्तवी लोकीं ॥
जैसी दयावती मति याची माता तसी नसे[83] तोकीं ॥ ९३ ॥
जपतांचि दूर करितें जें तापकरा[84] जनामय[85]शतातें ॥
कोठें हि मेळवीलें न चिकित्सक[86]राजनामयश तातें ॥ ९४ ॥
पूर्णायु होय या प्रभुवरभजनें जन असे जरि लवायु[87] ॥
याचा पदरेणु वरिल अमृत घनाधिक भलें करिल वायु ॥ ९५ ॥
कीर्ती अपार याची गावें या सदयसत्तमा त्रात्या ॥
याच्या नामें चि जना तारिति ज्या वैद्यदत्त मात्रा त्या ॥ ९६ ॥
किति इतर ज्यापुढें क्षणमात्र हि संसारगद[88] हि न ठरावा ॥
धन्वंतरिअवतार प्रभुचा हा कीर्तनीय अठरावा ॥ ९७ ॥
इति श्रीधन्वंतर्यवतारचरितं ॥

### १९ वा अवतार.

जमदग्निपुत्र भार्गव राम प्रभु होय विप्र तापससा ॥
जेणें अर्जुन[89] वधिला मृगराजें जेंवि विप्रताप[90] ससा ॥ ९८ ॥
साहे न बलात्कारें हैहयपति कामधेनुला हरि तें ॥
प्रभु परशुराम धावुनि मारी माहिष्मतीपुरीं अरितें ॥ ९९ ॥
अर्जुनसुत खळ नेती छेदुनि जमदग्निचें बळें शिर तें ॥
कथि साधु रेणुका जें हृदयीं अद्यापि शल्यसें शिरतें ॥ १०० ॥
बहु पावले तशा जमदग्निवधें लाख विप्र तापातें ॥
त्यां इतरां हि खळांतें मथुनि प्रभु दाखवि प्रतापातें ॥ १ ॥
करि एकवीस वेळां क्षत्रक्षय कश्यपासि दे वसुधा ॥
स्थळ घे सारुनि सागर सेविति कवि कीर्ति जेंवि देव सुधा ॥ २ ॥
हा भार्गवावतार प्रभुचा एकें उणा विसावा हो ॥
कीर्तनकरित्या सुखकर शुद्ध प्रेमलगुणा विसांवा हो ॥ ३ ॥
इति श्रीपरशुरामावतारचरितं ॥

---

८१ सारस=कमल. ८२. सेतु=मर्यादा. ८३. तोक=बालक. ८४ तापकर=दुःखद. ८५. आमय=रोग. ८६ चिकित्सक=वैद्य. ८७ लवायु=अल्पायु. ८८ गद=रोग. ८९ अर्जुन=सहस्रार्जुन. ९० विप्रताप=प्रतापरहित.

## २० वा अवतार.

रविवंशीं दशरथनृप ये प्रभु पोटीं तदीय भार्यांच्या ॥
कौसल्या कैकेयी सुमति सुमित्रा सुनामकार्यांचा ॥ ४ ॥
श्रीराम भरत लक्ष्मण शत्रुघ्न असे कुमार कवि चार ॥
रविच्या रश्मिपुढें तम तेंवि टिके ज्यांपुढें न अविचार ॥ ५ ॥
गाधिज येउनि निजमख रक्षाया रामलक्ष्मणा मागे ॥
त्या गेयचरित्रा दे गुरुवचनें भूप तो पदा लागे ॥ ६ ॥
विद्या बळाअतिबळा अस्त्रें दे रामलक्ष्मणा भारी ॥
प्रभु ताटकेसि मार्गीं मुनिच्या आज्ञेकरूनियां मारी ॥ ७ ॥
विघ्न सुबाहु करि हरि प्राणा त्या विप्रसत्त्[11]मारीच्या ॥
शरपवनें शत गांवें पाडी सिंधूंत मत्त मारीचा ॥ ८ ॥
मिथिलापुरीस मुनिसह जातां जैसा घनें महादाव ॥
प्रभुनें मार्गीं गौतमभार्येचा नाशिला शिलाभाव ॥ ९ ॥
विश्वामित्रप्रेरित जनकमहाराजदर्शित धनुष्य ॥
प्रभुचें प्रभुवर भंगी तन्नादें कापले सुरमनुष्य ॥ १० ॥
सीतादिसुता चवघी चवघां रामादिकां दिल्या जनकें ॥
ते देखिले सदुपयममंगल सादर सनंदनें सनकें ॥ ११ ॥
फिरुनि स्वरुपा येतां दशरथहृदयासि भीति भार्गव दे ॥
कपटें त्र्यंबकभंगक्रोधें कटु धरुनि रानमार्ग वदे ॥ १२ ॥
करुनि त्र्यंबकभंग छात्र[12]त्राच्या ही करी परिभवातें ॥
न च मानावें कर्म प्रभुला बहु मानलें परि भवा[13]तें ॥ १३ ॥
भूप वसिष्ठानुमतें रामासि म्हणे स्वराज्य ओपावें ॥
तों कैकेयीस वदे दासी कीं बल धरून कोपावें ॥ १४ ॥
भरतासि राज्य चवदा वर्षें वनवास आज रामातें ॥
कैकेयी पतिस म्हणे दे नातरि शीघ्र काजरा मातें ॥ १५ ॥
गुरुसत्यधर्मरक्षणकामें वरि गह[14]न देव राज्यातें ॥
सोडी जें तें मानी जन टाकुनि दहन दे वरा[15]ज्यातें ॥ १६ ॥
राज्याचा सुख वाटे दुःख स्वीकार न वनवासाचा ॥
सीतालक्ष्मणसहित प्रभुसि सुखविलास नवनवा साचा ॥ १७ ॥
भेटुनि गुहकासि प्रभु वटदु[16]ग्धें त्या स्थळीं जटा वळवी ॥

---

११ विप्रसत्तमारि=सद्ब्राह्मणशत्रु. १२ छात्र=शिष्य. १३ भव= शिव. १४ गहन=वन. १५ वराज्य=उत्तम नृप. १६ दुग्ध=चीक.

मळवी न द्युति वेल्कें हि न मुनि भरद्वाजमुनिस तें कळवी ॥ १८ ॥
शोकें नृपति मरे बहु मातेला भरत तप्ततनु गांजी ॥
धरि पाय चित्रकूटीं त्यासि रुचे वृत्ति तीच अनुगां जी ॥ १९॥
ऐकें पितृमरण नव्हे नवल म्हणे साश्रु राम हा हा तें ॥
पिंडोदकदान तया दे व्हाया पूर्णकाम हा हातें ॥ २०॥
पावे भरत प्रभुच्या चरणापासूनि पादुका नमनीं ॥
नंदीग्रामीं च वसे घाली स्मृतिचें चि हा दुकान मनीं ॥ २१ ॥
अत्रि सुतीक्ष्ण घटज शरभंग असे मुनि तपोनिधी रानीं ॥
प्रभुनमन घेति सादर चिंतावा जो जपोनि धीरांनीं ॥ २२ ॥
मारुनि शुचिता उचिता गति अतिमति देव दे विराधाला ॥
तो प्रभुतें बहु वंदी वर्णी यश डोलवी शिरा धाला ॥ २३ ॥
प्रभु मग पंचवटींत श्रीमद्गोदावरीतटीं राहे ॥
रावणभगिनी विधवा शूर्पणखा राक्षसी वरूं पाहे ॥ २४ ॥
रामाज्ञेनें तीच्या तो लक्ष्मण कर्णनासिका कापी ॥
देव म्हणाति तद्रक्ता करुनि प्रभुवर्णनासि काका पी ॥ २५ ॥
त्या तद्विरूपकरणें खरदूषण खवळले जनस्थानीं ॥
चवदा सहस्र वधिले प्रभुनें सुख मानिलें वनस्थानीं ॥ २६ ॥
भगिनीचें वैरूप्य प्रेक्षुनि बहु कोपला सुरद्वेषी ॥
मारीचासि कनकमृगरूपें रामाश्रमाप्रति प्रेषी ॥ २७ ॥
पाहुनि म्हणे जनकजा अत्यद्भुत हरिणमणि धरावा हो ॥
साकेतपुरीं लालनपालनसत्कार हा बरा वाहो ॥ २८ ॥
कामीसा प्रभु धांवे कांतेच्या ऐकतां चि वाणीतें ॥
जरि कपट राक्षसाचें साचें तत्क्षण मनांत आणी तें ॥ २९ ॥
चुकवी पळे निशाचर त्यातें मर्मी च मार्गणें हाणी ॥
हा सीते हा लक्ष्मण ऐशी प्रभुची तशी वदे वाणी ॥ ३० ॥
कर्णद्वारें ती त्या सीतेच्या मृदु मनांत हांक शिरे ॥
ती विधिस म्हणे केली हानि अकस्मात् वनांत हा कशि रे ॥ ३१ ॥
कथितां हि तत्त्व सीता अश्राव्य अवाच्य वाक्य आयकवी ॥
नायक वीरांचा तो तीतें उटजीं त्यजूनि जाय कवी ॥ ३२ ॥
तोंचि दशमुखें सहसा येउनि होऊनि दंभसंन्यासी ॥

---

९७ वल्क=झाडाची साल. ९८ काका=हे काका तद्रक्ता पी असें देव प्रभुवर्णनासि करुनी म्हणती. ९९ साकेत=अयोध्या. १०० मार्गण=बाण. १ दंभ=कपट.

धन्या सीता देवी हरिली व्याघ्रें वनांत वन्यासी ॥ ३३ ॥
गृध्रपति जटायु म्हणे सोडीं माझी दशानना सून ॥
घ्यावी अन्य स्त्रीच्या अभिलाषें [ कधि ? ] दशा न नासून ॥ ३४ ॥
बहु विकळ करी अरिला रथ भंगुनि पक्षचंचुनखरांहीं ॥
हांसुनि म्हणे न माझीं शस्त्रें घेतील वंचुन खराही ॥ ३५ ॥
त्या दशरथमित्राच्या खड्गें छेदूनि पक्षमूलातें ॥
सीतेसि हरी उठवी वनदेवीमस्तकांत शूलातें ॥ ३६ ॥
मारूनि मारिचातें फिरतां सौमित्रि देखिला अजितें ॥
पुसतां कारण सांगे प्रभुला जें काय बोलिली अजि तें ॥ ३७ ॥
वाटे कृत्या जैसी सीतारहिता तसीच दे२लशाला ॥
दारवियोग प्रभुला तो जेंवि ध्वजावियोग कलशाला ॥ ३८ ॥
स्त्रैण३विडंब४नकामें आत्मरत करी तदा विलापातें ॥
पळ हि विराम५ प्रभुच्या शोकाश्रूंच्या न दाविला पातें ॥ ३९ ॥
करितां शोध सतीचा क्षतपक्ष पतित जटायु आढळला ॥
जो मानिला प्रथम रवि पडला रथावरूनियां ढळला ॥ ४० ॥
लावी अश्रु पुसाया घालाया मंद वात हातातें ॥
प्रभु त्यासि पुसे वरिला कोणापासूनि पात हा तातें ॥ ४१ ॥
वत्सा सीता नेली पापानें मद्दशा असी केली ॥
रामा ऐसें अर्ध चि वदतां तच्चेतना लया गेली ॥ ४२ ॥
प्रभु आपण त्या पितृसखगृध्रवराची क्रिया करी राहे ॥
संस्कारिति तेंवि जनीं पुत्र हि न पित्याचिया शरीरा हे ॥ ४३ ॥
योजनहस्ता मारी तारी जगदीश तो कबंधातें ॥
हरि पातकिबंधातें प्रभु जे सातात तोकबंधातें ॥ ४४ ॥
निजचरणस्मरणपरा मुनिसेवालब्धशुद्धि जी शबरी ॥
तीस अतिथि होऊनि दे यतिपति गति देव जानकीश बरी ॥ ४५ ॥
बहु रम्य वनीं सीताविरही प्रभु तो विलोकिता पंपा ॥
कंपा पावे ज्याचें ध्यान म्हणे दासषड्डहितां६ संपा ॥ ४६ ॥
प्रसवे वाता पासुनि ज्या सदपत्यास अंजना त्यातें ॥
ब्रह्म्यास हि दुर्लभ जें दे त्या प्रभुपादकंज नात्यातें ॥ ४७ ॥
सुग्रीव ऋष्यमूकीं मारुतिनें प्रभुवरासि भेटविला ॥

---

२ दल=पर्ण. ३ स्त्रैण=स्त्रीलंपट. ४ विडंबन=फजिती. ५ विराम=थांबणें. ६ षड्डहित=षड्रिपु.

नँग[7] दाखविले मैत्री केली साक्षी हुताश[8] पेटविला ॥ १४८ ॥
भेदी निजतेजाचा प्रत्यय यायासि सप्ततालीला[9] ॥
वालिवध करि प्रभुची स्वजनीं नुरवी च तप्तता लीला ॥ १४९ ॥
सुग्रीव वानरांतें प्रेषी करवी प्रभु प्रियाशोध ॥
संपातिवचें[10] सागर लंघी तो वातसुत महायोध ॥ १५० ॥
शतयोजनमुख करि त्या ठकवुनि देउनि सुखासि सुरसेला[11] ॥
छायाग्रहासि[12] वधितां हांसति लावुनि मुखासि सुर सेला ॥ १५१ ॥
विघ्नेश्वरप्रयाणीं कोण इतर विघ्न करिल शिकून ॥
मैनाकास हि लंघी किति हें श्रमता न काळ जिंकून ॥ १५२ ॥
लंकेंत शिरे मारुति तीच्या अधिदेवतेसि जितून ॥
सीतेसि अशोकवनीं पाहे प्रभुतें मनांत चिंतून ॥ १५३ ॥
पाहे सीता करि दशवदना पाण्यापरीस पातळ तें ॥
चित्तांत म्हणे प्रभुला तरि च इचें विरहदुःख आतळतें[13] ॥ १५४ ॥
तो शिंशपातरुस्थित जावूं दे त्या दशानना क्षुद्रा ॥
रुद्राराध्यप्रभुगुण[14] वर्णी मग नमुनि दे तिला मुद्रा[15] ॥ १५५ ॥
सीता चूडामणि दे काकाची ही कथा खुणेस वदे ॥
वत्स चिरं जीव म्हणे याहुनि तो सर्व ही उणे सवदे ॥ १५६ ॥
वन भंगुनि अक्ष[16] वधुनि इंद्रजिदस्त्रासि सांपडुनि धीर ॥
बांधुनि घे हरि अरिमद पुर जाळुनि सिंधु तरुनि ये वीर ॥ १५७ ॥
प्रभु आलिंगुनि निववी मारुतिचें भाग्य काय वानावें ॥
याच्या सुयशाहुनि तो अमृत कवीनीं उणें चि मानावें ॥ १५८ ॥
दिधलें महत्व यश सुख उपमा विश्रांत जानकीशातें ॥
कीं प्रभु म्हणे निवविता या विरहीं तूं चि जाण कीशीं[17] तें ॥ १५९ ॥
सुग्रीवें मेळविलें प्लवगांचें बळ अनंत ऋक्षांचें[18] ॥
ज्यांचें आयुध पर्वतशिखरांचें शालतालवृक्षांचें[19, 20] ॥ १६० ॥
तें बळ घेउनि बैसे स्कंधीं श्रीराम पवनतनयाच्या ॥
गमनीं पादन्यासें कां होइल शेषें[21] अवनत[22] न यांच्या[23] ॥ १६१ ॥

---

७. नग=दागिने. ८ हुताश=अग्नि. ९ सप्तताली=ताडाचे सात वृक्ष. १० संपाति=जटायूचा बंधु ११ सुरसा=नागांची माता. १२ छायाग्रह=सिंहिका (राहूची माता). १३ आतळतें=स्पर्शतें. १४ रुद्राराध्यप्रभु=राम. १५ मुद्रा=अंगठी. १६. अक्ष=रावणाचा पुत्र. १७ कीश=वानर. १८ ऋक्ष=अस्वल. १९ शाल=वृक्ष विशेष. २० ताल=ताडाचा वृक्ष. २१ शेष=पृथ्वीधारण करणारा सर्प. २२ अवनत=वांकलेला. २३ याच्या=मारुतीच्या.

लक्ष्मण हि अंगदाच्या स्कंधीं श्रीरामसंमतें बसला ॥
वाटे उदयनगाग्रीं[२४] शारद[२५]परिपूर्णचंद्रमा वसला ॥ १६२ ॥
सागरतीरासि प्रभुसेनासागर अनंत तो पावे ॥
ज्याच्या महाप्रतापें सप्तांचे[२६] ही प्रताप लोपावे ॥ १६३ ॥
गजवर जसा ऱ्हदातें सोडुन दावाकुला अरण्यातें ॥
साधु बिभीषण टाकुनि बंधूतें शरण ये शरण्यातें ॥ १६४ ॥
येतां चि शरण दे त्या बहु मानुनि तो जगज्जनक लंका ॥
यश हें प्रक्षाळितसे आयिकतां कीर्तितां जनकलंका ॥ १६५ ॥
प्रभु कोपतां चि जाणुनि आणुनि सद्रत्नमय उपायन[२७] तें ॥
पदरज मायां धरिलें मग कथिला सागरें उपाय नतें ॥ १६६ ॥
प्रभुच्या आज्ञेनें करि नल जलनिधिमाजि सेतु शतगावें ॥
न तगावें अघ जेणें विश्वें होवूनि ज्यासि नत गांवें ॥ १६७ ॥
झटुनि अहोरात्रत्रय सेतुपथें प्लवगसैन्य तें उतरे ॥
गर्जुनि सुगलभट म्हणति कुमदें दुष्टा दशानना उत[२८] रे ॥ १६८ ॥
श्रीरामनयन लंघी जरि तो दशतुंडहतक लंकेला ॥
संतति सह बुडवाया गेला घेवूनि गतकलंकेला ॥ १६९ ॥
प्रभुनें प्रताप कळवुनि शुद्ध यशस्कर विचार आठविला ॥
शत्रुकडे परभंगद अंगद सामर्थ शीघ्र पाठविला ॥१७० ॥
अंगद हित सांगे परि न च वाटे त्या मदकुलास हित ॥
मारा धरा म्हणे खळमणि बुडवाया पदा कुळासहित ॥ १७१ ॥
धरिला खळसचिवांनीं भुजदंडीं वालिपुत्र हा पटुनीं ॥
चूर्ण करि उडुनि झाडुनि चवघांस हि तत्क्षणीं च आपटुनी ॥ १७२ ॥
प्रभु सांगे त्रासपद जैसा सदनी गराक्ष[२९] साप सदा ॥
तैसा चि जगीं हा या जोडा नाहीं च राक्षसापसदा[३०] ॥ १७३ ॥
रोधा लंका शंका न धरा प्राकार[३१] ढांसळा खाणा ॥
जाणा भट हो निज जय धर्मच्युत हत चि हें मनीं आणा ॥ १७४ ॥
श्रीरामो जयति म्हणति सुग्रीवो जयति लक्ष्मणो जयति ॥
ऋक्षांची प्लवगांची सेना पावे महारणीं जय ती ॥ १७५ ॥
विफल चि दशवदनाच्या जे विविधायुध सुधार[३२] सचिवांचे[३३] ॥

---

२४ उदयनग=उदयपर्वत. २५. शारद=शरदतूंतील. २६ सप्तांचे=सात समुद्रांचे. २७ उपायन=नजराणा. २८ उत=फूग. २९ गराक्ष=विष आहे डोळ्यांत ज्याच्या. ३० अपसद=नीच. ३१ प्राकार=तट. ३२ सुधार=तीक्ष्ण ३३ सचिव=प्रधान.

कीं सेवि तयास म्हणे सद्धर्मसुनयसुधारस चि वांचे ॥ १७६ ॥
सुत सचिव सुभट सेना समरीं शमती सदैव तरि मॉया[34] ॥
करि मॅाया[35] नग टांचें[36] ज्या प्रभुचा न समजे चि गरिमॉ[37] या ॥ १७७ ॥
श्री रामें जरि वधिला सुरपतिनें वृत्र तेंवि घटकर्ण ॥
तरि वारीन म्हणे नरकपिपॅल[38]पिंडें हतास्रकॅटकर्ण[39] ॥ १७८ ॥
जरि इंद्रजित्सुतमणिक्षय केला लक्ष्मणें तरि न राहे ॥
मानी दशकंठ म्हणे मस्तक लवतिल कसे अरिनराहे ॥ १७९ ॥
श्रीराम म्हणे तेजें पूर्ण हि जो काय सदरि पोकळ तो ॥
पदरीं सुकृत जयाच्या घातक त्याला चि मद रिपो कळतो ॥ १८० ॥
निरुपम समरीं रामप्रभुनें अत्यंत तो खपविला हो ॥
हें चिंतुनि निजबोधें भवसा दशकंठ तोखें[40] पविलॉ[41] हो ॥ १८१ ॥
स्व विजय कळवुनि वसवुनि शिबिकेंत सती समीप आणविली ॥
न्हाणविली शिखिकुंडीं शुद्धा सर्वां जनांसि जाणविली ॥ १८२ ॥
शक्रकृतामृतवर्षें समरनिहत सकळ उठविलें सैन्य ॥
प्रभुनें विश्वाचें ही खलबलदलनें निवारिलें दैन्य ॥ १८३ ॥
बैसुनि पुष्पकयानीं सबल बिभीषणसुकंठसह साजे ॥
करितें उणे चि झाले सिद्ध सुपुरुषार्थ सर्व सहसा जे ॥ १८४ ॥
चाले पुष्पक वेगें पवन जसा तत्समान सत्वर तें ॥
कीं प्रभु म्हणे पहाया शीघ्र भरत वत्स मानस त्वरतें ॥ १८५ ॥
नमुनि भरद्वाजातें भेटुनि गुहकाभिधा निषादातें ॥
प्रेषी मारुतिस पुढें वाराया बंधुच्या विषादातें ॥ १८६ ॥
पद्म भरत त्या दर्शन दे आधीं पवनपुत्र तो अरुण ॥
मग पद्मॅबंधु[42] भगवान् राम प्रभुवर्य जो महाकरुण ॥ १८७ ॥
श्रीराम प्रभु घनसा निववी अति तप्त भरत चातकसा ॥
पातक सारी नामें विश्वाचें तो करील घात कसा ॥ १८८ ॥
अंगॅार[43] भोग नीरस झाले तैं त्या नको रॅसापा[44] हे ॥
तो भरत रामचंद्र प्रभुपादांतें चकोरसा पाहे ॥ १८९ ॥
सुखवुनि गुरुमुख सकळां प्रभु भरताच्या स्वयें जटा उकली ॥
करि पुण्य यश असें कीं न च हें गात्या जना दटाउ कली ॥ १९० ॥

---

३४ माया=कपट. ३५. माया=राहण्यास. ३६ टांचें=अपूर्तें. ३७ गरिमा=मोठेपणा. ३८ पळ=मांस. ३९ कटकर्ण=कटक + ऋण=सैन्याचें कर्ज. ४० तोख=आनंद. ४१ पवि=वज्र. ४२ पद्मबंधु=सूर्य. ४३ अंगार=निखारे. ४४ रसाप=राजा.

कैकेयीतें वंदुनि तच्चित्तांतील खेद तो काढी ॥
कौसल्येसि सुमित्रेसह मग जगदीश सुखसुधा वाढी ॥ १९१ ॥
श्रीगुरु भरत सुमित्रापुत्र सुमंत्र प्रधान पुरवासी ॥
राज्याभिषेक करिती करुनि स्तुति वेद वाद्य[45]सुरवासी ॥ १९२ ॥
सुग्रीवविभीषणकृत उपकार स्वगुरुजवळि आठविले ॥
आपण अलंकृत करुनि ते सर्व स्वस्थळासि पाठविले ॥ १९३ ॥
प्रेमें त्या मारुतिला चिरजीवित्व स्वभक्ति दे वर हा ॥
देउनि हारमणि म्हणे मत्कीर्तन जेथ तेथ देव रहा ॥ १९४ ॥
रामाच्या राज्यांत स्वप्नीं पावे प्रजा न शोकातें ॥
न पित्यातें परि उठवी निववुनि विप्रासि विप्र[46]तोकांतें ॥ १९५ ॥
पृथ्वी पिके यथेप्सित घन जन चिंतिति तसें सुखें वर्षे ॥
अहि वृश्चिक [47]दंशीं मशक [48]मत्कुण हि नसे प्रजा सुखें हर्षे ॥ १९६ ॥
किं बहुना श्रीरामें म्हणुं दिधलें हाय कुतरिया नाहीं ॥
ज्याच्या सुधायशाहीं व्योमींच्या जेंवि [49]कुतरियांनाहीं ॥ १९७ ॥
प्रभु रंजन प्रजांचें करुनि करावें असें जना शिकवी ॥
व्हाया लोकद्वयहित हरिचरितें शोधिती [51]समाशि कवी ॥ १९८ ॥
केलें आपण हि जसें [52]तातें रघुनें अजें दिलीपानें ॥
निजशुचिकीर्तिसुधेच्या तृप्ति सदा सज्जना दिली [53]पानें ॥ १९९ ॥
प्रभुच्या [54]क्रतुंची तुलना येइल शतमखपिता हि न क्रतुला ॥
आकार सम दिसे परि सरडा पावेल काय नक्र तुला ॥ २०० ॥
आपण ईश्वर न म्हणे वर्ते गुरुधर्मविप्रभजनांत ॥
प्रभु उपदेशी सकळां कीं ऐसा तो न [55]विप्रभ जनांत ॥ २०१ ॥
भी प्रभु जनापवादा शुद्धा दयिता तरी तिस त्यागी ॥
सुयशीं धरुनि गोडी जोडी सोडी न रीति सत्या [56]गी ॥ २०२ ॥
निजयश रक्षाया प्रियबंधु त्यागी परि प्रतिज्ञा न ॥
नमितां सर्वांस हि दे नुरवुनि कामाद्यरिप्राति ज्ञान ॥ २०३ ॥
अकरा सहस्र वर्षे [57]साकेतीं विश्वपति करी राज्य ॥
ज्यांत स्मरे न मोक्ष हि ऐसें प्रभु दे जना सुख [58]प्राज्य ॥ २०४ ॥

---

४५ रव=स्वर. ४६. तोक=बालक. ४७ दंश=चिलटें, डांस. ४८ मत्कुण=ढेंकूण. ४९ कुतरि=वाईट नौका. ५० यान=वाहन. ५१ समाशी=संक्षिप्त. ५२ तात=दशरथ. ५३ पान=प्राशन ५४ क्रतु=यज्ञ. ५५ विप्रभ=तेजोहीन. ५६ गी=वाणी. ५७. साकेत=अयोध्या. ५८ प्राज्य=पुष्कळ.

निजचरित अश्वमेधीं ऐसें आपण जनांसि आयकवी ॥
जें कुशलवांसि पढवी रामायणकाव्य आद्य रायकवी ॥ २०५ ॥
भव्य महाकाव्य श्री रामायण चरित आपलें परि तें ॥
आपण हि श्रवण करी कीं हें सर्वांस ही सुखी करितें ॥ २०६ ॥
राज्यपदीं बैसविले निजकुळनंदन कुशादि जे आठ ॥
ज्यां वाल्मीकिवसिष्ठप्रोक्ता श्रुतिनीतिसत्कथा पाठ ॥ २०७ ॥
मग गोप्रतारतीर्थीं श्रीसरयूमाजि सर्व आणून ॥
न्हाणून जन विमानीं बैसविले स्वपदसक्त जाणून ॥ २०८ ॥
धांवोनि वर विमानीं मार्जार जसें तसें चढे कुतरें ॥
किंबहुना त्यातें ही न म्हणे चि विमानदेवता उतरें ॥ २०९ ॥
तत्कीर्तन योग जसा संप्रति वारुनि मोह तारितसे ॥
ने स्वपदा जीव सकळ देवांचा देव तो हतारि तसे ॥ २१० ॥
स्वसम समर्थ श्रितहित निज मंगलधाम नाम या महितें ॥
ताराया प्रभु ठेवी पुर उद्धरि न भरितां चि याम हि तें ॥ २११ ॥
भक्तमयूर सुखविले सर्व हि करुणाघनें घनश्यामें ॥
पूरितसंश्रित कामें श्रीरामें पुण्यकीर्तिच्या धामें ॥ २१२ ॥
कर्णीं भरवा बरवा नरवानरवासवां विसावा हो ॥
श्रीरामाचा त्रिभुवनपावन अवतार हा विसावा हो ॥ २१३ ॥

इति श्रीरामावतारचरितम् ॥

## २१ वा अवतार.

असुरांशभूपसेनाभारें बहु भूमि पावली पीडा ॥
म्हणुनि विधाता विनवी वैकुंठा सखगांचिया नीडा ॥ २१४ ॥
देता झाला सदभय विधिला जो सर्वसाधुवसुदेव ॥
करि करिवरवरद उचित निज जनकत्वासि साधु वसुदेव ॥ २१५ ॥
प्रभु पुत्र रोहिणीचा होय स्वांशें करुनि तो राम ॥
मग पुत्र देवकीचा झाला कृष्ण स्वयें घनश्याम ॥ २१६ ॥
हरि गोकुळासि गेला प्रकटुनि कारालयांत कंसाच्या ॥
वायस यत्न करुनि ही गतिला रोधील काय हंसाच्या ॥ २१७ ॥
त्या रोहिणीयशोदा मोही प्रकटूनि पूतना माया ॥

---

५९ आद्यरायकवी=वाल्मीकी. ६० विसावा=विश्रांति. ६१ वैकुंठ=विष्णु. ६२ खग=पक्षी. ६३ नीड=घरटें. ६४ कारा=बंदिखाना. ६५ वायस=कावळा. ६६ पूतना=पूतना माया (कपट) प्रकटुनि त्या यशोदा रोहिणा मोही.

मारायास्तव पाजी उग्रविष स्तैन्य[67] पूतनामी[68] या ॥ २१८ ॥
जीवन हि न राहूं दे गरळ हि विधिचा[69] न हा जनक[70] यानीं ॥
दे अमृत[71] पूतनेला म्हणुन चि भुलले महाजन कथानीं ॥ २१९ ॥
आपण होय मधुकरी[72] ज्या पद्म करी रमा सती नव या ॥
स्वपदें शकट उडवि विभु सुकुमारशरीर मास तीन वया ॥ २२० ॥
ज्यासी माता बांधी ओढित नेउनि तया चि उखळाला ॥
प्रभुनें प्रवेश मध्यें केला यमलार्जुनासि उखळाया ॥ २२१ ॥
विषजळपानें मेले जे पशुगोपाळ सर्व दृष्टीनें ॥
ते तत्काल उठविले जगदीशें जेंवि अमृतवृष्टीनें ॥ २२२ ॥
यमुना शुद्धा करि हरि परि हरि मद दमुनि कालियातें हो ॥
दवडी दे अभय म्हणे प्रभु दीन न शरणआलियातें हो ॥ २२३ ॥
यमुनातट निद्रित पशुपाळांतें दावदहन ये खाया ॥
त्यातें पी प्रभु किति तो काळ हि न क्षम तयासि देखाया ॥ २२४ ॥
तैसें चि गोप गोधन रक्षी प्रभु दाव गिळुनि मुंजांत[73] ॥
निजजनविघ्नांत प्रभु हा जैसा शरभदेव मुंजांत[74] ॥ २२५ ॥
प्रेमें बांधुनि घे प्रभु न पुरे ज्या बहु हि बंधना दावें[75] ॥
तत्पदपद्मीं होउनि अलि[76] सेवित सुरसगंध नांदावें ॥ २२६ ॥
जो देव यशोदेतें दावी जृंभितमुखांत विश्वास ॥
त्या प्रभुच्या चि पदाब्जीं अचळ असो सर्व काळ विश्वास ॥ २२७ ॥
करि उग्रवरुणपाशत्रासापासूनि मुक्त नंदातें ॥
तो देव सोडवू दृढभवपाशांतूनि या हि मंदातें ॥ २२८ ॥
मथुनि मयसुता व्योमा मुक्त करी गोपशिशु गुहाउद्ध ॥
मोह मथुनि मज संसृतिरुत्धा उद्धरुनि यश करो शुद्ध ॥ २२९ ॥
सदनव्यवहार दिवा रात्री निद्रा असा व्रजस्थ जन ॥
तो वैकुंठीं नेला स्मरतें अतिवत्सला तया चि मन ॥ २३० ॥
सप्त दिवस नग धरि हरि गोकुळ बुडवूं शके न मघवा[77] तें ॥
या प्रभुच्या चरणरजां वरिल्या नाशे अनंत अघ वातें ॥ २३१ ॥
लसद[78]मृतकर[79]करनि[80]करधवल[81]रजनिमाजि सबळ[82] मुरलीला ॥

---

६७. स्तन्य=दुग्ध. ६८ पूतनामा=पवित्र आहे नाम ज्याचें. ६९ विधि=ब्रह्मा. ७० जनक=बाप. ७१ अमृत=मोक्ष. ७२ मधुकरी=भ्रमरी. ७३ मुंज=एक प्रकारचें गवत. ७४ मुंजा=ग्रह, समध, भूत. ७५ दावें=दोरी. ७६ अलि=भ्रमर. ७७. मघवा=इंद्र. ७८ लसत्=शोभायमान. ७९ अमृतकर=चंद्र. ८० करनिकर=किरणसमूह. ८१ धवल=शुभ्र. ८२ सबळ=बळरामासह.

वाजवि लाजवि [८३]गीतें अमृत करि वनीं हरि [८४]प्रचुर लीला ॥ २३२ ॥
भजती जैशा यात्रा गंगायमुनाख्यसुसरिदोघांतें ॥
तैशा चि रामकृष्णा गोपी उपमा न दुसरि दोघांतें ॥ २३३ ॥
त्या गोपी हाकुनि ने [८५]धनदानुग शंखचूड हरि त्यातें ॥
मारुनि मणि घे कैसें पचतें प्रभुधन बळें चि हरित्यातें ॥ २३४ ॥
जो वत्स वत्सप गिळी त्या प्रभु दे हरुनियां [८६]अघा सुरसा ॥
ती करु करुणा [८७]करुणावरुणालय मी हि खळ अघासुरसा ॥ २३५ ॥
असुर प्रलंब पृष्ठीं वाहे पळवी तनू धरी भारी ॥
तत्काळ तच्छिरातें शतचूर्ण करूनि मुष्टिनें मारी ॥ २३६ ॥
वधिला धेनुकनामा खररूपी असुर तालवनवासी ॥
धरि तो परि न च दावी ज्या ऐसी उग्रता लव नवासी ॥ २३७ ॥
गिळि उगळी विश्वाच्या मानुनि शिशु निपट वन्हि बक राया ॥
त्यातें चिरितां प्रभुला म्हणति कविप्रवर सिंह बकरा या ॥ २३८ ॥
लीलेनें चि हरि वधी ज्या भीती देवकोटि केशीतें ॥
प्रभुभुजबळें खळ जसा उष्मा प्रबळ हि न तो टिके शीतें ॥ २३९ ॥
करि गर्भपात गर्जुनि वृषभासुर त्या हि हरि [८८]अरिष्टींतें ॥
मारी तारी गोकुळ भुजबळवातें चि हरि [८९]अरिष्टींतें ॥ २४० ॥
त्यां त्यांसी प्रभु मर्दी ज्यांसि म्हणे कंस कुवल या पीडा ॥
रंगद्वारीं मारी तद्दंतें त्या हि [९०]कुवलयापीडा ॥ २४१ ॥
मर्दी स्ववधोद्यत जे ते चाणूरादि सर्व मल्ल हरि ॥
प्रभुकीर्तिपुढें धरुत क्षीराब्धि म्हणे न गुर्व मल्लहरी ॥ २४२ ॥
केश धरुनि पाडुनि वरि पडुनि वधी देव [९१]भोजराजाला ॥
सद्द्वेष्टा विपराक्रममति किंवा पुरुष तो जरा जाला ॥ २४३ ॥
प्रभु [९२]मुचुकुंदासि यशा जाय करायासि आलय [९३]वनांतें ॥

---

८३ गीतें=गाण्यानें. ८४ प्रचुर=पुष्कळ. ८५ धनदानुग=कुबेरसेवक. ८६ अघ=पातक. ८७. करुणावरुणालय=दयासागर. ८८ अरिष्ट=राक्षस विशेष. ८९ अरिष्ट=संकट. ९० कुवलयापीड=कंसाचा हत्ती. ९१ भोजराज=कंस. ९२ मुचुकुंद=रत्नागिरी जिल्ह्यांत सह्याद्रीच्या पायथ्या जवळच्या साखरपें या गांवाशेजारीं सह्याद्रि पर्वतांत मुचुकुंदाची गुहा म्हणून एक स्थान आहे. तेथून दोन नद्या उत्पन्न होतात. एक साखरपें गांवावरून येते तिचें नांव कालयवनी. दुसरी पलीकडचे बाजूनें जाते व राजापूरची खाडी या नांवानें समुद्राजवळ प्रसिद्धीस येते तिचें नांव मुचुकुंदी. यावरून मुचकुंदानें कालयवनाचा नाश साखरप्याजवळचे गुहेंत केला असावा असें वाटतें. तथापि 'भाऊसाहेबांची बखर' पृ० १३–१४ पहा. ९३. वन=अरण्य, उदक.

तद्दृष्टिवज्रपातें करि भगवान् भस्म कालयवनातें ॥ २४४ ॥
भी ना मर्मी शार्ङ्गच्युत खरशरसर्प मुर डसवि त्यातें ॥
त्या नरका हि वधि म्हणे जो तेजोराशि मुरड[14] सवित्यातें ॥ २४५ ॥
जो वासुदेव म्हणवी पौंड्रक जड कां न तो तयाला हे ॥
दे मुक्ति जी सरूपा साच्याची[15] सुगति तोतयाला[16] हे ॥ २४६ ॥
शाल्व वधूनि समुद्रीं प्रभु बुडवि तदीय यान[17] सौभें[18] रितें ॥
प्रभुला सत्कीर्ति वरिति नृपकन्या भुलुनि जेंवि सौभरितें[19] ॥ २४७ ॥
वधिला द्विविद महाबळ कपि जो सिंधूंत शिरुनि जल उडवी ॥
बुडवी देश शिलांहीं ग्राम जसे पद्म गज पदें बुडवी ॥ २४८ ॥
नैमिषजन बहु सुखवी विश्वाचा वधुनि बल्वलास विता[100] ॥
निर्जीवन करि अहिता स्वकरांहीं[1] जेंवि पल्वला[2] सविता ॥ २४९ ॥
शिशुपाळदंतवक्र प्रभुनें वारुनि कुमारशापातें ॥
स्वद्वारप उद्धरिले हें यश हरितें अशेष पापातें ॥ २५० ॥
दमिले यमिलेखर्षभ[3] गीतें श्रीशें प्रमत्त वृष सप्त ॥
तप्त प्रणत निववले गौतममुनिदार[4] जेंवि पतिशप्त ॥ २५१ ॥
गाती शुकादि सादर वधिला विभुनें विदूरथ कवी तें ॥
प्रभुयश चि बहु सुखवितें वाहवुनि इतर विदूर थकवीतें ॥ २५२ ॥
रुक्मी विटंबिला तरि करि कपटद्यूत कोण मदवधिला[5] ॥
पावेल म्हणे प्रभुनें तो लीनें चि हरुनि मद वधिला ॥ २५३ ॥
पुण्यकुरुक्षेत्रीं कुरु सृंजय कांबोज मत्स्य कैकेयां ॥
वधुनि सुगति दे भगवान् त्या ही जो काय गाय ऐके यां ॥ २५४ ॥
बळभद्र भीम अर्जुन या रूपें ईश्वरें रणीं मथिले ॥
नेले वैकुंठातें धन्य म्हणुनि हे शुकादिकीं कथिले ॥ २५५ ॥
वाजवुनि वेणु जेव्हां यमुनापुलिनीं करी अनघ रास ॥
गोपींचें देवींचें न उमेचें ही स्मरे मन घरास ॥ २५६ ॥
मार्जारा न शुकानीं[6] भ्यावें नकुळांस[7] ही न उरगानीं ॥
खग मृग न चराति किति हे भुलति प्रभुच्या शिवादिसुर गानीं ॥२५७॥

---

१४ मुरड=परत फीर. १५ साच्याची=खऱ्याची. १६ तोतया=खोटा. १७ यान=वाहन. १८ सौभ=शाल्वाच्या यानाचें नांव. १९ सौभरि=ऋषिविशेष. ( ह्याला राजकन्यानीं वरिल्याची कथा विष्णु पुराणांत आहे ). १००. विता=प्रसवणारा. १ कर=किरण. २ पल्वल=डबकें. ३ लेखर्षभ=देवश्रेष्ठ. ४ गौतममुनिदार=अहल्या. ५. मदवधि=माझा अंत केला. ६ शुक=पोपट. ७ नकुल=मुंगुस.

प्रभुवेणुरवश्रवणीं न च चोखिति लाविले पृथुक थानीं ॥
धेनु मधुरतानांनीं भुलल्या कविमति जशा पृथुकथांनीं ॥ २५८ ॥
न नदी वाहे हें किति मानवती जी न मान वाहे ती ॥
शिवतां चि मना मोही गीति जशी जीन मानवा हेती[11] ॥ २५९ ॥
चुंबक लोहासि तसा वेणुरवें जनमनासि आकर्षी ॥
इतरांची काय कथा प्रभुगानें चित्र होय नाकर्षी ॥ २६० ॥
प्रकटी जग मोहाया भगवदभिव्यक्तिमोहरी तीतें ॥
जाणेल काय मोहन अन्या जी शक्ति मोहरीतीतें ॥ २६१ ॥
निववि यश जनासि तसें अमृत न शतमखमुखां सुरां पानें ॥
जें अनुमोदुनि गाउनि पावावें बहु सुखां सुरापानें ॥ २६२ ॥
त्रिभुवनमंगलचरितें श्यामब्रम्ह स्वकौतुकें करितें ॥
परि तें नतभव हरितें न रितें भाजन भजेल जें सरितें ॥ २६३ ॥
प्रभु वदला स्वयशोमृत पिउनि निवुनि हो चि धन्य ये रसिका ॥
आपण सिकोनि म्हणती अन्यासि पदार्थ अन्य येर शिका ॥ २६४ ॥
उद्धरि हरि च नृगातें अघ करि जरि तिळसमान सरडा या ॥
हें परिसुनि न जडाचें कर्मी धरि चिळस मानस रडाया ॥ २६५ ॥
मिथिलेशाच्या तेंवि श्रुतदेवाच्या हि जाय गेहास ॥
वर्णिसि हरिस न रसने काळिला येइल न काय गे हास ॥ २६६ ॥
रुचले चि सुदामपृथुक बहुत चि तें शाकपत्र अवशिष्ट ॥
प्रभुसि पशुपशिशु कवळें हि देति जसे भाग करूनि सर्व शिष्ट ॥ २६७ ॥
सिद्धांगरांग जेव्हां आम्हां बंधूंसि देव दे वाहे ॥
बहु दासी कुब्जा ही आवडती होय देवदेवा हे ॥ २६८ ॥
ध्यावा गावा भावें हा श्रीकृष्णावतार सुखहेतु ॥
रसिकां एकाविसावा एक विसावा भवांबुनिधिसेतु ॥ २६९ ॥

इति श्रीकृष्णावतारचरितं ॥

## २२ वा अवतार.

उपरिचरवसुनृपाच्या वीर्ये मीनोदरोद्भवा कन्या ॥
सत्यवती नाम जिचें दाशवरें पोषिली सती धन्या ॥ २७० ॥

---

८ उरग=साप. ९ मानवती=स्त्री. १० मान=गर्व. ११ हेती=खड्ग. १२ नाकर्षी=नारद. १३ शतमख=इंद्र. १४ सुराप=मद्यपी. १५ भाजन=पात्र. १६ सरिता=नदी. १७ हास=हास्य. १८ पृथुक=पोहे. १९ कवळ=घांस. २० सव=यज्ञ. २१ अंगराग=उटी. २२ दाश=कोळी, धीवर.

ती मीनें[23] गंध वारुनि निर्मुनि योजनसुगंध तनु उचिता ॥
सुवरें निजांगसंगा देउनि केली पराशरें शुचिता ॥ २७१ ॥
प्रसवे श्रीसत्यवती यमुनाद्वीपांत आशु भव्यास ॥
वेद विभाग करी प्रभु हो यास्तव नाम या शुभ व्यास ॥ २७२ ॥
भव्य महाभारत हा रचिला इतिहास पांचवा वेद ॥
याच्या श्रवणें न उरे अज्ञान तदुत्थ सर्व ही खेद ॥ २७३ ॥
करुणाब्धि बेविसावा हा श्रीव्यासावतार शुकतात ॥
सुकतात शोकसागर यातें गातां अनर्थ चुकतात ॥ २७४ ॥

इति श्रीव्यासावतारचरितं

## २३ वा अवतार.

असुर श्रुतिच्या मार्गीं सुदृढा निष्ठा सदैव ही धरिती ॥
सुतपोनुष्ठानें ते निजविजयप्राप्तिकारणें करिती ॥ २७५ ॥
कामगमा[24] त्रिपुरांपरि सुपुरी निर्मूनि दे तयांस मयें[25] ॥
न दिसे वेग तयांच्या आगमनाचा कळे चि ना समय ॥ २७६ ॥
श्रुतिपथबळें पुरीच्या साहित्यें ही जगासि बुडवीती ॥
ते लोकपाळिकांचें[26] धैर्य जसें तृण समीर[27] उडवीती ॥ २७७ ॥
प्रभु होय वेदनिष्ठा त्यांची उडवावया स्वयें बुद्ध ॥
शुद्धश्रुतिपथ दूषी बुडवी असुरांसि न करितां युद्ध ॥ २७८ ॥
पाखंडवेष करि उपदेशी पाखंड धर्म उक्तींनीं ॥
बहू मोह लोभ त्यांच्या घाली बुद्धींत बुद्ध युक्तींनीं ॥ २७९ ॥
त्या देवद्वेष्ट्यांच्या मोहें लोभें हि मति अति भ्रमल्या ॥
श्रुतिदूषणोक्ति नानापरिच्या हरिच्या तयां हिता गमल्या ॥ २८० ॥
श्रुतिपथनिष्ठा त्यागुनि मानुनि पाखंडधर्म असुर हित ॥
झाले निःश्रीक[28] सकळ शक्रें केलें रणांत असुरहित[29] ॥ २८१ ॥
कीकटदेशीं प्रकटुनि सुरशत्रुसमूह युक्तिनें मथिला ॥
प्रख्यात तेविसावा ऐसा बुद्धावतार हा कथिला ॥ २८२ ॥

इति श्रीबुद्धावतारचरितं ॥

## २४ वा अवतार.

होतिल पाखंडी द्विज सर्व भ्रमतील जेधवां कलिनें ॥

---

२३ मीन=मासा. २४ कामगम=हवी तिकडे जाणारी. २५ मय=असुर विशेष. २६ लोकपाळ=दिक्पाळ. २७ समीर=वायु. २८ निःश्रीक=निर्धन. २९ असु=प्राण.

मालिनें कर्में रुचतिल जेंवि अलिकुलासि विकसितें नलिनें[30] ॥ २८३ ॥
सर्वस्व हरुनि राजे शूद्र श्रमद प्रजांसि होतील ॥
घटजें[31] जसा जळनिधि जळ खळजन परधन मुखांत ओतील ॥ २८४ ॥
संताच्या ही सदनीं कृष्णकथा पावतील लोपातें ॥
कीं अपराधावांचुनि खल करितिल विघ्न धरुनि कोपातें ॥ २८५ ॥
जेव्हां न च करिजेल श्रवण स्वाहा स्वधा वषट् कानें ॥
राहो दिजेल लेश हि शत्रूंच्या साधुगुण न षट्कानें[32] ॥ २८६ ॥
तेव्हां कलिशास्ता प्रभुवर्य अवतरेल शंभलग्रामीं ॥
जो नामें विष्णुयशा ब्राम्हणसत्तम तयाचिया धामीं ॥ २८७ ॥
ज्या पावाया सम्राट् सर्वस्व त्यजुनि जाहले वल्की ॥
होइल युगावसानीं द्विजसुत नामें करुनि तो कल्की ॥ २८८ ॥
वधिल खळांतें पुनरपि कृतयुगधर्मप्रवृत्ति करिल हरी ॥
अमृतनिधिच्या कराया शकती प्रभुकीर्तिची न सरि लहरी ॥ २८९ ॥
गातांचि चोविसावा हा कल्क्यवतार पाप हरपावें ॥
या विष्णुयशें जैसे ऐसें अमृतें न तापहर पावे ॥ २९० ॥
इति श्रीकल्क्यवतारचरितं ॥

---

## उपसंहार.

भक्तहितजगन्नाथप्रेरित रामात्मजें असे भावें ॥
अवतार चतुर्विंशति लिहिले श्रीविष्णुयश सदां गावें ॥ २९१ ॥
जो प्रेरिल प्रेमें गाया श्रीविष्णुच्या चरित्रास ॥
साक्षात् तो श्रीराम चि संसृतिचा वारिता परित्रास ॥ २९२ ॥
सुकवि मन न सोडी हरियश जैसें तोकें[33] थान यागा[34] या ॥
बहुत चि अंतर विसरे जो सुरसिकें तो कथा न या गाया ॥ २९३ ॥
रसनें[35] श्रीकृष्णकथा गाया जरि मुक्त तरि हि शुक लागे ॥
ऐसें न करी जो तो जन सुज्ञ असोनि काय चुकला गे ॥ २९४ ॥
हरिचरिताच्या पानें गानें भवपाश सुदृढ ही उकले ॥
मुकले सुखासि ऐसें जे न करितीं पटु हि फार ते चुकले ॥ २९५ ॥
भगवान्नारद गातो हरिहरयश वाजवुनि वीणा रे ॥
चित्ता ज्यातें नमिती सत्कातिरामायणादि वीणारे[36] ॥ २९६ ॥

---

३० नलिन=कमळ. ३१ घटज=अगस्त्य. ३२ षट्क=सहांचा समूह. ३३ तोक=बाळक. ३४ याग=यज्ञ. ३५ रसना=जीभ. ३६ वीणारे=उत्पन्न केले.

चित्ता जेणें कामप्रमुखां[३७]हितसहित काळि वदे हा[३८] तें ॥
हरियश चित्तीं लटिकें स्पष्ट स्वप्रेम काळिव देहातें ॥ २९७ ॥
प्राणी कैसा हि असो येणें चि मना सुखें अजीं[३९] मिळतो ॥
नारायण नारायण सुतभावें कीं म्हणे अजामिळ तो ॥ २९८ ॥
भागवत म्हणे गातो जो हरियश सर्व साधु मानव तो ॥
कोणी हो भगवद्गुणगात्यातें सर्व साधु मानवंतो[४०] ॥ २९९ ॥
सर्व रसिक कर जोडी थोडी अन्यत्र यांत बहु गोडी ॥
जातात सर्व खोडी सोडी अघ चित्रगुप्तलिपि खोडी ॥ ३०० ॥
प्रभु अर्जुनासि सांगे संसारीं न च बुडेल मद्याजी[४१] ॥
जनता[४२] तरे हरियशें मळली असकृत्[४३] पिऊनि मद्या जी ॥ ३०१ ॥
तरली द्वेषें ही कीं जी अघबककेशिकंसखलजनता[४४] ॥
रे चित्ता मग दुर्गति कैची श्रीकृष्णपादजलजनता[४५] ॥ ३०२ ॥
ताप सरे पाप हरे ऐक अरे सदुपदेश सर्व खरे ॥
म्हण राम कृष्ण शंकर गोविंद मुकुंद देवदेव हरे ॥ ३०३ ॥
राम हरे राम हरे राम हरे राम राम राम हरे ॥
चित्ता जपशि असें तरि अत्यद्भुत हर्षहेतु हा मह[४६] रे ॥ ३०४ ॥
कृष्ण हरे कृष्ण हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे ॥
म्हण ऐसें निःस्पृह जो तो चि तरे सर्व ज्यांत तृष्ण हरे ॥ ३०५ ॥
शिव शंकर मृड भव हर शशिशेखर नीलकंठ मदनारे[४७] ॥
आहे रसना स्वस्था वद हे नामावळी च वदनारे ॥ ३०६ ॥
नरकाजिद[४८]वतारांची माला कंठीं च नित्य पाळावी ॥
हे जैसी तैसी प्रिय चिंतामणि निर्मिता न माळा वी[४९] ॥ ३०७ ॥
कविपिक[५०]निकरें[५१] प्रियकर हरिचे अवतार आम्रतरु फळले ॥
भक्तमयूर सुखप्रद किंवा पीयूष[५२]मेघ हे वळले ॥ ३०८ ॥
भगवदवतारमाळा हे भगवंतासि अर्पिली भावें ॥
बहु या महाप्रसादीं सादर भगवज्जनें सदा व्हावें ॥ ३०९ ॥
भगवद्यशोमृतार्णवलहरी अष्टोत्तर[५३] त्रिशत आर्या ॥

---

३७ अहित=शत्रु. ३८ हा=हायहाय. ३९ अज=परमेश्वर. ४० मानवतो=पसंत पडतो. ४१ मद्याजी=माझें पूजन करणारा. ४२ जनता=जनसमूह. ४३ असकृत्=वारंवार, अनेकदा. ४४ जलज=कमल. ४५ नत=नम्र. ४६ मह=आनंद. ४७ मदनारि=शिव. ४८ नरकजित=नरकास जिंकणारी. ४९ वी=हे माळा जैशी प्रिय वी ( प्रसवे ) तैशी चिंतामणि निर्मिता माळा न प्रिय वी. ५० पिक=कोकिल ५१ निकर=समूह. ५२ पीयूष=अमृत. ५३ अष्टोत्तर त्रिशत=तीनशें आठ.

या हरिजनप्रिया प्रभुलीला जैशा शुका हि कृतकार्या[५४] ॥ २१० ॥
इति श्रीमयूरपंडितविरचिता श्रीभगवदवतारमाला संपूर्णा ॥

## श्रीगंगास्तवः

### ॥ श्लोक ॥

तुझे जे **श्रीगंगे** जरि दिसति सामान्य तरि ते ॥
रिते कल्पांतीं ही न पडति मुखीं नामधरिते ॥
कवींचे प्रेमानें स्तवन करितां दाटति गळे ॥
गळे ज्यांचे तोयीं तव शव **महादेव** सगळे ॥ १ ॥
न कंठीं घालाया यम चुकुनि ही पाश उकली ॥
कली स्पर्शेना त्या कुगति तरि याची च चुकली ॥
पडे ज्यांचे नीरीं तव भसित देसी सुपद या ॥
दयाळे पावे त्या सुकृति हृदयीं बोध उदया ॥ २ ॥
त्वदंभोबिंदूंसी नुरवि करितां वाद पगडी ॥
रस स्वर्गींचा या समुचित कसा पादप गडी ॥
तुवां मोक्ष प्राण्यां सहज घडतां सेवन दिला ॥
भजे **श्रीशाला** जें सुयश तुज तें **देव**नदिला ॥ ३ ॥
पराधा ही प्राणी द्युनदि[१] घडतां मज्जन हरी ॥
तयातें **श्रीशंभु** प्रभु चि न म्हणे मज्जन हरि ॥
करीत प्रेमानें श्रवण मम पाथोरव[२] रहा ॥
असे **गंगे** माते म्हणसि जरि तूं थोर वर हा ॥ ४ ॥
तुझा जो संसारीं अजित चि जसा तो सुत रणीं ॥
दृढा तूं **श्रीगंगे** सति भवसमुद्रीं सुतरणी[३] ॥
तुवां केले प्राणी **हरिहर** असें आइकवितें ॥
न माझ्या चित्ता वेडें करितिल कसे आइ कवि ते ॥ ५ ॥
सम **श्रीशाचा** कीं तव सुमहिमा यासि कलिनें ॥
न मार्गे सारावें अति शुचिस अत्यंतमलिनें ॥
जयीं व्हावा विप्रा सुरनदि असो नारदमुनी ॥
जगीं मिथ्याभाषी भगवति नसो **नारद**मुनी ॥ ६ ॥
वदे ज्ञाता मुक्त त्वरित तुज गंगा करिल गा ॥

---

५४ कृतकार्य=धन्य.

१ द्युनदि=स्वर्ग-नदी. २ पाथोरव=उदकध्वनी. ३ तरणी=नौका.

मला नाहीं संताहुनि इतर या भूवरि लगा ॥
तुला आलों आहें जननि कर जोडूनि शरण ॥
स्वतीरीं त्वां द्यावें द्रवुनि मज काशींत मरण ॥ ७ ॥
महोदारे गंगे अगणित महा दोष हरिला ॥
दिला दीनोद्धारें बहुत चि तुवां तोष हरिला ॥
न कोणी ही पापी जन म्हणुनि जागा ढकलिला ॥
सदां बाधे त्रास भ्रमकर तुझा गाढ कलिला ॥ ८ ॥
गळावा त्वत्तीरीं भगवति न हा देह सदनीं ॥
पडो गंगे तूझें मरणसमयीं तोय वदनीं ॥
विवेकीं येवें जें धवलपण हेरंबरदनीं ॥
भवीं हो त्वन्नेत्र प्रभुनयन तें जेंवि मदनीं ॥ ९ ॥
पहातां दीनातें सकरुण खरा तो कळकळे ॥
द्रवेना तत्प्रेमा भगवति मना पोकळ कळे ॥
तव स्नेहा नाहीं जननि उपमा तापलि कडे ॥
मुला घे जी साची ढकलि उपमाता पलिकडे ॥ १० ॥
समर्था तूं चित्तीं भवभय धरूं कां पतित मीं ॥
रवीच्या पार्श्वींचे न पडुनि कधीं कांपति तमीं ॥
जगन्माते गंगे अभयवर तो दे वसविता ॥
त्वदंकीं हृत्पद्मा प्रति सुखद तो देव सविता ॥ ११ ॥
जगन्माते गंगे प्रवर वर दे पाव नत मी ॥
निवासार्थी आहें चिर तव तटीं पावनतमीं ॥
न देणें भारी हें वर बहुत देतीस चि वसे ॥
बक व्याळ व्याघ्र प्रिय करुनि घेती सचिवसे ॥ १२ ॥
सदा ही संसारीं विषयरत जो मानव ढिला ॥
तया देशीं द्यावा बहुत चि जसा मान वढिला ॥
असें केलें गंगे चिर हरिपणें कीं हरपणें ॥
विराजावें जीवें कृपणपण जेणें हरपणें ॥ १३ ॥
सदां देऊं गंगे सदमृत तुझें शुद्धरुचि तें ॥
नुपेक्षू पापी मीं जरि तरि मला उद्धरु चि तें ॥
नको चि स्वर्गीचें सुगुरुवचनें जा सपकसें ॥
कळे तो त्यासाठीं करिल गुणवेत्ता तप कसें ॥ १४ ॥

---

१ हेरंबरदन=गणपतिदंत. ५ पावनतम= अतिपवित्र.

न कंटाळावें त्वां **सुरतटिनि** हें होय रुचिर ॥
स्वयें दीनोद्धारव्रत वरुनि पाळूनि सुचिर ॥
जिते **श्रीवाल्मिकि** प्रमुख कवि गाती तिस तरी ॥
स्तवूं कीं तूं मातें खळभवनदीं होतिस तरी ॥ १५ ॥
तुवां मत्पत्राला जननि दिधला मान कळलें ॥
तुझें कारुण्यार्द्रे मन मजकडे स्पष्ट वळलें ॥
सुखें येणें झालें सकळ हि पथीं विघ्न टळलें ॥
प्रसूं प्रक्षाळील त्वरित न कसी बाळ मळलें ॥ १६ ॥
करी **सुग्रीवार्थ** प्रभुवर जसा **वालिशमना** ॥
तसें दे आधीतें मथुनि सुख या बालिश मना ॥
तुझ्या पायां झाला **द्युनदि** जरि हा पाप नत गे ॥
समर्थातें जातां शरण पळ ही ताप न तगे ॥ १७ ॥
न थोरांहीं कोणीं स्वपदनत मोहा निरविला ॥
सदां योग्या होय द्युनदि म तमोहानि रविला ॥
सुखें न्हाल्या प्याल्यावरि हि तुझिया भव्य सलिलीं ॥
जनें भ्यावें **विष्णुप्रभुपदसुते** काय कलिला ॥ १८ ॥
सुखी केलें **रामें** मुनि सम चि **भागीरथि** कपी ॥
यशा या जो तो ही तव अमृत जैसें पथिक पी ॥
तुझी ही **श्रीगंगे** नुरवि जनमोहा हि महिमा ॥
सुकीर्ति ज्ञात्यांला ह्मणवि च नमो हा हि महिमा ॥ १९ ॥
यदुत्पन्ना तूं त्या न च कृपणवाणी परिसवे ॥
सवेग **श्रीभर्ता** सुखवि करि पायापरि सवे ॥
तशीच **श्रीगंगे** प्रकृति तव कीं नित्य रसदा ॥
सदां देवर्षीच्या निवविसि यशें शोभसि सदा ॥ २० ॥
नको दुग्धाब्धीचें जरि महित आहे सुतट तें ॥
तुझें दे याणें चि द्रुत उर अरींचें उतटतें ॥
तया स्वीकारीना त्यजुनि बरवें हा जवळिल ॥
स्वयें या बाळाच्या **विधि** हि न मना आजवळिल ॥ २१ ॥
न यावा **श्रीगंगे** तव सुवदना बोलचि पहा ॥
रहाया त्वत्तीरीं जन सकळ ही लोल चि पहा ॥
म्हणावें त्वां क्षिप्र त्यजुनि धरिला आळस मज ॥

---

६ प्रसू=आई. ७ सलिल=पाणी. ८ सद=सभा.

प्रियें अर्थं घेसी जरि बहु शिशो आळ समज ॥ २२ ॥
तुझ्या तीरीं नीरीं हृदय रमतें दुःख शमतें ॥
यशोगानें पानें कुमत गळतें विघ्न टळतें ॥
कळीं भंगे गंगे षडरि झुरती दोष नुरती ॥
दिली **रामें** नामें तसिच जगतीला निजगती ॥ २३ ॥
द्रवावें त्वां **गंगे** द्रवुनि भगवत्कीर्ति वळली ॥
कृपा केली जी ती बहु म्हणुनि सर्वत्र कळली ॥
म्हणे प्रेमें सेवी प्रमुदित रहा मी नर मला ॥
न कां द्यावें ओघीं तव मकर हा मीन रमला ॥ २४ ॥
यमाच्या दृष्टीतें न हरिहर ही दे वहिवर ॥
तपस्वी देतात स्तवन करितां देव हि वर ॥
न या ठावें जाणें परम पटु जो तो कवि हित ॥
स्वयें माता पाहे किमपि नुमजे तोक विहित ॥ २५ ॥
नसे लोकीं अन्या अगतिगतिधन्या तुजविना ॥
स्वजन्म त्वेंद्रोधीं कवण कृतबोधी उजवि नीं ॥
कृपा **गंगे** तोकीं कर पसरितो कीं पदर हा ॥
**मयूरा** या दीना सकळ बळहीना वद रहा ॥ २६ ॥
अनेक शत पाळिसी अकृप जंतु जे घातकी ॥
समुद्धरिसि **जान्हवि** त्रिपथगे महापातकी ॥
नसे जड **मयूर** हा द्रवुनि यासि दे आसरा ॥
करील सुरभी सुखी जवळ आलिया वासरा ॥ २७ ॥
फिरे **वृक दशास्य** ही द्युनदि ऐकिली मात ती ॥
पयें अहि जसे तसें कुमति ते वरें मातती ॥
शिरीं हि **परमेश्वरें** चढविलीस तूं तो भली ॥
तुला चि ह्मणतो तुझी बहु सुकीर्ति हे शोभली ॥ २८ ॥
**श्रीभागिरथि** शेवटीं निजतटीं दे वास या हा किती
कोणी ही शरणागता सदय जे ज्ञाते न ते हाकिती ॥
माता धांवुनि आलिया स्वनिकट ग्रीष्मातपीं तापल्या
आर्धी कीं कुरवाळिती निववितीं स्नेहें मुला आपल्या ॥ २९ ॥
देवूनि क्षिप्र आर्धी अभयवर भवत्रस्त हें तोक पाळीं
राहेना त्वन्मृदंकीं विधिलिखित असें भोग जो तो कपाळीं ॥

९ रोध=तीर. १० ना=नर. ११ त्रिपथगा=गंगा.

लाजाया भक्तभाळा भगवति तुझिया निष्णुचें भाळ लागे ॥
माते माथांचि वाहे तुज तरिच **महादेव** ही भाळला गे ॥ ३० ॥
मज्जननक्षयदुःख हरो तव भज्जन सज्जनसंमतसंगें ॥
कीं तुझिया चरणस्मरणें कळिकाळ महादुरिताचळ भंगे ॥
कोण असा जन 'यन्मन न त्वदुदार यशींच निरंतर रंगे ॥
दीन मयूर गळां पडला शरणागत हा अभयोचित **गंगे** ॥ ३१ ॥
तारिले त्वां बहु जंतु त्यांचे न गणुनि मंतु तुझ्या स्नाना सप्ततंतु मोठे मोठे लाजती ॥
अंतीं होतां स्मृतिमात्र प्राणी तव दयापात्र **हरिहरतुल्यगात्र** होउनियां साजती ॥
अशीं तुझीं यशें फार त्रिभुवनीं वारंवार **गंगे** माते अत्युदार भावें नित्य गाजती ॥
पाव नता पावनांत ख्याता दया जी मनांत भक्ता **मयूरा** जनांत धन्य करो आन ती ॥ ३२ ॥
सारी महा पाप वारी तमस्ताप हारी तुझें आप सर्वा जना ॥
रंगे यशीं सर्व भंगे द्विषद्गर्व **गंगे** गमे खर्व मेरू मना ॥
माते तुझे पाय दाते तुजे काय या ते नको हाय देती धना ॥
गावें सदां तीर भावें सुखें नीर प्यावें म्हणे धीरगी ते नना ॥ ३३ ॥
आगीं विलोकुनि न रागासि येसि अनुरागा त्यजूनि सदये ॥
यागादि सर्व फळ मागा असें म्हणसि भागासि भव्य पद ये ॥
कागाहि **विष्णुपदिं** जागा मिळे भजक नागा स्वयें चि करिशी ॥
नागास्यसे चि तुजला गाति ते दुरित आगामि तें हि हरिशी ॥ ३४ ॥
भजति पशु हि जे तुतें होति नाकीं सदां **शक्र**से संपदा सेविते इष्टधी देवि ते ॥
**पुरमुरहरमूर्तकीर्ते** प्रसिद्ध तुझ्या कीर्तिसत्रीं सुखें जेविते सृष्टिचे जे विते ॥
**अमरतटिनि** सांग तूंचि स्वयें काय तान्हेलिया द्यावया आसरा वीट या वासरा ॥
भगवति म्हण आपुल्या सद्यशा नित्य लाजावया **शंभुचा** सारराचीट यावा सरा ॥ ३५ ॥
सर्व जीवसृष्टिचे अनंत भव्य संपदे ॥ देवि **जान्हवि** स्वभक्तदुष्कृताद्रिकंपदे ॥
आपुल्या तटीं वसीव हा **मयूर** शेवटीं ॥ ब्राम्हणप्रियार्थ विष्णुबाळसा वसे वटीं ॥ ३६ ॥
नको करूं विचार फार सार कीर्ति आयती ॥ मिळे सुदीन रक्षणें तुला न योग्य काय ती ॥
**अजामिळा**दि रक्षणें यश प्रभूत साधुनी ॥ प्रभु प्रसिद्ध वर्णिला प्रसन्नबुद्धि साधुनि ॥ ३७ ॥

इति**श्रीमयूरपंत**विरचितो**गंगास्तवः** संपूर्णः

१२ भज्जन=स्नान. १३ मंतु=अपराध. १४ आग=अपराध. १५ नागास्य=गजमुख.
१६ आगामि=होणारें. १७ प्रभुत=पुष्कळ.

## श्रीविश्वेश्वरार्तिक्यं.

त्वत्क्षेत्रप्राप्ति जना तुझिया नवसांनीं ॥ तत्व कथिसि जंतूंच्या कानीं अवसानीं ॥ ज्या दहनीं न उरावें पातक[१९]यवसानीं ॥ तव नामें देति फळें मोठीं सवें[२०] सानीं[२१] ॥ जय देव जय देव **श्रीकाशिनाथा** ॥ त्वत्पदपद्मीं सुरमुनिमधुप करिति माथा ॥ धृ० ॥ देती सर्व जनास **श्रीदेवी** भुक्ति ॥ करुणार्णव **विश्वेश्वर** तूं देशी मुक्ति ॥ मुक्ता[२२]ढ्या त्वन्नगरी लाजविती शुक्ति[२३] ॥ हे तुज मात्र रुचो या बाळाची उक्ति ॥ २ ॥ जय देव० ॥ प्रार्यावासि जडांनीं तूं रवि कोकांनीं[२४] ॥ उपदेश तुझा वरिला अगणित लोकांनीं ॥ व्हावें पात्र पित्याच्या वित्ता तोकांनीं ॥ या भक्त **मयूराच्या** सांग चि तो कानीं ॥ ३ ॥ जय० ॥

---

## ॥ अथ श्रीविठ्ठलपदपद्मस्तुतिषट्कं ॥

उपदेशें उद्धरिले किति भक्त किती भुजप्रतापानें ॥
कळिकाळीं विश्व तरो म्हणसी निजपादपद्म रसपानें ॥ १ ॥
पाद तुझे गतिकारण जोडियले त्वां तयावरूनि भले ॥
पायचि जोडूनि तुझे प्रेमळ संसारसंकटीं निभले ॥ २ ॥
श्रीकरलालितकोमलपदकमलें ज्यांत **सुरनदी** उगम ॥
तापोपशमनपटुतर दाविशि शरणागतांसि बहु सुगम ॥ ३ ॥
समपदविलोकनें तूं जनास हें सूचविशि असें वाटे ॥
समपद यांचें देणें लागावें चरण भक्तिच्या वाटे ॥ ४ ॥
श्रीचरणाची जोडी पाहुनियां भक्तजाणते झाले ॥
जोडी हे चि सुखाची जोडुनियां यांसि बहु सुखें धाले ॥ ५ ॥
**पंढरपुरांत** आम्हीं इटेवरी नीट जोडिले पाय ॥
हा अनुकार न केला उपदेशग्रहण रुसलां काय ॥ ६ ॥
॥ इति **श्रीमयूरपंडितकृतं पदपद्मस्तुतिषट्कं** समाप्तं ॥

---

## बालमंत्र रामायण.

**श्रीमान्** दशरथ राजा शतमखसख[१] पुण्यकर्मपथसक्त ॥
ख्यात रविकुळीं जाला हरिहरगुरुगोद्विजातिजनभक्त ॥ १ ॥

---

१८ अवसान=मरण. १९ यवस=गवत. २० सव=यज्ञ. २१ सान=लहान. २२ मुक्त=मोक्ष मिळालेला-पक्षीं मोतीं. २३ शुक्ति=शिंप. २४ कोक=चक्रवाक.

१. शतमखसख=इंद्रमित्र.

रामा बहु होत्या परि पुत्र नसे होय वृद्ध तो साधी ॥
विधिसुतकथितसुमंत्रप्रोक्तोपायें महामखा साधी ॥ २ ॥
मखमुख्यवाजिमेधीं भाग ग्रहणार्थ देव जे आले ॥
ते म्हणति विधे दशमुख आह्मांवरि नित्य घालितो घाले ॥ ३ ॥
जन्यीं अक्षम आम्हीं त्याच्या नाशा उपाय योजावा ॥
अनपत्य दशरथ हि कीं याचा जो काय आधि तो जावा ॥ ४ ॥
यज्ञेशातें ब्रह्मा प्रार्थी सुयशें जगासि ताराया ॥
देवा दशरथसुत हो दुष्टा दशकंधरासि माराया ॥ ५ ॥
रावण नरकपि न गणुनि इतरांपासूनि अभयवर घेची ॥
करिशील हानि युद्धीं होउनि तूं श्रीनिवास नर याची ॥ ६ ॥
मधुमथन अवश्य म्हणे त्यावरि पुत्रेष्टि ऋष्यशृंग करी ॥
तत्तेजें मंत्रबळें नृपभाग्यें होय कर्मसिद्धि बरी ॥ ७ ॥
जलजाचा बंधु तसा शिखिकुंडांतुनि निघे पुरुष भव्य ॥
तो हेमपात्र राया दे पायस ज्यांत अमृतसें नव्य ॥ ८ ॥
यज्वा म्हणे तिघींतें करुनि उचित भाग तें सुपायस खा ॥
सदनुग्रह जेंवि तसा कोण करिल इष्टकरसुपाय सखा ॥ ९ ॥
जगतीपतिच्या भार्या त्या प्राशुनि दिव्य पायसा धाल्या ॥
कौसल्या कैकेयी ससुमित्रा गर्भिणी तिघी जाल्या ॥ १० ॥
यम यक्षप शक्र वरुण पवन दहन रवि असे अमर जे ते ॥
विधिवचनें जनु अंशें वानरयोनींत जाहले घेते ॥ ११ ॥
राक्षसराजवधार्थी प्रभुला जाले सुखें सुर सहाय ॥
कीं नादत तो सेवारूप म्हणविल चि मुखें सुरस हाय ॥ १२ ॥
महिषी कौशल्या ज्या शुभ समयीं प्रसवली तया राम ॥
ऐसें दशरथ ठेवी नाम सविधि जें सुसिद्धिचें धाम ॥ १३ ॥
श्रीसंपन्ना प्रसवे कैकेयी ज्या सुता तया नाम ॥
भरत असें ठेवी सुरतरुपुष्पांचें उणे करी दाम ॥ १४ ॥
राकेशमुखी प्रसवे ज्यांसि सुमित्रा तयां सुता नामें ॥
लक्ष्मण शत्रुघ्न अशीं ठेवी नृप पूर्ण होय तो कामें ॥ १५ ॥

---

२ रामा=स्त्रिया. ३ साधी=दुःखी. ४ विधिसुत=नारद. ५ जन्य=युद्ध. ६ अक्षम=असमर्थ. ७ आधि=मनोव्यथा. ८ याची=मागे. ९ शिखि=अग्नि. १० यक्षप=कुबेर. ११ जनु=जन्म. १२ महिषी=राणी. १३. राकेश=राका + ईश=पूर्णमापति चंद्र.

मखामरातें[14] अर्पी रत्नालंकार हेम गज वाजी ॥
भूप म्हणे बळदास्या द्या करतिल पुत्र हे मग जवाजी ॥ १६ ॥
जन्मापासुनि देती निजमूर्तिसमृद्धि साधुरीतीस ॥
पितरांच्या इतरांच्या प्रीतिस जी कीर्ति माधुरी तीस ॥ १७ ॥
यक्षपसखप्रभावें[15] आचार्ये साधु पढविले चवघे ॥
अवघे सुरगुरु[16] गमती अमृतरसाची च भूप तो चव घे ॥१८ ॥
राशि तपाचा गाधिज[17] भेटे राजा धनाधिपी[18] शिवसा ॥
ज्या मुनिपुढें रवि तसा होय जसा पूर्णचंद्रमा दिवसा ॥ १९ ॥
मन्मख रक्षाया दे राम सलक्ष्मण म्हणे असें ऋषि तें ॥
दुष्कर गणिलें भूपें द्यावें जल आकुलें कसें तृषितें ॥ २० ॥
जगतीश्वरासि न रुचे रुचलें सुतदान तत्प्रभावज्ञा ॥
रघुकुलहिता वसिष्ठा कीं न हिता होय सत्प्रभावज्ञा[19] ॥ २१ ॥
यजमाना बोधुनि तो विप्राच्या तनय देववी राजा ॥
कीं त्या अयश नसावें म्हणती उचितज्ञ देव वीरा ज्या ॥ ॥
जय दे अस्त्रें शत दे मुनि मग मारुनि ताटिका चंडी ॥
सिद्धाश्रमांत राघव मारीचसुबाहुगर्वशिर खंडी ॥ २३ ॥
यजन समाप्त करुनि गुरुसह जाय प्रभु पुरासि जनकाच्या ॥
मुनिदारोद्धृति[20] रुचवी मतिस उपनिषत्तसीच[21] जन काच्या ॥ २४ ॥
राह पराकांचा[22] तो शिवचाप सलील खंडिला रामें ॥
अनुरूपा श्रीसीता वरिली जैसी रति प्रिया कामें[23] ॥ २५ ॥
महितगुण[24] लक्ष्मण वरी जनकाची उर्मिळाभिधा कन्या ॥
भरतासि मांडवी श्रुतकीर्ति रिपुघ्नासि पाणि दे धन्या ॥ २६ ॥
श्रीदसमान सभाग्य क्षितिपति दशरथ मयूरसा हर्षे ॥
जनक महाराजमणी स्वर्णप्रेमाश्रु मेघसा वर्षे ॥ २७ ॥
राहुनि विवाह करवुनि सर्वांस पुसूनि गाधिसुत गेला ॥
त्यावरि महा अनुग्रह आग्रह करुनी स्वयें असा केला ॥ २८ ॥
मनुजेश्वर दशरथ मग जनकास पुसोनि दारसुतसहित ॥
मिथिलापुरीहुनि निघे जो या विश्वांत शक्रसा महित ॥ २९ ॥

---

१४ मखामर=भूदेव=ब्राम्हण. १५ यक्षप=कुबेर. १६ सुरगुरु=बृहस्पति. १७ गाधिज=विश्वामित्र. १८ धनाधिप=कुबेर. १९ सत्प्रभावज्ञा=सज्जनांचे प्रभेचा अपमान. २० मुनिदारोद्धृति=अहल्योद्धार. २१. उपनिषत्=हा शब्द संस्कृतांत स्त्रीलिंगीं आहे. २२ पराकं=शत्रुरूपी सूर्य २३ काम=मदन. २४ महित=पूज्य.

**ज**गदीश्वरीपितृत्वें बहु मानी सुरसभा जनक राजा ॥
पात्र दशरथा करि त्या नुतिस सुधा सुरस भाजन करा ज्या ॥ ३० ॥
**य**तिमति विरक्त परि तो जनक प्राकृत तसा बरा चि रडे ॥
श्वशुरा सुता निरवितां बहु वाहुनि दुःखगिरिभरा चिरडे ॥ ३१ ॥
**रा**हे पहात पाउनि दूर पथीं निजपुरासि मग परते ॥
तो वेदांती मानसका[25]सारीं जेंवि हंसखग परते ॥ ३२ ॥
**म**द[26]नारिधनुर्भंगें कोपे भृगुराम काळसा वाटे ॥
फाटे दशरथहृदय त्रा[27]सें जें जळ मुखस्थ तें आटे ॥ ३३ ॥
**ज**मदग्निसु[28]त धरुनि पथ उग्राचा शिष्य उग्रमति राहे ॥
पूजाया दशरथ कुळगुरुसह ये जवळ जरि परि न पाहे ॥ ३४ ॥
**य**[29]वस क्षत्रियकुळशत यत्परशुदवानळ तया रामा ॥
नमुनि श्रीराम पुढें ठाके सांगूनि आपुल्या नामा ॥ ३५ ॥
**ज**रि मृदुलप्रकृति प्रभु तरि दावी राम उद्धतत्वातें ॥
त्या विभु कळवी चढउनि नारायणचाप शुद्ध तत्वातें ॥ ३६ ॥
**य**[30]तकोप प्रभु जोडुनि शर तदनुमतें तदीय धर्मातें ॥
खंडी तयाः अमोघें त्यास हि देता प्रताप श[31]र्मातें ॥ ३७ ॥
**रा**ग न धरुनि वरुनि शम भृगुराम महेंद्रपर्वता गेला ॥
स्वपुरप्रवेश निर्भयमोहें मुदितें नृपोत्तमें केला ॥ ३८ ॥
**म**ग आजा भेटाया शत्रुघ्नयुता प्रियासुता भरता ॥
मातुलसह नृप धाडी ज्याचीं स्तुत्या सुरोत्तमा नरता ॥ ३९ ॥

इति बालकांड ॥

---

**तो श्री** मत्सुडामणि दशरथ नृप यौवराज्य रामातें ॥
द्याया उद्यत जाला रुचलें रघुकुळविभूतिधामातें ॥ ४० ॥
**दा रा** दयिता प्रभुची तीतें दुर्बुद्धि मंथरा शिकवी ॥
विघ्न करी अभिषेका झाला असमर्थ सत्यराशि कवी ॥ ४१ ॥
**स म** यज्ञा कैकेयी हित समजुनि मंथरामतिस लागे ॥
वन रामा राज्य सुता दोन असे पूर्वदत्त वर मागे ॥ ४२ ॥
**नि ज** सत्यरक्षणपरें भूपें बहु विनविली परि खवळली
स्ववशा हि न ती पतिला कैकेयी द्यावया [32]हेरिख वळली ॥ ४३ ॥

---

२५ कासार=सरोवर. २६ मदनारि=शिव. २७ त्रास=भय. २८ जमदग्निसुत=परशुराम. २९ यवस=गवत. ३० यतकोप=दमन केलें आहे रागाचें ज्यानें. ३१. शर्म=सुख. ३२ हरिख=हर्ष.

सु य शोरत राम शिरीं घेता जाला तशी तदाज्ञा ते ॥  
धन गुरुसुतादिविप्रांप्रति वांटी म्हणति हा तदा ज्ञाते ॥ ४४ ॥  
वा रा या न शके मग बंधुस सीतेस उचित मानुनि घे ॥  
स्वगुरुजनासि पुसाया हर्षे रविवंशपद्मभानु निघे ॥ ४५ ॥  
स म जावुनि मातेसह सुमति सुमित्रेस अनघ रागेला ॥  
नमना कैकेयीच्या तो भक्तमयूरघन घरा गेला ॥ ४६ ॥  
नि ज जनका राम म्हणे दे आज्ञा पाय वंदितों बा हे ॥  
राहे लक्ष्मण न पुरीं सिद्धा सीता हि जाहली आहे ॥ ४७ ॥  
भ य सोडुनि कैकेयी निर्दयहृदया करी महा नाच ॥  
ती श्रीरामासि म्हणे चवदा वर्षे वनीं रहा जा च ॥ ४८ ॥  
द्वि ज वन्यवृत्ति जैसा चवदा वर्षे तसा चि हो राजा ॥  
सत्यव्रत तूं जाशिल मग जेविल आजि भव्य होरा जा ॥ ४९ ॥  
प य देणारी विष दे नेसाया वल्कलें पुढें ठेवी ॥  
लोभें भ्रमली बहुतचि अतिकठिणा राक्षशी च ती देवी ॥ ५० ॥  
ये रा ग गुरु म्हणे तें टाक चिं वल्कल न तूं मुळीं नेस ॥  
मत्सुवचन ईस नसो मान्य असावें चि तुज कुलीनेस ॥ ५१ ॥  
न म नीं तात रडविला कैकेयीहून अन्य ज्या माता ॥  
क्षिप्र[34] निघे जनकाचा स्वकुळ करायासि धन्य जामाता ॥ ५२ ॥  
ने श्री रामासि रथीं राजाज्ञेनें सुमंत्र वाहून ॥  
आबाळ पौर रडले वल्कलधरसानुजासि पाहून ॥ ५३ ॥  
पौ रा नुराग भारी निजल्या ठायीं तयांसि सोडून ॥  
त्यांतुनि हळु च निघे प्रभु वंचित[35]भक्तासि हात जोडून ॥ ५४ ॥  
अ म रनदीच्या तीरीं प्रभुसि सखा गुह निषादवर विनवी ॥  
राम म्हणे तातप्रिय तर्पी [ फल ] तृप्ति यांत बरवि नवी ॥ ५५ ॥  
भ ज जा प्रभुसि च ऐसें म्हणुनि सुमंत्रासि पाठवी मागें ॥  
उतरी गुह गंगेतें प्रभु त्यासि म्हणे रहा पथीं नागे ॥ ५६ ॥  
जा य भरद्वाजातें वंदुनि तत्कथितवनपथें तरुनी ॥  
यमुनेसि चित्रकूटा मुनिसह वाल्मीकितें नमन करुनी ॥ ५७ ॥  
आ[36] रा मीं तेंवि वसे लक्ष्मणरचितोटजीं[37] सदार सदा ॥  
होय मुनिसभा रामा जैशी ते कीर्ति कवि सदा रसदा ॥ ५८ ॥

---

३३ होरा=मुहूर्त. ३४ क्षिप्र=सत्वर. ३५ वंचित=फसविलेला. ३६ आराम=बाग. ३७ उटज=पर्णशाला.

**स म** जुनि गुहपरुष[३८]ोक्त प्रभुवृत्त सुमंत्र फिरुनि ये नगरीं ॥
पिहित[३९]मुख शिर दुःसह ताप जसा नृपगृहीं तसा न गरीं[४०] ॥ ५९ ॥
**अ ज** सुत[४१] कौसल्येतें शाप कथुनि रात्रिमाजि तो साङ्या ॥
व्यसु[४२] होय पुत्रशोकें त्या गतिला शत विपत्ति सोसाङ्या ॥ ६० ॥
**ल य** होतां प्रभुचा ज्या आप्तिदशा त्या कदापि न वदाव्या ॥
आला भरत स्मरत प्रभुतें दिवशीं परासि चवदाव्या ॥ ६१ ॥
**तो ज** ननीतें निंदी कौसल्येतें स्तवी पदें नमुनी ॥
पितृहित करी न महि घे घे हें न पुन्हा म्हणे वदे न मुनी ॥६२॥
**न य** धर्मज्ञ भरत तो गुरुजननीसचिवपौरजनयुक्त ॥
जाय विभुकडे त्या अतिपापापासूनि व्हावया मुक्त ॥ ६३ ॥
**मा रा** या जातो हें मानुनि धरि गुह निषाद वाटेतें ॥
काय वदावें भरता त्या स्वापयशें विषाद वाटे तें ॥ ६४ ॥
**सा म** गुहाशीं करि मग सेना ने तो कवि प्रयागा ती ॥
समजे मुनि हि भरत अतिशुचि सोडुनि शोक विप्र या गाती ॥६५॥
**स्व श्री** स भरद्वाज प्रगटी रामानुजा सपरिवारा ॥
पूजी न अहंकृतिचा लागो दे मानसास परि वारा ॥ ६६ ॥
**सा रा** जो विश्वाचा थारा नेता भवाब्धिच्या पारा ॥
त्या भरत चित्रकूटीं भेटे रामा क्षमादयागारा ॥ ६७ ॥
**तो म** रण दशरथाचें ऐकुनि सानुज सदार हा तात ॥
ऐसें म्हणे दयाश्रित सानंद भवीं सदा रहातात ॥ ६८ ॥
**नि ज** शोकें व्यसु जाला जनक म्हणुनि फार पावला शोक ॥
तो करि पिंडजलांजलिदानादिक करिति जे सदा लोक ॥ ६९ ॥
**द य** मानमानसा त्या प्रभुसि म्हणे पाय धरुनि तो भरत ॥
परत स्वपुरा ये बा या च पदीं मी पदीं दुजा न रत ॥ ७० ॥
**त्या रा** जीवाक्ष म्हणे हा धर्म नव्हे लहान चवदावें ॥
सरतां चि वर्षे येइन वत्सा त्वां म्यां हि हा न च वदावें ॥ ७१ ॥
**श्र म** राज्यभरोद्वहनें श्रीगुरु ससचिव असे परि सहाय ॥
बा लाविशिल म्हणाया कामप्रमुखांहि तूं अरिस हाय ॥ ७२ ॥
**द्वि ज** रावणनिधनार्थी ज्ञाते तेथील ते हि भरतातें ॥
म्हणति वहावा चि दिला दुर्वह हि चतुर्दशाब्द भर तातें ॥ ७३ ॥

---

३८ परुष=कठिण. ३९ पिहित=आच्छादित. ४० गरीं=विषांत. ४१ अजसुत=दशरथ.
४२ व्यसु=मृत.

प्र **य** तमति म्हणे टळतां अवधी ज्वलनांत काय होमीन ॥
गंगाह्रदविरहातें साहुनि वांचेल काय हो मीन ॥ ७४ ॥
म **ज** ला श्रीचरणाब्जस्पृष्टा दे पादुका तरायास ॥
योगक्षेमसमर्था या हरितिल विरहकातरा[43] यास ॥ ७५ ॥
श्रे **य** प्रियभक्ताचें करि देउनि पादुका दयाजलधी ॥
कैकेयीतें हि नमुनि राम म्हणे न च धरू तुझी मळ धी ॥ ७६ ॥
वा **रा** सार करूनि तो भरत परतऊनि ऐंद्रि[44]काकातें ॥
शिक्षुनि तेथूनि निघे राम कराया प्रहृष्टनाकौ[45]कांतें ॥ ७७ ॥
श **म** धन अत्रि प्रभुतें पूजी त्याची महासती भार्या ॥
सीतेसि अळंकारीं सत्कीर्ति जशी तशी च ती आर्या ॥ ७८ ॥
इत्ययोध्याकांडं ॥

---

## ॥ अथ अरण्यकांडं ॥

भव्य **श्री** राम प्रभु ज्याच्या हृदयीं उदंड कारूण्य ॥
प्रमुदित करी प्रवेशें तापससंकीर्ण दंडकारण्य ॥ ७९ ॥
न वि **रा** धराक्षसास चि हित इतरां सर्व तापसां गमला ॥
जो प्रभु दीनासि म्हणे हरितों निःशेष ताप सांग मला ॥ ८० ॥
पर **म** भयंकर राक्षस सीतेसि धरी हरी तया बाण ॥
प्रभु हाणुनि सोडवि ते क्षिप्र करिति जानकीपरित्राण ॥ ८१ ॥
तो त्या **ज** नकसुतेतें सोडी श्रीरामलक्ष्मणांसि धरी ॥
स्कंधीं शिशुसे वाहे जाय वनीं ती सती विलाप करी ॥ ८२ ॥
सत्प्रि **य** ते दाशरथी चंद्रार्क स्पष्ट तो गमे राहू ॥
खड्गवरांहीं त्यांहीं त्याचे तत्काळ खंडिले बाहू ॥ ८३ ॥
प्रभु **रा** जरा[46]जशापापासुनि त्या तुंबरासि करि मुक्त ॥
शरभंग मुनिस भेटे तो पूजी स्तवुनियां कथी युक्त ॥ ८४ ॥
निर्धू **म** ज्वलनीं तनु होमुनि मुनि दिव्यरूप तो होय ॥
त्या दहन तसा च्यवनां[47] दस्रौ[48]षधिसिद्धितें जसें तोय ॥ ८५ ॥
कंज **जें**[49] शक्रविमानीं बसवुनि त्या ब्रह्मपूर्व लोकातें ॥
घेउनि गेले श्रीमत्प्रभुदर्शनहर्षवीत[50]शोकातें ॥ ८६ ॥

---

४३. कातर=भितरा. ४४ ऐंद्रि=इंद्रपुत्र. ४५ नाक=स्वर्ग. ४६ राजराज=यक्ष. ४७ च्यवन=ऋषिविशेष. ४८ दस्र=अश्विनीकुमार. ४९ कंजज=ब्रह्मा. ५० श्रीमत्प्रभुदर्शनहर्षवीतशोक=श्रीरामाच्या दर्शनाच्या आनंदानें गेला आहे शोक ज्याचा.

अभ **य** ऋषींतें प्रभु दे राक्षसहत विप्र बहुत पाहून ॥
जनकसुतेतें सांगे भूतौं[51]हितहनन बहु तपाहून ॥ ८७ ॥
अव्या **जैं**[52] दय प्रभु मग जेंवि चकोरासि चंद्रमा निववी ॥
तेंवि सुतीक्ष्णें[53]मुनीतें दर्शन याचें चि नित्य सख्यववी ॥ ८८ ॥
विस्म **य** पावे प्रभुवर ऐकुनियां वाद्यगीतनाद सरीं ॥
स्वर्गणिकांहीं[54] दिधला उग्रतपा मांडकर्णि सोहकरीं ॥ ८९ ॥
प्रख **रा** सिचापशरधर राम प्रभु दंडकाननीं हर्षें ॥
क्रमिता जाला तापसजनसत्कृतिकरुनियां दहा वर्षें ॥ ९० ॥
प्रथ **म** भ्रात्यातें मग घटजातें[55] राम भेटला भावें ॥
त्या मुनि म्हणे तसें हें जेंवि समुद्रांत बेट लाभावें ॥ ९१ ॥
दे त्या **श्री** रामातें हरिदत्तें सर्व वैष्णवें शस्त्रें ॥
जैशीं दिधलीं पूर्वीं राक्षसविजयार्थ गाधिजें अस्त्रें ॥ ९२ ॥
मुनि **रा** जानुमतें तो प्रभु पंचवटीस जाय तो वाटे ॥
पितृसखें[56] जटायु भेटे प्रिय साक्षाज्जनकसा चितों वाटे ॥ ९३ ॥
सप्रे **म** म्हणे त्यातें प्रभु हें स्वकुटुंब या जपा सून ॥
तुमची सीता ईतें पाळा गहनांत आजपासून ॥ ९४ ॥
अंड **ज** पतिसें[57] पुसोनि प्रभु पंचवटींत राहिला उटजीं ॥
जैसा संतानीच्या[58] दिव्य मधुपराज पुष्पितीं कुटजीं[59] ॥ ९५ ॥
दुर्न **य** दशमुखभगिनी जी शूर्पणखा दुराशया दंडा ॥
जाली भाजन नासाकर्णयुगच्छेद या महा दंडा ॥ ९६ ॥
अंम[60] **रा** रि खर त्रिशिरा दूषण इत्यादि राक्षस क्रूर ॥
चवदा सहस्र वधिले रामें दुःसह हरीसें[61] जे शूर ॥ ९७ ॥
हेम **म** य मृगामागें प्रभु दयिताप्रिय करावया लागे ॥
हा सीते हा लक्ष्मण ऐसें तो असुहरेषुहत[62] गांगे[63] ॥ ९८ ॥
सीता **ज** वळुनि दवडी सौमित्रिस तों चि दशमुखें हरिली ॥
ती क्षण सोडवुनि रणीं सत्कीर्ति सुगति जटायुनें वरिली ॥ ९९ ॥
निर्द **य** निस्त्रप[64] रावण नेउनि ठेवी तिला अशोकवनीं ॥

---

५१ भूताहितहनन=सर्व भूतमात्र शत्रूचें हनन. ५२ अव्याजदय=निष्कपट आहे दया ज्याची. ५३ सुतीक्ष्ण=मुनिविशेष. ५४ स्वर्गणिका=अप्सरा. ५५ घटज=अगस्त्य ऋषि. ५६ पितृसख=बापाचा मित्र. ५७ अंडजपति=जटायु. ५८ संतान=कल्पवृक्ष. ५९. कुटज=कुडयाचें झाड. ६० अमरारि=राक्षस. ६१ हरि=इंद्र. ६२ असुहरेषुहत=प्राणहारक बाणानें विद्ध. ६३ गागे=ओरडे. ६४ निस्त्रप=निर्लज्ज.

ती त्यासि म्हणे यावें सुकवींच्या सुयश रे पशो कवनीं ॥१००॥
स्वोट **ज** शून्य विलोकुनि हाय म्हणे प्रभु फिरे सशोक वनीं ॥
जो दुःखभर सविस्तर आला वाल्मीकिच्या च तो कवनीं ॥ १०१ ॥
अन **य** त्नें दशवदनें साती इतकें वदोनि जो मेला ॥
प्रभु त्या तात[65]सख्या जल देउनि हुडकित पुन्हा वनीं गेला ॥ १०२ ॥
प्रभु **रा** नांत भ्रमतां धरि योजनभुज निशाचर कवंध ॥
त्याचे बाहू छेदुनि करुणार्णव चुकविती नरकबंध ॥ १०३ ॥
तो सु **म** ति होय राक्षस कोण तुम्ही काय या वनीं कार्य ॥
ऐसें पुसे तयातें सांगे सौमित्रि ऋ[66]जुमना आर्य ॥ १०४ ॥
सांगे **श्री** मंतातें पुशिलें निजवृत्त तो हि शापाच्या ॥
अंतातें जाणुनि दनुदानव नाशार्थ शेषपापाच्या ॥ १०५ ॥
रुचि **रा** कृति मी होतों उग्राकारें मुनीस भय भारी ॥
देतां जालों शापी स्थूळशिरा मुनि न रूप मज तारी ॥ १०६ ॥
हें म **म** वृत्त असा मी झालों शक्राश[67]निप्रहारानें ॥
दाहोत्तरकार्य करिन शोधाल म्हणत पुन्हा न हा रानें ॥१०७॥
त्याचा **ज** गदीश करिति दाह वनीं तों चि दिव्य रूप धरी ॥
बसुनि विमानीं प्रभुला सांगे इष्टाप्तिहेतु युक्ति बरी ॥ १०८ ॥
रामा **य** मनियमवती सुमति मतंगाश्रमीं असे शबरी ॥
दे दर्शन तीस जिला भेटि तुझी गति तशी गमे न बरी ॥ १०९ ॥
प्रव **रा** सरसी पंपा संपावा ताप मग पहा धीरा ॥
न[68]ग ऋष्यमूकनामा जवळ चि आहे रघूत्तमा वीरा ॥ ११० ॥
तेथें **म** नुजश्रेष्ठा वानर आहेत पांच रवितनय ॥
सुग्रीव तयांत वसे तो रामा योग्य तुज सखा सनय ॥ १११ ॥
ऐसें **ज** लदश्यामें रामें ऐकोनि तो द[69]नु स्वर्गा ॥
पाठविला हें प्रभुचें निरुपम कारुण्य आवडे भ[70]र्गा ॥ ११२ ॥
हृद **य** द्रवेल गाइल साधुसभा आत्मपद यश बरी तें ॥
चरित कराया भेटे होउनि अत्यंत सदय शबरीतें ॥ ११३ ॥
ती पू **ज** न करुनि म्हणे रामा मद्गुरु मतंग मुनि गेला ॥
सत्यपदा प्रति जेव्हां धन्य तुवां चित्रकूट नग केला ॥ ११४ ॥
सुश्रे **य** मला गुरुनें कथिलें तें सिद्ध जाहलें आजी ॥

---

६५ तातसखा=जटायु. ६६ ऋजु=उजु, सरळ. ६७ अशनि=वज्र. ६८ नग=पर्वत ६९ दनु=राक्षस. ७०. मर्ग=शिव.

तृप्ता केली होती करुनि जसी चातकी तशी आ जी ॥११५॥
सद **रा** तिन्हा प्रभुला पंपापथ कथुनि गुरुकडे जाया ॥
राया नमुनि रघूच्या होमी ज्वलदग्नि माजि ती काया ॥ ११६ ॥
होय **म** हित रूप तिला प्राप्त वर विमान सत्य लोक मग ॥
सानुज पंपा पावे तो श्रीराम स्वभक्तकल्पनग* ॥ ११७ ॥

---

## ॥ अथ किष्किंधाकाण्डं ॥

सुखदा **श्री**[71] पंपेची परि जाली प्रभुमनीं असुख रचिती ॥
इतरांचि तो तैशा विरहीं तत्काळ ती असु खरचिती ॥११८॥
हा सीते **रा** का[72]पतिमुखि सुख मज तव समागमें होतें ॥
कोणी न म्हणे म्हणतो पुनरपि कर नवस माग मी होतें ॥
बहु स **म** जावी लक्ष्मण मग तेथुनि ऋष्यमूकगोत्रांस[73] ॥
जाती त्यांतें पाहुनि पावे सुग्रीवकीशीं[74] तो त्रास ॥ १२० ॥
वातात्म **ज** पाठविला सुग्रीवें विप्रवेष तो यातें ॥
भेटे पावोनि निवे पांथ बहु तृषार्त जेंवि तोयातें ॥ १२१ ॥
तो आश **य** वृत्त पुसे लक्ष्मण सांगे तयासि तो बाहे ॥
स्कंधीं करि सुगळाशीं भेटि कपिप्रभु हि बहु सुखा लाहे ॥
त्या भास्क **रा** त्मजाशीं[75] प्रभुशीं शास्त्रोक्त सख्य तें जालें ॥
आलें मनास रविच्या शक्राचें चित्त हर्षलें म्यालें ॥ १२३ ॥
दोघे स **म** सुखदुःख प्रिय कार्य करावया प्रतिज्ञा ते ॥
करितेजाले स्वयशें सुखवाया सज्जनांप्रति ज्ञाते ॥ १२४ ॥
नेली र **ज** निचरें स्त्री अनुमानें जानकी असें जाणें ॥
अस्मच्छ्रुतीस वाढित गेली ती रामनाम हीं वाणें[76] ॥ १२५ ॥
रुचि[77]च **य** मणिकांचनमय दिव्य अलंकार उत्तरीयपटीं ॥
बांधुनि सोडुनि गेली आम्हा कीशांत याचि अद्रितटीं॥१२६॥
रामा या **ज** गतीधरकुहरीं[78] ते नगें[79] तसे चि आहेत ॥
प्रभु त्यासि म्हणे दाखिव आण अलंकार पुरविं हा हेत॥१२७॥
सीता प्रि **य** नगें पाहे राम म्हणे लक्ष्मणा पहा बा हे ॥
तो नेणे इतर म्हणे जाणें नूपुर चि यांत हें आहे ॥ १२८ ॥

---

* कल्पतरु. ७१ श्री=शोभा. ७२ राका=पूर्णिमा. ७३ गोत्र=पर्वत. ७४ कीश=वानर. ७५ भास्करात्मज=सुग्रीव. ७६ वाणें=वायनें. ७७ रुचि=शोभा. ७८ जगतीधरकुहर=पर्वत गुहा. ७९. नग=दागिने.

साश्रु उ **रा** श्रीं प्रभु धरि भिजवी शोकोदकें समस्त नग ॥
हारासि म्हणे हा तूं भाग्यें होतासि मजसम रतनग[८०] ॥ १२९ ॥
वा सांगे **म** ज नेली कोणिकडे राक्षसी प्रिया माजी ॥
त्या वधिन सपरिवारा मज युग जी येतसे त्रियामा[८१] जी ॥१३०॥
सुगळ **श्री** रामातें अश्रु पुसुनियां म्हणे तया अरितें ॥
नेणें भेटविन तुज स्त्रीरत्न करुनि यत्न मी परि तें ॥ १३१ ॥
माजी ही **रा** जसुता स्त्री हरिली वाळिनें तदापि थिरा ॥
मी कपि हि त्यजित नसें तूं कां त्यजितोसि पंडिता वीरा॥१३२॥
त्याप्रति **म** नुजवर म्हणे करितों वा प्रथम मी तुझ्या कार्या ॥
शोधाया मद्दयिता मग करशील प्रयत्न तूं आर्या ॥ १३३ ॥
प्रभु वी **ज** पुसे तैशा वैराचें सुगळ तो असें कळवी ॥
मायावी असुर तया वाळी भंगूनि संगरीं पळवी ॥ १३४ ॥
तो सभ **य** शिरे विवरीं द्वारीं ठेवूनि मज तयामागे ॥
शिरला वाळी हि जसा व्याघ्र चि व्याघ्राचिया वधा रागें॥१३५॥
संवत्स **रा** उपरि ये रक्ताचा विवरभरि महापूर ॥
शब्द न पडतां कानीं गमलें वधिला चि शत्रुनीं शूर ॥१३६॥
शोकें भ्र **म** लों विवरद्वारीं ठेवुनि गिरिधरा आलों ॥
रडलों अभिषेकीं मी वश सचिवाच्या दुराग्रहें जालों ॥ १३७॥
तो वाळी **ज** यशाली ये मज पाहुनि पदीं भरे रागें ॥
अंगें मारीन ह्मणे भ्रमलों सर्वत्र लागला मागें ॥ १३८ ॥
हा आश्र **य** निर्भय नग मज कारण सांगतों तुला याचें ॥
वाळी बळजलधि[८२]मथन करि दुंदुभिनामका लुलाया[८३]चें ॥ १३९॥
त्यातें यो **ज** न उडवी तत्बळदर्पासि निंदुनि करानें ॥
आश्रम मतंगमुनिचा भरला तद्रक्तबिंदुनिकरानें[८४] ॥ १४० ॥
क्षुब्धाश **य** मुनि शापी तो वाळी मूढ ऋष्यमूकनगीं ॥
व्यसु[८५] हो प्रवेशतां ची क्षम कोण मदुक्तलंघनास जगीं ॥ १४१॥
वाळिप **रा** क्रम परिसुनि पादांगुष्ठें शरीर दश गांवें[८६] ॥
प्रभु दुंदुभिचें उडवी ज्याचें शेषें असीम यश गावें ॥ १४२ ॥
एके चि **म** हाबाणें प्रभु भेदी सप्तशालभूमितळ ॥
वाळिवधीं संप्रत्यय होउनि वर्णी सुकंठ[८७] रामबळ ॥ १४३ ॥

---

८० रतनग=रतनावर लोळणारा. ८१. त्रियामा=रात्र. ८२ जलधि=समुद्र. ८३ लुलाय=रेडा. ८४ निकर=समूह. ८५ व्यसु=मृत. ८६ गांवें=योजनें. ८७ सुकंठ=सुग्रीव.

वाळीतें **श्री** रामप्रभु मारायासि सिद्ध होय मग ॥
सुगळासि म्हणे हटिक [88]दहित मब्दाणविद्ध हो [89]मग ॥ १४४ ॥
तो सम **रा** येतां प्रभु एकेचि शरें तयां उरीं ताडी ॥
पाडी तद्राज्यश्रीस्त्री भोगायासि तदनुजा धाडी ॥ १४५ ॥
वानर **म** हाबळ अमित सुग्रीवें आणवूनि भेटविले ॥
त्यांचे प्रतापदहन प्रभुपवमानें पळांत पेटविले ॥ १४६ ॥
सुरीं [90] **ज** दिशेसि विनत वरुणदिशेतें सुषेण पाठविला ॥
धनदादिशेतें [91] शतबळ सुग्रीवें पण मनांत आठविला ॥ १४७ ॥
तैसेचि **य** मदिशेतें जांबवदंगदमरुत्सुतादि कपी ॥
धाडी मास अवधि करि कीं प्रभु विरहार्त जळ हि नीट न पी॥
शोधुनि **रा** जसुतेतें विनतादिक परतले श्रमुनि आले ॥
वाळिसुतादि अवधितें लंघुनि चिंतार्थ शासना भ्याले ॥ १४९ ॥
म्हणति **म** रावे दुस्तर सागर पाहोनि बोलिले हाय ॥
धन्य जटायु प्रभुच्या जेणें कार्यार्थ वेंचिला काय ॥ १५० ॥
त्या अनु **ज** मरणपरिसुनि कीशांसि पुसे जटायुचा भ्राता ॥
संपातिनामका त्या अंगद कथि वृत्त सुत जसा ताता ॥ १५१ ॥
अर्पीनितो **य** भ्रात्या सांगे निजवृत्त जानकी शोध ॥
तो धर्मज्ञ म्हणे मज साधुनिशाकरमुनींद्र करि बोध ॥ १५२ ॥
कथितां **ज** नकसुतेची वार्ता तच्छोधकासि तुज लक्ष ॥
दक्ष स्तवितिल रवितेजें दग्ध भव्य नव पक्ष ॥ १५३ ॥
सीता प्र **य** ता दिसती तिजला लंकापुरीं अशोकवनीं ॥
शत योजन पाहतसे गृध्र करा यत्न जा तिच्या अवनीं॥ १५४ ॥
गृध्रव **रा** नें ऐसें सांगुनि होउनि सपक्ष हर्षानें ॥
केलें गमन निववि‌ले कपि सर्व जसे मयूर व[92]र्षानें ॥ १५५ ॥
मारुति **म** हेंद्रशिखरीं चढला ऋक्षपकृतस्तवें फुगला ॥
निजबळ कळतां सद्यश मिळतां राहेल कवि कसा उगला॥ १५६ ॥

---

## ॥ अथ सुंदरकांड ॥

बळसिंधु **श्री** मारुति लंघुनि शतयोजनाब्धि तो पा[93]रा ॥
पावे प्रभुवरशरसा ज्या अतिदुस्तर हि मार्ग सोपारा ॥ १५७ ॥

---

८८ अहित=शत्रु. ८९ यमग=मृत. ९० सुरराजदिशा=पूर्व. ९१ धनददिशा=उत्तर. ९२ वर्ष=वृष्टि. ९३. पार=पलीकडील बाजू.

हरुनि प **रा** क्रमलेशें मारुति लंकाधिदेवतातेजा ॥
शिरला पुरींत तृणसे राक्षस देवा द्विजासि खाते ज्या ॥ १५८ ॥
रावणधामीं[९४] **म** विलोकुनि पाहे रामप्रिया अशोकवनीं ॥
तों तेथें तो खळ ये तीतें प्रार्थूनि न्यावया भवनीं ॥ १५९ ॥
धिःकारी र **ज** निचरा तें बैसुनि शिंशुपानगीं[९५] पाहे ॥
मारुति मनीं म्हणे हे प्रभुला योग्या महासती आहे ॥ १६० ॥
विफळप्र **य** त्न होउनि दशमुख जोडुनि महाघरा[९६] गेला ॥
नव्हतां वश गिळिन असें वदुनि न पावुनि महाघ रागेला ॥ १६१ ॥
विश्वास पु **रा** या तो प्रभुगुण गाऊनि दे तिला मुद्रा[९८] ॥
चूडामणि[९९]सह देवी प्रभु आणाया निरोप दे रुद्रा[१००] ॥ १६२ ॥
मथुनि प्र **म** दवन वधुनि बळ अक्ष[१] म्हणे मनांत कां पडला ॥
दृष्टिस न दशमुख रणीं दाटुनि कपिघनरवासि सांपडला ॥ १६३ ॥
नेला प्रभं **ज** नतनय बांधुनि राक्षससभेसि बोलविला ॥
बोलुनि सरमुनिमस्तक शतवार सकंपसा चि डोलविला ॥ १६४ ॥
श्रीरामप्रि **य** सख हो देतो जे दास देव देवदया ॥
शरणागता मज अभयदाता तूं करिल देवदेव दया ॥ १६५ ॥
प्रबळ स्त्री **ज** नकसुता न शिवावें तापल्या पहारेंतें ॥
अतिहित या ही त्या ही*लोका आपल्या पहा रेतें ॥ १६६ ॥
प्रभुंचें[३] प्रि **य** वस्तु कधीं न जिरे साजे चि ना पद[४]क चोरा ॥
अनुभविल केशरांचें कैसें रे राक्षसा पद कचोरा[५] ॥ १६७ ॥
इत्यादि ब **रा** रागें भरुनि वदे तें न त्या खळा साहे ॥
पाहे असिस म्हणे तों त्या तद्नुज[६] साधु दूत हा आहे ॥ १६८ ॥
तैलार्द्रे अ **म** †राहितवस्त्रशतें वेष्टवूनि पुच्छातें ॥
पेटवुनि म्हणे फिरवा लंकेंत करुनि घोष तुच्छातें ॥ १६९ ॥
वातसुत **श्री** रामो जयति असें म्हणुनि तो उडे सहसा ॥
जाळी लंकेसि म्हणे रे राक्षस हो रडा मला न हसा ॥ १७० ॥

---

९४ धाम=घर. ९५ नग=झाड. ९६ महाघ=मोठें पाप. ९७ मह=आनंद. ९८ मुद्रा= अंगठी. ९९ चूडामणि=मूद. १०० रुद्र=मारुति. १ अक्ष=रावणाचा पुत्र. २ प्रभंजनतनय= मारुति. * येथें अक्षरें कमी आहेत. ३ प्रभुंचें वस्तु=‘वस्तु’ शब्द संस्कृतांत नपुंसकलिंगी आहे. ४ पद=स्थान, पदवी. ५ कचोरा=एक प्रकारची वनस्पति-हिचे अंगीं सुवास अस- ल्यामुळें ही केशांना लावीत असतात. ६ तद्नुज=बिभीषण. † अमराहित=राक्षस.

होय समी **रा** त्मज तो दीन श्रीरामदारदाहभयें ॥
विझवुनि पुच्छ समुद्रीं श्रीतें पाहुनि निवे बहु स्वजयें ॥ १७१ ॥
पुनरपि **म** हितनयेतें नमुनि तदाज्ञा खळासि निंदुनि घे ॥
तेथुनि कीशचकोरां निववाया तो कपींद्रइंदु निघे ॥ १७२ ॥
त्या लंघुनि **ज** लधीतें गर्जोनि महेंद्रपर्वतीं उतरे ॥
जाले जयापुढें ते राक्षस सिंहापुढे जसे कुतरे ॥ १७३ ॥
तो परम **य** शस्वी त्या वृद्धा भेटे नमूनि आनंदी ॥
कपि आलिंगुनि म्हणती श्रीरामनिदेशशंभु हा नंदी ॥ १७४ ॥
म्यां शुद्धाचा **रा** ती प्रभुदयिता देखिली सती सीता ॥
गीता मुमुक्षुनें तशि जाली मद्‍दृष्टिदर्शनें सीता ॥ १७५ ॥
केलें सद्गु **म** भग्न क्षणदाचर ही त्यजूनियां शंका ॥
डंका श्रीरामाचा गाजविला ती हि जाळिली लंका ॥ १७६ ॥
हें वृत्त आं **जं** नेयें कथितां परमोत्सवें वनीं चेष्टा ॥
बहु करिति उडति नाचति भक्तजनेष्टा चि त्या न नीचेष्टा॥१७७॥
प्रभुतें प्रि **य** कळवाया ते जांबवदादि उसळले खातें ॥
यश अमृतवर्ष कपिवळ अंकुरलें शुष्क मुसकलें खातें ॥ १७८ ॥
वानररा **ज** मनःप्रियमधुवन अत्यंत रम्य पाहून ॥
शिरले युवराजाच्या आज्ञेतें मागतां च लाहून ॥ १७९ ॥
राजाचें भ **य** धरूनी वनपाळा दधिमुखासि ताडून ॥
पाहूनि फळें भक्षुनि मधु प्याले मधुवनांत झाडून ॥ १८० ॥
तो वानर **रा** जातें सांगे दधिमुख रडोनि बोभाट ॥
त्या कार्यसिद्धि समजे वाटे सद्गुण चि वर्णितो भाट ॥ १८१ ॥
लक्ष्मण स **म** जे समजे राम हि निजकार्यसिद्धि कीं भृत्य ॥
करितात अतिक्रम ते करिती स्वाम्युक्तसिद्धि जें कृत्य ॥ १८२ ॥
ते विजय **श्री** मंडित पवनसुतप्रमुख सर्व जे आले ॥
श्रीरामलक्ष्मणसुगळ यांतें सांष्टांग वंदिते जाले ॥ १८३ ॥
विरहाधी **रा** त्मा प्रभु त्यांसि पुसे लागली कशी शुद्धी ॥
सीता कोठें आहे माझ्या ठायीं कशी तिची बुद्धी ॥ १८४ ॥

---

७ समीरात्मज=मारुति. ८ रामदार=सीता. ९ निदेश=आज्ञा. १० क्षणदाचर=राक्षस. ११ आंजनेय=मारुति. १२ ख=आकाश. १३ मुसकलें=नासलें, कुजलें. १४ खात=खत (शेत, झाडें इत्यादिकांचे पोषणार्थ घालतात तें). १५ मधु=मद्य. १६ झाडून=सर्व. १७ भाट=स्तुतिपाठक. १८ भृत्य=चाकर. १९ अतिक्रम=मर्यादा उल्लंघन. २० शुद्धि=शोध.

ते सकळ **म** रुत्तनया प्रेरिति तो प्रभुसि नमुनि मणि अर्पी ॥
श्रीसीतावृत्त कथी ते त्या रु[२१]ग्णासि अमृतसें तर्पी ॥ १८५ ॥
जों शतयो **ज** नजलनिधि लंघुनि जायासि लागलों रामा ॥
प्रगटे विश्राम मला द्यायातें तारकारिचा[२२] मामा ॥ १८६ ॥
मम हृद **य** ह्मणे विघ्न ख उरें पाहूनि ताडितां स्वामी ॥
वदला त्वद्विश्रामा आलों तव बंधु वायुसख वा मी ॥१८७ ॥
सांत्वुनि ध **रा** धरातें[२३] पुनरपि जों उसळलों त्वरित सुरसा[२४] ॥
शतयोजन मुख पसरी नागांची माय खावया सुरसा[२५] ॥ १८८ ॥
तों सोडीं मी **म** नुकुळतिलका निजनवतियोजनाकार[२६] ॥
तनु होउनि शिरुनि मुखीं निघतां जाली प्रसन्न ती फार॥१८९॥
आकर्षी म **ज** रामा छायाग्रह[२७] सिंहिका[२८] तिच्यापोटीं ॥
शिरुनि हरुनि हृदय वधिलि तव पदपद्में कृताभयें मोठी॥१९०॥
मकराल[२९] **य** लंघुनि ती लंका शोधुनि सती अशोकवनीं ॥
देखिलि तव विरहार्ता यत्न करीं त्वरित बा तिच्या अवनीं[३०] ॥१९१॥
खपले र **ज** निचर बहुत बा मजसह करुनि अल्प समरमखा[३१] ॥
वदलों दहना[३२] लंका जाणुनि हा दिवस कल्पसम रम खा॥१९२॥
मज हा ज **य** प्रसादें तुमच्या त्या ही महासतीच्या हो ॥
लंकेप्रति तत्र भवद्यात्रा[३३] कारण मह[३४] सतीच्या[३५] हो ॥ १९३ ॥
क्रूरमति **रा** क्षसींत स्मरणें तुझिया चि धृतिमती सवती ॥
एकांबरैकवेणी[३६] तन्वंगी व्याकुळा अतीव[३७] सती ॥ १९४ ॥
कुशळ सु **म** तिनें पुसिलें श्रीरामा तुज सलक्ष्मणा सुगळा ॥
शीघ्र निघा तत्प्राणत्राणार्थ[३८] ग्रास हि न गिळा उगळीं[३९] ॥ १९५ ॥

---

## ॥ अथ युद्धकांड ॥

बहु मुदित **श्री** रामप्रभु होय म्हणे अगा महाबाहो ॥
बा त्वत्प्रसाद सर्वां सदरिखळाश्वां लगाम हा वाहो ॥ १९६ ॥

---

२१ रुग्ण=रोगी. २२ तारकारिचा मामा=मैनाक पर्वत. २३ धराधर=मैनाक. २४ सुरसा=देवासारखा. २५. सुरसा=नागमातेचें नांव. २६ नवति=नव्वद. २७ छायाग्रह=छाया ओढणारी. २८ सिंहिका=राहुमाता. २९ मकरालय=समुद्र. ३० अवन=रक्षण. ३१ मख=यज्ञ. ३२ दहना—हे दहना हा दिवस कल्पसम जाणुनि रम (आणि) लंका खा. ३३ भवद्यात्रा=तुमचें जाणें. ३४ मह=आनंद. ३५ सती=सीता. ३६ एकवेणी=तिपेडी वेणी न घालणारी (विरहिणी). ३७ अतीव=अतिशय. ३८ त्राण=रक्षण. ३९ उगळा=थुंका.

बा वायुकुमा **रा** त्वां वांचविला सकळबंधु हा राम ॥
कल्पतरूंचा आम्हां श्रांतांला भेटलासि [४०]आराम ॥ १९७ ॥
कर्म सदृश **म** ज न दिसे प्रिय अवि[४१]तरणीं कृतघ्नता पाहें ॥
यास्तव आलिंगन तुज देतों सर्वस्वभूत बापा हें ॥ १९८ ॥
यापरि वदे **ज** गद्गुरु आलिंगी वायुनंदना सुचिर ॥
याहुनि नित्य परम सुख कीर्तिप्रद वस्तु कोणतें रुचि[४२]रें ॥१९९॥
तो प्रभु विज **य** मुहूर्ती हनुमत्स्कंधीं बसे निघे [४३]तूर्ण ॥
सौमित्रि अंगदरथीं चंद्र जसा उदयपर्वतीं पूर्ण ॥ २०० ॥
जलनिधिती **रा** नेल्या सुगळें वहु ऋक्षपतिचमू भारी ॥
राम बिभीषण भेटे त्या लंकाराज्य अभय दे तारी ॥ २०१ ॥
नतजलधि **म** त न[४४]ळकरें सेतु करावि रामराय शत [४५]गांवें ॥
उतरुनि अंगदवदनें अरिस म्हणे पामरा यश तगावें ॥ २०२ ॥
करिती भारी **ज** *न्य क्ष[४६]णदाचर ऋक्ष कीश जे वन्य ॥
अद्भुत असें न अन्य त्रि[४७]दश म्हणति यास त्यास ही धन्य ॥२०३॥
करि अहिम **य** बाणांनीं घ[४८]ननाद निबद्ध सानुजा रामा ॥
दाऊनि सती दडवी त्या व्य[४९]सनीं पक्षिराज ये कामा ॥ २०४ ॥
विकळ अनु **ज** मनुजवरें निरखूनि उरांत लागली शक्ती ॥
दशमुख जिणुनि पळविला कांहिंशी प्रगटली रणीं शक्ती॥२०५॥
कपिसेनाक्ष **य** करितां कपिपतिहृतकर्णनास मत्त महा ॥
प्रभुनें वदतां वदला खळ हा †घटकर्ण वीरसत्तम हा ॥ २०६ ॥
सांत्वुनि ताता **रा** वणि[५०] नेंवि गिळायास राहु इंदु निघे ॥
दाशरथी खिळुनि रणीं जय साधुनि गुप्त ख[५१]ींत राहुनि घे॥२०७॥
अतिसंकटीं **म** रुत्सुत औषधि न[५२]गश्रृंग अतिजवें आणी ॥
सबळ विभु विशल्य करुनि पाउनि ये अश्रुंनीं सुरा न्हाणी ॥२०८॥
मग करुनि **श्री** सीतामाया रावणि तिला वधुनि मोही ॥
झटुनि अहोरात्रत्रय वधिला श[५३]क्रारि लक्ष्मणें तो ही ॥ २०९ ॥
प्रभु वधुनि **रा** क्षसांच्या बहु शतकोटि स्वयें रणीं पाहे ॥
अस्त्रबळ म्हणे माझें की ऐसें चि स्म[५४]रारिचें आहे ॥ २१० ॥

---

४० आराम=बाग. ४१ अवितरण=न देणें. ४२. रुचिर=सुंदर. ४३ तूर्ण=सत्वर. ४४ नळ=वानरविशेष. ४५ गांवें=योजनें. * जन्य=युद्ध. ४६ क्षणदाचर=राक्षस. ४७ त्रिदश=देव. ४८ घननाद=मेघनाद (इंद्रजित). ४९ व्यसन=संकट. † घटकर्ण=कुंभकर्ण (रावण बंधु). ५० रावणि=इंद्रजित. ५१ ख=आकाश. ५२ नग=पर्वत (द्रोणाचल). ५३ शक्रारि=इंद्रजित. ५४ स्मरारि=शिव.

दशमुख स **म** रीं प्रभुच्या अनुजोरीं शक्ति दारुणा हाणी ॥
पुनरपि सुषेण[५५]वचनें औषधिनगशृंग वातसुत आणी ॥ २११ ॥
रथ देवें[५६]रा **ज** धाडी त्यावरि बैसुनि दशानना ताडी ॥
रण सप्त रात्र सतत करुनि हरुनि असु धरातळीं पाडी॥२१२॥
प्रभुच्या विज **य** महोत्सवसमयीं दुंदुभि[५७] नभांत वाजविले ॥
लाजविले मेघ तिहीं प्रतिनादांहीं दिगंत गाजविले ॥ २१३ ॥
गंधर्व अप्स **रा** बहु करिती आलाप रामरायाला ॥
गाति नटति वर्णिति जो श्रीमद[५८] आला परी[५९] मरायाला॥ २१४ ॥
त्या दिव्यकुसु **म** वर्षें हर्षें शक्रादि पूजिती अमर ॥
जयजय म्हणति मुनिश्वर जे प्रभुवरचरणनीरज[६०]भ्रमर ॥ २१५ ॥
राज्य दिलें अ **ज** रामर केला जो चंद्रसूर्य तों वरि तो ॥
प्रभुनें प्रणत विभीषण गौरविला नत चि सिद्धितें वरितो॥२१६॥
अग्निस्नानें प्र **य** ता दयिता स्वीकारिली सुरवर[६१]मतें ॥
प्रभुयश सेवुनि कविमन मृग[६२]मन परिसुनि जसें सुरव[६३] रमतें॥२१७॥
सुरमुनिरा **ज** विख्युत दशरथ उतरे विमान सोडून ॥
भेटे पुत्रास पदावरि पडतां साश्रु हात जोडून ॥ २१८ ॥
युद्धिं प्राप्तक्ष **य** ते सर्व उठविले दयासुधावर्षें ॥
हें प्रभुयश अत्यद्भुत गाती गंधर्वदेवता हर्षें ॥ २१९ ॥
बसला कपि **रा** क्षसपति[६४]सह राम सदार पुष्पकविमानीं ॥
त्या पुष्पकयानातें मधुपाकुळ कल्पपुष्प कवि मानी ॥ २२० ॥
प्रिय करुनि **म** नुष्येश्वर सीतेसि म्हणे प्रिये पहा सेतू ॥
त्वत्प्राप्तिस हा नळकृत मुक्तिस गुरुकृत सुबोधसा हेतू ॥ २२१॥
स्व सहायांचीं **श्री** शें नामें कृत्यें प्रियेसि जाणविलीं ॥
दाखविलीं भटरत्नें जीं सुग्रीवें जयार्थ आणविलीं ॥ २२२ ॥
जलनिधि ती **रा** वनितें दाऊनि म्हणे विभीषणें आर्यें ॥
येथें मज भेटि दिली नेलीं येणें चि सिद्धिला कार्यें ॥ २२३ ॥
तारा[६५] रुमा हि **म** हिलीं[६६] कीशाच्या पुष्पकांत घे सीता ॥
त्यांच्या[६७] श्रीजनकसुता जेंवि सुधावृष्टि दृष्टि करि सीता[६८] ॥२२४॥

---

५५ सुषेण=वैद्यविशेष. ५६ देवराज=इंद्र. ५७ दुंदुभि=नगारे. ५८ श्रीमद=लक्ष्मीचा धूर. ५९. पर=शत्रु. ६० नीरज=कमल. ६१ सुरवर=देवश्रेष्ठ. ६२ मृग=हरिण. ६३ सुरव=सुस्वर. ६४ राक्षसपति=बिभीषण. ६५. तारा, रुमा=ह्या दोन सुग्रीवाच्या स्त्रिया. ६६. महिला=स्त्रिया. ६७. त्यांच्या=त्यांच्या दृष्टि श्रीजनक सुता सीता करी. ६८. सीता=थंडगार.

प्रभु वदला **ज** नकसुते हे पंपा ऋष्यमूक सन्नगे[६९] हा ॥
सुगळ अभय दे येथें मज ज्या म्हण वी वियोग पन्नग[७०] हा ॥२२५॥
जी तापसप्रि **य** तमा ती पंचवटी प्रियेसि दाखविली ॥
गोदावरीसुधा त्या श्रीच्या तृषितेक्षणांसि[७१] चाखविली ॥ २२६ ॥
भेटे निषाद **रा** जा तो पावे ज्या यशा मरुत्त नया ॥
भरतातें कळवाया प्रभु तेथुनि पाठवि मरुत्तनया[७२] ॥२२७॥
शिष्यसम स **म** य पाहुनि राम भरद्वाजमुनिपदा लागे ॥
सुरसफलसमृद्धि असो मार्गी ऐसा तशासि वर मागे ॥२२८॥
हृष्ट भरद्वा **ज** मुनिस करुनि वरुनि शीघ्र गति दयाधामें ॥
वल्कजटाकुशमलधर कृश सानुज भरत निववला रामें॥२२९॥
गुरु सविन **य** नमिला मग जननीजनसचिव पौर हर्षविले ॥
नंदिग्रामीं घेउनि वेष प्रेमाश्रु सर्व वर्षविले ॥ २३० ॥
कपिवर र **ज** नीचरवर प्रमुदित नररूपरम्यवेशधर ॥
करिती पुरीप्रवेश प्रभुसह बैसोनि रथकरेणुंवर[७३] ॥ २३१ ॥
जाले जयज **य** कार प्रभुच्या राज्याभिषेक समयांत ॥
देवादिजीवमात्रीं परमोत्सव होय या चि समयांत ॥ २३२ ॥
राष्ट्रीं पुरीं पु **रा** तन जे नृप कोणीं हि ते न आठविले ॥
जेंवि परदिगंतातें प्रभुनें निजराज्यगुण हि पाठविले॥२३३॥
त्या परम स **म** र्थानें रंजविल्या स्वप्रजा प्रजा समया ॥
प्रभुच्या तेजें हर्षे जन वर्षे घन न लंघितां समया॥२३४॥

---

## अथ उत्तरकांड

राज्यपद वरि **श्री** मान्सीतापति धरुनि धर्मनीतिपथा ॥
परिसे घटजमुनिमुखें[७४] रावणकपिपतिमरुत्सुतादि कथा ॥२३५॥
मुनिवर चतु **रा** ननसुत पुलस्त्य तत्तनय विश्रवा नावें ॥
तत्सुत वैश्रवण तया दे लंका तात जीस वानावें ॥ २३६ ॥
राक्षससुता सु **म** ति वरि दुसरी ती कैकशी तिचे तनय ॥
दशमुखघटकर्णसुता शूर्पणखाख्या बिभीषण हि सनय ॥२३७॥
तप करुनि कं **ज** जवरें[७५] द्विजदेवांचा महोग्र होय अरी ॥
वैश्रवणाची[७६] लंका प्रथम चि मोडूनि धर्मनीति हरी ॥२३८॥

---

६९ सन्नग=उत्तम पर्वत. ७० पन्नग=सर्प. ७१ ईक्षण=डोळे. ७२ मरुत्तनय=मारुति.
७३. करेणु=हत्तीण ७४ घटज=अगस्त्य. ७५ कंजज=ब्रम्हा. ७६ वैश्रवण=कुबेर.

धनद पराज **य** करि घे त्याचें पुष्पकविमान हिसकून ॥
त्या नंदीश्वर शापी प्रभुसामर्थ्यें वधास हि सकून ॥ २३९ ॥
करि कैलास ध **रा** धरें[७७] चालन भुज अडकवी तळीं रुद्र ॥
धर्षण करुनि पावे वेदवतीशाप हिमनगीं[७८] क्षुद्र ॥ २४० ॥
त्या अनरण्याख्य **म** हिप शापी यमभटमृगांत होय हरी ॥
भोगवतीतें जिकी असुराशीं युद्ध करुनि सख्य करी ॥२४१॥
शापी धनदात्म **ज** नळकूबर शक्रासि मेघनाद धरी ॥
मग अर्जुन दशवदना बांधी वाळी हि सर्व गर्व हरी ॥२४२॥
निपट शिशु वि **य** न्मणि[७९] तें फळ मानुनि वातसुत उडे व्योमीं ॥
वरलाभ घटज कथि तें यश वर्णूं काय काय बुध हो मी॥२४३॥
गौरवुनिया नि **ज** पुरा साधु विभीषण सुकंठ पाठविले ॥
मारुतिला स्वयश दिलें प्रभुनें प्रिय तें त्रिकाळ आठविलें २४४॥
मग गर्भिणी प्रि **य** तमा होय पुसे प्रभु तदीय दोहद या ॥
सांगे मुनिवनदर्शन ज्याची राहों न दे चि मोह दया ॥२४५॥
कथितां भर्द्रेंच[८०] **रा** नें पौरकृत स्वापवाद ही राम ॥
लोकांचा हि तिचा ही पुरवी त्यागुनि तपोवनीं काम ॥२४६॥
श्रीवाल्मीकिमुनि **म** नें समनें पुण्याश्रमीं तिला रक्षी ॥
लक्षी कन्यासी ज्या सदया सुतनिर्विशेष मृगपक्षी ॥ २४७ ॥
सांगे स्वभ्रात्यास **श्री** पति नृगनिमिययातिशापकथा ॥
श्वोलूक[८१]न्याय करी न विलंघी राम धर्मनीतिपथा ॥ २४८ ॥
लवणाख्या असु **रा** तें शत्रुघ्न वधी रची पुरी नाम ॥
मधुरा ऐसें ठेवी पुरवी यमुनातटस्थमुनिकाम ॥ २४९ ॥
जाय फिरुनि स **म** यीं ज्या श्रीमत्प्राचेतसाश्रमीं राहे ॥
श्रीरामायणगाते सीतासुत उपजतां हि हा पाहे ॥ २५० ॥
उठवी मृत द्वि **ज** शिशुतें शूद्राचा करुनि मनुजदेव लय ॥
श्वेतकथा कथुनि विभुसि अत्यद्भुत कुंभतनु[८२]न दे वलय॥२५१॥
जो इक्ष्वाकुतन **य** नृप दंड कविसुता व्रतघ्न उद्दाम ॥
त्या भस्म करी श्रीकवि दंडकवन म्हणूनि जाहलें नाम॥२५२॥
रघुराज अध्व[८३]र **रा** सि श्रेष्ठा करि सांग तुरगमेधा[८४] त्या ॥

---

७७ धराधर=पर्वत. ७८ हिमनग=हिमालय पर्वत. ७९ वियन्मणि=सूर्य. ८० चर=हेर. ८१ श्वोलुक=श्वा + उलूक=कुत्रा घुबड. ८२ कुंभतनुज=अगस्त्य. ८३ अध्वर=यज्ञ. ८४ तुरगमेध=अश्वमेध.

सुरमुनि बहु मानवले सत्य[85] चि साकेत[86]पुरें गमे धात्यां[87] ॥२५३॥

यज्ञांत परम **म** धुर स्वर कुश लव गीति निज चारित राम ॥
ऐके प्रसन्नमानस होय पुसुनि त्यास आदिकवि[88] नाम ॥२५४॥

आदिकवि म्हणे **ज** रि हे सीता शुद्धा नसेल तरि तपलों ॥
तें व्यर्थ असो रामा जे यमनियमास मी सदां जपलों ॥२५५॥

सीता म्हणे धरे **य** श हो लज्जा पाहुं दे न देवि वर ॥
प्रभुहुनि जरि मन माझें अन्यत्र नसेल शीघ्र दे विवर ॥२५६॥

सहसा उलली **ज** गतीं सिंहासन चंद्रसूर्यनिभें[89] आलें ॥
त्यावरि भूदेवीनें बसवुनि नेली सुता असें जालें ॥ २५७ ॥

अत्याकुळहृद **य** प्रभु होतां अवतारतत्व विधि कळवी ॥
प्रभुचें मन तूं विष्णू श्री सीता कथुनियां असें कळवी ॥२५८॥

दश शत वर्षे **रा** ज्य प्रभु हयमेधादिमख करी शतशा ॥
प्रगटि यश ज्या लाजे हिमनग दुग्धाब्धि विधु करीश तशा ॥

त्ववघांचे सुत **म** हित स्वपितृसमगुणाढ्य आठ जे सनय ॥
अभिषिक्त तक्ष पुष्कळ दो नगरीं स्थापिले भरततनय ॥२६०॥

लक्ष्मण हि मग **श्री** मद्रामें अभिषेचिले तनुज दोघे ॥
अंगद हि चंद्रकेतु हि बसवूनि पुरद्वयीं सुयश तो घे ॥२६१॥

धरि काळ भूसुं[90] **रा** चें रूप प्रभुला म्हणे रहस्य असें ॥
वध्य द्रष्टा श्रोता हो द्वारीं राघवोक्त बंधु वसे ॥ २६२ ॥

विधिवच आग **म** न करी वैकुंठाप्रति असें कथी काळ ॥
तो लक्ष्मणासि भिववी दुर्वासा जेंवि आखुला[91] व्याळें[92] ॥२६३॥

प्रभु निज अनु **ज** त्यागी तो सशरीर त्रिविष्टपा[93] नेला ॥
आत्मप्रयाणनिश्चय भरता श्रुत तदनुजास ही केला ॥२६४॥

कुशलव तन **य** निज तयां अभिषेचुनि दोन दे पुरें राम ॥
सुत सुभुज शत्रुघाती त्याचा पुरवी अरिघ्न ही काम ॥२६५॥

तो सुगळ वान **रा** धिप निज पद देऊनि अंगदा आला ॥
भेटे भक्त बिभीषण लंकेंत म्हणे सुखी रहा त्याला ॥२६६॥

जो कलियुग म **म** वचनें तों मैंदाद्विविदें[94]जांबवन्हेया ॥
भूवरि सुखी असावें माझी आज्ञा तुम्हां नव्हे हेयां[95] ॥२६७॥

---

८५ सत्य=ब्रम्हलोक. ८६. साकेत=अयोध्या. ८७ धाता=ब्रम्हा. ८८ आदिकवि=वालिमकी. ८९ निभ=सदृश. ९० भुसूर=ब्राम्हण. ९१ आखु=उंदीर. ९२ व्याळ=साप. ९३ त्रिविष्टप=स्वर्ग. ९४ मैन्द, द्विविद, जांबवद् इत्यादि वानर विशेष. ९५ हेया=त्याज्य.

रघुपति स्वप्र **ज** सर्वां जीवांते पुरगृहें चि सोडुनि घे ॥
सानुग सुगळ सचिवकपियूथ[16]सहजोविचंद्र सोडु[17]निघे॥२६८॥

पवनसुता स्व **य** शोमृत सेवित सुखरूप तूं रहा सुचिर ॥
शुचिरसिकप्रियसद्गुणवरदेप्रभुसकृपवरअसा सुचिर ॥२६९॥

आला सार्मर[18] कं **ज** ज बहु रम्य विमानकोटि घेऊन ॥
न्हाणून गोप्रतारीं बसवी प्रभुचा प्रसाद जाणून ॥ २७० ॥

शरयूच्या स्नानें **य** ति सूकर मार्जार आखु अहि कुतरे ॥
जाले दिव्य विमानीं चढले त्यांतुनि न काक ही उतरे॥२७१॥

त्या संतानाख्य व **रा** विधिलोक समीप लोक शुभ केला ॥
क्रममुक्तिप्रद तो त्या स्याना जन सर्व उत्सवें नेला ॥ २७२ ॥

निजभक्तजन **म** यर प्रमुदित करि सुखघन स्वयें राम ॥
[19]रुद्र सहस्राब्दांतीं वसवी वैकुंठ आपुलें धाम ॥ २७३ ॥

इति उत्तरकांड ॥ बालमंत्ररामायण समाप्त ॥

---

## अथ मयूरकृत त्रिस्थळी आर्या.

श्रीशातें प्रेमें जे वर्णिति तुज ही कवि **प्रयागा** ते ॥
हरिहरयशसें तव यश नसतें जरि तरि न विप्र यागातें ॥ १ ॥

बा त्वत्समीप देवी **गंगा यमुना सरस्वती** वसती ॥
त्यजिति न तुज व्रतास क्षण हि जशा प्रीतिनें अतीव सती ॥ २ ॥

विषय विषम ज्वलन चि न भजुनि शुक विप्र यागराजाला ॥
व्हायासि तसें सेवित तुज बहु सुकवि **प्रयागराजाला** ॥ ३ ॥

भुलविशि सुखाविशी चुकविशि संसारवनांत अटक हे **यमुने** ॥
त्वत्तीरस्थ मुनिंस सुर म्हणति तुला वपुचि तट न हेय मुने ॥ ४ ॥

**श्री**काशि तुझें दर्शन परम अमृत कीं अनंत शिव[1] वीतें ॥
जिववी तेजें लघुतें हे तो सर्वां जनांस निववी तें ॥ ५ ॥

**श्री**काशि तुझें दर्शन घडलें झडलें अशेषही पाप ॥
आपत्सिंधुतरणि[2] तूं न उरों देशी निजाश्रितीं ताप ॥ ६ ॥

**श्री**काशि तुझें दर्शन अत्यद्भुत वर्णिती असें सुकवी ॥
कीं हें अमृत असोनि प्रबळा संसारपाद[3]पा सुकवी ॥ ७ ॥

**श्री**काशि तुझें दर्शन सर्व सुखाधिक म्हणे **स**दाशिव तो ॥

---

१६ यूथ=कळप. १७ सोडु=स+उडु=नक्षत्रांसह. १८ सामर=देवांसह. १९ रुद्र=अकरा. १ शिव=कल्याण. २ तरणि=नौका. ३ पादप=वृक्ष.

स्वशिरोमणि किरणांहीं सुरगण ज्याच्या पदा सदां शिवतो ॥ ८ ॥
श्रीकाशि तुझें दर्शन मातेचें जेंवि बाळका कविला ॥
अन्य पुरी सेवी तो सोडूनि सुधेसि बाळ काकविला ॥ ९ ॥
श्रीकाशि तुझें दर्शन हर्ष न दे बहुत तेंवि कवणातें ॥
अलवण भोजन पीडित पात्रीं पाहूनि जेंवि लवणातें ॥ १० ॥
श्रीकाशि तुझें दर्शन बहु हर्षद निर्धना जसें निधिचें ॥
लिहिलें भाग्य ललाटीं लिहिणें मोडोनि सर्वही विधिचें ॥ ११ ॥
श्रीविष्णुपदा आलों शरण तुला भिउन काळ सर्पा या ॥
कैचें श्याचे धन न शकें तुज तुळसीदळ हि एक अर्पाया ॥ १२ ॥
विष्णुपदा न विटसि वर बहु दीनें मागतां गळां पडुन ॥
कीं प्राकृत ही मानी बाळाचें मागणें पिता कडु न ॥ १३ ॥
श्रीहरिहरासि म्हणती शक्रादि जसे तसें अजित यातें ॥
जें त्वद्भक्त बहु वदति कविवर मणिकर्णिके अजि तयातें ॥ १४ ॥
मणिकर्णिके हरीहर होतात न सुरसमान वपु न्हाते ॥
तव जल सेविति न म्हणाति अमृतातें सुरस मानव पुन्हा ते ॥ १५ ॥

इति त्रिस्थळी आर्या समाप्त

---

## ॥ श्रीगुरुस्तुति ॥ *

श्रीगुरूचरणस्मरणस्तवननमन भद्र सर्वदां साचें ॥
श्रीगुरुगुणकीर्तन जें तेंचि तपज्ञान सर्व दासाचें ॥ १ ॥
श्रीगुरूच्या उच्छिष्टें होय विमळ जेंवि आशय ज्ञानें ॥
तुटतो गुरूपदेशें जैसा तैसा न पाश यज्ञानें ॥ २ ॥
गुरुनें जीव शिवाचि बहु बरवी प्रकटूनि हातवटि केला ॥
वृद्ध तरूण शंतनुनें न पसरुनि जेंवि हात वटिकेला ॥ ३ ॥
गुरुराज जनक जननी बंधु सुहृन्मित्र सोयरे स्वजन ॥
भजन श्रीगुरुचें तें गंगावाराणसीगयाव्रजनें ॥ ४ ॥
संसारांत श्रीगुरु परम हित न अन्य सोयरा जीव ॥
शिष्यातें मधुप करी आपण सुरसाढ्य होय राजीवें ॥ ५ ॥
सर्वस्व श्रीगुरुला अर्पुनि उत्तीर्ण शिष्य होय न तें ॥
कृत्य स्मरुनि वहावे परिचरणीं देह जेंवि तोय नतें ॥ ६ ॥

---

४ लवण=मीठ. ५ निधि=ठेवा. * हें व पुढील अशीं दोन प्रकरणें पंतांच्या वंशजांकडून मिळालीं. १. व्रजन=यात्रा. २ राजीव=कमल.

मुख्यप्रसाद गुरूचा होतां हरिचाहि बहुत बा होतो ॥
इच्छावें कृत्य करिन मी प्रथम मजचि दहांत वाहो तो ॥ ७ ॥
जरि गुरू वळे हरि हरहि बहुकाळ नको यशास तरि होया ॥
वश कर्णधार होतां लागे म्हणणें कशास तरिहो या ॥ ८ ॥
ब्रह्माविष्णुमहेश्वर साक्षात् श्रुतिगीतमहिम गुरू व्यास ॥
ते अन्य संसृतीसहि उन्मूळिति जेवि अहिमगु[३] रुजांस[४] ॥ ९ ॥
गुरू बंधु गुरू परिग्रह गुरू पुत्रहि गुरू तसाचि वाटावा ॥
दाटावा तद्विरहें कंठ मग न कां भवाब्धि आटावा ॥ १० ॥
गुरुभक्ताच्या कार्या याव्या म्हणवूनि या दहा आर्या ॥
भक्तमयूरें धार्या[५] लिहिल्या रुचतिल न कां जना आर्या ॥ ११ ॥

---

## ॥ द्विचत्वारिंशल्लिंगयात्रा ॥

ॐकारेश्वर देवा वरदप्रवरा तुला असो नमन ॥
त्वच्चरणातें सोडुनि अंतीं माझें गृहीं वसो न मन ॥ १ ॥
सदय त्रिलोचनेश्वर तूं देवा प्रार्थितों तुला भावें ॥
द्यावें काशींत मरण दीनातें दीनबांधवा पावें ॥ २ ॥
दे अभय महादेवा सेवावी शेवटीं सदा काशी ॥
राशि द्रव्याचा हित न करी तो काय शांति जो नाशी ॥ ३ ॥
दासांसि कृत्तिवासा ईश्वर तूं तारितोसि हें कळलें ॥
शुद्ध करिसि निजनामें मानस जें विषयसेवनें मळलें ॥ ४ ॥
रत्नेश्वरा तुज नमुनि न मुनिजनाहूनि जड उणा होय ॥
तो यश पावे निरुपम जो भावें वाहातो तुला तोय ॥ ५ ॥
चंद्रेश्वरा नमुनि तुज मी दीन प्रार्थितों करीं श्रवण ॥
कामातें भस्म करीं या पापें गांजिला नसे कवण ॥ ६ ॥
मज संतप्त करावें श्रीकेदारेश्वरा न कोपानें ॥
घात पुनः पुनरपि या विषयविषरसाचिया नको पानें ॥ ७ ॥
समजुनि धर्म अधर्म न केला केला वदों कसें लटिकें ॥
धर्मेश्वरा म्हणावें त्वां मच्छरणागतीं भया न टिकें ॥ ८ ॥
या कामाद्याहितांतें देवा वीरेश्वरा तुजा [६]निवटी ॥
ऐसा कोण त्रिजगीं[७] द्युमणिद्युति[८] तम हरील कीं दिवटी ॥ ९ ॥

---

३ अहिमगु=उष्णरश्मि, सूर्य. ४ रुजांस=रोगांस. ५ धार्या=धारण योग्य. ६ निवटी=नाशकरी. ७ त्रिजगीं=तिन्ही लोकांत. ८ द्युमणिद्युति=सूर्यकांति.

व्हावें मुक्त मम मनीं द्यावें कामेश्वरा दयाळो हें ॥
साध्य सुवर्णत्व जया प्रार्थावा स्पर्शमणि तया लोहें ॥ १० ॥
प्रख्यात विश्वकर्मेश्वर तूं भगवान् कल्पनियां युक्ती ॥
मुक्ति प्रणता द्यावी दीनाची नायको नये उक्ती ॥ ११ ॥
तूं गरुड भवा सापा सदया मणिकर्णिकेश्वरा बापा ॥
या पाव नता पापा सारीं वारीं अबोधजा पापा ॥ १२ ॥
या दीनाचा पाहों बा अविमुक्तेश्वरा नको अंत ॥
संतप्ता निववावें प्रेमें गाउत न वा यशा संत ॥ १३ ॥
कर जोडुनि तुज म्हणतों श्रीमद्विश्वेश्वरा नमो हा या ॥
शरणागता शकावी तव माया सर्वथा न मोहाया ॥ १४ ॥
अमृतेश्वरा न म्हणतिल तव चरणा वेद कां महोदार ॥
म्हणसि स्वजनांचेंही पूरितसर्वार्थिकाम हो दार ॥ १५ ॥
श्रीतारकेश्वरा मज पात्र करीं तारकोपदेशाला ॥
कीं काश्याख्या हे तव मायेतें फार कोप दे शाला ॥ १६ ॥
ज्ञानेश्वरा करावा शरणागत सर्व धन्य सुज्ञानें ॥
जाड्यांतुनि उद्धरिला त्वां न असा जीव अन्य सुज्ञानें ॥ १७ ॥
विश्वेश्वरासि माझें प्रार्थित वरुणेश्वरा स्वयें कळिव ॥ ॥
पळिव त्रास भवाचा कामप्रमुखाहितांनिनें मळिव ॥ १८ ॥
करुणावरुणागारा मोक्षद्वारेश्वरा तुवा सुघडें ॥
केलें मोक्षद्वार प्राणी तारावया सदा उघडें ॥ १९ ॥
दे भक्ति मुक्ति अथवा स्वर्गद्वारेश्वरा नको स्वर्ग ॥
सुखलेश नसे नाकीं वा की तेथें वसे द्विषद्वर्ग ॥ २० ॥
भ्याला बहु हा दीन ब्राह्मण ब्राह्मण भिवों नको वस रे ॥
पसरे सुयश त्रिजगीं जें बा ब्रह्मेश्वरा कधीं न सरे ॥ २१ ॥
बा लांगलेश्वरा तूं करिता झालासि सूपकारातें ॥
वर्णिति तुज बहु जैसे भक्षूनि सदन्न सूपकारातें ॥ २२ ॥
वात्सल्य ऐकिलें जें मज ही दावीव वृद्धकाळा तें ॥

९ स्पर्शमणि=परीस. (Philosopher's Stone). १० उक्ति=भाषण. ११ अबोधज=अज्ञानापासून उत्पन्न झालेलें. १२ पूरितसर्वार्थिकाम=पुरविले आहेत सर्व याचकांचे मनोरथ ज्यानें असें (दार). १३ जाड्य=मूर्खपण, अज्ञान. १४ भव=संसार. १५ अहित=शत्रु. १६ वरुणागार=वरुणाचें घर (समुद्र). १७ नाक=स्वर्ग. १८ द्विषद्वर्ग=शत्रूंचा जमाव. १९ लांगल=नांगर. २० सूपकार=सु + उपकार. २१ सूपकार=स्वैपाकी.

जपतोसि जसा ऐसा बा काय जपेल तात बाळातें ॥ २३ ॥
नमितों तुज या नमनें जें दुरित वृषेश्वरा न राहो तें ॥
अति दुर्लभ कैवल्य[२२] प्राप्त तुला वंदितां नरा होतें ॥ २४ ॥
प्रणताच्या भवबंधा खंडा चंडीश्वरा तुझी दृष्टी ॥
अमृतें[२३] संतर्पितसे भक्तजना वांसुरां जसी गृष्टी[२४] ॥ २५ ॥
नमुनि तुज म्हणतसे जो जन जयजय नंदिकेश्वर स्वामी ॥
त्यातें स्थापिसि परम प्रेमें तूं नित्य आपुल्या धामीं ॥ २६ ॥
आत्मा देसी त्या जो वाहे तुज बा महेश्वरा बेल ॥
मग मोक्ष चतुर्विध[२५] कां त्याच्या सदनीं सदा न राबेल[२६] ॥ २७ ॥
तुज हृदयांतील तम[२७] ज्योतीरूपेश्वरा हरायास ॥
नमितां घेतां नाम स्मरतां ध्यातां नको परायास[२८] ॥ २८ ॥
दे अभय दीनबंधो देवा शैलेश्वरा शिवा याला ॥
हा तप्त तव पदाब्ज[२९]च्छायेतें वांछितो निवायाला ॥ २९ ॥
श्रीसंगमेश्वरा तूं प्रिय भक्तां जेंवि अर्क राजीवा[३०] ॥
तव कीर्तिसुधा मिळतां अन्या ती होय शर्करा जीवां ॥ ३० ॥
नमितां अमितां तारिसि बा स्वर्लीनेश्वरा बुधाधारा ॥
भेटि भवार्तासि तुझी सुहिता रुग्णा[३१] जसी सुधाधारा ॥ ३१ ॥
हो मध्यमेश्वरा तूं या दुस्तरतर भवार्णवीं सेतु ॥
श्रीकाशींत वसाया आह्मांसि तव प्रसाद हा हेतु ॥ ३२ ॥
दे काशीमरण दुजा हिरण्यगर्भेश्वरा नको च वर ॥
छत्र परा निववाया तेंहि जरि शकेल तरि शको चवर ॥ ३३ ॥
जाऊं म्हणतां वांचो पळ ईशानेश्वरा न हा काय ॥
म्हणवी करितां पालन लालन हाल न करून हा काय ॥ ३४ ॥
साधुनि पशु हि अधिक पद बा गोप्रेक्षेश्वरा नराहुनि घे ॥
न निघो काशींतुनि हा सुरपंक्तींतुनि जसा न राहु निघे ॥ ३५ ॥
वृषभध्वजेश्वरा म्यां नमुनि तुज दयानदा न कांपावें ॥
त्वां द्यावें अभयाचें जो दीन तया न दान कां पावे ॥ ३६ ॥
विद्याधन देहाची मज उपशांतेश्वरा नसे शक्ती ॥
परि म्हणतों तारावें नाहीं मानें तुला असी भक्ती ॥ ३७ ॥

---

२२ कैवल्य=मोक्ष. २३ अमृत=मोक्ष किंवा दूध. २४ गृष्टी=गाय. २५ चतुर्विध=चार प्रकारचा. २६ राबेल=खपेल, कष्ट करील. २७ तम=अज्ञान. २८ परायास=अतिश्रम. २९ अब्ज=कमळ. ३० राजीव=कमल. ३१ रुग्ण=रोगी.

तव चरणीं अर्पावे प्राण ज्येष्ठेश्वरा उपायनसे[32] ॥
तारो तव प्रसाद चि दुसरा भवसागरीं उपाय नसे ॥ ३८ ॥
वंदुनि भक्तसुरतरुस न रुस निवासेश्वरा शिवा समज ॥
ऐसें मी अपराधी तुज म्हणतों दे पदीं निवास मज ॥ ३९ ॥
संसारीं सर्व चुके जड जीव शुकेश्वरा परंतु सुके ॥
न मुख न सद्रातिस मुके तुजसीं तुज वंदितां न कोण तुके ॥ ४० ॥
कामवृकें[33] हृदयविवरीं शिरला व्याघ्रेश्वरा न राखावा ॥
हें उचित तुज वसाया दुष्ट सदा पुष्ट हा बरा खावा ॥ ४१ ॥
क्षुद्रा चपळा माझ्या चित्तशशा[34] जंबुकेश्वरा[35] वंचीं ॥
तूं चि प्रसन्न हो मज ठावीं प्रभु योग्य भाषणें कंचीं ॥ ४२ ॥
भावें असी द्विचत्वारिंशल्लिंगस्तवात्मिका यात्रा ॥
केली भक्त मयूरें हे भव-रोगांतकारिणी मात्रा ॥ ४३ ॥
इति श्रीरामनंदनमयूरविरचिता द्विचत्वारिंशल्लिंगयात्रा संपूर्णाश्रीकाशी-विश्वेश्वरार्पिता भवतु ॥

---

## ॥ साधुसत्कार. ॥

श्रीदानें करुनि तुम्हीं करितां सत्कार नित्य नव संत ॥
न तुम्हां ऐसा करितो परितो सर्वत्र नित्य न वसंत ॥ १ ॥
विटावित नसां कधीं त्या रंजवितां परम अंतरा ज्यांच्या ॥
लाजवितां रीतीतें सर्व तुम्ही सदय संत राजांच्या ॥ २ ॥
निज संतति ते चि करिति पात्र निज धना न अन्य संततितें ॥
करितां तुम्हीं च जेंवि स्वीयें तें तेंवि धन्य संत तितें ॥ ३ ॥
सर्वार्थपूरणव्रत तों चालविलें तुम्हीं च संतानीं ॥
औदार्यसत्व चिंतामण्युपळीं[36] काय काय संतानीं[37] ॥ ४ ॥
जोडुनि पाणी प्राणी जो गेला भवदवार्त[38] संतापें[39] ॥
व्याळें[40] गरुडाश्रितसा तो सर्व हि सोडिला च संतापें ॥ ५ ॥
प्रकटचि आपण तारुनि इतरासि भवांत संत तरतीं तें ॥
यास्तव सच्चरणाब्जीं पावो चित्तालि[41] संतत रतीतें[42] ॥ ६ ॥
व्हा सुप्रसन्नमानस मज दीनावरि वळा चि सज्जन हो ॥

---

३२ उपायन=नजराणा. ३३ वृक=लांडगा. ३४ शश=ससा. ३५ जंबुक=कोल्हा. ३६ उपल=दगड. ३७ संतान=कल्पवृक्ष. ३८ दवार्त=अग्नीनें त्रासलेले. ३९ संतापें=साधूं जवळ. ४० व्याल=साप. ४१ चित्तालि=मनरूपी भ्रमर. ४२ रति=प्रीति.

दीनोद्धारीं च हृदय तुमचें इतरीं कदापि सज्ज्य[43] न हो ॥ ७ ॥
मेळवितां दीनातें तारूनि यशें तुम्ही च साधु निकीं ॥
मोक्षाधिकसुख होतें प्राप्त असंशय पदार्थ साधुनि कीं ॥ ८ ॥
वाल्मीकिप्रमुख कवि स्तुति करिती फार साधु रीतीची ॥
न सुधास्मरण करि रसिक कीं न्यूना निपट[44] माधुरी तीची ॥ ९ ॥
तुमचें पदरज वाहे तो जो पाप्यांसि सुगति दे वघुनी ॥
कन्या जसि पितृभाग्यें साधुयशें तेंवि फुगति देवधुनी[45] ॥ १० ॥
हरितां दर्शनमात्रें सर्वांच्या पापताप दैन्यातें ॥
भयद तुम्ही षडरींतें रामशर जसे पलाशसैन्यातें[46] ॥ ११ ॥
कळिचें तुम्हांपुढें बळ भानु पुढें तुच्छ जेंवि संतमस[47] ॥
काळमुखीं लावाया प्रबळ तुम्हीं एक मात्र संत मस ॥ १२ ॥
भाग्यें भेटे असतां या भवसिंधूंत अटत[48] साधु[49] वट[50] ॥
होतो सच्चरणरजीं जन दहनीं दिव्य पट तसा धुवट ॥ १३ ॥
बहु रंकांच्या[51] देते झाले पुरूषार्थ साधु निकरा[52] जे ॥
वैन्यादि[53] हि मानवले केवळ न तयांसि आधुनिक[54] राजे ॥ १४ ॥
तारावें दीनांतें वारुनि उग्रांहि अंतरायांतें[55] ॥
श्रीरामातें ठावें कीं एक तुम्हांचि संतरायांतें ॥ १५ ॥
शरणागतें समस्तें पावावें जें चि शर्म संतानें[56] ॥
केलें सर्व ही जें भूतसुहित तें चि कर्म संतानें[57] ॥ १६ ॥
तुमचें आर्जव करितों करि तोषकर प्रभु स्वयें जपुन ॥
अपुनर्भवप्रद पद हि आठवि भजनांत आपुलें वपु[58] न ॥ १७ ॥
केलें न च सत्पुत्रें कीं तैसें भजन संत हो तातें ॥
करितो तुमचें टाकुनि आत्ममुखीं अज न संत होता तें ॥ १८ ॥
जेंवि तुम्हीं संत भवत्संगतिरवएकहरि असा रसिक ॥
सद्गुरु तुम्हीं च दुसरें ह्मणति हित नसे चि तरि असा रसिक ॥ १९ ॥
न श्रीतें परि हरि बहु भुलला तुमच्या चि या सुरीतीतें ॥
वर्णिति ईतें पूर्वीं इतुकें न गुण प्रिया सुरी तीतें ॥ २० ॥

---

४३ सज्ज्य=तयार. ४४ निपट=केवळ. ४५ धुनी=नदी. ४६ पलाश=मांस खाणारे राक्षस) ४७ संतमस=अंधकार. ४८ अटत=फिरत. ४९ साधु=चांगला. ५० वट=वडाचा वृक्ष. ५१ रंक=भिकारी. ५२ निकरा=समूह, अनर्थ. ५३ वैन्य=वेनराजाचा पुत्र (पृथुराजा). ५४ आधुनिक=सांप्रतचे, आलीकडचे. ५५ अंतराय=विघ्न. ५६ संतान=मुलें बाळें. ५७ संत=साधु. ५८ वपु=शरीर.

केवळ पदार्थ चि तुम्हीं झालां न स्वार्थ संत तरु सेकीं ॥
काम धरीतो नसतां न च दे कांहींच संतत रुसे कीं ॥ २१ ॥
निधिलाभें पूर्ण मनोरथ ज्या होतात संत तो नाचे ॥
त्याहुनि बहु जो दुःखी पाहे सुखसिंधु संततोनाचे ॥ २२ ॥
स्वात्म्याच्या परताया जेंवि अमृतकांतिसंप दानांहीं ॥
म्हणतो तें चि म्हणतसां कोठें हे शांतिसंपदा नाहीं ॥ २३ ॥
जीवां तें न मुकुंदा अवलंबुनि शांति हे तुम्हां तारी ॥
तुमच्या ठायीं तरुणी देवी ईची च हेतु म्हातारी ॥ २४ ॥
ह्मणतो मुकुंद आत्मा मज न तुम्हांहुनि अधीक मंज्जन[५९] हो ॥
कथिले शुकें चि यास्तव तुमच्या चि यशोमृतांत मंज्जन[६०] हो ॥ २५ ॥
देवाधिक वदलों हें लगेल चि कठिण चित्त परि साहो ॥
शिक्षित तुमचें चि किमपि वदतों शुक[६१]बाळसा च परिसा हो ॥ २६ ॥
गुरु म्हणति निज श्रुतियुग बाळमुखांतूनि आयकों येतें ॥
येईल अन्य पदार्थप्रसवीं कुशलत्व काय कोयेतें ॥ २७ ॥
वाद्य स्ववादकजना जो संमत तो चि धरुनि पथ वाजे ॥
चाळकमतें चि चालति गज वाजी मति बलस्थ अथवा जे ॥ २८ ॥
स्वाराध्यातें सर्वाधिक म्हणतां कीं तुम्हीं च कवि राजे ॥
ह्मणतों तुह्मां तसें मीं कां हें न्यायें मदुक्त न विराजे ॥ २९ ॥
भगवंत भगवदनुगां आम्हां तों संत सदनुगां ठावे ॥
बाळें प्रथम बयेचे बापाचे चरण तदनु गांठावे ॥ ३० ॥
मज दीना देवाहुनि अधिक तुम्हीं संत सर्वथा धर्में ॥
बाळा जेंवि पित्याहुनि अधिका माता चि द्यावया शर्में[६२] ॥ ३१ ॥
आम्हां बाळांसि बळें स्वहित तुम्ही संत पंत पढवीतां ॥
आत्मपदीं कर धरुनि प्रेमें आग्रह करुनि चढवीतां ॥ ३२ ॥
नेणे प्रवर्तवी जो जलदात्या सुरवरा हरिसि[६३] मोर ॥
थोर प्रभु मानुनि बहु तांडव मेघाचिया करि समोर ॥ ३३ ॥
अजि मायबापहो हे जरि न वदे तोकें[६४] साधु तरि याचें ॥
स्वीकारा स्तवनकुसुम भगवान् घेतो कसा धुतरियाचें ॥ ३४ ॥
आर्यांच्या सत्कृतिला आर्या केल्या जपोनि चवतीस ॥

---

५९ मज्जन=मत्+जन=माझे लोक. ६० मज्जन=अंघोळ. ६१ शुक=पोपट. ६२ शर्म=सुख. ६३ हरि=इंद्र. ६४ तोक=मूल.

या कीर्तिसुधेसि जसी रसिककविमतें नसे चि चव तीस ॥ ३५ ॥
इति श्रीरामनंदनमयूरेश्वरविरचितः साधुसत्कारः संपूर्णः ॥

---

## गंगा-वकिली.

श्रीगंगे करुणावति वरदे परदेवते सदाधारे ॥
बहु वात्सल्य तुझें कीं मज हि ह्मणासि मदमृते सदा धा रे ॥ १ ॥
गंगे कविवर वर्णिति तुझिया अत्यंत पावना शीला ॥
लीलालेशें काढिसि कामाख्या प्रणतहृद्गता कीलीं[65] ॥ २ ॥
भागीरथि जीव तरति शतशः कलि जरि हि पापयुग माते ॥
जे तुज भजति प्रेमें पावति तुझिया सुखें चि उगमातें ॥ ३ ॥
गंगे गंगे म्हणती प्रणतां निर्दोष करिसि सदये तें ॥
जें दुर्लभ तव तीरीं नीरीं[66] त्यजितां चि देह पद येतें ॥ ४ ॥
स्वर्गी जें नामाचें कोणी हि न भजुनि जन नित्राला तें ॥
खंडी हि न घ्यावें तव अमृताच्या त्यजुनि जननि वाँलातें[67] ॥ ५ ॥
हरिहरनाम तसें तव जळ हि जना दे विमान वेगानें ॥
मज ऐशास हि ज्याच्या सज्जनशत देवि मानवे गानें ॥ ६ ॥
श्रीबाबूरायाचा ज्येष्ठ तनय सनय कृष्णराय शतें ॥
सुकवींच्या वर्णावा गंगे दे जें विशुद्ध या यश तें ॥ ७ ॥
श्रीबाबूरायाचा पुत्र पहा पांडुरंग राय कवी ॥
देवि भगीरथनंदिनि तात तसा स्वयश हाहि आयकवी ॥ ८ ॥
श्रीबाबूरायाचा जो नंदन नीलकंठराय सदा ॥
गंगे मुदित असो या वर्णूत द्विज यथेष्ट पाय सदा ॥ ९ ॥
यांच्या मातांसि पहा ज्यां ताई आवर्या असें म्हणती ॥
प्रणती करितों गंगे न करीं साधारणांत तूं गणती ॥ १० ॥
यांचे आश्रित सेवक गुरु जे तत्कामना पुरो हित हो ॥
गंगे ह्मणतीस सुखी व्हाया यजमान हो पुरोहित हो ॥ ११ ॥
अभिमानी स्वजनाचे हे हा यांचा सुदंडक विराजे ॥
गंगे यांतें दर्शन दे यश गातिल उदंड कविराजे ॥ १२ ॥
गंगे बाबूरायप्रभु भक्त तुझा तदीय जन सर्व ॥
तारावे बहुत भली तूं म्हणुन चि तुज शिरीं धरी शर्व[68] ॥ १३ ॥

---

६५ कील=खिळा. ६६ नीर=पाणी. ६७ वाल=सोनें वगैरे वजन करण्याचें एक वजन. ६८ शर्व=शिव.

तरीं यांच्या वाहाति जे दाजीप्रमुख कार्यभारा हे ॥
आर्य तव भजक गंगे सर्वत्र तसीच आर्यभा राहे ॥ १४ ॥
देवि भिकंभट्ट तुला भेटाया योग्य तूं चि या आण ॥
जाण सदाशिवभट्ट हि साधु तयाचें करीं परित्रांण ॥ १५ ॥
त्वां वासुदेवभट्ट हि गंगे ओढुनि बळें चि आणावा ॥
न्हाणावा त्याचा शिशुभाव निज हि मातृभाव जाणावा ॥ १६ ॥
गंगे तुज जो स्मरतो संपन्न चि जीव तो शुचि तपानें ॥
विठ्ठलभट्ट निवाया तव अमृताच्या असे उचित पानें ॥ १७ ॥
जो श्रीमदुपाध्याय श्रीधर शीतोष्णवृष्टि साहेल ॥
राहेल परि गृहीं च द्युनदि तुज तुज्या वरें चि पाहेल ॥ १८ ॥
गंगे भाऊभट्ट त्वद्भक्त चिरायु साधु सुतपा हो ॥
याच्या त्वद्दर्शनफळ जैसें तैसें चि हें हि सुत पाहो ॥ १९ ॥
तुज पांडुरंगशास्त्री पुनरपि पाववया उचित माते ॥
कीं जे ज्ञाते म्हणती ब्रह्मरस चि तव जळा शुचितमा ते ॥ २० ॥
पुरवू नाम तुझें जें गंगे वांच्छील बाजि जोशी तें ॥
ध्यानीं प्रवाह राहो निववि गुणें नेत्रराजि जो शीतें ॥ २१ ॥
गंगे भगवति दर्शन दे राघोपंत जो भिडा याला ॥
कळिकर्म काय न शके क्षण तुजसीं काळ ही भिडायाला ॥ २२ ॥
गंगे आरोग्य बरें दे नाना नाम परचुरा याला ॥
याच्या अहितकरांतें लाव कसी शीघ्र कर चुरायाला ॥ २३ ॥
सफळा उक्ति करीं सुत देउनि विठ्ठल दिवाकरा माजी ॥
गंगे सत्पुत्रभवीं हित जेंवि तमीं दिवाकरामाजी ॥ २४ ॥
विष्णुपदि श्रीविष्णुस्मरणीं रत सर्वदा निळोबा हे ॥
समज न मज चेंगट म्हण तुज यश तत्तारणें मिळों बाहे ॥ २५ ॥
मुद्गलभट्टाचें जें दुःख हरावें समूळ आधीं तें ॥
गंगे गंगे गंगे म्हणत्यांच्या हरिसि तूं चि आधीतें ॥ २६ ॥
शिवरामभाउला तूं गंगे माते म्हणोनि ओ पावें ॥
दुःख भवींचें नुरवीं त्वां शुभदर्शन म्हणोनि ओपावें ॥ २७ ॥
किति राघोबा जोशी सोसील विपत्ति अधनता खोटी ॥
गंगे दे सुख याला कीर्ति तुझी दीनरक्षणें मोठी ॥ २८ ॥

---

६९ परित्राण=रक्षण. ७० पान=पिणें. ७१ द्यु=आकाश. ७२ राजि=पंक्ति. ७३ आधी=मनांतील दुःख. ७४ आपणें=देणें.

तारिसि कीं तुज येती पाहुनि पापार्त मानवां कीव ॥
साधुपुढें तरि गंगे मूढांची धरुनि मान वांकीव ॥ २९ ॥
श्रीगंगे [७५]लांचीव स्वगुणीं विषविषयसक्त आंचीव ॥
करुनि कृपा वांचीव प्राणी जड पुण्य कीर्ति सांचीव ॥ ३० ॥
द्युनदि तुज तुझी म्हणती अमृतें सर्वत्र वर्ष देवि दया ॥
गोविंदराय हास्यप्रद तव दर्शन असो चि हर्षद या ॥ ३१ ॥
गंगे तुज पाहुनि जें दुःख त्यागूत एकवोटे तें ॥
बहु भारार्त जन जसा उतरुनि शिरावरील [७६]मोटेतें ॥ ३२ ॥
देवि विसोबाबापू तत्सुत तद्बंधु सर्व हि तरावे ॥
इतरा वेद तुज परि न गाति तुवां सर्व अर्थ वितरावे ॥ ३३ ॥
द्वेनादि करू आळस न भिकाजी रामचंद्र तो याया ॥
म्हणसी तूं सर्वांस प्राशा अमृतोत्तमा स्वतोया या ॥ ३४ ॥
गोपाळभट्ट साधु श्रीभागीरथि मिळो तया वित्त ॥
तळमळ न करी कोणा सुज्ञाचें तुज पहावया चित्त ॥ ३५ ॥
जो शेंबेकर राघोपंत तयाच्या सुतांसि तूं नेटें ॥
भेटें श्रीविष्णुपादि त्वन्नामें या भवार्णवीं बेटें ॥ ३६ ॥
गंगे असें करीं कीं गतिस सदाशिव ऱ्हाळकर पावे ॥
तव नयनें दोषतरु हि जेंवि अतिहिमें [७७]टहाळ करपावे ॥ ३७ ॥
आणिक हि कांहि आइक आइ करावा चि मान्य हा शब्द ॥
करुणाकटाक्ष तव हो गाडगिळीं जेंवि चातकीं [७८]अब्द ॥ ३८ ॥
त्वां कृष्णभट्ट वैष्णव सुखवावा द्युनदि आसरा याचा ॥
ब्राह्मण्य अनादरितां ब्राह्मण लौकिक न हा सरायाचा ॥ ३९ ॥
गंगे रागें भरसिल कां भारी मानिसील या कार्या ॥
दीनोद्धारीं हरिहरसमशीला तूं चि सं[७९]नुता आर्या ॥ ४० ॥
वेदांतश्रवणनिरत निर्मळमति विश्वनाथसुत तात्या ॥
त्वदृष्टिनें मिळावी संतति कीर्ति हि जगांत [८०]सुतता त्या ॥ ४१ ॥
हरिभक्त सदावर्ती मारडकर योग्य तुज पहायास ॥
गंगे गोविंदपदीं हें कृतपण वित्त शिर वहायास ॥ ४२ ॥
भागीरथि करुणावति मैनासुत बाळ आण तार चि तो ॥

---

७५ लांचीव=लंपट कर. ७६ मोट=ओझें. ७७ टहाळ=ओल्या फांद्या. ७८ अब्द=मेघ. ७९ नुता=स्तविलेली. ८० सुतता=सुतसमूह. ("ता" हा प्रत्यय समूह दाखविणारा जसें—जनता, बंधुता इ०)

अंजळि दास तुज पुढें हा तव माहात्म्य जाणता रचितो ॥ ४३ ॥
गंगे देवि हुणाखे भव्यगुणा खेदनाशका तीरा ॥
पावोत तुझ्या नीरा सेवुत जें प्रिय शिवा महाधीरा ॥ ४४ ॥
बहिरोबा दादा हे गातात सदुक्ति रामदासाच्या ॥
गंगे तुजहुनि न उण्या त्या स्वाश्रितसर्वकामदा साच्या ॥ ४५ ॥
साधु महादेवतनय राघोबा रामदास जनदास ॥
तव ओघास विलोकुनि नाचो जैसा मयूर वैनंदास ॥ ४६ ॥
गंगे दारिद्र्य श्रम देतें गोपाळनायका याचें ॥
अघ नाशीं स्वस्मरणें हें वाक्य नव्हे चि नायकायाचें ॥ ४७ ॥
गंगे भुजंगनायक काय करिल यासि तूं चि आण कसी ॥
श्रीविष्णुपदी प्रभु तूं मज तुजला घालवेल आण कसी ॥ ४८ ॥
कृष्णद्विज करंदीकर याची निष्ठा सदाशिवीं मोटी ॥
याचा उद्धार किती गंगे तारिसि असे सदा कोटी ॥ ४९ ॥
गंगे बहु काय वदों बहु कष्टी दीन देवबा होतो ॥
त्यातें समीप सत्वर दिनांचा बंधु देव बाहो तो ॥ ५० ॥
जो बाबुराय कृष्ण श्रीगंगे बहु गरीब हा याला ॥
भेटुनि कृतकृत्य करीं तव कीर्ति च बहु बरी बहायाला ॥ ५१ ॥
गंगे दोष हरावा त्वां राघोपंत कोतवाला जो ॥
भवजलधि गिळिसि तुज जळकण गिळितां कां न तो तवा लाजो॥५२॥
गंगे तव भव्य तटीं पावो आचार्य आवजी वास ॥
त्वत्पुण्यदृष्टि होतां येतो द्यायास आँव जीवास ॥ ५३ ॥
दहनें कोण प्रतिभेंट ऐसें म्हणतां म्हणेल ओ घाँस ॥
परि अघनगें लक्ष तुझ्या ऐकाया हि न शकेल ओघास ॥ ५४ ॥
दुनदि जिभेतें म्हणतो उपकार सुपुण्य परि सये राहें ॥
वद गंगा गंगा कीं अधिक स्वदुरुक्तिपरिस येरा हे ॥ ५५ ॥
प्राकृतजन संकोच हि न शकें वारावयासि रसना मीं ॥
बहु नाहीं काय तुझ्या गंगे तारावयासि रस नामीं ॥ ५६ ॥
रसना साध्वी मान्या संकोच असाधु या उडीव सये ॥
मम यजमानजना म्हण मत्तीरीं जो असे कुडी वस ये ॥ ५७ ॥
श्रीभागीरथि यावें धांवत संतानतें तम रसाचें ॥
पान स्नान घडो तव तीर्थाचें हरियशासमरसाचें ॥ ५८ ॥

८१ वनद=ढग. ८२ आव=हिमत. ८३ भट=योद्धा. ८४ घास=गवत. ८५ नग=डोंगर.

गंगे तूंचि भवार्णवमग्नांचे पूर्ण करिसि काम तरी[८६] ॥
तो चिमणाजी पाठक पाठ करू तव सहस्रनाम तरी ॥ ५९ ॥
बारामती पुरीचा तव वेंकटराय देशमुख दास ॥
पात्र करीं गंगे जें तव दर्शन या चि परम सुखदास ॥ ६० ॥
देशमुख श्रीबाबूराय प्रिय शूर मान्य मायाजी ॥
तत्पुत्रातें गति मति देती देईल न भ्रमा या जी ॥ ६१ ॥
बारामतिस्थ जे त्यां पाळीं तूं सर्व देशपांड्यातें ॥
जगदंबे जंतूंतें जपसि तसी पक्षिणी न आंड्यातें ॥ ६२ ॥
अमरनदि देशपांड्या बापू हा पूत तोयें[८७] तव सेवू ॥
स्नाता ची अन्यत्र क्षण ही स्वर्ग त्यजूनि न वसे वूं[८८] ॥ ६३ ॥
मुक्त करावे गंगे त्यां जे बारामतींत कुलकरणी ॥
पतितोद्धृति हे पाडी गुनादि तुझी बहु बुधांसि भुल करणी ॥ ६४ ॥
बारामतीपुरीचे जे पाटिल चौगुले तदघ भंगे ॥
रंगे स्वस्मरणीं तरि तच्चित्त सदां असें करीं गंगे ॥ ६५ ॥
तव तीर्थी स्नान करुनि गंगे पितरांसि उद्धरू चिमाजी ॥
लोक ह्मणोत कसें तरि तुज तो वाटेल शुद्ध रुचि माजी ॥ ६६ ॥
शिंपी मैराळ ढबू हे साधू स्वप्रसूसि[८९] घेवूत ॥
येवूत श्रीगंगे वत्स तसे तव पयांसि[९०] सेवूत ॥ ६७ ॥
श्रीगंगे त्वां द्यावें दर्शन जो हेंदरा सुभाना त्या ॥
हें उचित होय माता तूं प्राणी बाळ या शुभा नात्या ॥ ६८ ॥
जो राम कृष्ण ऐसें देवि पहाटे म्हणे सदा सांजे ॥
तो साधु शिपा हो तव चरण उपेक्षिति [कदा] न दासां जे ॥ ६९ ॥
गंगे तूं कल्पलता देसी पुरुषार्थ न कारितां वीणी[९१] ॥
वीणी[९२] व्यय कां न करूं तारीं सिदराम आदि ते वाणी ॥ ७० ॥
गंगे त्वां तारावे कुंभार सुतार परिट लोहार ॥
जोहार म्हणायाचा जो प्रभुचा होय देवि तो हार ॥ ७१ ॥
गंगे सद्गति सर्वां हैबतरायादि बाबराला हो ॥
खळ हांसोत मज भले म्हणातिल घेतोसि बा बरा लाहो ॥ ७२ ॥
बारामतींत वसती जे तारावे चि देवि तेलि हि ते ॥
जड अरि हेयें[९३] पुराणीं तरि कां हरि कीर्ति सेविते लिहिते ॥ ७३ ॥

---

८६ तरी=होडी. ८७ तोय=पाणी. ८८ वू=डोक्यांत होणारी ऊ. ८९ प्रसू=आई. ९० पय=पाणी; दूध. ९१ वाणी=कमताई. ९२ वाणी=शब्द. ९३ हेय=त्याज्य.

उद्धारिले सगरसुत ब्रह्मद्वेषी सहस्र जे साठ ॥
पाठ अघाची पुरविसि हे विद्या देवि तुज बरी पाठ ॥ ७४ ॥
काय महत्त्व कवीरीं हरिभक्ति न दे सुरापगे यवनीं ॥
त्वत्सेवनें [हि] पावो स्थिति शक्राच्या सुराप गेयें वनीं ॥ ७५ ॥
तुज भेटोनि निवावे गंगे शेटे महाजन हि सारे ॥
दीनांसि तूं चि म्हणसी शक्राधिक भजुनियां मज दिसा रे ॥ ७६ ॥
आर्थिप्रार्थित पुरतें आश्रय करितां चि कल्पवल्लीला ॥
तव यश काय वदावें देवि तुझ्या शेषतल्पवल्लीला ॥ ७७ ॥
मद्गुरुपुत्र सदाशिव यज्ञेश्वर यांसि भेट दे यश तें ॥
जें शुचि निवविसि गंगे तूं चि स्वजना अदेय देय शतें ॥ ७८ ॥
वरशील सहाध्यायी साधु सदाशिव तयासि तूं गंगे ॥
दर्शन दे द्रवसिल तरि विघ्न न करितील सर्वथा दंगे ॥ ७९ ॥
श्रीविठ्ठलभजनाचा बहु काशीनाथ साधु या लाहो ॥
श्रीगंगे प्राप्त तुला इतरा तव पाथसा धुयाला हो ॥ ८० ॥
गंगे देवि त्रिंठोबा दादा श्रीविष्णुभक्त शिवशील ॥
एतद्गीत हरियशश्रवणें काशीसमेत निवशील ॥ ८१ ॥
याचा परम प्रेमळ नंदन मैराळ तो तथापि कसा ॥
येतो जो पंढरपूर चूतवनीं करितसे कथा पिकसों ॥ ८२ ॥
हरिजनसंग तुज रुचे गंगे सादर अशांसि पाचार ॥
साचार कथारस घे प्राज्य स्वाश्रितजना हि हा चार ॥ ८३ ॥
तीर्थपद श्रीविठ्ठलमूर्ति स्थापूनि आदरें भजतो ॥
श्रीगंगे गोसावी गोविंद गमेल दूर कां मज तो ॥ ८४ ॥
जो अमरसिंह जाधव या धवल प्राज्य यश जसें मातें ॥
तोक हि लोकहितावह दे जें शिवभक्तिच्या रसें मातें ॥ ८५ ॥
गंगेसंदर्शन दे श्रीविष्णुस्वामिभक्त नानातें ॥
जग तोक माय तूं हें पूर्ण करु मनोरथासि या नातें ॥ ८६ ॥
यावे प्रभु प्रतापा करूनि पुढें तुज नमावया फडके ॥
गंगे तव तेजें तों विघ्नांचें उर कठोरही तडके ॥ ८७ ॥

---

९४ सुराप=मद्यपी. ९५ गेय=वर्णनीय. ९६ शेषतल्पवल्लीला=शेष. + तल्प-वत् + लीला=शेषावर निजणाऱ्या विष्णूसारखी लीला म्ह० क्रीडा. ९७ शिव-शील=कल्याणकारक आहे स्वभाव ज्याचा. ९८ चूत=आंब्याचें झाड. ९९ पिक=कोकिल. १०० प्राज्य=पुष्कळ.

व्हावे कृतार्थ गंगे यावे पूजावया तुला रास्ते ॥
हा स्तेनांसि म्हणविते पाठिव निजदूत परचमूशास्ते ॥ ८८ ॥
यावे द्युनदि खळांतें श्रीमाधवराय पेशवे दमुनी ॥
व्हावे श्रीरामजयें हृष्ट जसे सर्व देश वेद मुनी ॥ ८९ ॥
देवि अहल्याबाई पावी भेटावयासि सत्वर ती ॥
तूं पुण्यकीर्ति हे ही गंगे दोघी जणी हि सत्वरती ॥ ९० ॥
सद्गति जडांसि गंगे संपत्ति क्षेत्रवासि विप्रकुळा ॥
तुजला कीर्ति मिळेल प्रीति हरिहरांस ही न जीस तुळा ॥ ९१ ॥
भगवति भगवद्भक्त श्रीधर-हृदयांत न व्यथा राहो ॥
ब्रह्मकुटुंबशतभरण भवऋणभर हरुनि भव्य थारा हो ॥ ९२ ॥
द्यावी सद्गति गंगे त्वां माझ्या अग्रजांसि जो भावें ॥
तुज भेटे स्त्रीपुत्र त्यागुनि जेथें अवश्य लोभावें ॥ ९३ ॥
देवि मम पितृव्याचे सुत सुतरी कष्टपात्र रक्षावे ॥
लक्षावे मात्र तुझ्या दृष्टीनें सर्व दोष भक्षावे ॥ ९४ ॥
गंगाधर नारायण मन्मातुळपुत्र जे तदानयनें ॥
गंगे कुळ तारावें निववावीं तापलीं सदा नयनें ॥ ९५ ॥
मद्बंधूचे माझे तारावे श्वशुर मेहुणे साडू ॥
धाडू चित्त तुजकडे गंगे न च मोह मज्जना नाडू ॥ ९६ ॥
मम बाळमित्र सर्व हि गंगे तूं अच्युतप्रमुख तारीं ॥
वारीं संसारभ्रम सारीं प्राचीन पातकें सारीं ॥ ९७ ॥
बाबूराय तव सुत चि न शकें तत्प्रेमवर्णना तुंडें ॥
कुरवाळीं तदपत्यें भरुत यशें साधुकर्ण नातुंडें ॥ ९८ ॥
श्रीगंगे उरले ही वांचीव क्षुधित जीव सत्रप ते ॥
म्हणति असें जेउनि जे स्वजना नाभी न होति सत्रप ते ॥ ९९ ॥
देवि तव पथें प्रमुदित बहु सुरभीतनुभवा परि समोर ॥
हा स्वजनाच्या मागें या तुझिया अनुभवापरिस मोर ॥ १०० ॥
तुज ऐकविलि मयूरें सर्वजनहितोदया स्तवनवाणी ॥
हे द्याया आहेस प्रभु करिसिल देवि यास्तव न वाणी ॥ १०१ ॥
जी पांडुरंगरायें दिधली या सुयश दे वकीलीला ॥

---

१ स्तेन=चोर. २ चमू=फौज. ३ अग्रज=वडील भाऊ. ४ पितृव्य=चुलता. ५ मातुल=मामा. ६ मज्जन=मत्+जन=माझे जन. ७ सत्रप ते=अन्नछत्र घालणारे. ८ सत्रप=सलज्ज.

ऐकोत तुझ्या हि सुखें श्रीगौरी अदिति देवकी लीला ॥ १०२ ॥

॥ श्लोक ॥ त्वां दीन गंगे अति धन्य केला । ध्यातां तुज श्रीपतिकन्यकेला ॥
तूं जेंवि दीनासि असीम हातें । लोकीं न देणार असी महातें ॥ १०३ ॥
तारिले अघ निवारुनि गंगे । सर्व दास मज पावन तातें ॥
दाखवूं चरित कीर्ति करावी । सर्वदा समज पाव नतातें ॥ १०४ ॥
केली तुवां ख्याति महानदींनें । कीं मानिला स्वर्ग लहान दीनें ॥
शंभुत्व विष्णुत्व हि अर्पितीस । ज्ञानामृतें जंतुसि तर्पितीस ॥ १०५ ॥

कळाविद्या जाणे स्तुति करि रसें तो कवि नवी
तदन्य प्रेमें जो प्रिय तुज जसें तोक विनवी ॥
स्तवें भंगे गंगे दुरित समजे हा तव दया
न भी ऐसें चित्तीं तरि नुचलितां हात वद या ॥ १०६ ॥

॥ आर्या ॥ जो सज्जनरंजन सुत दादा मार्गांत पावला मरण ॥
स्मरण धरुनि करावें गंगे त्वां तद्भवव्यथा-हरण ॥ १०७ ॥

॥ दोहा ॥ काढीं जो नतजनमनीं दुःसह तो भवकील ॥
द्युनदि मयूरयशोधनीं हा कृतलोभ वकील ॥ १०८ ॥

॥ आर्या ॥ गुरु माझे श्रीराम श्रीमत्केशव गणेश हरि चवथे ॥
यांचा प्रसाद वदला गंगामृत पी यथेष्ट वरि चव घे ॥ १०९ ॥

॥ इति श्रीरामनंदनमयूरविरचित श्रीगंगावकीली संपूर्ण ॥

## उपसंहार.

आज पर्यंत आह्मीं मोरोपंतकृत ५४ सुरस प्रकरणें छापिलीं. ह्यांत ग्रंथ सुमारें तीस हजार आला आहे. हीं स्फुट प्रकरणं फारच मनोरंजक आहेत हें वाचकांचे लक्षांत येऊन चकलें असेलच. ह्या ५४ प्रकरणांत "विष्णुपद-वकीली" व "गंगा-वकीली" हीं ऐतिहासिक दृष्टीनें पाहतां फारच महत्वाचीं होत. ह्या दोहोंत पंतांनीं आपले विषयीं कांहीं गोष्टींचा उल्लेख केलेला आढळतो. त्यांचा भाऊ आबाजोपंत होता व भावजय सगुणाबाई होती असें विष्णुपद वकीलीच्या ६८व्या आर्येवरून स्पष्ट होतें. त्यांची स्त्री रमाबाई इनें काशीस जाण्याविषयीं प्रथम प्रेरणा केली असें त्याच प्रकरणाच्या ६९व्या आर्येवरून दिसतें. त्यांचे यजमान बाबूराय जोशी यांस कृष्णराय, पांडुरगराय, व नीळकंठराय असे तीन पुत्र होते असें गंगावकीलीच्या आर्या ७,८,९ आणि विष्णुपद-वकीलीच्या आर्या १३,१४,१५ यावरून दिसून येतें. ह्या तिघांच्या आया ताई व आबई होत्या असें गंगावकीलीच्या १०व्या आर्यैंत सांगितलें आहे. ह्यावरून बाबूराय यांस दोन बायका होत्या असें वाटतें. ह्या प्रकरणाच्या ९व्या आर्यैंत बाबूराय याबद्दल

चुकोनें आबूराय असें पडलें आहे. पंतांच्या बाळमित्रांत एक अच्युत नांवाचा मित्र होता असें गंगावकीलोच्या १७व्या आर्यंत आहे. गंगाधरपंत पराडकर यानें पंतांस काशीस जाण्याच्या कामीं मदत केल्याचा उल्लेख विष्णुपदवकीलीच्या १०व्या आर्यंत आहे. ज्या † अमरसिंग जाधवानें पंतांस काशीस नेलें त्याचा उल्लेख गंगावकीलीची आर्या ८५ व विष्णुपदवकीलोची आर्या १ ह्यांत आहे. त्यांचे चवथे गुरु ह्यांचा उल्लेख गंगावकीलीच्या १०१व्या आर्यंत आहे. काशीस जातांना वाटेंत दादा या नांवाचा पुरुष मृत झाला असें त्याच प्रकरणाच्या १०७ व्या आर्यंत लिहिलें आहे. त्याच प्रकराणाच्या प्रकरणाच्या १३व्या आर्यंत वडील भावाचा, १४व्या आर्यंत चुलत भावांचा, १५ आर्यंत मामेभाऊ गंगाधर व नारायण यांचा उल्लेख आढळतो. बारामतीकर जोशी यांचे मुख्य कारभारी दाजीबा होते असें त्या प्रकरणाच्या १४व्या आर्येवरून होतें. विष्णुपदवकीलीच्या ३७व्या आर्यंत सांगितलेली आका ही बाबूरावाची बहीण असावीसें वाटतें. आपलें निवासस्थान जी बारामती तिचा निर्देश गंगावकीलीच्या आर्या ६०, ६२, ६४, व ७३ ह्यांत पंतांनीं केला आहे. त्यांचे गुरुपुत्र सदाशिव आणि यज्ञेश्वर ह्या नांवाचे होते व त्यांतून सदाशिव हा त्यांचा सहाध्यायी होता असें त्याच प्रकरणाची आर्या ७८ व ७९ ह्यांवरून दिसून येतें. पेशव्यांच्या पदरचे सरदार फडके व रास्ते ह्यांचा उल्लेख आर्या ८७ व ८८ ह्यांत व अहल्याबाई होळकरणीचा आर्या ९० ह्यांत आहे. खुद्द सवाई माधवराव पेशवे ह्यांस विजय प्राप्त व्हावा अशी प्रार्थना आर्या ८९ ह्यांत केली आहे. ८६व्या आर्यंतील नाना हे नाना फडणीस असावेसें वाटतें. २७व्या प्रकरणांत वामन, तुळसीदास, चांगदेव, व निवृत्ति ह्यांचें वर्णन पंतांनीं केलें आहे. शके १६८४*त झालेल्या भक्तविजय ग्रंथाचा कर्ता जो ताहाराबादकर महिपति त्याची स्तुति १८व्या प्रकरणांत आहे. तिच्या ९व्या आर्येवरून महिपतीचा पुत्र विठ्ठल या नांवाचा होता असें दिसतें. १६व्या प्रकरणांत भगवद्गीतेचा भाष्यकार शंकराचार्य व टीकाकार मधुसूदन ह्यांचा उल्लेख ७व्या आर्यंत असून प्राकृत टीकाकार ज्ञानेश्वर व वामन ह्यांचा उल्लेख त्या प्रकरणांत आहे. या आर्येवर आम्ही पूर्वी दिलेली टीप चुकली आहे. ज्ञानेश्वरीची थोरवी त्या प्रकरणाची आर्या ३–१० ह्यांत वर्णिली आहे. आठव्या प्रकरणांत पैठणकर एकनाथ स्वामींचें रसाळवर्णन आहे. सारांश हीं ५२ प्रकरणें फार मनोरंजक असून ह्यांत बरीच उपयुक्त माहितीही आहे. पंतांचें चरित्र ह्या ग्रंथारंभीं दिलें आहे त्यांत त्यांच्या गोत्राचा उल्लेख आला नाहीं ह्मणून तत्संबधीं आर्या एथें दाखल करून हा अल्पलेख आटपतों:—

बा पाव जामदग्न्या ! रामा ! तूं शत्रु मृगकुळीं हरिसा ।
मज तव गोत्रोत्पन्ना पीडिति कामादि नित्य हे अरि सा ॥ १२ ॥

महद्विज्ञापना.

समाप्त.

---

† धनाजी जाधवाचे नातु. यांचे वंशज श्री० शंभुसिंग जाधव माळेगांवकर हे पुणें हायस्कुलांत इंग्रजी अभ्यास करीत आहेत.

* शके सोळाशें चवऱ्यायशी । चित्रभानुनामसंवत्सरासी ॥
वैशाख वद्य द्वादशीसी । ग्रंथ सिद्धीसी पावला ॥ २१५ ॥
प्रवरे पासूनि दक्षिणेस । ताहाराबाद गांव पांच कोस ॥
भक्तविजय अति सुरस । झाला असे ते ठायीं ॥ २१६ ॥ अ० ५७.

भक्तविजय.